कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेंतील

त्रिविध

• विद्वत्त्व आणि कवित्व, • इतिहास, • आमच्या देशाची स्थिति

संपादक

श्री. जी. सी. जोशी,

एम्. ए.

सिटी बुक स्टॉल,

अप्पा बळवंत चौक, पुणें २.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेंतील

तीन निबंध

विवेचक प्रस्तावना, निबंधांचा सारांश
व भरपूर टीपा...

• विद्वत्त्व आणि कवित्व • इतिहास • आमच्या देशाची स्थिति

वि: १२६१
नों: दि: १७५३
ग्रं. ८७५६
१७३

संपादक

श्री. जी. सी. जोशी,

REFBK-0009756

सिटी बुक स्टाल,
अप्पा बळवंत चौक, पुणें २.

मूल्य ३ रु.

प्रकाशक :
एस्. जी. कुलकर्णी,
३२३ सदाशिव पेठ
विद्यामंदिर प्रकाशन
पुणें २.

प्रथमावृत्ति जून १९५८
सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन
मूल्य तीन रुपये

मुद्रक :
सी. एस्. लाटकर,
प्रशान्त प्रिंटिंग प्रेस,
२५२-५ नारायण पेठ, पुणें २.

प्रस्तावना

पितापुत्र बाणभट्ट, पितापुत्र पंडित नेहरू, पितापुत्र बाळाजी आणि बाजीराव अशा थोर परंपरेंत बृहस्पति म्हणून ज्यांच्या विद्वत्तेचा गौरव झाला अशा कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या पोटीं विष्णुशास्त्र्यांचा जन्म २० मे १८५० रोजीं झाला. लहानपणीं त्यांचें लालनपालन आजा-आजींनींच केलें. लहानपणीं मनावर होणारे संस्कार हे मनुष्याच्या भावी आयुष्याची दिशा ठरविण्यास उपयोगी पडतात; आणि याच अर्थानें 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' असें आपण म्हणतों. शास्त्रीबुवांच्या ठिकाणीं असलेली रसिकता आणि बाणेदारपणा, तसेंच विद्याव्यासंगाची आवड हे गुण त्यांनीं आपल्या ख्यातनाम वडिलांच्याकडून घेतले. पण आजा-आजींनीं सदाचरणाचे आणि धर्मनिष्ठेचे धडे त्यांना लहानपणींच दिले. त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं रसिकता असूनहि रंगेलपणा अभावानें तळपत होता. वडिलांच्याप्रमाणें आचारांचा सैलपणा त्यांच्या ठिकाणीं दिसत नसे. वयाच्या केवळ १५ व्या वर्षीं सन १८६५ मध्यें ते प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनीं डेक्कन कॉलेजमध्यें आपलें नांव दाखल केलें. कॉलेजमध्यें असतांनाच त्यांना कवितेचा नाद लागला. पन्हाळकरबुवांचीं कीर्तनें ऐकून त्यांची मराठी कवितेबद्दलची आवड वाढीस लागली. त्यांना वाचनाचा जबरा नाद होता. मराठी आणि संस्कृतमधील बहुतेक सर्व नाटकें व काव्यें, व मोरोपंत, मुक्तेश्वर व वामन पंडित यांचीं 'सर्वसंग्रह' मध्यें प्रसिद्ध झालेलीं काव्यें त्यांनीं वाचलीं. इंग्रजी भाषा आणि इतिहास यांचाहि त्यांचा व्यासंग दांडगा होता. वयाच्या २२ व्या वर्षीं ते बी. ए. झाले. बी. ए. साठीं त्यांनीं इतिहास, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र आणि नीतिशास्त्र या विषयांचाहि अभ्यास केला. बी. ए. झाल्यानंतर इंग्लंडमधील ॲडिसन, जॉन्सन् यांच्याप्रमाणेंच आपणहि जीवन घालवावें असा त्यांनीं संकल्प केला. मराठी भाषेविषयीं नवीन विद्वानांत जी अनास्था दिसत होती, ती दूर करून व मराठींतच ग्रंथरचना करून देशसेवेची सुरवात त्यांनीं देशभाषेपासून केली. कृष्णशास्त्री चिपळूणकर १८६५ पासून 'शालापत्रक' नांवाचें मासिक चालवीत असत. त्यांत कृष्ण-

शास्त्र्यांनीं 'रासेलस्'च्या १८-२० भागांचें भाषांतर प्रसिद्ध केलें व बाकीचें काम आपल्या मुलावर-विष्णुशास्त्र्यांवर सोपविलें. तें काम विष्णुशास्त्र्यांनीं समाधानकारक पार पाडलेलें पाहून त्यांनीं शालापत्रकाचें संपूर्ण काम विष्णुशास्त्र्यांकडे दिलें. विष्णुशास्त्र्यांनीं इंग्लिश कवितेवर कांहीं लेख शालापत्रकांत प्रसिद्ध केले. संस्कृत कवींवर लेखमालाहि प्रसिद्ध केली. कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु आणि दंडी यांच्या काव्यग्रंथांचें गुणग्राही परीक्षणहि त्यांत प्रसिद्ध केलें. संस्कृत कविपंचकाप्रमाणें मराठी कवींवरहि लेखमाला शालापत्रकांत प्रसिद्ध केली. मध्यंतरीं शालापत्रकावर गंडांतर आलें व शालापत्रकाचा सरकारी आश्रय तुटला. कारण विष्णुशास्त्र्यांनीं मिशनऱ्यांविषयीं व इंग्रजांविषयीं मोकळेपणानें विचार मांडावयास सुरवात केली व तें सरकारास न आवडून १८७५ मध्यें शालापत्रक बंद करण्यांत आलें. पण त्याच्या आधींच १८७४ मध्यें विष्णुशास्त्र्यांनीं आपली विख्यात 'निबंधमाला' सुरू केलेली होती. त्या वेळीं विष्णुशास्त्र्यांचें वय केवळ २४ वर्षांचें होतें. शास्त्रीबुवांनीं सरकारी शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली. पण विष्णुशास्त्री शाळेच्या कामांत अनियमित वागल्यामुळें व शाळेच्या मुख्याध्यापकांनीं शास्त्रीबुवांच्या वडिलांची निंदा केल्यामुळें त्यांचा कुंटयांशीं बेबनाव झाला. निबंधमालेचें वाढतें वजन आणि तेजस्वीपणा पाहून सरकारी अधिकारी आणि मिशनरी संतप्त झाले. इंग्रज इतिहासकारांची निंदा व बंडवाल्यांची स्तुति केल्यावर अधिकारी न चिडतील तरच नवल ! हिंदुस्थानांतील इंग्रजांची स्वकीयांशीं वागणूक उर्मटपणाची होती. मिशनरी मोठे कावेबाज होते. कांहीं हिंदु लोक बाटून ख्रिश्चनहि झाले होते. ते स्वतःस इंग्रजांच्या तोडीचे समजत असत. या सर्वांवर रोख ठेवून त्यांनीं हत्यार उपसलें. तेव्हां या बंडखोर लेखकाविरुद्ध कांगावा करून त्यास राजद्रोही ठरवावें व हा कांटा काढून टाकावा असें त्यांनीं ठरविलें. पण थोरल्या शास्त्रीबुवांच्या पुण्याईमुळें त्यांतून म्हणण्यासारखें कांहींच निष्पन्न झालें नाहीं, फक्त एतद्देशीय वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तिरप्या नजरेमुळें त्यांची बदली रत्नागिरीस झाली. प्रापंचिक अडचणीमुळें शास्त्रीबुवांनीं मूग गिळून रत्नागिरीस मुक्काम हलविला. पण सरकारनें केलेला उपमर्द निमूटपणें सहन करण्याइतके ते लाचार नव्हते. रत्नागिरीस बदली होण्याचे थोडे पूर्वी त्यांनीं

'काव्येतिहाससंग्रह' व 'चित्रशाळा' यांच्या योजना आंखलेल्या होत्या. सरकारी नोकरीची रेशमी गांठ तोडून टाकण्याचा त्यांनीं त्याच वेळीं निश्चय केला होता. सरकारी नोकरीच्या संकुचित वातावरणांत त्यांची प्रतिभा गुदमरून गेली असली पाहिजे. सरकारी नोकरीवर लाथ मारून ज्ञान-प्रसाराच्या मार्गानें देशसेवा करण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला, व ह्याच दृष्टीनें त्यांनीं निबंधमाला सुरू केली होती. चिपळूणकर रजा घेऊन १८७९ मध्यें पुण्यास आले ते परत रत्नागिरीस गेलेच नाहींत. त्यांनीं नोकरीचा राजीनामा दिला होता. "गुलामगिरी करून पोट भरण्याची आपल्या लोकांची हीन दशा लक्षांत आणली म्हणजे राजसेवा ही ईश्वरदत्त अजब चीज आहे" असें जे समजतात तें नीटच आहे. सरकारी नोकरी बुद्धिपुरःसर सोडून देणें म्हणजे शुद्ध वेडेपणा किंवा प्रत्यक्ष आत्मघात करण्यासारखें आहे. "जुलुमगार वरिष्ठ अधिकाऱ्याला मस्तक नमविण्यापेक्षां एकदम सर्व संबंध तोडून मोकळें व्हावें हें बरें.....नीटशी संधि मिळाली कीं स्वातंत्र्या-वलंबन करावयाचा माझा पक्का विचार होता. एक छापखाना काढून तो चांगली मेहनत करून चालवावा व तद्द्वारें होईल तितकें देशकार्य करावें असा माझा विचार आहे. रुपेरी वेडी पायांत न वागविण्याचा माझा निश्चय घटका अर्ध घटकेचा नव्हता" असें त्यांनीं आपल्या राजीनाम्यासंबंधीं निवेदन आपल्या गांगल नांवाच्या मित्रास लिहिलेल्या पत्रांत केलें आहे. यावरून त्यांचा बाणेदारपणा दिसून येतो आणि विधायक देशभक्तीबद्दल त्यांची तळमळ प्रतीत होते. इ. स. १८८० मध्यें टिळक, नामजोशी, आगरकर, आपटे इ. थोर थोर सहकाऱ्यांच्या मदतीनें त्यांनीं 'न्यू इंग्लिश स्कूल'ची प्रस्थापना केली व १८८१ मध्यें त्यांनीं 'केसरी' आणि 'मराठा' हीं वर्तमानपत्रें सुरू केलीं. शास्त्रीबुवांनीं अशी एकहि संस्था काढलेली नाहीं कीं, जी यशस्वी झाली नाहीं; त्यांनीं असें एकहि कार्य हातीं घेतलें नाहीं कीं जें त्यांनीं तडीस नेलें नाहीं. त्यांची देशभक्ति डोळस होती. त्यांच्यापुढें निश्चित ध्येय होतें. त्यांचें आयुष्य योजनाबद्ध होतें. देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय. सज्ञान दशेचें फळ देशोन्नति हें होय. राष्ट्राची सुधारणा करावयाची म्हणजे तिचा पाया आत्मस्थितीचें पूर्ण ज्ञान हा होय, असें त्यांनीं प्रतिपादन

केलें आहे. प्रत्यक्ष शिक्षकाचा पेशा पत्करून त्यांनीं ज्ञानदान केलें; निबंध-माला सतत ७ वर्षें चालवून आणि केसरींतून लेख लिहून लेखणी कार्यक्षम केली. त्यांनीं आरंभिलेले सर्व उद्योग ज्ञानमार्गाला उपकारक असेच होते. १८८२ मध्यें त्यांनीं इहलोकींची यात्रा संपविली. ७४ ते ८२ हा त्यांच्या आयुष्याचा कळसाध्याय होता. ह्या काळांत त्यांनीं अनेक संस्थांना जन्म देऊन नांवारूपास आणलें. चिपळूणकरांची प्रतिभा विशिष्ट ध्येयानें उद्दीपित होत असे. त्यांची सामर्थ्यशाली लेखणी अखिल महाराष्ट्राला राष्ट्रवादाची दीक्षा देण्यास समर्थ ठरली. त्यांनीं आपल्या मालेंतून राष्ट्रीय-त्वाचा अनमोल उपदेश महाराष्ट्राला दिला. अत्यंत अल्प आयुष्यांत त्यांनीं केलेली महान् कामगिरी लक्षांत घेतां त्यांची तुलना शंकराचार्य, विवेकानंद, रामतीर्थ इ. थोर विभूतींच्या बरोबर करणें योग्य होईल. त्यांनीं मराठी भाषा समृद्ध बनविली; आणि महाराष्ट्राला राष्ट्रवादाची दीक्षा दिली. आगरकरांच्या शब्दांत ते 'महाराष्ट्रवाणीचे पति' होते.

निबंधमालेची सुरवात व तत्पूर्वीची महाराष्ट्राची स्थिति

१८७४ मध्यें निबधमाला सुरू झाल्यापासून महाराष्ट्राच्या नव्या पर्व-काळाला सुरवात झाली. टिळक, आगरकर आणि चिपळूणकर यांची राष्ट्रीय विकासाचें कार्य करणारी दुसरी पिढी होय. तत्पूर्वी बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, लोकहितवादी, ज्योतिराव फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, इ. मंडळींनीं पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रज आमदानीच्या ऐन सुरवातीच्या कालखंडांत साप्ताहिकें, मासिकें, वृत्तपत्रें काढून लोकजागृतीच्या कार्याला सुरवात केली होती. मराठी भाषा ही अर्थव्यंजक नाहीं, इंग्रजी भाषेप्रमाणें आपला अभिप्राय प्रकट करण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं नाहीं असा लोकांचा समज होता; पण राष्ट्रोन्नतीची बरोबर कल्पना ह्या लोकांना होती. इंग्रजी विद्येपासून होणाऱ्या लाभांत स्वातंत्र्याचा लाभ मोठा महनीय आहे हें त्यांनीं ओळखलें होतें. अशा वेळीं स्वाभिमान, स्पष्टवक्तेपणा ह्या गुणांना लोकांनीं जाणून बुजून दूर केलेलें होतें. कारण त्यामुळें त्यांनीं आरंभिलेल्या कार्याची हानि होईल अशी त्यांना साधार भीति वाटत होती. म्हणून स्वत्व, स्वराष्ट्र, स्वभाषा, ह्यांच्या उन्नतीसाठीं आणि लोकांमध्यें प्रसृत होऊं पहात

असलेलीं अज्ञानमूलक दुष्ट मतें नाहींशीं करण्यासाठीं चिपळूणकरांच्या निबंधमालेचा अवतार होता. स्वातंत्र्याचा काळ अत्यंत झोटिंग बादशाहीच्या काळाप्रमाणें लोकांना वाटत असे. आणि त्यामुळें इंग्रजांचें राज्य आल्यावर संतप्त होण्याऐवजीं जनता संतुष्ट होऊं लागली. स्वत्वाचें रक्षण केलें पाहिजे अशी कल्पनाहि लोकांना शिवली नाहीं. सुरवातीचें वाङ्मय इंग्रजी भाषांतरावरच अवलंबून होतें. पेशवाईच्या शेवटच्या काळांत वाढीस लागलेली मराठी भाषा इंग्रजी राज्यांत रोगट बनली. सुरवातीला मराठी भाषा परकीयांचें बोट धरूनच चालत होती. वर्डस्वर्थ, कॅंडी, एल्फिन्स्टन्, इत्यादिकांनीं तिच्या पायाभरणीस मदत केली. बाळशास्त्री जांभेकरांनींहि तिची यथाशक्ति सेवा केली. पण मालाकरांनीं दिलेल्या शक्तिवर्धक औषधानें ती पुन्हा टवटवीत दिसूं लागली. प्रो. दत्तो वामन पोतदार यांनीं आपल्या "मराठी गद्याचा इंग्रजी अवतार" ह्या पुस्तकांत " विष्णुशास्त्री ह्यांनीं तोफा डागल्या तेव्हांपासून मराठी वाङ्मयाच्या स्वरूपांत मोठीच क्रांति घडून आली. मराठी वाङ्मयाचें नवयुग तेव्हांपासूनच सुरूं झालें" असें प्रतिपादन केलें आहे. स्वतः चिपळूणकर यांनीं स्वतःस 'मराठी भाषेचे शिवाजी' म्हणवून घेतलें यांतच त्यांच्या जीवनाची विशाल रूपरेषा स्पष्ट झालेली आहे. इंग्रज मनुष्य कितीहि साधारण असला तरी तो हिंदु लोकांपेक्षां सहस्र गुणांनीं श्रेष्ठ आहे असा जो एक न्यूनगंड त्या वेळीं प्रसृत होऊं पहात होता त्याच्या गळ्याला वेळींच विष्णुशास्त्र्यांनीं नख लावलें. हेंहि कार्य त्यांनीं इंग्रजी विद्येच्या बळावरच केलें. इंग्रजी विद्येच्या वज्रानें आपण इंग्रजशाही उलथून पाडणार अशा प्रकारची बाणेदार वृत्ति त्यांनीं महाराष्ट्रांत उत्पन्न केली. १८५० मध्यें रेव्हरंड मरी मिचेल ह्यांनीं हिंदुधर्माविरुद्ध प्रचारकार्य चालूं केलें होतें. त्याला तोंड देण्यासाठीं 'विचारलहरी' या नांवाचें एक नियतकालिक सुरू झालें होतें. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे लेख त्यांत प्रसिद्ध होत असत. ते लेख इतके कडक होते कीं, त्यांना नोकरीस मुकावें लागलें. पुढें शाळाखात्यानें नमतें घेऊन त्यांना पुन्हा कामावर लावलें पण त्यांचें हें स्वाभिमानाचें तेज क्षणभंगुर होतें. विष्णुशास्त्र्यांनीं ज्या वेळीं निबंधमालेंत खरमरीत टीका केली त्या वेळीं कृष्णशास्त्र्यांनाहि ती असह्य आणि जाचक वाटू लागली. इंग्रजी आमदानींतील महाराष्ट्र अगदीं चैतन्यहीन होता असें म्हणतां येणार नाहीं.

मिशनऱ्यांच्या प्रचारामुळें लोकांच्या मनावर आपल्या धार्मिक समजुतींत कांहींतरी बदल केला पाहिजे असा परिणाम दिसून आला. कांहींशी आत्म-शोधन करण्याची प्रवृत्ति लोकांत उत्पन्न झाली. १८३१ मध्यें बाळशास्त्री जांभेकर यांनीं 'दर्पण' नांवाचें मासिक काढलें. १८४० मध्यें 'प्रभाकराचा' जन्म झाला. विष्णुशास्त्र्यांच्या प्रखर टीकेचा विषय झालेला 'ज्ञानोदय' १८४१ मध्यें सुरू झालेला होता. 'ज्ञानप्रकाश ',' इंदुप्रकाश' अशीं वर्तमान-पत्रेंहि सुरू झालीं होतीं. साताऱ्यास 'सत्यशोधक' व 'शुभसूचक' आणि 'ज्ञान वैभव' हीं वर्तमानपत्रें निघालीं. जांभेकरांनीं 'दिग्दर्शन' ह्या नांवाचें मराठी मासिक सुरू केलें. 'ज्ञानदर्शन' ह्या नांवाचें शास्त्रीय विषयांस वाहिलेलें त्रैमासिक चालविलें जात होतेंच.

परमहंस मंडळी आणि प्रार्थनासमाज

निरनिराळ्या नियतकालिकांतून सामाजिक व धार्मिक प्रश्नांची चर्चा सुरू होती. बाळशास्त्री जांभेकर हे समाजसुधारणेचे पुरस्कर्ते होते. जांभे-करांनीं आपल्या अत्यल्प आयुष्यांत पाश्चात्य विद्येचा प्रसार करण्यासाठीं नियतकालिकांचा उपक्रम केला होता. दादोबा पांडुरंग, आणि भाऊ महाजन यांच्या पुढाकारानें परमहंस मंडळी निघाली. 'जातिभेद मानूं नये, पुनर्विवाह संमत असावेत आणि मूर्तिपूजा करूं नये' असें ह्या सभेचें मत होतें. महात्मा ज्योतिराव फुले हे एक कर्ते सुधारक होऊन गेले. विष्णुशास्त्र्यांनीं त्यांच्या अज्ञानजन्य विधानांचा उपहासगर्भ पद्धतीनें खरपूस समाचार घेतला आहे. ज्योतिरावांनीं १८४२ मध्यें पुण्यांत मुलींची शाळा काढली. सारस्वत जातींतील पहिला पुनर्विवाह घडवून आणला. पण ज्योतिराव फुले यांना ख्रिस्ती मिशन-ऱ्यांचा कावा समजला नाहीं. तरीहि महाराष्ट्राच्या सामाजिक विकासाच्या इतिहासांत त्यांना मोठें स्थान द्यावें लागेल.

विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनीं ख्रिस्ती मिशनऱ्यांचा कांटा त्यांच्याच पद्धतीनें चौकाचौकांतून व्याख्यानें देऊन काढला. त्यांनीं १८५९ मध्यें वेदोक्तधर्मप्रकाश या नांवाचा ग्रंथ लिहिला. त्यांना आधुनिक लोकशाहीची पूर्ण कल्पना होती. 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध' या आपल्या पुस्तकांत तर त्यांनीं साम्य-वादाचा स्थूलपणें पुरस्कार केलेला आढळेल. विष्णुशास्त्री यांच्या पूर्वकालीं

ही जी जागृति होत होती तिचें स्वरूप सामाजिक आणि धार्मिक होतें. पाश्चात्यांच्या विजेतृ आगमनानंतर पौर्वात्य संस्कृति आणि पाश्चिमात्य संस्कृति यांत फरक दिसून येऊं लागला. आपलें तें वाईट व इंग्रजांचें तें चांगलें अशी कांहींशी आत्मघातक प्रवृत्ति विष्णुशास्त्री यांच्या पूर्वकालीन लोकांत होती व त्याला त्यांचा न्यूनगंडच सर्वस्वी कारणीभूत होता.

या न्यूनगंडावर प्रहार करून पडवळाप्रमाणें लिवलिवीत झालेल्या समाजाला ताठपणा आणून देण्याची व मातीच्या सांगाड्यांत स्वाभिमानी हाडांचा पिंजरा निर्माण करून नाजूक जनहृदयाचें संरक्षण करण्याची महनीय कामगिरी विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केली यांतच त्यांचा मोठेपणा आहे. माधवराव रानड्यांच्या मृत्युलेखांत लो. टिळकांनीं न्यायमूर्तींच्या कार्याचें जें नि:पक्षपाती समीक्षण केलें आहे त्यांत "थंड झालेल्या गोळ्याला ऊब आणून त्यांत चैतन्य ओतण्याचें काम" माधवरावांनीं केल्याचा उल्लेख आहे. अगदीं बरोबर हेंच विधान विष्णुशास्त्र्यांच्या बाबतींतहि खरें आहे आगरकरांनीं त्यांच्या मृत्युलेखांत त्यांची थोरवी कशांत होती व ते मराठी भाषेचे पति कसे होते याचें सूक्ष्म परीक्षण केसरींत केलें आहे. आपलें तें वाईट व परकीयांचें तें सर्व चांगलें हा जो समज सगळीकडे पसरत चालला होता त्याला रोखून लोकांत जागृति करण्याची कामगिरी त्या वेळच्या राजकीय परिस्थितींत असामान्यच म्हटली पाहिजे. आचार्य जावडेकर म्हणतात त्याप्रमाणें "महाराष्ट्रांत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं १८७४ सालीं निबंधमाला सुरू करून एक नवा स्वाभिमानी राष्ट्रीय विचारांचा संप्रदाय निर्माण केला" ही गोष्ट मान्य करावी लागेल. प्रा. अ. ना. देशपांडे म्हणतात, "विष्णुशास्त्र्यांच्या प्रतिभेचें अलौकिकत्व यांत आहे कीं, इंग्रजांच्या प्रभुत्वामुळें आपल्या देशावर राजकीय दास्याचें महान् संकट ओढवलें आहे, व त्यामुळें आपलें आर्थिक शोषण होऊं लागलें आहे, या वस्तुस्थितीची त्यांना अत्यंत उत्कटत्वानें जाणीव होऊन ती त्यांनीं प्रथमच अत्यंत निर्भयपणें बोलून दाखविली." श्री. आगरकर म्हणतात, "आपल्या देशाचें पारतंत्र्य आणि दारिद्र्य हीं शास्त्रीबुवांच्या अंत:करणाला जशीं खात तसें दुसरें कांहीं खात नसे. आपल्या लोकांची दैन्यावस्था पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटे." स्वत: विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं खडखडीत

आवाजांत प्रथमच जाहीर केलें कीं, "आमच्या देशास कांहीं एक झालें नाहीं. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतींत म्हणण्या-सारखा कांहीं एक विकार झाला नाहीं." आचार्य जावडेकर यांनीं ह्या त्यांच्या उद्‌गाराबाबत असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, "आमच्या समाजांत आमूलाग्र धार्मिक व सामाजिक क्रांति झाल्याखेरीज आम्ही राज्य करण्यास अपात्र आहोंत व म्हणून तोंपर्यंत आम्ही इंग्रजांचें दास्यच केलें पाहिजे या शिकवणुकीला कंटाळूनच एकोणिसाव्या शतकाच्या चौथ्या चरणांत राष्ट्रीयत्वाची निर्मिति करूं इच्छिणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं हे उद्‌गार काढले व राष्ट्रीयत्वाचा स्वाभिमान जागृत करण्यास सुरवात केली. महाराष्ट्रांत १८८० मध्यें चिपळूणकर, आगरकर व टिळक या तीन थोर विभूति निघून त्यांनीं महाराष्ट्रांत राष्ट्रवाद व बुद्धिवाद यांची स्थापना केली." लोकांस आपल्या सामान्य हक्कांचें व गोष्टींचें ज्ञान नसून त्यांची स्थिति पशुतुल्य झाली आहे, देश एवढा संपन्न असतां व लोकांची बुद्धि प्रखर असतां कल्पवृक्षाखालीं उपवास अशी आमची स्थिति झाली आहे अशा तऱ्हेचे विचार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं 'आमच्या देशाची स्थिति' या आपल्या निबंधांत काढले आहेत. "स्वातंत्र्यनाश ही आमची पहिली मोठी हानि झाली आहे. ह्या एका स्वातंत्र्यनाशाच्या पायीं आमचें अतोनात नुकसान झालें आहे. आमचें जगांतून अस्तित्वच नाहींसें झाल्या-सारखें झालें आहे. आम्ही तूर्त जगांतून उठल्यासारखेच झालों आहोंत. देशांतील सारे लोक म्हणजे बैल. त्यांस आम्ही सांगूं तसें त्यांनीं वागलें पाहिजे. त्यांना वस्तुतः कांहीं हक्क नाहींत. आम्ही जे कांहीं मेहेरवानी करून हक्क देऊं त्यावरच त्यांनीं संतुष्ट राहिलें पाहिजे, नाहींतर तो राजद्रोही समजला जाईल! हे सर्व तोटे कशामुळें? तर आमचें स्वातंत्र्य गमावल्यापासून." अशा प्रकारें मार्मिक पृथक्करण करून विष्णुशास्त्र्यांनीं जनतेंत जागृति निर्माण केली. इंग्रज सरकारबद्दल अप्रीति उत्पन्न केली. स्वातंत्र्यनाशाबद्दल चीड आणली. प्रा. अ. ना. देशपांडे यांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, "चिपळूणकरांपूर्वीच्या इंग्रजी आमदानींतल्या महाराष्ट्रांतील एकाहि नेत्यानें किंवा विचारवंतानें स्वातंत्र्याकांक्षेची ज्योत प्रज्वलित करणारे जहाल उद्‌गार काढले आहेत असें आढळून येत नाहीं! १८४० पासून

१८६५ पर्यंत लोकहितवादी, विष्णुपंत भिडे, विष्णुपंत रानडे इत्यादि महाराष्ट्रीय विद्वान् मंडळी इंग्रजी ग्रंथांच्या आधारें नवनवीन विचार बोलूं लागले होते. 'साहेबानें अमकें एक काम वाईट केलें' असें म्हणण्याची हिम्मत कोणाचीहि झाली नाहीं. या पूर्वकालीन आंग्ल सुशिक्षितांच्या संकुचित मनोवृत्तीवर विष्णुशास्त्री चिपळूणकरांना हत्यार चालविण्याशिवाय गत्यंतरच राहिलें नाहीं. सामाजिक व धार्मिक बाबतींत महाराष्ट्राला प्रगतिपर आचार-विचारांचे धडे देणारे दांडेकरांपासून रानड्यांपर्यंत अनेक थोर पुरुष महाराष्ट्रांत होऊन गेले; पण त्यांपैकीं एकालाहि राष्ट्रदृष्टीचा साक्षात्कार झाला नाहीं किंवा हया सत्चारित्र्यशील थोर विभूतींच्या चरित्रचंद्रिकेकडे पाहून आपण फार तर असें म्हणूं शकतों कीं, मनांत आलेले विचार जाहीर रीतीनें बोलून दाखविण्याची हिम्मत त्यांना झाली नाहीं. प्रत्यक्ष माधवराव रानड्यांना तर इंग्रजांच्या हातून राज्य काढून घेण्याची गोष्ट बोलणें हा फाजीलपणा वाटत असे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं छातीचा कोटकिल्ला करून ध्येयदर्शी वीराच्या अभिनिवेशानें मनांत उत्पन्न झालेले विचार बेधडक बोलून दाखविले व म्हणूनच प्रा. पोतदारांनीं निबंधमालेला 'गाजलेला तोफखाना' असें म्हटलें आहे.

ह्यावरून विष्णुशास्त्री चिपळूणकर हे कट्टर सतातनी होते व सामाजिक सुधारणांविषयीं ते उदासीन होते असें मात्र म्हणतां येणार नाहीं. आपल्या समाजांतील अनिष्ट चालीरीतींबद्दल त्यांनीं जागोजागीं नापसंती व्यक्त केली आहे. आपल्या 'देशोन्नति' या निबंधांत त्यांनीं जातिभेदाविरुद्ध व आपल्या भ्रामक समजुतींविरुद्ध जोरदार हल्ला चढविला. सामान्यतः ते सामाजिक गोष्टींसंबंधीं लिहीत नसत. पण एकदां लिहूं लागले कीं, समाजांतील वृद्ध मंडळींचा कोप होईल याचीहि ते विशेष पर्वा करीत नसत. आगरकरांच्या मतानें विष्णुशास्त्री हे अव्वल दर्जाचे व व्यापक दृष्टीचे सुधारक होते. सुशिक्षितांच्या पहिल्या पिढींत आणि चिपळूणकरांच्या मध्यें फरक इतकाच होता कीं, समाजसुधारणेचा कार्यक्रम अंमलांत आणल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यास आपण लायक ठरत नाहीं असें पहिल्या पिढीचें मत होतें; पण नवशिक्षितांच्या दुसऱ्या पिढीनें म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं स्वातंत्र्यनाशामुळेंच आपलें अतोनात नुकसान झालें

आहे असें सिद्ध करून दाखविलें. 'अराष्ट्रक स्थितींत असलेल्या महाराष्ट्रांतून राष्ट्र उभे करण्याची महत्त्वाकांक्षा चिपळूणकरांनींच बाळगिली' असें माडखोलकरांनीं आपल्या चिपळूणकरांवरील निबंधांत प्रतिपादन केलें आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या प्रखर राष्ट्रवादाची सुरवात चिपळूणकरांनींच केली; म्हणून चिपळूणकरांना केवळ आधुनिक मराठी वाङ्मयाचेच नव्हे, तर आधुनिक महाराष्ट्राचे जनक म्हणून गौरवपूर्वक संबोधून त्यांच्याबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त करणें हें महाराष्ट्राचें कर्तव्य ठरतें. स्वत: चिपळूणकरांनीं नवशिक्षितांच्या पहिल्या पिढीवर अत्यंत जोरदार हल्ले चढविले ही गोष्ट मान्य केली तरी त्यांच्या ठिकाणीं स्वभावसिद्ध गुणग्राहक वृत्ति होती. व त्यांनीं लोकहितवादींविरुद्ध निबंधमालेंत १५० पानें खर्च करून जो प्रतिकूल टीकालेख लिहिला त्यांतहि लोकहितवादींची निरलस उद्योगशीलता आणि लोकहितदक्षता अलौकिक होती हें मान्य केलें आहे. उतारवय झालें असतांहि लोककल्याणनिमित्तक उद्योग अव्याहत चालू ठेवल्याबद्दल त्यांनीं त्यांचें कौतुक केलें आहे. देशहितार्थ उलाढाल करण्याविषयीं हव्यास, ग्रंथरचना, सभापांडित्य वगैरेविषयीं हौस हीं तरुणांनाहि लाजवितील अशा प्रमाणांत हया वयातीत पुरुषाच्या ठिकाणीं होती हें त्यांना मान्य होतें. "आमच्या अलीकडील कमकुवत मंडळींनीं रावबहादुरांचा कित्ता घेणें अत्यंत उचित होय" असें आपलें स्पष्ट मत शास्त्रीबुवांनीं दिलें आहे. लोकहितवादींच्या शतपत्रांत त्यांना राष्ट्रोद्धाराविषयीं लागलेली कळकळ आणि तळमळ आपल्या प्रत्ययास येते. लोकहितवादी एका दृष्टीनें द्रष्टे होते. देशी माल खपवावा, परक्या देशांत जाऊन आपल्या मालाला उतारपेठ पहावी, ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकावा, स्वदेशीचा पुरस्कार करावा, जाडींभरडीं पण देशीच कापडें वापरावींत आणि आपल्या देशाचें रक्षण करावें, अशी त्यांनीं दिलेली शिकवण स्वाभिमानाची द्योतक होती. पुढें विकसित झालेल्या राष्ट्रवादाची सूक्ष्म कल्पना लोकहितवादींच्या हया शतपत्रांत येऊन गेलेली आहे. "लोक शहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील कीं, आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लमेंट द्या. ..... इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कामें करावयाचा आग्रह धरतील तर अमेरिकेंत झालें

तसें होऊन हे लोक आपणांस स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजांस सांगतील, तुम्ही आपल्या देशांत जावें.'' या कार्यास त्यांच्या अदमासाप्रमाणें २०० वर्षें लागावींत पण केवळ ७५ वर्षांच्या आंतच त्यांचें म्हणणें आज खरें ठरलें आहे. लोकहितवादींनीं सतत ४४ वर्षें लोकाभिमुख होऊन वाङ्मय लिहिलें. पण जनमनाची पकड ते घेऊं शकले नाहींत. लोकहितवादींच्या भाषाशैलींत अनुपम जिव्हाळा आणि निर्व्याजता आहे. हृदयांतून निघून हृदयाचा ठाव घेणारीं तोकडीं पण निर्भेळ मराठी वाक्यें हि आहेत. तरीहि महाराष्ट्राच्या रसिकतेच्या गौरवाला ते पात्र होऊं शकले नाहींत. प्राध्यापक क्षीरसागरां-नाहि आपण अंध व गाजरपारखी होतों असें म्हणणाऱ्या शतपत्रांच्या संपादकांचे ते उद्‌गार निराशेचे व नाउमेदीचे होते असें कबूल करावें लागलें आहे. खुद्द चिपळूणकरांनीं लोकहितवादींच्या लेखनांत भरपूर माहिती असल्याबद्दल आणि त्यांची मराठी भाषा शुद्ध आणि सुबोध असल्याबद्दल निर्वाळा दिला आहे. चिपळूणकरांवर लोकहितवादींना अन्याय केल्याचा आरोप करण्यापेक्षां त्यांच्या निष्प्रभ वाङ्मयाच्या स्वरूपाची मीमांसा करणेंच योग्य होणार आहे. कारण, लोकहितवादींच्या वाङ्मयांत न्यूनगंड आणि पराभूत वृत्ति जागजागीं दिसून येते. ईश्वरानें इंग्रजांस येथें पाठविलें व त्यांच्याशिवाय आमचा तरणोपाय नाहीं, व इंग्रज गेले तर आपलें कसें होईल? हिंदु लोक पक्के मूर्ख. अशा प्रकारच्या विचारसरणीची लोकांनीं उपेक्षा केली तर आश्चर्य नाहीं. स्वत:च्या न्यूनगंडामुळें त्यांची आत्मश्रद्धाच नष्ट झालेली होती. पण त्यांनीं जो लोकांचा तेजोभंग केला त्याच्यावर उतारा म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकरांना १५० पानें खर्च करावीं लागलीं. लोकहितवादींनीं आशावादाचे धडे लोकांना दिले नाहींत किंवा स्वाभिमानाचें किंवा कर्तृत्वाचें तेज त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न केलें नाहीं. जनमनाचें रंजन करण्याची नाजूक कामगिरी त्यांना जमली नाहीं. न्यायमूर्ति रानड्यांनीं पुढें जें भरीव कार्य केलें त्याचें उगमस्थान लोकहितवादींच्या निबंधांत नि:संशय होतें. पण राजकीय हक्काच्या प्राप्तीस असामान्य स्वार्थत्याग लागतो, संघटित लोकमताची शक्ति लागते व दृढ-निश्चय, स्वार्थत्याग व धाडस या गुणांनीं मंडित असें चारित्र्य पुढाऱ्यापाशीं असावें लागतें. ह्या लोकनायकत्वाच्या कसोटीवर टिळक, चिपळूण-

कर व आगरकर उतरले असें आचार्य जावडेकरांनीं दाखवून दिलें आहे. लोकनेता होण्याकरितां व्यक्तीच्या अंगीं जें कृतिशील ध्येयवादानें आणि स्वार्थत्यागानें संपन्न असें चारित्र्य असावें लागतें तें लोकहितवादींच्या अंगीं नव्हतें. उलट कृतिशील देशभक्ति आणि विवेकशील त्यागबुद्धि ह्या गुण-विशेषांनीं चिपळूणकरांचें जीवन उजळून निघालें होतें. आचार्य जावडेकर म्हणतात, " आपल्या पारतंत्र्याचा व आपल्यावरील जुलमाचा प्रतिकार हें मनुष्याचें आद्य कर्तव्य असून लोकांत नुसती कायदे पाळण्याची वृत्ति फैला-वण्याचा प्रयत्न करणें हेंच पुढाऱ्यांचें काम नाहीं, तर त्यांची जुलमाचा प्रतिकार करण्याची बुद्धि व स्वातंत्र्याकांक्षा जागृत करणें हें लोकनायकांचें आद्य कर्तव्य आहे." आणि याच कसोटीवर आचार्य जावडेकरांनीं चिपळूणकर हे आधुनिक महाराष्ट्रांतील पहिले लोकनायक होते असें सूचित केलें आहे. मराठी जनमनांत देशाभिमानाची व्यापक भावना प्रज्वलित करून तिच्या अनुषंगानें आपली भाषा, आपलें वाङ्मय, आपला धर्म, ह्याबद्दल प्रखर आत्मीयता उत्पन्न करण्याच्या विशाल ध्येयदृष्टीवर चिपळूणकरांचें नेतृत्व बावनकशी ठरलें आहे.

अव्वल इंग्रजी आमदानींतील इंग्रजी शिक्षणाचा संस्कार घडलेल्या तरुण शास्त्रीमंडळीनें जुन्या व नव्या विद्यांची जोड घालून देण्याचें कार्य मोठ्या कुशलतेनें केलें. ह्या शास्त्रीमंडळींत विष्णुशास्त्र्यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर हे अग्रगण्य होते. त्या वेळच्या पंडितमंडळीचें वर्तन थोडेसें दुटप्पी होतें. नोकरींत साहेबाच्या मर्जीप्रमाणें वागावयाचें व सायंकाळीं घरीं आल्यावर स्नान करून जपजाप्य करावयाचें असा त्यांचा दुटप्पी दिनक्रम असे. पण कृष्णशास्त्री चिपळूणकर हे वैदिक विद्येंत, शास्त्राध्ययनांत, आणि पाश्चिमात्य ज्ञानविज्ञानांत पारंगत होते. त्यांचे गुरुजी तर त्यांना 'बृहस्पति' म्हणत व गुरुजींच्याच सांगण्यावरून शास्त्रीबुवांनीं इंग्रजी विद्येचें अध्ययन केलें. इंग्रजीचें मराठी भाषांतर ते इतकें अप्रतिम करीत कीं, त्यांनीं मेजर कँडीकडून धन्यवाद मिळविले. शास्त्रीबुवांच्या अविरत उद्योगानें मराठी ग्रंथरचनेची उज्ज्वल परंपरा सुरू झाली. १८५२ सालींच सात्रेटिसाचें चरित्र लिहून त्यांनीं स्वभाषासेवेच्या महाव्रताला सुरवात केली. १८५२ मध्यें ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं चालविलेलें 'ज्ञानोदय' मासिक कृष्णशास्त्र्यांच्या

सडेतोड विवरणावर प्रक्षुब्ध होऊन 'नास्तिक मतें व ख्रिस्ती धर्माविरुद्ध जी बीभत्स निंदा' होती ती ज्ञानोदयांत उघडी करून दाखविली, त्या वेळीं सुरू असलेल्या 'विचारलहरी' या मासिकांत मुखपृष्ठावर शिरोभागी 'सद्धर्मोद्धारक आणि दुर्धर्मोच्छेदक' अशी बिरुदावलि छापलेली होती. त्यामुळें रे. बाबा पदमजी ह्यांच्यासारख्या सोज्वळ लेखकांनींहि विचारलहरींतील प्रतिपादनाला हलकट आणि पोरकट अशीं विशेषणें बहाल केलीं आहेत. न्या. रानड्यांनीं मात्र विचारलहरींतील लिखाणास तेजस्वी आणि कळकळीचें लिखाण अशीं विशेषणें लाविलीं आहेत. थोरल्या शास्त्रीबुवांचें वर्तन जरा रंगेल असल्यामुळें वडाचें साल पिंपळाला जोडून सरकारनें त्यांना 'बाहेर चालीची कांहीं आगळीक घडल्याची संधि साधून' कामावरून बडतर्फ केलें. शास्त्रीबुवांनीं आपला चरितार्थ स्वतंत्र बाण्यानें भागविण्याचा संकल्प केला. पण तो प्रसंग सुदैवानें त्यांच्यावर आला नाहीं. पुढें विष्णुशास्त्र्यांनीं ज्या वेळीं मिशनऱ्यांवर टीकास्त्र सोडलें व त्याची कागाळी थोरल्या शास्त्रीबुवांच्या कानांवर गेली तेव्हां चिरंजीवांचें तें साहस अनुचित असल्याचें त्यांनीं स्पष्ट बोलून दाखविलें.

त्या काळांतलें पुणें रसिकतेबद्दल व रंगेलपणाबद्दल गाजलेलें होतें. थोरल्या शास्त्रीबुवांचें उर्वरित आयुष्य मानसन्मानांचा वर्षाव घेत घेत व जीवनानंदाचा उपभोग घेत गेलें. सुभाषित, गीत आणि युवतींच्या लीला ह्या मनाला हटकून मोहिनी घालणाऱ्या वस्तु आहेत. मुलुखगिरीच्या धांदलींतहि पेशव्यांनीं ललितकलेचें संवर्धन केलें. लो. टिळकांनीं चिपळूणकरांच्या श्राद्धदिनानिमित्त वाचलेल्या निबंधांत असें म्हटलें आहे कीं, अशा प्रकारचा व्यसनीपणा हा पुण्यांतल्या प्रतिष्ठित सुखवस्तु लोकांनीं आपल्या उघड उघड चालणाऱ्या उंडग्या वर्तनानें तेव्हां एक शिष्टाचार करून सोडला होता. विष्णुशास्त्री यांना वडिलांच्या ह्या वर्तनानें खेद होत असे. 'शास्त्रीबुवांना बाहेरचा नाद फार लागल्यामुळें मामा व मामी (कृष्णशास्त्र्यांचे आईवडील) यांस फार दुःख होई. एकदां बरीच रात्र झाली तरी शास्त्रीबुवा घरीं आले नाहींत हें पाहून मामा फार तळमळून म्हणाले : "मी याला बोलूं का?" तेव्हां मामी ही अधिक शहाणी. तिनें उत्तर केलें, "तुम्ही बोलू नका. बोलण्यानें तो आपला नाद कांहीं सोडणार नाहीं. तुमचा थोडाबहुत वचक आहे तो

मात्र नाहींसा होईल !" परंतु शास्त्रीबुवांचा पिंड मात्र रसिकाचा होता. त्यांच्या जीवनांत ज्ञाननिष्ठा होती. अन्य कोणत्याहि निष्ठेची धार त्यांच्या वाङ्मयलोलुप विलासी जीवनाला लागली नाहीं. स्वधर्माविषयींची त्यांची बैठक सांस्कृतिक होती, पण सश्रद्ध नव्हती. ते अज्ञेयवादी होते. तरी लोक-विरुद्ध आचरण करण्याची मात्र त्यांची मुळींच तयारी नव्हती. पुण्यांतल्या सार्वजनिक सभा-समारंभांचें अध्यक्षस्थान त्यांच्याकडे आलें. पण शास्त्रीबुवांनीं जें वाङ्मय निर्माण केलें तें मोठेंसें उत्साहवर्धक नाहीं. त्यांची बुद्धि अष्टपैलू होती. पण त्यांचे ग्रंथ अनुवादित किंवा आधाररचित आहेत. मानवी सुखाची अपूर्णता मनावर बिंबविणाऱ्या रासेलसच्या सहवासांत त्यांनीं उत्तरायुष्य अर्पण केलें. शास्त्रीबुवांनीं जसा एकहि स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाहीं, तसा दादोबा पांडुरंगांनीं एकहि अनुवादित ग्रंथ लिहिला नाहीं. इंग्लिश भाषेच्या अध्ययनामुळें स्वभाषेची होत चाललेली हानि त्यांना जाणवत होती व म्हणूनच दादोबा पांडुरंगांनीं मराठी व्याकरणाचा खटाटोप आरंभिला. शास्त्रीबुवांच्या रंगेलपणानें त्यांच्या चारित्र्यावर मात केली. पण दादोबा पांडुरंगांनीं सरकारी नोकरीचे पाश झुगारून उर्वरित आयुष्याचा सद्व्यय करण्यांत समाधान मानलें. शास्त्रीबुवांच्याजवळ भाषाप्रभुत्व विलक्षण होतें. अर्वाचीन मराठीची ग्रंथबद्ध शैली शास्त्रीबुवांनीं घालून दिली.

अशा प्रथितयश वडिलांच्या सान्निध्यांत चिपळूणकरांना व्यापक आणि उद्बोधक शिक्षण मिळालें. विष्णुशास्त्र्यांनीं शास्त्रीबुवांच्या लाभलेल्या या सान्निध्याला 'रविकरगतकमलन्यायाची' उपमा दिली आहे. त्यांच्या प्रतिभाविलासाला व मनोविकासाला गृहस्थिति कारणीभूत झाली. थोरले शास्त्रीबुवा दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी असल्यामुळें अनेक पुस्तकें अभि-प्रायासाठीं येऊन पडत. नवीन ग्रंथ आणि ग्रंथकार यांचा राबता घरीं मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें तत्कालीन साहित्याचें समालोचन विष्णुशास्त्र्यांना अहर्निश पहावयास मिळालें. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांसंबंधीं चर्चा त्यांच्या कानांवर पडत असे. थोरले शास्त्रीबुवा ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाल्यापासून ग्रंथालयाची किल्लीच धाकट्या शास्त्रीबुवांच्या हातीं लागली. धाकटे शास्त्रीबुवा करमणुकीच्या हरेक कार्यक्रमाला अत्यंत अगत्यानें हजर रहात असत. मग ते करमणुकीचे प्रकार प्रतिष्ठित किंवा प्राकृत असले तरी

त्यांना ते सारखेच प्रिय होते. कीर्तनापासून तों तमाशापर्यंत करमणुकीचा कोणताहि प्रकार त्यांनीं वर्ज्य मानला नाहीं. इंग्रजी भाषेविषयीं त्यांनीं जे अतिरिक्त गौरवाचे उद्‌गार निबंधमालेंत जागजागीं काढलेले आहेत, त्याला कारण त्यांचे प्रा. वर्डस्‌वर्थ यांची विकासप्रद शिक्षणशैलीच होय. निबंधमालेंत जागोजागीं ग्रथित केलेलीं समर्पक सुभाषितें, रोचक कथा आणि विनोदमहदाख्यायिका इ. सदरांमुळें शास्त्रीबुवांची रसिकता कशी जिज्ञासानिबद्ध होती, व ती कशी संग्राहक आणि सर्वंकष होती याची कल्पना येईल. त्यांचे गणिताचे गुरु प्रो. केरो नाना छत्रे म्हणत, "विष्णु हा दिसण्यांत चंचल नाहीं खरा, पण त्याचें निरीक्षण मोठें मार्मिक आहे." अवांतर वाचनाच्या अनावर व्यसनामुळें शास्त्रीबुवांना परीक्षेंत गोता खावा लागला. पण त्या वाचनानें चिपळूणकरांच्या बुद्धीला प्रगल्भता आली होती व अनेक विषयांच्या चिंतनामुळें त्यांच्या मनाचा विकासहि होत गेला. शास्त्रीबुवांची स्मरणशक्ति अशी विलक्षण होती कीं, सातारच्या हरिशास्त्री पंडितांनीं प्रत्यक्ष पाहिलेल्या स्वराज्याच्या अखेरच्या दिवसांचीं वर्णनें ऐकून ते तीं तशींच्या तशीं उतरवीत असत. ऐतिहासिक वातावरणांत त्यांच्या अस्मितेचा विकास झाला व त्यांतूनच काव्येतिहाससंग्रह आणि चित्रशाळा यांचा उदय झाला.

"इंग्रज लोक शहाणे व आमचे लोक मूर्ख असाच जप करीत बसल्यानें लोकांतील स्वाभिमान नष्ट होऊन ते पराक्रमी होणें शक्य नाहीं. इंग्रजांची स्वार्थी नीति लोकांपुढें मांडून आणि त्यांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना पराक्रमी बनविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत" असें विष्णुशास्त्री यांनीं ठरविलें. आचार्य जावडेकरांचें हें विधान किती सार्थ आहे हें त्यांनीं पुढें सुरू केलेल्या वर्तमानपत्रांवरून सिद्ध होतें. सुरवातीपासूनच त्यांचा मनोदय होता कीं, एक छापखाना काढावा व स्वतंत्र व्यवसाय करावा. शिवाय थोरल्या शास्त्रीबुवांच्या जवळ जेव्हां त्यांचे अधिकारी विष्णुशास्त्रांच्या कडक टीकेबद्दल त्यांस ताकीद देण्यास सांगत, त्या वेळीं शास्त्रीबुवाहि वकिलीसारखा स्वतंत्र व्यवसाय करून वाङ्मय सेवा करण्याचा चिरंजिवास उपदेश करीत. या सर्वाचा साकल्यें करून परिणाम म्हणजे त्यांनीं आरंभिलेले स्वतंत्र उद्योग होत. पण हे सर्व उद्योग केवळ व्यापारी मनोवृत्तीनें त्यांनीं चालविले नाहींत. तर देशोन्नति व देशसेवेच्या उदात्त ध्येयानें प्रेरित होऊन ते केले हें भूषणावह होय. केवळ

व्यापारी मनोवृत्ति बाळगून आपल्या हातून हे उद्योग झालेच नसते असें विष्णुशास्त्र्यांनीं स्वत:च सांगितलें आहे. सरकारी नोकरी सोडल्यापासून स्वतंत्र शाळेचा उद्योग फलद्रूप होईपर्यंत त्यांनीं कोणाचीच सेवा केली नाहीं व ते स्वतंत्र वृत्तीनें लिहूं लागले. सरकारी नोकरींत असतांना सुद्धां त्यांनीं वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं फारसें नमतें घेतलें नाहीं. व सरकारवर आणि शिक्षण खात्यावर टीकास्त्र सोडण्याचें थांबविलें नाहीं. मग स्वतंत्र झाल्यावर त्यांची लेखणी अधिक तिखट बनली असेल हें सांगावयास नकोच. नवीन शाळेंत स्वार्थत्यागाची त्यांनीं जी थोर परंपरा घालून दिली व पर्यायानें राष्ट्रीय शिक्षणास सुरवात केली, त्याचाच परिणाम पुढें स्वराज्याचें काम सुलभ होण्यांत झाला. केवळ नाममात्र पगार घेऊन व मेहरबान डायरेक्टर साहेबांपुढें हांजी हांजी न करतां व सरकारी मदतीची अपेक्षा न धरतां त्यांनीं शाळेची थोर परंपरा निर्माण केली; व ह्या महान् नेतृत्वामुळेंच महाराष्ट्र शिक्षणाच्या कामीं अग्रेसर झाला व त्यांतून रँग्लर परांजपे यांच्यासारख्या थोर विभूति पुढें निर्माण झाल्या. ह्या शाळेंतून जे विद्यार्थी बाहेर पडले त्यांनीं कळत न कळत चिपळूणकरांची राष्ट्रीय वृत्ति वरोवर नेली व त्याचा परिपाक म्हणूनच पुढें थोर कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण झाली. त्यांनीं आरंभिलेलें सरस्वतीच्या उपासनेचें कार्य त्यांच्या कित्येक सहकाऱ्यांनीं पुढें चालविलें. विष्णुशास्त्री यांनीं हा जो शैक्षणिक पाया घातला तोहि राष्ट्रसेवेच्या बुद्धीनें प्रेरित होऊनच. आपल्या वाङमयीन सेवेनें चिपळूणकरांनीं महाराष्ट्राच्या निकट भूतकालीन इतिहासाच्या आधारें स्वराज्यस्थापनेच्या कार्यास आपली संस्कृति पूर्णपणें लायक आहे असा आत्मविश्वास लोकांत निर्माण केला.

शास्त्रीबुवांचा देशाभिमान स्वयंभू आणि स्वयंदीप्त होता. त्यांच्या सांस्कृतिक जीवनाची घडण अस्सल देशी होती. ब्रिटिशांच्याकडून कांहीं सांस्कृतिक ओंजळीनें पाणी पिण्याची आवश्यकता नाहीं असें त्यांना वाटे. आपल्या संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाबद्दल त्यांची श्रद्धा होती. त्या श्रद्धेवरच त्यांचा देशाभिमान आधारलेला होता. लोकहितवादी, फुले किंवा ख्रिस्ती मिशनऱ्यांवरील त्यांच्या टीकेचें मर्म हेंच होय. स्वभाषा आणि स्वदेशप्रेम सांस्कृतिक प्रेमादराबरोबर घेतलें कीं त्यांचें व्यक्तिमत्त्व पूर्ण झालें. पाश्चात्य इतिहासाच्या वाचनानें या प्रेमाला भरतें आलें.

चिपळूणकरांच्या मनोभूमिकेंत जॉन्सननें जितका खोलवर प्रवेश केला आहे तितका कोणींहि केला नाहीं. ॲडिसनप्रमाणें स्वतंत्र जीवन कंठावें असा त्यांनीं संकल्प केला. जॉन्सनच्या अंगीं असलेल्या सर्व गुणावगुणांची प्रतिमा थोडया फार प्रमाणांत विष्णुशास्त्र्यांच्या जीवनांत दिसून येते. डॉ. जॉन्सनच्या बेपर्वाई वृत्तीचा त्यांनीं त्यांच्या टीकालेखांत उपयोग केलेला आढळतो. जॉन्सनप्रमाणें तेहि दुराग्रही आणि स्थूलबुद्धि होते. ते देशाभिमानी होते ही गोष्ट मान्य करूनहि त्यांचा प्रमुख मनोधर्म किंवा पिंड रसिकाचाच होता हें लक्षांत येईल. शास्त्रीबुवांची घुम्या स्वभावाबद्दल ख्याति होती. परंतु आपल्या मित्रमंडळींत मात्र ते गप्पांत रंगून जात. त्यांचें वाचनहि भ्रमर वृत्तीनें चाले. आवडेल तेवढें वाचावें व नको तें सोडून द्यावें अशी तऱ्हा असे. ते रसिक असूनहि सहृदय होते. त्यांची रसिकता आत्मकेंद्रित किंवा अमानुष नव्हती. प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र ते सौम्य सात्त्विक आणि सहिष्णु स्वभावाचे होते. पण त्यांनीं हातीं घेतलेल्या कामांत मात्र त्यांच्या कुटुंबीयांना आपुलकी किंवा अगत्य नव्हतें. त्यांनीं आरंभिलेले सर्व उद्योग पैसा खाणारे असल्यामुळें कुटुंबीयांना पसंत नसत व त्यांना ते सर्व व्यवहार परस्पर करावे लागत. परंतु या सर्व व्यवहारांत व्यापारी मनोवृत्तीनें मात्र ते कधींच शिरले नाहींत. मित्रांशीं आणि स्नेह्यांशीं त्यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असत. मित्रांना त्यांचीं जहाल मतें व जहरी टीकापद्धति पसंत नसे. तरी त्यांच्याशीं त्यांनीं सलोख्याचेच संबंध ठेवले होते ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तत्कालीन लेखक आणि नियतकालिकें यांच्याविषयींहि त्याची वागणूक सहृदयतेची होती. टीकेच्या भरांत जरी त्यांनीं प्रतिपक्षाच्या डोक्यावर केसहि ठेवला नाहीं तरी प्रतिपक्षीयांच्या गुणांचें यथायोग्य ग्रहण करणें व कबुली देणें या गोष्टी करण्यास ते कधींच कचरले नाहींत. त्यांच्या कर्तृत्वाचे आणि स्वभावाचे आणि स्वभाषेवरील प्रेमाचें त्यांनीं कौतुक केलेलें आढळतें. आपलीं मतें मात्र कोणाच्या भिडेस बळी पडून त्यांनीं बदललीं नाहींत. त्यांच्या प्रतिपादनावर अहंकाराची सावली पडलेली असली तरी उदार गुणग्राहताहि त्यांचे ठिकाणीं वसत असल्यानें त्या अहंकाराचा लोकांना तिटकारा आला नाहीं व हेंच निबंधमालेच्या यशाचें मर्म होय.

चिपळूणकरांचें जीवन एकाकी होतें. स्त्रीसुखाला ते पारखे झालेले होते. या त्यांच्या जीवनाचा त्यांच्या वाङ्मयावर बराच परिणाम झालेला आहे.

वाङ्मयानंदाशिवाय इतर कोणत्याहि बाबतींत ते कधीं रंगून जात नसत. यामुळेंच हातीं घेतलेल्या विषयांव्यतिरिक्त इतर गोष्टींत ते रंगून जात नसत. या आत्मप्रत्ययामुळें व एकाकितेमुळें त्यांच्या विचारांनाहि विकसित होण्यास वाव मिळाला असेल असें वाटत नाहीं. त्यामुळें त्यांची बौद्धिक प्रगति कुंठित झाली नाहीं तरच नवल ! जुन्या आणि नव्या संस्कृतीच्या समन्वयानें नवीन दिशा दाखविण्याच्या कामीं त्यांची प्रतिभा कार्यक्षम झाली नाहीं यालाहि कारण त्यांचा एककल्ली स्वभाव असेल काय ?

निबंधमाला

थोरल्या शास्त्रीबुवांच्या हाताखालीं शालापत्रक चालविण्याचा जो उद्योग त्यांनीं केला त्यामुळेंच निबंधमाला चालविण्याची कल्पना आली. मासिक पुस्तक आणि तेंहि एकटाकीं आणि त्यांतल्या त्यांत निबंधवजा चालविण्यास जी अवांतर वाचनाची जरूरी असते त्याची पूर्ण तयारी त्यांनीं आधींच करून ठेवलेली होती. त्यांनीं जरी मराठी भाषेंत माला सुरू केली तरी त्यांचें खरें प्रेम इंग्रजीवर सर्वप्रथम होतें. इंग्रजीचे खालोखाल त्यांना संस्कृतची आवड होती व मराठींत ग्रंथसंपत्ति फारशी नसल्यामुळें मराठीचा क्रम अवांतर वाचनांत तिसरा आणि जुजबी स्वरूपाचा होता. छापील मराठी लेखांव्यतिरिक्त इतर वेळीं लेखनासाठीं ते इंग्रजीचाच उपयोग करीत.

शालापत्रकापासूनच त्यांच्या शैलीबद्ध निबंधलेखनाला सुरवात होते. संस्कृत कविपंचकावरील त्यांचे निबंध शालापत्रकांतच येऊन गेलेले होते ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. त्यांच्या निबंधांत व्यासंग आणि मनन यांचें मनोहर मिश्रण आढळतें. इंग्रजी वाङ्मयानें ज्याप्रमाणें टीकाशास्त्र परिणत केलें आहे, त्याप्रमाणें संस्कृत साहित्य इतकें विपुल असतां टीकाशास्त्र मात्र समृद्ध नसावें याचें शास्त्रीबुवांना आश्चर्य वाटत असे. मल्लिनाथीचा अर्थ वाईट टीका असाच जणू मराठीनें घेतला आहे. प्रायः टीकाकार नको तेथें विस्तृत टीका लिहितात व हवें तेथें मुळींच अनुल्लेखानें पुढें जातात हीच त्यांतील गोम आहे. नुसता शब्दार्थ, क्वचित् व्याकरणाचें रूप, क्वचित् अलंकार देणें यापलीकडे उपक्रम, उपसंहार, शैली इत्यादिकांबद्दल चर्चा त्यांत नसते. यामुळें विष्णुशास्त्री यांची टीका इंग्रजी वाघिणीवरच बसून झालेली

आहे हें लक्षांत ठेवलें असतां टीकाशास्त्राची मराठी सारस्वतांत त्यांनीं उत्तम परंपरा निर्माण केली, निदान टीकाशास्त्राला गति दिली व हेंच मुळारंभीं आवश्यक काम त्यांनीं केलें म्हणून आपण त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांची टीका पुष्कळ वेळां अतिशयोक्त झालेली आहे. क्वचित् तिनें अतिप्रसंगहि केला आहे. शालापत्रक हें सरकारमार्फत चाललेलें मासिक असतांना त्यांत सरकारवरच टीका करणें अप्रशस्त होतें; पण शास्त्रीबुवांनीं अतिप्रसंग करून शालापत्रकावर सरकारची अवकृपा करवून तें बंद पाडलें ही गोष्ट दृष्टीआड करतां येणार नाहीं. चौदा वर्षें सरकारनें उदात्त हेतूनें केवळ ज्ञानवर्धनास वाहिलेलें हें मासिक चालविलें तें बंद करण्याची पाळी सरकारवर यावी ही गोष्ट इष्ट नव्हे.

शालापत्रकांतील लेखांनीं विष्णुशास्त्री यांची स्वतंत्र शैली निर्माण होऊं लागली. त्यांच्या पूर्वी बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग इत्यादिकांनीं थोडी बहुत टीका आणि निबंध यांच्या शैलीला सुरवात केली होती; पण रेखीव टीका खंडनमंडनात्मक पद्धतीनें करून गुणांचें ग्रहण व दोषांचें आविष्करण करण्याची पद्धति विष्णुशास्त्र्यांनींच प्रथम घातली असें विधान करण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. निबंधलेखनाची शैली प्रायः त्यांनीं बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी आणि कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्या त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या निबंधकारांपासून उचलली. बाळशास्त्री जांभेकरांचे लेख, भाषा या दृष्टीनें अव्वल दर्जाचे नव्हते. लोकहितवादी यांचे लेख वाचणाऱ्या आजकालच्या विद्यार्थ्यांस तर ते पुष्कळ ठिकाणीं पोरकट आणि बेताल असे वाटतील व एवढ्या मोठ्या बहुश्रुत लेखकानें असले बेताल लेख कसे लिहिले याबद्दल आश्चर्य वाटल्याविना राहणार नाहीं. थोरल्या शास्त्रीबुवांनीं मात्र निबंधशैलीचा थोडा थोडा आविष्कार आपल्या निबंधांतून केलेला आढळतो. त्यांनीं स्वतंत्र आणि अनुवादित असे अनेक निबंध लिहिले. त्यांच्या निबंधांत विचारांची सात्त्विकता व भाषेचें सौष्ठव दिसून येतें. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपले निबंध लिहिले असले तरी आधुनिक निबंधशैलीची खरी सुरवात विष्णुशास्त्र्यांच्यापासून झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. थोरले शास्त्रीबुवा बुद्धिप्रधान होते, त्याचप्रमाणें रसिकहि होते. ह्यामुळें त्यांच्या निबंधांना एक प्रकारचें सौंदर्य आलें असल्याचें दिसून

येतें. शास्त्रीबुवांच्या लेखनशैलीचा रमणीय आविष्कार शालापत्रकांतील निबंधांत झालेला आहे. विष्णुशास्त्र्यांचे संस्कृत कवींवरील निबंध उत्कृष्ट वठले आहेत. कारण त्यांनीं संस्कृत वाङ्मयाचें भरपूर ज्ञान संपादन केलेलें होतें. त्यांत त्यांची रसिकता आणि प्राचीन परंपरेविषयीं अभिमान ह्या गोष्टींची भर पडली होती. आधुनिक शिक्षण मिळाल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं शोधक बुद्धि आणि तौलनिक विचारपद्धति यांचा संगम दिसून येतो. 'मिल, मेकॉले' इत्यादिकांची अंधश्रद्धेनें री ओढणाऱ्या स्वकीयांच्या अविवेकी प्रतिपादनावर आणि संस्कृत विद्या आणि वाङ्मय यांविषयीं प्रदर्शित केलेल्या दुर्मतावर त्यांनीं हल्ले चढविले आहेत. संस्कृत कविपंचकावरील निबंधांत युक्तिवादाचा अवलंब करून परमताचें आवेशपूर्ण खंडण केलेलें आहे. हे सर्व निबंध स्वतंत्र बुद्धीनें लिहिलेले आहेत असें त्यांनींच ह्या निबंधांच्या सुरवातीला प्रतिपादन केलें आहे. स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलेल्या कविपंचकावरील निबंधांच्या प्रस्तावनेंत ते लिहितात, "इंग्रज ग्रंथकारांच्या किंवा एतद्देशीय पंडितांच्या मतांचें त्यांत बुद्धिपुरःसर अनुकरण केलेलें नाहीं. त्यांचा उल्लेख खंडण करण्यासाठींच केलेला आहे. आणि विरोध किंवा खंडनहि गर्वाचे आहारीं जाऊन केलेलें नाहीं. इंग्रज लोकांची विद्या व वैभव पाहून आम्ही पूर्वीं जसे चकित होऊन जात होतों व आम्ही त्यांच्यापुढें काय पामर आहोंत, त्यांची योग्यता आम्हांस कधींहि यावयाची नाहीं असे आमचे समज असत. पण तें सर्व मान आतां अगदीं फिरलें आहे. ····· बुद्धीच्या मानानें पाहतां आम्ही इंग्रजांहून मुळींच कमी नसून ज्या कामांत आम्ही मन घालूं त्यांत वरील लोकांची बरोबरी करूंच करूं हें म्हणणें केवळ फुशारकीचेंच नव्हे. ····· आमच्या राज्यकर्त्या लोकांपैकीं जे अप्रबुद्ध व कोत्या बुद्धीचे आहेत त्यांचा आम्हांविषयीं अधिकाधिक द्वेष व मत्सर उत्पन्न होत चालला आहे. ···· इंग्रजी शिक्षणानें आमच्या बुद्धीस जी तीव्रता आलेली आहे ती आमच्या गुरूंच्या गर्वखंडनास अगोदर कारण होईल. संस्कृत ग्रंथांविषयीं मत देण्यास आम्हांस जो अधिकार आहे, तो परस्थ लोक कितीहि शहाणे व चतुर असले तरी त्यांस बिलकूल नाहीं. कित्येक इंग्रज महापंडितांनीं आमच्या प्राचीन कवींसंबंधीं जीं दूषणें लिहिलीं आहेत त्यांचाहि अत्यंत तिरस्कार व उपहास करण्यास आम्हांस पूर्ण अधिकार आहे. ह्यास्तव तो गाजविला असतां द्वेषबुद्धि किंवा गर्व मुळींच होत

नाहीं हें सांगावयास नकोच.'' शालापत्रकांतील हे निबंध इतके लोकप्रिय झाले होते कीं, त्याच धर्तीवर जुन्या मराठी कवितांवर लिहिण्याविषयीं वाचकांनीं त्यांस आग्रह केला होता. पण त्यांचे हे लेख संस्कृत किंवा इंग्रजी कवितेवरील लेखांच्या मानानें अगदींच उथळ आणि नीरस झालेले आहेत. मिशनरी, नवीन विद्वान्, यांच्यावर पाल्हाळीक टीका करण्यांतच त्यांतील बराचसा भाग व्यापलेला आढळतो. 'सर्वसंग्रह' मासिकाला असलेला सरकारी आश्रय काढून टाकल्याबद्दल त्यांनीं शिक्षणखात्यावर कडक टीका केली. पण ती सरकारी मासिकांतच प्रसिद्ध करून त्या मासिकावर गदा आणली.

निबंधमालेच्या सुरवातीसच शास्त्रीबुवांनीं लिहिलें आहे, ''ह्या निबंध-मालेचा उद्देश काय आहे हें वाचकांस पहिल्या अंकावरून समजेलच. तो मुख्यत: भाषाशोधनाचा तर आहेच, पण त्याचवरोवर त्यांस मनोरंजन व बोध कांहीं होईल असा भंरवसा आहे. .... कोणाच्या द्वेषवुद्धीनें आम्हीं कधींहि लिहिणार नाहीं. कोणास कांहीं गैर दिसून आम्हांस कळविण्यांत येईल तर आमची चुकी आम्ही मोठ्या संतोषानें पदरांत घेऊं. त्यांत जें जें कांहीं अहंकारवृत्तीचें दिसेल त्यांत सत्यनिरूपणाखेरीज दुसरा उद्देश कधींहि असणार नाहीं. हेंहि आम्ही एकदां खात्रीनें सांगून ठेवतों. .... निबंधमाला नांवाच्या पुस्तकांत नाटकांचीं, काव्यांचीं भाषांतरें, कल्पित कथा, देशवर्णनें इत्यादि विषय शोभणार नाहींत हें उघड आहे. ह्या मासिक पुस्तकाच्या नांवाप्रमाणें यांत निबंध मात्र छापले जातील. ते प्राय: मराठी भाषेच्या, देशस्थितीच्या, लोकाचारांच्या वगैरे सबंधानें असतील. अव-काशानुसार इतिहासादि शास्त्रीय विषयांवर लिहिण्याचा आमचा उद्देश आहे. एकच लांबलचक विषयाचा त्रास होईल ह्यास्तव पुस्तकाच्या शेवटीं दरखेपेस विशेषत: मनोरंजन होण्यासारखा कांहीं मजकूर घालण्याचा आमचा बेत आहे. उत्कृष्ट ग्रंथकारांचे उतारे, सुभाषितें, विनोदप्रचुर चुटके, महदाख्यायिका, अशा तऱ्हेचा तो मजकूर असेल. पुस्तक महिन्यांत केव्हांतरी निघून त्याचीं ४०–५० पृष्ठें असतील.'' वरील उताऱ्यावरून निबंधमालेचा उद्देश आणि स्वरूप आपल्या लक्षांत येईल. ''ईश्वरकृपेनें सरकारचें मिंधें झाल्यावांचून व बड्या मंडळीची ओशाळगत वागविल्या-वांचून आमचें पुस्तक आज दोन वर्षें खासें सुरळीत चाललें आहे. महाराष्ट्र

भाषेविषयीं कळकळ, स्वदेशाचा अभिमान, आणि ज्ञानाविषयीं उत्कंठा ह्यांनीं प्रेरित होत्साट्या शेंकडों लोकांचा आम्हांस वळकट आश्रय आहे" असें विष्णुशास्त्र्यांनीं मोठ्या अभिमानानें मालेच्या २ ऱ्या वर्षाच्या २४ साव्या अंकांतील वार्षिक समालोचनांत उद्‌गार काढलेले आहेत. मनोरंजन आणि बोध हे दोन्ही उद्देश साध्य करण्यासाठीं चिपळूणकरांनीं निरनिराळीं उद्‌बोधक सदरें आपल्या मासिकांत आणलीं. त्यांत त्यांची रसिकता, शोधकता आणि संग्राहक बुद्धि दिसून येते. वाचकवर्गाची जिज्ञासा, अभिरुचि, मार्मिकता आणि संशोधन बुद्धि, यांचा विकास करण्यासाठीं विष्णुशास्त्र्यांनीं खूप प्रयत्न केलेला आहे. वाचकवर्गांत त्यांनीं जी आस्था आणि गोडी उत्पन्न केली, ती केवळ अपूर्वच म्हटली पाहिजे. निरनिराळ्या काळांतील आणि क्षेत्रांतील विख्यात व्यक्तींविषयीं ज्या बऱ्यावाईट आख्यायिका कर्णोपकर्णीं चालत आलेल्या असतात, त्या ऐकण्याचा आणि स्मृतिगत करण्याचा चिपळूणकरांना विलक्षण नाद होता. चिपळूणकरांनीं विनोद महदाख्यायिका ह्या सदरांत दिलेल्या गोष्टी, कांहीं ऐकीव, कांहीं काल्पनिक, कांहीं ऐतिहासिक, कांहीं भारतीय तर कांहीं पाश्चात्य वाङ्मयांतून घेतलेल्या आहेत. त्यांच्या घरीं जो गप्पांचा अड्डा असे त्यांत त्या काळांतल्या सर्वच प्रमुख व्यक्तींची आणि घटनांची झडती होत असे. पण तत्कालीन मोठ्या व्यक्तींविषयीं ऐकण्यांत आलेल्या प्रवादांचा त्यांनीं कोठेंच उपयोग केलेला नाहीं.

प्रस्तुत निबंधमालेंत वाचकांचा पत्रव्यवहार हें हल्लीं गाजलेलें नवीन सदर त्यांनीं प्रथमत: सुरू केलें, व तें इतकें परिपुष्ट झालें व प्राधान्य पावलें कीं हें उपांग विष्णुशास्त्र्यांना सर्वच दृष्टींनीं गौरवास्पद ठरलें. कारण चिपळूणकरांनीं दिलेल्या उत्तरांत त्यांची सहृदयता, सहिष्णुता आणि समावेशकता दिसून येतात. आपले प्रतिपक्षीय, किंवा प्रतिस्पर्धी आक्षेपक आणि दूषक यांनाहि जास्तींत जास्त संधि देण्याची त्यांची प्रांजल वृत्ति दृग्गोचर होते. पण प्रतिपक्ष्यांवर वाग्बाण सोडतांना त्यांची ईर्ष्या, स्वमताभिमान, आणि आत्मविश्वास, त्याचबरोबर शास्त्रीबुवांच्या अंगीं असलेली नम्र वृत्ति आणि विवेक हेहि दिसून येतात. या प्रांजल वृत्तीमुळें मराठी वाङ्मयास खिलाडू स्वरूप आलें. मालाकार लिहितात, "सदरील पुस्तकांत आमची प्रतिपक्ष्याशीं झालेली चकमक वाचकांस माहीत आहेच. ही पद्धति किती उत्तम आहे हें कोणासहि दिसणार आहे. ..... सर्व लोकांसमक्ष दंड

ठोकून लढणें हें सत्यासत्याच्या निर्णयास अत्यावश्यक व परम भूषणरूप होय. मालेंतील सिद्धान्त स्पष्ट रीतीनें नमूद केलेले असून त्याजविषयीं, प्रसंगवशात् झालेली चर्चा चव्हाटयावर झालेली आहे.'' सर्व माला एकटयानें चालविल्यामुळें चिपळूणकरांच्या स्वभावानुसार कित्येक अंक वेळेवर निघत नसत. त्यासंबंधीं बोभाटाहि झाला होता. पांचव्या वर्षाच्या शेवटीं तर अंक ११ महिन्यांनीं मागें पडला. त्या वेळीं विष्णुशास्त्री विनोदानें लिहितात, ''आपली प्रिय वाचकमंडळी ५ वर्षांच्या अखेर एक वर्षाची सुटी मंजूर करण्यास फारशी कुरकूर करणार नाहींत.'' दोन वर्षें चहा प्यालेलें आपलें घडयाळ गेल्या सालच्या आरंभापासून अगदीं वेळेवर लावण्याचा निर्धारहि त्यांनीं व्यक्त केला आहे. 'दुर्मतध्वंसनार्थं' उचललेल्या आपल्या धनुष्यास तूर्त रजा देण्याचा आपला संकल्प जाहीर करतांना त्यांनीं आपल्या उशीराचें जें समर्थन केलेलें आहे तें सर्वच दृष्टींनीं समर्पक आणि मार्मिक वाटतें. आपण आरंभिलेल्या ह्या सप्तवार्षिक ज्ञानसत्राच्या अव्याहत उद्योगाला इतरत्र कोठेंहि तोड सांपडणार नाहीं असें त्यांनीं गर्वोक्तीचा दोष माथीं न घेतां म्हटलें आहे. ''स्वतंत्र निबंधरचनेचा विचार केला असतां ती पद्धति किती भिन्न आहे हें लक्षांत येणारें आहे. ··· हें बहुजनसाध्य कार्य आम्हीं स्वत:च अंगीकारिलें असतां त्यांत इतक्या अडचणी आल्या व तें वरचेवर मागें पडत असे ह्या गोष्टीचें वस्तुत: पाहतां कोणास आश्चर्य करण्यास कारण नसून इतक्या विषयांवर इतका काळ पावेतों आम्हीं लेखणी चालविली आणि कोणापाशीं एक छदाम किंवा एक ओळहि न मागतां अगर मेहेरबान डायरेक्टर साहेब किंवा ट्रान्स्लेटर साहेब यांच्या मेहेरबानीची बिलकूल फिकीर न करतां हें महासत्र संपविलें हीच विशेष गोष्ट होय असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं.'' हें त्यांनीं केलेलें उशीराचें समर्थन समर्पक नाहीं असें कोण म्हणेल? मालेवर अगदीं प्रारंभापासून सतत होत गेलेल्या टीकेची यत्किंचित् पर्वा न करतां विष्णुशास्त्र्यांनीं सत्यदेवतेच्या प्रीत्यर्थ दुर्मतांचें हवन करण्याचें आपलें व्रत शेवटच्या क्षणापर्यंत चालविलें. शास्त्रीबुवा म्हणतात, '' आजपर्यंत आमच्या देशाच्या हरेक गोष्टीविषयीं, आमच्या विद्येविषयीं, स्वभावाविषयीं, आचारविचारांविषयीं, धर्माविषयीं, भाषांविषयीं, कवितेविषयीं वगैरे ज्या लोकांच्या समजुती ठरून गेल्या आहेत त्यांपैकीं कित्येक नि:शंकपणें खोडून टाकून खोटया ठरविणें आणि

जें जें आम्हांस खरें भासलें तें तें, कितीहि लोकमत विरुद्ध असलें तरी आमच्या सुज्ञ व निःपक्षपाती वाचकांस प्रमाणासहित सादर करणें हा आमचा बाणा आहे " व हेंच निबंधमालेचें वैशिष्टय होय.

राजकारणाविषयीं शास्त्रीबुवांचीं मतें

नवशिक्षितांना ख्रिस्ती धर्मांत ओढण्याचें काम त्या वेळीं जोरांत चाललेलें होतें. हिंदु संस्कृतीवर सतत येत असलेली विध्वंसक टीका ही या धर्मप्रचाराला पोषक होती. मिशनरी नेहमीं भारतविरोधी प्रचार करीत. न्यायमूर्ति चंदावरकर यांनीं आपल्या आठवणींत एक नमुनेदार प्रसंग वर्णिला आहे. त्यांच्या प्राध्यापकांपैकीं एक फादर म्हणाले कीं, आशियांत जन्माला येणें हें पाप आहे. तेव्हां चंदावरकर यांचा स्वाभिमान जागृत होऊन त्यांनीं ताबडतोब विचारले कीं, भगवान् येशू ख्रिस्त हा आशियांत जन्मला नव्हता काय? या उर्मटपणाबद्दल त्यांना शिक्षा मिळाली हें सांगावयास नकोच. इंग्रजांनीं जे वरिष्ठ जातींतील लोक हाताशीं धरले त्यांनीं आपल्या स्वार्थासाठीं रयतेला त्रास देण्यास कमी केलें नाहीं. लोकहितवादी लिहितात, " मी एका कुळंब्याचें तोंडानें ऐकलें आहे कीं, साहेबाचें राज्य चांगलें. साहेब न्याय इन्साफ चांगला करतो, पण ब्राह्मण लोक त्यास शिकवून आमचीं घरें बुडवितात. जोंपर्यंत नेटिव्ह लोक दुर्गुणी व लोभी आहेत तोंपर्यंत त्यांचा पक्षपात कोणी करावा?" त्याचप्रमाणें सत्यशोधक समाजाचे संस्थापक ह्यांनींहि वरिष्ठ जातीच्या धार्मिक व राजकीय जुलमाविषयीं मागासलेल्या जातींत चीड निर्माण केली, व ब्रह्मराक्षसाच्या पीडेचें निवारण करण्यासाठीं बिनतोड उपायहि सरकारला सुचविला. ह्यावरून धर्म आणि संस्कृतीविषयीं सत्यशोधन त्या वेळीं सुरू झालें होतें. 'प्रभाकर' पत्रानें इंग्रजांच्या काव्याला थोडीफार वाचा फोडली होती. गोरे लोकांचा काळेपणा उघडकीस आणला होता. इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानावर कांहींहि उपकार केलेले नाहींत, ते आत्मस्वार्थी आणि मूळचे बुभुक्षित आणि दरिद्री आहेत, हिंदुस्थानांतील संपदा पाहून ते चकित झाले, व ही संपदा परमुलुखांत कशी नेतां येईल ह्याचाच ते विचार करूं लागले. दादोबा पांडुरंग यांचे बंधु भास्कर पांडुरंग यांनीं इंग्रजी राज्यनीतीची चिकित्सा आणि विदारणा इतकी मूलगामी आणि मर्मभेदक केली कीं, त्यांच्या धैर्याचें कौतुकच करावेसें वाटतें. चिपळूणकर, आगरकर आणि टिळक यांनीं

त्यांच्या सरकारवर तुटून पडण्याच्या बेदरकार धारिष्टाचीहि परंपरा पुढें पराकोटीला नेली.

पण तर्खडकरांनीं या परकीय इंग्रजी राज्याचा धिक्कार, 'जहरी शाप' म्हणून समर्पक शब्दांनीं १८४१ मध्यें केला. ह्या उलट नंतरच्या पिढींतील लोकहितवादी आणि रानडे यांच्यासारख्या द्रष्ट्यांनीं इंग्रजी राज्याला ईश्वरी योगायोग आणि ईश्वरी वरदान म्हणावें ही केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे !

महाराष्ट्राचें सार्वजनिक जीवन आणि मराठी वाङमय यांचा जो हा विकास निबंधमालेच्या पूर्वी होत होता त्याची चिपळूणकरांना पूर्ण जाणीव होती. इंग्रजांनीं केलेली एवढी यातायात केवळ परोपकारबुद्धीनें केलेली नाहीं व हिंदुस्थानचें राज्य करण्यांत त्यांचा अंतस्थ कावा आहे असें विष्णुशास्त्र्यांनीं प्रतिपादन केलें. मालाकारांना लोकांनीं मोठमोठ्या पदव्या लावल्या. त्यांची तुलना अतिरथी महारथी यांच्याबरोबर केलेली विष्णु-शास्त्र्यांना पसंत नव्हती. आपण काय वाचलेलें आहे व काय वाचलेलें नाहीं याचेंहि प्रांजल विवेचन त्यांनीं केलेलें आहे. आपल्या अंगावर उलटणारा कोटिक्रम किंवा मुद्दा चिपळूणकर मोठ्या मनानें मान्य करीत. आपल्या प्रतिपादनांत त्यांनीं सत्याभिमानाला अग्रस्थान दिलेलें आहे. 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत सत्य कसें चंचल असतें याचें वर्णन करतांना विष्णुशास्त्री लिहितात, "आम्ही कधीं कधीं नव्या लोकांस नांवें ठेवतों तर कधीं जुन्या लोकांसहि नांवें ठेवण्यास चुकत नाहीं. कधीं इंग्रजांची व इंग्रजी ग्रंथकारांची आम्हीं तारीफ केलेली आढळते. कधीं उलटहि प्रकार आढळतो. आमचे कोणत्याच विषयावर कांहींच मत निश्चित म्हणून नाहीं, किंवा हें आम्ही कांहीं तरी गौडबंगाल चालवीत असूं, आमचें प्रतिपादन कधीं ह्या पक्षाचें तर कधीं त्या पक्षाचें असतें हें खरें आहे, पण याचें कारण आमचें बुद्धिचांचल्य नव्हे, तर सत्याचेंच चांचल्य होय. सत्य हें एका राष्ट्राला, धर्माला, किंवा पक्षाला अनुसरून असतें असें नाहीं. सत्याचे अंश ज्यांत मिश्रित झाले नाहींत असा एकहि पक्ष नाहीं. ह्यास्तव एकाच पक्षाचा दृढ अभिमान धरणें हा दुरभिमान होय. यथार्थ ज्ञानाचा प्रसार करण्याचें काम जो पत्करील त्यानें केवळ सत्याचीच ओळख ठेवली पाहिजे." स्वदेशाच्या संबंधानें कोणी खोटाहि अभिमान वाहिला असतां तो तादृश दूषणार्ह नाहीं

अशी विष्णुशास्त्री यांची भावना होती. ह्यामुळें दंभस्फोट करण्याच्या भरांत उपहासाचा अनेक ठिकाणीं अतिरेकहि झालेला आहे. ज्या वेळीं परमेश्वराची उपासनासुद्धां इंग्रजींतून चाले त्या वेळीं विष्णुशास्त्र्यांनीं केलेल्या उपरोधी टीकेबद्दल त्यांना कोणी दोष देईल असें वाटत नाहीं. नवशिक्षितांना आपला धर्म, संस्कृति, समाज, आणि भाषा यांचा अगदीं उबग येऊन गेला होता. त्यांचा आत्मविश्वास ढासळला होता. मराठी भाषा अर्थव्यक्तीस लायक नाहीं असें त्यांचें मत होतें. चिपळूणकरांनीं या बाबतींत म्हटलें आहे, "आमच्या लोकांत कितीहि दोष असले तरी बुद्धीचा मंदपणा आमच्या माथीं मारतां येणार नाहीं. आमच्या बुद्धीचे प्रभाव जगाच्या इतिहासावर अक्षय कोरलेले आहेत." नवशिक्षितांपैकीं एकाहि पदवीधरानें आपला ज्ञानौघ मराठी भाषेच्या प्रवाहांत ओतला नाहीं. १९ व्या शतकांतील ज्ञानोपासनेचे, तत्त्वजिज्ञासेचे आणि इतिहाससंशोधनाचें सारसर्वस्व या विद्वानांच्या इंग्रजी लिखाणांतून सांठविलेलें आहे असें म्हटलें तरी चालेल. पण मराठीला हें ज्ञानधन असून नसल्यासारखेंच होऊन बसलें आहे. "आपल्या भाषेच्या अंगीं अर्थव्यंजकता कमी आहे हा अलीकडील विद्वानांचा ग्रह कांहीं अंशीं तरी मोडून टाकण्यास जर आमचे निबंध कारणीभूत झाले तर आमच्या हातून देशाहिताचें मोठेंच कृत्य घडलें असें आम्ही मानूं." असा विष्णुशास्त्र्यांनीं अभिप्राय व्यक्त केला आहे. चिपळूणकरांनीं हातांत लेखणी धरण्यापूर्वीं मराठी भाषा पोरकी आणि परावलंबी होती. निबंधमालेनें मराठीभाषेविषयीं अभिरुचि आणि अभिमान उत्पन्न केला व नवशिक्षितांना तिच्या सेवेला उद्युक्त केलें. नव्या राज्यकर्त्यांशीं एकरूप होण्याच्या लालसेनें पछाडलेल्या सुशिक्षित वर्गाचा स्वार्थ आणि घमेंड यांचा दंभस्फोट आपल्या अमोघ शैलीनें करून सामान्य लोकांचे हितसंबंध म्हणजेच सर्व देशाचे हितसंबंध या सत्याची जाणीव त्यांनीं नव्या पिढीला करून दिली.

निबंधमालेची शैली आणि विचार

चिपळूणकरांच्या शैलीवर जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, कृष्णशास्त्री चिपळूणकर या पहिल्या पिढींतील लेखकांचा परिणाम झाला. इंग्रजी लेखक ॲडिसन, जॉन्सन् आणि मेकॉले यांच्या शैलीचेंहि त्यांनीं अनुकरण केलें. विष्णुशास्त्र्यांच्या जीवनावरच ह्या तीन इंग्रज ग्रंथकारांचा

परिणाम झाला होता. मग तो त्यांच्या शैलीवर झाला असल्यास आश्चर्य नाहीं.

इंग्रजी विद्येच्या अभिमानानें त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे, "प्राचीन काळीं महापंडित होणें जितकें कठीण तितकेंच आतां महाशंख होणें कठीण झालें आहे." इंग्रजी विद्येवर त्यांची परमभक्ति होती. ते इंग्रजी विद्येला 'वाघिणीचें दूध' असें म्हणत. इंग्रजी विद्येला त्यांनीं वज्राचीहि उपम दिलेली आहे. त्यांनीं निबंधमाला डोळसपणानें आणि सर्वविषयीं सावधपणानें चालविली होतीं. त्यांच्या प्रखर टीकेनें क्रुद्ध झालेल्या आक्षेपकांनीं त्यांना ॲडिसनच्या सौम्य लेखनशैलीचें अनुकरण करण्याचा उपदेश केला. तेव्हां मालाकारांनीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, ॲडिसनचीं सौम्य भाषाशैलीं त्या कालास शोभून गेली .... हल्लींच्या दुर्धर देशस्थितींत व आणिबाणीच्या प्रसंगीं अत्यंत महत्त्वाच्या शेंकडों विषयांवर लिहिणें जरूर असतां वरील ग्रंथकाराच्या पद्धतीस अनुसरून किरकोळ विषयांवर टीका करूं लागलें तर तें किती शोभेल बरें? ॲडिसननें ज्याप्रमाणें इंग्रजी निबंधाचा पाया घातला त्याप्रमाणें विष्णुशास्त्र्यांनीं मराठी निबंधांना ठाकठीक स्वरूप दिलें. निबंधमालेचें वाङ्मयीन स्वरूप अत्यंत रमणीय झालें आहे. विविध विषयांचें विवेचन त्यांत आलें आहे. माडखोलकर म्हणतात, "विविध विषयांच्या सुबोध विवेचनानें आणि नाना प्रकारच्या विपुल माहितीनें भरलेला इतका मनोरंजक आणि उद्बोधक निबंधसंग्रह मराठींत अद्याप दुसरा झालेला नाहीं. इतके चित्ताकर्षक निबंध चिपळूणकरांपूर्वी मराठींत कोणीहि लिहिलेले नव्हते." फार थोडया अवधींत निबंधमालेनें जनमनाची पकड घेतली व मराठी भाषेच्या दूषकांच्या अंत:करणाचा थरकांप करून सोडला. चिपळूणकरांना पडवळाप्रमाणें सैल झालेल्या नवशिक्षितांना पाठीचा कणा द्यावयाचा होता. चिपळूणकरांची लेखनशैली लढाऊ होती. त्यांचें विवेचन अत्यंत सुगम आणि सरस असे. भावनांची रम्यता व कल्पनांची उज्ज्वलता त्यांच्या शैलींत दिसून येते. प्रौढ आणि भारदस्त लेखनासाठीं भरींव संदर्भ देण्याची कला त्यांनीं हस्तगत केली होतीं आणि यामुळेंच मराठी भाषेविषयीं नवशिक्षितांत त्यांनीं आदर उत्पन्न केला. प्रत्येक निबंधाच्या सुरवातीला चिपळूणकरांनी अनेक सुभाषितें वापरलीं आहेत. टिळकांनींहि त्यांचेंच अनुकरण आपल्या राजकीय लेखांतहि केलें आहे. चिपळूणकरांचा

विनोद मिशनरी लोक व नवविद्वान् यांच्या कुचाळीमधूनच निर्माण झालेला आहे. कित्येक प्रसंगीं ह्या अप्रस्तुत टीकेनें निबंधांना वेढबपणा आला आहे. इतर मोठ्या म्हणविल्या गेलेल्या व्यक्तींनीं जर हास्यरसाचा आश्रय घेतला आहे, तर "तो श्लाघ्य क्रम पुढें चालविण्यास आमच्या निबंधमालेस कां आडकाठी असावी?" जाणून बुजून दंभस्फोट करण्यासाठीं लिहिलेल्या निबंधांत चिपळूणकरांनीं कठोरपणा धारण केलेला आहे. "देशहितेच्छु म्हणविणाऱ्यांचा दंभ ध्यानांत घेतला असतां त्याचा नायनाट करायला उपयोगी पडलेला चिपळूणकरांच्या वाणींतील हा त्रिषार सत्कारणीं लागला" असें आपलें प्रामाणिक मत श्री. माडखोलकरांनीं चिपळूणकरांवरील आपल्या विद्वत्तापूर्ण निबंधांत प्रदर्शित केलें आहे.

ल. रा. पांगारकर यांनीं 'निबंधमालेचें स्वरूप व कार्य' ह्या आपल्या पुस्तकांत निबंधमालेचें विषयवार वर्गीकरण केलें आहे. (१) भाषाविषयक (२) वाङ्मयविषयक व चर्चात्मक यांत इतिहास, आणि विद्वत्त्व आणि कवित्व हे निबंध येतात. (३) परमतखंडनात्मक (४) सामाजिक (५) राजकीय —'आमच्या देशाची स्थिति' हा निबंध ह्या सदरांत येतो. (६) मानस शास्त्रीय.

कोणत्याहि लेखकाच्या मतांची नीट जुळणी करतांना उपक्रम आणि उपसंहार पहाणें अगत्याचें असतें. चिपळूणकरांनीं निबंधमालेच्या सुरवातीस "आम्हास तर असें वाटतें कीं आमचे खरे गुण व इंग्रजांचे खरे दोष प्रकट केले असतां ··· ज्यांस सत्यप्रीति आहे अशा कित्येक थोर इंग्रजांस ते पसंत पडतील. ··· प्रस्तुत सरकारच्या राज्यरीतींतील दोष दाखवून दिले असतां तें रागावेल याची शंकाच नको." निबंधमालेच्या शेवटीं उपसंहार करतांना चिपळूणकर म्हणतात, "ज्या उद्देशानें प्रस्तुत निबंधरचनेला आम्ही प्रवृत्त झालों तो आतां पुष्कळ अंशीं सिद्धीस गेला आहे. निबंधमालेच्या पूर्वीची स्थिति म्हटली म्हणजे नवीन विद्वान् कागदास मराठी लेखणीचा टांक म्हणून कधीं लावावयाचे नाहींत. इंग्रज ग्रंथकारांच्या पेनांतून उतरलें म्हणजे तें ब्रह्मवाक्य. अशी परमशोचनीय स्थिति उत्तरोत्तर पालटत चालली आहे. आमचे देशबंधु अगदींच वहकून गेले होते. त्यांस ताळ्यावर आणण्याचा संकल्प योजूनच आम्हीं कलम हातांत धरलें होतें. ह्या सर्वांचें खंडन करून लोकांचे त्या त्या प्रकरणीं बरोवर समज करावेत हा जो आमचा पुष्कळ

दिवसांचा मनोरथ होता त्याचें साफल्य झालें. चिपळूणकरांच्या मनांतून स्वाभिमानशून्य बनलेल्या महाराष्ट्राला, त्याच्या ठिकाणीं जडलेल्या न्यून-गंडाचें निराकरण करून स्वाभिमानी बनवावयाचें व मानसिक क्रांति घडवून आणावयाची होती. हें महत्त्वाचें कार्य त्यांना निबंधमालेमार्फत घडवून आणावयाचें होतें.

निबंधमालेला जशी वैचारिक क्रांति घडवून आणावयाची होती त्याप्रमाणें लोकांच्या ठिकाणीं राष्ट्राभिमान जागृत करावयाचा होता. हें सर्व काम चिपळूणकरांनीं एकट्यानें केलें. यांतच त्यांचें अपूर्व कर्तृत्व दिसून येतें. सतत आठ वर्षें एकटाकी मासिक चालविणें ही केवळ असामान्य गोष्ट होती. त्यांतच त्यांचें अलौकिकत्व दृग्गोचर होतें. त्यांच्या आत्मविश्वासाला दर्पोक्तीची झांक मारते असें इतक्या वर्षांनंतर आज आपण फार तर म्हणूं. पण ज्या काळांत त्यांनीं हें लेखन केलें, त्या काळांत त्याची आवश्यकता होती असा प्रांजलपणानें निर्वाळा द्यावा लागेल. चिपळूणकरांनाहि आपल्या ह्या कर्तृत्वाची पूर्ण जाणीव होती हें त्यांच्या मालेंतील समारोपावरून स्पष्ट दिसून येतें.

मालाकारांच्या ठिकाणीं लढाऊ वृत्ति होती. प्रतिपक्षीयांस 'केसरी'चें दर्शन घडविण्याची व मराठ्यांचा भाला चमकविण्याची ते सार्थ भीति घालीत. त्यांच्या ठिकाणीं असलेल्या लढाऊ वृत्तीमुळें त्यांच्या लेखणीला चांगलाच तिखटपणा येत असे. लो. टिळक म्हणतात, "इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या घोटा-बरोबर जो अव्यवस्थितपणाचा मद आलेला होता तो शास्त्रीबुवांनीं दूर केला व लोकप्रवृत्तीला सदाचाराचें व खऱ्या देशाभिमानाचें वळण लावण्याचें महान् कार्य त्यांनीं पार पाडलें." म्हणजे चिपळूणकरांच्या लेखांतला जहालपणा केवळ परिस्थितिजन्य, आणि तोहि विघातक स्वरूपाचा नसून विधायक स्वरूपाचा होता हें टिळकांनीं आपल्या लेखांत सूचित केलें आहे. खुद्द चिप-ळूणकर म्हणतात, " सर्व मनुष्यांस आपापलें मत सर्व लोकांस स्पष्टपणें कळविण्याचा पूर्ण अधिकार आहे, व ह्या अधिकारांतच आपल्या प्रतिपक्ष्यावर कोटिक्रम करण्याची मोकळीकहि येते. " आपल्या युयुत्सु वृत्तीचें समर्थन करतांना चिपळूणकरांनीं बिनतोड युक्तिवाद केला आहे. " परस्परयुद्धास समोर उभे ठाकलेल्या सैन्यानें तुम्ही फार कठोर प्रहार करतां अशी तक्रार करणें जितकें हास्यास्पद आणि अप्रयोजकपणाचें आहे तितकेंच एकदां वाग्युद्ध

सुरू झालें असतां तुम्ही आमच्यावर फार कडक टीकास्त्र सोडतां असा आक्षेप घेणें हेंहि अप्रयोजकपणाचें आहे. ''

हाच कोटिक्रम चिपळूणकरांच्या भात्यांतला मोठा मर्मभेदक बाण आहे. त्यांच्यापुढें माधवराव रानडयांसारख्यांनींहि हार खाल्ली आहे. त्यांनीं पत्र-व्यवहाराचें जें सदर सुरू केलें त्यांत त्यांचा विनतोड कोटिक्रम दिसून येतो. ह्या कोटिक्रमाबरोबरच मालाकरांची खिलाडू वृत्तिहि प्रदर्शित होते. प्राध्यापक अ. ना. देशपांडे म्हणतात, '' खिलाडू वृत्ति, कुशाग्र बुद्धि सत्यभक्ति, प्रांजल विवेचनपद्धति, विरोधकाची योग्यता पाहून प्रकट होणारी सभ्य व विनयशील वर्णनरीति, स्वाभिमानी वृत्तीबद्दल वाटणारी आदरयुक्त प्रीति इ. मनोज्ञ गुणविशेष मोठ्या विलोभनीय स्वरूपांत या पत्रव्यवहारांत प्रकट झाले आहेत.'' प्रतिपक्ष्यावर कोटिक्रमाचें हत्यार चालविण्यांत त्यांचा हेतु केवळ कुचाळकी व द्वेष करण्याचा मुळींच नसे. त्यांत सत्यनिरूपणाचा अट्टाहास दिसून येई. आपली चूक कबूल करण्यासहि ते नेहमीं तयार असत. ल. रा. पांगारकरांनीं 'मोरोपंतांची कविता' हा विष्णुशास्त्र्यांच्या विधायक टीकेवद्दल साक्ष पटविण्यास उपयोगी असा निबंध आहे असें आपलें मत प्रकट केलें आहे. ह्या निबंधानें सर्व लहानथोरांचें लक्ष निबंधमालेकडे ओढलें जाऊन बिचाऱ्या मोरोपंतांची निरर्थक दूषणांतून मुक्तता झाली. विष्णुशास्त्र्यांच्या शैलीपैकीं उपहासप्राचुर्य हा विशेष वाण होता. त्यांची उपहासप्रवृत्तिहि प्रकृतिगत स्वरूपाची होती. उपहास करते वेळीं त्यांची लेखणी विलक्षण तिखट बनत असे. ह्या उपहासगर्भ टीकेमुळें महाराष्ट्राच्या अभिरुचीला कुचेष्टेचें वळण लागल्याचा आरोप विष्णुशास्त्र्यांवर करण्यांत येतो. पण त्यांच्या उपहासाचें खरें कारण समजून घेतल्यानंतर हा आरोप निराधार वाटतो. चिपळूणकरांनीं ज्यांचा उपहास केला त्यांची वागणूकच तशी होती. उपहासाच्या विखारानें माखलेल्या लेखणीचा एक फटकारा मारून ते प्रतिस्पर्ध्याला चीत करीत. चिपळूणकरांच्या लिखाणांतील उपहासाचा वापर समर्थनीय होता असें अ. ना. देशपांडे यांनीं आपलें मत दिलें आहे.

'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' हा निबंधमालेंतील पहिला निबंध असून 'आमच्या देशाची स्थिति' हा तिच्यांतील शेवटचा निबंध आहे. देशाभिमानास स्वभाषाभिवृद्धीचा मोठा मार्ग विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं पहिल्या निबंधांत घालून दिला व शेवटच्या निबंधांत आपल्या देशाची

स्थिति कशी विदारक झाली आहे याची कल्पना दिली. हीं दोन प्रमुख ध्येयें विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं सतत डोळ्यांसमोर बाळगलीं असल्यामुळें त्यांचें सर्व लेखन या तळमळींतूनच बाहेर पडलें आहे. विशेषत: मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठीं मिशन-यांनीं केलेल्या प्रयत्नांच्या मागें जो कावा होता त्याची जाणीव न झाल्यामुळें नवशिक्षितांना इंग्रजी राज्य हें ईश्वरी वरदान वाटत असल्यामुळें विष्णुशास्त्र्यांच्या अंत:करणाला पीळ पडे. आगरकरांच्या विष्णुशास्त्र्यांवरील मृत्युलेखांत "विष्णुशास्त्री अगोदर एक पाय तुरुंगांत ठेवूनच देशोन्नतीसाठीं लेखणी उचलीत असत" असें विधान केलेलें आहे. "भाषेची अभिवृद्धि ही देशाच्या उत्कर्षाचें एक मोठें साधन असून तें प्रयत्नाधीनहि बरेंच आहे" असा खुद्द विष्णुशास्त्र्यांनींच उलेख केलेला आहे. ह्याविषयीं विष्णुशास्त्र्यांनीं मराठी भाषेच्या अभिवृद्धीस सुरवात करून हळूहळू वाचकांचीं मनें ताब्यांत घेतल्यावर 'देशोन्नति' किंवा 'आमच्या देशाची स्थिति' यासारखे ज्वलंत देशाभिमानानें प्रेरित झालेले निबंध वाचकांच्या गळीं उतरवून पारतंत्र्याबद्दल अप्रीति उत्पन्न केली व जनतेच्या आकांक्षा वाढीस लावल्या.

खं. भि. वेलसरे यांनीं विष्णुशास्त्र्यांवरील आपल्या निबंधांत असें प्रतिपादन केलें आहे कीं, "शास्त्रीबुवांच्या अंगचा विशेष गुण म्हटला म्हणजे त्यांचा मुत्सद्दीपणा होय. ह्यास दूरदृष्टि, विचारीपणा, समयोचितता वगैरे अनेक पर्याय आहेत." निबंधमालेची रचनासुद्धां त्यांनीं याच तत्त्वावर केली आहे. सुरवातीला निर्विवाद, निरपवाद आणि सोज्वळ विषय घेत घेत ते रणांगणावर उतरले आहेत व मगच दंड थोपटून प्रतिपक्षीयांना आव्हान देणाऱ्या विषयांना त्यांनीं हात घातला आहे व नवशिक्षित मिशनरी आणि सुधारक यांच्यावर जोरदार हल्ले चढविण्यास सुरवात केली आहे. हळूहळू आपलें म्हणणें लोक शांतपणें ऐकून घेत आहेत असें पाहून वक्ता ज्याप्रमाणें श्रोतृवृंदाला आपलेसें करीत आपला विषय त्यांच्या गळीं उतरवितो त्याप्रमाणें विष्णुशास्त्र्यानीं केलें आहे. अशा रीतीनें पोचट मतांचा धुव्वा उडवून व फोलकट कृत्यांचा फापट पसारा बाजूस सारून त्या त्या मंडळींचें हृद्गत जेव्हां त्यांनीं बाहेर काढावयास सुरवात केली त्या वेळीं त्यांच्या प्रतिपक्षीयांना हार खावी लागली. "कांहीं काळ मराठी भाषेवर त्यांनीं जें अद्वितीय आधिपत्य भोगलें तें त्यांच्या मुत्सद्देगिरीचेंच फळ होय" असें श्री. वेलसरे यांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे.

शास्त्रीबुवांचा बहुश्रुतपणा या निबंधमालेंत जागजागीं प्रत्ययास येतो. त्यांचें वाचन किती विस्तृत होतें, आणि त्यांचें अवलोकन किती सूक्ष्म होतें याचें प्रत्यंतर आपणांस येतें. मालेच्या प्रत्येक निबंधास समर्पक अवतरण शोधून काढण्यांत त्यांची बहुश्रुतता दिसते. जागजागीं टीपांमधून त्यांनीं विस्तृत माहिती दिलेली आहे. अवतरणें उद्धृत केलेलीं आहेत. विष्णुशास्त्रीं यांची व्युत्पन्न रसिकता या निबंधमालेंत स्वच्छ दिसून येते. स्वत:चें चारित्र्य निष्कलंक असल्यामुळें त्यांनीं सदभिरुचीस कधींहि बाध आणला नाहीं. उलट सदभिरुचिच राष्ट्राला कशी पोषक व उद्बोधक आहे हें त्यांनीं राष्ट्राला दाखवून दिलें. शास्त्रीबुवाच्या बहुश्रुतपणामुळेंच निबंधमाला म्हणजे एक ज्ञानकोपच आहे असें माडखोलकरांनीं केलेलें विधान रसिक वाचकांस पटल्याशिवाय राहणार नाहीं.

निवंधमालेला जें वाङमयीन स्थान प्राप्त झालेलें आहे, त्याला कारण त्यांची मनोवेधक शैलीच आहे. मराठी गद्याला सौष्ठव प्राप्त करून देऊन मराठी सारस्वताचा उकृष्ट रस्ता त्यांनींच प्रथम तयार केला. या रस्त्या-वरून पुढें जात असतांना अनेक थोर थोर लेखकांनीं विष्णुशास्त्र्यांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला असला पाहिजे. परंतु त्यांच्यासारखें थोर व्यक्तिमत्त्व व मनाची प्रांजळ ठेवण, कळकळ आणि तळमळ हीं सर्वांसच त्यांच्या प्रमाणांत न मिळाल्यामुळें त्यांना विष्णुशास्त्र्यांच्या लेखनशैलीचें अनुकरण करणें शक्य झालें नाहीं. याच अर्थानें "मी मराठी भाषेचा शिवाजी अमून तसा पूर्वी होऊन गेला नाहीं व पुढेंही होणार नाहीं.' असे उद्गार त्यांनीं काढलेले असावेत. विष्णुशास्त्र्यांची भाषाशैली म्हणजे वाग्गंगेचा संथ प्रवाह; परंतु त्यांत वक्तृत्वाचा ओघ आहे व भावनांची ओढ आहे. त्यांची वर्णनशैली आकर्षक होती. या आकर्षक वर्णनशैलीचीं उदाहरणें जागजागीं सांपडतात. भाषापद्धतीचे गुण सांगतांना, सुगमता, सुबोधत्व आणि सरलता अशा तीन गुणाचा त्यांनीं उल्लेख केला आहे. स्वत: घालून दिलेली ही मर्यादा त्यांनीं आपल्या निबंधमालेंत उतम रीतीनें पाळली आहे. भाषेचा वाह्य डौल त्यांनीं कायम राखला आहे. समर्पक आणि प्रासंगिक दाखले देऊन त्यांनीं आपलें म्हणणें सजविलें आहे. स्वच्छ हंडींतून मेणबत्तीचा प्रकाश जसा सगळीकडे पसरतो त्याप्रमाणें त्यांच्या निवंधांची धाटणी आहे. चिपळूणकरांच्या लेखनांतील भावनाशालित्वाच्या गुणांचें वर्णन करतांना

प्राध्यापक बनहट्टी लिहितात, "चिपळूणकरांनीं आपल्या भावनांचा अत्यंत कुशलतेनें आविष्कार करून जनतेच्या हृदयांत संवादी भावना उत्पन्न केल्या व तिचें मन वश करून घेंतलें." तरी पण त्यांची भावनाशीलता कधींहि मर्यादा ओलांडून गेली नाहीं किंवा तिचें भडक प्रदर्शनहि झालेलें नाहीं. चिपळूणकरांची भावनाशीलता विकारवशतेंतून निर्माण ालेली नाहीं. शास्त्री-बुवांचा स्वभाव जरी हट्टी होता व वरवर दिसण्यांत ते जरी जॉन्सनसारखे एककल्ली होते, तरी त्यांच्या लेखनशैलींत मात्र भावनांचा सूक्ष्म विलासच दृष्टीस पडतो. विशिष्ट भावना रसिकांच्या मनांत जागृत करण्याचें सामर्थ्यहि चिपळूणकरांच्या ठिकाणीं होतें. कारण, विचारांच्या बैठकीवरच भावनांचा मनोज्ञ आविष्कार ते करीत, पण भावनांच्या आहारीं मात्र ते कधीं जात नसत. म्हणूनच प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनीं म्हटलें आहे, "चिपळूणकरांच्या प्रकृतींत भावनांचा संनिवेश असला तरी त्यांची भावना सारासार विचारानें नियमित झालेली असल्यामुळें तिच्या द्वारा इष्ट अशींच कार्यें घडून आलीं."

चिपळूणकरांचा मराठीबद्दलचा अभिमान जाज्ज्वल्य होता. त्यांच्या समकालीन किंवा पूर्वकालीन लेखकांनीं आपले ग्रंथ मराठींत न लिहितां इंग्रजींत लिहिल्याबद्दल त्यांनीं जागजागीं आग पाखडली आहे. मराठी भाषेविषयींची ही उपेक्षा बुद्धि नष्ट करून तिच्या विषयीं अभिमान उत्पन्न करण्याचें ऐतिहासिक महत्त्वाचें कार्य निबंधमालेनें केलें आहे. मातृभाषेची उपेक्षा करण्यांत आपल्या हातून केवढें राष्ट्रविघातक पाप होत आहे याची जाणीव त्यांनीं जनतेला करून दिली. मराठी भाषेचें हें माळरान नांगरून व ताली घालून मराठीची मरुभूमि सुपीक बनविली असेल तर ती विष्णुशास्त्र्यांनींच. मातृभाषेची सेवा म्हणजे देशसेवेच्या व्रताचें एक अंगच होय असें ते मानीत असत. मायभूमीची मातृभाषेमार्फत त्यांनीं केलेली सेवा त्यांच्या परिश्रमशीलतेची द्योतक आहे. मालेच्या कामांत त्यांनीं हलगर्जीपणा कधींहि केला नाहीं. ते म्हणतात, "वाग्देवीची उपासना किती विकट आहे, ती सन्मुख येऊन उभी ठोकेतोंपर्यंत किती आढेवेढे घ्यावे लागतात, आपल्या मनाजोगती ती सजणें हें अनेक प्रसंगीं किती दुरापास्त असतें इ. रहस्यांचें ज्ञान स्वानुभवाविना प्रायः अगम्यच होय." महिनाभर सुस्त पडून व उगीच कोठें चार दिवस लेखणीला श्रम देऊन त्यांनीं अंक भरून टाकले आहेत असें कधींच झालें नाहीं. या कामीं त्यांनीं प्रयत्नांची

पराकाष्ठाच केलेली आढळेल. ह्या अखंड परिश्रमांचा परिपाक म्हणजेच त्यांची निबंधमाला होय.

भाषेच्या बाबतींत विष्णुशास्त्र्यांची दृष्टि पुरोगामी होती. ते जरी दिसण्यांत कर्मठ असले आणि सुधारकांवर त्यांनीं कठोर हल्ले चढविले असले, तरी त्यांची वृत्ति प्रगमनशील होती. इंग्रजींतील ज्ञानसंपत्ति लुटून मातृभाषेंत आणावी व अशा रीतीनें मातृभाषा समृद्ध करावी हा त्यांचा सोज्वळ हेतु होता. नवीन इंग्रजी विद्वानांवर जरी ते हल्ले करीत तरी इंग्रजी भाषेवद्दल त्यांना विलक्षण प्रेम असे. ते म्हणतात, "इंग्लिश भाषेचा आम्ही द्वेष करीत नाहीं. हें तर काय, पण आपल्या मराठीच्या उत्कर्षास ती मोठेंच साधन होईल अशी आमची खात्री आहे. आपल्या भाषेची अभिवृद्धि होण्यास एकीकडून संस्कृत व एकीकडून इंग्रजी अशा दोहोंचा तिला वळकट आधार सांपडला पाहिजे. संस्कृत व विशेषत: इग्रजी भाषेंत जें अगाध ज्ञान भरलें आहे त्याचा पाट फोडून जर आपल्या भाषेकडे वळवितां येईल तर केवढी मजा होईल." आपल्या भाषेचें स्वत्व कायम ठेवून इंग्रजींतील विचार आणि शब्दसुद्धां घेण्यास हरकत नाहीं अशी त्यांची व्यापक व उदार दृष्टि होती. इंग्रजीचें ऋण त्यांनीं मोकळ्या मनानें मान्य केलें आहे. आणि म्हणूनच विष्णुशास्त्र्यांना 'आधुनिक मराठी गद्याचे जनक' अशी पदवी जनतेनें दिली आहे. जे शब्द किंवा जे प्रयोग अनेक लोकांच्या वापरांत आल्यामुळें रूढ झाले आहेत, ते व्याकरणदृष्ट्या हिणकस असले तरी पावन करून घेण्यास हरकत नसावी अशी त्यांची पुरोगामी दृष्टि आहे. चिपळूणकरांनीं मराठी गद्याचा कायापालट घडवून आणला असें म्हणण्यापेक्षां त्यांनीं मराठी गद्याला नवीनच शरीर दिलें असें म्हणावें लागेल. चिपळूणकरांपासून मराठी गद्याच्या आधुनिक युगाला सुरवात झाली हें ह्या अर्थानें म्हटलेलें आहे. बाबा गर्दे या नांवाच्या रसिक वाचकानें मराठी भाषेविषयीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केलेल्या परिश्रमाचें मोठें गोड कौतुक केलें आहे. सुंदर वाङ्मयाच्या नवनिर्मितींत ते रममाण झालेले होते. तरी त्यांनीं निबंधमालेंतून महाराष्ट्राला राष्ट्रदृष्टि दिलेली आहे.

ते वेदाभ्यास जड म्हणून रूक्ष आणि नीरस मात्र कधींहि झालेले नाहींत. त्यांची शैली मोठी मनोरंजक आहे. त्यांनीं निबंधमालेंत अनेक नवीन नवीन चटकदार सदरें निर्माण करून मराठी भाषा बहुढंगी बनविण्याचा उपक्रम

केला आहे. प्रा. बनहट्टींनीं संपादिलेल्या 'विष्णुपदी'त मालेंतील निवडक भागच छापलेला आहे, पण त्यानें चिपळूणकरांच्या व्यक्तिमत्त्वाचें यथायोग्य सर्वांगीण दर्शन होऊं शकतें.

निबंधमालेनें प्रथमच निबंध, चरित्र आणि टीका वाङमयाला प्रतिष्ठित स्वरूप प्राप्त करून दिलें. यापूर्वी हे प्रकार कोणी हाताळले नाहींत असें नाहीं. पण प्रयत्नपूर्वक निबंध हा वाङमयप्रकार इंग्रजींतून घेतला असला तरी तो मराठींत आतां एकजीव झालेला आहे. प्रा. बनहट्टींच्या मतानें हे जसे आद्य मराठी निबंधकार, त्याचप्रमाणें ते आद्य मराठी चरित्रकारहि म्हणविले जाण्याच्या योग्यतेचे आंहेत. टीकेच्या बाबतींतहि त्यांनीं युगप्रवर्तक कार्य केलें आहे. चिपळूणकरांनीं आपल्या मालेंत ग्रंथावर टीका हा एक स्वतंत्र लेख लिहून आदर्श टीका कशी असावी व टीकाकाराच्या अंगीं कोणते गुण असावे याचें विवेचन केलें आहे व त्याच्या अनुषंगानेंच कित्येक मराठी पुस्तकांवर निर्भीड पण गुणग्राही परीक्षणें करून त्यांनीं टीकाशास्त्र समृद्ध केलें आहे. ह्या कर्तृत्वामुळेंच आधुनिक मराठींतले पहिले टीकाकार होण्याचा अपूर्व मानहि त्यांनाच द्यावा लागेल. निबंधमालेनें ध्येयवादी कार्यकर्त्यांची एक उज्ज्वल परंपराच निर्माण केली. चिपळूणकरांपासून वाङमयसेवेची स्फूर्ति घेऊन त्यांनीं मराठी भाषेस उच्चासनावर बसविलें. हेंच त्यांच्या कार्याचें अनन्यसाधारण स्वरूप होय. आणि म्हणूनच प्रा. अ. ना. देशपांडे यांनीं जें म्हटलें आहे कीं, "सामर्थ्यशाली स्फूर्तिदायकत्वाच्या दृष्टीनें निबंधमालेशीं तुल्यबळ असा दुसरा ग्रंथ आधुनिक मराठींत सांपडणें अशक्य आहे." या त्यांच्या मताशीं सर्वच सहमत होतील असा विश्वास वाटतो.

थोरांचा जन्म जितका मनोवेधक असतो तितकेंच त्यांचें मरणहि आकर्षक असतें. आपण कार्य करीत असतांनाच माणसाला मरण येणें मोठें भाग्याचें समजतात. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा शेवटचा लेख त्यांच्या मरणानंतर प्रसिद्ध झालेला आहे. यावरून शेवटपर्यंत कार्य करीत राहण्याचें भाग्य त्यांना लाभलें व त्यांचें मरणहि अद्वितीय ठरलें.

देशोन्नतीप्रीत्यर्थ आपल्या देशबांधवांना आत्मज्ञानाचा आणि स्वाभिमानाचा सन्मार्ग दाखवून व दुर्मतांच्या ढगांमुळें आलेला अंधकार नाहींसा करून चिपळूणकरांची लेखणी देशोन्नतीवरील आपले विधायक विचार व्यक्त करतां करतां विराम पावली.

चिपळूणकरांचे विचार पुरोगामी होते. सर्वच बाबतींत ते आधुनिक होते. त्यांनीं केलेलें तात्त्विक विवेचन आणि व्यावहारिक विषयांविषयीं त्यांनीं केलेली चर्चा लक्षांत घेतली असतां त्याचे विचार मूलगामी आणि मौलिक आहेत असा विद्वानांचा अभिप्राय आहे. चिपळूणकरांच्यावर त्यांच्या प्रतिपक्षीयांनीं जे हल्ले चढविले आहेत, त्यावरून ते जुनाट पुरुष होते, ते जुनाट वळणाचे गृहस्थ होते असा समज होण्याचा संभव आहे. परंतु त्यांनीं नवीन विचारांकडे पाठ फिरविलेली नाहीं. त्यांनीं समाज-सुधारणेच्या कोणत्याहि उपक्रमाला मोठा तीव्र विरोध केलेला नाहीं. त्यांच्या विरुद्ध मुद्दाम पसरविण्यांत आलेला हा एक भ्रम आहे. फुले, लोक-हितवादी, रानडे प्रभृति तत्कालीन सुधारकांवर त्यांनीं जी टीका केली त्यावरून ते जुन्या मताचे होते असा गैरसमज झाला आहे. परंतु त्या काळीं वर उल्लेखिलेल्या व्यक्तींवर ज्यांनीं ज्यांनीं प्रतिकूल टीका केली त्या सर्वांना नवमतविरोधक म्हणावयाचें कीं काय हा प्रश्न आहे. उदाहरणार्थ, 'इंदु-प्रकाश' च्या संपादकांनीं दयानंद सरस्वतींच्यावर हल्ला चढविलेला आहे. विष्णुशास्त्र्यांच्या टीकेंत तीव्रता जरा अधिक असेल यापलीकडे त्यांत कांहीं फरक नाहीं. रानडे यांनींहि दयानंद सरस्वतींच्यावर अशीच टीका केली आहे. आर्यसमाज, प्रार्थनासमाज आणि त्यांचे प्रवर्तक यांच्या संबंधींहि तत्कालीन सुधारकांत तीव्र मतभेद आहेत. ख्रिस्ती लोकांचे आचार-विचार हा एक मोठा चिंतामणीच त्यांना मिळालेला होता, व त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून प्रार्थनासमाजवादी जात होते. अशी प्रतिकूल टीका त्या काळीं पुष्कळांनीं केलेली आहे. चिपळूणकर विचारस्वातंत्र्याचे भोक्ते होते आणि लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. तत्त्वांच्या बाबतींत त्यांनीं आपल्या वडिलांचीहि विशेष पर्वा केली नाहीं. मग रानडे किंवा लोकहितवादी यांवर ते टीका करतील यांत काय नवल? केवळ प्रतिक्रिया म्हणूनच केलेल्या या टीकेवरून इर्ष्येच्या किंवा आवेशाच्या भरांत ती टीका केलेली असल्यामुळें, त्यावरून त्यांचीं मतें समजणें योग्य होणार नाहीं. लोकहितवादी किंवा रानडे यांनीं स्वत:वर प्रसंग येतांच कसें लाजिरवाणें वर्तन केलें तें पाहून चिपळूणकरांनीं जर त्यांच्यावर टीका केली तर ती त्यांच्या तत्त्वच्युतीवर टीका होती, त्यांच्या तत्त्वज्ञानावर नव्हती. तो व्यक्तिगत केलेला हल्ला होता. त्या हल्ल्याच्या मुळाशीं त्यांच्या तत्त्वांचा उपहास करणें हा विशेष उद्देश नव्हता.

'लोकभ्रम' ह्या आपल्या उत्कृष्ट निबंधांत विधवांच्या दुःस्थितीविषयीं जे कळकळीचे उद्‌गार त्यांनीं काढले आहेत त्यावरून त्यांचीं मतें किती पुरोगामी होतीं याचा प्रत्यय येतो. कधीं कधीं वादविवादाच्या भरांत त्यांनीं पपस्परविरुद्ध मतेंहि प्रकट केलीं आहेत. पण त्यावरून त्यांची भूमिकाच विसंगत होती असें म्हणतां येणार नाहीं.

भाषाशुद्धीपासून तों जातिभेदापर्यंत त्यांनीं प्रकट केलेलीं मतें पुरोगामी होतीं. ते धर्मनिष्ठहि नव्हते किंवा जुन्या जमान्याचा पुनरुद्धार करावा असेंहि त्यांचें मत नव्हतें. यजन, याजन, मंत्रतंत्र इत्यादि विधींचा पुनरुद्धार करावा असेंहि त्यांनीं कोठें प्रतिपादन केलें नाहीं. देशाभिमान ही त्यांची स्थायी प्रवृत्ति होती. हिंदुधर्मविषयींचा त्यांचा अभिमान हिंदु संस्कृतीच्या श्रेष्ठत्वावरच आधारलेला होता. धार्मिक बाबतींत नवीन दृष्टि देण्याचाहि उद्योग त्यांनीं केलेला नाहीं, किंवा त्या वादांतहि ते कधीं पडलेले नाहींत. वेदान्त, दैववाद इत्यादि आचारविचारांचे त्यांनीं कधीं समर्थनहि केलेलें नाहीं. त्यांच्या जीवनांत आणि विचारांत धर्माला मुळींच स्थान नव्हतें असें माडखोलकरांनीं सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. ते वाघिणीचें दूध पिऊनच पुष्ट झालेले होते. गीतामृताचा त्यांनीं एखादाच घोट फारतर घेतला असेल. हिंदु समाजरचनेबद्दल निरनिराळ्या धार्मिक पुढाऱ्यांनीं केलेलें प्रतिपादन त्यांना रुचलें असतें असें वाटत नाहीं. मागासलेल्या जातींवर जातिभेदामुळें जीं दुःखें येत असतील तीं हलकीं करणें किंवा होतील तितकीं नाहींशीं करणें हें आपलें कर्तव्य आहे असें ते म्हणत. शेवटच्या बाजीरावाच्या कारकिर्दीचा जेथें जेथें उल्लेख आलेला आहे, तेथें तेथें त्यांनीं कडक टीकाच केलेली आहे. अठरा पगड जातींस टोपकरानें गुंडाळून सर्वांच्या हातांत सारखीच करवंटी दिली आहे असे उद्‌गार त्यांनीं आपल्या 'देशोन्नति' ह्या निबंधांत काढले आहेत. आपण सर्व केवळ कलहकर्मात प्रवीण आहोंत अशी त्यांनीं टीका केलेली आहे. पाश्चात्यांचे इतिहास वाचून आपण किती गचाळ आहों याची प्रचीति आपण घेतली पाहिजे असें त्यांनीं सदर निबंधांत बजावलें आहे. जातिभेद आजच्या स्वरूपांत हास्यास्पद आहे व जातीय पीळ वेडगळपणाचा आहे, देशबंधुत्वाचेंच नातें खरोखर थोर आहे, म्हणून आपण एकोपा केला पाहिजे अशा प्रकारच्या त्यांच्या प्रतिपादनाला पुरोगामी नाहीं असें कसें म्हणतां येईल? 'आमच्य

देशाची स्थिति' ह्या शेवटच्या निबंधांत हिंदुधर्म सर्व प्रकारच्या सुधारणेस कसा अनुकूल आहे हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. फक्त क्रमाक्रमानें सुधारणा करण्याचा सुधारकांनीं प्रयत्न केला असता तर फार बरें झालें असतें असें त्यांस वाटतें. त्यांच्या पुरोगामित्वावद्दल आणखी एक साक्ष याच निबंधांत मिळते. ते म्हणतात, "धर्म व व्यवहार कोणत्याहि देशांत परस्परविरोधानें कधींहि राहात नाहींत. दोघांचीहि घासाघाशी होण्याची वेळ आली असतां त्या घासाघाशीनेंच दोघांची क्रमाक्रमानें सोय निघते." हा त्यांचा दृष्टिकोण पुरोगामी नाहीं काय? मोगलाईंतील आणि पेशवाईंतील झोटिंग पातशाहीचा त्यांनीं निषेधच केला आहे. "हल्लींच्या राज्यांत आम्हांस जितकें स्वातंत्र्य आहे तितकें यापूर्वी स्वदेशीय राजांच्या उत्कृष्ट कारकिर्दीतहि नव्हतें. आमच्या देशांत जों जों इंग्रजी विद्येचा प्रसार होत जाईल, तों तों सुधारणा, स्वातंत्र्य व सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार. इंग्रजी विद्येच्या वज्रानें आम्ही कोणतीही शाही उलथून पाडूं शकूं" असाच त्यांना आत्मविश्वास वाटतो.

ज्या ज्या वेळीं निव्वळ तात्त्विक विवेचन त्यांनीं केलें आहे त्या त्या वेळीं प्रतिपक्षीयांवर मात करण्याचा मुळींच प्रश्न उपस्थित होत नसल्यामुळें त्यांचे प्रगमनशील विचारच आपल्याला वाचावयास मिळतात. धर्माचा फाजील अभिमान त्यांनीं कधींच धरला नाहीं, आणि नीतीच्या बाबतींतहि त्यांनीं आपला तोल सुटूं दिला नाहीं. चिपळूणकर सदाचरणी असले तरी नीतीचें अवास्तव स्तोम त्यांनीं कधीं माजूं दिलें नाहीं. तमाशाचा फड जमला असतांना मागल्या रांगेंत उभे राहून तो पाहण्यास ते कधीं कचरले नाहींत. फाजील शिष्टपणाहि त्यांनीं कधीं धारण केला नाहीं. भाषेच्या स्वच्छंद प्रवाहाचेंहि त्यांनीं समर्थनच केलेलें आहे. भाषाशुद्धीविषयीं त्यांनीं विशेष कटाक्ष ठेवलेला नाहीं किंवा भाषेला सोंवळें नेसवून देवघरांतहि नेलेलें नाहीं. १८५७ सालच्या बंडांत देशाभिमानाचा मागमूसहि नव्हता, केवळ धर्माभिमान होता असेंच त्यांचें प्रतिपादन आहे. लोकप्रभुत्व आणि स्वातंत्र्य ह्या दोन तत्त्वांवर भर देऊन देशभाषेच्या द्वारें लोकांचें मन क्षुब्ध करून त्यांस सुजाण करणें हा देशस्थिति सुधारण्याचा एकमेव उपाय त्यांनीं सुचविलेला आहे. लोकांच्या सार्वभौम सत्तेचींहि स्वप्नें चिपळूणकरांना त्या काळांत पडलीं ही गोष्टच त्यांच्या थोरवीची साक्ष देण्यास पुरेशी आहे.

आचार्य जावडेकर यांनीं टिळक, चिपळूणकर आणि आगरकर ह्या तिघाहि व्यक्तींचा एकत्र नामनिर्देश करून गौरव केला आहे. पण प्रथितयश साहित्यिक श्री. माडखोलकर यांनीं, चिपळूणकरांचें साम्य टिळकांपेक्षां आगरकरांशींच अधिक होतें असा आपला निर्मल अभिप्राय व्यक्त केला आहे. त्यांच्या मतें " रानडे आणि टिळक हे दोघेहि आधुनिक नव्हते. ते थोर धार्मिक पुरुष होते, आचार्य होते. पण उलट चिपळूणकर आणि आगरकर यांना अध्यात्माचा गंधहि नव्हता. दोघांचेंहि जीवन धर्मनिरपेक्ष होतें. दोघेहि विलक्षण रसिक होते. दोघांचीहि सहृदयता अलौकिक होती व दोघेहि वाङ्मयानंदांत तल्लीन होऊन जात. रानडे आणि टिळक यांचें वाङ्मय अलंकारिक व भावनाप्रधान; दोघेहि राजकारणी आणि मुत्सद्दी; मोठें हित डोळ्यांसमोर ठेवून तत्त्वांनाहि मुरड घालण्याची दोघांची तयारी; पण चिपळूणकर आणि आगरकर हे दोघेहि धोपटमार्गी होतें. दोघेहि स्वतःच्या मतांना चिकटून राहिले व तदनुसार जीवन कंठण्यांत दोघांनींहि आयुष्याचें सार्थक मानलें. दोघांचेंहि वाङ्मय आल्हाददायक आणि उद्बोधक होतें. रानडे आणि टिळक हे द्रष्टे होते. चिपळूणकर आणि आगरकर हे मुख्यतः रसिक, साहित्यिक व सुधारक होते. पतित आणि परतंत्र राष्ट्राच्या पुनरुत्थानाला मात्र ह्या चौघांचेहि प्रयत्न सारख्याच प्रमाणांत उपयोगी पडले ही गोष्ट खरी आहे." साहित्यिक माडखोलकरांच्या या विधानाशीं सर्वच सहमत होतील असें नाहीं. पण ह्या विद्वानांतील मतभेदांत विद्यार्थीवर्गानें विशेष खोल न शिरलेलेंच बरें. आपण कांहीं तरी केलें पाहिजे. ह्या मृतप्राय राष्ट्राला चैतन्य आणलें पाहिजे, एकसारखे प्रयत्न करीत राहिलें पाहिजे म्हणजे केव्हां तरी उजाडेल अशी चौघांचीहि निष्ठा होती.

मालाकार ख्रिस्तद्रोही होते व राज्यकर्ते ख्रिस्ती होते. त्यामुळें मिशनऱ्यांचा दंभस्फोट करतांना साहजिकच सरकार त्यांच्यावर खवळून उठे व सरकारवर प्रतिकूल टीका करतांना त्यांना मिशनऱ्यांच्या हल्ल्याला तोंड द्यावें लागे. विष्णुशास्त्री हे राजद्रोही असल्याचा निर्वाळा मिशनऱ्यांनीं दिला आहे. वरिष्ठ इंग्रजी अधिकाऱ्यांनीं त्यांना पोक्त उपदेश करूनहि विष्णुशास्त्र्यांच्यावर फारसा परिणाम झाला नाहीं. विष्णुशास्त्र्यांच्या या काळांत (१) बडोद्याच्या महाराजांच्या पदच्युतीचा व (२) कोल्हापूरच्या बाळराजाला वेडें ठरविण्याचा असे दोन खळबळजनक प्रसंग घडले होते. सभेनें

दोघांचीहि वाजू प्रतिपादन करण्यांत मोठेंच नैतिक धैर्य दाखविलें होतें. बडोद्याच्या महाराजांवर तर राजद्रोह फैलावण्याचा आरोप होता. फडक्यांच्या बंडामागेंहि पुण्यांतील राजकारणी मंडळी असावीत असा सरकारचा ग्रह झाला होता. त्यामुळें पुण्याच्या ब्राह्मण वर्गाविषयीं सरकारच्या मनांत कायमची आढी बसली होती, व त्याचे परिणाम निबंधमालेलाहि भोगावे लागले होते. या अनर्थामुळें इंग्रजी राज्य हें दैवी वरदान आहे या समजुतीचा भ्रामकपणा लोकांच्या नजरेस आला. राणीच्या दरबारासंबधीं विष्णुशास्त्र्यांनीं सडेतोड विवेचन केलें आहे. इकडे लोक भुकेनें मरत असतां शेंकडों रुपयांची दारू उडवून इंग्रजांनीं आपण सार्वभौम असल्याचाच डंका पिटला. त्यामुळें इंग्रज रियासतीची जी तारीफ करतात ती स्थिति आतां गेली. विष्णुशास्त्र्यांच्या त्या अवघड काळांत असलें सडेतोड विवेचन करणारास केवढें नीतिधैर्य असावें लागलें असेल याची कल्पना ज्यांना येईल त्यांना शास्त्रीबुवांच्या या असामान्य नीतिधैर्याची तारीफ करण्यांत धन्यता वाटेल. युरोपांत जी मोठी विचारक्रांति झाली त्यामुळें सुधारकांतहि स्वाभिमान दृग्गोचर होऊं लागल्याचा तो काळ होता. त्या काळीं घडलेल्या सर्व प्रक्षोभक घटनांचा परिणाम चिपळूणकरांच्या प्रभावी मनावर होऊन त्यामुळेंच 'आमच्या देशाच्या स्थिती'वर येऊन निबंधमाला धडकली. निबंधमालेच्या शेवटच्या निबंधांतून त्यांच्या स्वाभिमानाची ज्योत प्रदीप्त झालेली दिसते. इंग्रज इतिहासकारांनीं ज्या विपरीत कल्पना प्रसृत केल्या होत्या त्या दुष्ट मतांचें निराकरण करण्याच्या हेतूनेंच त्यांनीं आपली लेखणी पाजळली. इंग्रज इतिहासकारांच्या भारताकडे पाहण्याच्या दृष्टिकोणाचा दंभस्फोट त्यांनीं केलेला आहे. मेजर जेकब यांनीं 'एलिफास्' हें टोपणनांव घेऊन देशी वृत्तपत्रांवर व कारस्थानी ब्राह्मणांवर जी आग पाखडली होती त्याचा खरपूस समाचार त्यांनीं आपल्या तिसाव्या निबंधांत घेतलेला होता. 'एलिफास्' याचा उद्देश या ब्राह्मणांची चळवळ दडपून टाकण्याचा होता. कारण बडोद्याच्या महाराजांना पदच्युत केल्याबद्दल सरकारचा निषेधहि करण्यास त्यांनीं मागें पुढें पाहिलें नव्हतें. त्यामुळें जेकब साहेबाला राग येऊन त्यानें सर्वच पुणें शहरावर आग पाखडली. अशा रीतीनें 'बाँम्बे गॅझेट' मधून निबंधमालेवर नुसती आग पाखडूनच ते थांबले नाहींत, तर या तिसाव्या अंकाचें इंग्रजी भाषांतरहि करून त्यांनीं सरकारकडे पाठविलें. त्यामुळें सर्व

नोकरशाही हदरून गेली. त्यानंतर कोणीहि ब्राह्मण कांहीं कामासाठीं सरकारकडे गेल्यास निबंधमाला चालविणाऱ्या ह्या ब्राह्मणाचा उद्धार होऊन ब्राह्मणांना विद्या दिली असतांहि त्यांनीं कसा कृतघ्नपणा केलेला आहे याची साक्ष पटविली जाई ! कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं मालेंतील आक्षेपार्ह मजकूर जाणूनबुजूनच सरकारच्या नजरेस आणून दिला नाहीं. पण त्यामुळें जरी त्यांच्या प्रतिष्ठेस धक्का लागला नाहीं तरी पण पूर्वीसारखा सरकारदरबारीं त्यांना मान मात्र मिळेनासा झाला. दुसऱ्या चिरंजिवांना चिठ्ठी देऊन कृष्णशास्त्र्यांनीं डायरेक्टरसाहेबांकडे पाठविलें असतां डायरेक्टरसाहेबानें वडयाचें तेल वांग्यावर असा प्रकार केला. पुढें अनेकांनीं विष्णुशास्त्र्यांची बाजू घेऊन मालाकारांवरील व एकंदर ब्राह्मणवर्गावरील आरोपांचें खंडन केलें. तेव्हां डायरेक्टरसाहेबांनीं विष्णुशास्त्र्यांची बदली करून ह्या सर्व रागाचें सौम्य शिक्षेंत रूपांतर केलें.

याचा परिणाम विष्णुशास्त्र्यांच्या मनावर सरकारी नोकरीबद्दल तिटकारा येण्यांतच झाला, व तें बंधन शक्य तितक्या लवकर तोडून टाकण्याचा त्यांनीं निश्चय केला. सरकारनें निबंधमालेची कांहीं काळ जी गय केली ती कृष्णशास्त्र्यांवरील लोभामुळेंच होय. विष्णुशास्त्र्यांनीं विचारस्वातंत्र्यासाठींच निबंधमाला काढलेली असल्यामुळें तिला सरकारचा आश्रय मिळावा असें चुकूनहि मनांत आणलें नाहीं. आपल्या वडिलांच्या मनाला अधिक ताप होऊं नये म्हणूनच विष्णुशास्त्र्यांनीं आपली लेखणी त्या वर्षीं सोज्वळ विषयांस वाहिली. तरीहि त्यांच्या मनांत चाललेल्या खळबळीचें प्रतिबिंब या निबंधांत पाहावयास मिळतेंच. १८७८ मध्यें ज्या वेळीं सरकारनें 'प्रेस ॲक्ट' जारी केला त्या वेळीं असाच सोज्वळ विषय घेऊन त्यांनीं आपली निबंधमाला चालूं ठेवली. आपल्या एका पत्रांत त्यांनीं असा कबुलीजबाब दिला आहे कीं, ह्या दुष्ट कायद्यामुळें फार दिवस घोळत असलेल्या विषयावर त्यांना पाणी सोडावें लागलें. विष्णुशास्त्र्यांना हें कळून चुकलें होतें कीं, लोकोपयोगार्थ ज्यास ग्रंथरचना करणें असेल व पोकळ वाग्डंबर न माजवितां हातून जर कांहीं कृति करावयाची असेल तर त्यास मुख्य गोष्ट स्वतंत्रता ही पाहिजे. आपले विचार निर्धास्तपणें प्रकट करण्यास व हवें तें काम करण्यासहि स्वातंत्र्याचाच उपयोग होतो. इंग्रजी अमदानींत स्वातंत्र्याची जरुरी फारच असल्याचें त्यांनीं आपलें मत प्रकट केलें आहे. पुढें त्यांनीं काव्येतिहाससंग्रह चालू केला

त्यावर आपलें नांवहि घातलें नाहीं. कारण मालेवर सरकारी अधिकाऱ्यांचा रोष होऊन त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागले होते. अशा रीतीनें अनेक उद्योग हातीं घेतल्यामुळें ते निर्वाहाच्या बाबतींत निश्चित झाले. जर कृष्ण-शास्त्री हयात असते तर त्यांनीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला असता कीं नाहीं याची शंका वाटते. थोरल्या शास्त्रीबुवांच्या सांगण्यावरूनच विष्णु-शास्त्र्यांनीं सरकारी नोकरी धरली, व तिला ते चिकटून राहिले ते वडिलांचा रोष होईल म्हणूनच. पण १८७८ मध्यें थोरल्या शास्त्रीबुवांचें देहावसान झाल्यामुळें चिपळूणकरांनीं स्वतंत्र शाळा काढली. ती निर्वाहाचें साधन म्हणून नव्हे. निःसत्त्व शिक्षणपद्धतीचा धिक्कार करण्यासाठीं व स्वत्वाचा जिव्हाळा ओतून शिक्षणाला नवीन वळण लावावें या उद्देशानें त्यांनीं 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. ज्ञानप्रसाराच्या कार्यांत निःस्वार्थ जीवन कंठण्याचा या ध्येयवादी तरुणांनीं निर्धार केला होता. शिक्षण स्वस्त आणि सुलभ करण्याचा आपला उद्देश असल्याची घोषणा चिपळूणकरांनीं केली होती. सरकारी हायस्कूलचा निरोप घेऊन शास्त्रीबुवांच्या हायस्कुलांत नांव दाखल करण्या-साठीं विद्यार्थ्यांनीं चार चार महिने आधीं नांवें काढलेलीं होतीं ही गोष्ट शास्त्रीबुवांच्या विषयीं जनमनांत केवढा प्रेमादर होता याची साक्ष पटण्यास पुरेशी आहे. सरकारी हायस्कुलांतील मुलांची संख्या कमी होऊन विद्यार्थ्यांचा ओघ न्यू इंग्लिश स्कूलकडे वळला. सरकारी अधिकारी व मिशनरी गृहस्थांनीं मुक्तकंठानें या शाळेची प्रशंसा केली व स्वार्थत्यागाचें उदाहरण दाखवून दिल्याबद्दल त्यांचा गौरव केला. ज्या डायरेक्टर चॅटफील्ड साहेबानें निबंध-मालेवरून विष्णुशास्त्र्यांचा एवढा राग केला होता त्यांनींच शास्त्रीबुवांच्या या कर्तबगारीचें कौतुकहि करण्यास कमी केलें नाहीं. आगरकर आणि नाम-जोशी यांच्या सहकार्यानेंच त्यांनीं 'केसरी' आणि 'मराठा' ही पत्रें चालूं केलीं. या पत्रांचें ध्येय 'देशस्थिति, देशभाषेंतील ग्रंथ व विलायतेंतील राजकारण' यांची चर्चा करण्याचें होतें. पण वर्तमानपत्रांच्या निरुंद रकान्यां-तून त्यांची प्रतिभा प्रस्फुरित झाली नाहीं. नोकरी सोडल्यानंतर शेवटल्या दोन वर्षांत त्यांच्या मागचे व्याप आणि संताप बेसुमार वाढत गेले, व जणू कांहीं निबंधमालेबरोबरच त्यांनींहि आपलें अवतारकार्य संपविलें.

चिपळूणकरांची योग्यता

कविवर्य मोरोपंत यांनीं म्हटल्याप्रमाणें विष्णुशास्त्री चिपळूणकरांची योग्यता त्यांच्याइतक्याच थोर विभूतींनीं सांगणें इष्ट आहे. परंतु त्यांच्या खऱ्या मोठेपणाची कल्पना मोठ्या पुरुषांनीं आगाऊच वर्णन करून ठेवलेली असल्यामुळें आपलें काम सोपें झालें आहे. विष्णुशास्त्र्यांचे सहकारी कै. आगरकर यांनीं चिपळूणकरांच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या केसरींतील लेखांत त्यांच्या मोठेपणाची भरीव कल्पना दिली आहे. दुर्दैवानें त्यांना आयुष्य फार कमी लाभलें, नाहींतर ... पण तो विचारच प्रस्तुत कर्तव्य नाहीं. कालमाहात्म्या पुढें हात जोडून पुढें जाणें एवढेंच आपलें काम आहे.

विष्णुशास्त्र्यांचें थोर व्यक्तिमत्त्व

विष्णुशास्त्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास त्यांच्याहून कांकणभर सरस आणि बृहस्पतितुल्य विद्वत्ता अंगीं असलेल्या कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या सान्निध्यांत झाला. कृष्णशास्त्री चिपळूणकर जसे रंगेल होते त्याप्रमाणेंच विष्णुशास्त्री रसिक होते. पण कृष्णशास्त्र्यांचें नीतिविषयक वर्तन थोडेसें समाजबाह्य झालें तसा प्रकार विष्णुशास्त्र्यांच्या बाबतींत झाला नाहीं. आणि म्हणूनच विष्णुशास्त्र्यांच्या विषयीं महाराष्ट्राच्या मनांत आदरभाव वसत आलेला आहे. किंबहुना भारतीय संस्कृतीचें एक वैशिष्ट्य म्हणून असें सांगतां येईल कीं, चारित्र्यहीन विद्वानांची तळी तिनें कधींच उचलून धरलेली नाहीं. लो. टिळक काय, आगरकर काय, किंवा विष्णुशास्त्री चिपळूणकर काय, त्यांच्या समकालीन पुढाऱ्यांपेक्षां ते चारित्र्यानें थोर असल्यामुळें जनतेच्या मनांत त्यांच्याविषयीं प्रेमादर उत्पन्न झाला. विष्णुशास्त्री एका दृष्टीनें अधिक नशिववान होते. कारण, कृष्णशास्त्र्यांच्या सान्निध्यांत त्यांची सरस्वती प्रफुल्लित झाली., कृष्णशास्त्री हे वरिष्ठ सरकारी अधिकारी असल्यामुळें पुष्कळशीं ग्रंथालयें त्यांच्यासाठीं नेहमीं खुलीं असत, आणि विष्णुशास्त्र्यांना वाचनाचा नाद लागल्यामुळें त्या ग्रंथालयांचा त्यांनीं भरपूर उपयोग करून घेतला. दक्षिणा प्राइझ कमिटी आणि नेटिव्ह प्रेस रिपोर्टर म्हणूनहि कृष्णशास्त्र्यांच्याकडे पुस्तकें येत त्यांचा विष्णुशास्त्री फडशा पाडीत.

एका थोर इंग्लिश साहित्यिकानें शैलीविषयीं लिहितांना असें सांगितलें आहे कीं, शैली नुसत्या अनुकरणानें साध्य होणार नाहीं. ज्यांचें व्यक्तिमत्त्व थोर आणि प्रभावी असेल त्यांचीच शैली परिणामकारक असते. नुसत्या वाचनानें किंवा नुसत्या अनुकरणानें विशिष्ट शैलीचा उगम होणार नाहीं. त्यासाठीं अंगीं थोर कर्तृत्व असावें लागतें. मनुष्य जितका कार्यांमध्यें अधिकाधिक मग्न झालेला असेल तितकी तितकी त्याची शैली प्रभावी आणि परिणामकारक होईल. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या छोट्याशा आयुष्यांत ज्या संस्था उभारल्या त्यांत त्यांच्या कर्तृत्वशक्तीला भरपूर वाव मिळाला. छापखाना, वर्तमानपत्रें, किताबखाना, मासिकें, पुस्तकें, चित्रशाळा, न्यू इंग्लिश स्कूल इत्यादि संस्थांच्या वाढत्या व्यापांत विष्णुशास्त्र्यांचें कर्तृत्व दृग्गोचर होऊं लागलें, व अनेक व्यक्तींशीं त्यांचा परिचय झाल्यामुळें त्यांच्या लेखनकर्तृत्वाला वाव मिळाला. त्यांतूनच त्यांच्या प्रभावी शैलीचा उगम झालेला आहे. विष्णुशास्त्री नुसते विद्वान् नव्हते. त्यांच्या मनांत एकसारख्या योजना चालूं असत. सभोंवतीं संस्थांचा आणि व्यक्तींचा व्याप होता. त्यांतूनच त्यांनीं आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेतला. संस्था उभारल्या कीं अनेक व्यक्तींशीं माणसाचे संबध येतात. त्यांत सर्व प्रकारच्या आणि सर्व वर्णनाच्या लहानथोर व्यक्ति असतात. त्यांतून बऱ्यावाइटाची परीक्षा माणसास करावी लागते. निरनिराळे अनुभव जमेस धरावे लागतात व त्यांतूनच व्यावहारिक शहाणपण किंवा रेखीव व्यक्तिमत्त्व निर्माण होत असतें. शास्त्रीबुवांनीं आपल्याभोंवतीं जमा झालेल्या व्यक्तींची नीट पारख केलेली होती. कारण त्या त्या संस्था अद्यापिहि कार्यक्षम आहेत व त्यांचा व्याप वाढलेला आहे.

विष्णुशास्त्र्यांच्या वेळीं काळ मोठा उमेदीचा आणि नाउमेदीचाहि होता. उमेदीचा म्हणण्याचा आशय असा कीं, शिक्षण झाल्याबरोबर तावडतोव सरकारी नोकरी मिळत असे व संसाराला ताबडतोव स्थिरता येत असे. नाउमेदीचा म्हणण्याचें कारण असें कीं, ज्याला म्हणून विचारशक्ति दिलेली आहे त्याला होतें कसें आणि झालें कसें ह्या मंत्राचा जप करण्याचें नशिबीं येई. आपल्या भूतकालीन वैभवाची साक्ष डोळ्यांसमोर उभी असतां व देशाच्या अवनत स्थितीची तसवीर डोळ्यांसमोर उभी असतां हृदयाला पीळ पडणार नाहीं असा मनुष्यच सांपडणार नाहीं. विष्णुशास्त्र्याचें मन

संस्कारक्षम होतें. देशावर आलेल्या अवकळेचा विचार त्यांच्या मनांतून एक क्षणभरहि गेला नाहीं. समाजाचे जुने पुढारी सरकारनें पेन्शनें देऊन स्वस्थ बसविले होते. नवीन पुढारी इंग्रजी राज्यानें व त्यांतील सुधारणांनीं दिपून गेले होते. सर्व देशभर एकमुखी सत्ता पहिल्यानेंच निर्माण झाली होती. देशाला शांतता मिळाली होती. प्रत्यक्ष विष्णुशास्त्र्यांनींच एके ठिकाणीं म्हटलें होतें कीं, इंग्रजांचा अंमल पूर्वीच्या काळाहून कितीतरी पटीनें चांगला होता. कारण, इंग्रजांच्या राज्यांत पूर्वी कधींहि नव्हतें इतकें विचारस्वातंत्र्य होतें. त्यांची न्यायदानाची पद्धत, धर्मांत ढवळाढवळ न करण्याचें त्यांचें धोरण, व वर्तमानपत्रांतून आणि मासिकांतून आपलीं मतें स्पष्टपणें मांडण्यास त्यांनीं दिलेली मुभा या अभूतपूर्व गोष्टी होत्या, व त्यांनींच शास्त्रीबुवांना इंग्रजी राज्याबद्दल हा अभिप्राय व्यक्त करण्यास भाग पाडलें होतें.

पण इंग्रजी विद्येचें ग्रहण केलेले नवीन विद्वान् ज्या वेळीं खाविंदचरणीं मिलिंदायमान झालेले त्यांनीं पाहिले व स्वतःच्या स्वार्थापलीकडे त्यांना कांहीं दिसत नाहीं असें जेव्हां त्यांच्या लक्षांत आलें, तेव्हां त्यांना आपली लेखणी पाजळावी लागली. ह्या सर्व मनःक्षोभाला भर म्हणूनच कीं काय मिशनऱ्यांची बाटवेगिरी सुरू झाली होती, त्यांनीं हिंदुधर्मावर आक्षेप घेण्यास सुरवात केली. हिंदुधर्माचें शवविच्छेदन करून त्यांतील दोष दाखविण्यास व इंग्रजी राजनीतीचा महिमा गाऊन दाखविण्यासहि त्यांनीं सुरवात केली. महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासारख्या स्वकीयांनीं हिंदुधर्मावर व भटशाहीवर वाटेल तसे कोरडे ओढण्यास सुरवात केली. दयानंद सरस्वतीचेंहि स्तोम त्या वेळीं फार माजविण्यांत आलें होतें. प्रार्थनासमाज, ब्राह्मोसमाज इ. समाजांची स्थापना होत होती, व दर रविवारीं देवाला आळविण्याचें कामहि चालूं होतें. १८५७ सालच्या बंडाच्या वार्ता एकसारख्या कर्णोपकर्णीं ऐकूं येत होत्या. बंड प्रत्यक्ष पाहिलेले लोक बंडाचीं वर्णनें रास्त किंवा अतिशयोक्त करीत होते. विश्वविद्यालय स्थापन होऊन नवीन नवीन पदवीधर बाहेर पडत होते. अशा ह्या धामधुमीच्या काळांत विष्णुशास्त्र्यांच्या मनाची केवढी धांदल होत असेल ह्याची कल्पनाच करवत नाहीं. अखंड वाचन, आल्यागेल्याबरोबर विश्रब्ध वार्तालाप, यांतून उरलेला वेळ विष्णुशास्त्र्यांनीं चिंतनांत आणि मननांत घालविला, व त्याचेंच फळ म्हणून त्यांचें लेखन अव्याहत चालूं राहिलें. त्यांचे शिष्य हरि नारायण आपटे यांना वाचनापायीं

जशी परीक्षेंत हार खावी लागली, तसाच थोडासा चटका हरि नारायण आपटयांच्या ह्या गुरुजींनाहि बसला. पण परीक्षेस बसणाऱ्यासच आपली परीक्षेच्या दृष्टीनें कितपत तयारी झाली आहे हें कळत असल्यामुळें अपयशानें नाउमेद होण्याचें त्याला कांहींच कारण नसतें. विष्णुशास्त्र्यांना तर अवांतर वाचनाच्या पायीं परीक्षेसाठीं नेमलेल्या पुस्तकांचें जुजवी वाचन करण्यासहि फुरसत मिळत नसे. पण शेवटीं एकदां ते बी. ए. परीक्षेंत उत्तीर्ण झाले.

केवळ वयाच्या पंधराव्या वर्षीं लेखनास सुरवात करून कृष्णशास्त्र्यांसारख्या विद्वानाकडून शाबासकी मिळविण्याचें सद्भाग्य विष्णुशास्त्र्यांना लाभलें होतें. इतक्या लहानपणीं एवढी कीर्ति मिळविणारा मराठी वाङ्मयांत तरी दुसरा कोणी आढळणार नाहीं. थोरल्या शास्त्रीबुवांपेक्षां धाकट्या शास्त्रीबुवांचे विचार अधिक प्रौढ आणि पुरोगामी असल्यामुळें वडिलांपेक्षांहि विष्णुशास्त्र्यांचें लेखन अधिक ठाकठिकीचें होत होतें. विष्णुशास्त्र्यांच्या ठिकाणीं जी लढाऊ वृत्ति होती, तिचा आविष्कारहि त्यांच्या लेखनांत झालेला दिसतो, आणि म्हणूनच दुर्मतध्वंसनार्थ कंबर बांधून त्यांनीं लेखणीची तलवार उपसली.

एखादा कुशल डॉक्टर म्हटला म्हणजे रोगाचें निदान त्याला बरोबर झालेलें असतें असें आपण समजतों आणि एकदां रोगाचें निदान बरोबर झाल्यावर औषधयोजना करणें ही फारशी महत्त्वाची बाब वाटत नाहीं, त्याप्रमाणें त्या वेळीं सभोंवतालच्या परिस्थितीचें योग्य निदान करून व अखंड सेवाव्रताचा आणि त्यागाचा कित्ता घालून विष्णुशास्त्र्यांनीं आपले विचार प्रथम शालापत्रक आणि नंतर निबंधमाला यांत स्पष्ट करून दाखविले आहेत. मोठ्या पुरुषांचा मोठेपणा हा त्यांनीं केलेल्या विविध कार्यावरच अवलंबून असतो. विष्णुशास्त्र्यांनीं निरनिराळ्या संस्था काढून आपल्या कर्तृत्वशक्तीस वाव करून घेतला, आणि म्हणूनच त्यांच्या मोठेपणाची साक्ष आपणांस पटलेली आहे. त्यांचें समाजाचें अवलोकनहि मार्मिक होतें. एक देश किंवा एक राष्ट्र ही कल्पनाहि आपल्या देशांत अद्याप रुजलेली नाहीं, यासाठीं देशबंधुत्वाच्या थोर नात्यांत अठरापगड जातींनीं आपलें नातें विरून टाकलें पाहिजे व एकराष्ट्रीयत्वाचा अभिमान बाळगला पाहिजे असा उपदेश त्यांनीं केला. आपला देश विस्तीर्ण असल्यामुळें व देशास शांततेचा काळ न लाभल्यामुळें आपल्या देशाची प्रगति होऊं शकली नाहीं. अद्यापहि आपल्या

लोकांस जर आपल्या अवनत स्थितीची जाणीव झाली नाहीं तर देशाचें डोकें वर निघणार नाहीं. म्हणून इंग्रज सरकारबद्दल व त्यांच्या राज्यपद्धती-बद्दल अधिक माहिती मिळवून आपल्या देशाची उन्नति करतां येईल असें अचूक प्रतिपादन त्यांनीं केलें. अद्यापहि आमचा अभिमानाचा विषय म्हटला म्हणजे धर्म होय; १८५७ सालचें बंड म्हणजे धर्माविरूनच झालेली चळवळ होय. ही शोचनीय स्थिति आपण दूर केली पाहिजे असा त्यांच्या प्रतिपादनाचा रोख आहे. यावरून विष्णुशास्त्री बुरसटलेल्या मतांचे होते; त्यांना पोकळ धर्माभिमानाची आवड होती, इ. टीका त्यांच्या विरुद्ध करणारे लोक कोणत्या दृष्टिकोणांतून त्यांचेकडे बघत होते हें लक्षांत येईल.

आणखी एक आक्षेप अलीकडील विद्वान् तरुण मंडळी विष्णुशास्त्र्यांच्या विरुद्ध घेतांना आढळतात. विष्णुशास्त्र्यांनीं जर कोणती गोष्ट सर्वप्रथम केली असेल तर ती म्हणजे त्यांनीं राष्ट्राभिमानाची ज्योत प्रज्वलित केली ही होय. पण हा त्यांचा राष्ट्राभिमान पोकळ होता; त्यांची राष्ट्रीय दृष्टि संकुचित स्वरूपाची होती; त्यांना आंतरराष्ट्रीय दृष्टि नव्हती; ते द्रष्टे नव्हते इ. आक्षेप त्यांचेविरुद्ध घेण्यांत येतात. पण या आक्षेपांत तथ्य नाहीं. नुसता राष्ट्रवाद समाजाला पचत नव्हता. कारखाने निघून भांडवलशाहीचा व्याप वाढलेला नव्हता. परकीय सत्ता देशावर राज्य करीत होती; स्वातंत्र्यनाशामुळें होणारी सर्वस्व हानि लोकांना उमगण्याइतकीहि त्यांची पात्रता नव्हती. अशा वेळीं आजच्या साम्यवादाच्या कसोटीवर राष्ट्रवाद घासून घेण्याची कल्पना हास्यास्पद वाटते. विष्णुशास्त्र्यांनीं काय केलें यावरून त्यांची योग्यता ठरविण्याचे ऐवजीं त्यांनीं काय केलें नाहीं यावरून त्याना दूषणें देत बसणें योग्य होणार नाहीं. त्यांना लोकशाही पद्धतीची जबाबदार राज्यपद्धति हवी होती. साम्राज्यान्तर्गत स्वराज्यावर ते आपली स्वातंत्र्याची तहान भागविण्यास तयार नव्हते ही गोष्टहि या लोकांनीं विचारांत घेतलेली नाहीं. ज्या वेळीं इंग्रजांचें राज्य म्हणजे ईश्वरी वरदान आहे असें मानण्यांत लोक धन्यता पावत त्या वेळीं व ज्या वेळीं इंग्रजांना येथून जा म्हणणें म्हणजे श्री. रानड्यांसारख्या पुढाऱ्यांना फाजीलपणा वाटत असे त्या वेळीं साम्यवाद प्रतिपादन करणें अशक्य होतें. विष्णुबुवा ह्यचारी यांनीं आपल्या 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध' या लेखांत जें प्रतिपादन केलें आहे, त्यावरून साम्यवादावर आधारलेली लोकशाही त्यांना

अभिप्रेत असावी असा आपला ग्रह होतो. पण विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचें मुख्य कार्य धार्मिक स्वरूपाचें होतें. मिशनऱ्यांचा हिंदुधर्मावरील हल्ला त्यांना परतवून लावावयाचा होता. राजकारण त्यांना विशेष अभिप्रेत नव्हतें किंवा राजकारणाकडे लक्ष देण्यास त्यांना फुरसद नव्हती. त्यामुळें त्यांनीं आपल्या साम्यवादी कल्पनांचा विस्तार त्यानंतर केला नाहीं. म्हणून विष्णुशास्त्री यांनीं संकुचित राष्ट्रवाद निर्माण केला या विधानांना कांहीं अर्थच राहात नाहीं. राजकीय विकासाची क्रमाक्रमानेंच वाढ होत असते ही गोष्ट ऐतिहासिक विकासवादाच्या अभ्यासू मंडळींना सांगण्याची आवश्यकता नाहीं. शास्त्रीबुवांनीं आपली दृष्टि गतेतिहासावर खिळवून ठेवली, गत-वैभवावर त्यांनीं फाजील भर दिला, यामुळें त्यांना सुखस्वप्नांत दंग होण्याची संवय लागली इ. आक्षेप किती फोल आहेत हें शास्त्रीबुवांच्या वाङमयाचा वरवर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसहि समजून येईल. गतेतिहासांतील चुकांची त्यांनीं कोठेंहि तरफदारी केली नाहीं किंवा रावबाजीच्या स्तुतिपर पोवाडेहि गाइलेले नाहींत. इतिहास हा त्यांचा आवडता विषय होता व इतिहासाच्या वाचनानेंच आजच्या परिस्थितीचें वैपम्य आमच्या देशबंधूंच्या लक्षांत येईल म्हणूनच त्यांनीं इतिहासावर भर दिला. अर्थात् या आधुनिक विद्वानांनीं त्यांच्या वाङमयीन गुणांचें सुयोग्य रसग्रहण केलेलें आहे. त्यांनीं लोकजागृतीचें कार्यहि मोठ्या धडाडीनें केलें असेंहि त्यांनीं मान्य केलें आहे. परंतु ते स्वप्नरंजनांत रंगून जात असा आक्षेप घेतांना त्यांच्या वाङमयीन गुणांकडे ते कसें दुर्लक्ष करूं शकतात याचेंच आश्चर्य वाटतें. स्वप्नरंजनांत दंग होणें ही वाङमयीन सेवकाची नित्याचीच संवय असते. किंबहुना ज्या वेळीं इच्छित वस्तु दुष्प्राप्य आहेत असें दिसतें त्या वेळींच मनुष्य स्वप्नरंजनांत दंग होऊन जातो असें मानस-शास्त्रीय विवेचन आहे. अशा रीतीनें या आक्षेपांतहि विशेष राम आहे असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. खऱ्या अर्थानें त्यांनीं राष्ट्रवाद प्रतिपादन केला व दलितोद्धार झाला पाहिजे, विधवांची अनुकंपनीय स्थिति बदलली पाहिजे इ. प्रतिपादन जागोजागीं केलें आहे. नाहीं म्हणावयास या विषया-वर स्वतंत्र निबंधरचना केली नाहीं असें फार तर म्हणतां येईल. पण ॲडिसनप्रमाणें आपली लेखणी सौम्य करा असें जेव्हां त्यांना सांगण्यांत आलें त्या वेळीं ॲडिसनप्रमाणें फुसक्या विषयावर लिहिण्यास आपणांस

सवड नाहीं असें समर्पक उत्तर त्यांनीं दिलें. यावरून राष्ट्रोद्धाराच्या मानानें दलितोद्धार, विधवा पुनर्विवाह, इ. विषय तादृश योग्यतेचे नव्हते. राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा प्रश्न मूलगामी होता. त्यांतून राष्ट्रसेवेचें अंग म्हणून मराठी भाषेचा पुरस्कार त्यांना करावयाचा होता; हें काम मौलिक नव्हतें असें म्हणतां येणार नाहीं. समाजक्रांतीच्या गोष्टी अजूनहि जेथें शक्य कोटींत उतरलेल्या नाहींत तेथें त्या परतंत्र काळांत या गोष्टींचें प्रतिपादन न करणें हा मोठा दोष आहे असें म्हणतां येणार नाहीं.

शास्त्रीबुवांचें कार्य सरंजामी आणि सुशिक्षित वर्गापुरतेंच मर्यादित होतें असाहि त्यांचेवर एक आरोप केला जातो. पण त्यांनीं सरंजामशाहीचा पुरस्कार कोठें केला आहे याचीं प्रमाणें मात्र दिलेलीं नाहींत. किंबहुना तशीं प्रमाणें नसल्यामुळेंच त्यांच्या विरुद्ध घेतलेल्या या आक्षेपांत स्वारस्य उरत नाहीं. ब्राह्मणांचा त्यांनीं फाजील अभिमान बाळगला असें म्हणण्याचें धाडस आज तरी कोणी करील असें वाटत नाहीं. रावबहादुरें व रेव्हरंडें यांना सिंहगर्जनेनें भेदरून टाकणारे विष्णुशास्त्री ब्राह्मण्याचा अभिमान बाळगीत असतील असें प्रतिपादन करण्याचें धैर्य आम्हांस नाहीं. 'देशोन्नति' वरील निबंधांतून त्यांनीं उडविलेली ब्राह्मणांची टर पाहिली असतां ब्राह्मण्याचा अभिमान त्यांना होता असें म्हणतां येणार नाहीं.

"पारतंत्र्याला ज्ञान आणि दारिद्र्याला उद्योग हीं दोनच वस्ताद औषधें आहेत" असें ते म्हणत असल्याचा उल्लेख आगरकरांनीं त्यांज-विषयींच्या मृत्युलेखांत केला आहे. आगरकर त्यांत लिहितात, "परकीय लोक राज्य करीत असल्यामुळें आमचे लोक सत्त्वहीन होत जाऊन आप्पल-पोटे, भेकड, हांजीहांजीखोर, मठ्ठ, निर्लज्ज, अभिमानशून्य, असे झालेले पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड उडे." शास्त्रीबुवा रानडे किंवा लोक-हितवादीप्रमाणें बोलके सुधारक किंवा आरामखुर्चीवरील देशभक्त नव्हते. असे कडक लेख तुम्ही कसे लिहितां असें शास्त्रीबुवांना कोणीं विचारलें तेव्हां ते म्हणाले, "अगोदर एक पाय तुरुंगांत ठेवून मग आम्हीं देशोन्नती-साठीं आपली लेखणी हातीं घेतली." एखादे वेळीं त्यांचा कल्पनाविहंग पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे.

वृद्ध पिढीचा रोष होईल म्हणून आपलीं खरीं मतें पुढें करण्यास त्यांनीं

कमी केलें नाहीं. पारतंत्र्यनाशासाठीं जालीम ठरणारा कोणताहि उपाय अवलंबिण्यास ते मागेंपुढें पाहणारे नव्हते. हिंदुस्थानच्या व्यापारासंबंधीं शास्त्रीबुवांनीं असे उद्‌गार काढले आहेत कीं, येथें व्यापारवृद्धि झाल्याशिवाय आमच्या देशाचें डोकें वर निघणार नाहीं. शास्त्रीबुवांनीं जे धंदे सुरू केले त्यांतहि त्यांचा उद्देश द्रव्यार्जनाचा नव्हता तर 'लोकांस काम मिळावें व त्यांस भाकरीची वाण पडूं नये' हा होता. ह्या उदात्त हेतूनें प्रेरित होऊनच त्यांनीं हे उद्योग आरंभिले. त्यांचें म्हणणें असें कीं, बुद्धिमान् आणि चतुर लोकांनीं मोठमोठे धंदे अंगावर चालू करावेत आणि मग ते साधारण लोकांच्या हातीं देऊन आपण त्यांपासून अलग व्हावें. यांतही त्यांची देशहितैक दृष्टि दिसून येते. शास्त्रीबुवांच्या निबंधमालेनें त्रिविध सेवा केली आहे. निबंधांना ठाकठीक स्वरूप देण्यांत शास्त्रीबुवांनींच प्रथम यश मिळविलें. त्यापूर्वी कोणी निबंध लिहिले नाहींत असें नाहीं. पण शास्त्रीबुवांच्या निबंधांचा भारदस्तपणा व डौल त्या निबंधांना नव्हता. निव्वळ निबंधांना वाहिलेलें मासिक काढून तें सतत सात वर्षें चालविणें ही गोष्ट असामान्यच म्हणावी लागेल. शास्त्रीबुवांनीं चरित्रलेखनाचाहि पाया घातला. त्यांनीं लिहिलेलें जॉन्सन्‌चें चरित्र सुव्यवस्थित असें पहिलेंच चरित्र आहे असें वाङ्मयाच्या सर्व इतिहासकारांनीं आपलें मत दिलें आहे. त्याचप्रमाणें टीकाशास्त्राचाहि उगम शास्त्रीबुवांच्या लेखणींतूनच झालेला आहे असा सर्व विद्वानांचा एकमुखी अभिप्राय आहे. संस्कृत वाङ्मयांत टीकाशास्त्र परिणत अवस्थेला जाऊं नये याची त्यांना मोठी खंत वाटत असे, व म्हणूनच इंग्रजी टीकाशास्त्राची मदत घेऊन त्यांनीं आपलें नवीनच टीकाशास्त्र मराठींत प्रथमच आणलें. टीका कशी असावी याची स्वतंत्र निबंधरूपानें चर्चा करून त्यांनींच या शास्त्रास जन्म दिला. त्यांच्या टीकांत जरी अतिशयोक्तीचीं विधानें होतीं तरी तशी टीका त्यांना नाइलाजानें करावी लागली होती. वाङ्मयवृद्धि होण्यास टीकाशास्त्राचा आसूड कडाडलाच पाहिजे असें त्यांचें मत होतें. ह्या बाबतींत युद्धाचा दाखला देऊन शास्त्रीबुवांनीं आपल्या कडक टीकेचें समर्थन केलें आहे. युद्धांत दंड ठोकून समोरासमोर उभे राहिल्यानंतर प्रतिपक्षीयांना जसें आपण 'तुम्ही फार जोरदार हल्ला करतां' असें म्हणूं शकत नाहीं, त्याप्रमाणें ज्यांच्यावर टीका केलेली असेल त्यांनींहि असें म्हणण्याचें प्रयोजन नाहीं कीं, 'तुम्ही फार कडक टीका करतां.' एकंदरींत आद्य निबंधकार, आद्य चरित्रकार आणि


आद्य टीकाकार या नात्यानें चिपळूणकरांचें नांव मराठी वाङमयांत अजरामर राहील असाच सर्व विद्वानांचा अभिप्राय आहे..

त्यांनीं मराठी भाषेची जी बहुमोल सेवा केली तीमुळेंच मराठी बोलीनें आजचें मोहक रूप धारण केलें आहे. मराठी भाषेचा त्यांचा अभिमानहि स्वदेशभक्तीनें प्रेरित झालेला आहे. किंबहुना देशभाषेचा स्वीकार राष्ट्रीय दृष्टीनें आवश्यकच आहे व राष्ट्रसेवेचें तेंच एक प्रमुख अंग आहे असें त्यांचें प्रतिपादन आहे. मराठी भाषा ही विचारांच्या अभिव्यक्तीस योग्य नाहीं हा जो गैरसमज कित्येकजण उराशीं बाळगून होते, त्यांना विष्णुशास्त्र्यांनीं चोख उत्तर दिलें आहे. त्यांची भाषाशैली बहुढंगी असून, वाटेल त्या विषयावर अभिप्राय व्यक्त करण्यास समर्थ आहे, असें त्यांनीं सप्रमाण दाखवून दिलें आहे. इंग्रजी ज्ञानगंगेचे पाट मराठीच्या कालव्यांनीं आपल्या देशांत खेळवून आपला देश संपन्न करावा अशीच त्यांची इच्छा होती. त्यांचे काळीं जे कित्येक मौलिक ग्रंथ इंग्रजी शिकलेल्या विद्वानांनीं इंग्रजींतून लिहिले त्याबद्दल त्यांना खेदच वाटत असे. त्यांनीं हे विचार मराठींतून मांडले असते, तर किती बरें झालें असतें असा अभिप्राय विष्णुशास्त्र्यांनीं दिला आहे.

स्वतंत्र हायस्कूलची स्थापना करून त्यांनीं राष्ट्रीय शिक्षणासच पर्यायानें सुरवात केली असें म्हणावें लागेल. अर्थात् त्यांनीं घालून दिलेल्या मूलभूत कल्पना पुढें त्यांच्या सहकाऱ्यांनीं उधळून लाविल्या व त्यामुळें त्यांची राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना अमूर्त स्वरूपाचीच राहिली. पण त्यांच्या विचारांचा ओघ कोणत्या दिशेनें वहात होता, याची पुरेपूर कल्पना न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेनें सर्वांनाच येऊन चुकलेली होती. मेहेरबान डायरेक्टर साहेबांची हांजी हांजी न करितां व सरकारी मदतीचा एक छदामहि न घेतां स्वतंत्र वृत्तीनें त्यांनीं चालविलेल्या या उपक्रमाची सरकारी अधिकाऱ्यांनाहि प्रशंसाच करावी लागलेली आहे. गुणांचे बाबतींत सरकारी हायस्कुलाला या हायस्कुलानें केव्हांच मागें टाकलें. आजन्म सेवकांची कल्पनाहि येथूनच निघाली. सरकारी नोकरी न करतां पोटापुरताच पगार घेऊन स्वार्थत्यागाचीहि मुहूर्तमेढ रोवण्यास शास्त्रीबुवांचेच परिश्रम कारणीभूत झाले. टिळक, आगरकर व चिपळूणकर ह्यांनीं आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें महाराष्ट्राला शिक्षणाच्या बाबतींत वरच्या दर्जावर चढविलें. त्यांतूनच पुढें रँगलर परांजपे यांच्यासारखे अतुलनीय स्वार्थत्यागी निर्माण झाले.

म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकरांना एक युगप्रवर्तक पुरुष असें अभिधान देणें योग्य होईल. मराठी भाषेचा स्वाभिमान जागृत करून, हांजीहांजीखोर लोकांचा दंभस्फोट करून, निबंधाचें स्वरूप ठाकठीक आणि गोंडस करून, सुंदर चरित्रलेखनाचा पाया घालून आणि टीकाशास्त्राला जन्म देऊन विष्णुशास्त्र्यांनीं मराठी वाङमयास नव्हे तर स्वदेशाभिमानास मूर्त स्वरूप दिलें. म्हणूनच आचार्य जावडेकरांनीं असें म्हटलें आहे कीं, "महाराष्ट्रांत विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं १८७४ सालीं निबंधमाला सुरू करून एक नवा स्वाभिमानी राष्ट्रीय विचारसंप्रदाय निर्माण केला. तसेंच महाराष्ट्राच्या निकट भूतकालीन इतिहासाच्या आधारें स्वराज्य-स्थापनेच्या कार्यास आमची संस्कृति पूर्णपणें लायक आहे असा आत्मविश्वास निर्माण केला." ग्रीक व रोमन प्राचीन विद्येचें पुनरुज्जीवन करून ज्याप्रमाणें युरोपनें नवयुगास सुरवात केली, त्याप्रमाणें आपल्याकडेहि विद्येचें पुनरुज्जीवन करून विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं क्रांति घडवून आणली. चिपळूणकर, रानडे आणि आगरकर यांनीं महाराष्ट्रांत दहापंधरा वर्षांत जें विचारमंथन घडवून आणलें त्यांत विद्येचें पुनरुज्जीवन करून विष्णुशास्त्र्यांनीं, धर्मक्रांति करून रानड्यांनीं, आणि विवेकवादी विचारक्रांति करून आगरकरांनीं तीन प्रवाहांचा त्रिवेणी संगम घडवून आणला. आमच्या समाजांत आमूलाग्र धार्मिक व सामाजिक क्रांति झाल्याखेरीज आम्ही राज्य करण्यास अपात्र आहोंत व म्हणून तोंपर्यंत आम्ही इंग्रजांचेंच दास्यत्व केलें पाहिजे या विचारांचा पगडा नाहींसा करून १९ साव्या शतकाच्या चौथ्या चरणांत विष्णुशास्त्र्यांनीं राष्ट्रीयत्व व स्वाभिमान जागृत करण्यास सुरवात केली. इंग्रजांची स्वार्थी नीति लोकांपुढें मांडून आणि त्यांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना पराक्रमी व स्वावलंबी बनविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत असें विष्णुशास्त्र्यांनीं ठरविलें व यांतच त्यांचा मोठेपणा आहे, अशी आचार्य जावडेकरांनीं कबुली दिली आहे. तात्पर्य स्वदेश, स्वभाषा आणि स्वधर्म या बाबतींत शास्त्रीबुवांच्या निबंधमालेच्या सप्तवार्षिक कार्यानें महाराष्ट्रांत कोणती विचारक्रांति घडवून आणली याची यथार्थ कल्पना येईल व म्हणूनच आचार्य जावडेकर म्हणतात, तें सर्वांस कबूल करावें लागेल कीं, "चिपळूणकर, आगरकर व टिळक यांनीं महाराष्ट्रांत एक नवीन युग प्रवर्तित केलें." आपल्या शेवटल्या निबंधांत विष्णुशास्त्र्यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, 'आमचे देशबंधु जे अगदींच वहकून गेले होते त्यांस ताळ्यावर आणण्याचा संकल्प योजून आम्हीं जें कलम हातांत धरलें होतें तें आतां जरी खालीं ठेवलें तरी हरकत नाहीं."

आम्ही तरी याहून वेगळें काय करणार!


२३४१८ दि: 1.0.१९५९
नों: दि: २८/...
मराठी ग्रंथ ... हा. क. ८७५६

विद्वत्त्व आणि कवित्व

सौरवर्णानि सरोजानि निर्मातुं सन्ति शिल्पिनः ।
तत्र सौरभनिर्माणे चतुरश्चतुराननः ॥[1]

अंक ३ रा—(१) काव्यविवेचनशास्त्र; त्याचा आपल्या लोकांत अभाव. (२) प्रकृत निबंधाचा विषय. (३) कवितेच्या स्वरूपाविषयीं निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें. (४) काव्याचें लक्षण; उदाहरणें. (५) कवित्व ईश्वरी देणें होय; प्रासादिक कवितेचीं उदाहरणें. (६) अशा कवितांतील चमत्कारिक खुबी. (७)—

१. काव्यविवेचनविषयक ग्रंथ इंग्रेजी भाषेप्रमाणें संस्कृतांत नसल्यामुळें काव्याचें स्वरूप काय, कवीस कोणते गुण अवश्य पाहिजेत, कवित्व ही ईश्वरी देणगी होय किंवा ती प्रयत्नाधीन आहे, वगैरे गोष्टींचें निरूपण केलेलें त्या भाषेंत कोठें सांपडत नाहीं. यावरून वरील विषयांवर संस्कृतांत कोठें कांहींच लिहिलेलें नाहीं असा म्हणण्याचा अर्थ नाहीं. साहित्यग्रंथांतून तसेंच कोठें कोठें काव्यांतून, नाटकांतून वगैरे यासंबंधें मोठे मार्मिक विचार प्रगट केलेले आढळतात. आणि ज्या आपल्या देशाचें भाषावैभव मुख्य

---

१. " सोन्याचीं कमलें कारागिरांच्या हातून होतील; पण त्यांत सुगंध नर्माण करणें ही करामत एका ब्रह्मदेवाचीच ! "

कविताच होय, व ज्यांत ती इतक्या परिपक्व दशेस येऊन पोंचलेली दृष्टीस पडते त्यांतील लोकांच्या मनांत वरील विचार येऊन त्यांचा उल्लेख जागजागीं दृष्टीस पडतो यांत कांहीं नवलही नाहीं;—तसा तो नसता म्हणजे मात्र मोठ्या आश्चर्याची गोष्ट होती! असो; तरी या विषयाचें विवेचन आलीकडे इंग्लंड वगैरे देशांत जितपत झालें तितपत यापूर्वी कोठें—म्हणजे आपल्या देशांत, किंवा ग्रीस, इटाली देशांतही—झालें नसेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या लोकांत तर या काव्यविवेचनशास्त्राचा आलीकडे मुळींच लय झाला आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. आपल्या जुन्या पंडितांस काव्याभिरुचि कितपत असते हें त्यांच्या संस्कृत कवितेवरून, त्यांच्या टीकांवरून, व संभाषणप्रसंगीं मोठमोठ्या संस्कृत कवींच्या ग्रंथांतून ज्या प्रकारचीं सुभाषितें ते काढतात, त्यांवरून अगदीं स्पष्ट दिसून येतें. युरोपांतील सासान्य पंडितांस आमचे काव्यग्रंथ जसे समजतात तसे इकडील मोठमोठ्या शास्त्र्यांसही अगदींच समजत नाहींत; व त्यांतील अप्रतिम रसाचा-आस्वाद घेण्यास जर हे परस्थ लोक आम्हांस न शिकविते तर तो आम्हांस कधींही समजताना यांतही अगदीं संशय नाहीं! साराश, या शास्त्राची चांगली माहिती ज्यास करून घेणें असेल त्यानें या विषयावरील इंग्रजी ग्रंथ वाचून त्यांचें सतत मनन केलें पाहिजे. तें केलें असतां काव्यांचें मर्म जाणण्याची त्याच्या अंगीं उत्कृष्ट शक्ति येऊन आनंदाचें एक मोठें साधन त्यानें अक्षयीं आपलेंसें करून ठेवल्याप्रमाणें होईल.

२. या निबंधांत काव्याविषयीं सविस्तर विवरण करण्याचा उद्देश नाहीं. यांत येवढ्याच गोष्टीचा विचार करणें आहे कीं, कवित्व आणि विद्वत्त्व यांचा वस्तुतः कांहीं संबंध आहे कीं नाहीं;—म्हणजे विद्वान् झाला कीं तो कवि झालाच, किंवा कवि असला कीं तो विद्वान् असायाचाच असा कांहीं नित्य संबंध आहे किंवा काय! याविषयीं समजूत होण्यास मराठी वाचकांकरतां अद्याप कोठें कांहींही लिहिलेलें आढळत नाहीं; यास्तव हा विषय त्यांस अगदीं नवा व त्यामुळें विशेष मजेचा वाटेल असें जाणून त्याविषयीं या अंकांत लिहितों.

३ आतां पहिल्यानें कविता म्हणजे काय याविषयीं विचार करूं. कवितेचें खरें स्वरूप आपल्या लोकांत अजूनही फारच थोड्यांस समजतें.

बाकीच्यांनीं त्याविषयीं कधींही नीट विचार केला नसल्यामुळें, व हा विचार करण्याची योग्यताही बहुतेकांस नसल्यामुळें, कवितेविषयीं त्यांच्या निर-निराळ्या समजुती असतात. जे अगदींच अप्रबुद्ध आहेत त्यांची समजूत तर अर्थात् हीच असते कीं, छंदोबद्ध पदरचना म्हणजे पद्य हीच कविता. मग या पद्यांत कांहीं कां असेना ! अमरकोशाचे श्लोक, भर्तृहरीच्या कारिका, वाग्भट्टाचे वैद्यकावरील श्लोक, आलीकडे मुलांकरतां केलेले पद्यरूप लहान इतिहास, हीं सर्व त्यांच्या मतें कवितेखालींच मोडतात. उद्यां बाजारांतील सर्व जिनसांच्या भावांचें कोष्टक जर कोणीं कवीनें पद्यरूप केलें, तर त्या कोष्टकांसही रघुवंशाबरोबर व शेक्सपीयर कवीच्या नाटकांबरोबर ते काव्याच्या वर्गांत सामील करतील ! सारांश, कवितेचें स्वरूप ते तिच्या नेहमींच्या वेषावरून मात्र जाणतात. जर तिनें गद्याचा वेष घेतला, किंवा गद्यानें तिचा वेष घेतला, तर दोहों ठिकाणीं ते फसून जातात. असो; हा एक प्रकार झाला. याहून वरची पायरी यमक, प्रास इत्यादिकांच्या भोक्त्यांची. यांच्या मतें ज्या पद्यांत यमकांची, प्रासांची वगैरे खूप रेलचेल असेल ती उत्कृष्ट कविता. ही परीक्षा म्हणजे स्त्रियांचें रूप त्यांच्या अंगा-वरच्या दागदागिन्यांवर लेखण्यासारखी होय. या लोकांच्या मतें अर्थातच मोरोपंतासारखा कवि आजपर्यंत झाला नाहीं व पुढें होणार नाहीं ! पण त्यांस येवढें समजत नाहीं कीं यमकांची, प्रासाची गर्दी ही जरी एका प्रकारच्या बुद्धीची दर्शक होय, तरी ही बुद्धि व कवित्व हीं एक नव्हेत. अष्टावधानी, अठरा अवधानी असा मनुष्य असला म्हणजे जसा तो महाबुद्धिमान् असतोच असा नेम नाहीं; किंवा उत्कृष्ट कसरतवाला असला कीं, तो मोठा शूर असून सेनाधिपत्यास नेहमीं योग्य असेलच असाहि नेम सांगतां येणार नाहीं; त्याप्रमाणेंच मोठमोठीं यमकें, चमत्कारिक प्रास हीं साधतां येणें हें कवित्वाचें दर्शकच होय असें म्हणणें व्यर्थ आहे. अशा यमकप्रासप्रचुर पद्यांपासून मनास मोठा चमत्कार वाटेल यांत संशय नाहीं; पण तो चमत्कार वरच्या दोघां मनुष्यांची कृति पाहून जसा वाटेल तसाच. त्यांपासून खरा उपयोग फार थोडा आहे, म्हणजे मनास कांहीं वेळ मौज वाटेल इतकाच ! याहूनही वरची पायरी श्लेषप्रिय दुर्विदग्ध लोकांची. या तिसऱ्या वर्गांत सर्व जुन्या शास्त्र्यांस घातलें असतां चालेल. यांस

खऱ्या कवितेचें रमणीयत्व व तिचे मुग्धविलास अगदींच कळत नाहींत ! न्यायमीमांसादि शास्त्रांतील कोटयांत घटून पूर्वपक्ष उत्तरपक्ष यांची परस्परांत नेहमीं झटापट करणाऱ्या या प्रचंड मल्लांचें उग्र रूप पाहतांच बिचाऱ्या कवितेचा थरकांप होतो ! अशा दांडगाईची तीस कधीं संवय नसल्यामुळें ती त्यांच्या हातीं सांपडतांच बहुधा मृतप्राय होते ! मग पुढची गोष्ट कशाला हवी ? हे तिची परीक्षा म्हणजे एखाद्या शास्त्रवादाप्रमाणें करणार, म्हणजे कोटयांवर काटया लढवून जसें त्यांचें पीठन्पीठ करून सोडायचें, तशीच कवितेचीही दशा ! तिची ताणाताण करून तींतील पदांवर नाना-तऱ्हेचे चित्रविचित्र अर्थ बसवायाचे. शृंगाराचा वैराग्यपर, वैराग्याचा शृंगारपर असा चमत्कारिक अर्थ करून बिचाऱ्या कवीच्या स्वप्नींही आली नसेल अशी त्याच्या ग्रंथाची दुर्दशा करून सोडायाची. शंकराचार्यांच्या नांवावर ' आनंदलहरी ' व ' अमरुशतक ' म्हणून दोन उत्कृष्ट काव्यें संस्कृतांत प्रसिद्ध आहेत. या दोहोंत शृंगाराचा विषय आहे, पण आमच्या पंडितांस शब्दांचें प्रसन्नार्थत्व व एकार्थत्व कधींही सहन होत नसतात. त्यांच्यांतून एकानें आपली तीव्र बुद्धि खर्चून व एकाक्षरी कोशाचें बहुधा बळकट पाठबळ घेऊन वरील काव्यांतील शब्दांचा रंगेलपणा काढून टाकून खऱ्या रसिकाबरोबर त्यांस वैराग्यांत लोटून दिलें आहे ! हाच प्रकार एका शहाण्या टीकाकारानें ' शाकुंतल ' नाटकांतील आरंभींच्या श्लोकाशीं केला आहे असेंही ऐकण्यांत येतें. पण इतक्यावरच गोष्ट गेली असेल तर कालिदासाचें मोठें भाग्यच मोजलें पाहिजे ! कां कीं न जाणों, त्याचें तें सगळें नाटकचें नाटक स्वतःस न कळतां वैराग्यपर अर्थाचेंही बांधलें गेलें असून दोन हजार वर्षांनीं त्याचा गर्भितार्थ जर या विशालबुद्धि टीकाकारानें काढला असता, तर एवढें नाटक रचूनही त्याचा अर्थ स्वतःसच नीट न कळल्याचें मोठें अज्ञान आपल्या महाकवीच्या पदरीं आलें असतें ! असा बुद्धीचा व काळाचा अपव्यय केल्याचें आणखीही एक आलीकडचें उदाहरण येथें सांगितल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. तें पुष्कळांस सहज प्रत्यक्ष पाहतां येईल. आमचे मराठीचे वैय्याकरण व प्रसिद्ध ग्रंथकार दादोबा पांडुरंग यांनीं ' केकावली ' वर सुमारें आठ दहा वर्षांपूर्वी एक भली लांब टीका करून ती प्रसिद्ध केली हे सर्वांस माहीत असेलच. त्यांत

त्यांनीं बुद्धया आडरानांत शिरून केलेले विलक्षण अर्थ पुष्कळ आहेत. त्यांवर यापूर्वी पुष्कळ चर्चा मागेंच झाली; व तींत एवढया मोठया ग्रंथकाराची व लोकोपकारी सद्गृहस्थाची होऊं नये अशी चारगटपणाची विनाकारण पुष्कळ विटबंनाही झाली हेंही येथें लिहिणें आम्हांस वाजवी वाटतें. असो; त्या टीकेच्या संबंधानें प्रस्तुत प्रसंगीं लिहायाचें तें हेंच कीं, तींत पहिल्या केकेवर व्याख्या देतांना दादोबांनीं वरील अप्रयोजक टीकाकारांचा बाणा उचलला आहे. पहिल्या मंगलाचरणरूप केकेचा अर्थ अगदीं उघड असतां तीवर पंचवीस तीस पानें व्याख्या देऊन तिचा अर्थ वेदान्तपर लावला आहे ! असो; तेव्हां श्लेष म्हणजे कवितेचा जीव प्राण, व पांडित्याचा परमोत्कर्ष म्हणजे चार वर्षांच्या पोराच्या बोलण्यांतही निरनिराळे अर्थ काढणें, असें मानणारांचा हा तिसरा वर्ग झाला. आतां याहूनही वरचा वर्ग नादलुब्ध लोकांचा. यांच्या मतें कवितेचें सर्वस्व पदरचनेंतील माधुर्य होय. शब्द अंमळ थाटमाटाचे घातलेले असून ते कानास गोड लागतीलसे असले कीं झाली उत्कृष्ट कविता. ही परीक्षा म्हणजे स्त्रियांच्या रूपाचें मान त्यांच्या गळ्यावर म्हणजे मधुर स्वरावर बसविण्यासारखें असमंजस आहे. मधुर रचना हें उत्कृष्ट कवितेचें एक अंग खरें, पण तिचें सर्वस्व नव्हे. याप्रमाणें निरनिराळे लोकांची कवित्वाविषयींचीं भिन्न भिन्न मतें सांगितलीं. पण एकढयांतच सर्वांचा समावेश होत नाहीं. या चौघांशिवाय बाकीचे जे कोणी आहेत त्यांचा कशाविषयींच आग्रह नसतो. त्यांचा अभिप्राय नेहमी चारचौघां विद्वानांसारखा पडायाचा,–म्हणजे ते जें म्हणतील त्यांचा अनुवाद करणें हेंच त्यांचें मत ! ते स्वत: म्हणून कधीं विचार करायाचे नाहींत. ढालीसारखीं पागोटीं जाऊन चंबूंचा प्रघात पडला, गजरेदार आंगरखे जाऊन पोकळ आंगरख्यांची भास पडली, हें पाहून विद्वानांच्या अभिरुचीस ते जसे अनुसरत गेले, त्याप्रमाणें त्यांचीं सर्व गोष्टींविषयीं मतें वरचेवर फिरत असतात. तीं अशीं बेचूक कीं, कोणी मनुष्य जर खेडेगांवांत जाऊन राहिला किंवा देशांतरास गेला असला तर पुन: शहरास परत आल्यावर अशा मनुष्याशीं त्यानें चार घटका प्रसंग केला कीं पुरे, त्यास तोंपर्यंत झालेल्या फेरफारांची सगळी माहिती तेव्हांच व्हावयाची ! असे लोक जर

विद्वानांच्या समाजांत मेजवानीस बसले असले तर त्यांचें लक्ष नेहमीं विद्वानांच्या तोंडाकडे असेल व त्यांच्या तोंडावर जसे रुचिभेदेंकरून विकार झालेले दृष्टीस पडतील, तसे हुबेहूब आपल्याही तोंडावर ते उठवितील,— म्हणजे प्रसंगानुसार साखरेच्याही पदार्थाला तोंड आंबट करतील, किंवा एखादा तुरट पदार्थ मोठा मिष्ट म्हणून त्याचा स्वाद वाखाणतील ! सारांश, अजून आपल्या लोकांत खरे परीक्षच फार थोडे आहेत; व यामुळें काव्य म्हणजे काय हें एकंदर लोकांस कांहींच कळत नाहीं.

४. काव्याचें वरोबर थोडक्यांत लक्षण देणें फार कठीण आहे. तें इंग्रज ग्रंथकारांनीं पांच पंचवीस प्रकारांनीं दिलें आहे. तरी आपल्या संस्कृत ग्रंथांतील 'रसात्मकं काव्यम्' म्हणजे रसयुक्त तें काव्य हें लक्षण सध्यांच्या पक्षी आपणांस पुरें आहे. हें लक्षण ध्यानांत धरलें असतां वरील सर्व भ्रांति दूर होतील, म्हणजे काव्यास पद्यरचना, यमक, प्रास, श्लेष किंबहुना वर्णमाधुर्य हीं अवश्य हवींच असा कांहीं नेम नाहीं हें तेव्हांच लक्षांत येईल. अशा प्रकारचीं काव्यें आपल्या मराठींतही नाहींतशीं नाहींत. हीं उदाहरणें पहा—

"कोणी एक ओगलजी नांवाचा गृहस्थ काश्मीर देशीं राहत होता. तो वैशाखमासीं एके दिवशीं संध्याकाळीं आपला मुलगा आन्या यास संगातीं घेऊन एके लहान डोंगरीवर बसला आहे, आणि तेथून समोर दृष्टीस पडताहेत ते रमणीय पदार्थ त्यांस दाखवितो आहे. ते वेळीं सूर्य अस्तास जात होता, तेव्हां त्यास अशी कल्पना झाली कीं, तो सर्व विश्वाला सोनेरी रंगाचें वस्त्र पांघरवून चालला आहे काय ! किंवा हे डोंगर सोन्याचेच आहेत काय ! अशा अशा कल्पना करीत ते सुख घेत बसले असतां, तितक्यांत तिकडून एक धनगर आपला कळप चारणीवरून घराकडे वळवून चालला होता; त्यानें सुस्वर गायन केलें, तें त्या बाप लेकांच्या कानीं पडून ते तिकडे पाहूं लागले."

बाळमित्र—कांटेझाड.

ऋतूंचें वर्णन

"बाळा नुकताच शेकून आणि ओले गव्हांच्या ओंब्या खाऊन आलेला होता, आणि म्हणतो 'अहाहा ! असा सदां हिवाळाच असता

तर बरें होतें ! याचें सुख काय सांगूं ! ह्यांत नद्यांचें पाणी किती स्वच्छ आणि किती मिष्ट ! लोंकरी वस्त्रें काय सुख देतात ! पोटांत भूक, अन्नास रुचि, आणि निद्रा तरी काय गाढ येते ती !' तें ऐकून गोविंदशेट, त्याचा बाप, त्यास म्हणाला, ' बरें तर, म्हणतोस असेंच स्मरणवहींत लिहून ठेव.' बाळानें तसें केलें. पुढें हिवाळा निघून गेला, आणि उन्हाळा आला. तेव्हां संपूर्ण वृक्ष पालवी फुटून फलपुष्पयुक्त झाले आहेत; वायु मंद सुगंध शीतळ वाहत आहे; लोक चंदनाच्या उटया घेऊन गळयांत पुष्पांच्या माळा घालून फिरताहेत, व नाना प्रकारचे शीतळ उपचार करताहेत; बागांमध्यें कारंजीं उडविताहेत; त्यांचे तुषार अंगास लागून अत्यंत सुख करताहेत, तसेंच पिकलेलीं फळें, आंबे, फणस, जांब, अंजीर, द्राक्षें इत्यादिक जिव्हेस अमृतासारखी रुचि देताहेत. तें सर्व सुख पाहून बाळा म्हणतो, ' अहाहा ! असाच सदां उन्हाळा असता तर बरें होतें.' गोविंदशेट म्हणाला, ' मुला म्हणतोस असेंच स्मरणवहीवर लिहून ठेव.' बाळानें तसें केलें. नंतर पावसाळा आला. त्या समयीं जिकडे तिकडे हिरवींचार गवतें व नाना प्रकारचीं झाडें उगवलीं आहेत; नद्यांचे प्रवाह चालले आहेत, शाकभाज्या पुष्कळ झालेल्या आहेत; जिकडे तिकडे पाणी जमलें आहे; त्यांतून कागदांचीं तारवें करून मुलें पोहविताहेत; डोईवर छत्र्या, सखलादीच्या टोप्या घेऊन पावसांतून लोक चालले आहेत; पुढें शेतें पिकलीं, त्यांत नाना प्रकारचीं धान्यें झालीं आहेत. तें पाहून बाळा म्हणाला, ' बाबा, काय चमत्कार हा ! हा पावसाळा सदां असाच असता तर बरें होतें ! ' बाप म्हणाला, ' मुला, हें त्या वहींत लिहून ठेव ! ' बाळानें तसें केलें."

कित्ता—तीन काळ.

अशीं काव्यें या ग्रंथांत पुष्कळच आहेत; फार तर काय पण हें सगळं पुस्तक काव्यमयच आहे असें म्हटलें असतां चालेल. हें मूळचें एका फ्रेंच बाईनें केलें असून या ग्रंथाची सर्व जगभर प्रसिद्धि झाली आहे. आपल्या मराठींत तर हें भाषांतर इतकें उत्कृष्ट उतरलें आहे कीं, तें परभाषेंतलें असेलशी शंका सुद्धां येत नाहीं. हें पुस्तक वाचलें असतां मराठीची दुर्दशा वीस पंचवीस वर्षांत किती झाली हें पुरतेपणीं चित्तावर ठसून फार वाईट वाटतें, व पुढील पंचवीस वर्षांकडे नजर

देण्यास भय वाटतें ! असो; या प्रसंगीं आमच्या भाषेच्या हितचिंतकांस हा ग्रंथ वरचेवर वाचण्याची फार फार शिफारस केल्यावांचून आमच्यानें पुढें लिहवत नाही !

असेच उतारे 'इसापनीति,' 'अरबी भाषेंतील गोष्टी,' 'मुक्तामाला,' 'थोरले माधवराव,' 'जयपाळ' अशा ग्रंथांतूनही आणखी हवे तितके घेतां येतील.

वरील दोन काव्यें वाचून आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् असमंजसपणानें हंसूं येईल; पण त्यांनीं पक्कें समजावें कीं, असें जोंपर्यंत होईल, व त्यांत त्यांस अंतःकरणास लागण्यासारखें कांहींच भासणार नाहीं, तोंपर्यंत कवितेचा स्वाद त्यांस मुळींच कळला नाहीं ! तसेंच आमच्या वाचकांत जर कोणी शास्त्री असतील तर त्यांसही वरील गोष्टींचा मोठाच चमत्कार वाटेल ! आपण कांहीं भलतेंच भ्रांतींत वाचीत आहों, किंवा हें लिहिणाराने तरी कांहीं भलतेंच भ्रांतींत लिहिलें असावें, अशा कल्पना त्यांस बहुधा कराव्या लागतील ! पण दोघांपैकीं भ्रांतींत कोणीच नाहीं हें दाखविण्याकरतां त्यांच्या परिचयांतलाच असा एक उतारा येथें घेतों—

तत्तु तीरं समासाद्य तमसायां मुनिस्तदा ।
शिष्यमाह स्थितं पार्श्वे दृष्ट्वा तीर्थमकर्दमम् ॥
अकर्दममिदं तीर्थं भारद्वाज निशामय ।
रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा ॥
इदं तीर्थसमं सौम्यं सुजलं सूक्ष्मवालुकम् ।
न्यस्यतां कलशस्तात दीयतां वल्कलं मम॥ बालकाण्ड—सर्ग २.

हें आद्यकवीचें काव्य कोणास 'रमणीय' वाटत नाहीं ? व कोणाचें चित्त 'प्रसन्न' व 'सौम्य' करीत नाहीं ! वास्तविक पहातां यांत येवढें काय आहे बरें ? गांवढळ कुणब्यासही ज्या गोष्टी दररोज दृष्टीस पडतात त्याच येथें वर्णिल्या आहेत. पण म्हणूनच हीं पद्यें येवढीं रमणीय झालीं आहेत ! तीं समजण्यास यत्किंचितही श्रम न पडून प्रत्येक मनुष्याच्या मनांत अशी नदी पाहिली असतां ज्या कल्पना सहज भरतात त्याच येथें कवीनें अगदीं साध्या रीतीनें बोलून दाखविल्या आहेत. या वर्णनांत एक

मात्र अलंकार घातला आहे,–किंवा घातला आहे म्हणण्यापेक्षां आला आहे हेंच म्हणणें बरोबर आहे. कां कीं, तो इतका सहज आला आहे,—व म्हणूनच त्या ठिकाणीं इतका शोभतो–कीं, तो आणण्यास कवीस यत्किंचितही प्रयत्न पडला नसावा. असो; एकंदरींत या काव्याची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच आहे ! ज्यानें आजपर्यंत कोट्यवधि मनुष्यांचें रंजन करून त्यांच्या प्रशंसेचें मोर्तब जें जसें काय काळास दाखवीत आहे त्या काव्यास येथच्या स्तुतीच्या दोन शब्दांनीं किती थोरवी येणार !

याचप्रमाणें पुढें क्रौंच पक्ष्याचा वृत्तान्त लिहिला आहे तोही किती हृदयंगम आहे ! तो वाचूनही ज्याची वृत्ति पहिल्याप्रमाणेंच तटस्थ राहील, त्यास देण्यास दुसऱ्या कोणाची उपमा साजणार नाहीं,–एक त्या निषादाची (कोळ्याची) च साजेल !

तेव्हां एकंदर सांगायाचें काय कीं, सत्काव्यास पद्यरचना, यमक, प्रास, श्लेष, किंबहुना वर्णमाधुर्यही, यापैकीं कोणाची सुद्धां बिलकूल गरज नाहीं ! जें वाचल्यानें किंवा ऐकिल्यानें मनाच्या वृत्ति प्रसन्न होऊन तो तो रस अंत:करणांत सहज बिंबून जातो त्यास काव्य म्हणावें. पण हें जर होत नाहीं तर छंद, यमक, श्लेष, मृदुत्व यांविषयींची सर्व खटपट व्यर्थ !

५. वरील सर्व गोष्टींचा यथास्थित विचार केला असतां लक्षांत येईल कीं, कवित्व हें अंगीं आणूं जातां येणारें नव्हे; तें ईश्वराचेंच देणें होय. यास्तव सौंदर्य, सुस्वर, इत्यादि मनुष्याच्या अस्वाधीन असणारे गुण बळेंच आपले ठायीं आणणाऱ्यांच्या प्रयत्नांस जितपत यश येतें, तितपतच अशा दांडगाईनें कवि होऊं पाहणाऱ्यांचा प्रयत्न सिद्धीस जातो; म्हणजे नुसत्या छानछुकींत व सुरेखपणांत जितकें अंतर, तितकेंच कृत्रिम प्रकारांनीं आणलेल्या शोभेंत व खऱ्या कवित्वांत ! आणि ज्याप्रमाणें छानछुक ही बहुधा हवें त्यांस प्रयत्नांतीं साधण्यासारखी असते, त्याचप्रमाणें कवितेचा बाह्य वेष म्हणजे छंद, मृदुरचना इत्यादिही सामान्य बुद्धीच्या सर्व लोकांस बहुधा साधतां येईल. आतां हें सर्व कोणास अधिक कोणास कमी, असें साधेल खरें, पण तें फार फार उत्कृष्ट साधलें तरी खऱ्या रसिकास त्यापासून तशी बहार वाटणार नाहीं; कीं जशी अगदीं साध्या पण अस्सल अशा कवितेच्या चुटक्यानें वाटेल ! उदाहरण:—

वर्षावावीण सागर जैसा जळें निर्भर ।
तैसाचि निरुपचार संतोषी जो ॥
व्यापक आणि उदास जसें कां आकाश ।
तैसें जयाचें मानस सर्वत्र गा ॥
संसारव्यथें फिटला जो नैराश्यें निवटला ।
व्याधाहातोनि सुटला विहंग जैसा ॥
घरींचियां उजेड करावा परकियां अंधार पाडावा ।
हें नेणेंचि गा पांडवा दीप जैसा ॥
जो खांडावया घाव घाली कां लावणी जेणें केली ।
दोघां एकचि सावली दे वृक्ष जैसा ॥
जो निंदेतें नेघे स्तुतीतें न श्लाघे ।
आकाशा न लागे लेप जैसा ॥ --ज्ञानेश्वरी-

हे भगवद्भक्ताचें वर्णन केवढें उदात्त आहे ! व यांत छंद, पदरचना, वगैरे अगदीं साधी असल्यामुळें तर हें फारच शोभतें. अशा ठिकाणीं संस्कृतांतले शिखरिणी, मंदाक्रांता वगैरे झोकदार मोठाले छंद, किंवा मराठींतलीं साकी, दिंडी इत्यादि मंजुळ वृत्तें अगदींच कामास पडतीं ना !

दुसरें:—

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोशीतो जगासी एकलाची ॥
फुटे तरुवर उष्णकाळमासी । जीवन तयासीं कोण घाली ॥
बाळा दुग्ध कोणीं केलेंसे उत्पत्ती । वाढवी श्रीपती सवें दोन्ही ॥
तुका म्हणे त्याचें नांव विश्वंभर । करा निरंतर ध्यान त्याचें ॥
ऐसे संत झाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ॥
स्नान संध्या बुडवीली । पुढें भांग ओढवली ॥
भांगभुर्का हें साधन । पचनीं पडे मद्यपान ॥
तुका म्हणे अवघें ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥
आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्यां भटां झाली धणी ॥
अंतरीं पापाच्या कोढी । वरी बोडी डोयी दाढी ॥
जें बोडिलें तें निघालें । सांग काय पालटलें ॥
पाप गेल्याची खूण । नाहीं पालटले अवगुण ॥

भक्तिभावेंवीण । तुका म्हणे अवघा शीण ॥
अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥
आत्माअनुभवीं चोखाळिल्या वाटा । त्याच्या माथां जटा
असो नसो ॥
परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक । त्याचे अंगा राख असो नसो ।
परद्रव्या आंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा तुका म्हणे ॥

आणखी एक:—

(वनाचें वर्णन)

देखे प्रचंड महागिरी विशाळ पर्वताचिया दरी ।
जळें तुंबलीं सरितासरीं समुद्रतुल्य अगाध ॥
नाना वृक्षांचीं अचाट डांगें लागलीं धनदाट ।
माजीं निर्झरोदकाचे पाट सरोवैरा धांवती ॥
माथां उचलूनी दिनकर छायें रक्षिला अंधकार ॥
माजीं श्वापदगणांचे भार सुखावले सुखवस्ती ॥

(नदीचें वर्णन)

नदी मालिनी पवित्रजीवनी वाहे जैशी देवतटिनी ॥
तरंगलिंगें सुफेनसुमनीं सुपूजितें शोभती ॥

(पुढील वृत्तान्त)

मग गर्जूनि नराधीशें म्हणितलें आश्रमीं कोण असे ॥
हें परिसोनि इंदिरावेशें लावण्ककलिका प्रगटली ॥
कनकलतिका सौदामिनी कीं चंद्रकलिका तनुधारिणी ॥
सुवर्णकेतकीपत्रवर्णी सुवर्णखाणी हरिणाक्षी ॥ मुक्तेश्वर.

६. येवढे उतारे पुरेत. यांवरून खऱ्या कवित्वाचें स्वरूप वाचकांच्या लक्षांत येईल. तें हेंच कीं, इतर कोणत्याही गोष्टींचें साहाय्य न घेतां अर्थाच्याच केवळ अंगभूत सौंदर्यानें व तद्व्यंजक शब्दांच्या अपूर्व सौष्ठवानें मनास चमत्कार भासविण्याची शक्ति. ही शक्ति कवीशिवाय इतरास समजणें

अशक्य होय. फार तर काय, पण कवीची कवीसही ती सांगतां येणार नाहीं ! व म्हणूनच या शक्तीस कवि व इतर लोक ईस्वरी प्रेरणा म्हणतात ! सामान्य मनुष्याची अक्कल व प्रयत्न कवितेच्या बाह्यांगांपर्यंत मात्र पोंचेल; व म्हणून काव्यांत रस आणावयाचा असल्यास चांगलीं मोठालीं वृत्तें, अर्थालंकार, शब्दालंकार इत्यादिकांचें मजबूत साह्य घेतल्याखेरीज त्यांचें कधींही चालणार नाहीं. पण वरील उतारे पहा बरें ! त्यांस असें बाहेरचें साहित्य लवमात्रही लागलें नाहीं. छंद, ओवी व अभंग--ज्यांत इतर छंदांप्रमाणें मोठेंसें माधुर्य आहे असें नाहीं; व ज्यांची रचना साऱ्या वृत्तांत अगदीं सोपी असल्यामुळें गद्यांत व जींत फारसा फेर नाहीं; शब्दालंकार पाहिला तर शेवटलें एकाक्षरी यमक येवढाच; आणि अर्थालंकारही मोठ्या प्रयासानें उत्कृष्ट निवडून घातले आहेत असेंही नाहीं. बरें, अशा कवितेचा विषय तरी कांहीं अपूर्व असतो काय ? कांहीं नाहीं; ज्या गोष्टी चारचौघांस नेहमींच्या माहीत असतात त्याच प्रायः तींत असतात ! पण कवीच्या वाणीनें त्या निघाल्या कीं पुरे; जादूगिराच्या कांडीनें त्याच पदार्थास जशी अपूर्वता प्राप्त होते, त्याप्रमाणें अशा नेहमींच्या गोष्टीसही कांहीं अपूर्व शोभा येते ! येरवींचीं पद्यें कितीही उत्कृष्ट असलीं, तरी त्यांचा एकदोनदां वाचतांच कंटाळा येऊन जातो; पण अशांचें साधें सौंदर्य शेंकडोंदां वाचल्यानेंही कमी न भासतां वाचकांस

प्रतिक्षण नवीच दे रुचि—

७. असो; याप्रमाणें स्वतःसिद्ध अशा महाकवींच्या कवितेचें स्वरूप वर लिहिलें आहे त्यावरून आमच्या वाचकांच्या मनांत बरेंच आलें असेल असें आम्हांस वाटतें. येथवर हातीं घेतलेल्या विषयाचा अर्धा भाग--म्हणजे कवित्व म्हणजे काय याविषयीं बराच विचार झाला. पण बाकीचा सर्व विषय थोडक्यांत आटपण्यासारखा नव्हे, म्हणून सध्यां येथेंच थांबून पुढील खेपेस तो पुरा करूं

हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता
जनः स्पर्धालुश्चेदहह कविना वश्यवचसा ।
भवेदद्य श्वो वा किमिह बहुना पापिनि कलौ
घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः ॥[1] भवभूति.

अंक ४ था—(१) अवतरण. (२) कवित्वास विद्वत्त्व अनुकूल होय हा लोकभ्रम. (३) तर्कशास्त्राचा कवित्वाशीं अत्यंत विरोध; कवीचें मन आणि तत्वज्ञाचें मन; उदाहरण–चंद्र. (४) कल्पनेच्या विकासानंतर बुद्धीचा त्रिकास. (५) कवित्वास आवश्यक गुण. (६) 'कवि' शब्दाची व्याख्या. (७) कवीचा मुख्य गुण–सहृदयता—(८) स्वभाववर्णन. (१) प्राचीन कवींच्या उत्कर्षाचीं कारणें. (१०) इतर अप्रधान गुण. (११) दोहोंचा योग. (१२) विद्वत्तेची गति कोठपर्यंत ? (१३) एकंदर सिद्धान्त.

१. मागील अंकांत अस्सल कवित्वाचें कांहीं स्वरूप सांगितलें. आतां कृत्रिम कवितेचें–म्हणजे मूळची कवित्वस्फूर्ति नसतां विद्वत्तेच्याच जोरावर रचलेल्या काव्यांचें–निरूपण करितों.

२. या विषयाच्या संबंधानें आपल्या लोकांत पुष्कळ दिवसांपासून एक मोठाच भ्रम माजला आहे. तो अर्थात् विद्वत्व आणि कवित्व यांचा परस्पर अभेद. फार तर काय, पण 'कवि' या शब्दाचा अर्थ 'शहाणा' असाही पुढें होऊन गेला. आतां असें होण्याचें कारण काय असें जर कोणी विचारील तर तेंही सांगणें कठीण आहेसें नाहीं. विद्यासंपादनाचा मार्ग पूर्वीचा असा कांहीं चमत्कारिक होता कीं, मनुष्यानें एक अगदींच विद्येशिवाय राहावें किंवा तिच्या सर्व शाखांचें पूर्ण अध्ययन तरी करावें; मध्यंतरीं म्हणून मुळींच मार्ग नव्हता. तेव्हां जे नामांकित कवि होत ते अर्थातच

१. "ओढून ताणून शब्दांची जुळवाजुळव करणारा मनुष्य सरस्वती ज्यांस प्रसन्न आहे अशा महाकवीशीं जर स्पर्धा करूं लागला; तर आज उद्यां मडकी घडवणाऱ्या कुंभाराचा व त्रिभुवनास ज्यानें निर्माण केलें त्या ब्रह्मदेवाचाही कलह लागेल !! कोणीं सांगावें ! "

या दुसऱ्या वर्गांतलेच असत. पण गुरूच्या घरीं बारा किंवा याहूनही अधिक वर्षें राहून त्यांनीं नुसतीं काव्येंच पढून न राहतां व्याकरण, न्याय, मीमांसा इत्यादि शास्त्रांत—कीं जीं कवीस कांहीं उपयोगाचीं नाहींत, किंवहुना कवित्वास अपायकारकही होत, त्यांस पारंगत व्हावें लागे. यास्तव जे कवि निपजत ते अर्थात् अशा विद्वानांतूनच. तेव्हां सहजच कवि असला कीं तो विद्वान् असायचाच असें लोकांच्या नेहमीं दृष्टीस पडे. पण याच शब्दांचा जर व्यत्यास केला—म्हणजे विद्वान् कवि असतात असें म्हटलें—तर नेहमीं चाललेच असें नाहीं; या गोष्टीचा त्यांनीं नीट विचार केला नाहीं ! असो; पुढें पुढें तर म्हणजे माघ, श्रीहर्ष यांच्या वेळीं, कवित्वास शास्त्राध्ययन अवश्यच झालें. या कवींच्या ग्रंथांतून व्याकरण, न्याय, मीमांसा, किंवहुना वैद्यक, ज्योतिष इत्यादि शास्त्रांचाही संबंध आणलेला असतो. असें होतां होतां आलीकडे तर 'रंडागीतानि काव्यानि[1]' येथपर्यंत येऊन मजल टेकली ! असो; हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार आलीकडे सुरू झालेल्या इंग्रेजी विद्येचा. ही विद्याही मागील संस्कृत विद्येप्रमाणेंच कवित्वास अत्यंत अनुकूल आहे. किंवहुना तीशिवाय चांगली कविता करतां येणें अशक्य होय, असा एकंदर लोकांचा समज झाला आहेसा दिसतो. अथवा हेंचसें काय; एकंदर सर्व गुणांचें अधिष्ठान इंग्रेजी विद्वत्ता होय असा या अप्रबुद्ध लोकांनीं सिद्धान्त केला आहेसा वाटतो ! त्यांच्या मतें ही नवी विद्वत्ता म्हणजे कांहीं मोठी अजब चीज होय ! ही जवळ असली कीं, त्या मनुष्यानें सभाग्रभागीं उभे राहून बृहस्पतीप्रमाणें श्रोत्यांस आपल्या वक्तृत्वानें थक्क करून टाकावें, कालिदासाप्रमाणें जगास चिरकाळ मोहणारी कविता करावी, शाक्यमुनीप्रमाणें मानसिक व्यापारांची उपपत्ति काढावी, इत्यादि अनेक परस्परविरुद्ध शक्ति अशांच्या ठायीं अवश्यमेव आल्याच असें हे समजतात. फार तर काय, पण चार पांच वर्षें विद्यालयांत घालविलीं कीं, पृथ्वीवरील व्यापाराची घडामोड, राज्यव्यवस्था इत्यादि गोष्टींत किंवहुना युद्धकलादिकांतही निपुणता प्राप्त होते असा

१. शास्त्रीय कोटयांत घटून त्याखेरीज दुसरें ज्यांस कांहीं रुचेनासेंच झालें असे आपल्या देशांतील जुने पंडित वरील वाक्यानें काव्याच्या अप्रतिम रसास तुच्छ करूं पाहतात. यावरून त्यांची रसिकता स्पष्टच दिसते.

सुद्धां कित्येकांचा समज असेल. उद्यां जर गायनविद्येचा अभ्यास करायाचें कोणाच्या मनांत आलें, कीं उत्कृष्ट पाकसिद्धि करायाची असली, तर तो एखाद्या विद्वानाची गांठ घेईल ! सारांश,

प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां ।
पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः ॥

"सर्व गुण एके ठिकाणीं ठेवण्याविषयीं विधात्याची इच्छा दिसत नाहीं,—तर याच्या उलट दिसते." असें सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी जें कालिदासास वाटलें, व अगदीं अलीकडेपर्यंत लोकांस वाटत असे, तें सध्यांच्या काळीं एकाएकीं खोटें ठरत चाललें कीं काय कोण जाणे असें एखाद्यास वाटेल ! मागील काळीं होमर, थुसिडिडीस, आरिस्टॉटल्, आलेक्जांडर, असे नामांकित पुरुष निपजावयास फार दीर्घकाळ लागे, व शिवाय एकेकाच्या ठायीं एकेकच गुण मोठ्या प्रयासानें वास करी; पण इंग्रेजांची सत्ता येथें होऊन त्यांची विद्या नुकतीच इकडे संचार करूं लागली तों सगळेंच मान एकदम फिरलें ! शिल्पशास्त्र मोठ्या उत्कृष्ट दशेस येऊन अलीकडे जसे अद्भुत चमत्कार चोहोंकडे दृष्टीस पडतात, त्याहीपेक्षां बुद्धीचे चमत्कार फार मोठाले दिसूं लागले आहेत. मनुष्याच्या मनास फार थोडया काळांत पूर्णत्व येऊन त्यांत हरएक गुणांचा सहज समावेश व्हावा असें झालें आहे. असो; ईश्वरकृपेंकरून येवढा प्रकाशाचा लोट आमच्या देशास सहन होवो म्हणजे झालें !

वरील लेखावर पुष्कळांचे पुष्कळ आक्षेप निघतील हें आम्ही जाणतों. तरी त्या सर्वांचें निराकरण करण्यास पुष्कळ जागा लागून तें या प्रसंगासही उचित नाहीं असें समजून त्यासंबंधें येथें कांहीं लिहीत नाहीं. वरच्या लिहिण्यांतील मुख्य मुद्दा असा आहे कीं, कवित्वास विद्वत्तेची अगदीं गरज नाहीं. निर-निराळ्या शास्त्रांत पुरतेपणीं गति होणें हें कवित्वास अनुकूल होणार नाहीं.

---

१. हा काळ अगदीं निश्चित म्हणून आम्हीं येथें लिहिला नव्हे. पण ज्या अर्थीं थोरल्या विक्रमादित्य राजाची व आपल्या कवीची तोडातोड अजून कोणीं पक्केपणीं केली नाहीं, त्या अर्थीं तसें होईपर्यंत लोकवादासच अनुसरणें आम्हांस प्रशस्त वाटतें.

हें तर काय, पण अगदीं साक्षात् प्रतिकूलच बहुधा होणार आहे. तर्कशास्त्रासारखें तर कवित्वास अपाय करणारें कांहींच नाहीं !

३. हें वाचून आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस मोठें आश्चर्य वाटेल; व काहीं तरी विलक्षण मत स्थापण्याच्या बुद्धीनें आम्हीं हें लिहिलें आहे असेंही कित्येकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. यास्तव एका अनुभविक ग्रंथकाराचें प्रमाण येथें त्यांस दाखविणें अवश्य वाटतें—

नटः—नन्वयं (कविः) प्रमाणप्रवीणोऽपि श्रूयते । तदिह चंद्रिकाचंडातपयोरिव कवितातार्किकत्वयोरेकाधिकरणतामालोक्य विस्मितोऽस्मि ।

सूत्रधारः—क इह विस्मयः ।

येषां कोमलकाव्यकौशलकलालीलावती भारती
तेषां कर्कशतर्कवक्त्रवचनोद्गारेऽपि किं हीयते ।
यैः कांताकुचमंडले कररुहाः सानंदमारोपिता—
स्तैः किं मत्तकरींद्रकुंभशिखरे नारोपणीयाः शराः ॥

प्रसन्नराघव नाटक.

नटः—हा कवि तर्कशास्त्रांतही मोठा प्रवीण आहे म्हणून ऐकतों. तर चांदणें व कडक ऊन हीं जशीं एकत्र असावीं त्याप्रमाणें याचें कवित्व व तर्कशक्ति एके ठिकाणीं पाहून मला मोठा चमत्कार वाटतो !"

"**सूत्रधार**—यांत कसचा चमत्कार ! अरे, ज्यांची वाणी कोमल काव्यरचना प्रसवते, तींतूनच तर्कशास्त्राचीं तीक्ष्ण वचनेंहि निघालीं असतां कोणती हानि झाली ? ज्यांनीं कांताकुचमंडली आनंदेंकरून नखें रोंविलीं, त्यांसच मदोन्मत्त झालेल्या हत्तीच्या गंडस्थळावरही बाण हाणण्यास कांहीं कठीण आहे काय ?"

याप्रमाणें सुमारें सात आठशें वर्षांपूर्वींच जयदेवासही 'कवितेचा व तार्किकत्वाचा' विरोध भासला. तेव्हां हें मत आम्हीं बळेंच स्वकपोलकल्पित काढलें आहे असें नाहीं अशी आमच्या सूज्ञ वाचकांची खचित खात्री होईल. आणि या विषयाचा जो अंमळ बारकाईनें विचार करील त्यास खचित कळून येईल कीं, कवीचें मन व तत्वज्ञाचें मन स्वभावतःच परस्परविरुद्ध होय. कवीच्या मनांत पदार्थमात्राच्या दर्शनानें कल्पनेचे नानाविध तरंग उठत असतात. ते अर्थातच बहुधा भासमय असतात. तत्वज्ञाचें

मन पदार्थमात्राच्या वास्तविक स्वरूपाच्या शोधाकडे लागलेलें असतें; यास्तव सर्व भासमय कल्पनांचा निरास करून तें निवळ सत्याकडेच जातें. कवीचें काम ब्रह्मदेवाप्रमाणें चित्रविचित्र कल्पनासृष्टि बनविण्याचें असतें. तत्वज्ञाचें रयायनवेत्त्याप्रमाणें पदार्थमात्राचें पृथक्करण करण्याचें असतें सारांश, पहिल्याचा विषय कल्पना व दुसऱ्याचा विषय सत्यासत्यविवेचन. ही भिन्नता विशेष स्पष्ट करण्याकरितां एक थोडेंसें उदाहरण येथें घेतों. साऱ्या सृष्टींत चंद्राहून रमणीय पदार्थ नाहीं. आतां याकडे कवीची व तत्वज्ञाची मनःप्रवृत्ति कशी होते तो बघा ! ग्रीक व रोमन लोकांनीं चंद्राच्या सौंदर्यावरून व सौम्यत्वावरून त्यास स्त्री कल्पिलें. त्यांच्या कथासमूहांत ही स्त्री पारधीण असून धनुष्य व भाता घेऊन ही वनांत पशूमागें धांवते आहे असें वर्णन आढळतें. आपल्या कथासमूहांत तर अशा कल्पनांची गर्दीच आहे. समुद्रांतून उगवलासा दिसतो म्हणून त्यांतून निघालेलें एक रत्न; तो उगवतांच कुमुदिनी (जणों काय हर्षानें) विकसतात म्हणून त्यांचा पति; रात्रींच त्याचे किरण प्रकाशमान होतात म्हणून तिचा नवरा, त्याच्या बिंबावर हरणाची आकृति दिसते म्हणून मृगांक; त्यास पाहतांच समुद्रास (जसें काय आनंदाचें) भरतें येतें, म्हणून (दुसऱ्या कल्पनेनें) त्याचा मित्र; याचप्रमाणें अंधकाराचा शत्रु, राहूचा द्वेष्य, इत्यादि संबंधही त्याजवर आले. त्याचें किरण नेत्रांस व शरीरास सुखद होत म्हणून शीतकर, चंद्रकांतास द्रवविणारा, इत्यादि कल्पनाही त्यावर बसल्या आतां या मनोरम भ्रमांचे तत्वज्ञ कसें निरसन करून टाकतो पहा ? चंद्र समुद्रापासून लाखों कोस दूर आहे हें जाणून तो समुद्रोत्थ रत्न नव्हे असा तो निश्चय करतो, समुद्राची भरती, कमलांचा विकास, हीं आकर्षणादि सृष्टिव्यापारांचीं फलें होत; हरण दिसतें ती चंद्रावरील पर्वतांची छाया; राहु म्हणतात ती पृथ्वीची छाया; अशा उपपत्ति तो करीत जातो. शेवटीं चंद्राचे किरण थंडगार आहेत हा लोकानुभवही त्यास सहन न होऊन उष्णतामापक यंत्रानें तो चंद्रकिरणांची उष्णता काढतो !!—झालें ! याप्रमाणें कविपरंपरेनें उभारलेल्या सुंदर मंदिराचा हा कविप्रतिपक्षी आपल्या दुर्बिणीनें व उष्णतामापक यंत्रानें समूळ विध्वंस करून सर्व सृष्टि उजाड करून सोडतो. वरील उताऱ्यांत कवितेस चांदण्याची व विचारशक्तीस कडक उनाची जी उपमा जयदेवानें

दिली आहे तीही मोठी सरस व समर्पक होय. एकतर चांदणें शांत व रमणीय असतें; आणि ऊन उपयोगाचें खरें, पण त्याची झळई कोणास आवडत नाहीं. तसेंच कविता समजण्यास सोपी असते, मनाचें रंजन करते, आणि मनास शांति देते; पण शास्त्रावरील ग्रंथ अगोदर दुर्बोध व समजल्या-वरही त्यांपासून मनास प्रगल्भता येते, त्याचें रंजन होत नाहीं; आणि वादाचे ग्रंथ असले तर त्यांपासून चित्तवृत्ति शांत न होतां उलटी क्षुब्धच होते. हें एक सादृश्य. दुसरें सादृश्य हें कीं, चांदण्यांत पदार्थ स्पष्ट न दिसल्यामुळें कल्पनाशक्तीस अवकाश सांपडून अवास्तव भासांत रंगण्यास मनास सांपडतें; पण कडकडीत उनांत पदार्थ अगदींच स्पष्ट दिसल्यामुळें कल्पनेस सवडच न सांपडून त्यांचें वास्तविक स्वरूप सहज दृष्टिगोचर होण्यासारखें असतें. हीच गोष्ट कल्पनेच्या द्वारें झालेल्या ज्ञानास व बुद्धीच्या द्वारें झालेल्या ज्ञानास यथानुक्रम लागते.

४. वरील उपपादनावरून दुसरी अशीही गोष्ट आमच्या सुज्ञ वाच-कांच्या लक्षांत येईल कीं, बुद्धीची प्रगल्भता ही कल्पनाविकासाच्या पुढली मनाची दशा होय;—म्हणजे आरंभीं कल्पनेचा विकास होऊं लागून त्यापुढें बुद्धि विकास पावूं लागते. या गोष्टीचा अनुभव फार थोडक्यांत आहे. लहानपणीं मुलांस खुळखुळ्याची, दिव्याच्या ज्योतीची, चांदोबाची जी मौज वाटत असते, तिचें बीज हेंच होय कीं, त्या वेळेस त्यांची कल्पना-शक्ति हळू हळू विकास पावूं लागत असते. त्यांस भूताखेतांच्या, राक्ष-सांच्या गोष्टींची फार मजा वाटते. काळोखांत जाण्यास तीं फार भितात याचें तरी कारण हेंच,—कीं त्यांची कल्पना मोठी जागृत असून विचार-शक्ति बहुधा निद्रिस्त असते. पण पुढें जसजसें त्यांस कळूं लागतें, तसतसा हा गोष्टवेल्हाळपणा कमी कमी होत जाऊन सारासारविचार म्हणजे तथ्य कशांत आहे, कशांत नाहीं वगैरे विवेचन तीं करूं लागतात. पुष्कळांस स्वत:च्या अनुभवावरून आठवत असेल कीं, लहानपणीं इसापनीतींतील गोष्टींची फारच मौज वाटून तात्पर्य वाचतांना डोकें उठे; पण तो कल्प-नेचा काळ जाऊन त्यापुढील दशा मनावर येऊं लागल्यामुळें हल्लीं वरच्या वरुद्ध अनुभव येतो;—म्हणजे गोष्टींपेक्षां तात्पर्यावर विशेष नजर असते ! असो; आतां हा प्रकार प्रत्येक व्यक्तिभूत मनुष्यांत जसा आढळतो, तसाच

पण एकंदर राष्ट्रांतही आढळतो. पहा, सर्व लोकांत अगदीं पहिले ग्रंथ[1] म्हटले म्हणजे कवितेचे असतात; आणि हे केवळ अनुक्रमानेंच पहिले असतात असें नव्हे, तर योग्यतेनेंही अग्रगण्य असतात. या दोन्ही गोष्टींचें कारण अर्थात् हेंच कीं, त्या अप्रबुद्धतेच्या काळीं कल्पनाशक्ति जशी उद्दाम आणि अनावर असते, तशी पुढें कधींही असत नाहीं. विद्वत्ता म्हणजे सर्व गुणांचें निधान मानणाऱ्या लोकांस होमर किंवा वाल्मीकि, व्यास यांसारखे पुढें कवि झाले नाहींत या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटत असेल ! पण असें होण्याचें कारण वर जें सांगितलें आहे तें लक्षांत आणलें असतां विस्मयास मुळींच जागा राहणार नाहीं तें मन्वंतर निराळें होतें आणि आतांचें निराळें आहे. त्या काळीं कल्पनेचेंच बहुधा प्रावल्य असल्यामुळें तसले जगद्वंद्य काव्यग्रंथ त्या वेळीं निर्माण झाले. पण आतां कल्पना जाऊन तिच्या जागीं विवेचनशक्तीचा जोर दिवसांदिवस होत चालल्यामुळें तें सामर्थ्य गेलें, आणि नानाविध शास्त्रांचा प्रादुर्भाव झाला. अंतरालांत काय काय चमत्कार आहेत, पृथ्वीच्या पोटांतील रचना कसकशी आहे, मनोवृत्तीचे व्यापार कोणकोणत्या नियमांनीं चालतात, वगैरे गोष्टींच्या शोधाकडे आलीकडे लोकांच्या मनाची प्रवृत्ति झाली. पहिला काळ वसंतमासांप्रमाणें पालवीचा, मोहोराचा व फुलाचा होय; आणि हा पुढील शरन्मासाप्रमाणें फलधान्यसमृद्धीचा होय. तेव्हां दोहोंचें एकाधिकरणत्व म्हणजे एके ठिकाणीं असणें वस्तुगत्याच शक्य नव्हे !

५. या सर्व गोष्टींचा यथास्थित विचार केला असतां ' सुधारणा कवितेस प्रतिकूळ होय, ' ' तिची वाढ सज्ञानतेच्या काळीं खुंटते ' वगैरे संकृत् दर्शनीं विलक्षण दिसणाऱ्या वाक्यांचा अर्थ आमच्या वाचकांच्या नीट लक्षांत येऊन त्यांची सत्यता त्यांच्या मनावर चांगली ठसेल. असो; आतां कवीचें लक्षण काय, त्याच्या अंगीं कोणते गुण प्राधान्येंकरून पाहिजेत, कोणते गौणत्वेंकरून हवेत, याविषयीं विचार करूं. तेणेंकरून प्रस्तुत विषयाची विशेष फोड होईल.

---

१. हा शब्द येथें ' पुस्तक ' या अर्थीं योजला नाहीं; तर त्याचा मूळचा अर्थ–'जुळलेला मजकूर' हाच घ्यावयाचा. वेदांच्या वेळेस किंवा होमरच्या वेळेस लेखनकला होती कीं नाहीं,या भानगडींत पडण्याची येथें जरूर नाहीं

६. ' कवि ' शब्दाचा धात्वर्थ पाहिला तर ' गाणारा[1] ' असा आहे. हा आलीकडच्या काळीं अर्थातच नेहमीं लागू पडेल असें नाहीं; कारण गाणें हें निराळें कसवच होऊन बसलें आहे. पण प्राचीन काळीं सर्व देशांत व अजूनही तशी स्थिति जेथें असेल तेथें कवि हेच गाणारे व वाजवणारे असत. संस्कृत नाटकांतून हा पूर्वीचा प्रकार दाखविलेला असतो. राजांपाशीं स्तुतिपाठक असत, त्यांस नाटकाच्या परिभाषेंत ' वैतालिक ' म्हणत, आणि येरवीं 'बंदीजन' ही म्हणत. दैत्यगुरु शुक्राचार्यास याच कारणास्तव 'कवि' 'काव्य' हीं नांवें होतीं. ग्रीक लोकांत ' ऱ्हापसोडिस्ट्स् (Rhapsodists) नांवाचे लोक असत, त्यांचा धंदा होमर वगैरे प्राचीन सर्वमान्य कवींचीं काव्यें गाऊन व वाद्यांवर वाजवून तोंडपाठ म्हणावीं हा असे. हे काव्यपाठक कोणी कोणी स्वत:ही काव्यें रचीत. असो; याप्रमाणें लेखनकला त्या वेळीं नसतांही आपल्या वेदांप्रमाणें तीं काव्यें पठकपरंपरेनें त्या लोकांत राहिलीं. असो; ही गोष्ट प्राचीन काळची झाली. पण इतकेंही लांब जाण्याची गरज नाहीं. हा प्रकार सध्यांही इकडच्या प्रांतीं नुसता दृष्टीस पडत असे. पेशव्यांच्या वेळेस लावण्या, पवाडे या छंदावर शाईर कवनें रचून आपणच गात; व त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्या वेळीं त्यांची संभावना होत असे. ही कविता अजूनहि पठकपरंपरेनें आपणांत राहिली आहे. ही छापून ठार बुडूं न देणें हें देशाभिमानी लोकांस मोठें भूषणास्पद होईल आणि असें केल्यानें भाषाभिज्ञांवर व रसिकांवरही लहान उपकार होईलसें नाहीं. असो; तेव्हां या रीतीनें ' कवि ' शब्दाची आपल्या देशांत रूढि झाली. इंग्रेजी भाषेंत एतदर्थवाचक जो शब्द आहे त्याचा अर्थ 'करणारा[2]' असा होतो यास्तव कवि म्हणजे कल्पनासृष्टि बनवणारा असा त्या भाषेंतला मूळचा अर्थ होय असें सामान्यत: लोक समजतात. पण येवढा खोल अर्थ त्या अडाणी लोकांच्या मनांत प्रथमत: आला असेल असें आम्हांस वाटत नाहीं. तर आपल्या ' कवि ' शब्दाप्रमाणेंच ' करणारा ' म्हणजे ' पद्यें जुळणारा ' इतकाच अर्थ त्या वेळीं मूळचा असेल हें मानणें आमच्या मतें अधिक सयुक्तिक होय. असो; येथवर नुसत्या शब्दाची व्याख्या झाली. आतां कवीस अवश्य गुण कोणते पाहिजेत वगैरे गोष्टींविषयीं विचार करूं.

---

१ कु —' गायन करणें '

२. Poet·poeo ' I make '

७. कवीच्या अंगीं मुख्य गुण सहृदयता पाहिजे---म्हणजे हृदयाच्या शृंगारवीरकरुणादि ज्या नानाविध वृत्ति त्या त्यास अत्यंत सूक्ष्मत्वानें व स्पष्टत्वानें भासल्या पाहिजेत. वरील निरनिराळ्या वृत्तींचा विषय इंद्रिय-गोचर होतांच कवीचें मन क्षुब्ध होऊन जातें, आणि त्या खळाळीसरसे जे उद्गार आपोआप निघून जातात तेच खरी व अस्सल कविता होत.[1] याचें अत्युत्कृष्ट उदाहरण आपल्या आद्यकवीचा क्रौंचवधनिमित्तक करुणोद्गार होय हें आमच्या वाचकांस मागील अंकावरून आठवेलच ! तसेंच मराठी कवितेंत पाहतां असे उत्कृष्ट मासले विशेषेंकरून तुकारामाचेचें अभंग होत हेंही सर्वांच्या ध्यानांत येईल. हा कवि मनाचा मोठा प्रेमळ, साधा, मोकळा व थोर असल्यामुळें कोणत्याही प्रसंगाचे त्याचे अभंग असोत, त्यांत तो तो रस जसा काय भरपूर भरलेला असतो; व म्हणूनच ते आपल्या लोकांस आज दोन अडीचशें वर्षें येवढे प्रिय होऊन राहिले आहेत; आणि जोंपर्यंत त्यांचा आधार जी मराठी भाषा ती या जगांत राहील तोंपर्यंत आपल्या नांवाप्रमाणें ते खरोखरच 'अभंग' राहणारे आहेत. असो; तेव्हां निरनिराळ्या वृत्ति पूर्णपणें ज्यांत प्रतिबिंबित होतील असें अंत:करण कवीचें अमायास पाहिजे; म्हणजे सहृदयता हें कवित्वाचें मुख्य लक्षण होय. हें ज्याच्या ठायीं वसत नाही त्याची बुद्धि कितीही प्रचंड असली तरी ती त्यास या ठिकाणीं अगदीं कामास पडायाची नाहीं. अशा विषयींचीं उदाहरणें आपल्या देशांतली देणें अशक्य होय; कां कीं, आपल्या प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रथकाराची माहितीच आपणांपाशीं मुळींच नाहीं म्हटलें असतां चालेल. यास्तव दुसऱ्या देशांतील उदाहरणें सांगणें अवश्य आहे. प्राचीन रोमन लोकांत सिसरो म्हणून एक महावक्ता होऊन गेला हे आमच्या मराठी वाचकांसही बहुधा विदित असेलच. हा सिसरो सांस्थानिक कामांतही मोठा हुशार असून शिवाय महाविद्वानही होता. यानें क्याटिलैनच्या वंडाचा मोड करून रोम शहर बचावलें, व एकंदर राज्यही त्यानें त्या संकटसमयीं वांचविलें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच यानें ल्याटिन भोषेंत शेंकडों मोठमोठे ग्रंथ रचून ठेवले होते; पण त्यांचा एक विसांश मात्र आतां

---

१. वर्डस्वर्थ नामक इंग्रेजी कवीनें असें कवित्वाचें लक्षण केलें आहे:—
"Poetry is the spontaneous overflow of powerful feelings."—

उरला आहे. असो; पण सागायाचें काय कीं हा येवढा नामांकित विद्वान् व शिवाय वक्ता असतांही, याची कविता इतकी भिकार आहे कीं तिला तें नांव सुद्धां शोभत नाहीं ! त्याला मात्र स्वाभिमानास्तव तिची योग्यता मोठी वाटे. पण बाकी सर्वांस ती आजपर्यंत अगदीं नादान वाटत आली आहे ! हें उदाहरण मोठें म्हणून आम्हीं येथें एकच घेतलें. दुसरींही अशीं पुष्कळ आहेत; पण तीं सर्व येथें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. आतां दुसऱ्या देशांतील कांहीं थोडीं सांगतों. जॉनसन्, पोप, ड्रायडन् हे ग्रंथकार केवढे थोर होऊन गेले हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. यांपैकीं शेवटल्या दोघांनीं तर आप-आपला सारा जन्म कविता लिहिण्यांतच घालविला; व तिघेही आपआपल्या काळीं बाकीच्या कवींत अग्रगण्य होते. पण आतां यांस फारसा मान नाहीं; कोणी कोणी तर हे मुळींच कवि नव्हेत असें सुद्धां म्हणायास भीत नाहींत ! बरें तर, हीं सर्व उदाहरणें महाविद्वान् असून मुळींच कवि नसणारांचीं—किंवा निदान महाकवि नसणारांचीं—झालीं. पण इतकेंच नव्हे, याहूनही चमत्काराची एक गोष्ट वारंवार आढळण्यांत येते, ती ही कीं, समयविशेषें-करून खऱ्या कवीचें सुद्धां कवित्व कमीजास्त होते;—म्हणजे एखादें काव्य एखाद्या वेळीं उत्कृष्ट साधून जातें, पण दुसऱ्या वेळीं कांहीं केल्या तसें उतरत नाहीं. मिल्टन् कवीनें आपणाविषयीं असें लिहिलें आहे कीं, माझी प्रतिभा वर्षाच्या कांहीं महिन्यांत विशेष उज्ज्वल असे, व या धोरणा-वर तो काव्यरचना करीत असे. पोपविषयीं जॉनसन् यानें असें लिहिलें आहे कीं, यानें वीस वर्षांचा असतां जितकी उत्कृष्ट कविता केली त्याहून वरचढ अशी पुढें त्यास साधलीच नाहीं. त्याप्रमाणें वैरन् यानेंही पंचवीस तीस वर्षांच्या वयांत जी कविता रचिली ती फारच उत्कृष्ट उतरली; तशी त्यास पुढें साधली नाहीं, इतकेंच नव्हे, तर ती पहिलीच्या मानानें पुष्कळच हलकी ठरली. असो; तेव्हां या सर्व गोष्टींवरून काय बरें स्पष्ट दिसतें ? अर्थात् हेंच कीं, कवित्वाचें तत्व सहृदयता होय. ही ग्रंथांत जशी कमी-जास्त असते, त्याप्रमाणें त्या ग्रंथास काव्यत्व येतें, आणि ही आपल्या अंगीं बळेंच आणूं जातां येणारी नव्हे हें तर काय, पण ती आपले ठायीं असतांही नेहमीं आटोक्यांत राहणारी नव्हे !

८. तेव्हां इतर मनुष्यांत व कवींत मुख्य विशेष म्हणून हाच कीं,

कवीच्या ठायीं सहृदयता अत्यंत असते. ही येवढी मुद्याची गोष्ट नीट ध्यानांत धरली असतां हा विषय सर्वांस अगदीं उघड होईल. पहा कीं, ही सहृदयता म्हणजे अंत:करणाचा कोमलपणा तरुण वयांत मनुष्यास फार असतो, व तसाच अर्थात् अज्ञानावस्थेंत असणाऱ्या राष्ट्रांतही फार असतो; म्हणूनच लहान वयांत अंत:करणवृत्ति सुक्षोभ असून नाटकें, कादंबऱ्या, काव्यें, अशा ग्रंथांचा अतोनात नाद लागतो, आणि राष्ट्राच्याही आद्यावस्थेंत उत्कृष्ट कविता उदयास पावते. पण या सौम्य वृत्ति मनुष्यांत व राष्ट्रांत प्रौढ वयाच्या सुमारास मावळू लागून शेवटीं बहुधा अगदींच नाहींशा होतात, व त्या त्याप्रमाणें विचारशक्तीचें प्राबल्य होत जाऊन कवित्वाचा ऱ्हास होतो. त्या मूळच्या साध्या काळांत झालेल्या कवीस दुसरी सोय ही होती कीं, सृष्टीच्या व मानवी स्वभावाच्या केवळ मूळच्या स्वरूपाशीं त्यांचा नेहमीं परिचय असे. आतांप्रमाणें दोहोंवर त्या काळीं कृत्रिमता आली नव्हती. यास्तव दोहोंची प्रतिमा त्यांच्या विशद मनावर जशी काय सहज जाऊन ठसून ती वर्णनद्वारां त्यांच्या ग्रंथांत प्रगट झाली. पण पुढील कवींच्या मनावर ती अर्थात्च पहिल्यांच्या प्रमाणें यथास्थित न उठल्यामुळें स्वभाववर्णन त्यांस पहिल्यासारखें साधलें नाहीं. असें होतां होतां शेवटीं तर स्वभाववर्णन अगदींच सुटून कविता केवळ सामान्य व्यावहारिक कलेप्रमाणें गणमात्रा जुळण्याचेंच काम होऊन बसली. पहिले कवि स्वानुभूत गोष्टीचें व मनोवृत्तींचें वर्णन करीत; पण पुढील काळीं कीर्तीच्या किंवा पैशाच्या लोभास्तव जेव्हां काव्यें रचण्याचा प्रघात पडला, व कविता करणें हा एक धंदा झाला, तेव्हां स्वानुभव हा कवींस नकोसाच झाला. कवितेस सहृदयत्वापेक्षां बुद्धीची व मेहनतीचीच विशेष गरज लागूं लागली. म्हणजे आधींच्या कवितेचें जें साधें अर्थसौंदर्य तें जाऊन त्याच्या जागीं मोठमोठीं मजेदार वृत्तें, पदांचें लालित्य व माधुर्य, अर्थालंकार, शब्दालंकार, असा थाटमाट हळू हळू आला. जे पदार्थ, जे सृष्टि-चमत्कार कधीं यावज्जन्म पाहिले नाहींत, ज्या मनाच्या वृत्ति किंवा जे अंत:करणाचे विकार कधींही साक्षात् अनुभवास आले नाहींत, किंबहुना येण्याची योग्यताही नाहीं, त्यांवरही या पुढील कवींनीं धाड घालून त्यांचें वर्णन आपल्या ग्रंथांतून आणलें आहे. हें एक असो, पण याहून उपहासास्पद गोष्ट काय कीं, जे

सृष्टींतील पदार्थ सहज पाहण्यासारखे असतात त्यांचेंही वर्णन यांनीं यथावत् केलेलें नसतें. होमरच्या 'इलियड' नामक जगन्मान्य काव्याचें पोप कवीनें इंग्रजींत भाषांतर केलें. त्यांतील आठव्या सर्गाच्या शेवटीं चांदण्या रात्रीचें वर्णन आहे. तें इंग्रेजींत इतकें चुकलेलें आहे कीं, मेकॉलेच्या मतें, 'त्यांत जितक्या चुका आहेत तितक्या साऱ्या 'इलियडां'त सांपडावयाच्या नाहींत. तसेंच ड्रायजन यानें एका नाटकांत एके प्रसंगीं रात्रीचें[२] वर्णन केलें आहे; त्याची मागें मोठी वाहवा होती, व तसें वर्णन कोणत्याही कवीस साधलें नाहीं असे जॉनसन्सारख्या महारसिकाचें मत होतें. पण तेंच आतां 'अप्रयोजक, व आंत शब्दगौरव मात्र मोठें

१. तें वर्णन येणेंप्रमाणें:—

As when the moon, refulgent lamp of night,
O'er heaven's clear azure spreads her sacred light.
When not a breath disturbs the deep serene,
And not a cloud o'ercasts the solemn scene.
Around her throne the vivid planets roll,
And stars unnumbered gild the glowing pole,
O'er the dark trees a yellower verdure shed,
And tip with silver every mountain's head;
Then shine the dales, the rocks in prospect rise,
A flood of glory bursts from all the skies;
The conscio us swains, rejoicing in the sight,
Eye the blue vault, and bless the useful light.

२. तें हें:—

All things are hushed as Nature's self lay dead,
The mountins seem to nod their drowsy head.
The little birds in dreams their songs repeat.
And sleeping flowers beneath the night-dew sweat,
Even Lust and Envy sleep; yet Love denies,
Rest to my soul, and slumber to my eyes.

Indian Emperor

('These lines are vague, bombastic and senseless'—Wordsworth)

असून अर्थशून्य ' असें ठरलें आहे. पुढील संस्कृत कवीचीं वर्णनेंही जीं इतकीं नीरस उतरली आहेत त्याचें तरी कारण हेंच. एकदां अनादिसिद्ध ज्या उपमा ठरून गेल्या, जे कविसंकेत एकदांचे कायम बसून गेले, त्यांचीच पुनरुक्ति, किंवा स्वत:च्या वेडयावांकडया अत्युक्तिरूप विलक्षण कल्पना ग्रंथीं त्यांच्या कृति भरलेल्या असतात. बाह्यसृष्टीचें किंवा अंत:-सृष्टीचें अवलोकन म्हणजे काय हें या बिचाऱ्यांच्या कधीं स्वप्नींही आलें नसेल ! जुन्या कवींनीं केलेल्या वर्णनांवरून सरासरी आपलीं वर्णनें बनवायाचीं, मग तीं कशीं चांगलीं उतरावीं ? अगोदर मोठमोठया कवींनीं केलेलीं वर्णनेंहि हुबेहूब उतरत नाहींत,--म्हणजे ते ते पदार्थ प्रत्यक्ष पाहून जी कल्पना मनांत भरते ती नुसत्या वर्णनांवरून कधींही भरत नाहीं. मग या वर्णनावरूनच जीं प्रतिवर्णनें उतरायाचीं त्यांच्यांत तथ्य व रस कितपत राहील ! अर्थात् छायेच्या प्रतिछायेंत व मूळच्या रूपांत जितपत अंतर तितपतच त्या दोहोंत[१] ! अशा प्रतिकवींचीं वर्णनें म्हणजे जन्मांधानें जसें वनश्रीचें वर्णन करावें, किंवा दुसऱ्या एका तऱ्हेच्या मनुष्यानें शृंगार वर्णावा, त्याप्रमाणेंच सर्वथा हास्यास्पद होत.

१. तेव्हां जुन्या कवींचीं काव्यें येवढी उत्कृष्ट उतरण्याचीं हीं कारणें होत. एक तर त्या काळीं कल्पनेचें मोठें प्राबल्य असल्यामुळें तें त्यांच्या कवित्वास अत्यंत पोषक झालें, दुसरें, बाह्यसृष्टीचें मूळचें शुद्ध स्वरूप त्यांच्या नेहमीं दृष्टीस पडल्यामुळें त्यांच्या कृत्रिमसंस्काररहित शुद्ध मनावर ' रंग: शुक्लपटे यथा ' (जसा पांढऱ्या स्वच्छ कापडावर रंग) या न्यायानें त्यांचा ठसा सहजपणें पूर्ण उमटला; तसेंच तिसरेंही कारण अर्थात् हें कीं, त्या कवींच्या मनोवृत्ति व हृदयवृत्ति केवळ स्वानुभूत असल्यामुळें त्यांचा

१. छायेच्या प्रतिच्छायेचें उदाहरण सृष्टींत दृष्टिगोचर होणारें एक मोठें आहे:--तें चंद्राची कोर दिसत असतां अवशिष्ट बिंबावर जो प्रकाश दिसतो तो होय. सूर्याचा पृथ्वीवरील प्रकाश चंद्रबिंबावर परावर्तन पावून त्याचें पुन: पृथ्वीवर परावर्तन झाल्यानें वरील अंधुक प्रकाश दिसतो --हा दृष्टान्त मूळच्या अनुभवसिद्ध वर्णनांत व वर्णनाच्या प्रतिवर्णनांत किती भेद होतो हें दाखविण्यास उपयोगी पडेल !

आविर्भाव तसाच यथास्थित व स्पष्ट त्यांच्या ग्रंथांत झाला. पदार्थविज्ञानांत सांगितलेला पाण्याचा धर्म सर्वांस माहीतच असेल कीं, तें जितक्या उंचीवर मूळचें असतें तेथपर्यंतच तें चढतें. हाच नियम अंतःकरण-वृत्तींसही लागतो. ज्या वृत्ति हृदयासच अगोदर भासल्या नाहींत त्यांचें वाग्द्वारां वर्णनही अगदीं रसशून्य उतरल्यास काय नवल ? ज्यानें वियोग-दुःख कधीं अनुभविलें नाहीं त्यानें पुत्रशोकादिकांचें वर्णन केल्यास, ज्याचा काळ नेहमीं ऐषआरामींत जाणार त्यानें युद्धादि प्रसंग वर्णिल्यास, वसंतांतली गार झुळूक घेणारानें समुद्रावरील तुफानाचें वर्णन करूं गेल्यास तें किती उत्कृष्ट उतरेल हें कोणी सांगेल ! ज्यानें पर्वतीहून मोठा डोंगर पाहिला नाहीं त्यानें हिमालयाचें वर्णन करूं जाणें, ज्यानें मुळामुठाच काय त्या मोठचा नद्या पाहिल्या त्यानें गंगायमुनांसारख्या महानद्यांच्या वर्णनास हात घालणें, म्हणजे भांबुरडयावरून लंडन शहराची कल्पना बांधणें होय ! असो; तेव्हां वर्णावयाच्या गोष्टींचा साक्षात् अनुभव कवीस अगदीं अवश्य पाहिजे.

१०. कवीस प्राधान्येंकरून ज्या गोष्टी पाहिजेत त्या त्या वर सांगितल्या. यांखेरीज बाकीच्या ज्या राहिल्या—म्हणजे पदलालित्य, मृदुत्व, माधुर्य, सरळ अन्वय, व्याकरणशुद्धता, छंदांची निर्दोष व्यवस्था, इत्यादि —त्या एके रीतीनें गौणच होत. या नसल्यानें काव्याची शोभा कमी होते खरी, पण याच नुसत्या असल्यानें ती येते असेंही नाहीं. दुसरें असें कीं, अगदीं सुमारवट बुद्धीच्या मनुष्यासही हे गौण काव्यगुण साधण्या सारखे आहेत, पण वरील तसे नव्हेत. ते पुष्कळ अंशीं मूळचेच अंगीं वसले पाहिजेत, व कांही अंशीं स्थितिविशेष व प्रसंगविशेष यांच्या योगानें त्यांचा उत्कर्ष व्हावयास पाहिजे. आरंभींच्या मोठमोठ्या कवींचीं काव्यें पाहिलीं, तर त्यांत वरील पदलालित्यादि गुण फारसे सांपडणार नाहींत. 'रामायणा'चा छंद येथून तेथून एक अनुष्टुप आहे, व शब्दांच्या रचनेकडे वगैरे त्यांत विशेष लक्ष अगदींच दिलेलें आढळत नाहीं. 'महाभारतां'तही तोच प्रकार. त्यांत मधून मधून मोठालें छंद कोठें कोठें आहेत, पण त्यांत छंदोभंगादि दोष हवे तितके आहेत. तिसरें प्रसिद्ध पुराण जें 'भागवत' यांत मात्र मोठाले छंद, अलंकार वगैरे सांपडतात; व यास्तव तें अर्वाचीन

आहे असें पंडितांचें मत आहे. इंग्लिश लोकांच्या अभिमानाचें परम स्थान होऊन बसलेला जो शेक्सपीयर–कीं जो इंग्लंडचा कवि नव्हे, तर साऱ्या मनुष्यजातीचा होय,[1] असें युरोपांतील पंडित म्हणतात—त्याचे ग्रंथही याच सदराखालीं मोडतात. या वोवांनीं तर कोणत्या दोषास म्हणजे आपल्या अजरामर कृतींत थारा दिला नाहीं असें प्रायः आढळणार नाहीं !—एकवचनी क्रियापद बहुवचनांत कर्त्याशीं जोडलें तर आहे; वोहेमिया देशास बेट करून त्याच्या किनाऱ्यावर जहाज तर उतरविलें आहे; ट्रोजन लोकांच्या हेक्टर नामक वीराकडून शेंकडों वर्षें पुढें झालेल्या आरिस्टॉटलचें एके प्रसंगीं वचन तर म्हणविलें आहे;—याप्रमाणें या वाग्देवतेच्या लालाचीही थोडीशी लीला वर्णन केली[2] ! वरें, माधुर्य, मार्दव, प्रसाद वगैरे इतर गुण जर कोणी पाहूं लागले, तर यासंबंधेंही शेक्सपीयरच्या ग्रंथांत त्याचें समाधान होईलसें आम्हांस वाटत नाहीं. या कवीच्या पुढल्या काळीं—म्हणजे ड्रायडन्, पोप, जॉनसन् यांच्या वेळीं—तर वरच्या उलट गुण, म्हणजे कार्कश्य, क्लिष्टत्व यांस्तव यास कोणीच

---

१ या म्हणण्याचा अर्थ असा कीं असे पुरुष फार विरळा होतात. असे लाल केव्हां केव्हां प्रगट करून ईश्वर आपली विभूति दाखवितो. यास्तव अमुकच देशांत ते जन्मास आले ही केवळ साहजिकच गोष्ट असून तीबद्दल याच देशविशेषास गर्वाचें कारण नाहीं; कां तर ती कृपा एकंदर मानवजातीवर झाली असें समजायाचें.

२. व्याकरणदोषाचें फार प्रसिद्ध उदाहरण '**जुलियस् सीझर**' नाटकांत आहे—' There *is tears* for his love '—प्रस्तुत कवीच्या भूगोलज्ञानाविषयीं **जॉनसन्** एके ठिकाणीं टिपेंत म्हणतो—' Our author seldom escapes well when he is entangled in Geography !' (' आपले कवि भूगोलाच्या जाळ्यांत अडकले असतां बहुधा बरेपणीं निभावत नाहीं ! ')—**आरिस्टॉटल् शिकंदर** बादशहाचा गुरु होता ही गोष्ट आमच्या वाचकांस बहुधा विदित असेलच. यास्तव या तत्ववेत्त्याचें वाक्य हेक्टरानें आपल्या भाषणांत आणणें म्हणजे भीमानें **कालिदासाचा** श्लोक म्हणण्याप्रमाणें हास्यास्पद आहे ! !

विचारीत नसे; व आतां जरी हा कवि येवढा लोकप्रिय होऊन गेला आहे तरी दुर्बोध अर्थाचीं याच्या नाटचांत पुष्कळ स्थळें आहेत हें हवें त्यास सहज दिसून येईल. पण येवढयानेंच झालें नाही. आणखीही दोन मोठाले दोष या कविशिरोमणींच्या माथीं मारले पाहिजेत. एक श्लेपयोजनेची अतोनात हौस, आणि दुसरा दोष अश्लीलत्व. जॉनसन् यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'श्लेपाची संधि सांपडली असतां ती आपल्या कवीस कधीं फुकट दवडवत नाहीं[1].' तसेंच अश्लीलत्व म्हणजे चावटपणा. हा शेक्सपीयरच्या मोठमोठ्या नाटकांतूनही खुशाल उघडपणें मोठमोठ्या पात्रांनीं सुद्धां केलेला असतो. याचा प्रत्यय आमच्या मराठी वाचकांस घेणें असेल तर त्यांनी कैलासवासी महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं केलेलें 'अथेल्लो' चें भाषांतर पाहावें. तें पाहिलें असतां आमच्या कांहीं संस्कृत कवींच्या शृंगार-वर्णनाच्या योगानें अंगावर शहारा आणणाऱ्या[2] डॉक्टर हाल् प्रभृति सोंवळ्या साहेबांच्या ढोंगाचा आमच्या लोकांस चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं! असो, या वादाच्या संबंधानें एका थोर निष्पक्षपात इंग्रेज ग्रंथकाराचा अभिप्राय येथें दाखवून हें प्रकरण संपवितों. शेक्सपीयर कवीनें कांहीं लहान काव्येंही लिहिलीं आहेत, त्यांस उद्देशून हालम् साहेबांनीं म्हटलें आहे कीं, हे ग्रंथ या कविच्या विशाल कीर्तीस कलंकरूप होत; हे यानें लिहिलें नसते तर बरें होतें. असो, पण या सर्वांपेक्षांही अधिक सदोष कविता पाहणें असल्यास आमची मराठी होय, तींतील बहुतेक कवींस व्याकरणाची, छंदांचीं वगैरे ओळख सुध्दां नव्हती असें म्हणण्यास हरकत नाहीं; मग पदलालित्य, अर्थगांभीर्य वगैरे काव्यगुणाची तर गोष्टच नको? प्रसाद हा गुणही त्यांच्या कवितेंत सर्वत्र आढळतोच असाही नेम नाहीं. या सर्व कवींत वामन पंडित मोठा विद्वान् होता म्हणून लौकिक आहे; पण या कवीचेंही पांडित्य त्याच्या

१. Our author can never resist the temptation of a pun.

२. हे साहेब दहापंधरा वर्षांमागें कलकत्त्याकडे विद्यागुरु होते. यांनीं सुबंधु कवीच्या 'वासवदत्ते' चें प्रकाशन केलें, या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत या साहेबांनीं संस्कृत कवींवर व एकंदर हिंदु लोकांवर मोठा कडाका उडविला आहे यासंबंधानें शालापत्रक, पुस्तक १३ अंक ८ वाचकांनीं पाहावा.

काव्यांत चांगलेंसें दिसत नाहीं. अर्थ पुष्कळ ठिकाणीं क्लिष्ट ३ सून शिवाय पदरचनेविषयींही पंडितांनीं मोठीशी खटपट केलेली कोठेंही नजरेस येत नाहीं. असो; तेव्हां एकंदर सिद्ध काय करायाचें कीं, हे पदलालित्यादि गुण काव्यास शोभादायक खरे, पण ते काव्याचे सर्वस्व नव्हेत. त्यांचा बहुधा अभावच असतांही जगास ज्यांचे ग्रंथ चिरकाळ मान्य होऊन राहिले आहेत अशा महाकवींचीं वर उदाहरणें सांगितलीं त्यांवरून पूर्वोक्त गुण केवळ गौण होत हें आमच्या वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

११ पण ते गौण आहेत म्हणून त्यांची गरज नाहीं असा अर्थ समजायाचा नाहीं. केवळ त्यांच्याच योगानें ग्रंथास काव्यत्व येणार नाहीं हें खरें पण सत्काव्याशीं जर त्यांचा योग झाला तर ते त्याचें रमणीयत्व फारच वाढवितील यांत तिळमात्रही संदेह नाहीं. याशिवायही काव्याचें सौंदर्य भासणें, किंवहुना एतद्विरूद्ध दोषांनीं ग्रस्त झालेल्या ग्रंथांतही कवित्वाची लकेर उमगणें, हें महारसिकांशिवाय दुसऱ्यांचें सामर्थ्य नव्हे; पण सामान्य जनांस जर रमविणें असेल तर रत्न जसें कोंदणांत बसवायाचें, तसेंच काव्यास वर सांगितलेल्या साधनांचा अवश्य उपयोग करून घेतला पाहिजे. हाच प्रकार व्हर्जिल् वगैरे ल्याटिन व कालिदासादि संस्कृत कवींच्या ग्रंथांतून आहे. व म्हणूनच त्यांचीं काव्यें मोठ्या मार्मिक रसिकांस जशीं रिझवितात तशीच सामान्यजनांसही आजपर्यंत आनंद देत आलीं आहेत.

१२. याप्रमाणें कवीस प्राधान्येंकरून कोणते व गौणत्वेंकरून कोणवे गुण अवश्य हवेत याविषयीं बरेंच लांब विवरण झालें. हें यथास्थित ज्यांच्या मनांत भरलें असेल त्यांस प्रस्तुत विषयाचा तेव्हांच उलगडा पाडतां येईल. तो असा कीं, प्रधान जे गुण आहेत—म्हणजे सहृदयता व तज्जन्य स्वभाववर्णन करण्याची शक्ति—हीं शेंकडों ग्रंथांचें अध्ययन करून त्यांचें ज्यानें पीठ करून सोडलें व मोठा वादचंचु किंवा महान् ग्रंथकार झाला त्यास सुद्धां त्याच्या विद्वत्तेच्या योगानें लेशमात्रहि येणार नाहींत. मोठा मोठा विद्वान् झाला तरी जसा मनुष्य चित्रकलेंत किंवा गायन अथवा वादनकलेंत निपुण झालाच असें होत नाहीं, तशीच गोष्ट कवित्वाची होय रत्नपारख्याची जशी एका प्रकारची नजर असते, ती शिकवून येणारी नव्हे, व तशीच चित्रकलेचें किंवा वादनकलेचें मर्म समजण्याची शक्ति जशी एकाद्याचेच ठायीं ईश्वरानें ठेविली असते; तशीच कवितेचीही

गोष्ट आहे. पण इतकेंच नव्हे, अशा प्रचंड पंडितांस जातीनें कविता करतां येणार नाहीं हें तर आहेच; पण शिवाय तिची परीक्षा किंवा आस्वादन हेही त्यास नियमानें शक्य असेलच असेंहि म्हणवणार नाहीं. याचीं उदाहरणें, इंग्लंडांत मागल्या शतकांत होऊन गेलेला जॉनसन् हा कांहीं अंशीं होय, व इकडे आलीकडील आपले जुने शास्त्री प्रायः सर्वथा होत. बाह्यसृष्टीचें वर्णन कर्तव्य असतां तो प्रदेश घटकाभर प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिला असतां जी त्याविषयीं मनांत कल्पना भरेल ती जशी नकाशावरून किंवा वर्णनांवरून पुष्कळ दिवस अभ्यास केल्यानेंहि येणारी नव्हे; त्याप्रमाणेंच अंतःसृष्टीचीही गोष्ट होय. त्या त्या रसाच्या विषयाच्या साक्षात् अनुभवानें जें स्वरूप लक्षांत येईल तें नुसत्या कोरड्या वर्णनांच्या वारंवार वाचनानेंही आलेंच तर अगदीं अस्पष्ट येईल.सारांश,कवित्वास किंबहुना रसिकतेसही विद्वत्ता अगदीं कारण नाहीं. उलटी ती मागें सांगितल्याप्रमाणें दोहोंस स्वभावतः विरुद्धच होय असेंही म्हटलें पाहिजे. तिचा उपयोग झालाच तर कवितेचें वर सांगितलेले बाह्य व अप्रधान गुण तिच्या योगानें कदाचित् मोठ्या श्रमानें साधतां येतील, इतकाच. पण तिच्या तत्वापर्यंत तिची गति कदापिही पोंचणार नाहीं!

१३. तेव्हां एकंदर सिध्दान्त हा. जो जात्या कवि आहे तो कदाचित् विद्वान्ही असेल—जसे कालिदास, जगन्नाथराय, मिल्टन्, बायरन् इत्यादि; किंवा नसेलही—जसे शेक्सपीयर, बर्न्स[1] तुकाराम इत्यादि. पण जितकी जितकी विद्वत्ता अधिक तितकें तितकें कवित्व अधिक ही मात्र मोठी चूक. या पक्षाचीं कांहीं उदाहरणें मागें सांगितलीं आहेतच—सिसरो,जॉनसन्, आपले जुने शास्त्री. पण हीं फार कां देतां येत नाहींत याचें कारण अंमळ विचार करील त्यास तेव्हांच उमगेल;—ते विद्वत्तेस सर्वगुणाधिष्ठित माननाऱ्या भोळ्या भाविकांस मोठें जाचेल यांत संशय नाहीं. तें आम्ही येथें उघड लिहीत नाहीं; तें येवढ्यानेंच सुचवितों कीं, असें होणें हें त्या विद्वानांच्या गर्वास किंवा मूर्खपणास योग्य शासन झालें, व या योगानें त्यांनीं पुढील लोकांस चांगला शहाणपणाचा मार्ग दाखवून ठेवला!

---

१. हा स्वशिक्षित कवि स्कॉटलंड देशांत गेल्या शतकांत होऊन गेला. हा अगदीं गरिब असून याचा सारा जन्म शेतकींत गेला.

इतिहास

कोऽन्यः कालमतिक्रांतं नेतुं प्रत्यक्षतां क्षमः ।
कविप्रजापतींस्त्यक्त्वा रम्यनिर्माणशालिनः॥राजतरंगिणी[1]

अंक ६—(१) प्रकृत विषयाचें स्वरूप. (२) 'इतिहास' शब्दाची व्युत्पत्ति; मूळचा व आतांचा अर्थ. (३) इकडच्या प्राचीन इतिहासाचा अभाव; त्याचीं कारणें. (४) उपलब्ध असणारे कांहीं ग्रंथ; त्यांवरून अनुमान. (५) या देशाच्या प्राचीन इतिहासाची माहिती होण्याचीं दुसरीं साधनें. (६) इतिहासाची उत्पत्ति व प्रसार. (७) इतिहासाचा उपयोग; त्यावर आक्षेप घेणारे लोक. (८) पहिला उपयोग—जिज्ञासातृप्ति. (९) दुसरा उपयोग—सदुपदेश. (१०) तिसरा—मनास प्रसन्नत्व व उन्नति.

१. हा विषय मोठा दांडगा आहे. यावर जितकें लिहावें तितकें थोडेंच. कारण खुद्द विषयच अगोदर मोठा असून त्याचीं अंगें–उपांगेंही अनेक आहेत. तीं अशीं कीं, यावर लिहिणारानें जगाच्या इतिहासावर एकंदर नजर पोंचविली पाहिजे; असें केल्यानें त्यास जे मुख्य मोठमोठे सिद्धान्त सामान्यतः दिसतात त्यांचा उल्लेख केला पाहिजे; नंतर प्रत्येक मोठमोठ्या

---

१. "रम्य अर्थसृष्टि बनविणारे प्रतिब्रह्मदेवच असे जे कवि त्यांवांचून पुरातन काळची स्थिति पुनः दृष्टिगोचर करविण्याचें कोणा इतराचें सामर्थ्य आहे?"

राष्ट्राच्या इतिहासाकडे विशेषत: दृष्टि देऊन त्याच्याविषयीं लिहिलें पाहिजे. तसेंच भूगोल व कालक्रम--कीं ज्यांस इतिहासाचीं नेत्रें म्हणतात--त्यांविषयीं; देशांच्या स्थितिविशेषाचीं फलें--म्हणजे अमुक अमूक देशाची रचना अशा अशा प्रकारची असल्यामुळें असे असे परिणाम उद्भवले,--याविषयी; विद्याकलादिकांचा उत्कर्ष कसकसा होत गेला, तो प्रकार, किंबहुना रीत, रिवाज, पेहराव, वगैरे लहानसान गोष्टी; यांविषयीं सुद्धां इतिहासांत माहिती आली पाहिजे. सारांश, इतिहास म्हणजे इतिवृत्त. मूळारंभापासून आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडल्या त्या सर्वांचें टिपण ज्या ग्रंथांत केलें असतें त्याचें नांव इतिहास.

२. आतां पहिल्यानें या शब्दाची व्युत्पत्ति अंमळ चमत्कारिक आहे म्हणून सांगतो. या शब्दाचे घटकावयव तीन शब्द आहेत--'इति-ह-आस.' यांचा अर्थ 'याप्रमाणें झालें' असा आहे[1]. तेव्हां या शब्दांचा अर्थ 'मागें घडलेला वृत्तान्त' असा आहे. पण मूळच्या व आतांच्या सर्थांत एक मोठा भेद झाला आहे. या शब्दाचा मूळचा अर्थ पुराणांतील उपकथा म्हणजे अप्रधान गोष्ट असा होता--जशा धर्मराजास वगैरे निरनिराळ्या प्रसंगीं ऋषींनीं सांगितलेल्या प्राचीन राजांच्या गोष्टी पण हल्लीं 'इतिहास' हा शब्द 'बखर' या अर्थीं योजतात. तेव्हां दोहोंतला भेद उघडच आहे कीं, पहिल्यांस प्रमाण केवळ ऋषींचे पुराणांतील लेखच काय ते होत; पण दुसऱ्यांस त्यांहून सबळ असे अनेक आधार लागतात.

३ वर जो 'इतिहास' शब्दाचा जुना अर्थ सांगितला त्यावरून स्पष्ट दिसते कीं, अर्वाचीन अर्थीं तो शब्द ज्यास लागेल असे ग्रंथ आपल्या देशांत प्राचीन काळीं नव्हते; म्हणजे ग्रीक व रोमन लोकांत सप्रमाण व खरे इतिहास लिहिण्याची जशी पुढें प्रवृत्ति पडली, तशी इकडे कधींही पडली असेलशी दिसत नाहीं. हा एके रीतीनें मोठा चमत्कार आहे. कारण जे प्राचीन हिंदु लोक त्या वेळेस सर्व राष्ट्रांत हरएक प्रकारें

१. या शब्दांत 'इ' हें केवळ अव्यय आहे. याचा प्रयोग वेदादि जुन्या ग्रंथांतून आढळतो.

अग्रगण्य होते, ज्यांच्यांत विद्या तर प्रत्येक रूपानें पूर्ण अवतरली होती, त्यांच्या हातून येवढें हेंच एक अंग सुटावें ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय ? आहे खरी. तथापि तीबद्दल कांहीं कारणें सांगतां येतील असें आम्हांस वाटतें. इतिहासाचा उद्भव केव्हां होऊं लागतो याविषयीं जर आपण थोडा विचार केला, तर असें दिसून येईल कीं, ज्या वेळेस राष्ट्रांत मोठ्या लढाया, मोठ्या राजक्रांति वगैरे कांहीं मोठमोठ्या गोष्टी घडतात तेव्हां. आथेन्स, रोम, इंग्लंड येथील लोकांत; तसेंच मुसलमान, मोंगल, मराठे या लोकांतहि, घडलेल्या गोष्टींचें वृत्त लिहून ठेवण्याची प्रवृत्ति अशाच प्रसंगीं पडली. असो; तेव्हां हें जर खरें आहे, तर प्राचीन हिंदु लोकांत इतिहासग्रंथांचा अभाव कां राहिला याचें कारण बरेंच स्पष्ट होईल. त्यांच्या देशाच्या चतुःसीमा बहुधा अलंघ्यच असल्यामुळें प्राचीन चिनी लोकाप्रमाणेंच आपले पूर्वजहि आपल्या ठिकाणींच स्वस्थ सुखरूप होते. ग्रीक, रोमन वगैरे लोकांचा शेजारच्या राष्ट्रांशीं जसा नेहमीं संबंध पडेच, तसें येथें मुळींच नसल्याच्या योगानें परराष्ट्रांशीं युद्धादि प्रसंग प्राचीन हिंदु लोकांचे कधींच घडले नाहींत. देशांतल्या देशांतच राजेरजवाड्यांच्या एकमेकांशीं लढाया होत असतील खऱ्या, तरी इतिहासरूपानें त्यांचें वर्णन करावें अशा तऱ्हेच्या त्या कधींहि झाल्या असतीलशा वाटत नाहींत. कारण त्या वेळचे जे कांहीं संस्कृत ग्रंथ अजून उपलब्ध आहेत त्यांत अनेक राजे स्वतंत्रपणें राज्य करीत असल्याचे उल्लेख आढळतात; पण एकानें सार्वभौमत्व पावून बाकीच्यांस पादाक्रांत करून टाकिलें आहे असें कोठें आढळत नाहीं. असो; तेव्हां मोठे युद्धप्रसंग, मोठ्या राजक्रांति, वगैरे जी इतिहासाची सामग्री ती नसल्यामुळें इतिहास लिहून ठेवण्याचा पाठ इकडे पडला नसेल असें वाटतें. दुसरें एक मोठें कारण असेंही दिसतें कीं, आपल्या लोकांच्या मनाचा एकंदर कल निवृत्तिमार्गाकडे जेवढा दृष्टीस पडतो तेवढा प्रवृत्तिमार्गाकडे नाहीं. जग सर्व मिथ्या आहे, प्रपंचांतील सर्व व्यवहार लटके आहेत, अवघा ईश्वरी मायेचा गोंधळ आहे,

दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें।
धरील मन आधिनें बहु परिभ्रमे चाकसें ॥

असे विचार ज्यांच्या मनांत नेहमीं घोळायचे, ज्यांचा परमार्थकिडेच विशेष ओढा, अशा लोकांस रक्तपात, राज्यांच्या घडामोडी वगैरे गोष्टींचीं वर्णनें करून नरस्तुति गात बसण्याचा कंटाळा असल्यास काय नवल ? असो; तर आपल्या देशांत इतिहासकार न झाल्याचीं हीं दोन मोठीं कारणें आम्हांस वाटतात.

४. वर प्राचीन हिंदु लोकांत इतिहास लिहिण्याचा परिपाठ नव्हता म्हणन म्हटलें, यावरून त्याविषयींची माहिती मिळण्यास मुळींच मार्ग उरला नाहीं असें समजायाचें नाहीं. निबंधाच्या अग्रभागीं जें पद्य घातलें आहे त्यावरूनच मार्मिक वाचणाराच्या सहज लक्षांत येईल कीं, इतिहासाची योग्यता आपले लोक जाणत नव्हते असें नाहीं. संस्कृतांत चांगले इतिहास नाहींत खरें, तरी पूर्वीं घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याचा नाद आपणांस अगदीं नव्हता असें नाहीं. वर ज्यांतून उतारा घेतला आहे तो 'राजतरंगिणी' ग्रंथच याविषयीं मोठें प्रमाण आहे. यांत काश्मीर देशाच्या राजांचें वर्णन अगदीं मूळारंभापासून तों तहत अकबर बादशहानें तो देश काबीज केला येथपर्यंत आहे. हा इतिहास निरनिराळ्या पंडितांनीं आपआपल्या वेळेपर्यंत आणून पोंचविला आहे. संस्कृत ग्रंथकारांचे शक बसविण्यास हा ग्रंथ फार उपयोगी पडतो. तसाच दुसरा इतिहासरूप संस्कृत ग्रंथ आम्हांस कांहीं वर्षांपूर्वी पाहिलेला आठवतो; त्यांत बंगाल्याकडील गोंगलांच्या राजांचा वृत्तांत लिहिला होता. 'विविधज्ञानविस्तारां-' त काशिराजनामक पंडितानें लिहिलेला पानपतच्या लढाईविषयींचा मजकूरही पुष्कळांनीं वाचला असेलच. तो जरी नबाबाच्या सांगण्यावरून त्या पंडितानें फारशी भाषेंत लिहिला, तरी या दोन्ही गोष्टींनीं आमच्या वरच्या म्हणण्यास बाध येत नाहीं. उलटया या दोन्ही आमच्या हिंदु लोकांस--व विशेषतः ब्राह्मणांस--भूषणास्पदच होत. एक तर पदरच्या मुनशांस टाकून त्या नबाबनें वरच्या पंडितासच तो वृत्तान्त लिहावयास सांगितला. यावरूनच त्याचें त्या भाषेंत अत्यंत निपुणत्व दिसून येतें. आणि दुसरें चांगला इतिहास लिहिण्यापुरती त्याच्या अंगीं शक्ति व हौसही होती असें म्हटलें पाहिजे. हौस होती असें म्हणण्याचें कारण उघडच आहे कीं, ती नसती तर स्वदेशीयांचा त्या घोर युद्धांत जो अगदीं मोड झाला—

कीं जो या देशास अजून भोंवतो आहे, आणि यापुढें तर कोणत्या परिणामास नेऊन पोंचवील, ईश्वर जाणे !—त्याची हकीकत लिहिण्याचें काम कोणीही हिंदु खचित पतकरता ना ! असो; तेव्हां इतिहास लिहिण्याचा आपल्या लोकांस अगदीं नाद नाहींसा नव्हता हें वरील उदाहरणावरून दिसून येईल. व आम्हांस असेंही वाटतें कीं, आपल्याकडे इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति कमी तर खरीच; परंतु वरच्यासारखे फुटकळ ग्रंथ पूर्वी पुष्कळ लिहिलेले असतील. त्यांचा कालगत्या लोप होऊन त्यांतले अजूनही कदाचित् कोठें सांपडण्यासारखे असतील. हा आमचा तर्क खरा असला, तरी आमच्या लोकांस त्यापासून मोठासा उपयोग नाहीं हें उघड आहे. नाना प्रकारचे शोध करण्याचा वगैरे सर्व कामांचा मक्ता आम्हीं आमच्या राज्यकर्त्यांस देऊन टाकला आहे. त्यांनीं ते शोध करून विलायतेस नेऊन तेथून मोक्षमुल्लर, डॉक्टर हौग् अशांच्या शिक्क्या—मोर्तबासहित ते इकडे आले, म्हणजे मग ते आमच्या अज्ञान व भोळ्या देशबंधूंपुढें मोठ्या पांडित्याचा आव घालून झोकानें मिरविण्याचें आमचें काम !

५. पण इतकेंच नव्हे, आपल्या देशाचा प्राचीन इतिहास वरच्यासारख्या ग्रंथांवरून तर समजतोच; पण याखेरीज दुसरींही कित्येक साधनें तो समजण्याचीं आहेत. प्राचीन ग्रीक व रोमन लोक मोठे शोधक असत: त्यांस आपल्या देशाची जरी चांगलीशी माहिती नव्हती; तरी उत्तरेकडील भागांविषयीं त्यांच्या कित्येक ग्रंथांतून लेख आढळतात. ते तेथील प्राचीन इतिहासाची माहिती होण्यास कांहींसे साधन आहेत. ईजिप्त (मिश्र) देशांत टॉलेमी म्हणून एक मोठा नामांकित भूगोलवेत्ता होऊन गेला. त्याचे ग्रंथ, तसेच चिनी लोकांचे[1] ग्रंथ, यांवरूनही प्राचीन हिंदुस्थानविषयीं बरीच माहिती मिळते. त्याप्रमाणें पूर्वीचे जयस्तंभ, ताम्रपत्रें, लेणीं, वगैरेही पूर्वीच्या काळचें ज्ञान होण्यास कांहींशीं साधन होतात. याशिवाय 'मुद्राराक्षस' 'मृच्छकटिक,' अशा ऐतिहासिक नाटकांवरून वगैरेही प्रसंगविशेषीं प्राचीन इतिहासाच्या कांहीं गोष्टी कळतात.

१. चिनी लोकांस हिंदुस्थानविषयीं लिहिण्याची गरज कां पडली हें समजण्यास शालापत्रक पुस्तक १३, अंक २ पहावा.

सारांश, आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासाची माहिती याप्रमाणें तुटक तुटक मात्र होण्याची सध्यां सोय आहे. पहिल्यापासून अनुक्रमानें लिहिलेले इतिहास जर असते, तर जसें पूर्ण ज्ञान होतें, तसें होण्याची आतां मुळींच आशा नको !

६. याप्रमाणें इतिहासाचा अभाव हें आपल्या प्राचीन विद्येचें मोठेंच व्यंग होय. आतां हें शास्त्र केव्हां व कोठें प्रथमतः उत्पन्न झालें, त्याचा प्रसार कसा झाला, यांविषयीं लिहितों.

साऱ्या जगांत ज्ञानाचा प्रसार जो झाला आहे त्याचे उगम मुख्यतः दोन होत. एक हिंदुस्थान; आणि दुसरा ग्रीस देश. पहिला देश जसा एशिया खंडाचें नाकें होतें, तसा दुसरा देश युरोपाचें होतें. अर्वाचीन काळीं युरोपांतील सर्व देशांत जी सुधारणा झाली आहे तिचें मूळ केवळ ग्रीस देश होय. विद्याकलादिकांची आलीकडे इंग्लंड वगैरे देशांत पुष्कळ वृद्धि झाली, व दिवसेंदिवस होत आहे हें खरें आहे, पण सर्वांचें आदिपीठ पाहिलें असतां वर सांगितलेला देशच होय. असो; तर युरोपांत जी इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति पडली आहे तिचेंही कारण ग्रीस देशच होय. या देशांत हिरॉडटस् हा पहिला इतिहासकार झाला. यास्तव होमर यास आद्यकवि हें पद जसें जोडतात, तसें यास आद्य इतिहासक र म्हणतात. ग्रीक लोकांचें पारसीकाशी[1] मोठें दारुण युध्द ज्या काळीं चाललें होतें त्याच काळांत हा जन्मला. यानें दूरदूरच्या देशीं प्रवास करून आपल्या इतिहासास उपयोगी पडेलशी पुष्कळ माहिती मिळविली, आणि ग्रीक भाषेंत पहिल्यानें इतिहास रचिला. तो त्यानें 'ऑलिंपिक् गेम्स' नांवाचे पांच पांच वर्षांनी जे सार्वजनिक उत्सव होत असत त्यांतील एका प्रसंगीं आपल्या देशबंधूपुढें वाचला. त्यांतील विषयच अगोदर देशाभिमानाचा—म्हणजे ग्रीक लोकांच्या पराक्रमाचें वर्णन असल्यामुळें, व इतरही चमत्कारिक माहिती मोठ्या चातुर्यानें आंत घातली असल्यामुळें, तो ग्रंथ सर्व लोकांस फारच प्रिय झाला. इतका कीं त्यांच्यांत नऊ ज्या

१. पारसीक म्हणजे प्राचीन पारशी लोक, "पारशी" "इराणी", हे अगदींच अर्वाचीन शब्द असल्यामुळें **कालिदास, बाण** इत्यादि आपल्या जुन्या कवींस ते लोक ज्या नांवानें माहीत होते तोच शब्द येथें योजणें प्रशस्त वाटतें.–'पारसीकांस्ततो जेतुं प्रतस्थे स्थलवर्त्मना–रघुवंश ४.

विद्याधिदेवता मानिल्या असत त्यांचीं नांवें त्या ग्रंथाच्या नऊ सर्गांस जमलेल्या समाजानें लागलींच ठेवलीं. याच प्रसंगीं दुसरीही एक चमत्कारिक गोष्ट अशी सांगतात कीं, वर सांगितलेला इतिहास हिरॉडटस् वाचीत असतां त्या समाजांत एका नऊ वर्षांच्या मुलास इतका गहिंवर आला कीं, तो आंसवें ढाळूं लागला. तें त्या इतिहासकर्त्यानें पाहून त्या मुलाच्या बापाशीं असें भाकित केलें कीं, हा तुमचा मुलगा पुढें मोठा नामांकित इतिहासकार निपजेल ! आणि खरोखरींच तसें घडून आलें. तो लहान मुलगा पुढें ग्रीस देशांतला, किंबहुना साऱ्या जगांतला, अत्युत्कृष्ट इतिहासकार थुसिडिडीज् झाला ! असो; याप्रमाणें आणखीही कित्येक इतिहासकार ग्रीस देशांत होऊन गेले. त्या सर्वांत वरच्या दोहोंसारखा म्हटला म्हणजे सॉक्रेटीस् याचा शिष्य जिनोफन् हा तिसरा होय. ग्रीक लोकांच्या वीर्याचा व वैभवाचा अस्त झाल्यावर पुढें रोमन लोकांची भरभर झाली. तेव्हां त्यांच्यांतही कित्येक मोठमोठे इतिहासकार झाले. लिव्ही, सालस्ट्, सीजर, प्लुटार्कू, टासिटस् इत्यादि. पुढें रोमन लोकांनींही हजार दीड हजार वर्षें राज्यवैभव भोगल्यावर त्यांची सद्दी संपली; आणि अरब व तुर्क लोक यांचें दैव उदयास आलें. या अरबांचें त्यांच्या शौर्यखेरीज त्यांचें स्वत:चेंच असें थोडेंच निघेल ! धर्म तर यहुदी व ख्रिस्ती यांच्या धर्मांची भेसळ करून व कांहीं पदरचें घालून सरासरी बनवलेला; तसेंच विद्या व कला याही ग्रीक व हिंदु लोकांच्याच घेऊन यांनीं आपल्या म्हणून म्हणविलेल्या आहेत. तेव्हां सदरहूप्रमाणेंच इतिहास लिहिण्याचा प्रघातही त्यांचाच मूळचा असेलसें दिसत नाहीं; तो त्यांनीं ग्रीक लोकांपासून घेतला असावा. असो; याप्रमाणें इतिहासाची उत्पत्ति होऊन त्याचा प्रसार जगांत झाला. आलीकडील इंग्लिश वगैरे लोकांनीं तर थेट ग्रीक व रोमन लोकांपासूनच तो उचलला हें वर सांगण्यांत आलेंच आहे; व हल्लींच्या काळीं हेच लोक बाकी सर्वांहून ज्ञानसंपन्न विशेष असल्यामुळें तो लिहिण्याची उत्कृष्ट पद्धति यांच्यांतच आहे. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, हल्लीं सगळ्या भूगोलाची माहिती झाली असल्यामुळे इतर सर्व देशांचेही इतिहास त्यांनीं लिहून ठवले आहेत.

७. याप्रमाणें प्रस्तुत विषयास उपोद्घातरूपानें जी माहिती सांगणें अवश्य होतें ती सांगितली. आतां खुद्द विषयाविषयीं विचार करूं. पहिल्यानें

इतिहासाचा उपयोग काय ? हा प्रश्न दिसतांच असमंजस दिसून कोणी करीत नसतीलसें प्रथमत: वाटतें. कां कीं, दुसरा कोणताही उपयोग नाहीं म्हटला, तरी मनुष्याच्या मनांत अत्यंत स्वाभाविक अशी जी जिज्ञासा ती तरी त्याच्या योगानें तृप्त होते हाच काय थोडा उपयोग आहे ? हा अगदीं निदानपक्षींचा उपयोग सांगितला—दुसरे जे इतिहास वाचल्यापासून मोठ-मोठे नफे आहेत ते पुढें सांगण्यांत येतीलच. असो; पण असें असतांही इतिहासांत ज्यांस कांहीं एक अर्थ दिसत नाहीं, जे त्याचा तिरस्कार करतात, असे मनुष्य पुष्कळ आढळतात. ज्यांच्या मनांत ज्ञानानें कधीं प्रवेश केला नाहीं, किंवा तो व्हावा असा ज्याविषयीं ईश्वरी संकेतच दिसत नाहीं, अशांनीं वरील मतें प्रगट केल्यास कांहीं नवल नाहीं. पण नवल हें कीं, ज्यांच्या ठायीं विचारशक्ति चांगली प्रखर दृष्टीस पडते, जे समंजसतेचा मोठा आव घालतात, अशांमध्येंही इतिहासावरची अप्रीति पुष्कळ वेळां दृष्टीस पडते. इंग्रेज लोकांतला प्रसिद्ध ग्रंथकार जॉनसन् हा अशाविषयींचें, एक मोठें उदाहरण आहे. एकंदर इतिहासाविषयीं व विशेषत: प्राचीन इतिहासाविषयीं, हा आपला तिरस्कार वारंवार प्रगट करीत असे. या थोर ग्रंथकाराच्या कित्येक विलक्षण समजुती होत्या, व जे हेकटपणाचे कित्येत ग्रह त्याच्या मनांत साऱ्या जन्मभर खिळून राहिले होते, त्यांपैकींच वरचा एक होय. असो; आपणांमध्येंही असे पुष्कळ म्हणणारे सांपडतील कीं, " अहो ! मागील काळाशीं आपणाला काय करायाचें आहे ? ते लोक गेले, मेले, पार झाले; आतां त्यांची कर्मकटकट आपणांस कशाला हावी ? बाजीरावानें दिल्ली घेतली, नाना फडनविसानें अशी अशी युक्ति लढविली,—आपणाला त्यांत काय लभ्य आहे ? सध्यां चाललें आहे तें खरें ! ज्यांत आपला कांहीं नफाही नाहीं व तोटाही नाहीं, अशा मागच्या गोष्टी मिळवायाच्या, जुने लेख पाहायाचे, वगैरे जी विनाकारण यातायात करायाची तींत काय अर्थ ? साहेब लोकांस कांहीं उद्योग नसतो, त्यांचीं हीं कामें ! असा रिकामा उद्योग कोणी करीत बसावें ? त्यांत निष्पन्न काय ? " खरेंच ! जीवमान आहे तोंवर खाऊन घ्यावें, पिऊन घ्यावें, दुपारची वामकुक्षी चुकूं देऊं नये, संध्याकाळच्या खाशा वेळीं शानदारसा पोषाक करून बाहेर पडावें; मग गंध्याचें दुकान,

किंवा (विद्येचा षोक अथवा सुधारणेंत पुढारीपणा दाखविणें असल्यास) लायब्ररी, अशा ठिकाणीं चार घटका साऱ्या जगाच्या उलाढाली करून नंतर रमत रमत घरीं यावें; अशा प्रकारचा स्तुत्य आयुष्यक्रम ज्यांनीं निरंतर अबाधित चालवावा, अशा थोर लोकांपुढें बाजीराव काय आणि मोठा शिकंदर बादशाहा झाला म्हणून तो तरी काय !! जन्मास आल्याचें चीज जर कोणास करून घेणें असेल, तर त्यांनीं अशाच सद्गुरूंचे पाय धरावे; कां कीं, एकंदर तत्त्व असें यांनींच ओळखलें ! मग काय उशीर ? तुकारामबोवा म्हणतात, अशांची थोरवी काय वर्णावी !—

आपणासारिखे करिती तात्काळ ।
नाहीं काळ वेळ तयांलागीं[1] ॥

असो; तर याप्रमाणें इतिहासास नाक मुरडणारे वर सांगितलेले दोन प्रकारचे लोक असतात. एक वरचे वामकुक्षीवाले. यांच्या मतांत तर अर्थातच मुळींच अर्थ नाहीं; व त्यांचें मत कोणीं न मानलें तर त्यांतही त्यांस मोठी मानहानि झालीशी वाटणार आहे असेंही नाहीं ! त्यांचें चमचमीत भोजन, वामकुक्षी, तंबाखू, गप्पा, यांस जोंपर्यंत कांहीं हरकत होत नाहीं, तोंपर्यंत इतर कशासही ते मोजीत नाहींत ! हा एक वर्ग, व हा फार मोठा आहे यांत संशय नाहीं. दुसरा वर्ग जॉनसन्सारख्या दुराग्रही व स्थूलबुद्धि लोकांचा. यांचीं मतें इतर विषयांवर केवढींही मान्य असलीं, तरी ज्यांवर त्यांनीं कधीं व्यासंग केला नाहीं, व ज्यांचा आस्वाद घेण्यास त्यांची स्थूलबुद्धि स्वभावतःच समर्थ नाहीं, अशा विषयांवरचीं त्यांचीं मतें असमंजस मानण्यास कांहीं हरकत नाहीं; कित्येक इंग्लिश कवींच्या ग्रंथांवर दिलेले अभिप्राय जॉनसन्चे जितपत खरे आहेत, किंवा गाण्याबजावण्यावर त्यानें आपलें मत दिलें असतें तर तें जितपत यथार्थ असण्याचा संभव होता, तितपतच त्याचें प्रस्तुत विषयावरचें मत ग्राह्य होय ! असो; तेव्हां या दोन्ही लोकांचे आक्षेप मनास आणण्यासारखे नाहींत. आतां इतिहासाचे उपयोग कोणकोणते आहेत यांविषयीं लिहितों.

---

१. वरचा अभंग कवीनें असा व्याजोक्तीनें लिहिला नाहीं. त्याचा मूळचा अर्थ सरळच आहे. पण मूळांतल्यासारख्याच प्रसंगीं लोक तो भाषणांत आणतात हें बहुधा सर्वांस माहीत असेलच.

८. एक तर वर सांगण्यांत आलाच आहे. कोणता ? तर जिज्ञासातृप्ति. ईश्वरानें ही मनोवृत्ति मनुष्याच्या ठायीं मोठी प्रबळ ठेविली आहे. हिचा अंगचा जोर कितपत आहे हें सुधारणेच्या काळीं चांगलें दिसून येत नाहीं. कां कीं, अशा काळीं मनुष्याच्या मनाची मूळची कळा त्याच्या शरीराप्रमाणें लोकाचाराखालीं पुष्कळ दबली जाते; म्हणजे मूळची जशी तिची स्वेच्छा-प्रवृत्ति असते तशी पुढच्या काळीं राहात नाहीं. पहा बरें, मनुष्याचा अंतरालांतील गोलांशीं काय संबंध आहे ? पृथ्वी फिरत असली कीं सूर्य फिरत असला, चंद्र स्वयंप्रकाश असला कीं परप्रकाशित असला, ग्रहमालेचा मध्य पृथ्वी असली कीं सूर्य असला, तारे कितीही असले, कांहींही असले तरी त्यांत मनुष्याचें काय बरें हिताहित आहे ? मागें सूर्य फिरतो असें लोक मानीत होते, आतां पृथ्वी फिरते असें लोक मानतात; म्हणून मनुष्यें काय रोग्याचीं निरोगी झालीं, कीं दरिद्राचीं संपन्न होऊन बसलीं ? एवढी उठाठेव करून दुर्भिणीची कल्पना काढून, नाना प्रकारचीं गणितें करून, निरनिराळीं प्रमाणें एकत्र करून–ज्योतिष्यांस किंवा जगास कोणता फायदा झाला ?–खरें आहे. एका कवडीचाही झाला नाही ! हाच उपदेश सर्व मनुष्यांत शहाणा म्हणून जो निवडला गेला त्या सॉक्रेटिसानें आपल्या शिष्यांस व सर्व जगास केला. पण एवढ्या महापंडिताच्या सांगण्यानेंही लोक राहिले आहेत काय ? सूर्य-बिंबाचा चंद्रानें ग्रास केला, किंवा शुक्र सूर्याच्या आड आला, कीं लोक कोणी हिंदुस्थानांत, कोणी अमेरिकेंत, कोणी दक्षिण समुद्रांत, धांव घेतातच कीं नाहींत ? जिवावर उदार होऊन केवळ जिज्ञासाप्रेरित होत्साते तोफेच्या गोळ्यांत बसून चंद्रलोकावर स्वारी करतात कीं नाहींत[1] ? असो; तेव्हां मनुष्यमात्राचे ठायीं जिज्ञासा ही मोठी उच्छृंखल आहे. हिचा मुळींच अभाव असता तर जगाच्या मूळच्या स्थितींत आज फारसा फरक पडताना हें उघड आहे. असो; तेव्हां सांगायाचें काय कीं, अंतरालांतील दूरदूरच्या गोलांविषयींही जर मनुष्याच्या मनांत जिज्ञासा उत्पन्न होते, तर

---

१. हें वर्तमान हल्लीं कित्येक पत्रांतून समजतें. तें खरें असेलसें बहुधा वाटत नाहीं. तरी मनुष्याचें धाडस व जिज्ञासा हीं काय करतील याचा नेम सांगवत नाहीं !

ज्या गोलावर तो वास करतो त्यावर निरनिराळ्या ठिकाणीं काय काय वृत्तान्त घडले ते समजून घेण्याची त्यास उत्कंठा होणार नाहीं काय ?

९. वर सांगितलेला इतिहासाचा उपयोग सर्वांत पहिला, साधा व लहान असा होय. तरी इतिहासाची प्रवृत्ति मूळारंभीं पडण्यास तोच कारण आहे असें दिसून येईल. त्याहून वरचढ दुसरा उपयोग म्हटला म्हणजे नीतिबोध. सज्जनांचा जय व दुर्जनांचा अपजय असेंच जरी नेहमीं इतिहासांत आढळत नाहीं, तरी एकंदरींत परिणाम असाच दृष्टीस पडतो. शिवाय दुसरें हेंही लक्षांत येतें कीं, भलेपणानें वागूनही जरी नेहमीं परिणाम लागतोच असें नाहीं, तरी पण दुष्टपणा केल्यानें तर तो नाहीच नाहीं लागत ! मनुष्याचें सर्व प्रकारें हित होणें तें केवळ याच मार्गानें व्हावयाचें; कुमार्गानें व्हावें हें वस्तुगत्याच शक्य नव्हे. याप्रमाणेंच मोठ्या प्रसंगींही ज्यांचें धैर्यबळ ढळत नाहीं असे थोर पुरुष तर विपत्तींतही जें सुख पावतात तें दुष्ट व कुत्सित मनाच्या लोकांस मोठ्या भाग्यशालीपणांतही लाधत नाहीं. सारांश, या संसाररूप महानाटकांत आजपर्यंत कोणकोणतीं पात्रें आपआपली भूमिका आटपून निष्क्रमण करतीं झालीं हें चित्तावर चांगलें ठसलें असतां चांगला मार्ग कोणता, वाईट कोणता हें सुज्ञ मनुष्यास सहज निवडतां येतें. खरें सुख, खरें समाधान, खरी प्रतिष्ठा कशांत आहे हेंही कळूं लागतें. सहस्रावधि मनुष्यांचा अनुभव थोडक्यांत त्यांस आलासा होतो; त्याच्या योगानें त्याची दृष्टि फांकते; आणि तो जर तसा समजुतीचा व दृढ निश्चयाचा असेल, तर लवकरच तो कोणाचा तरी कित्ता उचलून खलाशी लोक ध्रुवाच्या ताऱ्यावरून जसें नौकेचें नियमन करतात,त्याप्रमाणें तो त्या निवडलेल्या पुरुषाच्या चरित्रावर सारखी नजर ठेवून तदनुरूप आपलें आयुष्य क्रमण करतो. याप्रमाणें इतिहासापासून सदुपदेश प्राप्त होतो, व म्हणूनच एका थोर ग्रंथकारानें ' इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय ' असें यथार्थ म्हटलें आहे.

१०. इतिहास हा मनास उन्नति व प्रसन्नत्वही देणारा आहे. म्हणजे त्याच्या निरंतर वाचनानें चित्त शांत व स्थिर राहतें, आणि थोर होतें. याचें कारण उघडच आहे. एका चतुर ग्रंथकाराचें असें वचन आहे कीं, ' इतिहास म्हणजे या जगांत जे महापुरुष होऊन गेले त्यांचीं चरित्रें आहे. '

म्हणजे अशा पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं त्यांनींच इतिहास भरला आहे; तीं काढून निराळीं केलीं तर त्यांत काय उरेल ? अर्थात् कांहीं नाहीं. तेव्हां आजपर्यंत या जगतीस भूषणभूत जीं रत्नें निरनिराळ्या देशांत निपजलीं त्यांचा सहवास जर अक्षयीं घडेल, तर त्यापरता लाभ कोणता ? प्लूटार्क नामें करून एक नामांकित इतिहासकार ग्रीस देशांत होऊन गेला, त्याचा अत्यंत प्रसिद्ध व सर्व जगाचा प्रीतिमात्र झालेला असा ग्रंथ 'थोर लोकांचीं चरित्रें' या नांवाचा आहे. यांत त्यानें ग्रीस व इटली देशांत जीं मोठ-मोठीं प्रकरणें होऊन गेलीं त्यांचा वृत्तान्त लिहिला आहे. त्याच्या प्रस्तावनेंत त्यानें असें म्हटलें आहे की, मला या लोकांच्या उज्ज्वल चरित्रांचें मनन केल्यापासून जो लाभ झाला तो सांगतां पुरवणार नाहीं; जेव्हां जेव्हां कांहीं अनुचित कृत्यांकडे माझ्या मनाचा कल होई, किंवा सदाचरणाविषयींचा उत्साह कमी झालासा वाटे, तेव्हां तेव्हां मी यांचीं चरित्रें वाची, तेणेंकरून मला पुनः हुशारी वाटे. असो; सत्समागमाचा महिमा असाच आहे. आपल्या मराठी व संस्कृत कवींनीं या महिम्याविषयीं निरनिराळ्या कथानकांनीं व दृष्टान्तांनीं पुष्कळ लिहिलें आहे. या दृष्टान्तांपैकीं तुकारामादि मराठी कवींची फार आवडती जी लोहपरिसाची उपमा ती या ठिकाणीं फार सुंदर व समर्पक होय. लोखंड मूळचें किती हलकें असतें व दिसण्यांत किती भिकार दिसतें ! पण परिसाशीं वरच्यावर संघट्टन जसजसें घडेल तसतसें त्याचें सर्व धातूंत श्रेष्ठ व यथार्थनाम जें सुवर्ण तें बनत जातें ! आणि वस्तुतः मनुष्य कसाही चांगला वाईट निपजणें हें पुष्कळ अंशीं ज्या ज्या स्थिति त्यास प्राप्त होत जातात त्यांचेंच फल असतें. कोणी कोणी तर तें सर्वथाच त्यांचें फल होय असें सुद्धां म्हणतात. इंग्लंडांत सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं लॉक् नामें करून एक मोठा विख्यात तत्त्वज्ञ होऊन गेला. त्यानें हें मत स्थापलें. या मताच्या लोकांचें म्हणणें असें आहे कीं, मनुष्याचें मन हें आरंभीं एखाद्या स्वच्छ आरशाप्रमाणें किंवा कोऱ्या कागदासारखें शुद्ध असतें. त्यास प्राक्तन संस्कार म्हणजे आधींचे बरेवाईट विकार कोणतेच घडलेले नसतात. ते पुढें ज्याच्या त्याच्या स्थितिविशेषानुरूप त्यास जडून त्याचा कल चांगल्याकडे किंवा वाईटाकडे फिरतो. असो; हें कांहीं असो.

पण इतकें खचित आहे कीं या पुढच्या स्थितीप्रमाणें मन बहुधा चांगले-वाईट विकार पावत असतें. संस्कृतांत एक वाक्य आहे—

अत्रणे पतितो वह्निः स्वयमेवोपशाम्यति

'गवताशिवाय एकाद्या जाग्यावर अग्नि पडला, तर तो आपोआपच विझला जातो.' याप्रमाणेंच मनुष्याचे चांगलेवाईट गुण पूर्णपणें विकास पावण्यास तशा प्रकारची स्थिति त्यास अनुकूल असावी लागते. पहा बरें, सध्यां आपल्या देशांत शिवाजीसारखा किंवा हैदरासारखा राज्यकर्ता कां निपजत नाहीं ? किंवा नाना फडनविसासारखा राजकारगी पुरुष कां होत नाहीं ? कारण उघडच आहे कीं, तसे गुण असले तरी त्यांचा विकास होण्यास हल्लींच्या स्थतींत मुळींच अवकाश नाहीं. असो; तेव्हां एकाद्या अंगच्या गुणाचा उत्कर्ष व्हावयास तशी तशी स्थिति मनुष्यास अनुकूल असावी लागते. या स्थितिविशेषांतील एक मोठी गोष्ट तशा मनुष्याची संगत ह। एक होय. जगांत जे मोठमोठे लोक होऊन गेले ते त्यांस तशी संगत नसती तर कधीं न होते. अगदीं अलीकडचेंच एक उदाहरण घ्या. इंग्लंडांतला आलीकडचा मोठा प्रसिद्ध ग्रंथकार जॉन् स्टुअर्ट मिल्ल, जो गेल्या वर्षीं मरण पावला, त्यास जर त्याच्या वापाची संगति नसती तर त्याची बुद्धि एवढी परिपक्क झाली असती काय ? खचित झाली नसती. तो बुद्धिमानच होता, त्यापक्षीं तो कसा तरी प्रसिद्धीस येता यांत संशय नाहीं; पण येवढ्या योग्यतेस तो येरवीं कधीं चढताना. हें याच ग्रंथकारानें आपल्या नुकत्या प्रसिद्ध झालेल्या 'स्वरचित चरित्रां' त स्वतः कबूल केलें आहे. या ग्रंथांत तो म्हणतो कीं, बापाच्या शिक्षेमुळें मी पंचवीस वर्षें अगोदर जन्मून जितकें ज्ञान मला झालें असतें तितकें झालें. असो; याचप्रमाणें प्राचीन काळचे शिकंदर, हानिबॉल, सिपिओ, इत्यादि व आलीकडचे आपल्या देशांतले थोरले बाजीराव, टिपू सुलतान यांचींही उदाहरणें देतां येतील. तेव्हां संगतिविशेषाचें फल अचिंत्य होय. याचें तरी कारण पाहूं जातां फार खोल आहे असें नाहीं. मनुष्य जन्मून त्यास जगांतील व्यवहार थोडेबहुत कळूं लागले म्हणजे त्याच्या हातून कांहींना कांहीं तरी व्यापार अवश्य झालाच पाहिजे. त्यास सर्वथा निर्व्यापार असें कधींच

राहतां येणार नाहीं. असें जर आहे तर मग त्यानें कोणतें आचारण करावें ? अर्थात् जवळच्या चारचौघांचें जें पाहील तेंच. हें अगदीं स्वभावास अनुसरून आहे. यास्तव मुलांस आईबापांचे जितके गुण लागतात— त्यांतूनही विशेषत: आईचे–तितके दुसऱ्या कोणाचे लागत नाहींत. असो; तर अनुकरणाकडे मनुष्याची प्रवृत्ति जर येवढी साहजिक व बलवत्तर आहे तर लहानपणापासून इतिहास, चरित्रें वगैरे वाचण्याची जर त्यास गोडी लागेल तर ती त्यास किती हितावह होईल बरें ! सज्जन व थोर मनुष्यांशीं निरंतर सहवास असणें हजारांमध्यें एखाद्याचें कदाचित् भाग्य असेल; बाकीच्यांस वरच्याविरुद्ध लोकांशींच नेहमीं प्रसंग ! तेव्हां अशांची संगति जो गुण अवश्य करील तो नाहींसा होऊन सदाचरणप्रीति व खरा थोरपणा मनांत बिंबण्यास वरच्याखेरीज दुसरें कोणतें साधन आहे ? दुसरें असें कीं वरच्यासारखे थोर लोक कोणत्याही देशांत ईश्वरकृपेनें एकादे वेळेसच उत्पन्न होतात. व तेव्हां त्यांचा वर्तनक्रम पाहून दुसरेही कित्येक त्यांचा कित्ता उचलून योग्यतेस चढतात. पण तेवढा काळ गेला कीं आटपलें ! इतिहास, चरित्रें वगैरे लिहिण्याचा प्रघात नसला म्हणजे पांचपन्नास वर्षांत त्यांची आठवणही पार बुजून जाते ! मग पुढील लोकांच्या ठायीं उत्साह कसा उत्पन्न व्हावा ? व देशाची पहिली थोरवी तरी कशी राहावी ?–वर इतिहासाची अवहेलना करणारे जे सांगितले त्यांस येवढें विचारावें कीं, इतिहासापासून दुसरा बिलकूल काहीं एक फायदा नसला तरी हाच एक काय लहान आहे ? होमरकवीनें आकिलिसाचा पराक्रम वर्णिला नसता तर शिकंदर होता काय ? व्यासानें पांडवांचें चरित्र गाइलें नसतें तर शिवाजी उत्पन्न होऊन त्यानें यवनांपासून राज्यश्री माघारी हरण केली असती काय ? शिकंदराचा इतिहास नसता तर सीझर कशाला होता ? सीझराचा नसता तर नेपोलियन कशाला होता ? शिवाजी महाराजांची कीर्ति जर मागें न राहाती, तर त्यांच्या पुत्राचा वध होऊन, राजकुल व राजधानी शत्रूच्या कबजांत सांपडून, सर्व शून्याकार झालें असतांही मराठ्यांनीं दिल्लीच्या औरंगजेबास पुरेपुरेसें करून मोठ्या कष्टानें व मोठ्या शर्थेनें अहमदनगरास कशाला पळवून लाविलें असतें ? थोरल्या बाजीराव साहेबांनीं घरचें दाभाडयाचें बंड मोडून

दिल्लीच्या मोंगलाची व हैद्रादादच्या नवाबाची[1] कशाला खोड मोडली असती ? चिमाजी अप्पानें फिरंग्यास कशाला जेरीस आणलें असतें ? राघोबा भरारी[2] गिलच्यास अटकेपार कशास पळवून लावता ? थोरला माधवराव साऱ्या जगास भारी असणाऱ्या इंग्रजांसही जो भारी झाला, त्या हैदरास वरचेवर कसा तुडवून टाकता ? सरतेशेवटीं भेकड, मूर्ख, बायक्या असा धनी पेशव्यांच्या कुळास अक्षय कलंक लावून पळत सुटला असतां, शत्रूवर एकटा चालत जाऊन समशेरबहादुर[3] गोकलखा अष्टयास कसा पडता ? असो; तेव्हां अनुकरणाचें फल कांहीं विलक्षण आहे ! पण ते पुरुष होऊन गेल्यावर त्यांचे स्मरण पुढें कोणासच होत नाहीं.यास्तव इतिहास असावे लागतात,की देशाची स्थिति जरी अगदीं बदलून गेली,तरी ते वाचून पुढें मागें कोणास तरी त्यापासून उत्साह व प्रेरणा प्राप्त होते. ग्रीसचें, रोमचें व आलीकडील इंग्लंड, व फ्रान्स वगैरे देशांचीं राज्यें इतके दिवस टिकल्याचें हें एक कारण असावें यांत संशय नाहीं. पण कोणी म्हणतील कीं, सर्वांसच लढाऊ व राजकारणी पुरुष होण्याचें कोठें अनुकूल असतें ? नसतें खरें. पण म्हणून काय झालें ? इतिहासाचा उपयोग कमी झाला काय ? पृथ्वीवर हजारों लाखों लोक गुरूचे उपग्रह व शनीचें कडें दुर्भिणींतून बघतात; मग त्यांस ते उपग्रह व कडें आपल्या ताब्यांत येतील असें वाटत असतें काय ?

---

१. हल्लीं ज्यास निजाम म्हणतात त्यास आपले आजे पणजे नबाब म्हणत, ते आपणांस दिल्लीपतीचे अंकित म्हणवीत, म्हणून त्यांचें तें नांव ठीक होतें. ' निजाम ' हें नाव वास्तविक पाहतां अप्रयोजक आहे. साऱ्या पेशव्यांस ' माधवराव ' किंवा ' बाजीराव ' म्हणण्यासारखें हें होय !

२. इंग्लंडच्या कित्येक जुन्या राजांस जशीं त्यांच्या गुणांवरून उपपदें दिलीं असत, किंवा नेपोलियनच्या शिपायांनीं त्यांचें जसें ' लिट्ल कार्पोरेल् ' (छोटा नाईक) असें आवर्डानें ठेवलें होतें, तसें राघोबादादाच्या रणवेगावरून त्यास ' राघो भरारी ' असें म्हणत.--ही गोष्ट व पुढील टिपेंतील माहिती एका वृद्ध मनुष्यापासून आम्हास मिळाली.

३. बापू गोखल्यापाशीं जे आरब होते ते त्यास ' गोकलखा ' असें त्याच्या शौर्यावरून म्हणत.

नाहीं. ते उपग्रह व तें कडें पाहून विश्व रचणाऱ्या चतुर कारागिराचें जर वैभव त्यांच्या मनांत बिंबलें तर तो लाभ उपग्रह व कडें हीं ताब्यांत आल्यापेक्षांही शतगुणित अधिक नव्हे काय ? तद्वतच नेपोलियन बादशहाचे किंवा शिवाजीचे पराक्रम वाचून जर त्यांस वाटलें कीं, अहाहा ! मनुष्याच्या बुद्धीचा प्रभाव केवढा आहे !—कधीं कधीं एकटयाच मनुष्याच्या हातीं किती लोकांचें कल्याण व नाश करण्याचें असतें !—पहा ! येवढा युरोप हाताखालीं आला असतांही त्या नेपोलियनास संतोष म्हणून झालाच नाहीं, व शेवटीं एका दीड वर्षांत त्याची काय दशा झाली ! मोठमोठे राजे ज्याचे अंकित होऊन ज्यास थरथरां कांपत होते तोच दैवानें एक झोला देतांच अफाट समुद्रांत एका भयाण बेटांत जाऊन पडला; आणि जें शरीर जिवंतपणीं साऱ्या युरोपास दणाणवीत होतें तेंच एका दगडाखालचें खणून आणून त्याच्याच राजधानींत समारंभानें पुरण्यास त्याच्या शत्रूंची परवानगी मागावी लागली ! अरेरे ! लक्षावधि मनुष्यांच्या प्राणांचा नाश करून यानें कोणती जोड केली ! येवढया अचाट बुद्धीबरोबर परोपकाराची इच्छा जर याचे ठायीं तिळभरही असती, तर जगाचें केवढें हित होतें !—शिवाजीचें चरित्र पहा ! बापानें नावडत्या आईबरोबर पुनवडीस ठेवला असतां दादाजी कोंडदेवानें लहानपणीं थोडेबहुत जें त्यास कांहीं शिकविलें तेवढयाच ज्ञानानें पुढें केवढें अकांडतांडव केलें ! जे लोक मागेंहीं कधीं प्रसिद्धीस आले नव्हते व पुढेंही लवकर पुनः अप्रसिद्ध झाले, ज्यांच्या अंगीं बाहेरून शरीराचें किंवा बुद्धीचेंही सामर्थ्य दृष्टीस पडत नाहीं, अशांच्या ठायीं आपणांस अत्यंत उपयोगी पडतीलसे गुण ओळखून त्यांस त्यानें आपले जिवलग संगवडे केले. त्यांच्या बळावर जी हिंदूंची राजसत्ता सुमारें हजार वर्षे अस्तास गेली होती तिचा अरुणोदय मावळच्या डोंगरावर पुनः झाला ! थरमॉपिलीच्या लियोनिडसास त्यांच्या तानाजीनें व सूर्याजीनें लाजविलें ! सर्व पृथ्वीभर ज्या शहराच्या मातब्बरीची प्रसिद्धी होती, जें मोंगलांच्या राज्यश्रीचें केवळ कुंकू होतें, तें शहर त्यांनीं दोनदां सावकाश लुटलें. विजापुरास तर हंहं म्हणतां चिरडून टाकून गर्वानें माजलेल्या मोंगलांस त्यांनीं असा उच्छाद दिला कीं, शिवाजी एक आहे कीं दोन आहेत असें त्यास भासविलें ! तेव्हां केवढें सामर्थ्य

हें ! व याहीपेक्षां वाखाणण्यासारखें काय, कीं तिचा केवढा सद्व्यय झाला !– तेव्हां मोठी बुद्धि असण्यापेक्षां सदाचरणप्रीति असणें हेंच विशेष हितकारक आहे. मनुष्याच्या मनाचा असा चमत्कार आहे कीं, 'लाभाल्लोभः प्रवर्तते '—' जसा जसा लाभ होत जातो तस तसा लोभही वाढतो ! तेव्हां आहे त्यांत संतोष मानून राहणारा मजूरही मोठ्या बादशहापेक्षां सुखी असेल यांत संशय नाहीं ! याप्रमाणें शहाणपणाच्या अनेक गोष्टी जर त्याच्या मनांत ठसून गेल्या, तर मोठा अधिकार मिळाल्यापेक्षांही त्यास अधिक लाभ होणार नाहीं काय ? असो; तर इतिहासापासून मनास शांति व उन्नतत्व प्राप्त होतें हा एक त्यापासून मोठा लाभ आहे.

लंकापतेः[1] संकुचितं यशो यत् यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः ।
स सर्व एवाद्यकवेः प्रभावो न कोपनीयाः कवयः क्षितींद्रैः ॥१॥

बिल्हण

अंक ७ वा—(१) इतिहासाचा चवथा उपयोग––मनोरंजन. (२) पांचवा–नीतिज्ञान. (३) सहावा––मनाचें पोषण.

१. इतिहासापासून चवथा उपयोग मनाचें रंजन. निरनिराळ्या देशांत घडलेले वृत्तान्त समजल्यानें व त्यांचें मनन केल्यानें मागें सांगितल्याप्रमाणें जिज्ञासावृत्तीचें समाधान तर होतेंच, पण जर ते इतिहास तशा शैलीनें लिहिले असतील तर त्यांच्या वाचनानें वाचकांस आल्हादही होईल. असे इतिहासग्रंथ ग्रीक, ल्याटिन, फारशी या भाषांत आहेत. तसेंच आलीकडे इंग्लिश भाषेंत झालेले ह्यूम, गिबन्, मेकॉले यांचेही ग्रंथ सर्वत्र प्रसिद्ध आहेतच. अशा इतिहासाची भाषासरणी, यथास्थित ग्रंथरचना, कथानकाची जुळणी, गहन विचार, तऱ्हेतऱ्हेची माहिती मध्यें घालून देण्याची खुबी, यांच्या योगानें सर्व प्रकारच्या वाचणारांस ते मान्य होतात. ज्यांस

---

१. " लंकेचा राजा रावण याची कीर्ति थोडी, व रामराजाचें यश विशाल, हा प्रभाव अवघा आद्यकवीचा (वाल्मीकीचा) होय ! यास्तव मोठे राजे जरी झाले तरी त्यांनीं कवींशीं नम्रच असावें ! "

केवळ भाषाच शिकायाची असते. त्यांस तिचें अत्यंत रमणीय रूप त्यांत पाहावयास सांपडतें, ज्यांस विषयाची मांडणी कशी करावी याची समजूत करून घ्यायची असते त्यांस ती धाटणी त्यांतून उचलतां येते, केवळ गोष्टवेल्हाळच जे असतात त्यांस कादंबऱ्यांप्रमाणें त्यांत चमत्कृति भासते, जे तत्त्वजिज्ञासु असतात त्यांस पोक्तपणाचे व खोल असे विचार त्यांत सादर केले असतात, आणि ज्यांस चमत्कारिक व मौजेच्या गोष्टीचा संग्रह करावासा वाटतो त्यांस तो त्यांमधून सहज करतां येतो. याप्रमाणें इतिहास अनेक प्रकारांनीं मनोवेधक होतो. कादंबऱ्या वाचतांना श्रम न होतां जशी कर्मणूक होते तशीच बहुधा आलीकडील कित्येक उत्कृष्ट इतिहासांनीं होते; व यास्तवच आलीकडे इतिहास वाचण्याची प्रवृत्ति पडून तो सर्वांस सामान्यतः जितका माहीत असतो तितका पूर्वी कधींहि नसेल ही गोष्ट दोहों तऱ्हेनें नफ्याची झाली. एक तर इतिहासाचें ज्ञान सर्वांस उपयोगी आहे म्हणून; आणि दुसरें असें कीं, त्यामुळें कादंबऱ्या, नाटकें इत्यादि-कांकडेच जो लोकांचा पूर्वी ओढा होता तो कमी झाला. मनोरंजनाचा दुसरा प्रकार कांहींच अनुकूल नसल्यामुळें पूर्वी लोकांची कादंबऱ्यांकडे विशेषतः भर असे; व यामुळें मुख्यत्वेंकरून तरुण लोकांस त्या फार अनर्थावह होत. त्या वाचणारे बहुधा तरुण वयाचेच असायाचे, व लिहिणारेहि तसेच; मग काय विचारावें ? त्या वयांत अतःकरणवृत्ति अत्यंत सुक्षोभ असल्यामुळें अद्‌भुत असंभवी गोष्टींत मन रंगून शृंगारवीरादि रस, जे त्यांत अतिशयोक्तीनें वर्णिले असतात त्यांत तल्लीन होऊन मन भडकून जाई. डॉन् क्विक्सोट्[1] किंवा रासेलसांतील ज्योतिषी यांची जशी अवस्था होऊन गेली तशाच प्रकारची बहुधा या वाचकांची होण्याचा संभव असे. म्हणजे विलक्षण कल्पना व चमत्कारिक तरंग मनांत भरून लौकिक

१. हा जगद्विख्यात ग्रंथ एका स्प्यानिश ग्रंथकारानें दिवाणी तुरुंगांत असतां आपल्या कर्मणुकीकरितां लिहिला. यांतील नायकाचेंच नांव ग्रंथास ठेवलें आहे. यानें 'नाईट' लोकांच्या गोष्टी इतक्या वाचल्या कीं, त्यांनीं त्याला वेड लागून आपणही त्यांसारखे अद्‌भुत पराक्रम करावे असें त्याच्या मनांत आलें, व तसें करण्यास तो बाहेर पडला असतां त्यावर जे प्रसंग गुदरले ते या ग्रंथांत वर्णिले आहेत. यांत हास्यरस चोहोंकडे भरपूर आहे.

व्यवहारास हे मनुष्य अगदीं कामाचे नाहींत असे होत. शिवायं मन बिघडण्यास व त्यास अगदीं निस:त्व करून टाकण्यासही कादंबऱ्या कारण होत. याचें उदाहरण आपल्या मराठींतीलच कित्येक कादंबऱ्या व नाटकें आहेत. व इंग्लंडांत सर वॉल्टर स्कॉट यांच्या पूर्वी जे कित्येक कादंबरीकार होऊन गेले त्यांपैकीं मोठे नामांकित होते ते सुद्धां महाचावट होते. पण या चावटगिरीचा अगदीं कळस झालेला ज्यास पहाणें असेल त्यानें 'डिक्यामेरॉन्' व 'हेप्ट्यामेरॉन्' हे ग्रंथ पाहावे. पहिला बोकेशियो नामक इटालियन ग्रंथकारानें रचला व दुसरा त्याच्या नमुन्यावर एका फ्रेंच बाईनें रचला. पहिला ग्रंथ रचण्याचा प्रसंग मोठा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. फ्लॉरेन्स (हें नांव विशेषत: इकडच्या लोकांच्या मनाशी पुष्कळ दिवस खिळून राहील !) या नांवाच्या शहरीं एके समयीं मोठी पटकी उठली असतां तेथील सात तरुण स्त्रिया व तीन तरुण पुरुष अशी दहाजणें गांवाबाहेर एका बागेंत जाऊन कांहीं दिवस राहिलीं. तेथें त्यांनीं परस्परांत कर्मणूक करण्याकरितां ज्या चमत्कारिक गोष्टी सांगितल्या त्या एकंदर मिळून हा ग्रंथ झाला आहे. दुसरा ग्रंथ तर वर सांगितल्याप्रमाणें एका स्त्रिनेंच लिहिला असून त्यांत सांगितलेल्या कित्येक गोष्टी तिनें स्वानुभवावरून लिहिल्या आहेत ! असो; इतकी बारीक माहिती येथें सांगण्याचा हेतु इतकाच कीं, या दोन ग्रंथावरून सर्व सुधारणेचें आगर जें युरोप खंड, सर्व सदाचरणाचें आगर जो ख्रिस्ती धर्म, सर्व सद्गुणांचें आगर ज्या तिकडील कुलीन स्त्रिया, त्या सर्वांचें किंचित् स्वरूप आमच्या वाचकांच्या लक्षात यावें ! पण ही गोष्ट इतालियन व फ्रेंच लोक, जे नखरेबाज व इष्की म्हणून साऱ्या युरोप खंडांत निवडले आहेत, त्याविषयीं झाली. आतां आपले धनी इंग्रज लोक. त्यांच्या मतें नीति व सदाचरण यांचें केवळ निधानच ते होत, त्याच्यात तरी वरील पुस्तकाचा कितपत तिटकारा आह तो पाहूं. यास प्रमाण दोनच गोष्टींचें पुरें आहे पहिलें हें कीं, त्यांचे आद्यकवि जे चॉसर त्यांनींच 'डिक्यामेरॉन्' मधल्या कित्येक गोष्टींचें कवितारूपानें निबंधन केलें आहे. यावरून त्या इटालियन ग्रंथाचा सदाचरणी इंग्लिश लोकांत किती लवकर व केवढा प्रसार झाला हें समजतें. दुसरी गोष्ट, अगदीं आलीकडे ड्रैडन् व पोप यांनींही तोच प्रकार केला

आहे.[1] असो; येथें लेखणीनें बरोबरच घांव घेतली; पण वरील माहिती आमच्या कोणत्याही वाचकांस नक्कीशी वाटेल असें आम्हांस वाटत नाही ! तेव्हां मन बिघडणें हा कादंबऱ्यांपासून होणारा एक अनर्थ आहे. दुसरा अनर्थ मनाचें दौर्बल्य. कादंबऱ्याच वाचण्याची ज्यास एकदां चटक लागते त्यास मग दुसरें कांहींच वाचावेंसें वाटत नाहीं. कादंबऱ्या भराभर वाचायच्या, व त्यांत समजण्यासही कांही कठीण नसतें; यास्तव विद्या काय ती हीच असें वाचणारास वाटूं लागून त्याहून वरचढ जे शास्त्रीय वगैरे ग्रंथ त्यांचा त्यांस त्रासच येऊं लागतो. त्यांत शिकणारानें आपली मति शिरकवावी लागते, कारण ते कठीण व गहन विषय पडले; पण तें यांच्यानें होत नाहीं अशी एकदा संवय पडून गेली म्हणजे मग ती कधींही मोडता येत नाहीं. याप्रमाणें वाजवीपेक्षां जास्त असा हा कादंबऱ्यांचा नाद लागला असतां तो मनास अपाय करतो. तें अगदीं निःसत्त्व होऊन जाऊन कोणतेंही श्रमांचें काम त्यास झेपेनासें होतें.

पण मनोरंजक इतिहासाच्या योगानें वरील तिन्ही अनर्थ टळून कादंबऱ्यांचें तर कार्य होतें. त्यांत निव्वळ सत्यच लिहावयाचें असतें यास्तव भुताराक्षसाच्या, 'नाइट' लोकांच्या, अशा विलक्षण प्रकारच्या, अद्भुत गोष्टी त्यांत येत नाहींत. तरी पण त्यांत अद्भूत रस नसतो असें नाहीं. नेपोलियनसारख्या वीरांच्या, वॉट्सारख्या कल्पकाच्या, बेकन्सारख्या तत्त्वज्ञांच्या चरित्रांत अद्भुत रसास काय उणीव आहे ! पण दोहोंत फरक किती आहे तो पहा ! पहिल्या वाचून जसे पुष्कळ भ्रमिष्ट झाले तसे दुसऱ्याच्या योगानें कधीं तरी होतील काय? दुसरी गोष्ट मन बिघडणें. हेंही इतिहासवाचनानें होण्याचा अगदीं संभव नाहीं हें उघडच आहे. तिसरें मनाचें क्षीणत्व. हें इतिहासवाचनानें होण्याचा संभव मुळींच नाहीं. हें तर काय, पण जसाजसा इतिहासाचा कोणास नाद लागत जाईल, तसतसें त्याचें मन विशाल व विचारक्षमच होत जाईल. फार तर काय पण त्यास

---

१. **चॉसरचे व ड्रायडनचे** ग्रंथ सहज मिळण्यासारखे नाहींत; त्यांतून पहिल्याचे तर समजण्यासारखेही नाहींत. यास्तव वरील गोष्टीचा ज्यास प्रत्यय घेणें असेल त्यानें **पोपचें** 'January and May' हें काव्य पाहावें.

द. क्र. ९७५६

हा नाद लागला हेंच वरील दोहोंचें मोठें चिन्ह होय ! तर याप्रमाणें इतिहास हा सर्व प्रकारें हितकर असून कादंबऱ्याप्रमाणें त्यापासून कोणताही अपाय होण्याचा संभव नाहीं. शिवाय सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, इतिहास अक्षरशः खरा असल्यामुळें त्यांतील गोष्टी जशा मनावर पक्क्या ठसल्या जातात, तशा कादंबऱ्यांतील ठसत नाहींत.

२. इतिहासापासून पांचवा उपयोग राज्यकारणी पुरुषांस म्हणजे मुत्सद्यांस होय. इतिहासाचा मुख्य उपयोग वास्तविक पाहतां हाच असून याचकरितां इतिहासकार पूर्ववृत्त लिहून ठेवतात. व्यक्तिभूत मनुष्यास जितका चरित्राचा उपयोग तितकाच मुत्सद्यांस इतिहासाचा : म्हणजे 'पुढच्यास ठेंच मागला शहाणा' या मराठी म्हणीप्रमाणें पूर्वी होऊन गेलेल्या मनुष्याचा अनुभव जसा पुढच्यांस उपयोगी पडतो, त्याचप्रमाणें या पृथ्वीवर आजपर्यंत जीं अनेक राज्यें होऊन गेलीं त्यांचा अनुभव हल्लींच्यांस कामास येतो. राज्यास हितकर गोष्टी कोणत्या, अपायकारक कोणत्या, त्यांवर अनिष्टें आलीं असतां कोणत्या युक्तिप्रयुक्तिनें त्यांचें निवारण करावें, तंटे बखेडे कशामुळें उत्पन्न होतात, प्रजेस सुखी ठेवण्याचे मार्ग कोणते, कायदेकानू कशा प्रकारचे असावे, वगैरे शेंकडों गोष्टी पूर्वींच्या इतिहासावरून सध्यांच्या राज्यकर्त्यांस समजल्या आहेत. एखादें जुनाट वडाचें झाड अवाढव्य विस्तार पावून शेवटीं वठलें असतां त्याचे नवे सोट जसे वाढत जाऊन मूळच्या झाडाच्या जागीं होतात, त्याचप्रमाणें रोमच्या अफाट पसरलेल्या बादशाहींतून हळू हळू अलीकडच्या युरोपांतील अनेक राज्यें उद्भवलीं. भाषा, रीतिरिवाज वगैरेंचें मूळ जसें तें राज्य होय, तसेंच राज्यव्यवस्थेचा पायाही सध्यांच्या राष्ट्रांचा तेथपासूनच आहे. हा बळकट आधार नसता, तर युरोपाची स्थिति आज कोणत्या प्रकारची असती हें सांगणें कठीण आहे ! पहा बरें, पंधराव्या शतकांत ग्रीक व रोमन विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तिचा प्रसार युरोपभर होतांच त्या खंडांतील सगळ्या राष्ट्रांस एकदम किती जोर आला ! हरएक गोष्टींत तेथील लोकांचा पगडा साऱ्या पृथ्वीर जो तेव्हांपासून बसला आहे त्यास मुख्य कारण पाहूं जातां वर सांगितलेल्या प्राचीन राष्ट्रांनीं ग्रंथांत सांठवून ठेवलेलें अमोलिक ज्ञानभांडार एकदम त्यांच्या हातास जें लागलें तेंच होय. राज्यरीति, सैन्यव्यवस्था

कायदेकानू वगैरे सर्व वरील जुन्या लोकांमध्येंच पूर्ण दशेस आलीं असल्यामुळें तीं आलीकडील राष्ट्रांस आयतींच उपयोगीं पडलीं. तेव्हां हा त्यास केवढा लाभ झाला ! पूर्वी नशिरवान् नामें करून एका पारस देशाच्या राजानें[1] मुद्दाम एक वकील हिंदुस्थानांत पाठवून आपल्या संस्कृत 'हितोपदेशा 'चें फारशीभाषेंत भाषांतर करविलें; रोमच्या सेनेट सभेनें, तसेच तीन वकील अथेन्स शहरास पाठवून तेथून सोलनचे कायदे आणविले; लैकर्गस्ही स्पार्टन लोकांस राज्यव्यवस्थेचे नियम बांधून द्यावे या उद्देशानें एशिया मैनर, इजिप्त या दूरदूरच्या देशांस जाऊन हिंदुस्थानांतही आला होता असें म्हणतात;—असे दीर्घ प्रयत्न त्या वेळच्या लोकांस राज्यनीतिविषयक ज्ञान मिळायास पडत असत ! आणि तेवढेही त्या ज्ञानाची योग्यता जाणून लोक करीत ! मग आलीकडच्या हजारों नव्या सोईंच्या योगानें तेंच अमोलिक ज्ञान जर सर्वांस सुलभ झालें आहे, तर हा लाभ लहानसान काय ? मागें इतिहासाचे जे आक्षेपक सांगितले ते एवढाही विचार करीत नाहींत, कीं मुळांशिवाय जशी झाडाची स्थिति संभवत नाहीं, किंवा पायावांचून जसें घर राहणें अशक्य, त्याप्रमाणेंच प्राचीन स्थितीशिवाय कोणत्याही राष्ट्राची त्या त्या वेळची नवी स्थिति आली नसते. नुसत्या वरवर पाहणाराची दृष्टि मुळापर्यंत न पोंचल्यामुळें त्यास वाटतें कीं, सध्यां जें रूप दिसतें आहे तें स्वयंभूच आहे यास आदिकारण किंवा आधारभूत असें कांहींच नाहीं. ही मूर्ख समजूत मनांत धरून असे लोक आपल्या अज्ञानास अरसिकतेस. किंवा आळसास इतिहासाचा मुळीं तिरस्कारच करून लपवूं पाहतात. असो; तेव्हां एकाद्या राष्ट्राविषयीं पूर्ण साद्यंत ज्ञान ज्यास संपादन करायाचें असेल, त्यास त्याची त्या वेळचीच स्थिति पाहिल्यानें तें कधीं होणार नाहीं. अगदीं मूळारंभापासून कसकसे फेरफार होत गेले ते पूर्णपणें जेव्हां तो लक्षांत आणील तेव्हांच त्या वेळच्या स्थितीविषयीं त्यास यथार्थ

१, संस्कृत ग्रंथांचा कालक्रम बसण्यास कांही गोष्टी ठोकीव माहित आहेत—जसें शिकंदराची स्वारी, काश्मीरच्या श्रीहर्षराजाचा शक सन १११३, चिनी प्रवाशांचे ग्रंथ. यांपैकींच वरील राजाचा शक (सुमारें इ. स. ५६०) हा आहे. यावरून **कालिदासादि**कांसही जे आठव्या शतकापर्यंत ओढतात त्यांनीं अंमळ जपून लिहावें.

ज्ञान होईल. तसेंच त्याच्या भावी स्थितीविषयीं जर अटकळी बांधायाच्या असतील तर तेंही वरील समग्र ज्ञान असल्याखेरीज त्याच्यानें होणार नाहीं.

३. इतिहासाचा शेवटला एकंदर उपयोग म्हटला म्हणजे मनाचें पोषण होय. म्हणजे त्याच्या वाचनानें व मननानें मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भ दशेस पोंचतात. एक तर स्मरणशक्ति. शक, मिति, स्थलांचीं नांवें, मनुष्यांचीं नांवें व एकंदर मजकूर हीं अगदीं बरोबर ध्यानांत ठेवावीं लागल्यामुळें या शक्तीचें काम पडून ती उत्तरोत्तर अवश्य वाढत जाते. दुसरी कल्पनाशक्ति. इतिहास म्हणजे अर्थातच गत गोष्टींचा वृत्तांत असल्यामुळें तो मनांत यथास्थित आणण्यास कल्पनेचें काम पडतें ज्या काळचा, ज्या देशाचा इतिहास वाचायाचा, त्याची विशेष स्थिति पूर्णपणें लक्षांत आणल्यावांचून तो कधीं समजत नसतो; यास्तव तसें होण्यास वाचणाराची कल्पनाशक्ति चांगली चलाख असावी लागते. ही चलाख कल्पना व मोठी पोक्त किंवा सूक्ष्म बुद्धि हीं एक नव्हेत. यास्तव कविता, कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांचा तिरस्कार करणारे जसे मोठे बुद्धिमान्ही आढळतात, तद्वतच मागें सांगितल्याप्रमाणें जॉनसन्सारखे इतिहासास तुच्छ करणारे पंडितही आढळतात. पण या त्यांच्या अवहेलनेनें ते स्वतःस जितका अपाय करून घेतात तितका वरील कवितादिकांच्या अधिदेवतांस होत नाहीं ! त्यांचें मनोहर सौंदर्य लेशमात्रही कमी होत नाहीं, व त्यांच्या रसलुब्ध खऱ्या भजकांतूनही एकाची सुद्धां भक्ति लवमात्रही उडत नाहीं. हे अवहेलना करणारे मात्र कल्पनेचे जड ठरून वृद्धप्रमदान्यायानें उपहास्य होतात. पुरूरवा राजानें उर्वशीस प्रथमच पाहिलें असतां तिला निर्माण केल्याच्या संबंधानें तो ब्रह्मदेवास उदेशून जें म्हणतो तेंच अशा पंडितांस निराळ्या संबंधानें लागेल ![1] असो; तेव्हां इतिहास—त्यांतूनही विशेषतः

---

१. अस्याः सर्गविधौ प्रजापतिरभूच्चंद्रो नु कांतिप्रदः
शृंगारैकरसः स्वयं नु मदनो मासो नु पुष्पाकरः ।
वेदाभ्यासजडः कथं नु विषयव्यावृत्तकौतूहलो
निर्मातुं प्रभवेन्मनोहरमिदं रूपं पुराणो मुनिः ॥
विक्रमोर्वशीय अंक १.

(पुढें चालू)

दूरच्या देशांचा किंवा काळाचा——यथास्थित समण्यास व त्याची पुरतेपणीं गोडी लागण्यास वाचकाची कल्पना जागृत असली पाहिजे. असें असल्याविना त्या त्या इतिहासपात्राशीं तादात्म्य पावून तो तो वृत्तांत केवळ प्रत्यक्षसा मनास भासणें हें घडत नाहीं. तेव्हां ही शक्ति इतिहास वाचणाराच्या अंगीं मूळची असली पाहिजे. ती असली म्हणजे मग अर्थात्च याच्च वाचनानें ती पुढें वृद्धिगतही होत जाते. इतिहासांत नाना प्रकारचे देश, पुरुष, प्रसंग यांचें वर्णन असल्यामुळें कल्पनाशक्तीस रमण्यास हवा तेवढा अवकाश सांपडतो, व त्यामुळें तिचें अर्थात्च अधिकाधिक पोषण होत जातें. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, इतिहासांतील हकीकत सगळी अक्षरशः खरी असल्यामुळें–कारण तशी ती असेल तरच तो इतिहास—कादंबऱ्यांच्या असत्यतेमुळें जो एके रीतीनें त्यांपासून मनास खेद होतो तो यापासून होत नाहीं. पहा बरें, 'अरबी भाषेंतील गोष्टी' तल्या सिंदबाद दर्यावर्दीच्या निरनिराळ्या सफरी वाचल्या असतां मनांत मोठा चमत्कार वाटून कल्पनाशक्ति त्यांत अगदीं चूर होऊन जाते ! पण काय ? वाचणें संपतांच लागलेंच मनांत येतें कीं, या सर्व गोष्टी मोठ्या मौजेच्या खऱ्या पण शेवटीं काय— येथून तेथून खोट्या ! पण तेंच कोलंबसाच्या सफरी वाचा; म्हणजे मनाची कशी स्थिति होते ! पहिल्याच्या सफरी आजपर्यंत लक्षावधि लोकांनीं वाचल्या असतील, व तशाच दुसऱ्याच्याही वाचल्या असतील; पण पहिल्या वाचल्यावरोबर कोणी मनुष्य गलबत तयार करून त्याच्यासारखें हिरे आणण्यास निघाला असें वाटत नाहीं; पण दुसऱ्यांचा परिणाम काय झाला तो कोणासही–विशेषतः हिंदूंस तर–सांगायास नकोच ! त्याच जगप्रसिद्ध पुस्तकांत अल्लादिनाच्या वाड्याचें वर्णन आहे, आणि

(मागील पानावरून पुढें चालू)

" हिला निर्माण करतेवेळीं चंद्र प्रजापति झाला असावा, किंवा वसंत झाला असावा, अथवा एक्या शृंगारांतच जो नेहमीं रमतो असा साक्षात् मदनच प्रजापति होऊन त्यानें हिला घडली असावी ! कां कीं, सदासर्वकाळ वेद धोकून धोकून ज्याच्या बुद्धीस जाड्य आलें, व ज्यास विषयांचो प्रीति भासेनाशी झाली, तो जुनाट ऋषि (ब्रह्मदेव) असें मनोहर रूप उत्पन्न करण्यास कसा समर्थ होईल ?

इतिहासांत ताजमहालाचें वर्णन आहे; पण दोहोंच्या वाचनानें वाचकांच्या मनांत किती भिन्न वृत्ति उद्भवतात ! याप्रमाणेंच यक्षांनीं, राक्षसांनीं केलेलीं अद्भुत कृत्येंही त्यांत घातलीं आहेत; पण तीं वाचून मनास कांहीं वेळ कर्मणूक होते इतकेंच. इकड वायुवेगानें चालणारे अग्निरथ, तेलाशिवाय, बत्तीशिवाय जळणारे दिवे, एक ठोका मुंबईस, तर दुसरा ठोका लंडनास अशी मनाच्या वेगानें धांवणारी वीज, हत्तीच्या अंगासारख्या धोंडी एकावर एक रचून उभारलेले मनुष्याकृतीचे पर्वत–कीं जे आतां जितके जुने भासतात तितकेच हिरॉडटसास भासले,–डोंगर कोस कोस पोखरून कोरून काढलेलीं विशाल मंदिरें–ज्यांनीं आपल्या प्रचंडतेपुढें निष्ठुर, हेवेखोर व दुराग्रही अशा यवनांसही हात टेकायास लावून त्यांकडून त्यांचा दुष्ट हट्ट सोडविला—इत्यादि मानवी बुद्धीचे व प्रयत्नाचे अद्भुत प्रभाव जेव्हां मनुष्य पाहतो तेव्हां त्यास वरील खोट्या गोष्टी पोरकट वाटूं लागतात ! असो; तेव्हां सांगायाचें तात्पर्य काय कीं, मनुष्याच्या मनास स्वभावतःच सत्य आवडत असतें, यास्तव खऱ्या इतिहासाकडे त्याची प्रवृत्ति जितकी सहज व जितक्या प्रेमानें होईल तितकी कल्पित कादंबऱ्यांकडे होणार नाहीं व म्हणूनच मनुष्याची कल्पना इतिहासवृत्तांतांत मोठ्या आवडीनें निःशंक रमते; कारण त्यांत असत्यतादोष मुळींच नसल्यामुळें तींत यथेच्छ विहार केल्याचा तीस अगदीं शीण वाटत नाहीं. तसेंच इतिहासांतील विषय पुष्कळ प्रत्यक्ष इंद्रियगोचर होण्यासारखे असल्यामुळें त्यांचा ठसा मनावर जितका ठळठळीत उठण्यासारखा असतो तितका कल्पित कथांतील विषयांचा अर्थातच नसतो. असो, तर याप्रमाणें कल्पनाशक्तीस रंजविण्याच्या संबंधानें कादंबऱ्यांत व इतिहासांत इतकें अंतर आहे. तेव्हां इतिहासाच्या वाचनानें वाढली जाणारी दुसरी मानसिक शक्ति कल्पना होय. तिसरी विचारशक्ति. ही इतिहासाच्या ज्ञानानें वाढते हें अगदीं उघड आहे,—फार तर काय पण हें नुसतें लिहणें म्हणजे 'सूर्य तेजाळ आहे,' 'पाण्याच्या अंगीं प्रवाहित्वधर्म आहे,' इत्यादि वाक्यांप्रमाणें अत्यंत प्रसिद्ध अर्थाचा अनुवाद केल्याप्रमाणें असमंजस दिसतें. तथापि ती कां वाढतें व कशी वाढते यावर अंमळ विस्तार करणें जरूर आहे. एक तर इतिहासांत तऱ्हेतऱ्हेची माहिती

असल्यामुळें मनाच्या कोठारांत पुष्कळ नव्या गोष्टींचा भरणा होतो. त्या तर्क चालविण्यास किंवा हातीं घेतलेल्या विषयास वैचित्र्य किंवा विशदत्व देण्यास उपयोगीं पडतात. दुसरें, इतिहासांत निरनिराळ्या पात्रांचे निरनिराळे गुणदोष, निरनिराळे स्वभाव, निंरनिराळ्या कृति स्पष्ट दाखविल्या असतात. यास्तव मानवी स्वभावाचीं अनेकविध अशीं चित्रविचित्र रूपें वाचकांच्या दृष्टीस पडून त्यांचें व्यवहारांत अत्यंत उपयोगी असें मार्मिक व पूर्ण ज्ञान त्यांस होतें. निरनिराळ्या देशांतील लोकस्थिति, राज्यव्यवस्था, रीतरिवाज, धर्मादि विषयांवर समजुती, वगैरे कळल्या असतां मनुष्याची नजर दूरवर फांकते. त्यामुळें बुद्धीची पोंच वाढून एकंदर वस्तुमात्राविषयीं त्यास पहिल्याहून विशेष यथार्थज्ञान होऊं लागतें. एकच स्थितिविशेष नेहमीं दृष्टीसमोर असल्याच्या योगानें बुद्धीवर जो संकुचितत्वाचा वाईट संस्कार घडलेला असतो तो मोडण्यास दोनच मार्ग आहेत. एक देशोदेशीं हिंडून परराष्ट्राविषयीं प्रत्यक्ष माहिती करून घेणें; आणि याच्या खालोखालचा दुसरा मार्ग म्हटला म्हणजे अर्थात्च तसें ज्यांनीं केलें आहे त्यापासून भाषणद्वारां किंवा लेखनद्वारां तें ज्ञान मिळविणें. आतां पहिला मार्ग व दुसऱ्यांतील पहिली सोय हीं फारच थोडयांस अनुकूल असतात, यास्तव एकंदर लोकांच्या उपयोगाचा मार्ग म्हटला म्हणजे इतिहास, देशांतरवर्णनें, प्रवासाच्या हकीकती वगैरेच, होत. याचा यथास्थित अभ्यास केला असतां कूपमंडूक किंवा उंबरांतले किडे यांसारखी सदोदित अवस्था असल्याच्या योगानें ज्या मूर्ख समजुती व जे दुराग्रह मनास स्वभावतःच जडून काळेंकरून त्यांस अगदीं खिळून जातात ते दूर होतात. शहाणे काय ते आम्ही; रीतभात उत्तम म्हणजे काय ती आमचीच; सर्व सुधोरणेचें आगर म्हणजे आमचाच देश; खरा व सदाचरणप्रवर्तक असा आमचाच धर्म–बाकीच्यांचें म्हणजे निवळ थोतांड व लोकभ्रष्ट—; देवाचे एकुलते एक लाडके असे आम्हीच; त्यानें आमच्याच भूमींत अवतरून आपलें शुभवर्तमान इतर सर्व पापमग्न व मरणोत्तर अक्षय नरकाचे धनी होणाऱ्या लोकांस जाहीर करण्याचा आम्हांस अधिकार दिला आहे; आमची भाषा उत्तम; आमची विद्या, आमच्या कला याच बाकीच्या साऱ्या जगांत वंद्य;–फार तर काय, पण आमची पोषाकाची तऱ्हा, आमची जेवणाखाण्याची तऱ्हा, आमची

तोंड धुण्याची तऱ्हा, ही सुद्धां सर्वांत उत्कृष्ट; अशा प्रकारच्या ज्या निराधार कोत्या समजुती त्या नाहींशा होऊन इतिहासाच्या योगानें आपणांविषयीं व इतर राष्ट्रांविषयीं यथार्थ ज्ञान वाचकांस होतें.[1] आपली मोठी मानवजाति जी साऱ्या भूमंडळावर पसरली आहे, व एकेक राष्ट्र केवढेंही ज्ञानसंपन्न किंवा थोर असलें तरी तें जिचा केवळ एक कोपरा असतें, तिचें सर्वांशीं जेव्हां पर्यालोचन करावें तेव्हांच तिचें एकंदर खरें स्वरूप लक्षांत येतें. मनुष्यस्वभावाच्या नित्य व शाश्वत स्वरूपापासून त्याचें आगंतुक म्हणजे देशकालविशेषजन्य स्वरूप निवडतां येण्यास अर्थात् असेंच एकंदर सर्व राष्ट्रांचें मनानें आकलन झालें पाहिजे. असो; तेव्हां मनाचा दृक्प्रदेश वाढवून कोत्या समजुतीपासून व भ्रमांपासून इतिहास त्यांस मुक्त करितो, व आपणांविषयीं व इतरांविषयीं यथार्थबुद्धि मनांत आणून देऊन इतरांशीं सलोखीनें वागण्यास तो आपणांस शिकवितो हाही त्याच्या अध्ययनानें होणारा एक मोठा लाभ आहे. इंग्रजांचें राज्य या देशांत होऊन इतकें दिवस टिकलें, व पुढेंही बहुधा चिरकाल असेंच अबाधित चालेल, याचें एक मोठें कारण वरील गोष्टीच्या संबंधें त्यांच्यांत व मुसलमानांत जो मोठा भेद दृष्टीस पडतो तो होय यांत संशय नाहीं. इतिहासाच्या योगानें व राजकारणाच्या संबंधें विचारशक्ति वाढते हेंही वरील कलमांत सांगण्यांत आलेंच आहे. पण तें खुद्द राज्यकर्त्यांसच लागून होतें. प्रस्तुत प्रसंगीं हेंही दाखवायाचें आहे कीं, ज्याच्या हातीं राज्याधिकार लहान थोडा सुद्धां नाहीं अशा घरीं बसून असणाऱ्या सुख-

१. इतिहासापासून मनास जें शिक्षण मिळायाचें त्याचा उत्कृष्ट भाग वरील होय. हें यथार्थ ज्ञान मोठी निष्पक्षपात व उदार बुद्धि धारण केली, किंवा प्रत्यक्ष तो देश पाहिला, किंवहुना तेथें राहून तेथील विद्येचेंही अध्ययन केलें, तरीही नियमानें येईलच असें नाहीं. याचें उत्कृष्ट प्रमाण ज्यास पहायाचें असेल त्यानें हिंदुस्थानचा इतिहासकार **मिल्ल**, प्रसिद्ध ग्रंथकार **मेकॉले**, 'वासवदत्तेचे' प्रकाशक **डॉक्टर हॉल** यांचे ग्रंथ पाहावे ! यांनीं आमच्या देशाच्या संबंधानें कित्येक ठिकाणीं इतका शहाणपणाचा मजकूर लिहिला आहे कीं, तसा जर कोणी हिंदु त्यांच्या देशाच्या संबंधें लिहिता, तर हेच ग्रंथकार त्यास पोरापेक्षां पोर ठरविते, व त्यास कोठें तोंड काढूं देतेना !

वस्तु मनुष्यासही तशा प्रकारचें मार्मिक ज्ञान इतिहासापासून होईल. सध्यां इंग्लंडांत वगैरे अशा प्रकारचे विचार करणारे व अशा विषयांवर ग्रंथ लिहिणारे लोक सगळे मुत्सद्दीच असतात असें नाहीं; तर वर सांगितले तसे सुखवस्तु असणारे लोकही अशा विचारांत मग्न असतात. तेव्हां हा विषय राज्यकारणी पुरुषांचाच केवळ आहे असें नव्हे; अगदीं सामान्य मनुष्यांसही तो विचारार्ह आहे. राज्यप्रकारांपैकीं[1] उत्कृष्ट कोणता, किंवा अमुक अमुक देशास कोणकोणता विशेष हितकर; प्रजेस राजानें अगदीं अटकावांत ठेवावें कीं मोकळीक द्यावी, द्यावी तर कोठपर्यंत; राज्याचें हित होत असलें तर अनीति आचरावी कीं नाहीं, आचरली असतां तिचा परिणाम काय होईल; देशाच्या स्थितिविशेषाचे परिणाम एकंदर सर्व लोकांच्या मनावर व स्थितीवर काय होतात; राज्याचा आणि धर्मखात्याचा कितपत संबंध असावा; राजानें प्रजेवर धर्माच्या बाबतींत सक्ती करावीं कीं करूं नये; अशा रीतीचे शेंकडों विषय एकंदर सर्व लोकांच्या संबंधाचे आहेत; यास्तव यांवर इंग्लंड वगैरे देशांतून सारखी वाटाघाट चालू आहे. गेल्या शतकाच्या शेवटीं फ्रान्स देशांत जी मोठी धामधूम झाली त्यावेळेस सर्व युरोप व अमेरिका अगदीं गलबलून गेलीं; व सर्वांच्या तोंडीं लोकसत्ताक संस्थान चांगलें कीं एकराजक चांगलें हा वाद झाला.त्या प्रसंगीं त्या मोठ्या विषयांवर शेंकडों ग्रंथ झाले; पण ते आतां सर्व बुडून विख्यात वक्ता जो बर्क त्याचा ग्रंथ 'फ्रान्सच्या राज्यक्रांतीवर विचार' येवढा मात्र अजून सर्वत्र प्रसिद्ध आहे. या ग्रंथावरून त्या थोर तत्त्वज्ञाची विशाल बुद्धि स्पष्ट दिसून येते. या ग्रंथाविषयीं दुसरी विशेषत: सांगायची गोष्ट काय कीं, त्यांत ज्या कित्येक गोष्टींविषयीं मागील इतिहासाच्या अनुभवावरून त्या ग्रंथकारानें भाकीत केलें होतें तें पुढें बरोबर मिळून आलें. असो; वरील शेवटल्या

१. या शब्दाचा अर्थ आमच्या मराठी वाचकांस अंमळ फोडून सांगितला पाहिजे. हिंदुस्थानांत व साऱ्या एशिया खंडांत पूर्वीपासून तों तहत आजपर्यंत राजाच्या सत्तेखेरीज दुसरी सत्ता कोणास माहीत नाहीं. पण युरोपांत अल्पजनसत्ताक, प्रजासत्ताक, लोकसत्ताक असे अनेक संस्थानांचे प्रकार होते, व अजूनही प्रसंगानुसार स्थापित होतात.

गोष्टीवरून इतिहासाची थोरवी सर्वांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं; आणि सर्वांच्या, व विशेषत: राज्यकर्त्यांच्या, उपयोगीं इतिहासाचें ज्ञान किती पडण्यासारखें आहे हेंही त्यांवरून दिसून येईल. कोणी कोणी तर यावरून असेंही म्हणतात कीं, कांहीं काळानें इतिहासज्ञांस पूर्वीच्या अनुभवावर पुढें अमुक अमुक देशाची कसकशी स्थिति होईल याविषयीं अगोदर भाकीत करण्याची सुद्धां शक्ति येईल. असो; याशिवाय आणखीही एका प्रकारें विचारशक्ति वाढते. तो हा कीं, सगळ्या जगाचा इतिहास पहिल्यापासून आजपर्यंत सगळा एकदम मनांत आणला असतां जगदीशाचें वैभव त्यांत दिसून येतें. अगदीं प्राचीन राष्ट्रांची मूळची स्थिति कशी होती, व ती पुढें क्रमाक्रमानें कालगत्या कशी पालटत गेली, आणि असें होतां होतां हल्लींच्या काळीं जग कोणत्या स्थितीस येऊन पोंचलें आहे, याचा जो यथा-स्थित विचार करील त्यास एकंदर जगाच्या रहाटीचा रोख सुधारणुकेकडे आहे असें खास दिसून येईल. या म्हणण्यास रानटी लोकांनीं रोमन बादशाहांची धूळधाण करून टाकली, ख्रिस्ताच्या जन्मभूमीनिमित्त कोट्या-वधि युरोपियन लोक मरून शेवटीं त्यांसच मुसलमानांनीं माघारीं पिटून लावलें, फ्रान्स देशांत दंगा होऊन त्याची व त्यावरोवर सगळ्या युरोप खंडाची नासाडी झाली, वगैरे गोष्टी सकृद्दर्शनीं विरुद्धशा वाटतात; पण याच अनर्थाचे पुढें परिणाम कसे झाले याचा जो अंमळ विचार करील त्यास कळून येईल कीं, ते अनर्थ केवळ तात्कालिक असून त्यांपासून जगाचें चिरकाल कल्याण झालें आहे. सध्यां जी पृथ्वीवरील सुधारलेल्या देशांची स्थिति आहे तिजमध्यें व चारपांचशें वर्षांमागें जी होती तींत जमीनअस्मा-नाचा फरक झाला आहे असें म्हटलें असतां चालेल. हल्लीं अगदीं सामान्य मनुष्यास अशीं शेंकडों सुखें व सोई प्राप्त झाल्या आहेत, कीं ज्या त्या वेळीं मोठ्या बादशहास अनुकूल नव्हत्या. सध्यां पोरांसोरांस अशा कित्येक गोष्टी माहित आहेत, कीं ज्या त्या वेळच्या मोठमोठ्या पंडितांच्या व तत्त्वज्ञांच्या स्वप्नींही कधीं आल्या नसतील. प्राचीन काळीं पक्षवायुग्रस्त शरीराप्रमाणें जगाची अवस्था होती; म्हणजे एक भागाचें सुखदु:खज्ञान दुसऱ्यास पोचण्याचा बिलकूल मार्ग नसे. यास्तव जवळजवळचे देश सुद्धां परस्परांविषयीं उदासीन असत. ग्रीक लोकांचें व पारसीकांचें युद्ध अनेक

वेळां मोठ्या निकराचें झालें; पण एकीकडे रोमन वगैरे लोक व दुसरीकडे हिंदु वगैरे, अगदीं गार होते. तसेंच दुसऱ्या पक्षीं हानिबाँलानें रोमचें राज्य हालवून दिलें, किंवा इकडे बौद्धधर्मी लोकांस ब्राह्मणांनीं तिबेटांत, लंकेंत, चिनांत हद्दपार करून घालवलें, पण ग्रीक लोक आपल्या ठिकाणीं स्वस्थ. पण आतां कसा चमत्कार झाला आहे तो पहा! अमेरिकेंत लोक भांडतात—एक होतात; आणि त्यांच्या संबंधानें पातालवासी जे मुंबईचे शेट-सावकार ते त्या भांडणाच्या योगानें एकदम कोट्याधीश होतात, आणि भांडण एकाएकीं मिटतांच घरोघर शेणाचे दिवे लागतात!—सारांश, तारायंत्राची तार जशी सध्यां पृथ्वीच्या एका टोंकाशीं हालवली असतां दुसऱ्या टोंकापर्यंत ती हालत जाते, त्याप्रमाणें एका भागाचें सुखदुःख तत्क्षणीं दुसऱ्या भागाच्या अनुभवास येतें; किंवा वरचें सादृश्य येथें घेतलें तर निरोगी मनुष्याच्या शरीराच्या कोणत्याहि भागास झालेलें ज्ञान जसें तत्क्षणीं सार्वत्रिक होतें तसा प्रकार होतो. असो; तेव्हां हा सर्व प्रकार जेव्हां लक्षांत येतो, व एकंदर जगाचा क्रम दिवसेंदिवस सज्ञान व सुखी होण्याचा आहे असें त्यांवरून समजतें, तेव्हां धर्मशील पुरुषांस मोठी उमेद येऊन त्यांची परमेश्वराचे ठायीं भक्ति दृढ होते.

याप्रमाणें या अचाट विषयाचें आमच्या वाचकांस किंचित् दिग्दर्शन करविलें. या विषयास साजेलसें पूर्ण निरूपण करणें म्हणजे सामान्य मनुष्याचें काम नव्हे. त्यास ग्रंथावलोकन पुष्कळ पाहिजे, जगाचा अनुभवही पुष्कळ हवा, आणि शिवाय विषय प्रतिपादन करण्याची शैलीही उत्कृष्ट साधलेली पाहिजे. हीं सर्व प्रस्तुत लिहिणाराच्या अंगीं आहेत असें त्यास अगदीं वाटत नाहीं. परंतु तीं सध्यांच्या वाचकांच्या मानानें पाहतां त्यांमहीं हावीं आहेत, किंवा त्यांपासून त्यांस हल्लींच्या स्थितींत उपयोग होणार आहे, असेंही पण त्यास वाटत नाहीं. वाचकांचें ज्ञान व विचारक्षतमा जसजशी वाढत जाते, त्याच मानानें त्यांची सेवा करण्यास तसे ग्रंथकारही अवश्य निपजत जातात; यास्तव आमचे इकडील वाचन इंग्लंडांतील वाचकांच्या तोडीचे होताहेत तोंपर्यंत आपणांत बर्क, मेकॉले, मिल्ल यांसारखे लिहिणारे खास निपजततील यांत संशय नाहीं! या दोन्ही गोष्टी परस्पर सापेक्ष होत हें

उघडच आहे. असो; तेव्हां सध्यांच्या स्थितीप्रमाणें आमच्या मराठी वाचकांस प्रस्तुत निरूपण पुरें आहे असें आम्हांस वाटतें. या व मागील अंकांत सांगितलेले इतिहासाचे उपयोग नीट मनांत भरून त्याच्या अभ्यासाकडे जर त्यांतून कित्येकांची प्रवृत्ति होईल तर या लेखाचे श्रम फुकट गेले असें होणार नाहीं.

येथवर इतिहासाविषयीं सामान्यतः विचार झाला. पुढील अंकांत विशेषतः आपल्या देशाच्या इतिहासाविषयीं चार शब्द बोलूं.

[1]न यत्र स्थेमानं दधुरतिभयभ्रांतनयना ।
गलद्दानोद्रेकभ्रमदलिकदंबाः करटिनः ॥
लुठन्मुक्ताभारे भवति परलोकं गतवतो ।
हरेरद्य द्वारे शिव शिव शिवानां कलकलः ॥

—भामिनीविलास

अंक ८ वा—(१) आपल्या देशाविषयीं एकंदर जगाचें मत. (२) आपलें स्वतःचें मत. (३) 'घासीराम कोतवाल;' 'पुण्याचें वर्णन.' (४) हिंदुस्थानच्या इतिहासाची इंग्रेजांस गोडी व माहिती. (५) आमची गोडी व माहिती. (६) उपसंहार. (७) लोकांस सूचना.

मागील अंकाच्या शेवटीं सुचविल्याप्रमाणें यांत आपल्या देशाच्या इतिहासाविषयीं म्हणजे या विषयावर इंग्रेजींत व मराठींत जे ग्रंथ आहेत ते कसे आहेत, सध्यां एकंदर लोकांस इतिहासाचें ज्ञान कितपत आहे, त्याची योग्यता त्यांस कितपत कळते वगैरेंविषयीं लिहायाचें आहे. आतां या विषयासच खुद्द आरंभ करायाच्या पूर्वी एका मोठ्या गोष्टीविषयीं बरेंच लिहिलें पाहिजे. ही गोष्ट हिंदुस्थानाविषयीं एकंदर जगाचें

---

१. "ज्या गुहेपुढें आलें असतां मदोन्मत्त हत्तींनीं भय पावून क्षणभरहीं तेथें न ठरतां दूर पळून जावें, जींत हत्तींच्या गंडस्थळांतील मोत्यांचा खच पडला आहे, त्याच सिंहाच्या गुहेंत आतां भालूची गर्जना ऐकू येते ! शिवशिव ! ! "

मत. हें चांगलें लक्षांत आलें असतां पुढील विषय पुरतेपणीं ध्यानांत येण्यास अगदीं सोपें पडेल.

१. आलीकडे पन्नास पाऊणशें वर्षांत या देशाची स्थिति मोठी चमत्कारिक होऊन गेली आहे. त्यास फारां दिवसांनीं मोठ्या सुदैवानें जें स्वराज्याचें वारें लागलें होतें तें एकाएकीं नाहींसें होऊन तो हल्लीं एका टोंकापासून तों दुसऱ्या टोंकापर्यंत परराज्याच्या सत्तेखालीं आला आहे. असें पूर्ण पराधीनत्व त्यास यापूर्वीं कधींही आलें असेलसें दिसत नाहीं. आणि याहूनही विशेष खेदास्पद काय कीं, हींतून मुक्त होऊन त्यास पुनः वर डोकें उचलण्याचा बहुधा प्रसंगही इतःपर येईलसा वाटत नाहीं. सध्यांच्या अत्यंत कष्टावस्थेंत इंग्रेजांच्या तरवारींच्या तिखट धारांशीं दयार्द्रतेचा जो कांहीं थोडाबहुत अंश मिश्रित असेल तेवढेंच बहुतकरून आम्हांस त्राण उरलें आहे ! असो; पण हीही दशा कदाचित् सह्य होती. कां कीं, 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण'[1] या न्यायानेंच एकंदर जगाची रहाटी चालली आहे. जो मनुष्य, जें कुळ, किंवा जें राष्ट्र आज भाग्याच्या परम शिखरास चढलेलें असतें तेंच उद्यां एकाएकीं डवघईस येऊन परवां त्याचा मागमूसही मागें राहात नाहीं. पहा बरें, 'ग्रीक' या नुसत्या नांवाबरोबर किती कल्पना एकदम मनांत उभ्या राहतात ! ज्या देशैकनिष्ट वीर्यापुढें झर्सीज राजाचें असंख्यात सैन्य भुतासारखें उडून गेलें, तें वीर्य; सारें जग अजूनही ज्यांच्या योगानें थक्क होतें असें वाक्चातुर्य व बुद्धि; मोठमोठ्या राजांस ज्याचा धाक पडावा असें उत्साहोद्दीपक वक्तृत्व; प्रत्यक्ष पाषाणास बोलता चालता करण्याची अपूर्व करामत; इत्यादि कल्पना वरील नांवाच्या केवळ उच्चाराबरोबर एकसमयावच्छेदेंकरून मनांत प्रवेश करतात ! व यामुळेंच हें नांव आजपर्यंत सर्वांच्या कानास अमृतासारखें मधुर लागत आलें आहे. फार तर काय, पण या चिमुकल्या देशाचा—कीं ज्याचा एकंदर विस्तार येथील एखाद्या जिल्ह्याइतका सुद्धां नसेल, त्याचा-इतिहास सर्व जगास एखाद्या महातीर्थप्रमाणें, पावन व तारकच जणों काय झाला आहे. यानेंच नुकतें सगळ्या युरोपास दीर्घकालक महानिद्रेंतून

१. 'चाकाच्या धांवाप्रमाणें मनुष्याची स्थिति वरचेवर पालटत असतें, म्हणजे एकदां खालीं होते, पुनः वर होते.'

एकदम जागविलें, व त्याचा प्रचार व प्रसाद जेथें जेथें होत जाईल तेथें तेथें त्याच्या मागोमाग विद्या व कला या आल्याच असें समजावें. आजवर जे युरोपांत व अमेरिकेंत थोर थोर लोक होऊन गेले त्यांपैकीं ज्याच्या बुध्दीनें येथून पेट घेतला नाहीं असा कदाचित् एकही मनुष्य सांपडणार नाहीं. असो; पण याच ग्रीक लोकांची लवकरच काय दशा होऊन गेली ! ज्या मासिडोनियन् लोकांस ते आपणांहून अत्यंत हीन समजून त्यांची अवगणना करीत तेच साऱ्या ग्रीस देशांत शिरजोर झाले; त्यानंतर अक्षरशून्य जे रोमचे दांडगे शिपाई त्यांनीं सहज तो सगळा देश सर केला आणि त्यांच्या मागून तर वाळवंटांतून भटकणारे आरब त्यांची एक टोळी इकडे येऊन त्यांनीं मूर्ति फोडण्यास व सगळ्या देशाची धूळदाण करण्यास आरंभ केला. लक्ष्मीच्या चंचलतेचें व दैवाच्या अस्थिर-पणाचें आणखी उदाहरण हावें आसल्यास रोमचेंही आहे ! या शहराच्या इतिहासापेक्षां चमत्कारास्पद दुसरें काय आहे ! रॉम्युलसानें जी मर्यादा पहिल्यानें नांगरानें आंखून दिली तीच वाढतां वाढतां कोठपर्यंत वाढली ? त्या वेळेस माहीत असलेलें सारें जग तींत आलें ! पण एवढें होऊनही शेवटीं काय राहिलें ? ज्या रोमन लोकांचा मागें पाय म्हणून कोठें कधींही आलाच नाहीं; ज्यांचें धैर्य असें अढळ कीं, केनीच्या मोठ्या लढाईंत हानिबालानें त्यांच बहुधा हातपायच मोडून टाकले असतांही जे यत्किंचि-त्ही न डगमगतां जो कोणी शत्रूस शरण जाण्याची मसलत काढील त्यास मारून टाकावें असा ज्यांनीं नियम केला, ज्या वीरांचा अद्भुत पराक्रम ऐकून ईजिप्त, हिंदुस्थान[1] अशा दूरदूरच्या देशांतूनही त्याकडे वकील येत, त्यांसच शेवटीं रानटी जे गॉल, व्यांडल, गॉथ, हून्स, आरब, तुर्क अशा लोकांपुढें थरथरां कांपावें लागलें ! असो; तर याप्रमाणें हें कालचक्र सतत फिरत आहे ! याच्या सपाटयांत कोणाचें काय होईल याचा काय नेम आहे ? तेव्हां आमचे पूर्वज केवढेही थोर असले, व सध्यां आम्ही कितीही

१. ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. मुसलमानांच्या संबंधानें 'रूमशाम' हा शब्दही आमच्यांत आला आहे. तुर्कस्थानच्या सुलतानास ते हा शब्द लावतात. तसेंच एका हिंदु चालीच्या कृत्रिम भूगोलावर 'रोमकपत्तनम्' असें नांव पाहिलेलें आम्हांस आठवतें !

नीच पदवीस आलों असलों, तरी त्यांत चमत्कार कसचा ? जी गति ग्रीक व रोमन लोकांसही चुकली नाहीं तीच हिंदूंसही प्राप्त झाली असल्यास नवल कसचें ? याप्रमाणें सध्यांच्या पक्षीं मनाचें समाधान करून घेण्यास सवड झाली असती; आणि आमच्या पूर्वींच्या वैंभवाकडे पाहून आमचा मान चोहोंकडे अद्याप असता ! पण हें तरीं कोठें आहे ? आमच्या देशाविषयीं व आमच्या लोकांविषयीं एकंदर जगाच्या कशा समजुती आहेत त्या येथें विशेष सांगायाला पाहिजेत असें नाहीं. मोठमोठ्या नामांकित इंग्रेज ग्रंथकारांच्या ग्रंथांत हिंदुस्थानासंबंधीं कांहीं प्रकरण निघालें असतां, पार्लमेंट सभेंत, येशू ख्रिस्तानें वरद हस्त डोईवर ठेवून सर्वज्ञ केलेल्या मिशनरी लोकांच्या मोलवान भाषणांत, त्यांच्या प्रसादानें सर्वज्ञतेची झुळूक ज्यांच्यावरून गेली अशा येशूच्या कळपांत जाऊन फसलेल्या विचाऱ्या बाटग्यांच्या दांभिक वोलण्यांत. किंवा ख्रिस्ताच्या शरीराचें व रक्ताचें भोजन पुरतेंच अर्धेमुर्धे मेंढे वनून कळपांत शिरलेल्या लबाड लांडग्याच्या कपटव्याख्यानांत. वगैरे जिकडे तिकडे एक घोष ऐकूं येतो, त्याचा सारांश हा कीं, आम्हांसारखे मूर्ख वेडगळ, भितरे, लवाड, दुराचारी असे आम्हींच ! इंग्लंडांत अगोदर हिंदुस्थानचें नांव निघालें कीं, लोकांच्या कपाळास तिडीक उठते; पण त्यांतूनही आमच्या देशास आपल्या वास्तव्यानें भूषित करण्यास व आम्हांवर उपकार करण्याच्या बुद्धीनें जे कोणी इकडे येतात, ते येतांना मेकॉले साहेबांचे ' लॉर्ड क्लाइव ' ' वॉरन हेस्टिंग ' हे निबंध रेल्वे स्टेशनावर विकत घेऊन वाचीत असतील ! साहेबाची वृत्ति मूळची सौम्य न ज्ञानही अगाध असतेंच; त्यांतून हे सुंदर निबंध वाचल्यावर तर हिंदुस्थानावर पाऊल ठेवतांच त्यांच्या मनात अशा वृत्ति उद्भवत असतील--' अहो ! क्लाइव व हेस्टिंग्स यांस इतके श्रम तरी पडले ! मीं असतों तर एका सपाटयास साऱ्या हिंदूंस चीत करून दिलें असतें ! मीं एक शब्द बोलेन तर त्यांचे सगळे ग्रंथ त्यांस कस्पटाप्रमाणें वाटवीन !' आम्हांस खचित वाटतें कीं मोठमोठ्या वरिष्ठ कामदारांपासून तों रेल्वेच्या य:कश्चित् गार्डापर्यंत जो अरेरावीपणा सर्वांत दृष्टीस पडतो तो इंग्रेज लोकांच्या अंगच्या उद्दामपणामुळें व त्यांचें हिंदुस्थानावर प्रभुत्व झालें आहे यामुळेंच केवळ आलेला नव्हे. हिंदु म्हणजे काय कस्पटापेक्षां

कस्पट, अधमांहून अधम, मूर्खांपेक्षां मूर्ख असे जे वेडगळ समज सांच्या लोकांचे झाले आहेत, व जे अधिकाधिक दृढ करण्याविषयीं ज्याचा त्याचा यत्न चालू आहे, त्यांचें जर आमचे लोक खंडन करतील, आणि आपली योग्यता प्रकट करतील, तर वरील दांडगेपणा बराच कमी होईल यांत संशय नाहीं. याविषयीं दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांची खात्री होईल. सर्व इतिहासज्ञांस, किंबहुना इकडील सर्व लोकांस, सर जॉन मालकम् साहेबांचें नांव ठाऊक असेलच. अव्वल इंग्रेजींत ज्या साहेबांचीं नांवें या प्रांतांत, आबालवृद्धांस माहीत होतीं, व ज्यांवर एकंदर लोकांचाही लोभ जडला असे, त्यांत अल्फिष्टन्च्या खालोखाल सदर्हू मालकम् साहेबाचेंच नांव होतें. या भल्या साहेबानें आपणाविषयीं हा मजकूर लिहिला आहे--

"माझी स्वतःची एतद्देशीय लोकांविषयीं पहिल्यानें काय समजूत होती ती अजून मला आठवते,–व ती आठवली असतां माझी मला मोठी शरम वाटते ! ती अशी होती कीं, माझ्या हाताखालीं जे नेटिव कामगार आहेत ते माझ्यापेक्षां सर्व प्रकारें किती हलके आहेत ! असें मला बरेच दिवस वाटत असे; पण जसजसें येथील लोकांविषयीं व माझे स्वतःविषयीं मला अधिकाधिक कळूं लागलें, तसतसा आमच्यामधील भेद कमी कमी होत गेला. आमचे इंग्रेज लोक आपल्या श्रेष्ठपणाचा मोठा डौल मिरवितात हें मीं पुष्कळ ठिकाणीं पाहिलें आहे व ऐकलेंही आहे; पण युरोपांतील व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रतींच्या लोकांची त्यांच्या त्यांच्या मानानें परस्पर तुलना केली, तर तिकडच्या लोकांस गर्व मिरविण्यास मोठेंसें कारण दिसेल असें वाटत नाहीं ! तसेंच सगळ्या हिंदूविषयीं एकंदर सरसकट जें मत ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येतें, कीं ते सारे लोक येथून तेथून लुच्चे, लबाड आहेत, त्यांची भल्यानें संगत करूं नये; आणि ते बुद्धीचे इतके मंद आहेत कीं विद्याभ्यासाच्या योगानें ज्यांचीं मनें विशाल व उदार झालीं अशा युरोपियन् लोकांच्या संभाषणास व स्नेहास ते अगदीं लायक नाहींत हेंही मला बिलकूल मान्य नाहीं."[1]

१. Brigg's Letters XXIII.

दुसरें उदाहरण कोलब्रूक नामक प्रख्यात संस्कृतज्ञाचें. आपल्या प्राचीन विद्येवर व्यासंग करून तिची माहिती युरोपांत ज्यांनीं करून दिली, या पंडितांच्या मालिकेंत याची गणना मोठी आहे. असें असतां याच साहेवाचे आधींचे उद्‌गार येथें दाखल केले असतां सर्वांस मोठा चमत्कार वाटेल; व ते पुनः वाचून कोलब्रूक साहेबास स्वतःही अनेक वेळां खचित लाज वाटली असेल ! ज्याची पुढें संस्कृतावर येवढी भक्ति जडली, व फारशी वगैरे भाषांशींही ज्यानें चांगला परिचय केला, त्यानेंच विल्किन्स नामक संस्कृतज्ञास 'संस्कृताचें वेड डोक्यांत शिरलेला' असें म्हणावें. 'एशियाटिक मिसलेनी' म्हणून एक बंगाल्यांत पुस्तक काढीत असत त्यास 'वेडगळ मजकुराचें आगर,' 'ऐन अकबरी' ग्रंथास 'हा नुसता उकिरडा आहे, यांत एकादें दुसरें मोतीं सांपडेल न सांपडेल' असें म्हणावें ही केवढी चमत्काराची गोष्ट ! या दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांस स्पष्ट दिसून येईल कीं एकंदर जगास आमच्या देशाविषयीं यथार्थ ज्ञान बिलकूल नाहीं. तसेंच यावरून आम्हांस असेंही खचित वाटतें कीं जे जे युरोपियन लोक येथें येऊन पुनः माघारीं गेले व जातात, त्यांच्या हिंदूविषयीं पहिल्या समजुतींत फारच तफावत पडत असेल ! नाहीं अशी मेकॉलेसारख्या दुराग्रही व कोत्या मनाच्या लोकांची किंवा युरोपांतून शुभवर्तमान घेऊन येऊन तें बहुधा जसेचें तसेंच गुंडाळून माघारीं न्यावें लागल्यामुळें निराश झालेल्या मिशनरी लोकांची मात्र समजूत पालटत नसेल! मग हे सद्‌गृहस्थ तिकडे गेल्यावर आपलें सर्व पांडित्य हिंदूंवर खुशाल बिनधोक ओतीत असतील. तिकडे अगोदर हिंदुस्थानाविषयीं माहिती इतकी जबर कीं, शिदा हिंदु कीं मुसलमान यांची भ्रांत, हैदर दिल्लीस राज्य करीत होता कीं त्रावणकोरास करीत होता कोण जाणे ! मुंबईस एकाद्यास पत्र लिहिलें असतां मद्रासेस व कलकत्त्यास असणाऱ्या इष्टमित्रांचा समाचार त्यास पुसायाचा ! केवळ नकाशाकडे पाहून किंवा इतिहासाच्या चार ओळी वाचून जी माहिती मिळायाची तिची इतकी भ्रांत; मग अशा लोकांस हिंदुधर्माची, हिंदूंच्या विद्येची, त्यांच्या भाषांची वगैरे माहिती कितपत असेल हें सांगायास नकोच ! फार कशाला, अजूनही हा प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडत नाहीं काय ? संस्कृतामध्यें ओ का ठो करतां येत नसतांही

हिंदुधर्माविषयीं सव्वासव्वा हात गप्पा झोकणारे पाद्रीसाहेब कोणी पाहिले नाहीं ? 'पंचतंत्र' या महाग्रंथाचें अकटोविकट अध्ययन करून खासे पीएच्. डी. बनून आलेले चारी वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें, यांत पारंगत झालेले श्वेतद्वीपीय व शर्मण्यदेशीय शास्त्री कोणास माहीत नाहींत ? पण अं: यांत काय आहे ? संस्कृतचसें काय, एशिया खंडांतील झाडून साऱ्या भाषांत ज्यांचा कोणी हात धरणारा नाहीं असे 'पूर्वदेशीय भाषांचा बाणा बाळगणारे' ही युरोपांत तयार होऊन इकडे येत नाहींत काय ? त्यांस तुम्ही आरबी विचारा, फारशी विचारा, चिनी विचारा; सगळ्यांत तयारी ! प्रश्न करण्याचा अवकाश ! साहेबांची बुद्धि येथवर फांकली असल्यावर मग युनिव्हर्सिटींत मराठीचीं बुकें नेमतांना 'विद्येपासून लाभ आणि संतोष', 'ईश्वरी ज्ञान' वगैरे लाखों ग्रंथ त्यांनीं निवडल्यास, किंवा 'दक्षिणा-प्रैज-कमिटी'कडे कसाही गद्य-पद्यात्मक ग्रंथ येवो, त्यावर फाडकन् न्यायाच्या तराजूंत जोखलेलें मत साहेबांनीं दिल्यास आश्चर्य कोणतें ? वा: ! एकूण अक्कल हा जिन्नस हल्लींच्या काळीं युरोपखंडांत जितका रगड पिकतो तितका एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी कधीं कोठेंही पिकला नसेल !! हा देवानें आपल्या आवडत्या लोकांवर एकदम महाप्रसाद केला असेल, किंवा त्यांच्या पुत्रानें आपलें शुभवर्तमान भूमंडळावर फैलावलेंसें पाहून खुष होऊन आकाशांतून हें अपूर्व पारितोषिक पाठवून दिलें असेल कोण जाणें ! असो, तेव्हां सांगायचें काय कीं, असे अरण्यपंडित इंग्लंडांत गेल्यावर 'एरंडोऽपि द्रुमायते' या न्यायानें तेथें मोठी प्रतिष्ठा व विद्वत्तेबद्दल मान पावतात. मग काय, सांगतील ती पूर्व-दिशा ! कोणत्याही लोकांस इतरांचा मोठेपणा व थोरवीचें वर्णन कधीं सहन होत नसतेंच; त्यांतून हिंदूंसारखे लोक, जे त्यांच्या सत्तेखालीं आलेले, त्यांचें वर्णन काय करावयाचें आहे ? यास्तव लोकांस हंसवायासाठीं व आपण किती थोर आहों हें त्यांस समजविण्यासाठीं हिंदूंचा जितका पाडाव करावा तितका इष्टच ! त्यांतून दुसरें काय झालें आहे कीं, हिंदूंचा फार प्राचीन काळापासून संपत्तीविषयीं, कलांविषयीं, विद्येविषयीं वगैरे मोठा लौकिक इतका कीं, युरोपांतील सर्व राष्ट्रें तिकडून आलेले अमोलिक जिन्नस पाहून हिंदुस्थानाविषयीं केवळ वेडीं होऊन गेलीं होतीं. कोलंबस अमेरिकेजवळील बेटांस जाऊन लागला, पण त्यास आपण हिंदुस्थानच शोधून काढला असें

वाटून त्यानें त्यास तेंच नांव दिलें, तें अद्याप चालत आहे. तसेंच ग्रीक व रोमन लोकांतही आमच्या पूर्वजांची मोठी ख्याति होती असें त्यांच्या ग्रंथांवरून वगैरे दिसतें.[१] तेव्हां येवढचा नामांकित लोकांचें नाक खालीं करून ते अत्यंत नीच आहेत हें दाखविलें म्हणजे इंग्रेज लोक मोठे थोर कसे नाहीं झाले? अर्थातच झाले! ख्रिस्ती धर्माकरितां वेडे होऊन गेलेल्या मिशनरी लोकांनीं हिंदूविषयीं एकंदरींत, व विशेषतः धर्माच्या संबंधानें, हवी तितकी वडबड केली तरी ती त्यांच्या थोरपणास व त्यांच्या येशूच्या नांवास शोभते खरी; पण सत्याचा, न्यायाचा, विद्वत्तेचा वाणा बाळगणाऱ्या अशा मोठमोठ्या ग्रंथकारांनींहि आमच्या देशांविषयीं झोटिंग-पाच्छाहीचा मजकूर लिहावा हा केवढा चमत्कार आहे? मेकॉलेसाहेब मोठ्या तीव्र बुद्धीचा, बहुश्रुतपणाचा, रसिकतेचा व निःपक्षपातपणाचा बाणा मारीत असतां हिंदुस्थानाच्यासंबंधानें जेथें जेथें त्यांनीं कांहीं म्हणून लिहिलें आहे, तेथें तेथें अत्यंत दुराग्रह–किंबहुना पोरकटपणाही–त्यांनीं प्रगट केला आहे, त्याची माहिती केवढी जबर होती हें त्यास दहा वारां भाषा येत होत्या यावरून व त्यांच्या ग्रंथावरून स्पष्ट दिसतेंच. दृष्टान्त देण्याविषयीं तर त्यांची हद्दच होती. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या ग्रंथांतून, अर्वाचीन युरोपांतील भाषांतल्या ग्रंथांतून, किंबहुना फारशी वगैरे इकडील ग्रंथांतूनही ते त्यांनीं प्रसंगवशात् दिले आहेत. पण नाहीं असा संस्कृतांतून! त्यांच्या तडाक्यांतून आमच्या कालिदासाचें 'शाकुंतल' नाटक, कीं ज्याचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध होतांच श्लेजेल, हंबोल्ड, गेटी अशा महापंडितांस त्यानें गर्कच करून टाकलें तें चुकलें असेल असें मुळींच

---

१. शिकंदर बादशहा हिंदुस्थानांत आला होता तेव्हां तेथील लोकांचें ज्ञान व चातुर्य पाहून तो चकित झाला, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तसेंच अनेक ग्रीक व रोमन ग्रंथकारांनीं हिंदुस्थानाविषयीं लिहिलें असून येथील लोकांविषयीं त्यांच्या मनांत आदराची बुद्धि पुष्कळ वागत असावी असें दिसतें. पोप कवीनें 'टेंपल् ऑफ् फेम' (कीर्तिमंदिर) या नांवाच्या काव्यांत पूर्वदेशीय विद्वत्समाजांत ब्राह्मणांस घातलें आहे :—

'—The sage Chaldeans robed in white appeared,
And Brahmans, deep in desert woods revered.'

संभवत नाहीं. त्यांतून साहेबमजकूर आमच्या देशांत तीन चार वर्षें येऊन राहिलेही होते. पण कांहीं नाहीं. फारशी ग्रंथांचा संबंध जसा त्यांनीं आपली माहिती दाखविण्याकरितां आपल्या ग्रंथांत कोठें कोठें आणला आहे, व फर्दोशी, शेक सादी वगैरे कवींचीं नांवें मोठ्या प्रेमानें आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं आणलीं आहेत, तशीं हिंदूकवींचीं मात्र बिलकूल कोठें नाहींत. आम्हांस खचित वाटतें कीं, त्यांनीं 'शाकुंतला' चें भाषांतर जें एकादे वेळेस कधीं वाचलें असेल, तें त्यांचे बंधु जेम्स मिल्ल इतिहासकार यांच्यासारखे घूकदृष्टीनेंच वाचलें असेल ! बरें ते इतके दिवस बंगाल्यांत राहिले तेव्हां नंदकुमाराच्या देशबांधवांची वर्तणूक त्यांनीं 'वॉरन् हेस्टिंग्स' या निबंधांत लिहिली आहे तशीच त्यांच्या नजरेस आली असेल काय ? म्हणजे लहानापासून थोरापर्यंत सर्वच लबाड, ठक, मूर्ख असे त्यास आढळले असतील काय ? तसेंच जेवढा टापू त्यांनीं पाहिला असेल तेवढ्यांत कोणत्याही संबंधानें चांगलें म्हणण्यासारखें त्यांत कांहींच दिसलें नसेल? काय असेल तें असो. गरीब बिचारा हिंदुस्थान ! त्याच्या धर्माची तर सर्वांनी पायमल्ली करावीच—'टुमी हिंदु लोक' करणाऱ्या पाद्रीसाहेबापासून तों मोठ्या लाटसाहेबापर्यन्त–त्याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथकारानेंही एके ठिकाणीं आपल्या नेहमींच्या चालीप्रमाणें त्यावर वर्षाव केलाच आहे. त्याचा अंमळशानें उल्लेख करूं—पण नवल पाहा काय कीं, आमच्या देशाची संपत्तिही साहेबमजकुरांस सहन झाली नाहीं ! ! त्यांनी वर सांगितलेल्या सर्वप्रसिद्ध निबंधांत असा मजकूर लिहिला आहे–"मोठ्या शहाण्या व्यापाऱ्यांसही हिंदुस्थानांतील संपत्तीचा मोठा भ्रम असे. त्यांच्या मनांत अशा वेडच्या कल्पना घोळत कीं, हिंदुस्थानांत हिऱ्यांचीं जोतीं, रत्नांचे खांब, सोन्याचे वाडे असे आहेत; पण खरोखरी पाहतां हा सगळा भ्रम होता. युरोपांत पोर्तुगाल देश, किंवा त्याहूनही ऐर्लंड देश भिकारी समजतात, पण हिंदुस्थान तर आयर्लंडाहूनही भिकारी आहे ! ! !" लॉर्डसाहेबांचें हें महावचन ऐकून आमचे वाचक खरोखर भांबावून जातील !–काय ? हिंदुस्थान आणि भिकारी !–वा: ! दिवसा ढवळ्या साऱ्या जगाच्या डोळ्यांत माती टाकण्याचें हें साहेबांचें धाडस त्यांचें त्यांसच शोभो ! हिंदुस्थान जर दरिद्री झाला तर मेकॉले साहेबांचा देश कशानें श्रीमंत झाला कोण जाणें? शिशाच्या

व कोळशांच्या खाणींनीं तर नाहींना ! कोणीं नाहीं म्हणावें ? उद्यां मेकॉले साहेबांचे एखादे बंधु साऱ्या जगास कदाचित् जाहीर करतील कीं, 'अहो ! हिमालयाविषयीं मोठ्या भूगोलवेत्त्यांसही मोठी भ्रांति आहे. आमच्या इंग्लंडांतील एकादें लहानसें टेकाड त्यास उंचींत हटवून टाकील ! तसेंच गंगा, ब्रह्मपुत्रा यांची सारे लोक रिकामी बढाई सांगतात. आमच्या लंडनांतलें एकादें गटार पुढें होईल तर त्यास मागें सारून देईल !'— जुलमी राजांनीं प्रजा चरकांतून पिळून काढल्यामुळें येथील लोकांस अगदीं त्राण उरलें नसतें असें जर आमच्या साहेबांचें म्हणणें असेल, तर वरील वाक्य क्लैव्, हेस्टिंग्स् अशांच्या देशबंधूंस फारच नामी शोभतें म्हणायाचें ! असो; यावरील मतावर आणखी विस्तार येथें करीत नाहीं; तें आमच्या वाचकांवरच आम्ही सोपवून देतों. आतां वरील महाविद्वान् साहेबांचें आमच्या विद्येच्या धर्माविरील मत ऐका.सरकारनें प्रजेवर धर्माच्या बाबतींत सक्ती करावी कीं नाहीं असा विषय चालला असतां तदनुरोधानें मेकॉले-साहेब हिंदुस्थानाविषयीं लिहितात–"परधर्म जबरीनें लोकांवर बसविला असतां जेथे त्यांचें अपरिमित कल्याण होईल असा देश हिंदुस्थानाखेरीज कदाचित् दुसरा कोठेंही सांपडणार नाहीं. तेथील धर्मासारखा नीचतेस पोंचलेला धर्म साऱ्या पृथ्वीवर कोठेंही नाहीं. त्याचा समूळ उच्छेद करून ख्रिस्ती धर्माचें अत्यंत हीन काळीं अत्यंत हीन जें स्वरूप कधीं कोठें चालू असेल तें त्याच्या जागीं आणून बसविलें असतांही त्या देशांतील लोकांचें अतोनात हित होणार आहे !"[1] वाः ! येथें तर आमच्या साहेबांनीं आपल्या सर्वज्ञतेची पराकाष्ठाच दाखविली ! आमच्या देशाकरितां राज्य-संबंधाचे कायदे करण्याच्या कामांत हे साहेब पुढारी होते,व सध्यां चोहोंकडे चालू असणारी शिक्षणपद्धतिही त्यांनींच घालून दिली, या डौलावर जाऊन आमच्या धर्माविरही ते घसरले नसतील ना ! वरील त्यांच्या लेखावरून पाहतां हे साहेब येशूचे पुरे भक्त असून आमच्या धर्मांतला त्यांस खडान् खडा माहीत होता याविषयीं आम्हांस संशयच उरला नाहीं ! साहेबांचें लिहिणें कोठेंही पहा; ते अर्धबोबड्या मनुष्यासारखें अर्धेमुर्धें कधीं नसायचेंच. त्यांतून हिंदुस्थानासारख्या देशांविषयीं तर तें अगदीं निक्षूनच

१. 'Gladstone on Church and State.'

असायाचें. त्यांची व त्यांच्या देशबंधूंची खात्रीच होऊन गेली आहे कीं, आमच्या देशाविषयीं कितीही वाईट लिहिलें तरी तें पुरें नाहींच होत! मग कशाला कसर करा? मानवी भाषेनें जेथवर म्हणून निंदा व्यक्त करतां येते तेथवर तिचें सत्व बघून बिचाऱ्या हिंदुस्थानवर वर्षाव ! ही मजा ज्यास पुरतेपणीं पाहायची असेल त्यांनीं जेम्स् मिल्ल् साहेबांचा 'हिंदुस्थानचा इतिहास' पाहावा. यांनीं तर इतिहास लिहिण्याची नवीन तऱ्हा जगांत प्रगट केली. इतिहासकारक इंग्लंडांत; ज्याचा इतिहास लिहावयाचा तो देश सात आठ हजार कोस दूर; तेथील लोक काळे का गोरे कधीं पाहिले नाहींत; तेथील भाषांच्या ज्ञानाच्या नांवानें तर आंवळचायेवढेंच म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं; अशा थाटानें हे साहेब इतिहास रचावयास बसले. बरें, इतकेंही नाहीं म्हटलें; येथील देशाची हकीकत ज्यांनीं लिहिली त्यांच्या लेखांवरच निर्वाह करून इतिहासकारानें आपलें बुध्दिकौशल्य योजून निदान निःपक्षपातबुद्धीनें खरा मजकूर तरी लिहिला असेल म्हणावें! पण तसें तर बिलकूल नाहीं. स्वतः हिंदुस्थानाविषयीं माहिती तर मेकॉले साहेबांच्याच तोडीची, तेव्हां दुसऱ्यांचे लेख तर पाहायाला हावेच; पण खुबी काय करायाची ! जेवढें म्हणून हिंदूच्या विरुद्ध लिहिलेलें सांपडेल तितकें मात्र घ्यावयाचें; पण त्यांच ग्रंथकारानें त्यांविषयीं जेवढा प्रशंसेचा मजकूर लिहिला असेल तेवढाच नेमका गाळायाचा! येवढी सगळी सामग्री असल्यावर मग हा इतिहास किती उत्कृष्ट उतरला असेल हें सांगायास नकोच ! या थोर इंग्रेज इतिहासकाराच्या मनांत आमच्या हिंदुस्थानाविषयीं केवढी बळकट अढी होती ती थोडक्या उदाहरणांवरून वाचकांस कळवितों. सारें जग ज्यांस पाहून विस्मय पावतें अशा डाकाच्या मलमली, आग्ऱ्याचा ताजमहाल, कालिदासाचें 'शाकुंतल नाटक,' वेरूळचीं लेणीं हीं सुद्धां साहेबांच्या पसंतीस उतरलीं नाहींत ! ! लेण्याविषयीं त्यांनीं एक तर्क सुचविला आहे तो मोठ्या मौजेचा आहे. साहेबांची कल्पना अशी धांवते कीं, हीं लेणीं कदाचित् भुईंतूनच स्वयंभू वर निघालीं असतील किंवा आकाशांतील ढगांतून खालीं कोसळलीं असतील ! ! ! विलायती कल्पना खरी ! असो; तेव्हां असे दिव्य इतिहास वाचून एकंदर जग आमच्या-

विषयीं कल्पना बांधणार ! मग त्यांत आमच्याविषयीं त्या आतांप्रमाणें अत्यंत मूर्खत्वाच्या असल्यास नवल काय ?

२. पण वरच्याहूनही विशेष मूर्खपणाचा व लज्जेचा प्रकार अजून सांगणें आहे. तो कोणता, तर खुद्द आपल्याच देशांतला. हिंदुस्थानाशीं येवढा निकट संबंध झाला असतांही इंग्रेजांस, व तद्द्वारेंच कायतें इतरांस ज्ञान होणार. यास्तव बाकीच्या एकंदर जगास, त्याविषयीं यथार्थ ज्ञान बिलकूल नाहीं. यांत वास्तविक पाहतां मोठेंसें आश्चर्य नाहीं. कारण आम्हांत व इंग्रेजांत हरएक गोष्टींत मनस्वी अंतर आहे. इंग्रेज तरवारीच्या जोरानें अरेराव झालेले,आम्ही हतवीर्य होऊन त्यांचे वंदे बनलेलों; आम्ही मूर्तिपूजक ते मूर्तिभंजक; आम्ही फार झाले तर बायकांस बरोबरीनें वागविणारे,त्यांच्यांत तर मडमसाहेब म्हणजे प्रतिदैवत; आम्हांस तर कीडमुंगीच्या हत्येनेंही अंगावर शहारा येणार, व प्राणांत ओढवला तरी मद्यास शिवणें नाहीं; त्यांच्यांत तर दोहोंसही मनाई नाहीं हें तर काय, पण दोनही पदार्थ अनुक्रमें करून त्यांच्या पैगंबराचें शरीर व रक्त मानले असून स्वर्गारोहणाची पहिली पायरीच होत; आमच्या स्त्रियांस परपुरुषाचें वारें सुद्धां पातिव्रत्य-भंजक; त्यांच्यांत हें तर काय, पण मोठया शृंगार वेषानें परक्याबरोबर नृत्य करणें हें अत्यंत प्रतिष्ठादायक ! याप्रमाणें हजारों गोष्टींत आम्हांत व इंग्रेजांत रात्रंदिसाचें अंतर असतां इंग्रेजांनीं आपल्या अत्युच्च पदापासून खालीं येऊन हिंदूंशीं स्नेह करावा व त्याविषयीं यथार्थ ज्ञान संपादावें हें व्हावें कसें ? हें ज्ञान त्यांस क्रमाक्रमानें होत जाईल खरें; पण मिल्ल, मेकॉले, हे पुरते लबाड ठरण्यास आणखी शंभर दीडशें वर्षें तरी हवींत असें आम्हांस वाटतें ! तेव्हां मुसलमानांचा व आमचा जितपत हल्लीं स्नेहभाव झालेला दृष्टीस पडतो तितका कदाचित् आमचा व इंग्रेजांचा होईल. पण तेथपर्यंत वर लिहिल्यासारखीं मतें मोठे ज्ञाते म्हणविणाऱ्या साहेबांच्याही मनांतून निघायाचीं नाहींत. तर याप्रमाणें परदेशस्थ लोकांच्या समजुती आमच्या विषयीं कितीही वाईट असल्या, व कशाही हेकटपणाच्या असल्या तरी त्यांस सवड आहे; पण तशाच, किंबहुना त्याहूनही वेडगळ, अशा जर आपणच आपणांविषयीं वागवूं लागलों, तर मग केवढ्या आश्चर्याची गोष्ट! आमची पुष्कळ दिवसांपासून पक्की खात्री होऊन गेली आहे कीं, इंग्रेज

लोकांच्या अज्ञानानें व दुराग्रहानें, ख्रिस्ती भटांच्या मतलबी व हेकटपणाच्या उपदेशानें, त्यांच्या पुढें पुढें करणाऱ्या बाटग्यांच्या व लबाड शिष्यांच्या मूर्ख व्याख्यानांनीं, सुशिक्षित म्हणविणाऱ्या अर्धबोबड्या लोकांच्या पोकळ शब्द-पांडित्यानें, एकंदर देशांत स्वतःविषयींच्या दुर्मतांचें जें महाजाल चोहोंकडे पसरलें आहे, तें पार नाहींसें करून लोकांचीं मनें साफ दुरुस्त करणें म्हणजे ग्रीक लोकांच्या हर्क्युलसानें ऑजियस् राजाच्या तबेल्यांत फार दिवस बिऱ्हाड करून राहिलेली लीद व घाण दोन नद्या धरून आंत सोडून जशी पार धुवून टाकली, तसेंच एकाद्या अचाट महावीरानें उठून येथें केल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं ! ज्या गोष्टी धडधडीत डोळ्यांपुढें जणों काय प्रत्यक्ष दिसणाऱ्या आहेत त्या सुद्धां नाहींशा म्हणून वरील लबाड व मूर्ख लोकांनीं पंचतंत्रांतील तीन धूर्तांच्या गोष्टीप्रमाणें आमच्या डोळ्यांत माती फेकली आहे ! त्या धूर्तांनीं त्या भोळ्या ब्राम्हणास फसवून प्रत्यक्ष पशूवर जशी कुत्र्याची भ्रांति करविली, त्याप्रमाणें आमचे पूर्वज सर्व राष्ट्रांत अग्रगण्य असतां व सऱ्या जगाचे गुरु असतां त्यांच्या पदरीं या कुत्सित लोकांनीं वेडगळपणा व मूर्खपणा बांधला आहे. बरें, हेंही असो; पण प्रत्यक्ष आमच्या पदरीं हल्लींही ते मंदता, क्रूरता, भीरुत्व इत्यादि दोष वांधू पाहत आहेत, तेव्हां त्यांच्या धाडसास काय म्हणावें ? युनिवर्सिटी स्थापन होऊन नुकतीं पंधरा सोळा वर्षें होताहेत तोंच ज्या लोकांत कितावी विद्वान् पैशापासरी या मोलानें विकूं लागले, ज्यांनीं खुद्द विलायतेंतही बुद्धिमान् म्हणून नाक मिरविणाऱ्या लोकांचा पहिल्याच सपाट्यास त्यांच्याच भाषेंत नक्षा उतरविला, ज्यांच्यांत न्यूटन् सारख्या महापंडितांच्या ग्रंथावरही कोटि चालविणारे आढळतात, तेच लोक 'बुद्धिमंद असून विद्वान् युरोपियनांच्या संभाषणास व स्नेहास लायक नाहींत !!' ज्याच्यांत प्रत्यहीं लक्षावधि निरपराध प्राण्यांचा वध होत आहे, ज्यांच्यांत मद्याचा तर कधीं कोणींच निषेध केला नसून ज्यांची मगरूरी इतकी कीं केवळ बोलतां बोलतां ज्यांनीं हातघाईस यावें, उन्मत्त पशूप्रमाणें मोठे विद्वान् म्हणविरांनींही द्वंद्वयुद्धें करावीं, ज्यांची सुधारलेलो कर्मणूक म्हटली तर 'पिज्यन् शूटिंग' म्हणजे खबुतरांच्या करंडयाचें झांकण उघडें करून तीं बिचारीं पांखरें वर उडूं लागलीं असतां त्यांच्या नाजुक अंगांत छरें रोंवावाचे अशा प्रकारची,

धर्माच्या कलहांत ज्यांनीं लक्षावधि लोकांचे प्राण घेतले, ज्यांच्या पवित्र शास्त्रानें अंगांत इतकी दया संचरते कीं, सगळें खंडचें खंड जी उजाड करण्यास प्रवृत्त करून मूर्तिपूजक काळ्या नीग्रो लोकांवर धाड घालून जनावराप्रमाणें त्यांचा राजरोज विक्रय केला असतांही जीस बाध येत नाहीं, ताडावर चढणाऱ्या काळ्या माणसांची ज्यांच्या अपूर्व ज्ञानदृष्टीनें माकडें बनून जे त्यांवर छऱ्यांची सहज लीलेनें कृपा करतात, अशा अत्यंत सुशील, अत्यंत दयाळू, अत्यंत धार्मिक, 'एका गालावर मारली तर दुसरा गाल पुढें करणाऱ्या' देवाच्या आवडत्या पवित्र लोकांपुढें आमच्या बिचाऱ्या हतभाग्य हिंदूंचा काय पाड ? तसेच आम्ही भेकड ! ! खरेंच, वसईच्या किल्यावर भगवा झेंडा रोंवतांना भेदरलेल्या एका पेद्रूला, [१] किंवा सुमारें शंभर वर्षांपूर्वी वडगांव मुक्कामीं दातीं तृण धरायास लावलेल्या एकाद्या टोपीवाल्यास विचारलें असतें तर तो आमच्या भेकडपणाचें फार फार छान वर्णन करता ! ! फार लांब नको; 'नाना' म्हणतांच ×× वर कांटा उभा राहिलेले अजूनही शूर साहेब शेंकडो सांपडतील ! असो; तेव्हां अशा धडधडीत सर्वांदेखतां झालेल्या व होणाऱ्या गोष्टीही ज्या दुरभिमानांध लोकांस दिसत नाहींत त्यांस काय म्हणावें ? ही तर दुराग्रहाची व मूर्खत्वाची पराकाष्ठाच; पण जे आमचे लोक अशा फू करतां उडून जाणाऱ्या पोकळ शब्दपांडित्यानेंही फसतात त्यांची तर केवढी बहादुरी ! आमच्या लोकांत सध्यां जर स्वतःविषयीं समजुती पाहिल्या तर अशा आहेत:— अहो ! आम्ही कसचे लोक हो ! आम्ही का शूर आहों, का विद्वान् आहों, का सदाचारी आहों, का सद्धर्मी आहों ? आमचे पूर्वज तरी कसले ? त्यांनीं ग्रीक व रोमन लोकांप्रमाणें राज्यें काबीज केलीं; का हल्लींच्या इंग्रेजाप्रमाणें आगगाड्या काढल्या, तारायंत्रें रोंवलीं, का कलाकौशल्य वाढवलें? काय केलें ? आमचा धर्म काय, आमचीं शास्त्रें काय, आमचें ज्ञान काय ? सगळें येथून तेथून वेडगळपणाचें ! या सर्वांचा जेव्हां समूळ उच्छेद होईल तेव्हां कोठें हिंदुस्थानास कांहीं सुधारणुकेची कळा येऊं लागेल ?' पाद्री भटांनीं, मेकॉलेसारख्या लहान तोंडीं मोठा घास घेणाऱ्या अप्रयोजक ग्रंथ-

---

१. हा शब्द Pedro या फिरंगी शब्दापासून निघाला कीं काय कोण जाणे ? असला तर वरच्या प्रसंगीं कदाचित् निघाला असेल.

कारांनीं, स्वभाषा धेडगुजरी बोलूं लागण्यापुरतें किंवा गिचमीड फर्डेशाई सही करण्यापुरतेंच इंग्रेजीचें चुटपुटतें ज्ञान मिळवून तेवढ्यावरच मोठ्या पांडित्याचा आव घालणाऱ्या आमच्या आलीकडच्या नव्या विद्वानांच्या कोत्या समजुतींनीं, वगैरे जीं वरच्यासारखीं कुत्सित मतें चौंहोंकडे माजविलीं आहेत त्यांचें पूर्ण खंडन केल्यास एक स्वतंत्र ग्रंथच बनेल; पण तसें करणें प्रस्तुत स्थळीं इष्ट नसून तें कोणत्याही सामान्य समजुतीच्या मनुष्यास मोठेंसें कठीण पडेल असेंही वाटत नाहीं; यास्तव त्यासंबंधें येथें कांहीं विशेष लिहीत नाहीं. आमच्या लोकांस इतकेंच सुचवितों कीं, केवळ स्वार्थसाधु मिशनरी लोकांच्या किंवा अजाणत्या हटवादी इंग्रेज ग्रंथकाराच्या म्हणण्यावरून आपली पारख करून घेणें हें अप्रयोजकपणाचें व आपणांस अत्यंत लज्जास्पद असें कृत्य आहे. वरील साहसी लोकांचें अज्ञान व दुराग्रह त्यांच्या पदरांत घालून त्यास चीप न बसवितां जर त्यांच्या अद्वातद्वा बडवडीस आपण उलटी मानच डोलवीत गेलों, तर मग आपण जसे शरीरानें परकी लोकांचे गुलाम झालों तसेच मनानेंही झालेले होऊं ! फार काय, पण आपले धनी इंग्रेज हे दुसरें मोठें स्वातंत्र्य जें आपणांस उदारपणानें देताहेत त्यासही आपण पात्र नाहीं असें होईल ! आपले दोष आपणांस जितके कळतील तितकें चांगलेंच,व ते जो कोणी आपणांस दाखवील तो मोठा दावेदारी असला तरी सुद्धां मन:पूर्वक आभार मानण्यासच तो योग्य होय, हें आम्ही पक्कें जाणतों; पण जो दुष्ट आमच्या सर्व गुणांसही दोषांचें रूप देऊन व दोषांचें अत्युक्तीनें वर्णन करून आम्ही राक्षसतुल्य किंवा पशुतुल्य आहों असें जगास भासवूं पाहील त्याचे चांगले दांतच पाडणें आपणांस उचित आहे. पण तसें करण्याचें टाकून देऊन आपल्या स्वदेशाच्या निंदेंतच जर आपणांस पुरुषार्थ वाटूं लागला व त्या मूर्खांचे आपण उलटे साह्यकारी झालों, तर मग आपल्या सत्यनिष्ठेची व शहाणपणाची पराकाष्ठाच झाली असें म्हटलें पाहिजे ! आमच्या विद्येविषयीं, आमच्या धर्माविषयीं, आमच्या इतिहासाविषयीं जर यथार्थ ज्ञान कोणास हवें असेल, तर तें त्यानें मेकॉलेपासून--ज्याचें इकडील भाषांचें ज्ञान अढें अगाध होतें कीं, Ali-Nagor or Port of God असें आपल्या सर्वोच्या घमेंडींत अप्रयोजक भाषांतर करून ज्यांनीं आपलें अज्ञान व धाडस

साऱ्या जगास विदित मात्र केलें--किंवा मुंबईच्या डॉक्टर विलसन्सारख्या हिंदु धर्मांचें, मुसलमानी धर्मांचें, पारशी धर्मांचें, एका सपाट्यासरसें एकदम खंडन करून देणाऱ्या अपूर्व विद्वान् मिशनरीपासून, किंवा मॉरिस्-सारख्या छोटेखानीं इतिहासकारापासून तें करून घेणें म्हणजे आमच्या परसांत भाजी कोणती आहे किंवा तळघरांत भांडीं कोणतीं आहेत तीं समजून घेण्यास इंग्लंडांतल्या किंवा अमेरिकेंतल्या एकाद्या मोठ्या प्रसिद्ध भूगोलवेत्त्याकडे जाण्यासारखें हास्यास्पद होय ! ज्या इंग्लिश लोकांचा येवढा बाणा आहे कीं, त्यांच्या भाषेचा नुसता उच्चारही एका इंग्रेजाशिवाय दुसऱ्या कोणास--प्रत्यक्ष स्कॉटलंडांतल्या त्यांच्यांत हरहंमेश वागलेल्या मनुष्यासही--साध्य नाहीं, त्यांसच येवढेंही कळत नाहीं कीं हजारों कोसांवरून दूर आम्ही हिंदूंच्या भाषांविषयीं, विद्येविषयीं, धर्माविषयीं किंवा अत्यंत हद्गत गोष्टींविषयीहि वेधडक तसा मजकूर लिहितों हें काय ? हा केवढा चमत्कार आहे ! आणि अशा पोरकट वडबडीसही जे आम्ही महाप्रसाद म्हणून झेलतों त्या आमच्या शहाणपणाची तर किती तारीफ करावी !

३. गेलीं पंचवीस तीस वर्षें वरील लोकांनीं, विशेषतः मिशनरींनीं, बरेंच राज्य भोगलें. त्यांनीं म्हणावी ती पूर्वदिशा होऊन त्यांच्या पोरकट गोष्टींनीं भरलेल्या पवित्र शुभवर्तमानाची वरीच चोहोंकडे भरभर झाली. येशूख्रिस्ताच्या कळपांत जरी महार, मांग वगैरे हीन जातींतले लोकच काय ते शारीर भुकेनेंच केवळ प्रेरित होत्साते शिरले, तरी एकंदर सुशिक्षित म्हणविलेल्या लोकांच्या मनांत ख्रिस्ती धर्माविषयीं बराच अभाव होता. त्या धर्माविषयीं व तो आचरणाऱ्या सुधारलेल्या इंग्रेज लोकांविषयीं त्यांच्या ठायीं एकंदरींत मोठी आदराची बुद्धि वागत असे. इंग्रेजी म्हटलें कीं त्यांत सर्व गुणांचा समावेश झाला. त्यांस इकडील सर्व गोष्टींची मोठी लाज वाटूं लागली. इंग्रेजीशिवाय तर पाणीही प्यावयाचें नाहीं, तितकें अनुकूल नसलें तर निदान मधून तरी इंग्रेजी शब्द बोलण्यांत जितके आणवतील तितके आणायाचे, निदानपक्षीं ' ग्यारी ', ' धोरा ', ' गारव ' अशी तरी इंग्रेजेची उगीच झांक दाखवायाची; मराठी विसरून गेल्यांत मोठी प्रतिष्ठा गाडींत बसलें असतां कोचमिलास स्वतःच्या पदवीस चढवून जातीनें सा

पाटलून, बूट वगैरे मिरविण्यांत कांहीं विलक्षण थोरपण; किंबहुना याहूनही निंदास्पद व लज्जास्पद दुसरे विलायतेकडून इकडे आलेले ढंग करण्यांत मोठें भूषण;-इत्यादि प्रकार त्या वेळेस विशेष चालू असत. ते अजूनही अगदीं मोडले नाहींतच; पण ते आतां अंमळ जुने झाल्यामुळें व एकंदर लोकांत ज्ञान व समजूत हींही अंमळ जास्त वाढल्यानें, त्यांचें प्राबल्य आतां पहिल्यासारखें नाहीं. सुमारें आठ दहा वर्षांमागेंच इंग्रेजी या नांवाला जितका मान होता तितका आतां नाहीं. त्या वेळच्या पत्रांतून, पुस्तकांतून त्या वेळची स्थिति स्पष्ट दिसते. माजी मोरोबा कानोबा, स्मॉलकॉज कोर्टाचे जज्ज, यांनीं सुमारें दहा अकरा वर्षांपूर्वीं 'घाशीराम कोतवाल' या नांवाची एक कादंबरी रचली होती; ती वर सांगितलेल्या पुस्तकाचाच एक मासला होती. हिचा सध्यां विशेष प्रचार नाहीं; तरी येवढ्या मोठ्या हुद्देदारानें ती केली असल्यावरून तिचें नांव अजून पुष्कळांस माहीत असेल. हींत हिंदूंस, व विशेषतः महाराष्ट्राकडील लोकांस, रानटी, मूर्ख, वेडगळ असे दाखविण्याचा ग्रंथकाराचा उद्देश होता; व शहाणपणा काय तो इंग्रेजांत ! फार तर काय, पण जे मुसलमान अजूनही अक्षरशून्य, मंद असे सर्वत्र प्रसिद्ध आहेत त्यांचे सुद्धां ज्ञान आपल्या लोकांपेक्षां विशेष दाखविलें आहे. ह्या कादंबरीवर (सदरील ग्रंथास येवढे नांव तरी केवळ मुरवतीस्तवच द्यावयाचें !) शालापत्रकांत[1] आमच्या एका कॉलेजकर मित्रानें फार नामी चरचरीत अशी एक टीका केली आहे; ती सर्व रसिक व देशाभिमानी अशा आमच्या वाचकांस लक्षपूर्वक वाचण्यास आम्ही शिफारस करतों. असो; अशाच प्रकारचें पण अंमळ निराळ्या तऱ्हेचें, असें दुसरेंही एक पुस्तक सहा सात वर्षांमागें प्रसिद्ध झालें आहे. तें 'पुण्याचें वर्णन' होय. हें पुस्तक पुष्कळांनीं वाचलें असेल; पण लिहिण्यास फार खेद वाटतो कीं, या महाविद्वान् व अत्यंत थोर ग्रंथकारांची जशी शोभा करणें हवी होती तशी कोणीं केली नाहीं ! यांची विशेष माहिती आम्हांस बिलकूल नाहीं; पण त्यांच्या प्रस्तुतच्या ग्रंथावरून हे मिशनरी लोकांच्या हाताखालीं शिकले असून त्यांचा उपदेश मनांत पूर्ण बिंबलेल्या शिष्यवर्गापैकीं आहेत हें स्पष्ट दिसतें. असें गुरुमुख असल्याखेरीज 'बेबलचा बुरूज;' सहा दिवस सतत

१. फेब्रुवारी १८६६.

खपून देवानें पृथ्वी घडली व सातव्या दिवशीं दमून विश्रांति घेतली; आमच्या आईबापांच्या तऱ्हेवाईक अपराधाबद्दल आम्हांस भलत्याच ठिकाणीं भयंकर दंड; नोहाच्या एका पोरानें आफ्रिकाखंड, दुसऱ्यानें युरोप,तिसऱ्यानें एशिया, अशीं तीन्ही खंडें तिघांनीं वसविलीं (अमेरिकेची व पासिफिक महासागरांतील बेटांची काय वाट झाली असेल ती असो !); पवित्र शास्त्रांतील देव सहाव्या दिवसाच्या शेवटीं खोरें कुदळ ठेवून जो निजला तो सार्वजनिक पुनरुत्थानाच्या दिवशीं पुनः उठणार, तोंवर सगळे पाप-पुण्याचे खटले तसेच तुंबवून ठेवून त्या एका दिवशीं फडाफड कोटयान्कोटी मनुष्यांचा निवाडा आपण व आपला प्रिय पुत्र असे बापलेक मिळून करणार; तेव्हां देवाचे लाडके ख्रिस्ती लोक भराभर आपआपलीं थडगीं फोडून आयतेच बाहेर निघतील; (पण हिंदूंसारखे दहन पावलेले, पारशांसारखे गिधाड, घार यांच्या पोटांत राहिलेले, तसेच समुद्रांत बुडालेले, वाघांनीं वगैरे खाल्लेल्या लोकांची त्या वेळेस 'आकाशांतला'बाप काय तडजोड काढील ती काढो !) इत्यादि खऱ्या धर्माचीं रहस्यें पुरतेपणीं कळून आमच्या ग्रंथकर्त्यांच्या हृदयांत एरवीं येवढा प्रकाश कसा फांकता ? सद्धर्माची येवढी बळकट प्रतीति घडली असतां येशूच्या शरीराचें व रक्ताचें पवित्र भोजन करून मोठ्या सुदैवानें हातीं लागलेलें खरें मौल्यवान् मोतीं, ते कां स्वीकारीत नाहींत कोण जाणे ! तसें होऊन ते जर कोठें मेंढपाळ बनले असते, तर सांप्रत पुस्तकांत जो त्यांनी जागोजाग चारगटपणा केला आहे तो त्यांस पुरतेपणीं शोभता, व ज्या हतभाग्य वाचकांकरतां त्यांनीं सद्धर्माचे विचार इतके भरपूर जिकडे तिकडे ओतून दिले आहेत त्यांच्या मनावरही ते कांहीं अंशीं तरी ठसते. पण तसें न झाल्यामुळें वाचकांस सहजच असा अंदेशा येतो, कीं आपल्या उपदेशकांस फसविल्याबद्दल त्यांचें कांहीं तरी समाधान करण्याकरतां, किंवा वर सांगितलेल्या भोजनाची मोकळीक त्यांच्या प्रसादानें आपणांस मिळाली अशा कृतज्ञत्वबुद्धीनें, अगर डॉक्टर उईलसन प्रभृति आपल्या सद्धर्मी आश्रयदात्यांस वरचेवर हंसवून त्यांनीं पुष्कळ प्रती घतल्यासारखी त्यांची कांहीं तरी सेवा करावी, असे उद्देश मनांत धरून हे वर्णनकर्तें ग्रंथरचना करण्यास बसले असावे ! कसेंही असो; पण हें अमोलिक पुस्तक वाचलें असतां एक मोठीच गोष्ट मनावर पक्की ठसते ती ही. ख्रिस्ती शास्त्राचें अध्ययन केलें असतां 'मोलवान मोती' हातीं

बाकीचे सर्व धर्म एकदम कस्पटासारखे भासूं लागतात. हा 'मोलवान' लाभ तर आहेच; पण बुद्धीची अतोनात तीव्रता प्राप्त होऊन सर्वज्ञतेचीही थोडीबहुत छाया मनुष्यावर पडते ! राज्यव्यवस्थेचें, सैन्यव्यवस्थेचें, शहराच्या मांडणीचें वगैरे पूर्ण ज्ञान एकदम होऊन जिकडे पाहावें तिकडे चुकाच चुका मनुष्याच्या नजरेस येऊं लागतात ! अरेरे, काय थोडक्यानें गेलें ! पेशव्यांनी येवढें सैन्य ठेवायाची, येवढे गुणी लोक पदरीं बाळगायाची वगैरे व्यर्थ खटपट न करतां विलायतेहून एक दोन पाद्री जर आणवले असते, तर त्यांनीं असे दिव्य शिष्य तयार करून दिले असते कीं, त्यांच्या हातून फत्ते म्हणून झाल्याशिवाय राहिलीच नसती ! एका चार पांच वर्षांत त्यांनीं त्यांस युद्धकलेंत, राजनीतीच्या कामांत, शहरांच्या बांधणीच्या कामांत, वगैरे असे तरबेज केले असते कीं, त्यांनीं कोणाची मात्रा चालूं दिली नसती ! नाहीं तर आतां पहा. पर्वतीचें तळें काय बांधलें आहे, ते साडेतीन शहाणे काय, त्यांच्या मसलती काय, पेशवे किती अप्रयोजक, अंगास तीन चिमटचा राख लावून पळालेच तर कोणत्या उद्देशानें पळावें ?' 'उघडे बोडके होऊन पावसांत जाऊन वेड्यासारखें बसूं नये' येवढेंही त्यांस कळलें नाहीं !! असो; एकंदरींत आमच्या बिचाऱ्या पेशव्यांच्या राजधानीचें वर्णन करण्यास येवढचा ख्रिस्तभक्ताखेरीज दुसरा कोणी मिळाला नाहीं याचें आम्हांस फार वाईट वाटतें. तसेंच चमत्कारही असा वाटतो कीं, ज्यानें पांच सहा वर्षें या उद्योगामागें लागून येवढी जुनी माहिती मिळविली त्यानें पेशव्यांविषयीं, नानाफडनवीसाविषयीं वगैरे प्रस्तुत ग्रंथांत दाखल केलेल्या पोरकट अप्रयोजक गोष्टीखेरीज दुसऱ्या कोणत्याच गोष्टी बिलकुल ऐकल्या नाहींत ! पण आमच्या शहाण्या वर्णनकर्त्यास बहुधा असें वाटलें असावें कीं, स्वतः मूर्तिपूजक असून त्या अत्यंत घोर पापमार्गाचे पुरस्कर्ते असल्यामुळें पवित्र शास्त्राच्या वचनाप्रमाणें जे अक्षय नरकाचे धनी झाले अशा महापातकी लोकांचें, तसेंच शेषाच्या मस्तकावर पृथ्वी, राहु, केतु चंद्रसूर्याचे वैरी, पृथ्वी स्थिर, सूर्य फिरणारा असें मानणाऱ्या महामूर्ख लोकांचें, काय वर्णन करायाचें आहे ! हल्लींच्या काळचें एकादें पोर त्यांस ज्ञान शिकविण्यास समर्थ झालें असतें ! असें वाटून जगाचें खरें कल्याणकर्ते, अकटो विकट ज्ञानसंपन्न असे मिचेल साहेब, गार्डनर साहेब व जोतीबा फुले प्रभृति त्यांचे सच्छिष्यमणि अशांच्या नांवांनीं आपल्या पुस्त-

कांस पवित्र करून मधून मधून पवित्र शास्त्रांतील अति सुंदर ओंव्या 'बेबलच्या बुरुजा' सारखे अत्यंत सरस दृष्टांत, आमच्या ग्रंथकारानें मोठ्या प्रेमानें मधेमधें गोवून दिले असावे ! असो; एकंदरींत हा ग्रंथ वाचला असतां मिशनरी लोकांच्या शिक्षणानें बुद्धि केवढी फांकते, सत्यनिष्ठा केवढी व त्यांचें ज्ञान किती खोल आहे, याचा चांगला अजमास होतो !

४. येथवर जें वर लिहिण्यांत आलें आहे त्याचा चांगला विचार केला असतां आमच्या देशाच्या इतिहासाची एकंदर सर्व लोकांस व आमची आम्हांसच किती गोडी लागण्याचा संभव आहे हें सहजच लक्षांत येईल. उघड आहे; उद्यां जर एकाद्यानें मोठे परिश्रम करून करून नीग्रो लोकांचा इतिहास जगांत प्रसिद्ध केला तर तो घेणारे व वाचणारे किती मिळतील वरें ! वस्तुतः पाहतां वरचाही दाखला अगदीं बरोबर आहे असें म्हणतां येणार नाहीं. नीग्रो लोकांविषयीं सर्वांचा, व विशेषतः इंग्रेजांचा, जितका कळवळा आहे तितका त्यांशीं समवर्ण व एकंदर जगाच्या मतें त्यांच्याच योग्यतेचे असे जे आम्हो त्यांविषयीं आहे कीं नाही हें कोणालाही सांगायाला नको. ज्या पार्लमेंटानें नीग्रो लोकांच्या दास्यमुक्त्यर्थ कोटयावधि रुपये खर्चले तींतच फॉसेट, ब्राइट् या वक्त्यांच्या भाषणांचा किती जयजयकार होतो हें सर्वांस माहीत आहेच ! नामांकित कवि लॉर्ड बायरन् यांनीं त्याच सभेंत एक विनोदाचें भाषण केलें तें प्रकृत स्थलीं फार समर्पक आहे. ऐरिश लोकांच्या वतीनें कोणी सभासद तेथें भांडत असतां हे एकीकडे वळून आपल्या जवळच्या लोकांस म्हणाले, "ह्या ऐरिश लोकांचा वर्ण गोरा आहे हें त्यांचें केवढें दुर्भाग्य आहे ! हेच जर काळे असते तर त्यांच्या मुक्त्यर्थ याच सभेनें केवढा खटाटोप केला असता ! " असो; तर याप्रमाणें साऱ्या जगांत अज्ञान, दुराचरी, वेडगळ म्हणून निवडले गेले त्यांविषयीं माहिती कोण करून घेतो ? कोणीं घेतलीच, तर मेकॉले, हॉल यांच्याप्रमाणें केवळ उपहास व तिरस्कार करण्याच्या बुद्धीनेंच घेतात ! मेकॉले साहेबांनी 'लॉर्ड क्लाइव' च्या आरंभीं वरच्याच गोष्टीविषयीं मोठें आश्चर्य दाखविलें आहे, व क्लाइव प्रभृति वीरांनीं येथें जे मोठमोठे पराक्रम केले ते कोणासही

वाचावेसे कां वाटूं नयेत याचें कारण आम्हांस बिलकूल समजत नाहीं असें ते म्हणतात. पण कारण उघडच आहे. त्यांनींच स्वतः आपल्या निबंधांत जर हिंदूंस परम नीच, परम दुर्बळ असे सिद्ध करून दाखविले आहेत, तर अशा तृणप्राय लोकांवर मोठे अद्भुत जय मिळविले म्हणून नवल कसचें असें अर्थातच त्यांचे शहाणे देशबांधव समजत असतील! आबिसिनियाची मोहीम, अशांटी लोकांची लढाई या जितक्या प्रेमानें लोक वाचतील तितक्याच प्रेमानें अर्थात हिंदुस्थानचाही इतिहास वाचतील. आणि हा लोकांचा तिरस्कार त्यांच्या दोन्ही निबंधांनींही तिळमात्र तरी कमी झाला असेल असेंही पण आम्हांस वाटत नाहीं. असो; तर याप्रमाणें आमच्या देशाचा इतिहास परकी लोकांस केवळ तिरस्कारास्पद आहे आणि आमच्या देशाच्या संबंधें त्यांचे स्वतःचे पराक्रम वाचण्याचीही जर त्यांस हौस वाटत नाहीं, तर खुद्द आमच्याच संबंधाचा इतिहास त्यांस किती रुचेल हें सांगायासही नको! हा प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो. 'हिंदुस्थानचा इतिहास' असें ठळठळीत नांव वर घातलेल्या ग्रंथांतून बहुतेकांत खुद्द हिंदुस्थानाविषयीं किती माहिती असतें हें सर्वांस ठाऊक असेलच! उदाहरणार्थ सध्यां चोहोंकडे चालू असणारा मॉरिस साहेबांचा इतिहास पहा. या साहेबांनीं अगदीं मुळापासून तों तहत इ. सन १७३९ पर्यंतचा इतिहास सरासरी तीस पसतीस पानांत ओढून टाकून बाकीचा सर्व ग्रंथ इंग्रेजांच्या मजकुरानें भरला आहे. पेशव्यांचें तर त्यांत बिलकूल नांव सुद्धां नाहीं, आणि ज्या मूसलमानी घराण्यांनीं हिंदुस्थानावर कित्येक वर्षें प्रभुत्व भोगलें त्यांची हकिकत कोणाची दोन ओळी, कोणाची चार ओळी देऊन मनुष्याचा आपल्या कीर्तीविषयींचा गर्व किती व्यर्थ आहे हें प्रगट केलें आहे! अकबराचा पन्नास वर्षांचा इतिहास एका पानांत भरला आहे. आमच्या शिवाजीची दशा तर कांहीं पुसूंच नये! तो चोर होता येथून आरंभ करून त्यानें केलेला प्रसिद्ध खून मात्र सविस्तर वर्णन केला आहे, आणि बाकीच्या गोष्टींची कल्पना करणें वाचकांवरच सोंपवून दिलें आहे. असा एकंदर मजकूर सुमारें दोन अडीच पानें आहे. पण तेवढ्यांत या विद्वान् इतिहासकारानें शंभर चुका केल्या आहेत! शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दहा वर्षें अगोदर ओढला आहे, अफजुलखानास तीन वर्षें

उशीरानें मारविला आहे. संभाजीचा वध वगैरे गोष्टी शिवाजी जिवंत असतांच घडविल्या आहेत ! बरें येवढी घाई व इतक्या चुका करून साहेब पुढें धांवले तरी कोठें ? अर्थात्च मेजर लॉरेन्स्, कर्नल मॉनसन्, लेफ्टेनंट अशा महावीर्यशाली शूरांचे पोवाडे गाण्यास ! खरेंच, 'स्वजातिर्दुरतिक्रमा!' तेथें कोणाचा उपाय आहे !! परवां सहज 'पेनी सैक्लोपीडिया' नांवाच्या सर्वसंग्रहरूप ग्रंथांत मराठ्यांचा इतिहास कसा काय दिला आहे म्हणून पाहिलें. तों कांहीं अपूर्वच माहिती मिळाली ! बाळाजी विश्वनाथाचा पुत्र बाळाजी बाजीराव; धाकट्या माधवरावाचें खरें नांव शिवाजी माधवराव ; त्याचा पुत्र दुसरा बाजीराव !!! कां, कशी खाशी माहिती आहे ! पण इतकें कशाला, प्रत्यक्ष आमच्या युनिवर्सिटींतही हा प्रकार दृष्टीस पडतो. बी. ए. सारख्या परीक्षेस मराठ्यांच्या इतिहासावर असे प्रश्न असतात– 'पेशव्यांची वंशावळी लिहा,' 'पानपतची लढाई केव्हां व कोठें व कोणा-मध्यें झाली ? तिचे परिणाम काय झाले ?'–केवढे जाडे प्रश्न हे ! आम्हांस खचित वाटतें कीं, असे प्रश्न देणाऱ्या परीक्षकापेक्षां आमच्या मराठी शाळें-तल्या 'महाराष्ट्रदेश' शिकणाऱ्या मुलांस मराठ्यांच्या इतिहासाची माहिती पुष्कळ ज्यास्त असते. असो; तेव्हां एकंदरींत आमच्या देशाकडे इंग्रजांचें फारच दुर्लक्ष व फारच तिरस्कार ! मेकॉले साहेबांनीं आपल्या दोन निबंधांत जसें केलें आहे त्याप्रमाणें जेव्हां त्यांस हरबऱ्याच्या झाडावर चढवावें, तेव्हां एतद्देशीय इतिहासाचा वगैरे ग्रंथ त्यांस पाहावासा वाटतो. आमच्या एका कॉलेजबंधूनें पांच सहा वर्षांपूर्वी येथील 'यंग मेन्स असोशियेशन्' (ही सभा अजून आहे कीं नाहीं हें बाहेरचे लोकांस सांगायाला नकोच !) पुढें 'ग्रांट् डफकृत मराठ्यांच्या इतिहासावर टीका' या नांवाचा एक उत्कृष्ट निबंध वाचला, त्यांत त्यानें एका इंग्रेजी पत्रांतून घेतलेली सदरहू साहेबांची हकीकत वाचली. ती तर आमच्या वरच्या लेखास फारच मजबुती आणते. तींत मराठ्यांच्या इतिहासकारास आपला ग्रंथ छापून बाहेर काढण्यास केवढा भगीरथ प्रयत्न पडला–किती छापखान्यांचें आर्जव करावें लागलें, किती मोठमोठ्या लोकांच्या भिडा खर्चीं घालाव्या लागल्या–हें सविस्तर लिहिलें आहे या प्रसंगींचा मरे (छापखानेवाला) व डफ् यांचा संवाद मोठा लक्षांत ठेवण्यासारखा झाला. तो डफ् साहेबानें स्वत: असा

लिहून ठेवला आहे:—" त्यानें मला सांगितलें कीं, जर तुम्ही ग्रंथाचें नांव बदलाल तर आम्ही तो छापूं. " मीं म्हटलें कीं, हा ग्रंथ मराठ्यांची बखर आहे. यास्तव 'मराठ्यांचा इतिहास' हेंच नांव त्यास योग्य आहे. तो म्हणाला, तें खरें; परंतु मराठ्यांची यत्किंचित् तरी माहिती कोणास आहे? त्यास मीं उत्तर दिलें 'हें पुस्तक करण्याचें कारण काय तें तेंच; मराठ्यांची माहिती लोकांस फार थोडी आहे.' मरेनें उत्तर केलें, 'ठीक, तुम्ही म्हणतां तें खरें आहे; पण माहिती असावी अशी तरी इच्छा कोणास आहे? तुम्ही या ग्रंथाचें नांव 'मोगलांचा पाडाव किंवा इंग्रेज लोकांचा उत्कर्ष' असें ठेवल्यास तें ठीक होईल. परंतु 'मराठ्यांची बखर?' छे, हें पुस्तक कोणी विकत घेणार नाहीं!' मरे साहेबांचें भाकीत अक्षरशः खरें झालें. हिंदुस्थान लुटून जे गब्बर झाले त्या कोर्ट ऑफ डायरेक्टरच्या सभासदांनींच मुळीं चाळीस प्रती घेतल्या. पण त्या पावल्याचें उत्तरहि पाठविलें नाहीं. मग इतर लोकांत या बखरीचा किती खप झाला असेल हें सांगावयास नको. डफ् साहेब शेवटीं लिहितात, "हा जो मीं येवढा खटाटोप केला त्यांत मला कवडीचाही फायदा न होतां उलटा ११७०० पेक्षां ज्यास्ती रुपयांस मात्र मी बुडालों."

५. वरील गोष्टीवरून इंग्रेजांस आमच्या देशाचें ज्ञान कितपत आहे व तें मिळविण्याची इच्छा तरी कितपत आहे हें आमच्या वाचकांस पुरतेपणीं कळल्यावांचून राहणार नाहीं. तरी त्यावद्दल त्यांस मोठेंसें नांव आम्हांस ठेवतां येंत नाहीं. ज्या त्या प्रकरणीं मोठी घमेंडी मारण्याची जी त्यांस सवय लागून गेली आहे तिचा अप्रयोजकपणा वर दाखल केलेल्या गोष्टीवरून उघड दिसेल खरा; पण त्या देशाशीं ते अगदीं अपरिचित, जेथील रीतभात, भाषा, लोकांच्या समजुती वगैरे त्यांच्याहून फारच वेगळ्या त्याचा इतिहास वाचण्याची त्यांस गोडी कशी लागावी? 'अहल्याबाई", 'माधवराव' हीं नांवें जशीं आम्हांस गोड लागतात, तशीं 'Aila Bye, Madhoo Rao'--ज्यांचा उच्चारही त्यांच्या भाषेनें होणें कठीण, व झाला तरी कानांस कर्कश लागणारा,—तीं त्यांस तशीं न लागून त्यांचा त्यांस त्रास येत असल्यास नवल काय? असो; तर न्यूहॉलंडचा किंवा अमेरिकेचा इतिहास जसा आम्हांस तसाच आमचा इतिहास त्यांना होय; व यास्तव त्यांची यावर

अप्रीति असल्यास त्यांत कांहीं विलक्षण नाहीं. पण हीच अप्रीति खुद्द आमच्यांतच असल्यास मग तर काय म्हणावें? आमच्या देशचे प्रख्यात वीर होऊन गेल्यास अजून शंभरही वर्षें होऊन गेलीं नाहींत-खुद्द आमच्या आठवणींतही आमचें राजतेज शेवटच्या धूमावस्थेंतून एकाएकीं प्रज्वलित होऊन त्याच्या प्रचंड लोळानें सगळ्या हिंदुस्थानास धाक दाखविला, व सगळें जग त्यांच्याकडे आश्चर्यानें स्तब्ध होत्सातें पाहात राहिलें! तरी आमची देशप्रीति व बुद्धीची तीव्रता केवढी! आम्ही केवळ हवालदील होऊन एकमेकांस साशंक विचारतों! 'काय हो आम्ही कसचे लोक, किती भित्रे, केवढे भागूबाई; आम्हांस हवें त्यानें खुशाल तुडवावें! आमच्यांत वीर असे हाका मारायला झाले कधीं! आमचे वीर म्हटले म्हणजे बाजीरावासारखे बंदुकीच्या बाराला भिणारे! मेकॉले साहेबांनीं बकऱ्याची उपमा आम्हांस दिली आहे ती ठीक!!' वर शौर्याच्या संबंधानें आमच्या तर्कशास्त्राचे तारे तुटले! तसेच प्रत्येक गोष्टीच्या संबंधानेंही हरहमेश तुटत असतात! मेकॉले, मिल्ल, पाद्री साहेब यांच्या सुविचाराचें अखंड सेवन केल्यानें बुद्धींत अतोनात प्रकाश कोंदून तो वरील रूपानें लोककल्याणार्थ बाहेर पडतांना पुष्कळांनीं पाहिला असेल; किंवा त्यांचें स्थिर रूप कोणास पाहणें असल्यास तो हेतु मागें सांगितलेले दोन अनुपम ग्रंथ सहज पूर्ण करतील. एकंदर हिंदु लोकांचा थोडक्यांत पराभव करून टाकून अल्पायासानें अरण्यपांडित्य ज्यास मिरविणें असेल त्यास वरील कोठारांत हवीं तितकीं अपूर्व शस्त्रास्त्रें सांपडतील! असो; उपाय काय? सांप्रतच्या स्थितींत जाळ्यांत अडकलेल्या वाघाप्रमाणें जो जो मानभंग होईल तो तो आमच्या देशास सोसणें भाग आहे. मेकॉलेच्या देशबांधवांची आमच्या काळच्या लोकांवर जशी सहज लीलेनें चावकांची, छऱ्यांची वगैरे कृपा होते, तशीच त्यांच्यासारख्या महापंडितांची आमच्या विद्यादिकांवरही होते हें अनुरूपच आहे! अशांच्या फर्डेशाईपुढे आमच्या बिचाऱ्या हिंदु लेखणीनें टिकाव धरावा हें मुळींच संभवत नाहीं. तिच्या सपाटचानें अगदीं गतप्राणच न होऊन ज्यांच्यांत अजून थोडी धुगधुगी तरी उरली असेल त्यांस जिवविण्याचा यथाशक्ति यत्न करणें आम्हांस योग्य वाटतें. यास्तव आम्ही अशांस इतकेंच सांगणार कीं, बाबांनो! ज्यांच्यांत पाणिनि, वाल्मीकि,

कालिदास आर्यभट्ट, भास्कराचार्य, गदाधरभट्ट, वगैरे असंख्यात धेंडें निपजलीं, त्या लोकांची केवळ मूर्खांतच गणना करणें कठीण आहे.ज्यांच्यांत रामपांडवादि नाहीं धरले तरी विक्रमादित्य, इतिहासप्रसिद्ध पोरस, शिवाजी, बाजीराव, यशवंतराव, रणजितसिंग, विजेच्या गतीनें सैन्यासहवर्तमान धावणारा परवांचा शूर, असे तरवारबहाद्दर होऊन गेले ते केवळ 'मेंढ्या'च असतीलसें नाहीं; तसेंच ज्यांच्यांत तुकाराम, रामदास किंवा रामशास्त्री, माधवराव असे निष्पाप महात्मे; व रमाबाई, अहल्याबाई, अशी भूतलास भूषित व पवित्र करणारीं स्त्रीरत्नें निर्माण झालीं, त्याच लोकांस अघोर, पातकी, दुराचारी, निर्दय म्हणणें म्हणजे शुद्ध दांडगाई आहे; आणि जो धर्म सर्वांत प्राचीन असून शंकराचार्यांसारख्यांनीं ज्याच्या रक्षणार्थ आपली बुद्धि खर्चली तो मेकॉले, रेवरेंड विलसन् किंवा जोतीबांसारखे त्यांचें कल्याण, अशांच्या बडबडीनें व शुष्क तर्कांनीं ऱ्हास पावेल हें मुळींच संभवत नाहीं! वरील गोष्टी इतक्या धडधडीत स्पष्ट दिसत असतांही आमच्या लोकांस त्या आलीकडे दिसेनाशा झाल्या आहेत; हें तर काय पण आपणांस अधिकाधिक कुत्सित म्हणून घेण्यांतच पुष्कळांस कांहीं विलक्षण प्रतिष्ठा वाटते. 'हिंदु' हा शब्द 'मूर्ख' शब्दाशीं केवळ समानार्थच होय असें ते समजतात, आणि त्यांतून जितकें सुटून जातां येईल तितकें जाण्याचा बहुतेकांचा प्रयत्न दृष्टीस पडतो.हा हिंदुत्वाचा द्वेष कित्येकांच्या ठायीं इतका जागृत असतो कीं, पोषाक, रीतरिवाज, आचार वगैरे गोष्टींत सर्व प्रकारें इंग्रेजांचा नमुना उचलला असल्यामुळें त्यांच्या पूर्वस्थितीची एक मात्र काय ती मोठी खूण त्यांच्यांत राहिली असते--ती अर्थातच काळा रंग होय. हा जाण्याचा जर एकादा अपूर्व उपाय इंग्लिश लोक काढतील, तर आमच्या देशांत त्यांचे पुष्कळ नवे बंधु बनतील ! असो; तर याप्रमाणें दिवसेदिवस आमची स्थिति मोठी विलक्षण होत चालली आहे. आमची मूळची स्थिति तर आम्हांला नकोच; पिसें लावून थोरांच्या मंडळींत शिरूं पाहतों, पण ते तर आम्हांस नीग्रो, हॉटेंटॉट अशांच्याच पंक्तीस सरासरीं वसवितात ! चोहोंकडे इंग्रेजी माजल्यानें आमची भाषा आम्हांस येईनाशी झाली, देशाभिमान सहजच विगलित झाला,--कारण चांगलें म्हणण्यासारखें आमच्यांत कांहींच नसून दोष

ठेवण्यासारखेंच सारें पडलें, तेव्हां त्याचा अभिमान म्हणजे दुरभिमानच होय !--धर्माची तर अशी लाज वाटूं लागली कीं, कांहीं बोलण्याची सोय नाहीं, तेव्हां एकंदरींत देश नाहीं, भाषा नाहीं, धर्म नाहीं, रीतरिवाज नाहीं, असें पोरकें राष्ट्र आम्ही. सध्यांच्या स्थितींत झालों आहों ! असें झाल्यामुळें जो कोणी पूर्वींच्या संबंधाचें कांहीं चांगलें म्हणेल तो एक वेडगळ तरी असेल किंवा मूर्ख तरी असावा असा एकंदर लोकांचा ग्रह होऊन गेला आहे. वर ' मराठ्यांच्या इतिहासावर टीका ' म्हणून एका निबंधाचा आम्हीं उल्लेख केला; त्याचा त्या माजी सभेनें व एकंदर लोकांनीं वर सांगितल्या प्रकारेंच आदर केला; म्हणजे अशा निबंधापासून तादृश कांहीं उपयोग नाहीं असा त्या ठिकाणींच लिहिणारास सभेचा अभिप्राय मिळून पुढें त्यानें तो छापला असतां आज सात वर्षें बहुधा जसाचा तसाच छापखान्यांत लोळत पडला आहे. पण इतक्यानेंच झालें नाहीं. ज्या रात्रीं तो वाचला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं 'ज्ञानप्रकाशांत' एकानें पत्र पाठवून सर्वांस कळविलें कीं त्या निबंधांत कांहीं जीव नव्हता. आणि सभेंत अध्यक्षांनीं वगैरे जी त्यांची तारीफ केली तो सर्व प्रकार ' पंचतंत्रां'तील ' पूर्वं तावदहं मूर्खो, सर्वं वै मूर्खमंडलम्' असा झाला ! असो; वरील गोष्टीवरून आपल्या इतिहासाची आमच्या लोकांस एकंदरींत किती गोडी आहे ती स्पष्ट दिसून येते. तसेंच आमच्यांत विद्वान् म्हणविणारासही त्याची किती माहितीं असते व माहिती करून घेण्याची इच्छा तरी कितपत असते, तीही येथें विशेषतः सांगायास पाहिजे असें नाहीं.

६. असो, प्रस्तुत निबंधांत ज्या विषयाचें विवेचन करायाचें होतें त्याच्या नुसत्या प्रस्तावनेदाखलच सरासरी इतका मजकूर लिहावा लागला. आतां यापुढें मुख्य विषयावरच जर आणखी लिहूं लागलों, तर त्याचें जसें व्हावें तसें अध्ययन जरी अजून आमचें मुळींच झालें नाहीं, तरी सुद्धां पुष्कळ लिहिण्यास सांपडेल आणि हा विषय हिंदूंसच स्वतः म्हटला म्हणजे मोठा मोहक पडला, यास्तव आरंभ केला असतां एकाएकीं तो सोडतां येणेंही कठीण. पण आमच्या वाचकांस इतका लांब मजकूर वाचूनही अगोदर कदाचित् कंटाळाच आला असेल असें आम्हांस वाटतें; यास्तव इकडूनही पाहतां सांप्रत विषय, येथेंच तसा तहकूब ठेवणें आम्हांस बरें वाटतें. या खेपेस आमच्या देशाविषयीं ज्यांपासून माहिती आम्हांस मिळते,--कीं जी बहुधा

'बाबावाक्यं प्रमाणम्' या न्यायानेंच आपण गृहीत धरून चालतों,-- त्यांस ती खरी मिळण्याचा संभव किती, व यास्तव ती आपण किती जपून मान्य केली पाहिजे; ही एक मोठी मुद्द्याची गोष्ट जर या अंकावरून आमच्या वाचकांच्या मनावर पक्की ठसेल, तर एक मोठीच गोष्ट मिळविलीशी होईल. तसेंच मनोरंजनांत आपल्या देशाचा इतिहास कोणत्याहि दुसऱ्या देशाच्या इतिहासाहून उणा नाहीं हेंहि जर या एकंदर निबंधावरून वाचकांच्या लक्षांत येईल, तर तेवढ्यानेंहि तो लिहिल्याचा हेतु सफळ झालासें होईल. असो; तरी लिहावयाच्या एक दोन मोठ्याच गोष्टी राहिल्या; त्यांतील पहिली ही कीं, प्रस्तुतचे इंग्रेजी इतिहास फारच अपुरते असतात,- म्हणजे संस्थानिक वृत्तांताखेरीज आमच्या विद्या, कला, स्थिति, रीति वगैरेविषयीं त्यांत बिलकूल एक अक्षरही असत नाहीं. दुसरी ही कीं, आमच्या मराठींत इतिहास चांगला वाचण्याजोगा म्हटला तर मुळींच नाहीं, व एक तर लोकांत त्याविषयीं येवढें अज्ञान असण्याचें एक मोठें कारण तेंच आहे. यासारख्या आणखी दुसऱ्या कांहीं न्यूनता मागें एकदोन वेळां सांगितलेल्या 'ग्रांट डफ्वर टीका' नांवाच्या निबंधांत[1] चांगल्या रीतीनें दाखविल्या आहेत. त्या प्रस्तुत निबंधाच्या परिशेषार्थ वाचकांनीं पहाव्या. तसेंच मराठींतील विद्यमान इतिहासावर शालापत्रकाच्याही एका अंकांत[2] कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत तेही वाचण्यास आम्ही त्यांस शिफारस करतों. आतां सरते शेवटीं एकंदर लोकांस या विषयाच्या संबंधानें कांहीं सूचना करण्याजोग्या आहेत त्या येथें लिहून हा अंक पुरा करतों.

---

१. हा निबंध व मागें सांगितलेली 'घाशीराम कोतवाला'वर टीका हीं आमचे कॉलेजबंधु रा. रा. नीळकंठ जनार्दन कीर्तनें यांनीं रचिलीं. हे 'माधवराव पेशवे' व 'जयपाळ' या सर्वमान्य नाटकांचे कर्ते रा. रा. विनायक जनार्दन कीर्तने यांचे धाकटे बंधु. यांची लिहिण्याची पद्धति तारीफ करण्यासारखी असून विषयाचें निरूपण प्रौढ व मार्मिक रीतीनें करण्याची यांची शैली उत्कृष्ट आहे. प्रस्तुत निबंधाच्या संबंधानें वरील दोन्ही लेख वाचले असतां वाचकांस हितावह होतील.

२. पुस्तक १२, अंक ५.

७. वर जें इतकें विवरण केलें त्यावरून आपल्या देशाचा इतिहास चांगला होऊन त्याची सर्वांस माहिती झाली असतां किती उपयोग होणार आहे हें सर्वांच्या ध्यानांत आलेंच असेल. यास्तव ज्यांस तशी माहिती मिळण्याचा संभव असेल त्यांनीं ती बुडूं न देतां तिचा संग्रह ठेवावा, आमचीं जुनीं लहानमोठीं राज्यें अजून साऱ्या देशभर पुष्कळ आहेत; तर त्यांचा स्वाहा जोंवर झाला नाहीं तोंवर तरी लोकांनीं सावध होऊन आपल्या नुकत्या होऊन गेलेल्या पराक्रमी पूर्वजांची येवढी तरी सेवा करावी. असें केलें असतां आपला देशाभिमान जागविलासा होऊन आपल्या वाडवडिलांचे उपकार फेडलेसे होतील;-कारण त्यांची कीर्ति वाढवणें जर आपल्या हातून होत नाहीं, तर तिचें रक्षण करून ती बुडूं न देणें हें तरी आपण श्रेय घ्यावें; आणि हें पहिल्यापेक्षां पुष्कळ सोपेंही आहे हें उघड आहे. आतां हें कृत्य आपले सध्यांचे धनी इंग्रेज लोक यांच्या विरुद्ध केलेसें होईल किंवा केलेंसें ते समजतील, याविषयीं बिलकूल संशय धरण्यास जागा नाहीं. ते इतर संबंधानें कसेही असले, तरी येवढ्यांत तरी अत्यंत उदार आहेत. फार तर काय, पण त्यांनींच जर ही माहिती मिळवून ठेवली नसती, तर माधवराव काय, आणि बाळाजी विश्वनाथ काय, सर्व आतांपर्यंत आपणांस एकच होऊन गेले असते ! शिवाय दुसरें असें कीं, अशी माहिती ग्रांट डफ्, मालकम् अशांच्या ग्रंथांत कांहीं आहे खरी; पण ती केवळ राजकीय संबंधाची. पूर्वीची किरकोळ माहिती जागोजागच्या लोकांस जशी अजूनही असेल तशी सर्व अगोदर त्यांस कळली नसेल हें एक; आणि दुसरें ती सर्व त्यांस आपापल्या ग्रंथांत घालतांही आली नाहीं. अशा माहितीचा वास्तविक निराळाच ग्रंथ असला पाहिजे,व 'पिक्टोरियल् हयांडबुक ऑफ लंडन्' अशा तऱ्हेचे निराळेच ग्रंथ इंग्लंडांत वगैरे करतात तसें आमच्या पुण्याच्या 'वर्णनांत' असेलसें पाहिल्याबरोबर सर्वांस वाटतें; पण ग्रंथकर्ते ब्राह्मण धर्माचे व तेव्हां अर्थातच पेशव्यांचे वगैरेही शत्रु असल्यामुळें त्यांचें जिच्या योगानें गौरव होईल अशी एक सुद्धां गोष्ट त्यांनीं आपल्या ग्रंथांत दाखल केली नाहीं. फुलांतून मधमाशा मध काढतात, पण त्यांतूनच दुसरे किडे विष काढतात, याप्रमाणेंच त्यांनीं कृति केली ! असो; येथें शेवटीं इतकेंच सुचवितों कीं, आमच्या मराठी शहरांचीं जर यापुढें अशीच कोणी वर्णनें

रचिलीं तर काम पुरें होईपर्यंत तो रचणारा मोठा भाविक ख्रिस्ती असला तरी त्यानें आपलें पवित्र शास्त्र तोंपर्यंत एकीकडे गुंडाळूनच ठेवावें ! असो; तेव्हां आमच्या लोकांस यासंबंधानें हीच सूचना करावयाची कीं, अशी माहिती कितीही क्षुल्लक वाटली, तरी तिचा त्यांनीं नीट संग्रह करून ठेवावा; कां कीं, कधीं कधीं एकाद्या अशा क्षुल्लक गोष्टींतही असें तात्पर्य असेल कीं तिच्या योगानें कदाचित् इतिहासही फिरूं शकेल ! त्यांतूनही नेटिव संस्थानांतून दप्तरी माहिती किंवा जुने लेख ज्यांपाशीं असतील त्यांनीं तर ती फारच जपून ठेवावी. अशा प्रकारचा उद्योग आमचे बंधु 'विविधज्ञान-विस्तार' कर्ते यांनीं करण्याचें मनावर घेतलें होतें. पण लोकांच्या अज्ञानास्तव, हयगयीमुळें किंवा वेड्या समजुतीमुळें त्यांस त्यांत फारसें कोणीं साहाय्य केलें नाहीं असें दिसतें. हा प्रकार अत्यंत शोचनीय होय. असो; याखेरीज जुन्या माहितीचा आणखीं एक मार्ग सध्यां तादृश प्रसिद्ध नसणारे इंग्रेजी ग्रंथ होत. गेल्या शंभर दीडशें वर्षांत इकडे आलेल्या इंग्रेज लोकांनीं लिहून ठेवलेले पुष्कळ ग्रंथ आहेत, ते कधीं मधीं दृष्टीस पडतात. त्याकाळीं आपली स्थिति फार निराळ्या तऱ्हेची असल्यामुळें कित्येक तर इतके तल्लीन होऊन गेले होते कीं, त्यांचीं मूळचीं मतें जाऊन बहुतेक आमच्यासारखींच झालीं होतीं. अशांस सर जेम्स् म्याकिंटाश्, जे कांहीं दिवस मूंबईचे रेकॉर्डर (न्यायाधीश) होते त्यांनीं 'ब्राम्हण [1] बनलेले युरोपियन' असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. वास्तविक पाहतां यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कांकीं, त्या काळीं हल्लींप्रमाणें ब्राह्मण हे रेल्वेच्या गाडीच्या पायावारीं जात नव्हते; तर गजमस्तकारूढ झालेले, किंवा अश्वारूढ होऊन शत्रूंवर गर्जणारे अशापैकीं होते ! अजूनही वृद्ध लोकांच्या तोंडून जें आपण ऐकतों, कीं पहिले साहेब फार दयाळू असत, इकडच्या लोकांचा ते फार बोज ठेवीत, तें खोटें नव्हे. आतांप्रमाणें चुटपुटती विलायतेस परीक्षा देऊन व येतांना मेकॉलेचे दोन निबंध वाचून अरेराव होऊन आलेले ते नसत. त्यांस लोकांच्या अनुरोधानें वागणें पडे. असो; तर अशांच्या ग्रंथांत आपणांस अनुकूल असा पुष्कळ मजकूर सांपडतो. मालकम् साहेबांचा वर एक लेख लिहिला आहेच; व अहिल्याबाईचें त्यानें

१. 'Brahmanised Europeans.'

किंती चरित्र मिळवून लिहून ठेवलें आहे तेंही बहुतेकांस विदित असेलच. तसेंच 'विविधज्ञानविस्तारा'च्या एका अंकांत स्कॉट् नामक एका ग्रंथकाराचा अफजुलखानाच्या वधाविषयींचा मजकूरही पुष्कळांनीं वाचला असेल. अजूनही हिंदूंचे पक्षपाती इंग्रेज लोक कित्येक सांपडतील. 'तारा', 'सीता', 'ठगाची जबानी' या सर्वप्रसिद्ध ग्रंथांचे कर्ते क्यापटन् मेडोज टेलर हे अशांत अग्रगण्य होत. यांनीं नुकताच एक हिंदुस्थानचा इतिहास स्वभाषेंत लिहून प्रसिद्ध केला आहे; त्यांत सर्व भागांचें यथास्थित विवरण केलें असून मॉरिस, मेकॉले, मिल्ल यांच्यापेक्षां फार निराळ्या तऱ्हेचीं मतें त्यांत प्रदर्शित केलीं आहेत. अशाच तऱ्हेचे आणखी एक दोन लहान इतिहास आलीकडे प्रसिद्ध झाले आहेत. असो; तर गेल्या काळाविषयीं चमत्कारिक व खरी माहिती मिळण्याचा हा तिसरा मार्ग आहे. तर याप्रमाणें असत्यरूप व भ्रांतिरूप धुकें जें या देशभर आजपर्यंत पसरून राहिलें आहे त्याचें निरसन करून सत्यरूप सूर्याचा व ज्ञानाचा खरा उदय अजूनही व्हावा अशी आजची तर स्थिति आहे.

आमच्या देशाची स्थिति

दुर्लभं भारते जन्म मानुष्यं तत्र दुर्लभम् । [1]

अंक ७७:-- (१) विषयोपन्यास. (२) आक्षेपनिरसन—विषयाचे विभाग. (३) आमच्या राज्यकर्त्यांची स्थिति. (४) राज्य व प्रजा यांचा संबंध. (५) इंग्रेजी राज्याविषयीं आजपर्यंतच्या समजुती. (६) त्यापासून आम्हांस झालेले व होणारे फायदे.

१. प्रस्तुत विषय हा वस्तुतः पाहतां अत्यंत व्यापक होय, म्हणजे त्यांत शेंकडों गोष्टींचा विचार करतां येण्यासारखा आहे, हें उघडच आहे. आमची सांप्रत जी स्थिति आहे तिजविषयीं ऊहापोह करावयाचा म्हटलें म्हणजे त्यांत कितीक प्रकार येतात ! प्रथमतः आपलीं आजपर्यंत काय काय अवस्थांतरें होत गेलीं याचा विचार करणें जरूर आहे; कां कीं, सध्यांची स्थिति हें त्या सर्वांचें मिळून एकंदर फळ होय. वरील पूर्व-पीठिका झाल्यानंतर हल्लीं आमची काय हालहवाल आहे ती पाहिली पाहिजे. ही स्थिति फार चमत्कारिक आहे हें उघडच आहे; तिला आमच्या पूर्व इतिहासांतच काय, पण बहुधा साऱ्या जगाच्या इतिहासांतही तोड सांपडणें बहुधा कठीण पडेल ! हा दुसरा भाग झाल्यानंतर तिसरा व शेवटचा भाग आमची भावी स्थिति होय. हिजविषयीं अनेकांचे अनेक तर्क आहेत. हे कितपत खरे होतील हें एका परमेश्वरावांचून इतरांस अगम्यच होय !

प्रस्तुत विषयाचा वर सांगितला येवढा वस्तुतः पाहतां जरी विस्तार आहे, तरी त्यांतला विशेष उपयुक्त व निश्चित असा भाग म्हटला म्हणजे

---

१. " या भरतखंडांत जन्म पावणें हें अगोदर दुर्लभ आणि त्यांतून मानुष्य दुर्लभ ! "

मधलाच होय, हें उघड आहे. कां कीं, या देशाची पुढें काय स्थिति होणार याविषयींचे तर्क तरी कितीसे निश्चयात्मक होणार आहेत हें कोणीहि सांगेल, व असल्या शुष्क तर्कापासून उपयोग कितीसा होणार आहे हेंही दिसतेंच आहे. बरें, मागील काळाविषयीं पाहिलें, तर आमचा इतिहास ग्रीक व रोमन लोकांच्या इतिहासाप्रमाणें साद्यंत तर मिळत नाहींच; पण जी कांहीं इकडची तिकडची माहिती माराकूट करून मिळते तीही पराकाष्ठेची संदिग्ध व तुटक मिळते. भूमि खणतां खणतां एकादा भौमासुराचा वाडा लागला तर त्यावरील लेख एके हातांत घ्यावा, व दुसऱ्या हातांत एकादा श्लोक घ्यावा, आणि अमुक अमुक ग्रीक इतिहासकाराचा अमुक अमुक लेख आहे म्हणून त्याशीं तो ताडून पाहावा; याप्रमाणें 'शेख मिऱ्याचा डोला आणि पर्वतीच्या पायऱ्या' अशी कांहीं सांगड लावून देऊन बादरायण संबंध जोडून द्यावा येवढाच काय तो हल्लींच्या स्थितींत मार्ग उरला आहे ! असें करतांना 'मृच्छकटिक' नाटकांतला 'भावश्चेटः चेटो भावः'[1] हा प्रकार किती वेळां घडत असेल कोण जाणे ! तेव्हां भूत, भविष्य व वर्तमान या तिहींपैकीं तिसऱ्या विषयींच आपणांस निश्चयात्मक विवेचन करतां येणार आहे, व त्यापासूनच विशेष लाभही आहे. यास्तव तोच घेऊन त्यावर आमचें काय काय विचार आहेत ते वाचकांस सादर करतों.

२. हे विचार या वेळेस सादर करण्याचें एक मोठें कारण असें आहे कीं, आजपर्यंत या विषयाच्या संबंधानें आमचे जे जे विचार प्रगट होत गेले त्यांवरून कित्येकांस एक मोठी शंका उत्पन्न झाली आहे कीं, आमची स्वतःचीं मतें तरी काय आहेत ? आम्हीं कधीं कधीं कधीं नव्या लोकांस नांवें ठेवतों; व कधीं कधीं जुन्यांसहीं ठेवायला चुकत नाहीं. कधीं इंग्रजांची व इंग्रेजी ग्रंथकारांची आम्हीं तारीफ केलेली आढळते; कधीं तोच उलटही प्रकार आढळतो. तेव्हां हें आहे तरी काय ? एक आमचें कोणत्याच

१. 'मृच्छकटिका' च्या प्रथम प्रवेशांत शकार, विट व चेट हे अंधारांत वसंतसेनेस शोधीत असतां वरील चुकभुली झाल्या आहेत. प्रथम अंक पाहावा.

विषयावर कांहींच मत निश्चित म्हणून नाहीं असें तरी असलें पाहिजे; किंवा उगीच हें! कांहीं तरी गौडबंगाल तरी आम्ही चालवीत असूं! 'इसापनीतीं' तील वनदेवास वाटसराची परस्परविरोधी कृति पाहून जसा आचंबा वाटला, व हा लबाड आहे असा त्यानें सिद्धांत करून टाकला; किंवा ग्रहांच्या विचित्र गति, म्हणजे त्यांचें प्रचलन, स्तंभन व वक्रीभवन,[1] हे प्रकार पाहून प्राचीन ज्योतिषी जसे गोंधळून जात, त्याप्रमाणेंच आमचें मतवैचित्र्य पाहून अनेक वाचक बुचकळ्यांत पडले आहेत असें आम्हांस समजलें आहे. त्याप्रमाणेंच इतर आक्षेपकांचें असेंही म्हणणें आमच्या कानांवर आलेलें आहे कीं, आम्ही हें बरोबर नाहीं, तें बरोबर नाहीं याप्रमाणें दोषाविष्करण मात्र करतों; पण बरोबर कोणतें, व करावें काय, याविषयीं कोठेंच कांहीं सांगत नाहीं. केवळ निषेध करून काय फळ आहे? निषेध करील त्यानें विधीचाही मार्ग सांगणें अवश्य होय!

आतां प्रथमतः वरील दोन आक्षेपांचा थोडासा विचार करणें जरूर आहे: पहिला आक्षेप हा कीं, आमचें स्वतःचें मत काय आहे तें निश्चितपणें समजत नाहीं. वस्तुतः पाहतां आजपर्यंत जे जे विषय आम्ही हातीं घेतले त्यांजवर इतरांचे जसे अभिप्राय प्रगट केले त्याप्रमाणेंच आम्हीं आपलेही प्रगट केले आहेत; मग त्यांत संदिग्धपणा कोणता राहिला आहे हें आम्हांस कांहीं समजत नाहीं! आतां आमचें प्रतिपादन कधीं या पक्षाचें असतें व कधीं त्या पक्षाचें असतें हें खरें आहे; पण याचें कारण आमचें बुद्धिचांचल्य नव्हे, तर सत्याचेंच चांचल्य होय. सत्य हें एकाच

१ जो एकाद्या ग्रहाच्या गतीकडे लक्षपूर्वक अवलोकन करील त्यास पुढील विलक्षण प्रकार दृष्टिगोचर होणार आहेत–कधीं कधीं त्याची गति सारखी पुढें चालली असते, केव्हां केव्हां तो जागच्या जागीं अडून राहिल्यासारखा दिसतो, व दुसऱ्या वेळीं पहावें तों, स्वारी मागें मुरडून पिछेहाटही करते! या शेवटल्या दोन प्रकारांस अनुक्रमें करून स्तंभन व वक्रीभवन अशा ज्योतिषांतील संज्ञा आहेत. हे सर्व विचित्र आभास पृथ्वीच्या समकालिक गतीमुळें होतात हें आमच्या वाचकांपैकीं कांहीं मंडळीस तरी माहीत असेलच.

राष्ट्राला, एकाच धर्माला, किंवा एकाच पक्षाला अनुसरून असतें असें नाहीं; तर अशोधित धातूंत जसे सुवर्णरज यदृच्छेनें मिसळलेले असतात, व रसायनव्यापारांनीं त्यांचें पृथक्करण करून ते वेगळे काढावे लागतात, त्याप्रमाणेंच सत्याचीही गोष्ट होय. त्याचे अंश ज्यांत मिश्रित झाले नाहींत असा प्रायः कोणताही पक्ष नाहीं. यास्तव एकाच पक्षाचा दृढ अभिमान धरणें हा दुरभिमान होय. तर लोकांत यथार्थ ज्ञानाचा प्रसार करण्याचें काम जो पतकरील त्यानें केवळ एका सत्याचीच ओळख ठेवली पाहिजे. अमुक अमुक पक्षाचे किंवा अमुक अमुक मताचे आम्ही अभिमानी आहों असा बाणा 'बाँबे ग्याझिट्' किंवा 'ज्ञानोदय' यांच्याप्रमाणेंच त्यानें बाळगणें म्हणजे आपलें कर्तव्य विसरून जाणें होय. तर हें तत्त्व नीट लक्षांत ठेवलें असतां आमच्या लेखांत जे कोणास विरोध भासत असतील त्यांचा तेव्हांच परिहार होणार आहे !

दुसरा मुद्दा असा कीं, एकाद्या गोष्टीला जो कोणी नांवें ठेवील त्यानें ती सुधारावी कशी हेंही पण जरूर सांगितलें पाहिजे; नाहीं तर नांव ठेवण्यास त्यास अकत्यार नाहीं. हा मुद्दा किती पोकळ आहे हें बहुधा कोणालाही कळणार आहे. अमका मनुष्य नकटा आहे असें कोणी म्हटल्याबरोबर त्याचें नाक 'चांपेकळी' सारखें करून देण्याचा बोजा लागलीच त्याच्या डोक्यावर येऊन आदळतो काय ? वैद्यानें आपली नाडी पाहून अमुक अमुक विकृति आपल्याला जडली आहे असें सांगितल्याबरोबर आथेल्लोनें जशी यागोची गचांडी धरली त्याप्रमाणें वैद्यराजांवर प्रयोग केला असतां चालेल काय ? 'इंग्रेजी राज्य जुलमी आहे' हे शब्द तोंडावाटें काढावयाचे, तर अगोदर पार्लमेंट, स्टेट सेक्रेटरी, वैसरॉय, गव्हर्नर, कलेक्टर, या साऱ्या परंपरेची जेव्हां मनांतल्या मनांत वाट लावून उत्कृष्ट राज्यपद्धतीचा नकाशा अगोदर तंतोतंत जुळवून ठेवावा, तेव्हां तोंड उघडावें, दरम्यान चालला आहे तसा बुक्क्यांचा मार निमूटपणें सोसला पाहिजे, हें म्हणणें रास्त होईल काय? वरच्यासारखें तर्कशास्त्र लढूं लागलें तर मोठा जुलूम होणार आहे ! 'अरे, ही भित येथें वांकडी आली ना !' असें यजमानानें विचारल्याबरोबर गवंड्यानें हातची करणी खालीं ठेवून द्यावी आणि 'कशी घालावयाची ती अगोदर दाखवा आणि मग बोला'

असें खाडदिशीं उत्तर द्यावें, असा न्याय झाला ! तसेंच स्वतः सूपशास्त्रांत अगोदर निपुण व्हावें, आणि मग हें आंबट, तें तिखट, ही चवढव करायला लागावें. दरम्यान किती आंबट लागलें तरी तोंड वेडेंवांकडें करण्याचा कोणाला अधिकार नाहीं, किंवा तिखटाची आग कानशिलाला जरी जाऊन झोंबली तरी खबरदार कोणी हूं कां चूं केलें तर !!– तेव्हां एकंदरींत हाही कोटिक्रम अगदीं शुष्क आहे. अमुक अमुक गोष्ट गैर आहे असें सांगण्याचा सर्वांस अधिकार आहे, व ती सुधारण्याचा उपाय सांगण्याची जबाबदारी वरील दूषकावर नियमानें येतेंच असें कांहीं नाहीं. दूषकानें दोषाचें आविष्करण करतांना त्याच्या प्रतिक्रियेचाही उपाय सांगितल्यास चांगलेंच. तसें केलें असतां त्यास तें विशेष श्रेयस्कर होणार आहे हें उघडच आहे. पण या वरच्या पायरीपर्यंत जरी त्याची मजल न पोंचली, तरी लोकांचा भ्रम दवडून त्यांस सावध केल्याचें तरी श्रेय त्याजकडे येणार आहे हें उघड आहे. रोगापासून मुक्त करण्याचें सामर्थ्य थोडयांसच असतें, म्हणून आपल्या दृष्टीस जी विकृतीची भावना येईल ती कोणाच्या किंवा त्याच्या स्नेह्यांच्या लक्षांत आणून दिल्यानें दौर्जन्य प्रगट होतें असें नाहीं. वरील भावना लक्षांत येणें हेंच पुढील चिकित्सेचें पहिलें अंग होय !

तर याप्रमाणें वरील दोन आक्षेपांचें निरसन झालें. आतां सदरील विषयावर आम्हीं आपले अभिप्राय यापूर्वी प्रगट कां केले नाहींत हा विचार जर कोणाचे मनांत येईल, तर असें करण्याचें कारण उघडच आहे. तें हें कीं, प्रस्तुत विषय हा मोठा खोल आहे. ज्यानें उठावें त्यानें त्यावर वाक्पांडित्य चालवावें किंवा लेखणीची फर्डेशाई उडवावी अशांतला तो नव्हे. त्यास पुष्कळ वाचन, पुष्कळ विचार, पुष्कळ अनुभव, व मोठी पोक्त बुद्धि, हीं पाहिजेत. केवळ चार दिवस येथें बडेजावी भोगून गेलेल्या पाश्चात्य ग्रंथकारांनीं, किंवा चवाठ्यावर शेणमार खाल्लेल्या ख्रिस्तपुत्रांनीं, आपलें अगाध ज्ञान मिरविण्याच्या उद्देशानें केलेल्या एकदेशीय वर्णनावरून येवढया प्रचंड व प्राचीन राष्ट्राची खरी अंतर्गत स्थिति समजणें हें केवळ अशक्य होय. कोणत्याही राष्ट्राच्या स्थितीचें वास्तविक स्वरूप ज्यास माहीत करून घेणें असेल त्यास तें परवांच्या युवराजांप्रमाणें दीपोत्साहांत

हिंडून बडचा दरबारांतील गुळचेट नाटकी बोलण्यावरून समजत असतें असें नाहीं; किंवा साहेबी बंगल्यांतून दुर्भिणी रोखल्यानेंही वरील उद्देश सफळ होत नाहीं. वरील ज्ञानाची ज्यास खरोखरच अपेक्षा असेल त्यानें अंग मोडून जातीनें मेहनत केल्याखेरीज तें कधीं प्राप्त होणारें नाहीं. आपली बडेजावी एकीकडे गुंडाळून ठेवून जो लहानथोरांत सामील होईल, राजापासून रंकापर्यंत परिचय ठेवील, देशभाषांतील ग्रंथांचें सामग्र्यानें अवलोकन करील, चोहोंकडे पर्यटन करून साऱ्या प्रकारची माहिती मिळवील, त्यासच वरील हेतु साध्य होणार आहे. तेव्हां हें सर्व लक्षांत आणलें असतां, आजपर्यंत सदरील विषयावर आम्हीं आपली लेखणी कां चालवली नाहीं, व सध्यांही चालवण्याची आम्हांस धास्तीच वाटते, या दोन्ही गोष्टींची उपपत्ति कोणासही करतां येणार आहे.

येवढी प्रस्तावना करून आतां आम्हीं पुढें सरसावतों. वर नुकतेंच सांगण्यांत आलें आहे कीं, प्रस्तुत विषय हा मोठा गहन आहे. व याचें यथार्थ विवेचन करावयाचें म्हणजे पुष्कळ साधनें अनुकूल पाहिजेत. हीं आमच्यापाशीं हल्लींच्या स्थितींत जशीं असावींत तशीं जरी नाहींत, तरी प्रकृत महत्त्वाच्या विषयावर दिग्दर्शनमात्रेंकरून तरी निरूपण करूं अशी आम्हांस उमेद आहे.

असो; आतां या अवाढव्य विषयाचें निरूपण आम्ही कोणत्या पद्धतीनें करणार तें सांगून नंतर विषयास लागूं. आमच्या देशाच्या स्थितीविषयीं जो विवेचन करील त्यानें पुढील तीन विभागांवर आपलीं मतें प्रदर्शित केलीं असतां बस होईल असें वाटतें. हे तीन विभाग येणेंप्रमाणें:-(१) आमच्या राजकर्त्यांची स्थिति, (२) एतद्देशीय राजेरजवाड्यांची स्थिति, (३) सामान्य लोकांची स्थिति. तर आतां पहिला विभाग उचलून त्याच्या संबंधानें आमचें आजमित्तीला काय काय अभिप्राय झाले आहेत ते निवेदन करतों.

वरील तीन भागांपैकीं या प्रथम विभागावर आपले काय विचार असतील ते बेधडक कागदावर नमूद करणें हें हल्लींच्या बादशाही कारकीर्दीत मोठें कठीण काम झालें आहे हें सर्वांस महशूर आहेच. त्यांतून दिल्लीपदावर आरूढ झाल्यानंतर लवकरच आमच्या राज्यकर्त्यांनीं छापखान्यांवर

केवढी कदर चालू केली, व साऱ्यांचों मुसकटें कशीं आवळून टाकलीं, हेंही सर्वप्रसिद्धच आहे. आतां विलायतेंत त्यावर जी झटापट झाली, व बीकन्सफील्ड महाराजांच्या जागीं ग्लाडस्टन साहेबांचें प्रभुत्व स्थापित झालें. त्याच्या योगानें वरील खग्रास बराच सुटला आहे हें खरें; तरी पूर्ण मोक्ष होऊन कैलासवासी लॉर्ड साहेबांच्या नांवें बुचकळी मारण्याची मोकळीक सर्वांस होईपर्यंत चकोर मंडळीस स्वच्छंदेंकरून भराऱ्या मारण्याचें अवसान येणार नाहीं हें उघड आहे. यास्तव इंग्रेजी पेन हातीं धरलें असतां प्रस्तुत विषयांचें विवेचन जसें आम्ही करूं, किंवा एकादा फ्रेंच, रशियन अगर अमेरिकन ग्रंथकार जसें त्यावर निष्प्रतिबंध लिहील, तसें प्रस्तुत प्रसंगीं आमच्या हातून होणार नाहीं हें खरें; तथापि पुढें ज्या गोष्टी आम्ही दाखल करणार त्या सर्व इतिहासप्रसिद्ध व लोकप्रसिद्ध असल्यामुळें त्यांच्या संबंधानें यथास्थितपणें विवेचन करण्यास आम्हांस कोणतीही हरकत नाहीं.

आतां आमचे धर्मनिष्ठ बंधु 'ज्ञानोदय' व राजनिष्ठ बंधु 'एलिफास्' अशा मंडळीस आमचें पुढील विवेचन कोणत्या तऱ्हेनें भासेल, व त्यांतील कोटिक्रम त्यांच्या पवित्र व ज्ञानमय चित्तावर कोणत्या प्रकारें आरूढ होईल हें आम्ही पुरतेपणीं जाणून आहों; पण आमच्या हल्लींच्या स्थितींत त्यांच्या अभिप्रायांची आम्हांस मोठीशी फिकीर करायाला पाहिजे असें नाहीं. शिवाय त्यांची वादपद्धति किती मुद्देशीरपणाची असते हें यापूर्वी अनेक प्रसंगीं आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. यास्तव पुढील विवेचनाच्या संबंधानें निघणारे जे त्यांचे नेहमींचे आक्षेप, कीं आपल्या राज्यकर्त्यांस अप्रिय होईल असा मजकूर लिहिणें हें मोठें अनुचित कर्म होय, व ज्यांनीं आपणांस ज्ञान दिलें त्यांचे दोष काढूं पाहणें हा मोठा अधमपणा आहे इ. इ., या सर्वांकडे आम्ही कानाडोळा करून आपल्या मार्गास लागतों.

३ 'आमच्या राज्यकर्त्यांची स्थिति' या प्रकरणांत आम्ही पुढील गोष्टींविषयीं निरूपण करणार. प्रथमतः आमचा व आमच्या राज्यकर्त्यांचा संबध कसा जडला, आमची पूर्वींची स्थिति कशी होती, हल्लीं कशी आहे, सरकारचें आमच्याशीं कोणत्या तऱ्हेचें वर्तन आहे, तें असायला कसें पाहिजे, इत्यादि.

इसवी सनाचें सोळावें शतक संपेतोंपर्यंत आम्ही इंग्रेजांचे कोणी नव्हत व इंग्रेज आमचे कोणी नव्हत ही स्थिति होती, हें सर्वास माहीत आहेच. शत्रु, मित्र व उदासीन या संबंधत्रयापैकीं आमचा व आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांचा त्या वेळेस शेवटला काय तो संबंध होता. पुढें या देशाची कीर्ति ऐकून पोर्च्युगीज, डच, फ्रेंच, डेन्स वगैरे लोकांप्रमाणें इंग्रेज हेही आमच्या देशांत येऊन येथें वखार घाल, तेथें थोडीशी जमीन खरेदी कर याप्रमाणें त्यांनीं क्रम आरंभला. सारांश, पारशी लोक जसे स्वदेशास पारखे होऊन गुजराथच्या राजाला शरण येऊन त्याच्या मुलखांत वणिग्वृत्तीनें राहिले,[1] किंवा मारवाडी जसे लोटा व रस्सी येवढें भांडवल घेऊन प्रथमतः येतात व 'कांच बांगडी फुटाणी' करून वाणिज्यवृत्तीस आरंभ करतात, त्याप्रमाणेंच आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांची

१. पार्शी लोकांचा मूळ देश हल्लीं ज्यास इराण म्हणतात तो होय. त्यावर मुसलमानांनीं स्वारी करून तो इ. स. ६५० या वर्षीं काबीज केला. तेव्हां कांही लोक आपला फारा दिवसांचा अग्नि व धर्मपुस्तकें हीं जवळ करून गलबतांत बसून निघाले, ते गुजराथेच्या किनाऱ्यावर येऊन दाखल झाले. तेव्हां त्या देशच्या राजानें त्यांजपासून कांहीं आणभाक करून घेऊन त्यांस आपल्या मुलखांत राहण्याची परवानगी दिली. पारशांची अग्यारी, बहात्तर पदरी लोकरीचें जानवें, विटाळशीचा विटाळ गोमांसवर्जन वगैरे गोष्टी प्रसिद्धच आहेत. पुढें मुसलमानी अंमल झाल्यावर वरील लोकांस डुकराचें मांसही सोडून द्यावें लागलें. या लोकांनीं आपली वाणिज्यवृत्ति अद्याप कायम ठेवली असून ते आजपर्यंत कोणत्याही उलाढालींत पडले नाहींत, व आपल्या आश्रयदात्यांशीं त्यांनीं निमकहरामीपणा केला नाहीं, ही गोष्ट त्यांस भूषणास्पद समजली पाहिजे! नाहीं म्हणायाला आमच्या पुण्याचे मोदीसाहेब मात्र शेवटल्या राजश्रींच्या कारभारांत थोडेसे पडले होते. पण त्यांस लवकरच हिरकणीचें प्रायश्चित्त घेणें भाग पडलें ! !

2387 ई 1901
1231 ... 2817

मूळपीठिका आहे. [1] पुढें एका इंग्रेजी डाक्तरानें दिल्लीच्या बादशाहास बरा केला, नानासाहेब पेशव्यानें इंग्रेजांची मदत घेऊन आंग्रचांचा मोड केला, आरकाटच्या नबाबास त्यांनीं साह्य केलें, अशा लहानमोठ्या कामगिऱ्यांवर या लोकांनीं एतद्देशीय राजांपासून जकातीची

१. प्रसिद्ध अमेरिकन कवि माँटगामेरी (मेकालेच्या तावडींत सांपडलेले रेवरेंड बोवा नव्हेत !) यानें एका काव्यांत पुढील विलक्षण उल्लेख केला आहे:--

" Either India next is seen,
with the Ganges stretched between,
Ah ! Wha horrors here have been !
" War disguised as commerce came,
Britain, carrying sword and flame,
Won an empire, lost her name ! "

Voyage round the world.

वरील उल्लेखाचा एक भाग या अमेरिकन कवीनें वहुधा द्वेषबुद्धीनें लिहिला असावा. त्याजबद्दल त्याच्यापाशीं काय पुरावा असेल न कळे ! पण दुसरा भाग मात्र सर्वथा यथार्थ होय. त्याबद्दल खुद्द राज्यस्थापकाच्या हातचेंच सर्टिफिकेट घ्या:--

" Alas ! " says Clive, " How low is the English name sunk ! I could not avoid paying the tribute of a few tears to the departed and lost fame of England and the British nation–recoverably so, I fear. However, I do not declare, by that great Being who is the searcher of all hearts, and to whom we must be accountable if there be a hereafter, that I am come out with a mind superior to all corruption, and that I am determined to destroy these great and growing evils, or perish in the attempt. "

Essay on Lord Clive.

माफी घेतली, [१] गांव इनाम घेतलें, असा प्रकार चालू झाला. पुढें हे जरासें जोरावर आल्यावर यांच्या व परेंच लोकांच्या लढाया सुरू झाल्या. यांत सुदैवेंकरून आमच्या भावी राज्यकर्त्यांसच जय येत गेला. फ्रेंच लोकांनीं शेवटपर्यन्त इंग्रेजांचा पाडाव करण्याचा प्रयत्न चालवला होता, [२] व एके प्रसंगीं डच् लोकांनींही आपलें बोट शिरकविण्याचा लाग केला होता; [३] पण इंग्रेजांची सद्दी जबर ! त्यांच्या आणीबाणीच्या प्रसंगीं क्लेव्,

१. ह्यामिल्टन नांवाच्या एका इंग्रेजी वैद्यानें फिरुक्शीर बादशाहास रोगमुक्त केलें; ह्याबद्दल बादशाहाकडून इंग्लिशांस मद्रासेजवळ तीन गांवें मिळालीं, व कलकत्त्याजवळ सदतीस गांवें खरेदी करण्याची परवानगी मिळाली, खेरीज वर सांगितलेली जकातीची माफी ! या एका गोष्टीवरून आम्हांत व इंग्रजांत काय फरक आहे तो तेव्हांच लक्षांत येण्यासारखा आहे. ह्यामिल्टन्च्या जागीं आमच्या इकडचा कोणी मनुष्य असता, म्हणजे तो आपल्यापुरता विचार करून आपणांस एकादी जहागीर वंश-परंपरा करून घेता; आणि आमचे धुलीपसिंग महाराज जसे खुशाल विलायतेस रमून राहिले आहेत त्याप्रमाणेंच तो इकडे दिल्लीपतीच्या चरणारविंदीं निरंतर पडून राहता !

२. वरील प्रयत्नांपैकीं साऱ्यांत जबरा प्रयत्न म्हटला म्हणजे नेपोलियनचा. त्याने ईजिप्ट् (मिसर) देशांतून टिप्पु सुलतानाशीं संधान चालविलें होतें सन १७९९ च्या जानेवारी महिन्यांत त्यानें टिप्पूस असें पत्र लिहिलें होतें कीं, " इंग्लिश लोकांच्या त्रासांतून आपणास सोडवण्यास मी आपली अजिंक्य फौज घेऊन निघालों आहें ! " पण ही फौज पुढें जों येणार तों अगोदरच इंग्लिश लोकांनीं श्रीरंगपट्टणावर गर्दी करून सुलतान साहेबांस अध्यय्यपदीं आरूढ केलें ! वरील राजश्रीनें शेवटीं शेवटीं फ्रेंच प्रजासत्ताक राज्याची ही दीक्षा धारण करून ' सिटिजन् टिप्पु ' ही किताबत सुरू केली होती ! !

३. हा प्रसंग मीर जाफर यानें त्यांच्याशीं गुप्तपणें संधान बांधून इंग्रजांस घालवून देण्याची जी मसलत योजिली होती तो होय. यांस कितपत यश आलें हें सांगायालाच नको च. हल्लीं सुरत मुक्कामीं एक शेत काय तें डच् लोकांकडे राहिले आहे !

कूट, वेलेस्ली, हावलॉक् यांच्यासारखे जाडे सरदार सेनानायक होऊन त्यांचा मार्गे पाय म्हणून फार करून कोठें आलाच नाहीं ! आतां हें खरें, कीं त्यांनीं माधवराव, महादजी, रणजितसिंग अशा प्रबळ पुरुषांशीं स्नेहभावच राखून त्यांच्या मरणानंतर त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ केली व दोन्ही पक्षांकडील सेनानायक एका तोडीचे आहेत असा फार करून योग आलाच नाहीं; तरी एकंदरींत पाहतां या पाश्चात्य लोकांची सद्दी, त्यांचें कारस्थान, व कवायत हीं विशेष खरीं. त्यांच्या योगानें हिंदुस्थानासारखें अफाट राज्य त्यांच्या अचानक पदरीं पडलें, एरवीं मुळारंभीं पाहतां एक लहानशी व्यापाऱ्यांची मंडळी ती काय निघाली, हिनें दीडशें वर्षेपर्यंत या देशांत नुसती वाणिज्यवृत्ति ती काय केली, पुढें एकाएकीं तराजूची दांडी टाकून देऊन ते वैश्याचे क्षत्रिय काय बनले, व हळू-हळू पाय सरकवतां सरकवतां साऱ्या राजेरजवाड्यांस बेताबेतानें गुंडाळून टाकून सेव्यसेवकभावाचा विपर्यय करून सार्वभौमपदावर आरूढ ते काय झाले ! एकंदरींत साराच गौडबंगाली खेळ ! तेव्हां इंग्रेज ग्रंथकारांच्या व विशेषतः मिशनरींच्या तोंडून जो कधीं कधीं धन्यवाद निघतो, कीं हें भरत-खंड आकाशांतील बापानें आमच्याकडे मेहेरबानीनें सोपवून दिलें आहे त्याची यथार्थता कोणास भासणार नाहीं ?

तर याप्रमाणें कोणीकडे इंग्लंड व कोणीकडे हिंदुस्थान, पण प्रभूच्या अचिंत्य करणीनें या दोहों देशांची आज कितीक वर्षांपासून सांगड जुळून गेली आहे ! आतां ही जी इंग्रेज लोकांची या अफाट देशावर सत्ता चालू झाली आहे ती कोणत्याही तऱ्हेनें मिळविलेली असो, तिजविषयीं तूर्त आम्हांस विचार कर्तव्य नाहीं. आम्ही असेंच घेऊन चालतों, कीं प्लासीच्या लढाईपासून तों राणीसाहेबांच्या जाहीरनाम्यापर्यंत जो जो आमच्या सरकारनें येथें कारभार केला तो सर्व अगदीं न्यायाचा होता, कंपनी सरकारचे पहिले गव्हर्नर जनरल वॉरन् हेस्टिंग्स यांच्यापासून तों शेवटले लॉर्ड डालहौसी यांच्या पावेतों सर्वांनीं जो जो व्यवहार केला तो रास्त, जीं जीं युद्धें केलीं नीं तीं धर्मयुद्धें, हें सर्व आम्हांस कबूल आहे. आतां हें सर्व गृहीत धरून सध्यां आमची स्थिति कशी आहे व आमचे राज्यकर्ते आम्हांस कोणत्या तऱ्हेनें वागवीत आहेत तें पाहूं.

४. राजा व प्रजा या दोघांचा परस्पर संबंध कोणत्या तऱ्हेचा असायाला पाहिजे हें बहुधा कोणालाही सांगायाला नकोच. 'प्रजा' शब्दाचा मूळ अर्थ 'संतति' असा आहे; तेव्हां या अर्थाप्रमाणें पाहतां बापाचा व मुलांचा संबंध तोच वस्तुतः पाहतां राज्यकर्त्यांचा आणि राष्ट्राचा असायास पाहिजे. म्हणजे बाप जसा मुलाचें लालनपालन करतो, त्यांस सन्मार्गास लावून सुशिक्षा देतो, व त्यांचें जें हित व जो थोरपणा तेंच त्याचें हित व त्याचाही थोरपणा अशी त्याची समजूत असते, तशीच समजूत राजानें आपल्या प्रजेविषयीं बाळगिली पाहिजे. आजपर्यंत जे महाविख्यात राजे होऊन गेले त्या सर्वांच्या कारकीर्दीत हाच प्रकार नजरेस येतो. आमच्याच देशाविषयीं विचार केला तर राम, युद्धिष्ठिर, वगैरे पौराणिक काळांतले राजे जरी सोडून दिले तरी थोरले माधवराव, अहल्याबाई, अकबर, वगैरेंची राज्यगीति सर्व प्रकारें वरील नमुन्याचीच दिसून येते. आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांविषयीं जरी पाहिलें तरी त्यांचा पहिल्यापासून हाच घाट आहे. हिंदुस्थानांतले लोक अर्धवट रानटी आहेत त्यांस सुधारायाचे, जें अज्ञान आहेत त्यांस सज्ञान करायाचें, त्यांचा धर्म वाईट आहे तर त्यांस चांगल्या धर्मांत आणून सोडायाचें, त्यांच्या देशांत चोहोंकडे झोटिंगपाच्छाई होती ती मोडून टाकून त्यांस यथान्याय राज्य करण्याची पद्धति लावून द्यावयाची,- हा एकंदर प्रकार ! राणीच्या जाहीरनाम्यांत, पार्लमेंटांतील भाषणांत, गवर्नरप्रभृति येथील अधिकाऱ्यांच्या बोलण्यांत एकंदर मथितार्थ म्हटला म्हणजे हा, कीं या देशावर आधिपत्य करण्याचा आमच्या पाश्चात्य बंधूंचा मतलब म्हटला म्हणजे या देशाचें हित हाच केवळ होय. बाकी आमच्या धर्मप्रभूंस येवढचा अफाट देशाचें राज्य चालवण्यापासून स्वतःला म्हणजे कांहीं फायदा आहे असें नाहीं. कित्येक पंडित तर 'केसरि हिंद' शाही हा आंतबट्ट्याचा व्यापार आहे असेंही म्हणायाला चुकत नाहींत ! असो; धन्य त्यांची; आमचें सर्वस्व जाऊनही जेव्हां आमच्याच पायीं विलायतेस बूड, तेव्हां लांडग्यानें कोकरावर जो चार्ज ठेवला, की तूं माझें पाणी गढूळ करतोस, तो बरोबर म्हटला पाहिजे; व आमच्या भाषेंत जी म्हण आहे, कीं 'मेंढी जाते जिवानिशीं आणि खाणारा म्हणतो वातट' तीही प्रस्तुत प्रसंगाला लावली पाहिजे !

असो; वरील मतांच्या यथार्थत्वाविषयीं किंवा अयथार्थत्वाविषयीं आम्हांस विचार कर्तव्य नाहीं. त्यावरून इतकेंच तात्पर्य घ्यावयाचें, कीं आमचे प्रस्तुतचे राज्यकर्ते या देशाच्या संबंधानें कोणत्या बुद्धि मनांत बाळगतात, किंवा निदान बोलण्यांत तरी दाखवतात. आतां आज सरासरी शतकभर जो पाश्चात्यांचा आमच्यावर अंमल चालला त्यापासून आमचें हिताहित काय झालें याविषयीं निःपक्षपात बुद्धीनें विचार करूं.

५. सुमारें वीस पंचवीस वर्षांपूर्वी वर्तमानपत्रांतून व ग्रंथांतून इंग्रज लोकांचा केवळ स्तुतिपाठच चालत असे ही गोष्ट सर्वांत माहीत आहेच. 'आमचें शहाणें व दयाळू सरकार,' 'इंग्रेजी राज्य झाल्यापासून या देशास अनेक फायदे झाले' इत्यादि प्रकारांनीं फार करून ग्रंथांचे प्रस्ताव होत असत. आलीकडे पाहावें तों वरील मन्वंतर अगदींच फिरल्यासारखें दिसत आहे. मागें जी आमच्या राज्यकर्त्यांविषयीं लोकांची पूज्यबुद्धि होती व त्यांचे ठायीं जें प्रेम होतें तें हल्लीं पुष्कळच कमी झालें आहे. आम्हांस वरील दोन्हीही गोष्टी कबूल नाहींत. मागलें अज्ञानदशेंतलें प्रेमही आम्हांस पसंत नाहीं, व आलीकडचें दुराग्रहजन्य अप्रेमही आम्हांस मान्य नाहीं. केवळ तिऱ्हाईतपणानें आम्हांस जी गोष्ट खरी वाटते ती आम्ही येथें नमूद करणार. तर आतां इंग्रेजी राज्यापासून आम्हांस फायदे कोणते झाले किंवा होण्यासारखे आहेत याविषयीं प्रथमतः विचार करूं.

६. युरोपांतील लोकांचें आलीकडे विद्येंत पाऊल पुष्कळ पुढें सरकलें असल्यामुळें त्यांची कल्पना अशी झाली आहे कीं, सुधारणा काय ती आमच्या खंडांत; एशियातले सारे लोक गैर सुधारलेले ! हीच कल्पना इंग्रेज लोकांची एतद्देशीयांविषयीं आहे हें सर्वप्रसिद्धच आहे. आतां हींत वस्तुतः पाहतां जरी थोडाच अर्थ आहे तरी हल्लींच्या स्थितींत आम्हांस युरोपस्थांकडून पुष्कळच नवीन माहिती करून घेण्यासारखी आहे हें उघड आहे. यास्तव आपणांहून विद्वान् असणाऱ्या मनुष्याशीं समागम घडला असतां जसा आपणांस नेहेमीं फायदा असतो, त्याप्रमाणेंच सध्यां इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांचा जो निकट संबंध जडला आहे त्यापासून विशेषतः हिंदुस्थानास बहुत लाभ होण्यासारखे आहेत हें कोणासही कबूल करणें भाग आहे. एकाद्या शाहण्या मनुष्याच्या बरेंचसें भांडवल हवालीं केलें असतां

तो जसा लवकरच दामदुप्पट करून दाखवतो, व उत्तरोत्तर बहुगुणित अर्थ संचय त्यापासून निष्पन्न करतो, त्याप्रमाणेंच प्राचीन ग्रीक, रोमन, हिंदु, आरब वगैरे लोकांपासून पाश्चात्यांनीं जें ज्ञान संपादन केलें तें त्यांनीं आपल्या उद्योगानें आलीकडे पुष्कळच वाढवलें आहे यांत संशय नाहीं. पूर्वीं जीं अनेक शास्त्रें होतीं तीं त्यांनीं नवीन शोध सामील करून पुष्कळच वाढविलीं आहेत, व दुसरीं तर पूर्वीं अज्ञात असलेलीं नवीं काढून त्यांचा बहुत विस्तार केला आहे तेव्हां हल्लीं हें अपरंपार भांडवल आयतेंच आमच्या स्वाधीन होणारें आहे; मग हा काय लहानसहान लाभ म्हणावा! त्यांतून कोणत्याही उद्देशानें म्हणा, हें सर्व अपूर्व भांडार आमच्या राज्य-कर्त्यांनीं बळेंबळें आमच्या गळचांत बांधण्याचा हा आज वीस पंचवीस वर्षें अव्याहत उद्योग चालवला आहे, व त्यास यशही पुष्कळ आलें आहे. तेव्हां आमचा व इंग्रेजांचा समागम झाल्यापासून हें एक मोठें फल आम्हांस प्राप्त झालें आहे.

दुसरी गोष्ट व्यावहारिक कलांचें ज्ञान. या कला आलीकडे साऱ्या युरोपांत व अमेरिकेंत किती वाढल्या आहेत, व त्यांच्यापासून मानवजातीचें किती कल्याण झालें आहे व होण्यासारखें आहे हें आजच्या मित्तीला कोणालाही सांगण्याची जरूर उरली आहे असें न हीं. छापखाना, आगगाडी, आगबोट, तारायंत्र, प्रकाशालेख्य, गिरणी, वगैरे गोष्टींकडे जो क्षणभर लक्ष पुरवील त्यास सहाव्या पुस्तकांतील 'तीन राक्षसां'च्या धडयाची आठवण झाल्याशिवाय खास राहणार नाहीं. केवढचा अदभुत या शक्ति ! 'महाभारतांत–' वेषधारी नलराजाच्या सारथ्यकर्मांचें वर्णन केलेलें आहे कीं, ऋतुपर्ण राजाचा शेला रथवेगाच्या सपाटचांत उडन खालीं पडला, तेव्हां बाहुकानें त्यास सांगितलें कीं, 'तो राहूं द्या आतां, एक योजनभर तो मागें राहिला आहे ! ' [१] वरील इतिहासांतच

१. " त्या नृपवार्ष्णेतांचे दाटति पाहोनिया जवास गळे ।
तों स्यंदनावरुनि भूपृष्ठीं साकेत–राज–वास गळे ।।
" भूप म्हणे पडला गा भूपृष्ठीं उत्तरीय-पट थांब ।
बाहुक म्हणे पडों द्या तो योजन एक राहिला लांब ।।
'वनपर्व'—४०

अर्जुनाच्या हस्तलाघवाचें वर्णन केलें आहे कीं, त्यानें एका बाणाच्या टोकाला पत्र लावून तें आपल्या बापाच्या कचेरींत धाडून दिलें. त्याप्रमाणेंच कर्णानें पृथ्वी उचलिली, मारुतीनें सूर्यबिंबाच्या ग्रासार्थ उड्डाण केलें, दुर्वास ऋषीनें एकदम अठ्यांयशीं सहस्र ऋषींचा तांडा आणून पांडवांच्या आश्रमाशीं 'अल्लक' म्हणून गर्जना केली, व येवढा जबरदस्त भोजनसमारंभ काम्यक-वनांत घडविला ! वरील सर्व अचाट गोष्टी आज एकोणिसाव्या शतकांत प्रत्यक्ष घडूं लागल्या आहेत ही केवढी अजब बा'त आहे ! आमच्या गुर्जर देशाधिपतींस जेव्हां परवां अग्निरथांत घालून चाळीस तासांत पूर्वसमुद्र-तीरचें मद्रपूर दाखविलें, तेव्हां त्यास ऋतुपर्णाचा हेवा करण्यास थोडेंच कारण राहिलें असेल ! मोठमोठ्या राजेरजवाड्यांच्या डोक्यांवरून सफाई हात फिरवून लॉर्ड डालहौसी साहेब जेव्हां थकले भागले होत्साते हरि हरि म्हणायाला परत निजधामास गेले, व लंडनांतल्या तारागृहांतून त्यांनीं हिंदुस्थानाची आलबेली विचारली, [1]जेव्हां अर्जुनाच्याच कृतीचा नमुना उतरला नाहीं काय ? वरील भारती वीराच्या प्रतिपक्ष्यानें 'सप्तद्वीपा पृथ्वी' मोठ्या प्रयासानें सारीं चार अंगुळें उचलिलीं; आज एकोणिसाव्या शतकांत तर तिला तागडींत घालून तिचें वजनही काढून मंडळी मोकळी झाली आहे ! अंतरालांत लाखों कोस उड्डान एका क्षणांत करण्याचें अद्भुत साधन आज मानवजातीस उपलब्ध झालें आहे हें कोणास माहीत

१. वरील लाटसाहेबांनीं आपली कारकीर्द आगगाडी, तारायंत्र, टपाल, विद्याखातें वगैरे अनेक गोष्टी मोठ्या झपाट्यानें अमलांत आणून चोहों-कडे गाजवून दिली हें इतिहासज्ञांस सांगावयास नकोच ! त्यांनीं अयो-ध्येचा शेवटचा गोड घांस माजी कुंपिणीबाईस चारून स्वदेशवास जेव्हां केला, तेव्हां नूतनस्थापित विद्युद्यंत्राच्या द्वारें त्यांनीं तेथून इकडचें क्षेम-कुशल पुसलें, कीं अयोध्या प्रांतांत सर्व सामसूम आहेना? इकडूनही उत्तर गेलें,-ऑल्‌वेल् (आलबेल)! वरील आलबेलीच्या पाठोपाठ केवढी गलबल झाली, व कुंपिणीबाईस लाटसाहेबांनीं जें बळकट अजीर्ण करविलें त्याच्या योगानें तिचीं बिचारीचीं पुरीं शंभर वर्षें भरून तिचा अपूर्व अवतार कसा आटपला हें आबालवृद्धांस श्रुत आहेच ! अयोध्येंत पाऊल पडल्यावर राम म्हणण्याचा योग येणें हेंही साहजिकच आहे ! !

नाहीं ? त्याप्रमाणेंच वरच्यासारखा दाढीवाल्यांचा कंपू जर एकदम येऊन उतरला, तर तितक्यांची अन्नसामग्री एका सपाटयास तयार करण्याची तजवीज या अद्भुत शतकांतल्या एकाद्या सार्वजनिक महानसांत सहज होण्यासारखी आहे. बोळवणी करतांना प्रत्येक ऋषिजनास वस्त्रदान करायाचें मनांत आणल्यास तेंही तसेंच सुकर आहे ! सारांश, रावणानें जसे सर्व देव कावीज करून कोणाची पाककर्मावर, कोणाची सम्मार्जनावर, वगैरे नेमणूक करून साऱ्यांस सारखें राबविलें होतें, त्याप्रमाणेंच आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांनीं सर्व महाभूतें वठणीस आणून त्यांजपासून ते चोपून कामें घेत आहेत ! ! [१]

मग अशा अद्भुत प्रभावाच्या राष्ट्राशीं जर आपला आयताच योग जमून आला आहे तर ही केवढी सुदैवाची गोष्ट समजली पाहिजे ! रशियाचा पहिला बादशाहा पीटर दि ग्रेट यास आपला देश सुधारावयाचा होता तर हातचें राजवेत्र टाकून व बादशाही पोषाक फेकून देऊन मजुराचा धडधाकट डगला व हत्यारांची पेटीही त्यास पत्करावी लागली. मग पाश्चात्यांची अपूर्व विद्या जर आपल्या पायांनीं आमच्या देशास चालून आली आहे तर ही केवढी मोठी सोय आम्हांस झाली आहे बरें !

तिसरा लाभ मानसिक उन्नति. मानसिक उन्नति म्हणजे देशाभिमान, जात्यभिमान, स्वाभिमान, अनुचित कर्मापासून निवृत्ति, स्वातंत्र्याभिलाष, दैन्यवर्जन इत्यादिकांविषयीं ज्या मानसिक स्थितीपासून स्फूर्ति होते ती. ही स्थिति असणें हेंच देशोन्नतीचें प्रधान साधन होय व तिचा अत्यंताभाव म्हणजे देशाच्या अपकर्षाची परमावधि होय ! आतां हा लाभ इंग्रेजी राज्यापासून होईल हें म्हणणें पुष्कळांस सकृद्दर्शनीं विरुद्धोक्तीसारखें भासेल; पण मागील इतिहासावरून जो प्रत्यंतर पाहील त्याच्या ही गोष्ट सहज

१. हल्लीं आमच्या प्रभूंनीं पंचमहाभूतें आकळून त्यांजवर जें स्वामित्व चालविलें आहे त्यावर मागील पौराणिक वर्णनास अनुसरून किती विचित्र कवित्व करतां येणार आहे ! 'रामायणां'त व 'कुमारसंभवां'त त्यांतील प्रतिनायकांच्या वैभवाचें वर्णन आमच्या प्राचीन कविवरांनीं केलेलें आहे. आलीकडील थोडा मासला 'पद्यरत्नावलीं'तील एका प्रकरणांत सांपडेल.

लक्षांत येण्यासारखी आहे, कीं विद्येचा संस्कार हा सामान्यतः वरील उन्नतीस कारणीभूत होतोच आणि त्यांतून ग्रीक, रोमन; इंग्लिश वगैरे विद्यांचा तर वरील प्रभाव स्पष्टच आहे ! युरोपखंड जें गाढ अज्ञाननिद्रेंत शतकांचीं शतकें घोरत पडलें होतें त्यांतून त्याची जागृति कशाच्या योगानें झाली बरें ? ग्रीक व रोमन लोकांची प्राचीन विद्या–दुसरें कांहीं नाहीं. या विद्येचें पुनरुज्जीवन, हल्लीं जसे सस्कृताचें कांहीं होत चाललें आहे, त्याप्रमाणें पंधराव्या शतकांत सुरू झालें. या अमृतवल्लीचा थोडाबहुत रस पोंचतांच मृतप्राय जें युरोपखंड त्याच्यांत एकाएकीं चळवळ उत्पन्न होऊन लवकरच तें खडखडीत जागें झालें. मग काय विचारतां ! गलिव्हर जागा होतांच त्यानें छोटेखानी लोकांचे पाश जसे तडातड खाडदिशीं तोडून टाकले, आणि मोकळा झाला; त्याप्रमाणेंच वरील खडाचीही अवस्था झाली. प्राचीन ग्रीक व रोमन ग्रंथकाराचें अध्ययन करतांच त्या राष्ट्रांची वीरश्री इंग्लीश, फ्रेंच, जर्मन वगैरे लोकांचे ठायीं संचरली, आणि अनेक बंधनांतून ते भराभर मोकळे होत गेले प्रथमतः रोमनगरीं पोप महाराजांनीं कित्येक शतकें बंड माजवून ठेविलें होतें त्याच्यावर हल्ला पडला. वरील धर्मप्रभूचा अंमल अर्ध्या युरोपानें एकदम झुगारून दिला, व जिकडे तिकडे ज्वाला जसा वाटला तसा त्यानें निराळाच पंथ काढला ! याप्रमाणें आपल्या पारलौकिक पारतंत्र्याचा नाश करून युरोपचीं राष्ट्रें आपल्या ऐहिक प्रभूंवर उलटलीं, आणि राजा म्हणजे ईश्वरी अंश होय इत्यादि असमंजस कल्पनांचा त्याग करून त्यांनीं आपापले हक्क शाबीत केले. या कृत्यांत आमचे राज्यकर्ते हे तर सर्वांत प्रमुख झाले. त्यांनीं एका राजाशीं युद्ध करून येथल्या प्राचीन वेनराजाप्रमाणें त्यास मारून टाकलें, व त्याचेच चिरंजीव पुनः तेच तेच चार जेव्हां करूं लागले तेव्हां त्यासही पदच्युत करून तिसऱ्यालाच राजपदावर प्रतिष्ठापित केलें. फ्रान्स देशांतही हा दंगा तीन वेळां होऊन हल्लीं तेथें प्रजासत्ताक राज्यच चालू आहे. याचप्रमाणें जर्मनी, रशिया वगैरे राष्ट्रांतून हीच चळवळ सुरू आहे. अमेरिकेंतल्या लोकांनीं गेल्या शतकांत काय प्रकार केला तो तर जगजाहीरच आहे. असो; तर एकंदरींत हें सांगावयाचें कीं सज्ञान दशेचें फळ देशोन्नति हें होय. यास्तव आमच्या देशांत जों जों इंग्रेजी विद्येचा

प्रसार होत जाईल तों तों सुधारणा, स्वातंत्र्य, सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार ! एक इंग्रेजी विद्येचें वज्र आमच्या हातांत असलें, म्हणजे मग लिटन्‌शाही, टेंपल्‌शाही, चाटफील्ड्‌शाही, मूरशाही, वगैरे शंभर शाह्यांस सुद्धां आम्ही दाद देणार नाहीं ! !

याखेरीज इतर जे अनेक लाभ प्रस्तुत राज्यापासून या देशास झाले आहेत ते सर्वांस महशूर आहेतच. पूर्वी ज्या प्रकारची स्वस्थता, देशास बहुधा कधींही प्राप्त झाली नसेल तशा प्रकारची गेल्या पन्नास साठ वर्षेंभर येथें नांदत आहे. इंग्रेजी होण्याच्या पूर्वी प्रत्यहीं घडणाऱ्या ज्या गोष्टी, म्हणजे लढाया, मारामाऱ्या, पेंढारी दंगा वगैरे त्या आतां साऱ्या स्वप्नवत् झाल्या आहेत. पाश्चात्य राज्याच्या विस्तीर्ण छायेखालीं हें अवघें भरतखंड खुशाल झोपेंत घोरत आहे असें म्हटलें तरी चालेल ! आढचाला पाय लावून बिनघोक निजण्याचा काळ या राष्ट्रास यापूर्वी असा कधींही लाधला नाहीं ! काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यन्त जावें अशी जी सदरील कारकीर्दीची लोक तारीफ करतात ती अगदीं वाजवी आहे त्याप्रमाणेंच पूर्वी या देशाचा व्यापार जो अगदीं संकुचित होता तो आतां साऱ्या जगभर होण्याच्याही उत्कृष्ट सोई झाल्या आहेत. आगगाडचा, आगबोटी, तारायंत्रें, टपाल या सर्वांपासून व्यापारी लोकांचा किती फायदा होत आहे व होण्यासारखा आहे हें कोणालाही उघड करून सांगायला पाहिजे असें नाहीं. त्याप्रमाणेंच एकंदर लोकांचेंही वरील यंत्रविद्येपासून किती हित झालें आहे व होण्यासारखें आहे याविषयींही येथें कांहीं लिहिण्याची जरूर नाहीं. त्याप्रमाणेंच मानसिक स्वातंत्र्य हाही या कालांत सर्वांस झालेला एक मोठाच लाभ आहे मानसिक स्वातंत्र्य म्हणजे हवा तसा विचार करण्याची व ते विचार वाग्द्वारा किंवा लेखनद्वारा प्रसिद्ध करण्याची मोकळीक हिंदु राज्यांत या प्रकारची मोकळीक जरी बरीच होती, तरी मुसलमानांच्या राज्यांत यासंबंधानें बराच अटकाव होता हें इतिहासप्रसिद्धच आहे. औरंगजेबानें महंमदाची निंदा केल्याबद्दल संभाजीमहाराजांची जीभ कापून टाकली. टिप्पूच्या त्रासानें दोन हजार वैष्णवांनीं एकदम आत्महत्या करून घेतली; इत्यादि प्रकार प्रस्तुत राज्यांत केवळ अश्रुत आहेत. मिशनरींच्या द्वारें परस्पर काम झाल्यास

बरेंच असा जरी इंग्रेज सरकारचा अंतःस्थ हेतु आहे, तरी उघडपणें ख्रिस्ती धर्माच्या प्रीत्यर्थ कोणाही मनुष्यास या राज्यांत बिलकुल इजा पोंचत नाहीं, व आजपर्यंत पोंचलीही नाहीं. प्रख्यात वक्ता पिट्ट यानें एके ठिकाणीं आपल्या देशच्या राज्यव्यवस्थेची तारीफ करून एके प्रसंगीं असें म्हटलें आहे कीं, "इंग्लिश मनुष्याचें घर हा त्याचा किल्ला आहे." [१] हीच गोष्ट बऱ्याच प्रकारें आमच्या देशासही लागू झाली आहे. मागें मोगलाईंत किंवा पेशवाईंत जसें राजानें हवें त्याला उचलून बंदींत टाकावें किंवा त्याचा प्राणही घ्यावा तसा प्रकार प्रस्तुतचें राज्य परकी लोकांचें असतांही येथें होऊं शकत नाहीं. हें तर काय, पण टेंपलसाहेबांस एकीकडे मानपत्र मिळतें व एकीकडे प्रत्येक सभासदाच्या हातांत टेंपलशाहीचा इंग्रेजी पोवाडा पडतो; मूरसाहेब आज जकातीचे धारे होयबा रावबहादुरांच्या मान डोलावण्यावरून पास करतात, व दुसऱ्या दिवशीं पुणेंशाही 'छोकऱ्यां'नीं थोडीशी गडबड केली न केली तों 'बुढ्ढे' मंडळीस सरकारांतून खाशी थप्पड येते, इत्यादि गोष्टींकडे जो कोणी क्षणभर लक्ष पुरवील त्याची अशी खात्री झाल्यावांचून खास राहणार नाहीं. कीं हल्लींच्या राज्यांत आम्हांस जितकें स्वातंत्र्य आहे तितकें यापूर्वीं स्वदेशीय राजांच्या उत्कृष्ट कारकीर्दींतही कधीं नव्हतें. त्याप्रमाणेंच आमचे लोकच अत्यंत साहसशून्य व अगदीं पोंचट होऊन गेले आहेत,

१. "The proudest Government that exists upon the face of the earth is that of Great Britain. And the great Pitt, her proudest statesman, when he would tell of Britain's crowning glory, did not speak, as he might have done, of her wide-spread dominian upon which the Sun never sets. He did not speak of martial achievements, of glorious battle-fields and of splendid naval conflicts. But he said, with swelling breast and kindling eye that the poorest man of Great Britain in his cottage might bid defiance to all the force of the Crown. It might be frail, its roof might shake, the wind might blow through it, the storm might enter, the rain might enter; but the king of England could not enter it! In all his forces he dared not cross the threshold of that ruined tenement!"

नाहीं तर या स्थितींतही त्यांचा किती उत्कर्ष होण्यासारखा आहे हेंही बहुधा सर्वांच्या लक्षांत येण्यासारखें आहे !

फारचि बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच ।
'विराटपर्व'

अंक ७८--(१) इंग्रेजी राज्यापासून अहित. (२) स्वातंत्र्य-नाश. (३) आक्षेपनिरसन. (४) इंग्रेजी राज्याची आवश्यकता. (५) सध्यांच्या पारतंत्र्यापासून झालेले तोटे.

१. मागील अंकांत प्रस्तुतच्या राज्यापासून आमच्या देशास कोण-कोणते फायदे झाले आहेत व होण्यासारखे आहेत ते सांगितले. आतां त्यांत वरील राज्यापासून आमचें आजपर्यंत काय काय नुकसान झालें व पुढें कितपत होण्यासारखें आहे याविषयीं विचार करूं.

२. इंग्रजी राज्यापासून आमची पहिली मोठी हानि कोणती झाली म्हणाल तर स्वातंत्र्यनाश स्वातंत्र्याची स्थिति पारतंत्र्यापेक्षां किती सुखावह असते हें कोणालाही सांगायला नकोच. यदृच्छेनें अंतराळांत फिरणाऱ्या व वनगहनांत यथेच्छ आहारविहार करणाऱ्या पक्ष्यांत आणि मोठ्या सोन्याच्या किंवा रत्नखचित पिंजऱ्यांत कोंडलेल्या पोपटांत किती अंतर ! ज्याचा ईश्वरदत्त अधिकार हा, कीं त्यानें आपल्या सुंदर पक्षांच्या बळावर हवा तिकडे अनिरुद्ध संचार करावा, नानाविध फलांचा रसास्वाद घ्यावा, स्वजनांत राहून संसारसुख अनुभवावें, त्यानें टीचभर जागेंत राहून सदोदित 'लटपटपंची' करीत राहावें ही केवढी दैन्यावस्था ! हीच गोष्ट राष्ट्रासही लागू आहे. वस्तुतः पाहतां ज्या त्या राष्ट्रानें आपापली व्यवस्था ठेवावी व इतरांशीं जो संबंध ठेवायाचा तो फक्त व्यापाराच्या वगैरे संबंधानें ठेवावा, हा सचोटीचा मार्ग. प्रत्येक गृहस्थानें जसें आपलें घरदार, कुटुंब व जिनगी ही सुरक्षित ठेवून आपल्या शेजाऱ्यास उपद्रव लावूं नये, ही नीति होय; त्याप्रमाणेंच एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं जो व्यवहार ठेवायाचा तोही माणुसकीस अनुसरूनच ठेवणें उचित होय. गोमाजीनें उठून तिमाजीच्या घरावर दरवडा घालावा, त्याची चीजवस्त लुटून त्याचा जीव घ्यावा, बायको

उपटावी, मुलांमाणसांस बंदेगुलाम करून आपल्या घरीं न्यावें, हा प्रकार जितक्या दुष्टपणाचा व पाजीपणाचा आहे, तितकाच दुसऱ्याच्या मुलखावर स्वारी करणें, हजारों माणसांचे लढाईंत प्राण घेणें, सारा देश उध्वस्त करून त्यास कंगाल करून सोडणें, हाही होय. पण असें असतां आजपर्यंत जगाचा क्रम पाहिला तर काय आढळेल बरें ? दुसरें काय, लठ्ठालठ्ठी, मारामारी, रक्तपात, लुटालूट, जाळून पोळून फस्त, –हाच काय तो ! त्यांतून ज्या वेळेस सद्धर्माचा उदय झाला नव्हता, व खऱ्या देवाची ओळख कोणास नसून खोटे देवच साऱ्या देशांतून माजले होते, शिवाय सुधारणेचा ध्वज आलीकडे जसा चोहोंकडे फडकूं लागला आहे तशीही जेव्हां स्थिति नव्हती, तेव्हां वरील दांडगाईचे व अन्यायाचे प्रकार जिकडे तिकडे दृष्टीस पडत असत, यांत कांहीं नवल नाहीं. पण हल्लीं चालू असणारें एकोणिसावें शतक हें तर सुधारणेच्या संबंधानें पहिल्या प्रतीचा वाणा मिरवीत असतां, व या शतकांत सद्धर्माचे पवित्र प्रेषित आकाशांतली दिवटी घेऊन सारें भूमंडळ आक्रमीत असतां व येशूच्या दयामय धर्माचा जिकडे तिकडे गजर करीत असतां, कंठस्नानाचा व झोंटिगपाच्छाईचा प्रचार पहिल्यापेक्षां आतां काडीभरही कमी आहे असें नाहीं. हें शतक सुधारणेंत जसें सर्वांत पुढें आहे त्याप्रमाणेंच रक्तपातांतही त्याची सरशीच आहे. मागें भूमातेला तिचीं पवित्र लेकरें रक्तचंदनाचा नुसता सडा टाकून शोभवीत असत, आतां तर तीं जों जों शहाणीं होत चालली तों तों तिला वारंवार रुधिरस्नानाची महापर्वणी लाधते ! असो; तर मनुष्याचें अंतर्गत हें अद्याप पहिल्यासारखेंच मलिन आहे, व त्याची परस्वापहरणाविषयींची जी लालसा तिचें फळ तूर्त आम्ही भोगीत आहों !

आतां या एका स्वातंत्र्यनाशाच्या पायीं आमचीं कितीक नुकसानें झालीं आहेत पहा. एक तर आमचें जगांतून अस्तित्वच नाहींसें झाल्यासारखें झालें आहे. केवळ प्राणधारण करून आम्ही आहों इतकेंच काय तें ! गेल्या शतकांत हिंदु लोकांचीं राज्यें, हिंदु लोकांची संपत्ति, हिंदु लोकांची विद्या, वगैरे शब्दांचा जसा अर्थ होता तसा आतां कांहीं राहिला आहे काय ? सांप्रत आमचे लहानमोठे सर्व राजे म्हटले म्हणजे सरासरी बुदबळांतलेच होत. हालतां नये, बोलतां नये, बडे साहेबांच्या सदोदित

मुठींत, जवळ फौजफाटा म्हटला तर केवढा,-बुदबळांतलाच सरासरी प्रकार ! तोही आज कितीक दिवस सरकारच्या डोळ्यांत खुपतोच आहे. आमची संपत्ति म्हटली तर एकाद्या वेश्येपाशीं जशी असते तशा प्रकारची ! कोणी उस्ताद आला आणि तोंडांत मारून घेऊं लागला तर तिचा बचाव करण्यापुरतीही आमच्यांत ताकद नाहीं. रोमन लोकांनीं ब्रिटन देश अचानक सोडून दिला, त्याप्रमाणें जर उद्यां आम्हांवर पाळी आली, तर आमच्या मुंबापुरींतल्या एकेका ढेलाची काय त्रेधा उडून जाईल बरें ! चार चार घोड्यांच्या गाडींत जीं प्रस्थें घराच्या बाहेर पडायाचीं त्यांची हरी रामोशाशीं गांठ पडल्यावर त्यांजवर केवढा प्रसंग गुजरेल हें सांगायाला नकोच ! दोन वर्षांपूर्वीच एका य:कश्चित् दरवडेखोरानें साऱ्या दक्षिणेंत केवढी धामधूम करून दिली या एका गोष्टीवरूनच आमच्यांत दिवसें-दिवस किती मर्दुमकी येत चालली आहे हें कोणाच्याही सहज लक्षांत येणारें आहे. हाच प्रकार आमच्या विद्येचा व धर्माचाही. आमची आलीकडील विद्वत्ता म्हणून जी आम्ही येवढ्या डौलानें मिरवतों, ती वस्तुत: पाहतां पाश्चात्य विद्येचा, एक रज:कण आहे; तींत आमचें स्वत:चें बहुधा कांहींच नाहीं, व आहे तीही प्राय: शब्दज्ञानदात्मकच आहे. उद्यां जर आमचें सरकार आम्हांस सोडून गेलें तर तिला दीडदमडीलाही कोणी विचारील कीं नाहीं कोण जाणे ! इंग्रेज लोक जर एकदम आमच्या देशां-तून अंतर्धान पावले, तर आमच्या बडया विद्वानांत कोणी रेल्वे एंजिन करणारा मिळेल किंवा तारायंत्र जुळवून देणारा मिळेल याचा वानवाच वाटतो ! त्याप्रमाणेंच शेंकडों प्रकारचे कारागीर जे आमच्या देशांत आज शेंकडों वर्षें नांदत आले ते आलीकडे एकामागून एक जे नाहींसे होत गेले व चालले आहेत, ते तरी पुन: उत्पन्न व्हावयाचे म्हणजे केवढी दुरापास्त गोष्ट आहे ? सारांश, जसा एकादा आयदोजी असतो, व त्याला पाटावर बसवून ठेवून त्याचें सर्व कामकाज दुसऱ्यांनीं करावें, त्यासारखी आमची स्थिति दिवसेदिवस होऊं पाहत आहे. असें होतां होतां लवकरच काडीचाही वकूब नाहीं असे आम्ही नादान होऊन जातों कीं काय कोण जाणे ! हल्लीं आमची धर्माच्या संबंधानें कोणत्या प्रकारची स्थिति होऊन गेली आहे ती तर

सांगायाला नकोच. जुन्या धर्माची आम्हांस अतिशय लाज वाटून ख्रिस्ती लोकांचें पोकळ अनुकरण करणें हाच ईश्वराराधनाचा व लोकनीति सुधारण्याचा काय तो मार्ग आहे असें आम्हांस वाटूं लागलें आहे.

तेव्हां एकंदरींत पाहतां आम्ही तूर्त जगांतून उठल्यासारखेच झालों आहों. ज्यांस आम्हीं प्रथमतः थारा दिला, व जे आमच्या पुढें पुढें कित्येक दिवस करीत होते तेच आतां आमचे धनी होऊन बसले आहेत; व साऱ्या देशांतली जमीन सरकारची, जंगलांतील प्रत्येक झाड व झाडाचें प्रत्येक पान सरकारचें, सरकारास हवे तसे कर बसविण्यास पूर्ण अधिकार आहे, व त्या पैशाचा हवा तसा विनियोग करण्यास 'केसरि हिंदू' चे कुलमुकत्यार व्हैसराय साहेब यांस मुभा आहे, देशांतील लोक म्हणजे सारे बैल, त्यांस आम्ही जसें वागवूं तसें त्यांनीं वागलें पाहिजे, त्यांस वस्तुतः म्हणजे कांहीं हक्क नाहींत, आम्ही मेहेरबानी करून काय हक्क देऊं तेवढे घेऊन त्यांनीं मुकाटचानें राहावें व आमची निरंतर स्तुति गात बसावें, असें जो न करील तो राजद्रोही समजला जाईल, अशा प्रकारची एकंदर आमची हालहवाल आहे. हा सर्व प्रकार कशामुळें? तर एक स्वातंत्र्य गमावल्यापासून.

३. आतां आमच्यांपैकीं कित्येक सुखावलेल्या मंडळींचा वरील उल्लेखावर असा आक्षेप येणार आहे कीं, "स्वातंत्र्य हें वस्तुतः अत्यंत इष्ट आहे खरें; पण तें आम्हांस काय उपयोगी? "बाळमित्रां" त 'मुलें जीं स्वतंत्र व्हावयास इच्छीत होतीं' हा धडा आहे, त्यांत जशी त्या वेडचा मुलांची हौस त्यांच्या विपत्तीस कारण झाली; किंवा इस्पितळांत कोंडलेले वेडे एकदम सोडून दिले, अगर गोठचांतलीं गुरें मोकळीं सोडून दिलीं, तर जसा अनर्थ होईल, त्याप्रमाणेंच आम्हांसारख्या मूर्ख लोकांस स्वातंत्र्य प्राप्त झालें असतां मोठा कहर गुदरणार नाहीं काय?" ही वेडी समजूत आजपर्यंत आमच्यांतील अर्वाचीन विद्वज्जनांनीं हृदयाशीं धारण केली होती, व अद्यापही ती सुटली आहे असें नाहीं. आमच्या राज्यकर्त्यांचा तरी बोलून दाखवायाचा बाणा हाच कीं हे हिंदुस्थानांतले सारे लोक निवळ वेडे आहेत व यांच्यांत सामर्थ्य बिलकूल नाहीं. यास्तव यांचा पतकर आकाशांतील प्रभूनें आमच्याकडे सोंपवून दिला आहे; तर यांचा यथायोग्य प्रतिपाळ करून यांस शहाणे केलें

कीं आम्ही चाललों; आमचें येथें काय आहे? हाच कोटिक्रम लढवून लॉर्ड डालहौसी साहेबांनीं पंजाब तोंडांत टाक, नागपूर गिळून टाक, सातारा, झांशी वगैरेंची चटणी-कोशिंबीर कर, अयोध्येच्या नवाबास गादी-वरून खालीं ओढ, हा आठ वर्षें सारखा सपाटा चालवला आणि आपलीं घोर कर्में विचाऱ्या क्यानिंग साहेबास पुढें निस्तारायाला लावलीं ![1]

१. लॉर्ड डालहौसी साहेबांनीं आमच्या कल्याणार्थ आम्हांस नागवण्याचा जेव्हां एकसारखा तडाखा चालवला, तेव्हां हिंदुस्थानाचे हितचिंतक म्हणविणारे आणि स्वातंत्र्याचे व सदाचरणाचे अभिमानी मेकॉलेसाहेब यांनीं येणेंप्रमाणें आपला अत्यंत संतोष प्रदर्शित केला:--

"I am happy, to say, that, since this passage was written, the territories both of the Rajah of Nagpore and of the king af Oude have been added to the British dominions (1857). "

History of England (note)

लखनौ व नागपूर येथील दौलत आपल्या देशबंधूंस यथेच्छ लुटायाला सांपडली हें ऐकून आमच्या साहेबांस जे आनंदाश्रु आले ते लवकरच दुःखाश्रु झाले:—

" Horrible news from India: massacres of Europeans at Delhi, and mutiny. I have no apprehensions for our Indian Empire; but this is a frightful event. Home; but had no heart for work. I cannot settle to work while the Delhi affair is undecided. "

Life and Letters of Lord Macaulay.

वरील दोन उताऱ्यांवरून आमचे साहेब निःपक्षपात इतिहासकार होण्यास किती नालायक होते हें कोणासही सहज कळून येणारें आहे. इंग्रेजांच्या घरांत पैसा जात असला म्हणजे मग तो दरवडे घालून कां जाईना, त्याबद्दल साहेबांस आनंदच. पण त्या दरवडयापासून पुढें जर कांहीं बरीवाईट गोष्ट घडून आली, तर मात्र त्यांनीं तेवढें हिरमुसलेलें तोंड

(पुढें चालू)

तेव्हां आम्हीं आपला स्वतःचा कारभार करण्यास अगदीं नालायक आहों, व स्वातंत्र्य हें आम्हांस हितकारक न होतां उलटें अत्यंत अनिष्टप्रद होणारें आहे, हा एक मोठा मुद्दा आमच्या पाश्चात्य बंधुजनांनीं काढला आहे. व त्याचा अनुवाद आमचे अर्वाच्य पंडित आपल्या नेहेमींच्या पद्धतीस अनुसरून आजपर्यंत करीत आले आहेत व अद्यापही करीत आहेत. [1] आतां वस्तुतः पाहतां त्यांत किती अर्थ आहे याविषयीं जो पूर्वापार इतिहासाकडे नजर देऊन विचार करील त्याच्या ध्यानांतमुद्धां ही गोष्ट सहज येणार आहे कीं, या जगांत इंग्रेज लोक जर मुळींच नसते तर त्यांच्या वांचून म्हणजे आम्ही

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

करावयाचें ! वाः मेकॉले बोवा ! धन्य तुम्ही, तुमची नीति, तुमची स्वदेशप्रीति, आणि तुमचा ख्रिस्ती धर्म ! !

अरेरे ! गेल्या शतकांत हेस्टिंग्सच्या नांवानें दांत ओठ खाणारा विचारा बर्क, आणि या शतकांत डालहौसी, लिटन्, बीकन्स्फील्ड यांचे पोवाडे गाणारा विचारा राबर्ट नेट् हे किती खुळे लोक बरें! त्यांनीं वरील इतिहासकाराप्रमाणें आपला संतोष बेटचांनीं कोठेंच प्रदर्शित केला नाहीं ! या निमकहरामीपणाबद्दल आकाशांतील बापानें त्यांस परलोकीं काय भयंकर शासन नेमून ठेवलें असेल तें असो ! !

१. वरील विषयाचा खल नुकता झालेलाच आहे. यास्तव वरील प्रकरणीं आणखी न लिहितां आलीकडे सांपडलेलें एक ताजें सर्टिफिकिट येथें दाखल करतों म्हणजे झालें—

" India has produced in modern times as great administrators as ever existed in England : Porneah, of Mysoor and Nana Farnavese, the mahratta minister, might claim to be on a level with the most celebrated of our English statesmen as will be plain to any one who reads their history from the pens of the Duke of wellington, Elphinstone, and others, who, statesmen themselves, were able to discern the qualities which make a statesman. "

The way to regain India.

रसातळास जाऊन पोंचलों असतों असें कांहीं नाहीं; त्यांनीं आमच्याकरतां येवढी तसदी घेऊन खोटचा सहया करा, दिवसाढवळया दरवडे घाला असा क्रम आरंभून या देशाचें आधिपत्य जे स्वीकारलें तें जर ते न करते, व आपल्या श्वेतद्वीपाच्या आंतल्या आंतच जर ते राहते, तर आम्ही आज कोणत्या स्थितींत असतों हें सांगायला नकोच. हें खरें आहे कीं, आज जेथें आगगाडया आहेत तेथें आमच्या जुन्या बैलगाडयाच राहत्या, व तारायंत्राच्या जागीं सांडणीस्वार किंवा जासूद हीच पुरातनची पद्धति अद्याप कायम राहती. त्याप्रमाणेंच सात समुद्र जाऊन अटलांटिक, पासिफिक, भूमध्यसमुद्र हेहि त्यांच्या जागीं येऊन न बसते; पण हल्लीं जो जिकडे तिकडे सुधारणेचा कळस दृष्टीस पडत आहे, कीं साहेबी बूट खाऊनही लोक चाकरी करायाला तयार असतां कोणास पोटभर अन्न नाहीं, जिकडे तिकडे रोगराई, अशक्तता, दैन्य इत्यादिकांचा प्रचार, जेथे शेंकडों हजारों वीर हां हां म्हणतां गोळा व्हावयाचे तेथें आतां कोणास स्वप्नींही तरवारीचें किंवा बंदुकीचें दर्शन नाहीं, ही दुबळेपणाची व शोचनीय स्थिति तरी आम्हांस नसती ! इंग्रेजांनीं आपले घोडे बेताबेतानें पुढें सरकावण्यास सुरुवात केली त्या वेळीं आम्ही मुसलमानांस जिकडे तिकडे जेर करून आपल्या बाहुबळानें व बुध्दिबळानें वश करून टाकिलें होतें; चुलत्यानें गिलच्यास अटकेची पैलथडी दाखविली तों पुतण्यानें दक्षिणेंत नवाब साहेबांची व सुलतान साहेबांची खोड मोडावी येथपर्यंत आमची मजल येऊन ठेपली होती. मग वेलेस्ली साहेबांनीं परोपकारबुद्धीनें मध्यें पडून शिंद्याचा मोड कर, होळकरांच्या पाठीस लाग, पेशव्यास आणून गादीवर बसव, वगैरे जे ढवळाढवळीचे प्रकार केले व सरतेशेवटीं साऱ्यांस गुंडाळून टाकून आम्ही ' केसर-इ-हिंदू ' हिंदुपद बादशाहा हा जो ध्वजारोप केला त्याची काय जरूर होती बरें ? ज्यास केवळ लोककल्याणार्थ उद्योग करावयाचा आहे त्यास येवढा खटाटोप करण्याची जरूर आहे काय? आम्हांला तर मुळींच दिसत नाहीं. शिवाजी महाराजांनीं आपलें सारें राज्य गुरुपदीं वाहिलें, तेव्हां गुरुमहाराजांच्या जिभेला पाणी सुटून त्यांनीं जर पुढील पेशवाईंतला प्रकार त्याच वेळेस युक्तीयुक्तीनें अमलांत आणला असता:— म्हणजे आपली भिक्षेची कुबडी हळूच एकीकडे ठेवून समशेर हातांत

घेतली असती, आणि साऱ्या फौजेवर हुकमत ठेवून 'शापादपि शरादपि' [1] असें सव्यसाचित्व पतकरलें असतें आणि आपल्या शिष्यास रायगडावर किंवा सातारच्या किल्ल्यावर टाकून राज्यसुखाचे सोहळे भोगण्यास आरंभ केला असता. आणि सिंहासनावर बसून निरंतर जप काय ?—

मना वासना दुष्ट कामा नये रे, मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।
मना सर्वथा नीति सोडूं नको हो, मना अंतरीं सारवीचार राहो ॥

असें जर झालें असतें, तर आजपर्यंत समर्थ महाराजांचा केवढा नांव-लौकिक मागें राहता बरें ! ! तर आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंस जर खरो-खरच आमची येवढी कींव आली होती, कीं आम्ही आपापसांत मारामारी करून विनाकारण आपलें नुकसान करून घेत आहोंत, किंवा काबूल-कंद-हारांतल्या दुष्ट लोकांच्या झुंडीच्या झुंडी इकडे येऊन ते या समृद्ध देशाचा धुडगूस उडवतात, हेंही जर त्यांच्यानें पाहवत नव्हतें, तर वरील राज-गुरूंनीं आपल्या 'शिवबा' स ऐहिक व पारलौकिक असा दोहों प्रकारचा उपदेश करण्याचा अधिकार घेतला होता तसा त्यांनीं घ्यावयाचा होता; अगर वॉशिंग्टन् यानें आपल्या देशबांधवांस इंग्लिशांच्या त्रासा-पासून सोडवून स्वतंत्र केलें, आणि तें महाकार्य आटपल्यावर पुनः शिंगें मोडून तो जसा वासरांत शिरला आणि एका सुतळीच्या तोडयालाही न शिवतां अगदीं अलिप्तपणें राहून त्यानें शेवटपर्यंत कालक्रमणा केली,-तसा तरी प्रकार घडावयाचा होता. पण प्रकृत प्रसंगीं पाहतां वरच्यापैकीं एकही प्रकार घडला नाहीं. येथला प्रकार निराळाच. 'इसापनीतींतल्या' स्वारानें जसें घोडयास सांगितलें, "बा रे तूं म्हणतोस खरें, पण आतां नाहीं माझ्यानें तुला सोडवत; तूं इतका उपयोगी आहेस हें मला पूर्वी माहीत नव्हतें; तर तुझ्या पाठीवरचें खोगीर कधीं निघेल ही आशा सोडून दे." मग हा प्रकार सारा धडधडीत डोळयांपुढें दिसत असतां आम्ही हिंदुस्थानच्या कल्याणाकरतां येथें आलों आणि कल्याण झालें म्हणजे आम्ही येथून जाणार, हा 'मतलबीसिधु' ज्या बिचाऱ्या भोळचा भाविकांस आजपर्यंत खरा वाटला व अद्यापही वाटत आहे त्यांची धन्य म्हटली पाहिजे; दुसरें काय ?

---

१. वरील शब्द प्रसिद्ध भारती ब्राम्हणवीर द्रोणाचार्य यांच्या संबंधाचे आहेत. यांचीं आयुधें दोन:--शाप आणि शर !

४. तेव्हां आमच्या देशावर इंग्रेजांचें जें राज्य झालें आहे त्याविषयीं आमचें मत तर असें आहे कीं, आमचें कल्याण होण्यास त्यावांचून म्हणजे दुसरा मार्गच नव्हता असें कांहीं नाहीं. आम्ही आज तीन चार हजार वर्षें जे या देशांत नांदलों, येवढालीं राज्यें चालविलीं, कायदेकानू केले, शास्त्रें निर्माण केलीं, कला उदयास आणल्या, ऐहिक व अध्यात्म विचार केले, ते सर्व या आंग्लभौम मंडळीच्याच जिवावर काय ? आमच्या पोरस्[1] राजानें जगद्विजयी शिकंदराशीं पंजाबांत टक्कर दिली, तेव्हां क्लैव् व वेलेस्ली साहेब कोणीकडे होते वरें ? आमच्या जगद्गुरूंनीं बौद्धांस वादांत जर्जर करून त्यांस चिनांत लंकेंत पळवून लाविलें, त्या वेळेस रेवरेंड मंडळी कोणीकडे लपून वसली होती ? महेश्वरानें डमरूनाद करून येवढी अवाढव्य गीर्वाणवाणी, पण तिलाही गुंडाळून टाकण्यासारखीं चवदा सूत्रें प्रगट करून पाणिनीस अर्पण केलीं, तेव्हां मेकॉले साहेबांच्या प्रपितामहाचे प्रपितामह कोणत्या स्थितींत असतील बरें ? या तर प्राचीन काळच्या गोष्टी झाल्या. ह्या वेळेस आमच्या राज्यकर्त्यांचे पूर्वज जनावरांचीं कातडी पांघरून व अगाला रंग लावून आमच्या अर्वाचीन नाटकांतल्या विदूषकाप्रमाणें नुकते कोठें या जगाच्या रंगभूमीवर नाचूं बागडूं लागले होते हें सर्व प्रसिद्धच आहे. तेव्हां त्या वेळची गोष्ट राहूं

१. आलीकडे वृथाभिमानी व अल्पज्ञ इंग्रेज ग्रंथकारांनीं आमच्या देशाच्या संबंधानें ज्या कल्पना चोहोंकडे पसरून दिल्या आहेत, व ज्या आमच्या स्वत:च्या मूर्खत्वास्तव व शोधाभावास्तव आम्हीही खऱ्या धरून चालत आलों आहों, त्यांस प्राचीन व अर्वाचीन इतिहासावरून एकंदरींत पाहतां फारच थोडा आधार मिळतो. शिकंदराचें सैन्य येवढा दिग्विजय करून पंजाबावर चालून आलें असतां तेथें त्यास कित्येक निकराच्या लढाया कराव्या लागल्या. विशेषत: पोरस् राजाची हकीकत तर ग्रीसच्या इतिहासांत फारच मौजेची आढळते, ती बरीच लांब असल्यामुळें येथें देववत नाहीं. ही प्राच्य व पाश्चात्य आर्यांची लढाई शतद्रु नदीच्या कांठीं झाली. 'शतद्रु' चा अपभ्रंश 'सतरंजी' असा आलींकडे झाला आहे. हीस ग्रीक लोक 'हैडास्पीज' म्हणत व इंग्रेज लोक 'सतलज' म्हणतात.

द्या. पण अगदीं आलीकडच्या काळाविषयीं जरी विचार केला, तरी काय आढळेल बरें ? बापानें टाकून दिलेल्या पंधरा सोळा वर्षांच्या पोरानें मावळांतल्या दऱ्याखोऱ्यांतून हिंडून वनचरांस आपले सवंगडे केले, आणि यवनाक्रांत झालेल्या भूमीचा भार हरण करण्याचा प्रचंड संकल्प योजून तानाजी मालुसरे, बाजी फसलकर, येसाजी कंक, असल्या घोंगड्या वीरांस अफझुल्खां, झुल्फिकारखां, रुस्तुमखां असल्या बादशाही मडळीशीं झुंजायाला लावून त्यांची खाखा मोडली, आणि हिंदूंची चिरनष्ट राजसत्ता पुनः उदयास आणून मराठेशाहीची टोलेजंग इमारत उभारून दिली--हा सर्व विभु रचतांना शिवाजी महाराजांनीं इंग्रेजी शिपाईगिरी किंवा इंग्रेजी मुत्सद्देगिरी चार हजार कोसांवरून उसनी मागून आणली होती काय ? त्याप्रमाणेंच कारकुनी पेशानें वागणाऱ्या बाळाजीपंतानें शाहूच्या राजमंडळांत शिरतांच दिल्ली अटकेपर्यंत नजर पोंचवून अवघ्या बादशाहीस आपल्या जाळ्यांत गुदरविलें, आणि येवढी शिकार आपल्या देशबांधवांच्या आटोक्यांत आणून दिली, हें करतांना तरी वरील पेशव्यानें आपली बुद्धि एखाद्या आंग्लभौम विद्यालयांत पाजळून घेतली होती काय ? पण इतकेंही दूर जावयाला नको. नुकत्या वीसपंचवीस वर्षांमागच्या गोष्टीकडेच अंमळ लक्ष पुरवलें असतां आम्ही कुचकामाचे आहों, आम्ही राजकारण व युद्धकला या दोहोंविषयीं अगदीं अडाणी आहों, आम्हांस इंग्रेज लोक शिकवितील तेव्हांच आम्ही शहाणे होणार, वगैरे मूर्ख कल्पनांचा तेव्हांच ऱ्हास होणारा आहे. सत्तावन सालच्या भयंकर बंडाविषयीं जो शांतपणें विचार करील (असा विचार करण्याची वेळ आतां आली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.) त्यास त्यावरून एकंदर राष्ट्राविषयीं कोणकोणत्या कल्पना होण्यासारख्या आहेत बरें ? आम्हांस कुवत नाहीं, धैर्य नाहीं, ज्ञान नाहीं, या कल्पना वरील सालच्या इतिहासावरून होतील काय ? आतां या बंडांत आमच्या लोकांच्या हातून पुष्कळ अत्यंत क्रूरपणाचीं कृत्यें घडलीं, व इंग्रेजी कवायतीपुढें त्यांचें कांहीं न चालून येवढा बंडावा झाला असतांही तो लवकर मोडण्यांत आला, शिवाय अनेक इंग्लिश सरदारांचें अतुल धैर्य वरील प्रसंगीं प्रगट झालें, हें सर्व खरें;

पण ब्रह्मावर्तचा एक य:कश्चित् शागिर्द काय, आणि तो 'लंडन टैम्स बातमीदार रसेल साहेब यांच्या हातचें सर्टिफिकिट काय मिळवितो,[1] त्याप्रमाणेंच झांशी संस्थान तें काय, आणि त्याची माजी मालकीण एक रांडावलेली बाई काय, आणि तिनें सर ह्यू रोज याच्यावरोबर सामना काय दिला ![2]--तेव्हां सगळाच चमत्कार नव्हे काय ? तो ध्यानांत आणून ज्यास आमच्या वास्तविक स्वरूपाची प्रतीति घडणार नाहीं त्या महापुरुषाचें डोकें विचित्रच असलें पाहिजे ! !

तेव्हां आमच्या लिहिण्यांतील एकंदर आशय हा आहे कीं, आमचे राज्यकर्ते आमच्या संबंधानें जो मोठचा डौलाचा आव नेहेमीं घालीत असतात, कीं तुम्हीं नेणतीं लेकरें आहां व आम्ही आतां यापुढें तुम्हांला काय सज्ञान करूं ते करूं; बाकी आम्ही येथें येण्याच्या पूर्वीची तुमची

१. अं. १२--टीप.

२. वरील स्त्रीरत्न जर युरोपच्या एकाद्या देशांत निपजलें असतें तर त्याचें किती चीज झालें असतें हें सांगतां पुरवत नाहीं. तिजवर किती नाटकें व किती कादंबऱ्या झाल्या असत्या, व किती इतिहासकारांनीं व चरित्रकारांनीं तिचा वृत्तांत मिळवून जगास जाहीर केला असता ! एका इंग्रेजी इतिहासकारानें तीस फ्रान्स देशांतील प्रसिद्ध सेनानायिका जोन ऑफ आर्क हिची उपमा दिली आहे. हें पुस्तक परवांच्या आगींत जळाल्यामुळें त्यांतील उतारा देववत नाहीं. ग्रंथकाराचें व पुस्तकाचें नांव आम्हांस आठवतें, तेवढें मात्र येथें दाखल करतों:- British India from 1757 to 1857 a book of confessions-by Torrens, M P.

माजी 'दंभहारका' च्या एका अंकांत प्रस्तुत विषयावर एक उतारा आला होता. तो येथें दाखल करण्यासारखा आहे:—

Among the native rulers who have heroically resisted foreign invaders, none have shown stronger qualities than Lakshmi Baee, the Rani, or Queen of Jhansi, whose wonderful generalship held the British army in check, and who headed her troops in person, dressed as a cavalry officer, and was killed on the field. Sir Hugh Rose declared that the best man on the enemy's side was the Rani of Jhansi !

स्थिति म्हणजे केवळ अज्ञान.ची व रानटीपणाची होती,-हा सर्व निवळ भ्रम आहे. ज्या त्या राष्ट्राला आपापली घमंडी वाटतच असते, आणि त्यांतून एका राष्ट्रानें दुसऱ्यास जिंकलें म्हणजे तर तें विजयी राष्ट्र काय म्हणेल ती पूर्वदिशा असा प्रकार होत असतो. तेव्हां याच कारणावरून वरील मत आजपर्यंत माजलें आहे. वस्तुतः पाहतां इंग्रेजांनीं म्हणजे आमचा पतकर घ्यावयाला पाहिजे होता असें कांहीं नाहीं. ते जर इकडे आले नसते तर त्यामुळें आमचें कांहीं अहित न होतां उलटें हितच होण्याचा अतिशय संभव होता. स्पेनच्या लोकांनीं क्रमाक्रमानें जसें मुसलमानांस आपल्या देशांतून पार आफ्रिकेंत घालवून दिलें, आणि अर्धचंद्राच्या जागीं मात्क्यान् आपला क्रूस आणून त्यांनीं चोहोंकडे स्थापित केला, त्याप्रमाणेंच चालू शतकांत सारें भरतखंड निर्यवन होऊन पुनः आर्यराष्ट्राचें सार्वभौमत्व होण्याचा योग आला होता. पण आमच्या पाश्चात्य आर्यबंधूनीं छिद्रान्वेषण आरंभून भाऊबंदकी साधल्यामुळें त्याजवर विरजण पडलें !

असो; तर आम्ही स्वातंत्र्याच्या स्थितीला योग्य नाहीं, व तसें असल्यामुळें आमचें प्रस्तुतचें पारतंत्र्य अत्यंत हितावह होय, हीं दोन्ही मतें निवळ खोटीं आहेत असें आम्हांस वाटतें व हीं आलीकडे आमच्या हृदयाशीं खिळून गेलीं आहेत हेंच प्रस्तुत काळीं आमची स्थिति सुधारण्यास मोठें प्रतिबंधक आहे यांत संशय नाहीं. आधीं तीरावरच ज्यानें हातपाय गाळले तो काय पोहणार ? रडतराव घोडचावर कितीसे खंबीर स्वार होणार हें कोणीही सांगेल !

५. पण हा सारा वाद प्रस्तुत विषयाच्या संबंधानें पाहतां गौण आहे. त्याचा खरोखरी पाहतां मागील व पुढील काळाशीं जितका संबंध आहे तितका वर्तमान काळाशीं नाहीं. यास्तव सध्यांच्या स्थितीविषयींचें विवेचन आरंभलें आहे तेंच पुढें चालवूं.

वर इंग्रेजी राज्यापासून आमचें कोणकोणतें अहित झालें आहे तें सामान्यतः सांगण्यांत आलेंच आहे. एक पारतंत्र्य म्हटलें म्हणजे तें दरएक ठिकाणीं नडत असतें. या गोष्टीचा प्रत्यय सध्यां या देशांतील लोकांस पदोपदीं आहे. पहा कीं, आम्ही व्यापारांत लक्ष घालूं म्हटलें तर आमचें

कांहीं चालणार आहे काय ? इकडे मोठे भगीरथ प्रयत्न करून जरी देशी माल उत्पन्न केला, तरी कायदे कौंसलांतून एकादा वटहुकूम सुटला कीं पुरे, आमचे सारे कारखाने चीत ! म्यांचेस्टरवाले सरकारचे देशबंधु पडल्यामुळें त्यांनीं तिकडे हाकाटो करून थोडीशी उचल केली, कीं इकडे आमचे हातपाय मोडले ! इकडे उरस्फोड करून तपांचीं तपें विद्याध्ययनांत घालवीं आणि शेवटीं नोकरी मागितली म्हणजे आमचे चान्सेलर साहेब आम्हांस प्रेमपूर्वक उपदेश करणार कीं, "लाडक्यांनो, तुम्हांस आम्हीं येवढ्या औदार्यानें विद्यादान जें केलें, तें सरकारपुढें हात पसरण्याकरतां कां रे ! अरे तुम्हीं आपला देश सुधारावा, लोकांस सज्ञान करावें, त्यांचे हक्क त्यांस समजावून द्यावे. आपल्या राज्यकर्त्यांचें निरंतर स्तुतिस्तोत्र करून आकाशांतील बापाच्या पायांपाशीं त्यांच्या कल्याणार्थ डोळे मिटून प्रार्थना करावी विलायतेस जावें, अमेरिका पालथी घालावी, जॉन्सन्-सारखे ग्रंथ लिहावे, बर्कसारखें वक्तृत्व करावें, लूथरप्रमाणें धर्मसुधारणा करावी, मंगो पार्कप्रमाणें देशाटनें करावीं,– हें सर्व करायचें सोडून देऊन खुळ्चासारखे चाकरीच्या रे काय नादीं लागतां ? उदरपोषण हें काय रे विद्योपासनेचें पर्यवसान ? सरकारनें तुम्हांस विद्या दिली ती दिली, आणि तुम्हांस नोकऱ्या देण्याचाही पतकर त्यांनींच घेतला पाहिजे काय ? छे, छे, एकून तुम्ही या युनिवर्सिटीजननीस व्यर्थ शिणविल्याचें श्रेय घेऊं पाहत आहां दुसरे कांहीं नाहीं ! ! " याप्रमाणें आमच्या झगेवाल्या मंडळीच्या कानीं विद्यादेवीच्या निष्काम उपासनेचा तत्त्वोपदेश दरवर्षीं पडतो खरा; पण इकडे व्यवहारांत जों पाहावें तों त्याची प्रतीति फारशी येत नाहीं. जे आमचे प्रभु येथील विद्वानांस वरील ब्रम्हज्ञान शिकवतात तेच दरवर्षास वीस लाखांचा फन्ना उडवून 'कूपर्स हिल्ल' वासी मंडळीस इकडे पाचारण करतात, व आपल्या सनदी नोकरांस आगबोटीवर पाय ठेवल्यापासून तीनशें रुपयांचा तनखा चालू करतात. याखेरीज आमच्या दक्षिण विद्यालयांतील प्रसिद्ध विद्यारण्यांसारखे व मागें आलेल्या एका छिन्नांगुष्ट विद्यागुरूंसारखे एकेक जाडे विद्वान् विद्याखात्यावर गुदरून दिले जातात ते निराळेच ! एतावता तात्पर्य काय, कीं सर्वांपरी नागवलेले आम्ही त्या आमच्या वांटयाला वरील कोरडें ब्रह्मज्ञान; आणि ज्यांस उदरनिर्वाहाच्या

शेंकडों इतर सोई आहेत ते जसे काय सरकारचे जांवई; नाहीं तेथून त्यांची भर झाली पाहिजे !

पण पारतंत्र्यापासून होणारी सर्वांतली मोठी हानि अद्याप सांगायाचीच राहिली आहे. ती ही कीं, त्यापासून मानसिक उन्नति अगदीं नष्ट होऊन जाते. ज्याच्या परवशता ही कालेंकरून आंगवळणीं पडते तो हळू हळू मानधनता, लज्जा, धैर्य वगैरे सर्व सद्गुणांना पारखा होत जाऊन वरच्याच्या उलट जे दुर्गुण ते त्यास सहजीं जडूं लागतात, व उत्तरोत्तर मूळ स्थितीपासून तो भ्रष्ट होत जातो. ही परमावधि हल्लीं आमच्या देशांत बहुधा सर्वत्र दृष्टीस पडूं लागली आहे. जन्मास येऊन करावें काय, तर परदास्य करावें, यजमानाची खुषामत करावी, लांड्याचालबाड्या कराव्या, लोकांच्या मुंड्या मुरगाळाव्या, वरिष्ठांची थुंकी झेलून हाताखालच्यांस गांजावें; व शेवटीं पैशाचीं गांठोडीं उराशीं घट्ट आवळून धरून एकादे दिवशीं मरून जावें,--हें एकंदर तत्त्वज्ञान आलीकडे माजलें आहे. 'इसापनीतीं' तील कुतरा लांडग्यास जसा आपला सुखसोहळा निवेदन करीत आहे तशी सांप्रत बहुतेक मंडळीची स्थिति आहे. पूर्वीच्या लोकांत अकिंचन स्थितींत राहणारे, नि.स्पृह स्पष्टवक्ते अशा प्रकारचे पुरुष जसे पुष्कळ आढळत असत, तसा प्रकार आतां अगदीं विरळा. आतां हुशार व शहाणा मनुष्य कोण, तर जो साहेवांचे बूट उचलील, वरिष्ठानें कितीही पुष्पवृष्टि केली तरी ती जो प्रेमानें झेलील, आंगमस्तीपर्यंत वेळेनुसार येऊन ठेपली तरी ख्रिस्त प्रभूच्या उपदेशाप्रमाणें जो दुसरा गाल खुशाल पुढें करील, आपल्या यत्किंचित् स्वार्थाकरतां किंवा नुसती बहादुरी मिळवण्याकरतां जो देशाशीं मात्रागमनीपणा करतांना बिलकूल शरम बाळगणार नाहीं, तो. आमच्या देशांत आलीकडे विद्येचा फैलावा थोडा झाला आहे असें नाहीं; पण या विद्येच्या योगानें जें वास्तविक ज्ञान निष्पन्न व्हावें, व जी मनाची थोरवी वाढावी, त्यांतलें अजून कांहींच दृष्टीस पडूं लागलें नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांतून इंग्रेजी विद्या ही तर वस्तुतः पाहतां वाघिणीसारखी आहे; तिच्या दुधावर जो पोसला तो लेंचापेंचा कधींच निपजूं नये.[1] उत्साह, धैर्य, अश्लाघ्य

१. इंग्रेजी भाषा शिकल्यापासून केवढा फायदा आहे, व या भाषेच्या

(पुढें चालू)

कर्माचा तिरस्कार, स्वावलंबन इत्यादि उदात्त गुण वरील भाषेंतील ग्रंथांच्या अध्ययनापासून उत्पन्न होणारे आहेत; पण आजपर्यंतच्या तऱ्हेवाईक शिक्षणपद्धतीनें म्हणा, अगर तितका संस्कार आमचे ठायीं अद्याप बिंबला नसल्यामुळें म्हणा, वरील गुणाचा उदय अद्याप तर कांहींच झालेला दृष्टीस पडत नाहीं. जिकडे पहावें तिकडे 'हां जी,' 'जी हां.' 'खुदावंत,' 'खावंद' हाच श्ववृत्तीचा प्रकार नजरेस येतो. यःकश्चित् मराठी कारकुनापासून तों म्युनिसिपल कमिशनर, कौन्सिलर, दिवाणसाहेब, यांच्यापर्यंत एक मासला;--खावंदचरणारविंदीं मिलिंदायमान होणारी सारी मिंधी मंडळी ! बाकी सभेंत उभें राहून नुसतें मुखपांडित्य करायाला सांगा, त्यांत ज्याची त्याची तयारी; यंव करावें त्यंव करावें;-चुटक्यांच्या मांडवाला किती उशीर ! पण अंग मोडून मेहेनत करण्याची पाळी येऊं द्या; किंवा पदरचा एकादा पैसा खर्च करण्याची मात्र वेळ यावी, म्हणजे 'इसापनीतीं' तील सांबराची अवस्था ! कुत्र्यांचा शब्द कानीं पडतांच वरील सांबराची जशी गाळण व्हावयाची, त्याप्रमाणेंच वरील अवसानघातकी वीरांचा आव एकंदर एका संस्कृत कवीनें वेदांताच्या संबंधानें जें विनोदानें म्हटलें आहे तेंच आमच्या फांकड्या मंडळीस लागू पडतें:-

वागुच्चारोत्सवं मात्रं तत्क्रियां कर्तुमक्षमाः ।
कलौ वेदांतिनो भांति फाल्गुने बालका इव ।।

राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेनां
तेनाद्य वत्समिव लोकममुं पुषाण ।
यस्मिंश्च सम्यगनिशं परितुष्यमाणे
नानाफलैः फलति कल्पलतेव भूमिः ।। 'नीतिशतक'

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

अध्ययनानें फ्रेंच लोकांची स्थिति एकदम किती सुधारली, हें ज्यास माहीत करून घेणें असेल त्यानें बकलचा इतिहास, भाग २, खंड ५ हें वाचावें.

१ "प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा नृपा तूं करीं फार सांभाळ याचा ।
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें अभीष्टार्थ देईल हे भूमि वेगें ।।" वामन.

अंक ७९--(१) विषयोपक्षेप (२) आमचें सरकार कोण, याची मीमांसा (३) इंग्रेज सरकारचें आमच्यासंबंधानें कर्तव्य (४) ख्रिस्तीधर्माच्या दृष्टीनें (५) नीतिदृष्टया (६) केवळ व्यवहारपरत्वें.

१. मागील दोन अंकांत इंग्रेजी राज्यापासून आमच्या देशास फायदे कोणते झाले व तोटे कोणते झाले याविषयीं निरूपण केलें. आतां या अंकांत आमच्या राज्यकर्त्यांचीं या देशाच्या संबंधानें कर्तव्यें कोणकोणतीं आहेत याविषयीं विचार करूं.

२. हा विचार करतांना अगोदर आमचें सरकार म्हणजे कोण यांविषयीं विवेचन करणें अवश्य होय. सध्यांचें हिंदुस्थानचें राज्य ही तऱ्हा अगदींच विलक्षण आहे. यास्तव तिच्या संबंधानें प्रथमतः वाचकांचा समज बरोबर केल्याखेरीज पुढें जाऊन उपयोग नाहीं. आजपर्यंत या देशाचें आधिपत्य एतद्देशीय किंवा परदेशीय लोकांकडें जें होतें त्याचा प्रकार असा असे कीं, एक तर राजा व राजमंडळ हें या देशांतल्या देशांतच असे. मुसलमानांनीं दूरदूरच्या मुलखांतून येऊन जरी हा देश काबीज केला व येथें अनेक राज्यें स्थापन केलीं तरी त्यांनीं येथल्या येथेंच तळ दिला होता. त्यामुळें हिंदुप्रजेपैकीं जर कोणास विचारलें असतें, कीं तुमचा राजा कोण ? तर अकबर बादशाहा, किंवा आदिलशाहा, असें त्या वेळेस सांगतां आलें असतें. पण इंग्रेजी राज्यांत तसा प्रकार मुळींच नाहीं. सन १८५८ सालापूर्वीं जी व्यवस्था होती ती तर राहूं द्याच; पण हल्लीं केसरहिंदशाही अंमल सुरू झाला असतांही जर येथील एकाद्या कुणब्यास किंवा जुन्या गृहस्थास विचारलें, कीं तुमचा राजा कोण, तर त्यानें काय सांगावें ? गवर्नर साहेबांची गाडी कधींमधीं कोणाच्या येथें जाफतीला जातांना पाहिली असली,तर हे आमचे प्रभु असे त्यास क्षणभर वाटणार जाहे. पण गवर्नर साहेब हें आमचें हिताहित करण्यास सर्वस्वीं मुकत्यार आहेत काय? छे, त्यांच्या डोक्यावर हिंदुस्थानचे वैसराय (प्रतिनिधि) लाटसाहेब आहेतच. बरें, लाटसाहेब हे तरी आमचे कुल-

मुकत्यार आहेत काय ? त्यांनीं १८७७ सालच्या आरंभीं दिल्लीच्या वादशाही दरबारांत अध्यक्षस्थान पतकरलें होतें; व शिंदे, होळकर, निजाम, गायकवाड, अशा वडया वडया सस्यानिकांचे त्यांनीं सलाम घेतले; तेव्हां सकृद्दर्शनीं कोणास असा भ्रम होणें साहजिक आहे, कीं अश्वमेध केल्यावर युधिष्ठिर जसा भरतखंडाचा अधिपति झाला, किंवा साऱ्या प्रतिस्पर्ध्यांस निवटून टाकून अवरंगजेवाची स्वारी जशी दिल्लीच्या तक्तावर आरूढ होऊन हिंदुपद वादशाहा बनली, त्याप्रमाणेंच नेक नामदार लॉर्ड लिटन-साहेब हे मुक्तेश्वराच्या ओवीप्रमाणेंच—

प्राची प्रतीची दक्षिणोत्तरा । चारी दिशा चतु:समुद्रां ।
आक्रमूनि महीमहीधरां । सुरेंद्र जैसा भूलोकी ॥

या सोहळ्याचे भोक्ते झाले. पण ही भ्रांति दवडण्यास मध्यभागाच्या सिंहासनावर मांडलेल्या तजबिरीकडे अंमळ नजर फेकणें एवढें बस झालें असतें. ही तजबीर कोणाची होती हें सांगायला नकोच; मलिका माअझमा महाराणीसाहेब, हल्लीं केसरी हिंदु, यांची ती प्रतिमा होती. तेव्हां या साऱ्या देशाचें प्रभुत्व हें लाटसाहेबांकडून इंग्लिशस्तानच्या तक्ताच्या मालकिणीकडे गेलें. बरें, आतां हें तरी प्रभुत्वाचें परम पद ठरणार काय? छे, छे. हेंही राजसत्तेचें अत्युच्च शिखर नव्हेच ! तेथपर्यंत पोंचण्यास आणखी मार्गक्रमण करणें जरूर आहे. मलिका माअझमा वाईसाहेवांनीं केसर्-इ-हिंद् ही किताबत जी घेतली, ती शिवाजीनें आपणास राजपद घेतलें, किंवा हैदर नाइकाचे चिरंजीव आपणास सुलतान म्हणवूं लागले, अथवा नेपोलियन यानें ख्रिस्ती धर्माचें जगद्गुरु पोपसाहेब यांच्या आशी-र्वादाक्षता घेऊन सार्वभौमत्वाचा स्वीकार केला, अशांपैकीं तऱ्हा मुळींच नव्हती. तर मुख्य प्रधान माजी बीकन्स्फील्ड साहेब यांनीं आपल्या बहादुरीवर वरील समारंभ करवून एतद्देशीय राजेरजवाडे जीं पूर्वीं दोस्त सरकारें होतीं त्यांस मांडलिक करून महाराणीसाहेबांस चक्रवर्तिनी पदावर चढविलें. तेव्हां 'ते मंत्रः ब्राह्मणाधीना ब्राह्मणो मम दैवतं' या न्यायानें पाहतां महाराणी व्हिक्टोरिया यांच्यापेक्षां वरील यहुदी लॉर्ड साहेब यांची

पायरी वरची झाली. वरें तर, लॉर्ड बीकन्स्फील्ड हे आमचे धनी होते असें म्हणूं ! असें म्हणायाचें असेल, तर इंग्लंडांत नूकतेंच जें प्रभ्वंतर झालें, व जी माभळभाटी झाली, तिजकडे अगोदर लक्ष पुरवायाला पाहिजे. बीकन्स्फील्ड साहेब व त्यांचें पंचायतन [१] यांचें एकाएकी वारा वाजून जो 'मंगळमर्ति मोरया' चा प्रकार झाला, व या उत्तरपूजेच्या समयीं कांहीं देवतांस मुष्टिमोदक नैवेद्यही समर्पण झाला, ती सारी धुमश्चक्री क्षणभर मनांत आणली पाहिजे. ती आणली असतां कोणासही सहज कळून येणारें आहे कीं, जे यहुही उमराव आज सारें राज्यसूत्र हातांत वागवताहेत, आणि उद्यां पाहावें तो फूस कांहीं नाहीं, ते कसचे आमचे प्रभु ! आतां बेकी आणि अंमळशानें फुक्की ही ज्या सत्तेची शाश्वती तीस सत्ता कोण म्हणेल ? तेव्हां लॉर्ड बीकन्स्फील्ड साहेब हेही उडाले ! मग शेवटीं आमचें सरकार ठरलें तरी कोणतें ? तर अवघ्या इंग्रेजी राष्ट्राचा अभिप्राय. या अभिप्रायानें बीकन्स्फील्ड यांस क्षणभर प्रभुत्व दिलें; त्यासरशीं चोहोंकडे लढाया सुरू झाल्या, दिल्लीचा सार्वभौमाभिषेक झाला, मुद्रणयंत्रावर मुद्रा बसली, उदीमपट्टी निघाली, इत्यादि प्रकार झाले. पूर्वे अफगाण लोकांनीं डोळे वटारून दोस्त इंग्लिश सरकारास आपल्या मुलखापार घालवून दिलें, आफ्रिकेच्या दक्षिण भागाच्या लोकांनीं आमच्या सरकारच्या फौजांचा चांगला समाचार घेतला, जवळचे ऐर्लंड गडबड करूं लागलें त्यासरशीं बीकन्स्फील्ड बोवांची सट्टी आटपली, आणि लगेच त्यांस बुक्का लागला ! ते खालीं बसतांच त्यांचे प्रतिपक्षी ग्लाडस्टन साहेब कंबर बांधून उठले, व त्यांनीं आपला डाव सुरू केला. सारांश. आमचें सरकार कोण याचा मुळींच पत्ता नाहीं म्हटलें असतां चालेल; अमक्या एका मनुष्याच्या किंवा मंडळीच्या खुषीवर आमचें बरेंवाईट करणें अवलंबून

१. वरील पंचायतन कोणतें हें आमच्या वाचकमंडळीस थोडेंबहुत तरी माहीत असेलच. तें लॉर्ड लिटन्, सर रिचर्ड टेंपल्, सर जॉन् स्ट्राची, व मुंबईचे माजी गवर्नर सर बार्टल् फ्रीयर, हें राजमंडळ होय. गेल्या दोन-तीन वर्षांचा जो इतिहास लिहील त्यास वरील मंडळीचे किती पोवाडे गावे लागतील !

आहे अशांतला मुळींच प्रकार नाहीं. तर आंग्लभौमराष्ट्ररूप महोदधीवर जी कालवशांत यदृच्छेनें लाट उठेल तिजसरसें आम्हीं हेलकावत जावें हीच आमची राज्यव्यवस्था, व वरील लहर हेंच आमचें सरकार!!

तर आमच्या देशाच्या राजसत्तेचें अशा प्रकारचें स्वरूप आहे. हें स्वरूप इकडील देशांत तर अगदींच अदृष्टपूर्व आहे हें सांगायाला नकोच. आतां कांहीं अशीं तें आम्हांस हितावह आहे व कांहीं अंशीं गैरफायद्याचें आहे हें थोडा विचार केला अपतां कोणासहि दिसून येणारें आहे. एकच मनुष्य राज्यपदावर नियुक्त असला म्हणजे तो ज्या तऱ्हेचा मनुष्य असेल त्याप्रमाणें प्रजेचें हित किंवा अहित होण्याचा संभव असतो. थोरल्या माधवरावासारखा किंवा अकबर बादशाहासारखा प्रभु असला म्हणजे सारी प्रजा आबादानी भोगते व सुख पावते; तीच शेवटल्या रावबाजी-सारखी किंवा महंमद तघलखासारखी स्वारी सिंहासनारूढ झाली म्हणजे झाली 'वेबंद नगरी व झोंटिगपाच्छाई' सुरू! हा प्रकार प्रस्तुतसारख्या राज्यांत घडण्याचा संभव बहुधा नाहींसा म्हटला असतां चालेल. कां कीं, वैसरॉय साहेब झाले तरी त्यांस कायद्याचें बंधन आहेंच. इकडे दूरदूरच्या प्रांतीं राहून चार दिवस घाशीरामी चालवण्याचा जर त्यांनीं घाट घातला तर लागलींच त्यांस तिकडून थप्पड येईल. व वॉरन् हेस्टिंग्सचीं आठ वर्षें धिंड निघाली तशी शोभा निजधामास गेल्यावर होईल ती निराळीच! बरें, हा इकडून फायदा पाहावा तर दुसरीकडून गैर फायदाही आहे प्रतिनिधिसाहेबांस एका बाजूनें जसा कायदा अडवतो, तशीच दुसऱ्या बाजूनेही त्यास आडकाठी आहेच! एडमंड बर्क किंवा परोपकारी जॉन हॉवर्ड जरी यदाकदाचित् गवर्नर जनरल झाला, तरी त्यास पदोपदीं वरीलच कायदा आडवा येईल. त्यानें असें मनांत आणलें कीं, मल्हारराववर उगीच आरोप येऊन तो विचारा गादीला मुकला, किंवा निजामचा वऱ्हाड प्रांत अडकवून ठेवला आहे ही निव्वळ बळजबरी आहे, किंवा फुलर साहेबांनीं शिपायाचा खून केला तर त्यास जॉर्ज नेल्सच्या सोबतीला पाठविलें पाहिजे, अशा गोष्टी जर तो नुसत्या मनांत आणील तर तें सुद्धां वरील कायद्यास कितपत खपेल हें सांगायाला नकोच! वरच्यासारखें 'ब्र' तोंडांतून काढल्याबरोबर तिकडून लाटसाहेबांस चांगले खरपूस समज

येतील, कीं आपणांस तुकारामबोवांचा किंवा ख्रिस्त महाराजांचा अवतार बनायाचें असेल तर ती वेळ अद्याप आली नाहीं. पुढें होणारें प्रभु येशूचें सहस्रवार्षिक राज्य अद्याप यावयाचें आहे. त्या वेळेस तुमची पाहिजे तर नेमणूक करूं; सध्यां आपण एकाद्या टेंपल, फ्रीयर, किंवा आंडर्सन्सारख्या हुशार मनुष्याच्या स्वाधीन शिक्केकटार करून मार्गस्थ व्हावें हें बरें ! तर याप्रमाणें आमच्या प्रस्तुत राज्यकर्त्यांची कारकीर्द व पूर्वीच्या राजेरजवाड्यांची कारकीर्द यांत महदंतर आहे.

३. आतां सांप्रतच्या सरकारानें या देशाच्या संबंधानें काय काय केलें पाहिजे याविषयीं विचार करूं. हा विचार तीन प्रकारांनीं केला असतां चालेल; एक आमचें सरकार आपणास ख्रिस्ती म्हणवितें म्हणून, एक नीतिदृष्टचा, आणि तिसरा सामान्य व्यवहाराच्या दृष्टीनें.

४. आमचें सरकार ख्रिस्तधर्मी ऊर्फ संद्धर्मानुयायी आहे हें आमच्या वाचकांस सांगणें नलगेच. ख्रिस्ती धर्माचा मुख्य सिद्धान्त असा आहे कीं, जगांतील इतर धर्म सर्व खोटे आहेत, व खरी नीति काय ती त्यांतच सांगितली आहे; क्लैव साहेबांनीं जसे दोन तहनामे तयार केले होते, एक खरा आणि एक खोटा,–त्याप्रमाणें आकाशांतील प्रभूच्या स्वदस्तुरची सनद म्हटली म्हणजे 'पवित्रशास्त्र' हें होय, व वेदकुराणादि ग्रंथ तांब्डया तहनाम्यादाखल होत. आपल्या परम दयाळू महाराणीसाहेबांनीं सन १८५८ च्या जाहीरनाम्यांत आम्हांस असेंच कळविलें आहे कीं, वरील ईश्वरप्रणीत व मोक्षैकमार्गभूत धर्मावर त्यांचा पूर्ण निर्धार आहे शिवाय दरवर्षीं वरील पवित्र धर्माच्या प्रीत्यर्थ आमच्या खजिन्यांतले लाखों रुपये उडत असून मिशनरी ऊर्फ प्रेषित मंडळी तर शहरोंशहरीं गांवोंगांवीं रस्तोरस्तीं सद्धर्माचा प्रकाश पाडीत आहेत व त्यांचा महिमा गात आहेत हें सर्वांस महशूर आहेच. तेव्हां आमचे राज्यकर्ते हे येशू महाराजांचे केवढे परमभक्त आहेत हें कोणालाही दिसणार आहे. आतां ही ख्रिस्तभक्ति आणि गेल्या शंभर सवाशें वर्षांतला येथील कारभार यांचा वस्तुतः पाहतां किती अत्यंत विरोध आहे हें कोणालाही सांगायला नकोच. जो कोणी पवित्रशास्त्रांतर्गत येशूचरित्र आणि क्लैव, हेस्टिंग्स्, डलहौसी टेंपल या चतुष्टयांची चरित्रावली वांचील आणि दोहोंची परस्पर तुलना करील, त्यास

वरील मंडळीची ख्रिस्तलोकीं काय संभावना होण्यासारखी आहे हें समजण्यास फार आयास पडतील असें नाहीं. त्याप्रमाणें रे० मिचेल, टेलर वगैरे मंडळी हिंदु धर्माच्या संबंधानें असंबद्ध प्रलाप करण्यांत जी व्यर्थ कालक्षेप करते, तीच जर पवित्रशास्त्रांतलें एकेक वचन घेऊन त्याचें स्पष्टीकरण हिंदुस्थानच्या इतिहासांतून करूं लागेल तर केवढी मनोरंजक व्याख्यानें होतील बरें ! पण याविषयीं तूर्त आम्हांस विचार कर्तव्य नाहीं. 'गतं न शोचामि कृतं न मन्ये' या न्यायास अनुसरून मागें होऊन गेलेल्या गोष्टींचा काथ्या कुटण्यांत कांहीं हासील नाहीं. क्लैव, हेस्टिंग्स् वगैरे मंडळीविषयीं त्यांच्या समकालीनाचे जे अभिप्राय होते ते खरे असोत, [१]

१. क्लैवच्या संबंधानें जॉन्सन्च्या भाषणांत पुढील उल्लेख आहे:--

"The ingenious Mr. Brown told me, that he was once at the seat of Lord Clive, who had returned from India with great wealth; and that he showed him at the door of his bed-chamber a large chest, which he said he had once had full of gold: upon which Brown observed, 'I am glad you can bear it so near your bed-chamber.'"

हेस्टिंग्स्वर बर्कनें केलेला भडिमार तर प्रसिद्धच आहे:--

"At length the orator concluded. Raising his voice till the old arches of Irish oak resounded, "Therefore," said he, "hath it with all confidence been ordered by the Commons of Great Britain, that I impeach, Warren Hastings of high crimes and misdemeanours. I impeach him in the name of the Commons House of Parliament, whose trust he has betrayed. I impeach him in the name of the English nation whose ancient honour he has sullied. I impeach him in the name of the people of India, whose rights he has trodden under foot, and whose country he has turned into a desert. Lastly, in the name of human nature itself, in the name of both sexes, in the name of every age, in the name of every rank, I impeach the common enemy and oppressor at all."

Macaulay's Essay on Warren Hastings.

किंवा मेकॉलेप्रभृतींनीं त्यांस जागोजाग जें प्रेमालिंगन दिलें आहे तें यथार्थ असो; तूर्तच्या पक्षीं आम्हांस दोन्ही लेख सारखेच होत. यास्तव हल्लीं आपण असें समजूं कीं, 'इसापनीतीं' त जुपिटरानें जसा एक भला मोठा ओंडा अचानक आकाशांतून खालीं सोडून दिला, आणि हा तुम्हांला राजा घ्या असें बेडकांस सांगितलें, त्याप्रमाणेंच आकाशांतील प्रभूनें आमचे सांप्रतचे प्रभु आम्हांकरतां पाठवून दिले आहेत अशी कल्पना केली असतां प्रस्तुत सद्धर्मी राज्यकर्त्यांनीं येथील सत्ता कोणत्या तऱ्हेनें वहिवाटली पाहिजे हें पाहूं.

येशू ख्रिस्त व त्यानें स्थापलेला धर्म याविषयीं आमच्या वाचकांस कितपतशी माहिती असेल हें आमच्यानें सांगवत नाहीं. कां कीं, एक तर इंग्रेजी शाळांतून व विद्यालयांतून तर त्याविषयीं कधीं फार करून नांवही काढीत नाहींत; व एतद्देशीय भाषांतून वरील विषयावर म्हणण्यासारखा एकादाही ग्रंथ झाला असेल असें म्हणवत नाहीं. आजपर्यंत पाद्रीखात्यानें येथें आपल्याकडून अट्टाहास करून पुस्तकांच्या, शाळांच्या व व्याख्यानांच्या द्वारें सदरील विषय लोकांच्या मनांत आणून देण्याचा पुष्कळ यत्न केला आहे हें खरें; पण त्यांच्या तऱ्हेवाईक पद्धतीमुळें प्रस्तुत धर्म हें कांहीं तरी खूळ आहे इतकी मात्र लोकांची समजूत दृढ होऊन बसली आहे. यास्तव प्रस्तुत विषयाच्या अनुषंगानें येथें इतकें सांगतों म्हणजे बस आहे कीं, सदरील धर्माचा पैगंबर हा युधिष्ठर, बुद्ध, साक्रेटीस, तुकाराम या लोकांच्या कोटींतला होता अशा विभूति 'भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम्' या महाकविवचनास अनुसरून या भूतलावर कधींमधीं अवतीर्ण होत असतात; तर तोच मासला परम शठ जे यहुदी लोक त्यांच्यांत 'भांगेंत तुळस' ग्या न्यायानें वरील महापुरुषांच्या रूपानें दृष्टीस पडला. त्यानें तीसपासून तेहेतीस वर्षांपर्यंतच काय तो धर्मोपदेश केला, पण त्या तीन चार वर्षांत पेरलेल्या बीजाचेंच फळ येवढ्या प्रचंड व वैभवयुक्त रूपानें साऱ्या पृथ्वीभर आज कित्येक शतकें दृष्टीस पडत आहे. आतां वरील उपदेश काय होता हें जर पाहिलें, तर सर्वांवर दया करावी, प्रत्यक्ष शत्रूंचीही क्षमा करून त्यांजबद्दल ईश्वरापाशीं करुणा भाकावी. एका गालावर मारली असतां दुसरा पुढें करावा, सारें मनुष्यमात्र हीं परमेश्वराचीं लेकरें होत यास्तव अमुक मंडळी

देवाची लाडकी आणि अमुक नावडती या कल्पना कुत्सित होत, याप्रमाणें अत्यंत सात्त्विकगणाचा तो होता. तुम्ही आपल्या देशांतून उठा आणि परमुलखावर जाऊन धाड घाला, ज्यांनीं तुम्हांस कधीं काडीचाही उपद्रव दिला नाहीं त्यांचे मुलूख काबीज करा, ज्यांनी सालसपणानें तुम्हांस आश्रय दिला त्यांच्यावर उठून अरेरावी करा, रणवाद्यें वाजवा, जयस्तंभ उभारा, खोट्या सह्या करा,दुसऱ्यांच्या बायका उपटा. दिवसाढवळ्या दरवडे घाला, वाटेल त्यास उचलून फांशीं द्या, यांपैकीं एकही प्रकार 'शुभवर्तमानां' त आढळत नाहीं. वरील सर्व प्रकार मुसलमानांच्या पैगंबरानें केलेल्या उपदेशास कांहींसे साजणारे आहेत; कां कीं जरी वरील घोर कर्मांचा त्यानें साक्षात् उपदेश केला नाहीं, तरी तरवारीच्या लखाखीनें सद्धर्माचा प्रकाश साऱ्या दुनियेवर पाडण्याची त्यानें आज्ञा दिली असल्यामुळें एकंदरींत तोच पर्याय झाला. पण बिचाऱ्या येशूनें तीही आज्ञा आपल्या शिष्यांस दिली नाहीं, व स्वत: तरवारीस तो कधीं शिवलाही नाहीं.उलटा त्याच्या चरित्रकारांचा तर असा उल्लेख आहे कीं, त्यास सुळावर चढवतांना त्यानें अत्यंत थोर-पणाची गंभीरवृत्ति धारण करून लोकांच्या अज्ञानाबद्दल कारुण्य प्रगट केलें, आणि त्यांच्या कल्याणार्थ आपल्या पित्यापाशीं मनोभावेंकरून प्रार्थना केली! मग हें सर्व जर खरें आहे, तर गुरूंत व शिष्यांत हें केवढें महदंतर! आमची तर पक्की खातरी आहे कीं, हेस्टिंग्स्, डालहौसी, लिटन्, टेंपल्, फ्रीयर अशासारख्यांस ख्रिस्ताच्या शिष्यांत सामील करणें म्हणजे 'वेषधारी लांडग्यांस' मेंढ्यांत गणणें, किंवा डंकनरोडवासी अखंड सुवासिनींचें 'सीता-मंदोदरी-तारा' या वर्गांत परिगणन करणें यासारखेंच होय! 'पवित्रशास्त्र' म्हणजे 'इसापनीति' जर नसेल, आणि 'आकाशांतील बापा' नें जर खरोखरच सिनिया पर्वतावर मोझ्याला 'आज्ञादशक' दिलें असेल, तर वरील खाशा मंडळींची व त्यांच्या लक्षावधि देशबंधूंची इत-उत्तर काय व्यवस्था होणारी असेल ती असो! ! ‡

‡ "Sydney Smith well remarked, 'If you wish to convert the heathen, you must first burn your Bibles, which, instead of exhibiting you as Christians, will only prove you to be impostors.' At another Period Burke remarked 'The

(पुढें चालू)

तर ज्या अर्थी आमचें सरकार आपणास ख्रिस्ती म्हणवितें, त्या अर्थी वरील धर्माप्रमाणें एक आणा तरी त्याचें आचरण येथें उतरायाला पाहिजे हें उघड आहे. येवढा हिंदुस्थान देश आम्हीं इतक्या थोडया काळांत व इतक्या अल्प आयासानें काबीज केला हें आमचें सामर्थ्य नव्हे, तर परमेश्वरानें आपले अर्चित्य हेतु सिद्धीस नेण्याकरतां ह । येवढा खाऊ आमच्या हातावर अचानक आणून ठेवला, याप्रमाणें आज कितीक दिवसांपासून पाश्चात्यांनीं ज्या लक्षवेळां उक्ति प्रगट केल्या आहेत त्या जर केवळ वायफळ नसतील व जगाच्या समाप्तीनंतर पितापुत्रांचें मोठें जगड्व्याळ कमिशन बसून त्यांत सर्वांचा निवाडा होणें आहे हा जर आमच्या सद्धर्मी राज्यकर्त्यांस निवळ फार्स वाटत नसेल तर आमच्या देशाचा कारभार आजपर्यंत ज्या तऱ्हेनें चालला, आणि या घटकेला जसा चालला आहे ती तऱ्हा त्यांनीं अगदीं टाकून दिली पाहिजे. जरी घटकाभर असेंही मानलें, कीं आमचा कारभार करण्याकरतां सदरील पाश्चात्य मंडळीस आकाशांतील प्रभूनें मुनीम नेमून ठेवलें आहे, तरी ही मुनीमी ते कोणत्या रीतीनें बजावतात हें पहावयास नको काय ? आमच्याकडे मुकत्यारी दिली आहे असें तोंडानें म्हणून ' इसापनीतीं 'तल्या खवाखाऊ वानराप्रमाणें जर आमच्या सरकारनें कृति केली तर, चालेल काय ? आम्ही भरतभूमीचीं वेडींखुळीं लेकरें यांच्या लक्षांत जरी आम्हांवर नेमलेल्या मुनीमांची लबाडी आली नाहीं, तरी सर जॉन् स्ट्राची आपला अक्कलआढावा देवबापापासून लपवूं शकतील असें त्यास वाटतें काय ? गवर्नर साहेबांनीं सात सेक्रेटरीयटांच्या आंत जरी आपलें ' सीक्रेट डिपार्टमेंट ' (गुपचुपीचें खातें) लिकवून ठेवलें, तरी तें येशूला व त्याच्या बापाला काय होय ? त्याचा छडा त्यास लागणार नाहीं असें होईल काय ? आता आमच्या राज्यकर्त्यांस

(मागील पानावरून पुढें चालू)

English who double the cape, generally contrive to unbaptise themselves. ' Had Burke lived to see the annexation of Oude, he would perhaps have criticised the morals of a government which based its acts of spoliation and violence on the requirements of the Christian religion. "

The way to regain India.

असें वाटत असेल, कीं आम्ही धर्मकृत्याकडें हिंदुस्थानच्या खजिन्यांतले लाखों रुपये प्रतिवर्षीं उडवितों, जिकडे जिकडे चर्च व चापलन् यांची गर्दी आम्हीं करून दिलीच आहे, शिवाय आमच्या आश्रयानें मदतीनें शेंकडों मिशनें येथें येऊन उतरलीं आहेत व प्रभूच्या नामाचा गजर त्यांच्या मुखें सदोदित चालूच आहे, शिवाय मूर्तिपूजकांच्या देवस्थानांवर आम्हीं डोळा ठेवला असून खऱ्या देवाच्या सन्निध येण्याबद्दल लोकांस आमचें हस्तें-परहस्तें प्रोत्साहन चालूच आहे,—मग इतक्या परींनीं प्रभूची प्रसन्नता संपादन करण्याविषयीं आम्ही सदोदित झटत असतां आणखी तें काय पाहिजे ? असें आमच्या सरकारचें मनोगत असेल तर मग आमचें कांहीं बोलणें नाहीं. आमचे शेवटचे राजमणि बाजीराव साहेब यांचाही खाक्या अशाच मासल्याचा होता. वडिलांच्या हातून चुकून गफलतीनें गोत्रजहत्या घडली, तर त्यांनीं ' बापसे बेटा सवाई ' हा न्याय अंमलांत आणून प्रत्यक्ष विठोबास खडा साक्षीदार करून ठेवून ब्रह्महत्येचा डंका स्वपूर्वजार्जित ' ब्रह्मबाच्छाही ' भर वाजवून दिला, आणि सारी पुण्यनगरी रांडवाडा करून सोडून आपली पवित्र ज्ञाति भ्रष्ट करविली,आणि या सर्व महाकृत्यां-बद्दल चित्रगुप्ताच्या वहीवर दुसऱ्या बाजूला जमा काय,–तर ब्राम्हणभोजनें, नऊ लाख आंबराई, विठोबाला पोषाख, गंगेला सबंध पेनशनाचें समर्पण, इत्यादि ! तर 'नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावायाची' यापेक्षा उंची दराची धर्मवासना जर आमच्या राज्यकर्त्यांच्या ठायीं वसत असेल; तर त्यांनीं आपली ख्रिस्तनिष्ठा सध्यांपेक्षां फार निराळ्या तऱ्हेनें प्रगट केली पाहिजे हें उघड आहे.

हें एक प्रकरण झालें. वस्तुत: पाहतां यांत मोठासा अर्थ आहे असें नाहीं. कां कीं आमच्या राज्यकर्त्यांची नाटकी भाषा ज्यास कळली नाहीं त्यास मात्र राणीसाहेबांचा जाहीरनामा किंवा फ्रीयर साहेबांची ख्रिस्तभक्ति हीं फसवूं शकतील. बाकी वस्तुतः पाहतां इंग्रेजी आभार (thanks), इग्रेजी खेद (regret), इंग्रेजी आनंद (pleasure) वगैरेंत जितपत अर्थ असतो, तितपतच ' आमची ख्रिस्ती धर्मविर पूर्ण निष्ठा आहे ' इत्यादि तिलगुडोपम कर्णमधुर वाक्यांची मीमांसा करावयाची. सणावाराच्या दिवशीं जसें घरांतील वस्त्रप्रावरण व लेणें सगळें काढून अंगावर घालण्याची सर्वांची रीत आहे,

त्याप्रमाणेंच दरबारी भाषणांतून व जाहीरनाम्यांतून फुकाची ख्रिस्तनिष्ठा मिरविण्याची साऱ्या पाश्चात्य राज्ट्रांची चालच आहे. बिचारा येशू ख्रिस्त दोन हजार वर्षांपूर्वी हालअपेष्टा होऊन मरण पावला; त्याच्या नांवावर आज हवें त्यानें हवें तें कृत्य करावें. तो आकाशांतून उतरून कोणाचा हात धरायला येंतो आहे असें कांहीं नाहीं, किंवा बीकन्स्फील्ड महाराज व त्यांचें पंचायतन यांच्या 'सीक्रेट डिपार्टमेंटां'त तो थोडकाच डोकावून पाहतो आहे, मग त्याचें फुकाचें नांव घेऊन त्याखालीं जर हवें तें दडपून द्यावयाला सांपडतें आहे तर कशाला कमी करा ! पंढरपूरच्या विठोबानें दामाजीपंताबद्दल जशी एकदम भरपूर रसद पोंचवून दिली, त्याप्रमाणें वरील प्रभूनें आपल्या रक्तानें आपल्या क्रोधाविष्ट पित्यास संतुष्ट करून पुढच्या व मागच्या सर्व पापांबद्दल साऱ्या मनुष्यजातीची हमी भरून भरभक्कम ऐवज स्वर्गीच्या दरबारीं एकदम पटवून दिला आहे. तेव्हां आतां ख्रिस्तभक्तांच्या आचरणांत वैगुण्य काढण्याची प्रत्यक्ष आकाशांतील बापाचीही पुण्याई नाहीं ! !

५. दुसरा विचार नीतीचा. 'नीति' शब्दाचा येथें संस्कृत अर्थ घ्यावयाचा नाहीं, ‡ तर 'न्यायीपणा,' 'रास्तपणा' या प्राकृत अर्थी घ्याचें ग्रहण करायाचें. या नीतिविषयींही आमच्या राज्यकर्त्यांचा पहिल्यापासून मोठा बाणा आहे. मेकॉले साहेबांच्या एतद्देशविषयक दोन निबंधांत

‡ संस्कृत भाषेंत 'नीति' शब्दाचा अर्थ 'राजनीति' हा होय. व राजनीति म्हणजे दुसऱ्याचें पागोटें घेण्याची विद्या. महाभारतांतील कणकनीति व मुद्राराक्षसांतील 'मंत्रिमुख्या'ची नीति आमच्या वाचकांपैकीं किंत्येकांस माहीत असेलच. भर्तृहरीच्या नीतिशतकांतील राजनीतिविषयक श्लोक पुढें भाषांतररूपानें सादर करतों, त्यावरूनही प्रस्तुत विषयाचें स्वरूप लक्षांत येईलच:--

केव्हां सत्य वदे वदे अनृतही केव्हां वदे गोडही
केव्हां अप्रियही दयालुहि असे केव्हां करी घातही ।
जोडी अर्थहि जे यथेष्ट समयीं कीं वेचही आदरी
ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे परी ॥

--वामन

वरील प्रकरणीं तर मोठेंच विवरण केलेलें आहे, आणि इंग्रेजी लोकांचा नीतिमत्तेंत साहेबांनीं पहिला नंबर बिनदिक्कत ठोकून दिला आहे ! * शिवाय नीतीचीं म्हणजे सदाचरणाचीं तत्त्वें ख्रिस्ती धर्म प्रगट होण्यापूर्वी या भूतलावर बहुधा अज्ञातच होतीं, तीं वरील उजेड आकाशांतील बापानें पाडल्यावर काय तीं जगांत पूर्णपणें प्रगट झालीं. ही स्वधर्माची पोकळ फुशारकी सहस्रशः पाश्चात्य ग्रंथकारांनीं आजपर्यंत गाइली आहे. ॥ तर आतां केवळ न्यायाच्या दृष्टीनें पाहतां आमच्या देशांतील कारभार कसा काय चालला आहे तो पाहूं.

* अंक ३० पहा

॥ वरील प्रौढीवादाचें निरसन पुढील उताऱ्यांवरून होण्यासारखें आहे:—

"That the system of morals propounded in the New Testament contain no maxim which has not been previously enunciated, and that some of the most beautiful passages in the Apostolic writings are quotations from pagan authors, is well-known to every scholar; and so far from supplying, as some suppose, an objection against Christianity, it is a strong recommendation of it, as indicating the intimate relation between the doctrines of Christ and the moral sympathies of mankind in different ages But to assert that Christianity communicated to man moral truths previously unknown, argues, on the part of the asserter, either gross ignorance or else wilful fraud !

Buckle's History

"I have just read these words in a piece of declamation in fourteen volumes, entitled, The History of the Lower Empire—"The Christians had a morality, but the Pagans had none "

Oh, M. Le Beau ! author of these fourteen volumes, where did you pick up this absurdity ? What becomes of the morality of Socrates, of Zeleucus of Charondas, of Cicero, of Epictetus, and of Marcus Aurelius ?

Voltaire's Philosophical Dictionary (Morality.)

राजानें प्रजेशीं यथान्याय व्यवहार करावयाचा म्हणजे काय हें प्रायः स्पष्टच आहे. प्राच्य देशांत राजाविषयीं ज्या समजुती आहेत, कीं राजा हा साऱ्या प्रजेचा मालक आहे, व तो काय पाहिजे तें करील, त्यास विचारण्याचाही कोणाला अखत्यार नाहीं, या खऱ्या असोत किंवा प्राचीन काळीं कांहीं पाश्चात्य राष्ट्रांत राजाविषयीं ज्या समजुती असत, व आतां तर प्रायः सर्वत्र आहेत, कीं राजा हा केवळ प्रजेचा चाकर आहे, आणि तो जर चुकेल तर त्यास विचारण्याचा तर काय, पण शासन करण्याचाही अधिकार प्रजेस आहे; हीं मतें यथार्थ असोत. दोहोंतील आशय मिळून सामान्यतः एकच आहे इकडे राजाविषयीं जरी पूज्यभाव फार आढळतो तरी तो जर दुर्वृत्त निघाला तर त्यास कोणी नांवें ठेवीत नाहीं किंवा त्याशीं विरोध करीत नाहीं, असें नाहीं. राघोबादादा येवढा जोरावर होता, पण त्याची कोणी डाळ शिजूं दिली नाहीं, व ज्या चांडाळणीस पुण्यास राज्य करायाचें होतें तिच्या कपाळीं वैधव्यदशेंत कारागृहवास मात्र आला; त्याप्रमाणेंच दोघांच्या पोटीं जे कुलदीपक जन्मास आले त्यांसही शेवटपर्यंत कोणीही बरें म्हटलें नाहीं. आमच्या हल्लींच्या सरकारानें त्यांस आपमतलबासाठीं हातीं धरले म्हणून, नाहीं तर ऐन पुण्यावर लढाई ठोकून जो बहादर चढून आला होता त्याच्या हातानेंच बहुधा रावबाजीच्या कारकीर्दीची अखेर होण्याचा रंग आला होता! मुसलमानांच्या इतिहासांतही हुमायुनास पदच्युत करून शेरशहानें गादी बळकावल्याचीं वगैरे उदाहरणें आहेतच, तेव्हां इकडे तरी लोकांचा अंतर्गत अभिप्राय हाच आहे कीं, राजाकडे जरी सर्व अधिकार सोंपवून दिलेला आहे तरी तो जोंपर्यंत त्याचा यथार्थ विनियोग करील तोंपर्यंतच. वरील अधिकाराच्या जोरावर जर तो प्रजेस अतिशयित गांजू लागला, तर मूळचा पूज्यभाव तेव्हांच नष्ट होऊन जातो. तर कोणत्याही राष्ट्रांत पाहिलें तरी राजाविषयींच्या कल्पना बहुधा सारख्याच आहेत. त्या हया कीं, त्यानें प्रजेचें रक्षण करावें, तीस सुमार्गास लावावें, देश समृद्ध करावा, सर्व लोक एकमेकांस उपद्रव न करतां जेणेंकरून आनंदानें व संतोषानें राहतील अशा तजविजी कराव्या, इत्यादि. राज्य-धुरेचा ज्यानें अंगीकार केला, त्यानें वरील सारी जबाबदारी आपल्या अंगावर घेणें जरूर आहे. ती न घेतां प्रभुत्वापासून मिळणाऱ्या सुखोप-भोगाची व मानसन्मानाचीच मात्र जो अपेक्षा करील तो प्रजारक्षक नव्हे,

तर प्रजाभक्षक होय. जसा सिंह हा पशूंचा राजा, किंवा गरुडपक्षी हा पक्ष्यांचा राजा, तसाच वरील नरपति होय; म्हणजे सिंहाच्या आधिपत्याचा जसा इतकाच अर्थ, कीं त्यानें आपल्या प्रजेवर झाप घालून हवें त्यास वाटेल तेव्हां फाडून खावें, व गरुडपक्ष्यानेंही तोच प्रकार दुर्बळ पक्ष्यांवर निःशंकपणें करावा, त्याप्रमाणेंच वरच्यासारख्या नृपाधमानें पाहिजे त्यास बुचाडावें व पाहिजे तिजवर बलात्कार करावा येवढाच त्याच्या राजेपणाचा अर्थ ! पण जो आपणांस सुज्ञ म्हणवतो त्याच्या हातीं सत्ता आली असतां तिचा तो वरच्याप्रमाणें कधीं दुरुपयोग करीत नाहीं. मग आमचें सरकार जर आपणांस शहाण्यांतलें शहाणें म्हणवितें, व ख्रिस्ती धर्मांतील पवित्र आचरणाचा बाणा बाळगतें, तर त्याची प्रजानियमनाची पद्धति तर किती निर्दोष व स्तुत्य असावी ! पण लिहिण्यास दिलगीर वाटते कीं, पहिल्या-पहिल्यानें म्हणजे अव्वल इंग्रेजींत जरी न्यायीपणाचा व दयाळूपणाचा प्रकार या देशांत पुष्कळ दृष्टीस पडत गेला, तरी आतां हळूं हळूं वरील दोन्ही वृत्तींचा ऱ्हास होत जाऊन प्रभुत्वाचीं खरीं लक्षणें दिवसेंदिवस विरलतरतेनें अ ढळूं लागलीं आहेत. मुंबईचे पहिले गवर्नर अल्फिष्टन्साहेब यांच्यांत व परवांची राजमूर्ति टेंपलसाहेब यांच्यांत केवढें जमीनअस्मानचें अंतर ! सत्तावीसचे कायदे आणि आलीकडचे एकेक दिव्य आक्ट यांत केवढी थोरली तफावत! सती, ठगी, बालहत्या वगैरेंबद्दल हळहळणारी व बंदोबस्त करणारी वेंटिक्प्रभृति मंडळी कोणीकडे,आणि खुद्द कलेक्टरास दुष्काळांत लोक मरतात येवढा उल्लेख केल्याबद्दल ताबडतोब अर्धचंद्र देणारे व लक्षावधि प्रजा मरणाच्या दारीं बसली असतां दिल्लीस दिवा लावणारे बीकन्स्फील्डप्रमुख महापंचायतन कोणीकडे! एक ना दोन, ज्या ज्या गोष्टींत पाहावें तींत तींत पंचवीस तीस वर्षांमागच्या स्थितीला व आज चोहोंकडे आढळणाऱ्या स्थितीला कांहींच मेळ दिसून येत नाहीं. हल्लीं आमच्या ख्रिस्ती व नींतिमान् म्हणविणाऱ्या राज्यकर्त्यांचें राज्यसूत्र हें एक जबरदस्त आढळतें कीं, जेणें-करून द्रव्यप्राप्ति होईल तो उपाय कसाही असला तरी अवश्य करावा. राजेरजवाड्यांशीं झालेले तह, आज किती काळापासून चालत आलेले लोकांचे हक्क, आपण स्वतः वेळोवेळीं प्रजेस दिलेलीं वचनें, वगैरेंची व्यवस्था आमचें सार्वभौम सरकार मनास मानेल त्या रीतीनें करीत असतें. जी गोष्ट त्यांच्या पथ्यावर पडेल व जेणेंकरून गोऱ्या लोकांच्या पोतड्या भरतील

तो कायदा ! एकंदरींत पाहतां आलीकडच्या काळांत आणि त्यांतून दिल्ली-पदावर बादशाही गाजल्यापासून आमच्या पाश्चात्य प्रभूंनीं जो वर्तनक्रम सुरू ठेवला आहे तो बहुतेक अंशीं केवळ अन्यायाचा आहे, व ही गोष्ट दिवसेंदिवस येथें आबालवृद्धांच्याही प्रचीतीस येत चालली आहे. यापूर्वी सारे लोक मोगलाईस व पेशवाईस नांवें ठेवून इंग्रेजी राशियतीची जी तारीफ करीत असत ती स्थिति आतां गेली आतां अगदीं उलट प्रकार होत चालला आहे असें म्हटलें असतांही चालेल. पूर्वीची तिस्मारखानी व पेंढारशाही सुद्धां पुरवली, पण हा इंग्रेजी चरक फार भयंकर, असें आलीकडे सर्वांस वाटूं लागलें आहे !

६. येथवर प्रस्तुत विषयाचा दोन गोष्टींच्या संबंधानें विचार झाला. आतां तिसरा प्रकार नुसता जगांतील व्यवहार येवढ्याच दृष्टीनें प्रस्तुत राज्यरीतीविषयीं विचार करूं. हा विचार असा कीं,आमचे सरकार खिरस्ती धर्म झूट समजून यास मुळींच मानीत नाहीं, व नीतीसही बिलकूल ओळखीत नाहीं. असें गृहीत धरलें असतां आमच्या प्रस्तुतच्या स्थितीवरून काय विचार मनांत येण्यासारखे आहेत तें पाहूं.

वरील विवेचन करतांना असें मनांत आणलें पाहिजे कीं, हा विस्तीर्ण देश ही एक दुभती गायच आमच्या प्रभूंस सांपडली आहे. वरील उपमा जरी विषयनिरूपणार्थ येथें यदृच्छेनें घेतली आहे तरी अनेक अंगांनीं तिच्या ठायीं यथार्थत्व किती आहे हें बहुधा कोणाच्याही लक्षांत येऊन चुकणार आहे. सहनशीलपणा, संतोषवृत्ति, उपयुक्तत्व, इत्यादि गुणांत आमच्या राष्ट्राचें व वरील पशुविशेषाचें साम्य किती उत्कृष्ट जुळतें हें सांगायास नकोच ! त्याप्रमाणेंच गाय कितीही सौम्य असली तरी समयविशेषीं ती जशी लाथ उचलायाला सोडीत नाहीं, त्याप्रमाणेंच या आर्यभूमिधेनूचाही अनुभव तिच्या परराष्ट्रीय धन्यास आहेच.नुकती परवां जेव्हां ती एकाएकीं बिथरून गेली व दावें तोडून शिंगें मारायला लागली तेव्हां तीस चुचकारतां चुचकारतां व पुनः ताब्यांत आणतां आणतां कोण अट्टाहास झाला ! आतां आलीकडे आमच्या शहाण्या प्रभूंनीं अधिक बंदोबस्त करून तिचे पायच बांधून टाकले आहेत व मुसकटही असें आवळून टाकलें आहे कीं, तिचा हंभारवही बाहेर न फुटे, हें खरें; त्याप्रमाणेंच परवांच्या महाप्रलयांत

जेव्हां लक्षाहुतीवर लक्षाहुति होत होत्या तेव्हां इतके वत्स पटापट प्राण टाकतांना पाहूनही तिनें मुकाटचानें काय दुःखाश्रु जागच्या जागीं गाळलेले असतील ते असतील; बाकी पूर्वी विश्वामित्राच्या कारकीर्दीत तिचा एक वत्स बांधून चालविला असतां तिनें जें अकांडतांडव केलें, आणि—

पकडो लियो हकालो बे बिसवामितर भाग जावे गा ।

अशी गर्जना करणाऱ्या मंडळीच्या हातून त्याच्या सैन्याची एका क्षणांत वाताहत करून सोडली, तें तेज हल्लीं तिच्यांत कांहींही उरलें नाहीं. बिचारी करते काय ? एकेक धुरंधर के. सी. एस्. आय्. (क. स. इ.) नामदार टेंपल साहेब, नेकनामदार लिटन् साहेब, आणि या साऱ्या शौंडिक मंडळीचे सद्गुरु पुण्यप्रताप बीकन्स्फील्ड बोवा, अशांच्या पुढें तिचा काय पाड ? नाहीं म्हणायाला आतां एक उरलें आहे, कीं तिनें प्राच्य आर्यांच्या समजुतीप्रमाणें क्षीरसागराकडे पुनः धाव घेऊन परमेश्वरापाशीं करुणा भाकावी, किंवा पाश्चात्य आर्यांच्या मताप्रमाणें आकाशांतील बापाच्या नांवानें तरी हंबरडा फोडावा म्हणजे त्याचा पुत्र तरी आपल्या लाडक्या भक्तमंडळीच्या हृदयांत वास करणाऱ्या पवित्र आत्म्यास जरा जागें करील व सैतानप्रयुक्त जें पूर्वोक्त मूतित्रय त्यानें दिलेल्या दुर्धर पीडेचा कांहीं तरी उपशम होईल !

असो; तर या देशांतून निघेल तितका पैसा काढायाचा व आपली भर करून घ्यावयाची येवढयाच दृष्टीनें जरी पाहिलें तरी आमच्या राज्यकर्त्यांनीं 'इसापनीतीं'तील 'मनुष्य आणि हंसी' ही तरी गोष्ट चांगली मनांत आणावी. आमच्या हिंदुस्थानाची पहिल्यापासून सुवर्णभूमित्वेंकरून प्रख्याति आहे खरी; पण ज्या हंसीपासून प्रतिदिवशीं वरील अमूल्य द्रव्याची निष्पत्ति होणार ती जर जाग्यावर असेल तर सगळ्या गोष्टी ! इसापकल्पित शहाण्या मनुष्यानें सगळा लग्गा एकदम हातीं लागावा म्हणून जसा सुरीचा प्रयोग केला, किंवा गाय मोठी दुभती असली म्हणून दुधाच्या जागीं रक्त येईपर्यंत जर दोहनाचा सपाटा लावला तर कांहीं उपयोग होणार आहे काय ? अर्थात् कांहीं नाहीं. हंसीचा धनी ती मेल्यावर निराश होत्साता जसा हाका मारीत बसला, तशीच अवस्था हावयाची, तर आमच्या पाश्चात्य आर्यबंधूनीं निदानपक्षीं येवढी तरी

सावधगिरी ठेवावी म्हणजे झालें. सारा देश खंक होऊन बसल्यावर मग आमच्या दयाळू सरकारनें दररोज एक नवा कर बसविला तरी कांहीं चिंता नाहीं; व म्यांचेस्टरवाल्यांकडे या गरीब प्रजेस नित्य वस्त्रदान केल्याबद्दल वैसरॉय् साहेबांनीं प्रतिवर्षी काबूलच्या माजी अमीराप्रमाणें खंडणी रवाना केली तरी सुद्धां हरकत नाहीं. परवां परम दयाळू टेंपल साहेबांच्या राजवटींत या मुलखांतली लाखों प्रजा अन्न अन्न करीत जेव्हां रानोमाळ भडकत सुटली, तेव्हां अवघ्या भूमीचें दान तिनें आपल्या कृपावंत प्रभूस केलें नाहीं काय ? मागें पेंढाऱ्यांच्या आमदानींत फार तर आमचे लोक एका गांवांतून उठून दुसऱ्या गांवांत जात किंवा डोंगरकपारींत दडून बसत. पण अमळशानें वादळ शांत झालें कीं, सारा गांव पुनः पहिल्याप्रमाणें गजबजलेला दिसत असे. पण हल्लींच्या सुधारलेल्या इंग्रेजी राज्यांत मागच्या वेडगळ प्रकारांपैकीं एकहि आढळावयाचा नाहीं. टेंपल साहेबांनीं खुदावंत होऊन खुदाच्या मुलाखतीला आपल्या मुलखांतील लाखों प्रजा एकदम रवाना करून दिली. परलोकचे दरवाजे खुले करून न येत्या गांवाला जाण्याचा हमरस्ता साहेब महसूफांच्या राशियतींत जसा धडक वाहत होता तसा मागें कधींही वाहिला नसेल, व पुढेंही देव करो आणि कधीं न वाहो ! मग अशा राष्ट्रविप्लवाच्या वेळीं सारी जमीनची जमीन जरी सरकारानें घशांत घातली तरी कांहीं किफायत आहे काय ? तर आमचें राष्ट्र पिळून काढून त्यास भुकेबंगाल करून सोडण्यापूर्वी ही एक मोठी गोष्ट आमच्या राज्यकर्त्यांनीं मनांत आणली पाहिजे. दुसरी अशी कीं, कोणतेंही राज्य प्रजा संतुष्ट आहे तोंवरच सुरळीत चालतं असतें; सारे लोक बिथरून जाऊन त्यांच्या पोटांत जर सरकाराविषयीं दिवसेंदिवस अढी राहिली, तर वेळेनुसार कोणत्या थरावर गोष्ट जाईल याचा नेम नसतो. त्यांतून जेथें कोटयावधि लोकांत थोडयाथोडक्या सिवडक मंडळीनें अंमलदारी चालवायाची आहे तेथें तर निरंतर किती जपून वागणें जरूर आहे हें सांगायाला नकोच. त्यांतून असेंही करतां कधीं कांहीं गडबड न होतां इंग्रेज लोकांचें प्रभुत्व जरी येथें शतकांचीं शतकें असेंच राहिलें आणि आम्ही अगदीं निःसत्व होऊन जाऊन निवळ मेंढया बनून गेलों तरी इकडूनही इंग्लंड देशाचें म्हणजे मोठें गौरव होईल असा प्रकार नाहीं. अमेरिकन इंडियन लोकांच्या संबंधानें स्पेन देशास जो अक्षम्य कालिमा लागून राहिला तोच

इतिहासांत आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंवरही राहील. जें राष्ट्र इंग्लिश लोकांचे पाय येथें लागण्यापूर्वी लक्ष्मी, सरस्वती, अन्नपूर्णा, वीरश्री इत्यादिकांनीं युक्त होतें तेथें सारी नासाडी करून टाकून सहाराचें वाळवंट करून सोडलें ही परम देदीप्यमान कीर्ति तरी आमच्या श्वेतद्वीपीय बंधूंच्या वांट्यास येऊन तिचा ध्वज यावच्चंद्रदिवाकरौ फडकत राहील !

दैवेनोपहतस्य बुद्धिरथवा पूर्वं विपर्यस्यति । *

'मुद्राराक्षस'

अंक ८०-(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) सांप्रतच्या राज्यकर्त्यांची स्थिति. (३) राजेरजवाड्यांची स्थिति. (४) इंग्रज सरकारचें राजेरजवाड्यांशीं वर्तन. (५) जुन्या संस्थानिकांनीं काय करावें.

१. मागील तीन अंकांत प्रस्तुत विषयाचा एक भाग आटपला; म्हणजे आमच्या प्रस्तुतच्या सरकारच्या संबंधानें जें लिहावयाचें होतें तें लिहिलें. आतां दुसऱ्या भागाविषयीं विवेचन करूं. हा दुसरा भाग आमच्या राजेरजवाड्यांची स्थिति हा होय.

२. कोणत्याही देशांत पाहिलें असतां लोकांचे तीन वर्ग असतात. एक राजमंडळ, म्हणजे राजा आणि त्याचे आप्त व आश्रित; दुसरा वर्ग अमीर-उमराव अगर जहागीरदार; आणि तिसरा वर्ग म्हटला म्हणजे रयत अगर साधारण लोक. हल्लीं आमच्या देशांत पाहतां हे तिन्ही वर्ग आहेत. पहिल्यांत आम्हांवर नियुक्त असलेले युरोपियन अधिकारी येतात; दुसऱ्यांत 'जनरल ऑफ दि एंपायर' (शिंदे सरकार) यांजपासून तों अगदीं छोटेखानी इनामदार यांच्यामार्फत सारी मंडळी येते; आणि तिसऱ्यांत लहान-थोर, श्रीमंत-गरीब अशी सारी प्रजा येते. अलीजा बहादर शिंदे सरकार वगैरे मंडळीस आम्ही दुसऱ्या म्हणजे अमीर उमरावांच्या वर्गांत घातलें हें पाहून आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् नवल वाटेल; पण वस्तुतः स्थिति तशीच आहे हें सर्वप्रसिद्धच आहे. माजी लॉर्ड बीकन्स्फील्ड महाराजांनीं महाराणी साहेबांस नवी फारशी किताबत देऊन त्यांच्या

* "अथवा ज्यास दुर्दैवानें घेरलें त्याच्या बुद्धीस प्रथमतः विपर्यास पडतो !"

बादशाही सिंहासनापुढें छप्पन्न देशचे राजे जे गोळा करून आणले, आणि प्राचीन दिल्लीपतींचा सार्वभौमत्वाचा थाट पांच वर्षांपूर्वी जो येवढ्या थाटानें मिरविण्यांत आला यांतलें तात्पर्य काय ? तात्पर्य हेंच, कीं पूर्वी निजाम, गायकवाड, शिंदे, होळकर वगैरे जीं अनेक दोस्त सरकारें होतीं तीं इतःपर मांडलिक झालीं हें जगजाहीर करायाचें. पूर्वीचा जो निदान बाह्यात्कारी तरी बरोबरीचा संबंध होता तो जाऊन यापुढें आम्ही राजाधिराज, नेटिव संस्थानिक हे आमच्या खालीं एक पायरी, आणि एरवींची हिंदु प्रजा ही त्याहूनही खालच्या पायरीची, हाच काय तो इत्यर्थ एकशें एक तोफांचा व त्या दिवशीं जागजागीं केसरीहिंदच्या नांवानें खंडोगणती दारू जाळून जे हजारों रुपये खराब केले, त्यांत होता. बाकी त्या समयास शेंकडों वर्तमानपत्रांनीं बीकन्स्फील्ड बोवांच्या नांवानें हाकाटी केली, कीं या बुढ्यानें हें काय खूळ काढलें आहे म्हणून ? चक्रवर्तिनी साहेबांच्या देशबंधूंनीं तर त्यास निक्षून सांगितलेंच कीं, दूरच्या भरतखंडांत तुम्ही पाहिजे तीं सोंगें करा, पण येथें श्वेतद्वीपांत म्हणाल तर 'राणी' हीच किताबत आपल्यास बस आहे ! बाकी यहुदी उमरावजींच्या मनांत आमच्या महाराणी साहेबांस इंग्लिस्तानची ही बादशाहीण बनवून सोडायचें होतें; व स्वतःला नुकतेंच बारावें वर्ष लागलें होतें, तेव्हां स्वतः वजिरातीची इभ्रत भोगायाची होती !! असो; तर आमच्या दयाळू राणीसाहेबांस म्हातारपणीं दिल्लीच्या तक्ताचा जो सोहळा भोगायाला सांपडला त्यांतलें तात्पर्य पाहतां आमचे लहानमोठे सारे राजेरजवाडे हे इंग्रेजी बादशाहींतले अमीर-उमराव झाले हेंच होय हें उघड आहे. कांहीं दिवसांपूर्वी नेटिव संस्थानिकांच्या फौजांवर जी धाड येणार होती तिचा मतलब काय हेंही कोणाला सांगायला नकोच !

तर आतां अगदीं उंच पायरी जी इंग्रेजी लोकांची तिजवरून उतरून वरील मध्यम प्रदेशावर येऊं, व येथील हालहवाल काय आहे ती लक्षांत आणूं.

३. या मध्यम लोकांची स्थिति एकंदरींत पाहतां फारच विचित्र आहे. जसा त्रिशंकु हा इंद्रानें वरून लोटून दिला असतां धड स्वर्गलोकीं नाहीं व धड भूलोकींही नाहीं अशी त्याची अवस्था झाली व अजून मृगनक्षत्राच्या

शेजारीं बिचारा मधल्यामधेंच आज युगानुयुगें लटकत राहिला आहे, त्यासारखीच आमच्या एतद्देशीय माजी राजमंडळाची आज स्थिति होऊन गेली आहे. जसा पर्जन्यकाळीं एकाद्या नदीस अपरंपार पूर यावा आणि कांहीं काळानें तो अगदीं ओसरून गेल्यावर त्या प्रचंड जलौघाचा अवशेष जागजागीं डबकीं होऊन त्याच्या रूपानें राहावा, तसा प्रकार आलीकडे आमच्या सर्व संस्थानिकांचा झालेला आहे. कांहीं ठिकाणीं मोठालीं डबकीं, कांहीं ठिकाणीं लहान, कांहीं त्यांच्याहूनही लहान, अशा रीतीनें आमच्या माजी मराठीशाहीचीं खंडें या भरतभूमीवर जागजागीं राहिलेलीं आहेत. मागें चोहोंकडे धामधूम असे व धुमाळी उडत असे, तेव्हां वादळांनीं समुद्र व वातावरण हीं जशीं स्वच्छ राहतात; त्याप्रमाणें आमच्या राष्ट्राची तरतरी ही कायम होती. आज काय शिद्यांची मोहीम हिंदुस्थानावर झाली, उद्यां होळकरानें पुण्यावर रोख धरून आपल्या 'कल्लोलोपम तुरंगसैन्यानें' * आपल्या प्रतिस्पर्ध्यावी व दुष्ट यजमानाची खोड मोडण्याचा घाट घातला आहे, परवां भोसल्यांची धुमाळी बंगाल्यावर होऊन टोपीवाले कलकत्त्याच्या खंदकाच्या आंत दडून

* "Holkar, seeing himself thus completely hemmed in, and all his schemes of conquest about to be checked by the British, seems to have hastily determined to plunge into a contest with them. He threatened the territory of their ally the Rajah of Jyenagar; he made extravagant and even insulting demands: and in a letter to Sir A. Wellesley, he said, "Countries of many hundred coss shall be overrun and plundered, Lord Lake shall not have leisure to breathe for a moment; and calamities will fall on lacks of human beings in continual war by the attacks of my army which overwhelms like the waves of the sea!" At the same time he earnestly invited Scindia and the other princes who remained still independent, to unite against the English as a common enemy."

Murray's British India

राहिले, * असा नेहमीं तडाखा उडत असल्यामुळें देशांत बहुधा अस्वस्थता राहून रक्तपाताचा प्रसंग वरचेवर येत असे हें खरें, पण निदान येवढें तरी होतें कीं, आज जसे तोफेचें चित्र पाहायचें असलें म्हणजे वेब्स्टरकृत इंग्रेजी कोश उघडावा लागतो, किंवा अफगाणिस्थानांत जायला मनुष्यें पाहिजेत तर मारून मुटकून शिपाई सजवावा लागतो, अगर परवां जसे लक्षावधि लोक दांत वासून अन्न अन्न करून मेले व टेंपल साहेबांनीं खुशाल विलायतेस तारा पाठवाव्या कीं 'आरबी गोष्टीं' तील आंधळ्यांच्या प्रमाणें हे सारे लबाड लोक मरणाचें सोंग घेत आहेत, असला तरी अत्यंत दैन्याचा व लाजिरवाणा प्रकार त्या वेळेस नव्हता ! इंग्रेजी भाषेंत एक म्हण आहे कीं ' हत्याराचा नाश उपयोग केल्यानें जितपत होईल त्यापेक्षां गंजल्यानें तो त्वरित होतो,' तर हीच म्हण व्यक्तिभूत मनुष्याच्या संबंधानें पाहतां किंवा एकंदर राष्ट्राच्या मानानें पाहतां खरी आहे. मनुष्य सुखावला आणि जागच्या जागीं बसला कीं त्यास आकाबाईनें घेरलेंच म्हणून समजावें. यास उत्कृष्ट उदाहरण आमच्या राजेरजवाड्यांचेंच घ्या, दुसरें नको. महादजी शिंदा मुळीं लेकवळा, त्यांतून पानपताच्या पूर्णाहुतींत एक पाय गमावल्यानें लंगडशाई पदरीं आलेली, सारे भाऊ गनिमांनीं खाऊन टाकल्यामुळें ' नास्ति बंधुसमं बलम् ' यापैकीं कांहीं अनुकूल नाहीं, याप्रमाणें सर्व तयारी असतां ' क्रियासिद्धि : सत्त्वे भवति

* वरील खंदकाचा घेर सात मैल होता असें आम्हीं एके ठिकाणीं वाचलें आहे. त्याच्यासंबंधानें मेकॉलेनें असें लिहिलें आहे :—

" Another leader, at the head of his innumerable cavalry, descended year after year on the rice-field of Bengal. Even the European factors trembled for their magazines. Less than a hundred years ago, it was thought necessary to fortify Calcutta against the horsemen of Berar; and the name of the Mahratta ditch still preserves the memory of the danger. "

Lord Clive.

महतां नोपकरणे ' ‡ यां कविवचनाप्रमाणें त्यानें पुढें केवढा आटोकाट विभु रचला ! दासीपुत्र असतां गादीचा मालक होऊन तिची इभ्रत त्यानें अतोनात वाढविली, मुसलमानांनीं पानपतानंतर उत्तर प्रांतांत पुंडावा मांडला होता तो मोडून टाकून खुद्द दिल्लीपतीला आपल्या ताब्यांत घेतलें, येवढे शूर रजपूत पण त्यांशीं सतत झगडून त्यांवर आपला शह बसविला, पुण्याच्या दरबारीं आपलें वजन वाढवून शेवटीं तर नाना फडनवीसासारख्यालाही गुंडाळण्याचा त्यानें घाट घातला, फार तर काय पण इंग्रेजही त्याच्या पराकाष्ठेचे आर्जवानें असून त्यांच्या बंगाल प्रांतावरही त्यानें चौथ व सरदेशमुखी नेली होती, आणि युद्धकथेवरून असें ऐकण्यांत आलें कीं, पाटील बोवांचा इरादा खुद्द लंडनवर भगवा झेंडा रोंवण्याचा होता ! ! ही एका व्यक्तीची गोष्ट झाली. दुसरी होळकरशाहींतली व्यक्ति घ्या. ते तरी दासीपुत्रच, पायानें नाहीं तरी एका डोळ्यानें व्यंग, साऱ्या बंधूंची वरच्यासारखीच किंबहुना त्याहूनही वाईट गति झालेली आणि स्वतः उधळून ना घर, ना दार, ना दौलत, ना सखासोयरा अशा अत्यंत विपत्तींत रानोमाळ सुटलेले,- हा पूर्वरंग, पण उत्तररंगांतली काय मजा सांगावी ! प्रावृट्काळीं गिरीशिखरावर वृष्टि झाली असतां हजारों ओहोळांचा एक लोट बनून जसा जबरदस्त लोंढा कडेपठारावरून व डोंगरावरून उडया टाकीत खालीं येतो आणि चोहोंकडे दाणादाण करून सोडतो, त्याप्रमाणें पेंढार गोळा करीत करीत हळू हळू मोठा जमाव करून जेव्हां का स्वारी पुण्यावर येऊन आदळली तेव्हां पुण्यपत्तनश्री विकंपित झाली ! पुढें वानवडीच्या मैदानावर, शिंद्याच्या कंपूवर व चौदाशें तोफांवर जेव्हां यशवंतरावानें एकच गर्दी केली आणिं मारीन किंवा मरेन या कृतनिश्चयानें पाश्चात्य बृहद्यंत्रांच्या धूम्रकल्लोलांशीं जेजुरीच्या भंडाऱ्याची टक्कर दिली, तेव्हांची ती रणधुमाळी काय वर्णावी! येवढा दौलतराव शिंद्यांचा कट्टा सरंजाम, व जॉन पेरू, सवाई शिकंदर, जॉन बत्तीस वगैरे फराशीस सरदारांनीं केलेला तोफांचा भडिमार, पण पार धुव्वा उडवून दिला ! पुढें इंग्रेजांच्या हातें शिंद्याचा मोड झाला, आणि तो हतवीर्य होऊन बसल्या-

‡ " थोरांची कार्यसिद्धि जी होत असते ती त्यांच्या आंगच्या पराक्रमावरून होत असते; केवळ साधनांच्या साहित्यानें कांहीं होत नाहीं ! "

वर ही स्वारी कंबर बांधून उठली. शिद्याचें लष्कर मोठें खरें; पण तो स्वतः नामर्द असल्यामुळें त्याचा मोड वेलेस्ली साहेबानें तेव्हांच केला; पण यशवंतरावाची गोष्ट अगदीं निराळी. तो जातीनेंच शूर, व मराठी काव्यांत पुरा वाकबगार; तेव्हां जवळ विशेष साधन नसतांही त्यानें हुतुतूचा डाव पुरा शिताफीनें आरंभला कीं कर्नल मॉन्सन्ची फटफजिती उडून जनरल लेक सुद्धां जेरीस आला. परवां तात्या टोप्यानें वर्ष दोन वर्षें आमच्या सरकारच्या फलटणीस जसें खेळवलें व धनाजी जाधव मोगलांस जसा पुरून उरला होता, त्याप्रमाणेंच होळकरानें नर्मदा नदीपासून जो घोडा पिटला तों त्यास थेट सिंधु नदी दाखविली ! इंग्रेजांनीं त्याचा होईल तितका पाठपुरावा केला, पण असल्या पठ्ठ्यामागे कोठपर्यंत तोफांचा खटारा त्यांनीं ओढीत न्यावा, व त्याच्या गुलकावण्यापुढें यांच्या हडेलहपीचें काय चालणार! शिवाय हिंदुस्थानच्या शिवेपर्यंत पिटला, तरी गडचाचा दम आहे तो आहेच ! तेव्हां आमच्या शहाण्या सरकारनें सरतेशेवटीं हार घेऊन वरील स्वारीस पुनः आणून आपल्या गादीवर बसविलें व तंटा मिटविला ! याप्रमाणें एक ना दोन,-शेंकडों उदाहरणें गेल्या दोन शतकांतलीं आहेत. पण तींच आतां मौज पहा. आतां महाराज शिंदे यांनीं मोठें शतकृत्य केलें म्हणजे काय, तर कलकत्त्यास एकाद्या 'बॉलां'त कमांडर इन् चीफच्या वगैरे बायकोबरोबर नाचले; आणि महाराज होळकर यांनीं मोठी तलवार गाजवली म्हणजे काय तर एकादी गिरणी काढली ! मागल्या रानवट काळीं आमच्या संस्थानिकांस वरचेवर कामगिऱ्या पडत; व आज काय नबाबावर स्वारी नेमली, उद्यां पट्टणावर चढाई करून जावयाचें, परवां गिलच्याच्या पारपत्यास निघावयाचें, असे सरदारमंडळीस वरचेवर यजमानाकडून तगादे असत; पण आतांच्या धर्मराज्यांत वरील रानटीपणाचा धौशा कांहीं एक उतरला नाहीं. हिमालयापासून तों कन्याकुमारीपर्यंत अवघ्या भरतखंडास आमची श्वेतद्वीपस्थ माता खुशाल थापटून अंगाई करविते आहे, व गाढ झोप येण्याकरतां इंग्रेजी सुधारणेची थोडीशी अफूही तिनें चारल्यामुळें तें बिनधास्त आज कितीक काळपावेतों बिचारें घोरत पडलें आहे ! आमच्या संरक्षणाचा वगैरे सर्व कांहीं मक्ता आमच्या दयाळू राज्यकर्त्यांनीं आपणाकडे घेतल्यावर मग आम्हांला आतां कशाचें भय उरणार ? यापूर्वी आम्हांला मुसलमानांनीं ग्रासून टाकलें होतें, व आम्हीही मूर्खपणानें आपापसांत

भांडून एकमेकांस उपद्रव करीत असूं; पण प्रस्तुतच्या सुधारलेल्या राज्यांच्या विस्तीर्ण छायेखालीं आतां कोणत्याही तऱ्हेचा कोणाला त्रास म्हणून उरला नाहीं. उत्तरेकडचे ऋक्षमहाराज जरी आमच्यावर गुरगुरले, किंवा त्यांच्या सान्निध्यानें अमीर साहेबांनीं जरी कधीं मधीं उचल केली तरी आमचें दयाळू सरकार वरील गोष्टींचा बंदोबस्त परभारेंच करतें; आमच्या झोपेंत बिलकूल व्यत्यय आणीत नाहीं. परवां दिल्लीच्या दरबारीं आमच्या अलीजा बहादरांस आंग्लभौम बादशाहीची सरदारी दिली म्हणून परवांच्या दंग्याधोप्यांत त्यांस इंग्रेज सरकारनें कांहीं त्रास दिला कीं काय ? छे, तें त्यांचें शीलच नव्हे ! आमचें जुनें राजमंडळ जें एकदां आमच्या पाश्चात्य प्रभूंनीं पोटाशीं धरलें व तुमचें सर्व प्रकारें आम्ही रक्षण करूं म्हणून त्यांस एकदां जें त्यांनीं अभय दिलें, तें आतां ते विसरतील काय ? ज्यांच्या जिवाकरतां इंद्रप्रस्थ मुक्कामीं येवढा समारंभ करविला, व गोड गोड भाषणांनीं रिझवून व बडेबडे किताब देऊन ज्यांची सत्कारपूर्वक बोळवणी केली,त्या सोनुकल्यास का आयत्या वेळेस आयुबखानासारख्या राक्षसाच्या दाढेंत द्यावयाचें ?

तर आमच्या राजेरजवाड्यांची सध्यां मोठी विलक्षण स्थिति झाली आहे. इंग्रेज लोकांनीं सगळा कारभार आटपल्यामुळें त्यांनीं चारी ठाव जेवावें व मन मानेल तितका ऐषआराम करावा येवढेंच त्यांस हल्लीं काम उरलें आहे. मागें वारंवार परचक्राचें भय असे तेव्हां आतांसारखी चैन भोगण्यास फुरसतच नसे, नेहमीं घोडा व माला यांशीं काम ठेवावें लागत असे. आतां परचक्राची पिढ्यानपिढ्याही वार्ता नसल्यामुळें 'सुखं च मे शयनं च मे' येवढा काय तो प्रकार उरला आहे. इंग्रेजींत एक म्हण आहे कीं,रिकामें मन हें सैतानाचा कारखाना आहे; म्हणजे मनुष्य निरुद्योगी असलें कीं सैतानानें तेथें आपलें गबाळें ठेवलेंच म्हणून समजावें, मग तो तेथें काय काय विकार उत्पन्न करील याचा नेम नाहीं ! या म्हणीचें पूर्ण सार्थक्य हल्लीं आमच्या संस्थानिकांचे ठायीं सांपडेल. मद्यपान, व्यभिचार, अनन्वित आचार वगैरे सर्व कांही अनर्थ जिकडे तिकडे ऐकण्यांत येतात. उघडच आहे; 'हितोपदेशां'त एक श्लोक आहे:—

यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ॥

" तारुण्य, धनाची विपुलता राज्याधिकार आणि विवेकशून्यता,—या चौकडयापैकीं एकेक जरी पाहिलें तरी अनर्थावह होय. मग सारीं एके ठिकाणीं जुळल्यावर तर काय विचारायचें आहे ?"

आतां हें खरें आहे, कीं आमच्या दयाळू सरकारनें आमच्या देशांत इतर जशीं शेंकडों सोंगें उभीं केलीं आहेत, त्याप्रमाणेंच दरएक राजा-रजवाडयाच्या मागें विद्याभ्यासाचें एक शुक्लकाष्ट लावून दिलेलें आहे, मोठमोठया संस्थानिकांपासून तों छोटेखानी जहागीरदारापर्यंत एकेका ऑरिस्टॉटलाची योजना करून दिलेली आढळते. पण इतक्यांच्या हातून अद्यापि एकही शिकंदर निपजला नाहीं. कशाला निपजेल ? सर्वच गोष्टी अनुकूल ! अगोदर मुळीं लक्ष्मीचें व सरस्वतीचें कितीसें सूत आहे हें पहिल्यापासून प्रसिद्धच आहे. तेव्हां ' यस्मिन् द्वयं श्रीश्च सरस्वती च ' * हा योग आधुनिक काळीं म्हटला म्हणजे कपिलाषष्ठीचाच म्हणायाला कांहीं हरकत नाहीं. त्यांतून जेथें बापजन्मीं कधीं म्लेंच्छविद्येचा विटाळ झाला नाहीं तेथें तीस बळेंच घुसवून देण्याचा प्रयत्न करावयाचा म्हणजे काय ? वरील विद्या मुळीं तिकडील स्त्रियांप्रमाणें आवगुंठन केलेली; कोठें भरतखंड व कोठें श्वेतद्वीप ! तेव्हां तिची नुसती तोंडओळखही पक्की होण्यास एतद्देशीयांस केवढे प्रयास; ती स्वदेशीय विद्येप्रमाणें सुखप्रवेश तरी आहे? त्यांतून वाग्देवीच्या साऱ्या मुलखांतलीच चाल, कीं ती अभिसारिके-प्रमाणें आपण होऊन म्हणजे कोणाच्या गळ्यांत पडत असते असें नाहीं. त्यांतून ही तर पाश्चात्य विद्या; तिच्या अंगीं तद्देशीय रमणीप्रमाणेंच पहिल्या प्रतीचा कुर्रा ! शंभरदां पायां पडून घेईल तेव्हां अवगुंठनाचा

* कालिदासानें ' रघुवंशा'च्या सहाव्या सर्गांत एका राजाचें येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे:—

निसर्गभिन्नास्पदमेकसंश्रयं यस्मिन् द्वयं श्रीश्च सरस्वती च ॥

" ज्याचे ठायीं स्वभावतःच ज्यांचें वैयधिकरण्य अशा लक्ष्मीचें व सरस्वतीचें एकत्र वास्तव्य आढळतें ! "

प्रसिद्ध भूमितिकार यूक्लिड याचें एक सुभाषित सर्वप्रसिद्धच आहे. एका राजानें त्यास विचारलें कीं, आपली विद्या आम्हांस आपण विशेष

(पुढें चालू)

किंचित् निरास करून आपल्या वदनचंद्राची एकादी कला प्रगट करील ! तेव्हां हें अर्थात् सिद्ध झालें कीं, आमच्या राजबिंड्यास म्हटली म्हणजे वरील विद्येच्या संबंधानें सदोदित अमावास्याच बहुधा असणार. नाहीं म्हणायाला येवढें मात्र निष्पन्न व्हावयाचें कीं, यजमानास तर सरस्वतीचा लाभ जितक्यास तितकाच; पण टयूटर साहेबांनीं मात्र लक्ष्मीचा योग करून घ्यावा ! तर असल्या तुटपुंजीच्या विद्येनें आमच्या नेटिव संस्थानांचें काय कल्याण होणार? शिवाय ज्याच्या अंगावर राज्यकारभार टाकायचा त्याला इतिहास, भूगोल, व्याकरण, पदार्थविज्ञान हें सर्व भारूड शिकवून तरी काय करावयाचें आहे कोण जाणे ! वरील विषयांपेक्षां घोड्यावर बसणें, भाला मारणें, निशाण रोवणें, लष्करी कवाईत, वगैरे वगैरे गोष्टी शिकविल्या तर अधिक उपयोग नाहीं काय ? किंवा न्यायमनसुबा कसा करावा, जमाबंदीची व्यवस्था कशी ठेवावी, या गोष्टींची माहिती आमच्या होतकरू राजबिंड्यास जर करून दिली, तर ती त्यास फायद्याची होणार नाहीं काय ? पण हें कोण करतो ! छे छे, ती गोष्ट मनांत सुद्धां आणू नका. जें आमचें दयाळू सरकार आज कितीक वर्षें साऱ्या राष्ट्रास निःशस्त्र करून टाकून त्यास मीठही पुरतें खाऊं देत नाहीं, व ज्याची ऐतद्देशीय संस्थानिकांच्या चार शेंदाड शिपायांवर सुद्धां आज कितीक दिवस करडी नजर आहे, ते का त्यांस कवायतीचे भिकार चाळे करायाला शिकवणार? आमचा बचाव करण्याचा एकंदर मक्ता त्यानें घेऊन टाकला असतां आतां आम्हांला हडेल् हप आणि फाट् फुट् हीं हावी कशाला ? त्याचप्रमाणें आमच्या देशांतले मल्हारराव व तात्यासाहेब हे हायकोर्टांतल्या जज्जांप्रमाणें प्रजेस न्याय द्यावयाला लागले व वसूल बाकीच्या ताळेबंदांकडे लक्ष पुरवूं लागले, म्हणजे मग सात वर्षांपूर्वी वडोद्यास जी दंगल झाली, व विलायतच्या बारिस्टरांची बिदागी त्यांस पोंचली आणि अद्यापपावेतों सर. टी. महाराजांच्या हस्तें प्रजेस करटी मिळून श्वेत-कायांस जी वरचेवर खोबऱ्याची खैरात होते, ती चंगळ कशी चालावी!!

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

सुलभतेनें पढवाल कीं नाहीं ? त्यावर त्यानें उत्तर केलें, "There is no royal road to learning" (विद्याध्ययनास राजमार्ग नाहीं; म्हणजे लहानथोरांस एकच मार्ग !)

असो; तर एकंदरींत पाहतां आमच्या राजेरजवाड्यांची हल्लींची स्थिति ही अत्यंत शोचनीय होय हें उघड आहे. सामान्य रयत लोकांची स्थिति सुद्धां पुष्कळ अंशांनीं बरी; कां कीं त्यांस हवें तें करण्याची मुकत्यारी तरी असते, व स्वतःस सुधारण्याचे मार्ग तरी त्यांस खुले असतात. पण आमच्या संस्थानिकांस तें कांहीं आहे काय? जशीं कळसूत्री भावलीं असतात त्याप्रमाणें बडेसाहेब, दिवाणसाहेब, कारभारीसाहेब ज्याप्रमाणें वागवितील त्याप्रमाणें त्यांस वागणें प्राप्त! रयतेपैकीं एकादा मनुष्य उठला, आणि साऱ्या मुलुखावरून हिंडून यावयाचें असें जर त्यानें मनांत आणलें तर तें त्यास सहज हवें तेव्हां करतां येणार आहे. पण एकाद्या राजेसाहेबांनीं तें कधींकाळीं मनांत आणलें तर अगोदर सतरा परवाने पाहिजेत. सामान्य मनुष्यांस शहाणपणें येण्यासही शेंकडों रस्ते असतात. मध्यान्हाचा निर्वाह हेंच अगोदर त्यांस एक मोठें प्रेरक असतें, व जगाचे टोणपे हेही त्यास पुष्कळ शहाणे करीत असतात. पण आमच्या हतभाग्य गर्भश्रीमंतांस वरच्यापैकीं कांय अनुकूलता आहे बरें? कांहीं नाहीं: जसा एकदा लाडका पोपट सोन्याच्या पिंजऱ्यांत ठेवावा आणि त्यांस बसायाला काय, तर सोन्याची दांडी; पानपात्र काय, तर रत्नखचित पेला; खायला काय, तर मसकतचीं डाळिबें;—त्याप्रमाणेंच त्यांचा सारा प्रकार आहे. वरील श्रीमंती पोपटांत आणि खुशाल वनोपवनांतून हिंडणाऱ्या व आकाशपंथानें स्वच्छंद भराऱ्या मारणाऱ्या राघूमध्यें जितकें अंतर, तितकेंच राज्यरूप कारागृहांत वागणाऱ्या व ऐषआरामाच्या धुंदींत लोळणाऱ्या आमच्या नाटकी राजांत आणि एकाद्या सामान्य मनुष्यांत आहे.

याप्रमाणें आमच्या देशांतील राजेरजवाड्यांच्या हालहवालीच्या संबंधानें चार शब्द लिहिले. आतां एकंदर देशाच्या संबंधानें त्यांचीं काय कर्तव्यें आहेत, व त्यांच्या संबंधानें आमच्या सांप्रतच्या सरकाराचीं काय कर्तव्यें आहेत याविषयीं थोडेंसें निरूपण करून हे प्रकरण आटपतों.

४. प्रथमतः प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांनीं आमच्या जुन्या संस्थानिकांशीं कोणत्या रीतीचा संबंध ठेवला पाहिजे याविषयीं जर विचार केला तर ही गोष्ट कोणासही कबूल करणें भाग येईल, कीं हल्लीं चोहोंकडे जें प्रस्तुत प्रकरणीं सरकारचें वर्तन आहे तें त्यास पुष्कळ अंशीं बदललें पाहिजे. मागील अंकांत इंग्रेज लोक आम्हां प्रजेचें काय लागतात याविषयीं जें बरेंच निरूपण केलें आहे तेंच या ठिकाणींहि बहुतेक अंशीं उपयोगी पडण्यासारखें आहे.

कां कीं मार्गे सांगितल्याप्रमाणें १८७७ सालापासून आम्ही व जुने राजे-रजवाडे या दोहोंकडेही चक्रवर्तिनीच्या संबंधानें प्रजाधर्म आला आहे. तर सद्धर्मनिष्ठा, नीति आणि व्यवहार या तिहींसंबंधानें विचार करतां या राष्ट्राशीं मलेपणानें वागणें हें जसें आमच्या पाश्चात्य प्रभूंस उचित आहे, त्याप्रमाणेंच ज्या एतद्देशीय संस्थानिकांनीं त्यांस प्रथमतः आश्रय दिला त्यांशीं निदान न्यायानें तरी वागणें त्यांस जरूर आहे. ही गोष्ट आम्हांस कबूल आहे, कीं आमचे राजेरजवाडे हे मूर्ख, दुर्व्यसनी, अल्पदृष्टि वगैरे होते व अद्यापही आहेत; व असें असल्यामुळेंच आमच्या राज्यकर्त्यांचा व त्यांचा गेल्या शतकांत जो संबंध होता त्याच्या अगदीं उलट तो या शतकांत झाला आहे. सेव्यसेवकभावाचा येवढ्या थोड्या काळांत जो केवळ विपर्यय झाला तो सामान्य कारणांनीं नव्हे हें उघडच आहे. आमच्या पाश्चात्य बंधूंच्या अंगीं आम्हांहून शौर्यादि गुण विशेष, तेव्हां त्यांचा आम्हांवर पगडा होऊन आम्हीं डाव हरलों हें तर सर्वविश्रुतच आहे. तेव्हां आमच्या हतवीर्य होऊन बसलेल्या राजेरजवाड्यांच्या तर्फेनें बोलावयाचें म्हणून इतकेंच कीं, ते आज सार्वभौम सरकारचे सर्वथा अंकित होऊन गेलेले आहेत. पूर्वीच्या वैभवाची हळूं हळूं त्यांची आठवण सुद्धां बुजत चालली आहे. व आकाशांतील प्रभूनें जे धनी त्यांस पाठवून दिले आहेत त्यांच्या सेवेंत ते सर्व अत्यंत तत्पर आहेत. दिल्लीस या, आले; कलकत्त्यास चला, गेले; अमक्या अमक्या तऱ्हेनें वागा, वागले:-याप्रमाणें त्यांचें सारें सूत्र केसरीहिंदच्या प्रतिनिधि साहेबांच्या हातांत आलें आहे. मग इतक्या प्रतीची स्थिति येऊन पोंचल्यावर अजूनही आमच्या दयाळू सरकारचा त्यांच्यावर कटाक्ष कां असावा बरें ? राजे सर टी, राव बरवे, यांच्यासारख्या महादक्ष प्रधानजींनीं थोरल्या सरकाराची नोकरी येवढ्या शिताफीनें बजावण्याचें मनावर घेतलें असतां अद्यापही आमच्या देशांतील छोट्या सरकारांचा मलिका माअझमा महाराणीसाहेबास विश्वास येत नाहीं काय ? या हिंदुस्थानाचा कारभार यथास्थित चालण्यास आमच्या संस्थानिकांनीं आपल्या शिक्केकटयारीला रजा देऊन बडे शेट बनल्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं काय ? कोण जाणे बोवा ! भर्तृहरीनें सांगितलेंच आहे कीं, 'वेश्यांगनेव नृपनीतिरनेकरूपा:' मग या रूपांची मीमांसा आमच्या-सारख्यांनीं करून उपयोग काय ?

'तुका म्हणे उगें राहावें आणि जें जें होईल तें तें पहावें !!'

५. आतां सरते शेवटीं आमच्या जुन्या संस्थानिकांनीं हल्लींच्या स्थितींत काय करावें याविषयीं थोडेंसें लिहून हा अंक संपवितों. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, त्यांची स्थिति आतां पूर्वीपेक्षां फार निराळी झाली आहे, व दिवसेंदिवस होत चालली आहे.हल्लीं त्यांनीं फार तर आपल्या टापूंत काय थोडाबहुत कारभार करण्याजोगा असेल तेवढा करावा,आणि स्वस्थ बसावें; येवढेंच त्यांजकडे राहिलें आहे. बाकी एकंदर देशाच्या राज्याशीं त्यांचा संबंध म्हटला म्हणजे इतक्यापुरताच आहे, कीं कोठें एकादें दरबार झालें तर मुजरा करायला जावें, किंवा कायदेकौन्सिलांत खुर्चीवर बसून झोंप घ्यावी! तेव्हां आतां आमच्या राजमंडळानें मागला इतिहास सर्व विसरून जावा हेंच बरें; व आजपर्यंत त्यांस जी इतकी दगदग पडत असे तिजबद्दल त्यांचे दयाळू धनी त्यांस आज विश्रांति घ्यावयाला सांगताहेत, तर सरकारच्या वचनाला त्यांनीं मान द्यावा हें उचित आहे. सर्वांनींच हुतूतू घालून काय करायाचें आहे ? गेल्या शतकभर प्राच्य आर्यांचा डाव चालला होता; आतां पाश्चात्य मंडळी पुढें सरसावून आपली हौस पुरवते आहे,–ठीक आहे. तसेंच कां होईना ! तर या माजी पडलेल्या मंडळीनें आतां बसल्या बसल्या निराळ्या रीतीच्या उद्योगांत कालक्षेप करावा. हे निराळे उद्योग म्हटले म्हणजे आपल्या देशबंधूची स्थिति सुधारण्याचे उपाय अमलांत आणणें हें होय. देश जो भरभराटीस येतो तो केवळ मर्दुमकीवर व तरवारीच्या जोरावरच येतो असें नाहीं. ज्यास जागचें हलवत नाहीं असा मनुष्य सुद्धां देशाचें अपरिमित कल्याण करूं शकेल. पहा बरें, एवढा शिकंदर पादशाहा, कीं ज्यानें सारें भूमंडळ दणाणून दिलें, आणि एवढें भूमंडळ नाचायाला थोडें वाटून जो विषण्ण होत्साता रडला, पण त्याचें आतां काय राहिलें आहे ? त्याला मूठमाती कोठें दिली याचा सुद्धां आज पत्ता नाहीं. पण तीच त्याच्या गुरूची म्हणजे ॲरिस्टॉटल् याची गोष्ट घ्या. शिकंदर काय, पण सारें ग्रीक राष्ट्र आतां कीर्तिशेष होऊन त्याचा मागमूसही आतां उरला नसतां वरील पंडितश्रेष्ठाच्या ग्रंथांनीं आजपर्यंत मनुष्यजातीचें किती कल्याण केलें आहे ? येवढें रोमन लोकांचें अवाढव्य राज्य सारी पृथ्वी व्यापून राहिलेलें, पण पुढें रानटी लोकांनीं त्याची धूळधाण करून सोडली, व आतां त्या काळचें एक चिटपांखरूं देखील राहिलें नाहीं; पण त्या लोकांचे कायदे

व त्यांनीं संपादन केलेली विद्या अद्याप युरोपांत जागृत आहे व त्यांनीं बांधलेले रस्ते व नळ कायम आहेत. हीच गोष्ट आपल्या देशासही लागू आहे. राम गेले, युधिष्ठिर गेले, विक्रमादित्य अस्तंगत झाला आणि कायम मंडळी कोण ! तर वाल्मीकि, व्यास, कालिदास, पाणिनि, वाग्भट्ट, भास्कराचार्य, इत्यादि. तर शारीर प्रभाव व मानसिक प्रभाव या दोहोंत इतकें अंतर आहे; एक वैद्युत तेजाप्रमाणें क्षणभर डोळे दिपवणारा खरा, पण पुढल्या क्षणीं कांहीं नाहीं. पण तीच दिनमणीच्या तेजाची गोष्ट पहा ! स्वारीला ज्या दिवशीं आदितीनें जन्म दिला तेव्हांपासून आजपर्यंत किती भुवनांस तो आधारभूत होऊन राहिला आहे ! नाहीं तर विद्युल्लताबाई; आपल्या पित्याच्या अंकापासून च्युत होऊन काय घटकाभर कडकड चमचम करतील तेवढीच; पण अंमळशानें पाहावें तों मेघराजही नाहींत व त्यांची कन्याही नाहीं; दोघांचा बरोबरच लय ! पण दुसऱ्या दिव्य तेजाचें केवढें स्थैर्य व एकंदर जीवलोकास याचा केवढा आधार ! तेव्हां आमच्या नृपमंडळानें आजमित्तीला जरी आपलें वैभव गाजविण्याचें मनांत आणलें तरी तसें होण्यास मार्ग नाहींसा नाहीं. खबुतरांचीं लग्नें, मक्केची चादर, सेलर हौस, असल्या हौसा पुरवण्यापेक्षां आपल्या देशांतील प्राचीन नष्टप्राय विद्यांचें व कलांचें पुनरुज्जीवन करण्याचें श्रेय जर ते घेऊं पाहतील तर किती बरें होणार आहे ? त्याप्रमाणेंच दुर्व्यसनांत आपली व आपल्या राज्याची खराबी करण्याचें टाकून जर देशाटनांत ते पैशाचा व्यय करूं लागले, व ज्या राष्ट्रानें या देशास हां हां म्हणतां ग्रासून टाकलें, त्यांचें ऐश्वर्य व सामर्थ्य लक्षांत आणण्याचा जर त्यांनीं यत्न केला तर केवढी फायद्याची गोष्ट होईल बरें ? मागील राजेरजवाड्यांस हिंदुस्थान येवढेंच काय तें जग होतें, व कोणी बाहेर जावयाचा हिय्या केलाच असता तर पुष्कळ अडचणी होत्या; पण आतां केवढी मौज झाली आहे ? अफाट दर्या व प्रचंड पर्वत यांनीं सुद्धां मानवी बुद्धीपुढें हात टेकले आहेत. तेव्हां राजाराम महाराज वगैरे कांहीं जणांनीं जो कित्ता घालून दिला तो वळविला असतां आमच्या संस्थानिकांचें व त्यांच्या द्वारें लोकांचें पुष्कळ हित होणार आहे. त्याप्रमाणेंच युरोपियन व्यापाऱ्यांपुढें टिकाव न निघून एतद्देशीय लोकांचा व्यापार जो बसला आहे, व शेंकडों कला नष्ट होऊन

किंवा निदान नाहींशा होण्याच्या बेतांत येऊन ज्या बसल्या आहेत, त्यांसही हात देण्याचें वरील मंडळीनें मनावर घेतलें असतां सहज होणार आहे. आमच्या देशांत हल्लीं अशी कांहीं चमत्कारिक स्थिति आढळते कीं सारी फुटाफूट आहे. 'दांत आहेत तों चणे नाहींत, आणि चणे आहेत तों दांत नाहींत' असा कांहीं विलक्षण प्रकार आहे. ज्यांच्यापाशीं पैसा मुबलक आहे त्यांस ज्ञानाचा संस्कार म्हटला म्हणजे बेताबेताचा, व देशहित हे तर स्वप्नींहि माहीत नाहीं. त्यांनीं संपत्तीचें ऐश्वर्य भोगावयाचें म्हटलें म्हणजे चार घोड्यांच्या गाड्यांतून मिरवावें, युरोपियन कोचमिल ठेवावा, आपल्या प्रभूस बडा खाना द्यावा, लाखों रुपये हातचे दवडून एकादा दोन तीन अक्षरांचा किताब आपल्या नांवापुढें लटकवून द्यावा, इत्यादि बालिशत्वाचे प्रकार करावे; पण लाखों लोक पटापट प्राण टाकताहेत, तर बेटयांनीं एका छदामानेंही खराब होऊं नये. ही एका बाजूची हालहवाल झाली. दुसरीकडे वळावें, तों आम्ही यंव करूं, आम्ही त्यव करूं, पार्लमेंट सभा काढूं, म्यांचेस्टरास हालवून सोडूं, कलाकौशल्य उर्जित दशेस आणूं, देशभाषांतून ग्रंथांची रगाडी करून देऊं, इत्यादि प्रलाप मात्र ऐकावे; पण हातून व्हावयाचें आहे काय ? मारे अध्यक्ष नेमले, उपाध्यक्ष नेमले, व्यवस्थापक मंडळी बनली, चिटणीस लेखणी कानावर ठेवून पुढें सरसावले, खजिनदार तयार झाले, –सगळें झालें, पण खखिन्याची वाट काय ? 'बाजारांत तुरी' या म्हणीसारखीच अवस्था ! सारी पाकशाळेंतील मंडळी सिद्ध झाली, व मोठे वल्लवाधिपति पुढें येऊन उभे राहिले; पण काय ! 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' ! तर आमच्या राजेरजवाड्यांपाशीं आज जी धनसमृद्धि आहे तिचा वेळेवर जर ते सदुपयोग करतील तर देशाचें अतिशयित कल्याण होऊन त्याच्या योगानें त्यांस मोठें भूषण प्राप्त होणारें आहें. नाहीं तर लक्ष्मी स्वभावतः चंचळ आहेच, ती कोठें म्हणजे स्थिर राहिली आहे असें नाहींच; तेव्हां तिच्या प्रवाहांत समयीं जर हात धुऊन न घेतले तर मग खुशाल तेच चोळीत बसावें !

विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः । *

' नीतिशतक '

अंक ८१--(१) प्रकृत अंकाचा विषय. (२) विषयोपक्षेप. (३) आमच्या राष्ट्राची कोणते राष्ट्राबरोबर तुलना करावी ? (४) आमच्या व इंग्रेजी राष्ट्राची तफावत.

१. येथवर प्रस्तुत विषयाच्या दोन सदरांचा विचार झाला. आतां तिसरें सदर सामान्य लोकांची स्थिति हें होय. तर यावर आमच्या समजुती आजपर्यंत काय झाल्या आहेंत त्या आतां वाचकांस सादर करतों.

२. सामान्य लोकांच्या स्थितीविषयीं ऊहापोह करायचा म्हटलें म्हणजे त्यांत पुढील गोष्टी येतात. प्रथमतः चांगल्या स्थितींतलें एकादें राष्ट्र घ्यावें आणि त्याशीं आपली तुलना करून आपली अवस्था कोणत्या प्रकारची आहे हें पाहावें. ती पाहिली म्हणजे मग तिची उपपत्ति करण्याचा यत्न करावा. आणि हें उपपादन झालें म्हणजे मग आपली स्थिति सुधारण्यास उपाय कोणते याविषयीं विवेचन करावें तर हा अनुक्रम धरून आतां पहिल्या कलमाला लागूं.

३. आमच्या राष्ट्राचें प्रत्यंतर पाहावयास कोणत्या राष्ट्राच्या स्थितीचें अवलोकन करावयास पाहिजे याविषयीं मोठी पंचाईत करायला नको हें कोणाच्याही लक्षांत येऊन चुकणार आहे. ज्या आरशांत आमचें रूप दृष्टिगोचर करून घ्यावयाचें तो अगदीं जवळच आहे. त्याची व आमची परमेश्वरानें सांगडच घालून दिली आहे. अत्यंत परिपक्व दशेस येऊन पोंचलेल्या राष्ट्राचें उदाहरण इंग्रेजांहून आपणांस दुसरें कोणतें आढळणार ? व हें जवळचें असून दुसरें आपणांस पाहिजे तरी कशाला ? तर हल्लीं आमच्या लोकांची स्थिति जशी असावी तशी आहे कीं नाहीं या गोष्टीची प्रचीति पाहण्यास ' हातच्या कांकणाला आरसा कशाला ? ' या म्हणींतल्यासारखीच आमची स्थिति आहे. यास्तव याच दोन राष्ट्रांची स्थिति ताडून पाहूं म्हणजे झालें.

---

* " जे एकदां विवेकभ्रष्ट झाले त्यांची शेंकडों प्रकारांनीं हानि होत जाते ! "

४. कोणत्याही मनुष्याच्या स्थितीविषयीं विचार करायाचा झाला म्हणजे प्रथमची गोष्ट त्याला खायाला प्यायाला आहे कीं नाहीं व त्यापाशीं पैसा आहे कीं नाहीं हिजविषयीं विचार करायाचा. हीच गोष्ट एकंदर राष्ट्रासही लागू. या जगांत अन्नोदक हें प्राणधारणास अवश्यच असल्यामुळें सुखी राष्ट्राचें पहिलें लक्षण म्हटलें म्हणजे सर्वांचा यथास्थितपणें निर्वाह चालणें हें होय.ज्याप्रमाणें सुखवस्तु कुटुंब म्हणजे कोणतें,तर ज्यांत कोणाला अन्नवस्त्राची ददात नाहीं तें; त्याप्रमाणें लक्षावधि, कोटयावधि कुटुंबांचा समुच्चय जें राष्ट्र त्याची तरी चांगली स्थिति केव्हां समजायची, तर जेव्हां कोणाही उद्योगी व प्रामाणिक मनुष्याला उदरनिर्वाहाची पंचाईत पडूं नये तेव्हां. * पण असें नसून जर 'घरांत वाजे नकारघंटा' ही एकाद्या राष्ट्राची स्थिति असली तर मग तेथें कलाकौशल्याचा, विद्येचा, राजवैभवाचा वगैरे केवढाही थाटमाट दृष्टीस पडला तरी तें राष्ट्र भिकारच समजलें पाहिजे; व अशा राष्ट्राचा राजा यास प्रजापालक हें नांवही शोभत नाहीं. त्याचें नृपतित्व म्हटलें म्हणजे धनगर जसा आपल्या प्रजेस कोणाचा उपद्रव लागूं नये म्हणून व निवाऱ्या-करतां मेंढवाडयांत कोंडून ठेवतो; पण तें सर्व कशाकरितां ? तर लोकर वाढली कीं कातरावी व गिऱ्हाईक आलें कीं 'अजामुत्रं बलि दद्यात्' या वचनास अनुसरावें म्हणून ! तर अशा प्रकारची ज्या राज्यांतली स्थिति असेल तेथल्या लोकांस किती सुख लागणार आहे हें कोणासही सांगायास

* फ्रान्सचा राजा चवथा हेन्री यानें थोडींच वर्षें पण फार उत्तम रीतीनें राज्य केलें. आपल्या प्रजेविषयीं त्याची इतकी कळकळ होती कीं प्रत्येक कुणब्याच्या थाळयांत दररोज कोंबडें पडेल अशा रीतीनें राज्याची व्यवस्था मी ठेवीन अशी त्यानें उमेद बाळगली होती. नाहीं तर आमच्या परवांच्या राजमूर्ति ! यमपुरीचा रस्ता धडकं दररोज वाहतो आहे, आणि टेंपल् साहेबांच्या व लिटन् साहेबांच्या इंग्लिस्तानच्या वजिरास तारा धूम चालल्या आहेत कीं, इकडे चोहोंकडे आबादानी आहे ! पुढील सुभाषितांत थोडा फरक केला असतां तें टेंपल् साहेबांच्या मुंबापुरींतल्या पुतळयाच्या चहुऱ्यावर किती उत्तम शोभेल बरें ?—

वैद्यराज नमस्तुभ्यं यमराजसहोदर ।
त्वयि विन्यस्तभारोऽयं कृतांतः सुखमेधते ॥

नकोच: तेव्हां निर्वाहाच्या साधनांच्या संबंधानें विचार केला तर इंग्रेज लोकांच्या व हिंदु लोकांच्या स्थितींत केवढें अंतर आढळेल बरें ? ज्या इंग्रेज लोकांचें पृथ्वीच्या चारी खंडांत राज्य आहे, ज्यांनीं सारें भूमंडळ आपल्या वाणिज्यानें ग्रासून टाकलें आहे, व ज्यांच्या देशांत हजारों टोलेजंग कारखाने आहेत ते कोणीकडे ; आणि ज्या हिंदु लोकांचीं मोटमोठीं संस्थानें म्हणजे परकी लोकांच्या सर्वथा अंकित, त्यांतूनही त्यांत पहिल्या प्रतीची अव्यवस्था, ज्यांचा व्यापार (कीं ज्याच्या योगानें व्हेनेशियन लोक, फिरंगी, वलंदाजी, हे एकेक पूर्वीं गब्बर होऊन गेले, व ज्यामुळें या देशाची 'सुवर्णद्वीपकल्प' अशी आख्या पडली होती) आतां इतका मेटाकुटीला आला आहे कीं, चूल पेटवायाच्या काडीपासून सुद्धां त्यांस परकी लोकांच्या तोंडाकडे बघणें जरूर आणि ज्यांचें दयाळू सरकार तर त्यांवर इतकी मेहेरबानी करतें कीं, खबरदार कोणी आमच्या झाडाचें पान तोडाल तर किंवा जमिनींतून मीठ काढाल तर ! --तीं विचारी दुबळी एतद्देशीय प्रजा कोणीकडे ? हल्लीं आमच्या लोकांत त्राण म्हटलें म्हणजे सात रुपयांवारी हडेलहप्पी करावी व अफगाणिस्थानांत थंडींनें कुडकुडून मरावें, पांच रुपयांवारी कुग्रामांत राहून गुराख्याचा धंदा करावा (आणि खबरदार पांचाचे साहा केलेत तर; पांच रुपये पंचप्राणास हें त्रैराशिक का गैर आहे?) किंवा खांद्यावर आसूड टाकून बैलांच्या पाठीवर राहावें, आणि या आर्यभूमीचें विलेखन करून मेघराजानें जर कृपा केली तर प्रथमतः सरकारची पोतडी भरावी, राहिल्यासाहिल्यांत सावकारास फूल नाहीं फुलाची पाकळी वाहावी, आणि मग आपण खुशाल शानदार रागदारींत 'देवी श्रीविक्टुरिया सार्वभौमिणी' हीस कुडींत प्राण आहे तोंवर अत्यंत निष्ठापूर्वक आळवीत बसावें ! तेव्हां एकंदरींत पाहतां सुगींत व दुष्काळांत जें अंतर, अगर जेवणांत व भुकेंत जी तफावत, ती हल्लीं आमच्या राज्यकर्त्यांत व आमच्या राष्ट्रांत आहे !

५. आमच्या भाषेंत म्हण आहे कीं, 'अन्नमय प्राण व प्राणमय पराक्रम.' या म्हणीपैकीं वरील कलमांत एका अवयवाचा विचार झाला; अथवा त्यांतच दोहोंचेंहि विवेचन झालें असें म्हणायास हरकत नाहीं; कां कीं, पुढील प्रकार पहिल्यावरच सर्वथा अवलंबून राहणारा आहे. प्राणाला आधारभूत जें अन्न तेंच जर नाहीं, तर त्यावर ज्या पराक्रमाची इमारत

त्याच्या उद्भवाची वार्ता कशाला हावी? त्याप्रमाणेंच पराक्रमापासून निष्पन्न होणारी जी संपत्ति तिची कथा वरील मूलच्छेदन झाल्यानेंच आटपली म्हणून समजावें. ज्या बिचाऱ्याला निरंतर उदरनिर्वाहाची पंचाईत त्याच्या अंगीं हिंमत ती काय असणार ! त्यास केवळ उदरंभरित होऊन ज्याच्या त्याच्या पायीं तुकडा खात लोळणें जरूर हें उघडच आहे. आज साठ सत्तर वर्षें या देशांत सारखी स्वस्थता नांदल्यानें व परकी लोकांचा जारी अंमल इतका काळपावेतों सारखा चालल्यानें आमच्या लोकांची किती शोचनीय स्थिति होऊन गेली आहे बरें ! इंग्लिश इतिहासकार हिंदुस्थानांतील शांततेचा मोठा महिमा गात असतात, पण ही शांतता. त्यांच्या राष्ट्रास कितीही हितावह झाली असली तरी आम्हांस ती अत्यंत अनिष्टप्रद झाली आहे यांत संशय नाहीं. *मोठ्या भरभराटींत असणाऱ्या स्वतंत्र राष्ट्रांसही चिरकालिक

* आमच्या देशास इंग्रेज लोकांनीं केवळ हतवीर्य करून टाकून जी दुबळाई आणली आहे तीस स्वस्थता हें नांव देऊन तिचा महिमा ते कसा गातात तो पाहा:—"श्रीरंगपट्टणच्या बाहेर एक मोठी थोरली निरुपयोगी मोडलेली तोफ पडली आहे. मोठमोठाल्या तोफांच्या गोळ्यांच्या राशी पडल्या आहेत. त्यांवर उगवलेल्या वेलांचीं हिरवींचार पानें व त्या गोळ्यांचा तांबडा लाल जंग दोन्हीं एकत्र पाहिलीं असतां मोठी मौज दिसते. पुढें कधीं तोफेचा आवाज ऐकूं येणार नाहीं अशा वेळाचें एक मंगलदायक चिन्ह आहे ! ! !" (आमेन !)

(मॉरिसकृत हिंदुस्थानचा इतिहास)

दुसरा धन्यवाद एतद्देशीय ग्रंथकारांच्या मुखें ऐका:—

"अशी पेंढाऱ्यांची समाप्ति झाली. जे शेंकडों मनुष्यांस अनिवार्च्य पीडा देणारे त्यांच्या नाशार्थ इंग्लिश सरकारानें इतका मोठा श्रम केला हें त्या सरकारास मोठें भूषण होय. राज्याकरितां युद्धें करण्याची चाल सर्वत्र आहे, आणि हिंदुस्थानांतील राजांनीं आपण स्वत: फौजेच्या हातून प्रजा लुटल्याच्या आणि लुटारू बाळगल्याच्या कथा वर आल्या आहेत; परंतु लुटारू आणि हत्या करणारे ह्यांपासून प्रजेस सोडविण्याकरितां इतकें द्रव्य खर्चून श्रमानें युद्ध केल्याचें उदाहरण हें पहिलेंच आहे !"

(जांभेकरकृत हिं. इ.)

स्वस्थता अपायकारक होते; मग ज्या दयाळू सरकाराची कदर इमल्याच्या खालच्या जमिनीपर्यंत, झाडावरच्या पानांपर्यंत, व जेवणांतल्या मिठापर्यंत, त्याच्या मगरमिठींत सांपडलेल्या बिचाऱ्या राष्ट्राची स्थिति तर काय सांगावी? हल्लींच्या काळचा मनुष्य आणि पन्नास वर्षांमागचा मनुष्य यांची जर परस्पर तुलना केली, तर त्यांत केवढें अंतर दिसून येतें ! सध्यांचे जवान असले पठ्ठे आढळतात कीं त्यांस कोस दोन कोस मजल करावयाची असली तरी सहसा गाडीवांचून व्हावयाचें नाहीं; तेच त्यांचे आजोबा वेळ पडल्यास तीस कोसांच्या मजलीलाही भीत नसत. हल्लींच्या तरुण विद्वानांस बचकभर भात असला कीं बस होतो, व शरीराचे असे मजबूत कीं युनिवर्सिटीच्या झग्या-सकट वेळेनुसार अल्लाद उडून जावयाचे; तीच बाजीरावसाहेबांची सव्वा शेराची व मक्याच्या कणसांची आख्या सर्वविश्रुतच आहे; व त्या वेळच्या शरीरसामर्थ्याचे मासले अद्यापही दृष्टीस पडत नाहींतसें नाहीं. मागलां आयुर्दाय असा कीं सवाई माधवरावाच्या बरोबर जनन झाल्याची निशाणी गजनीची कुंची घातलेले एक भटजी येथें नुकते निवर्तले,* व 'शतायुवै पुरुषः' या श्रुतीची भरपाई तिच्या जनकापासून चोपून घेणारी, व एखादें दुसरें अधिकच पण कमी नाहीं, अशी मंडळी शेंकडों असे. पण आतां काय विचारतां ? विशी म्हणजे ऐन उमेद (संसाराचा स्पर्शकाल!) तिशी म्हणजे मध्यम काल, व चाळिशी म्हणजे मोक्षकाल ! मग काय, कोणी गटारांत बाटलाबाईच्या मिठीसकट जे कलंडले ते त्याच अप्सरेसकट इंद्रभुवनाच्या वाटेला लागले; कोणी युनिवर्सिटीच्या पदव्या व पदकें यांचा हव्यास धरून व खडतर अभ्यास करून खासे विलायती वकील बनले, पण ती सनद जेव्हां लोकांतरींच्या कोर्टावर रुजू करून घ्यावी तेव्हां उपयोगी;

---

* येथें शनवारांत एक भटजी अठ्ठ्याण्णव वर्षांचे होऊन वारले. त्यांचा जन्म सवाई माधवराव ज्या दिवशीं पुरंदरावर जन्मले त्या दिवशीं झाला होता. वरील पेशव्यांचा जन्म म्हणजे कोण आणीबाणीचा प्रसंग होता हें इतिहासज्ञास किंबहुना इकडील सामान्य जनांसही विदित आहेच; तेव्हां त्या दिवशीं जेवढीं मुलें जनन पावलीं तेवढ्यांस सरकारांतून गजनीच्या कुंच्या वाटल्या गेल्या ! वरील मनुष्यानें महाराष्ट्र देशांचीं किती स्थित्यंतरें पाहिलीं म्हणायाचीं ! !

त्याप्रमाणेंच कोणीं साहेबाराधनेच्या कामीं असे कांहीं कष्ट केले कीं शेवटीं त्यांच्या पांढऱ्या पायांपाशींच त्यांनीं राम म्हटला (अथवा छे छे ! राम नव्हे; परमेश्वर ऊर्फ अल्ला)! याप्रमाणेंच पुरुषांच्या अंगीं अवश्य अपेक्षित असे जे शौर्यादि गुण त्यांचाही आलीकडे किती लोप होऊन गेला आहे हें सांगायास नकोच मागें सामान्य मनुष्याच्या अंगींही इतकी धमक होती कीं येवढा राघोबा दादा, पण त्यास रामशास्त्री यांनीं देहान्त प्रायश्चित्ताचा खडखडीत जबाब तोंडावर दिला. नाहीं तर आतांचे एकेक वीर महावीर ! साहेब बहादूर म्हणतात ना अमुक अमुक गोष्ट करावी म्हणून; ठीक आहे, आम्ही कांहीं साहेबांच्या बाहेर नाहीं ! आजपर्यंत ज्यांनीं आम्हांला भाकरी चारली, व ज्यांच्या कृपेनें आम्ही या अधिकारावर आलों आहों, त्यांच्यांशीं का निमकहरामी करायाची ! छे छे. असला मात्रागमनीपणा आम्हीं केला तर तो कोठें फेडूं ! आतां लोकांचे आम्ही मुकत्यार म्हणवतों खरें, व आमच्या बेकुबीनें व लांगूलचालनानें एकंदर रयतेचें नुकसान होतें हेंही खरें; पण या गोष्टींचा विचार करण्याची आम्हांला काय जरूर आहे ? साहेब आमचे मायबाप, त्यांची आज्ञा आम्हांला शिरसावंद्य आहे, येवढी गोष्ट आम्हांला समजते ! असो, तर हा जो पोंचटपणा व दुबळेपणा आलीकडे आम्हांस इतका खिळून राहिला आहे तो कशामुळें बरें ? तर ह्यास वरील दीर्घकालिक स्वस्थता व सरकारची कदर हींच दोन कारणें होत यांत संशय नाहीं.

आतां वरील गोष्टींत इंग्रेज लोकांची व आमची तुलना करायाची म्हटलें म्हणजे जमीन व अस्मान किंवा रात्र आणि दिवस यांची तुलना करूं पाहण्यासारखेंच होय हें उघड आहे आकाशपंथानें यदृच्छेनें गमन करणाऱ्या पक्ष्यांत व दोन्ही पांख उपटून लोळागोळा करून टाकलेल्या पांखरांत जें अंतर तेंच इंग्लंडच्या लोकांत व आम्हांत आहे. इंग्रेज लोक आपणांस आज सार्वभौम म्हणवीत आहेत; व आमची स्थिति पाहिली तर 'इसापनीतीं' तील खुळ्या मांजराप्रमाणें झाली आहे. त्यांनीं आपल्या खव्याची पंचाईत जशी वानराकडे नेमिली, आणि त्या लबाडानें सारा तंटा गमतीनें मिटवून सारें भांडें पालथें घातलें, आणि सांगितलें कीं मीं तुमच्या तंटयाचें कारणच नाहींसे करून टाकलें, आतां खव्याबद्दल चुरमुरे

खात मुकाटयानें चालते व्हा म्हणजे झालें; त्याप्रमाणेंच आम्ही आपल्या भांडणांत परद्वीपस्थ लोकांस घालून 'धन्याला धत्तुरा आणि चाकराला मलिदा' अशी आपली स्थिति करून घेतली.* आतां येवढें बरें आहे कीं आमचे राज्यकर्ते मागल्या इमामदांडग्यांसारखे रानवट नाहींत, व सद्धर्माचा प्रकाश त्यांच्या अंत:करणांत फांकला असल्यामुळें ते आम्हांवर नीतीनें † व

* वरील उल्लेख आमच्या वाचकांपैकीं कोणास कदाचित् मोठा भयंकर वाटेल अशी कोणास भ्रांति पडल्यास त्यानें **मेकॉले** साहेबांचे पुढील प्रेमोद्गार वाचावे--

"Dupleix was perfectly aware that the most easy and convenient way in which a European adventurer could exercise sovereignty in India, was to govern the motions and to speak through the mouth of some glittering puppet dignified by the title of Nabob or Nizam. The arts both of war and policy, which a few years later were employed with such signal success by the English, were first understood and practised by this ingenious and aspiring Frenchman."

"Those names once so an august and formidable, still remain. There is still a Nabob of the Carnatic who lives on a pension allowed to him by the English out of the revenues of the province which his ancestors ruled. There is still a Nizam, whose capital is overawed by a British cantonment, and to whom a British resident gives, under the name of advice, commands which are not to be disputed There is still a Mogul, who is permitted to play at holding courts and receiving petitions, but who has less power to help or hurt than the youngest civil servant of the Company."

Lord Clive.

† नीतिमत्ता हा इंग्रेजी राज्याचा जणूं काय अंगभूतच गुण हा सिद्धांत पुष्कळांनीं गृहीत धरल्यासारखा दिसतो. मेकॉले साहेबांची पुढील घमंडी पहा:--

(पुढें चालू)

दयेनें राज्य करीत आहेत; शिवाय आमचें सर्वस्व हस्तगत करून घेण्यांत त्यांचा स्तुत्य उद्देश येवढाच आहे, कीं आम्ही जाणते होऊन आपली मालमत्ता वहिवाटण्याजोगे शहाणे व्हावें, म्हणजे त्यांची ईश्वरदत्त पालकता आटपली ! हा अमृतसिद्धियोग केव्हां यावयाचा असेल तो असो; पण हल्लीं तर आमची स्थिति फार शोचनीय झाली आहे. आम्ही आमच्या राज्यकर्त्यांच्या कच्छपीं लागून त्यांच्या उसन्या वैभवानें आपणास गौरवूं पाहत आहों, व ' आमचा हिंदुस्थानचा खजिना,' 'आमचें अफगाणिस्थानांत गेलेलें लष्कर', वगैरे प्रयोग बेधडक करतों. पण वस्तुतः आमचें तें काय आतां उरलें आहे ? आम्ही स्वतः तरी आपले आपण आहों काय ? उद्यां जर रशियाची स्वारी हिंदुस्थानावर झाली, आणि पिन्हस् राजानें टारेंटाईन लोकांवर किंवा नेपोलियननें फ्रेंच लोकांवर जशी सक्ती केली तशी या राष्ट्रावर जर इंग्रेजांनीं केली आणि हडेल् हप् करायाला लावून लाख दोन लाख नवी फौज बनवली, तर आम्हांला झक मारीत घरांतून निघायाला नको काय? सरकारनें सांगायाला दुष्काळनिवारणार्थ आणि खरोखरी पाहतां गिलच्यांच्या मुलखांतील गृध्रपंक्तीच्या तर्पणार्थ जी येथें उदीमपट्टी सुरू केली ती लोकांच्या खिशांतले पैसे बेलाशक उपटण्याखेरीज दुसरें काय आहे? वरील कर म्हणजे उद्योगोपणावर कर व आळशीपणाला बक्षीस असा नव्हे काय ? पिऱ्या चांभार जोडे चांगले शिवतो, अमुक अमुक न्हावी चांगली हजामत करितो, कीं सरकार धांवले त्याच्याकडे; टाक जास्ती पट्टी, नाहीं तर तुझी अरी व धोपटी ठेवूं अडकवून ! अमक्या अमक्यानें जास्त मेहनत करून आपला उदीम चांगल्या रंगरूपास आणला कीं बसलाच जास्त बोजा त्याच्या पाठीवर ! एकूण या करापासून मुक्त कोण, तर जो चोहोंचा आंकडा ठोकून खुशाल घरीं बसेल तो, किंवा ब्रह्मदेवानें ज्याच्या कपाळावर

(मागील पानावरून पुढें चालू)

" The only protection which the conquered could find was in the moderation, the clemency, the enlarged policy of the conquerors. That protection, at a later peroid, they found. But at first English power came among them unaccompanied by English morality."

Warren Hastings.

'ढ 'हा राजमान्य शिक्का मारला असेल तो ! या अनर्थापेक्षां गायकवाडी खिचडी, शिंद्याचें लक्षभोजन, किंवा भटांची रमण्यांतली दक्षिणा हीं हजार वाटचांनीं बरीं नव्हेत काय ? पण ते सर्व रानटी प्रकार व ही सुधारलेली प्रतिष्ठित पश्यतोहरता ! तर स्वातंत्र्य, पराक्रम, अभिमान वगैरे गोष्टींत इंग्लंडांतील प्रजेची व येथील प्रजेची तुलना कशाला हावी? नांवाला जरी दोन्ही राष्ट्रांतील मनुष्यसंख्या मलिका माअझमा विक्टोरिया साहेबांची अंकित आहे, तरी तिकडचा प्रकार वस्तुतः पाहतां येथच्या अगदीं उलट आहे. तिकडे मलिकामा अझमा बाईसाहेबांचा मानमरातब जरी सारे लोक यथास्थितपणें ठेवतात, तरी त्याचा जितका भाग त्यांस स्वतःच्या गुणावरून मिळतो तितका त्यांच्या अधिकारावरून मिळत नाहीं. त्यांच्याच जागीं जर * मेरी-सारखी एकादी कृत्या असती, तर याच प्रजेनें तिची अवज्ञा तरी केली असती किंवा तिला गादीवरून तरी काढलें असतें. बाकी इंग्लंडचा राज्याधिकार तेथील लोकांनीं आणतां आणतां इतका संपुष्टांत आणून ठेवला आहे कीं जसे देव देव्हाऱ्यांत असतात व त्यांनीं पंचोपचारपूजा घ्यावी आणि मुकाटचानें असावें, त्यासारखीच तेथील राजपदाची स्थिति आहे. लढाई किंवा तह करणें, कायदा कानू चालू करणें, कर बसवणें वगैरे सर्व गोष्टी मुख्यतः लोकांच्याच हातांत आहेत.महाराणीसाहेबांनीं तयार झालेल्या कायद्यावर आपली राजकीय मुद्रा ठोकावी,व सालीना सहकुटुंब संहपरिवार अमुक अमुक पेन्शन घेत जावें, इतकीच व्यवस्था आहे. पण तोच प्रकार इकडे काय आहे तो पहा ! तिकडे लोकांचा काय तो अधिकार, राजाचा सरासरी कांहीं नाही; इकडे लोक म्हणजे गुरांढोरांसमान व सरकार म्हणजे काय तें परब्रह्म ! बाकी इकडे तरी सोंगें सारीं आहेत, नाहींतशीं नाहीं.

---

* मेरी ही एलिजाबेथ राणीची बहीण. दोघींचा धर्म अनुकमें करून क्याथलिक व प्रॉटेस्टंट हा होता. मेरीनें धर्माच्या बाबतींत काय कहर करून सोडला होता तो इतिहासांत विदित आहेच. याचें थोडेसें स्वरूप पुढील उल्लेखावरून ध्यानात येईल. मेरी बाईनें जी मंडळी जाळून मारली तिची याद इतिहासांत येणेंप्रमाणें आढळते:--५ बिशप, २१ पाद्री, ८ गृहस्थ, ८४ व्यापारी, १०० शेतकरी, कुणबी वगैरे, ५५ बायका आणि ४ पोरें.

कायदेकौन्सिलांत मेंबर आहेत, म्युनिसिपालिटींत लोकांचे मुकत्यार आहेत, पुणेंमुंबईच्या लोकांस जूरी (पंच) हा अधिकार दिलेला आहे, नेटिव कारभारी आहेत, नेटिव सिविल सर्जंट होताहेत. कोणी येथून विलायतेस कोंवळचा वयांत जाण्याची कंबर बांधील तर त्यास तिकडे सिविलियन होण्याची सोय ठेवलेली आहे, वर्तमानपत्रांत लिहिण्याची मुभा आहे, सर्व कांहीं आहे. पण हे सर्व प्रकार म्हटले म्हणजे केवळ आपातरमणीय होत. तोंडानें नाहीं म्हणायाचें तें हातानें नाहीं म्हणायाचें, किंवा न कर्त्याचा वार शनवार, यांतलीच एकंदर व्यवस्था ! वरील सभांतलीं मेंबरें म्हटलीं म्हणजे म्हणतात ना,--खायाला अगडबंब आणि म्हणायाला मुखस्तंभ, यांतलीच बहुतेक स्थिति; जूरीचा अधिकार आहे, पण त्यावर हायकोर्टाची मखलाशी ठेवलेलीच आहे; नेटिव कारभारी आहेत, पण ते कोण ? बटोदरपुरस्थ मद्रदेशोद्भव शल्यमामा (यांनीं सारथ्यकर्म जसें बजावलें, त्याप्रमाणेंच तद्देशोद्भव नरपुंगव राज्यरूप शकटाची व्यवस्था करणार !) आणि करवीरस्थ आडनांवी बरवे ! सदरहुप्रमाणेंच नेटिव सिविल सर्वंट,-ते कोण ? खानबहादुराचे बेटे अगर रावबहादुराचे चिरंजीव; विलायतेची यात्रा करून सिविलियन होण्याचा रस्ता खुला आहे, पण तें होणार केव्हां? तर लोणचें पापड बरोबर देऊन एखाद्या हौशानें आपल्या राजबिंड्याचें उपनयन जेव्हां मोक्षमूलर भट्टाचार्यांच्या करवीं टेम्सनदीच्या पवित्र तीरीं करविण्याचा संकल्प येथें सोडून ठेवावा तेव्हां. याप्रमाणेंच वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य, कोणावर कोणत्या वेळेस काय गदा येईल याचा नेम म्हणून नाहीं! सारांश, इंग्लंडांतील प्रजेचें स्वातंत्र्य खरोखरच्या जलप्रवाहाप्रमाणें आहे; आणि इकडे जी केसरि हिंद्ची प्रजा आहे तिला मृगजलाचा लाभ करून दिलेला आहे. हें मृगजल अशा खुबीचें आहे, कीं जो दूरस्थ आहे त्यास अर्थात्च तें थेट पाण्यासारखें वाटणार आहे, व वाटत आहे.

आतां विद्या, कला वगैरेंच्या संबंधानें भरतखंडवासी लोकांत व श्वेतद्वीपीय राष्ट्रांत कितीसें अंतर आहे तें पाहूं. हें अंतर वरच्या साऱ्या अंतराप्रमाणेंच स्पष्ट आहे. अमेरिकेंत प्रतिवर्षीं नवीन विद्या व कला उदयास येत आहेत. आज काय नाद धरण्याची युक्ति सांपडली,-ती अशी कीं अमक्या अमक्यानें आज वक्तृत्व केलें, किंवा अमकी अमकीनें आज खूप शानदार

आलाप घेतले, तर तेंच बोलणें व तेंच गाणें यंत्रावर धरून ठेवून पाहिजे तर न्यूफौंडलंड बेटांत सन २८८२ सालीं ऐकावें ! ! !– उद्यां काय मेघकन्या जी विद्युत् तिला वाहक करून अग्निरथाच्या जागीं विद्युद्रथ निघाला ! परवां काय सूर्यकिरणांसच दूत करून 'मेघदूता' वर ताण केली ! याप्रमाणें पाश्चात्यांच्यां बुद्धिसागराचे एकेक तरंग मेघमंडळावरही जाऊन आदळताहेत ! आमच्या देशांत पाहावें तों नव्या विद्या व कला तर राहिल्याच; पण हजारों वर्षें ज्यांची येथें वस्ती झाली त्या सुद्धां बिचाऱ्या निराश्रित होत्साऱ्या विगलित होऊं पाहताहेत, व कित्येक तर झाल्या सुद्धां ! दवलताबाजीच्या जागीं फुल्स्क्याप आला, आंबव्याच्या जागीं साटीण आली; कषायांच्या जागीं विलायती रस आले, 'हर हर' च्या जागीं 'हडेल् हप्' येऊन बसलें. शालजोडीच्या जागी गौन आला, –याप्रमाणें क्रमाक्रमानें एकेक आदेश होत गेले. नाहीं म्हणायाला अद्याप एक मात्र राहिलें आहे, कीं श्राद्धपक्ष चालवायाला हीं जुनीं भटें जीं येतात, त्यापेक्षां भट्टमोक्षमूलर यांचे छात्र किंवा बोधलिंगाचार्यांचे अंतेवासी यांस अद्याप इकडे कोणी टपालांतून मागवीत नाहीं ! ! असो; तर ही स्थितिही अत्यंत लज्जास्पद व भयप्रद होय. आजपर्यंत या देशावरच काय, पण पृथ्वींतल्या साऱ्या देशांवर परकी लोकांचे अंमल गाजलेले आहेत, पण सध्यां आमच्या येथें जी स्थिति दृष्टिगोचर होत आहे तिची तोड कोठेंही सांपडायाची नाहीं. येवढें रोमन लोकांचें हजार दोन हजार वर्षें चाललेलें साम्राज्य; पण काबीज केलेल्या मुलुखांवर एकेक प्रोकॉन्सल् (मामलेदार) रोम शहरांतून जात असे, व त्याच्या बंदोबस्ताकरतां फौजफाटा ठेवलेला असे, येवढी काय ती परकी अमलाची निशाणी; बाकी सारी व्यवस्था ज्या त्या देशाच्या रिवाजाप्रमाणेंच बिनहरकत चालत असे. मूळचीच राज्यपद्धति, मूळचाच धर्म, मूळचेच रीतिरिवाज, असा चोहोंकडे प्रकार असून जसा घोडयाचा लगाम मात्र हातांत असावा त्याप्रमाणें केवळ राज्यसूत्र रोमकपत्तनस्थ राज्यधुरंधरांकडे असे. असा संपद्राय होता म्हणूनच येवढें पृथ्वीचें राज्य एका शहरांतील लोक वहिवाटीत होते, आणि तें किती काळ पावेतों, तर दीड दोन हजार वर्षें ! बरें येवढ्या विस्तीर्ण छायेखालीं असणारीं राष्ट्रें सावटानें जसें रोपडें बिघडवतात त्याच-

प्रमाणें दुरवस्थेस पोंचलीं कीं काय ? छे,दिवसेंदिवस त्यांच्या राज्यकर्त्यांची सुधारणा त्यांच्या ठायीं मुरून ते हळूं हळूं त्यांच्याच पदवीला येऊन पोंचले. हल्लीं येवढालीं प्रबळ राष्ट्रें युरोपांत झालीं आहेत, हीं सर्व वरील अस्तंगत साम्राज्याचीं अपत्यें च म्हटलीं असतां चालतील, तर अशी रूमच्या बादशाहीची गोष्ट होती.या बादशाहीचें ऐश्वर्य पुढें ईश्वरसत्तेनें अरबस्थानांत व तार्तारांत वनपशूंप्रमाणें हिंडणाऱ्या राष्ट्रांस प्राप्त झालें.त्यांची इमामशाही जशी लांबलांबच्या मुलुखांवर गाजली व अजूनही गाजत आहे, त्याप्रमाणेंच येथेंही गाजली. पण त्यांच्या तरी राज्यव्यवस्थेचा एकंदर प्रकार वरच्याच-सारखा. मेकॉले, मॉरिस वगैरे सत्यापलापी व दुराग्रही मंडळींची बडबड कांहींही असो.पण आलीकडे ही गोष्ट बहुधा सर्वांत महशूर आहे कीं,मागली मोगलाई हल्लींच्या इंग्रेजशाहीपेक्षां शतपट बरी. ज्या राज्यांत ब्राह्मण दिवाणगिरीच्या कामावर असत व रजपूत सेनापति असत ते कोणीकडे, आणि ज्यांत प्रिवी इन्स्पेक्टरपर्यंत सुद्धां गोऱ्यावांचून चालायाचें नाहीं व ब्राह्मण म्हणजे कवडीचा माल ठरलेले, असलें सध्यांचें सुधारलेलें सद्धर्मी व न्यायाचें आगर म्हणविणारें पाश्चात्य साम्राज्य कोणीकडे ! या गोऱ्या बादशाहीची जिकडे जिकडे स्वारी फिरली आहे तेथें तेथें तिजबरोबर खराटा फिरत चालला आहे. आमचे नामधारी पाताळवासी इंडियन लोक यांच्यावर तर पवित्र आत्म्याची झडप पहिल्या तडाख्यास बसून त्यांस त्यानें अमेरिकेंतून पार धुवून काढलें; आमच्या इकडे तरी दिवसेंदिवस तोच प्रकार होऊं पहात आहे. इंग्रेजी काव्याखालीं आमचें स्वातंत्र्य नष्ट झालें, कायद्याखालीं आम्ही कफल्लक होऊन बसलों, पाद्री साहेबास पुढें करून आम्हांस प्रभूच्या कोंडवाड्यांत नेऊन गुदरण्याचे प्रयत्न दीर्घकाळ चालू आहेतच,म्यांचेस्टरच्या वगैरे यंत्रांत येथील वाणिज्याचा चुराडा झालाच, आणि एकंदर विद्या व कला याही लुप्त होऊन जाऊन इंग्रेजी बादशाहीची मगरमिठी आम्हांस पक्की वसण्याचा समय दिसत आहे !

तेव्हां एकंदरींत पाहतां तूर्त आम्ही आकाबाईच्या फेऱ्यांत पुरे सांपडलों आहों असें म्हणायास हरकत नाहीं. जिकडे जिकडे दृष्टि फेंकावी तिकडे तिकडे आनंदच आनंद हल्लीं नजरेस येत आहे. कोणत्याही बाजूनें आम्ही धड राहिलों आहों असें नाहीं. निवळ रानटी राष्ट्रांची स्थिति एका अंशानें

चांगली असते, तसें आमचें नाहीं; किंवा सुधारलेल्यांत हल्लीं जीं प्रमुख होऊन बसलीं आहेत, त्यांस ज्या सोई असतात त्याही आम्हांत नाहींत. आम्ही धड ना विद्वान् ना अविद्वान्, ना रानटी ना सुधारलेलें, ना स्वतंत्र ना परतंत्र, ना हिंदु ना ख्रिस्ती, ना आर्य ना म्लेंच्छ, अशा कांहीं विलक्षण कचाटींत सध्यां येऊन पडलेलों आहों. या महागर्तेंतून काढून आम्हांस कोण ईश्वराचे घरचा लाल पुनः मार्गास लावील तो लावो ! आमचे इमाम-बंधु अफगाण लोक किंवा आफ्रिकावासी झुलू वगैरे लोक यांच्यांत आजच्या घटकेला इतकी तरी तरतरी आहे, कीं आम्ही आपापसांत भांडूं, लढूं, एक-मेकांच्या उरावर बसूं, काय पाहिजे तें करूं, पण शेजारचे कोणी शकोजी बळेंच दिंडींतून घुसून आमच्या घरांत येऊन लांडे कारभार करायाला लागले, कीं तें आम्हांला बिलकूल खपायाचें नाहीं; असे त्यांच्यापैकीं प्रत्येक व्यक्तीला वाटत आहे. काफर म्हटला कीं तत्क्षणीं घरदार सोडून देऊन त्याच्याशीं सामन्याला जाऊन उभें राहावें ही एक जबरदस्त गोष्ट वरील राष्ट्रांच्या ज़णों काय हाडीं खिळलेली आहे. पण आमच्या येथला प्रकार अगदीं उलट; आमच्या अंगीं येशूनें उपदेशिलेली शांति ओतप्रोत भरलेली आहे. काफर सोडून महाकाफर कां येईना; आम्हांला त्याची कांहीं क्षितीच नाहीं ! विलायतेंतल्या लोकांनी चार हजार कोसांवरून आमच्या नांवानें × × करावा " कीं अरे, तुमची चमडी जाण्याची वेळ आली तरी तुम्ही कांहींतरी हूं कां चूं सुद्धां करीत नाहीं, तुम्ही तरी भले निगरगट्ट बोवा; "पण आम्हांला काय त्याची लाज आहे ? टेंपल साहेब लाखों प्रेतांचा ढीग केसरि-हिंद्च्या पुढें मांडून आपल्या देशीं चालले ना, आमचें त्यांना मानपत्र आहे; राव बरवे आपल्या यजमानास 'क्लीबे च पतिते पतौ' या पाराशरस्मृतींत घालून आपलें पौरुष गाजवूं पाहताहेत ना; ठीक आहे. त्यांची तुतारी आम्हीं पत्करलीच ! बाणेदार महाराजाला खुळा ठरवून त्याची "वाट लावली" आणि एखादें मेषपात्रसें पोर पाहून यजमानिणीच्या मांडीवर दिलें, कीं मग झाली पुनः आयुर्मर्यादेपर्यंत चंगळ सुरू; अशा वेळीं रावबहादुर एकादा लहानसा तुकडा तर आपल्या तोंडावर टाकतील; येवढाच 'समाचार, आपल्याला बस झाला ! तर एका तऱ्हेनें पाहतां रानवटपणाच्या स्थितींतला जो अनावर आदेश तो सर्व नाहींसा होऊन आम्ही केवळ प्रेतवत् होऊन

राहिलों आहों बरें,दुसऱ्या बाजूनें पाहतां सुधारलेल्या लोकांची बडी अक्कल व कर्तृत्व हें जर पहावें, तर तेंही पण आमच्या अंगीं आलेलें नाहीं. आमचें ज्ञान म्हणजे इंग्रेजांचे उष्टेमाष्टे विचार, आमची सुधारणा म्हणजे त्यांचें वालिश अनुकरण, आमचें कर्तृत्व म्हटलें म्हणजे पार्लमेंटच्या जागीं सार्वजनिक सभा, सेंट पॉल् चर्चच्या जागीं प्रार्थनामंदिर व क्रिकेटच्या जागीं क्रीडाभुवन ! एतावता ' इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः ' या म्हणीप्रमाणें आमच्यांत धड आमचें मूळचें तत्त्व राहिलें नाहीं, व आमच्या पाश्चात्य बंधूंच्या समागमें करून नवें पाणी आम्हांत दृष्टीस पडूं लागावें तेंही अजून तर आलें नाहीं मग पुढें हें आमचें तारूं कोणाच्या थडीला लागणार आहे तें परमेश्वरच जाणे !

अतिवीर्यवतीव भेषजे बहुरल्पीयसि दृश्यते गुणः । *

' किरातार्जुनीय '

अंक ८२--(१) प्रस्तुत अंकांचा विषय. (२) आमच्या देशाच्या अपायाचीं कारणें. (३) देश सुधारण्यास हिंदुधर्म बाधक आहे कीं काय? (४) आमच्या दैन्यास बालविवाह कारण काय ? (५) जुने प्रचार सुधारणुकीस कितपत बाधक आहेत. (६) वडच्या मंडळींनी प्रस्तुत विपत्तीचीं ठरविलेलीं निदानें

१. मागील अंकांत सांप्रतच्या लोकस्थितीचें निरूपण केलें आहे. आतां यापुढें तिची उपपत्ति करून सध्यांच्या दुर्दशेच्या निवारणार्थ काय काय केलें पाहिजे याविषयीं विचार करावयाचा.

२. सदरील विषयावर आजपर्यंत पुष्कळ विचार झालेला आहे हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. इंग्रेजी विद्येचा इकडे प्रसार व्हावयाला लागून लोकांचे ठायीं नवी विचारशक्ति जेव्हां जागृत झाली, व आपला देश, व आपले रीतिरिवाज, आपला धर्म,वगैरे विषयांवर त्यांनीं विवेचन करण्यास

* " जसें जलाल औषध हें थोडकें असलें तरी त्यांत पुष्कळ गुण दृष्टीस पडतो ! "

जेव्हां आरंभ केला, तेव्हां अर्थातच आपल्या राष्ट्रांची हालहवाल व इतरांची हालहवाल, आपली विद्यमान कालची स्थिति व पूर्वीच्या कालांतली स्थिति, या सर्व गोष्टींच्या संबंधानें आमच्या विद्वान् मंडळींत चर्चा होऊन ती आज-पर्यंतही चालूच आहे. बहुश्रुत व विचारशील अशी चार मंडळी एकत्र जमळली असतां सदरील विषयाच्या संबंधानें कांहीं ना कांहीं तरी ऊहापोह झाल्याशिवाय राहातच नाही; कां कीं, हा विषय ज्याच्या त्याच्या दृष्टीसमोर जिकडे तिकडे आहेच. जोंवर कोणी मनुष्य आरोग्ययुक्त व स्वस्थ असतें तोंवर त्याच्या संबंधाची विचारपूस करण्याचें कांही कारणच नसतें; पण वरील दोन्ही स्थिति नाहींशा झाल्या असतां अर्थातच क्षणोक्षणीं व पदोपदीं त्याच्या संबंधानें पृच्छा उत्पन्न होणारी आहे. मग हें जर एका व्यक्ती-विषयीं पाहतां खरें आहे, तर अवघ्या राष्ट्राची सर्वांपरी दैन्यावस्था दृष्टीस पडू लागली असतां तिच्या संबंधानें हजारों जणांचे हजारों प्रकारें विचार निघणार आहेत हें कशाला सांगायाला पाहिजे ?

आतां वरील अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आजपर्यंत काय काय कोटचा निघाल्या आहेत त्या अगोदर दाखल करून त्यांतील तथ्यातथ्याचा निर्णय करूं.

वरील कोटचा अनंत आहेत. कोणी म्हणतात, आमच्यांत मूर्तिपूजेचें बंड शिरलें हें आमच्या देशाच्या अपायास कारण झालें; तेव्हां गिझनीच्या महंमदाचें व्रत जेव्हां येथें जारीनें चालू होईल, व तेहतीस कोटी देवांची खाशी कत्तल उडेल, तेव्हां या हिंदुस्थानाला कांहींसें बरें वाटायाला लागेल ! कोणी म्हणतात, जातिभेद हा समंध मनूच्या कारकीर्दीपासून आमच्या बोकांडी बसला आहे, तर श्रीमत्परमहंसांच्या 'जुक्ती' चें किंवा जोतिबांच्या 'गुलामगिरी' चें साह्य घेऊन जेव्हां एका सपाटचासरसा साऱ्या देशभर 'सवगोलंकार' करून टाकावा, व मिस्टर लिटल्डेल आणि मिस् अनुबाई (Anne) यांच्यासारखे गांधर्वविवाह लाखोगणती करून द्यावे, तेव्हांच आमची 'ऋषीच्या कारकीर्दी' तील सुधारणा आमची आम्हांला पुनः परत मिळेल ! कोणी म्हणतात, वैधव्यदशेंत ब्रह्मचर्यानें राहावें हें जें खूळ आमच्या जुन्या टोणग्यांनीं एतद्देशीय स्त्रियांस लावून दिलें आहे तें पायाखालीं तुडवून टाकून जॉनसन्च्या यजमानणीनें चाळीस वर्षांच्या ऐन उमरींत पोराबाळां-सकट इटालियन सारंगयाशीं पाट लावला व साऱ्या इंग्लंडची छीथू मागें

टाकून देऊन आपल्या नव्या सासरीं जसा मुकाट्यानें पळ काढला, किंवा स्कॉटलंडच्या राणीसाहेबांनीं लागोपाठ तीन चार नवरे केले, तशी जेव्हां वहार सुरू होईल, तेव्हां इकडे बावनकशी कोरी करकरीत सुधारणा अवतीर्ण होईल! कोणी म्हणतात वनपशूंप्रमाणें झाडपाला व कणसें खाणें व भिकारड्या-सारखें नुसतें पाणी पिणें हें सोडून देऊन 'वत्सतरी मडमडायिता' * हा पवित्र आचार जेव्हां मात्क्यान् सुरू होईल व बाटलाबाईच्या गळ्यांत मिठी मारून जेव्हां आम्ही गटारांत कोलंडूं लागूं, तेव्हां आमच्या अंगांत असा जोर येईल कीं, इंग्रेजांशीं किंवा रशियनांशीं सुद्धां टक्कर द्यावयाला आम्ही तयार होऊं ! याप्रमाणें एक ना दोन,-शेंकडों कोट्या आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांनीं जातीनें ऐकल्याही असतील.

आतां वरील साऱ्या कोट्यांचा यथास्थितपणें विचार करणें हें किती आवश्यक आहे हें बहुधा कोणासही उघड दिसणारें आहे. त्यांतील कित्येक तर इतक्या असमंजसतेच्या आहेत कीं नुसत्या नमूद केल्या कीं पुरे-तेच त्यांचें खंडन होय ! बाकीच्यांत तरी प्रायः अज्ञानाचा व दुराग्रहाचा इतका अंश मिसळलेला आढळतो कीं, थोडासा विचार केला असतां त्याचा शुष्कपणा बहुधा कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहावयाचा नाहीं. शिवाय यापूर्वी अनेक वेळां वरच्यापैकीं कित्येक कोट्यांचा या पुस्तकांत प्रसंगोपात्त विचार झालेलाही आहे. यास्तव पूर्वोक्त कोटिक्रमांतला मुख्यांश मात्र ग्रहण करून त्यावर येथें विवेचन करूं म्हणजे बस होईल.

३. प्रस्तुतच्या राष्ट्रदशेची एक मोठी उपपत्ति आजपर्यंत काय करण्यांत आली आहे ती सर्वांस माहीत आहेच. ती ही कीं, आमचा धर्म हा फार खराब आहे. याच्या पायीं आज इतक्या खराबीस आम्ही आलों. तेव्हां याचा जेव्हां समूळ उच्छेद होईल तेव्हां आमच्या दृष्टीस चांगले दिवस पडतील ! ही समजूत आमच्या आजपर्यंतच्या पंडितजनांत इतकी दृढपणें खिळून बसलेली आहे कीं, ती बहुधा प्रत्येकाच्या भाषणांत व लेखांत आढळत आली आहे. शिवाय हिंदुस्थानचा हा महारोग नाहींसा करून टाकून त्याची रक्तशुद्धि करण्याकरतां व त्यास पुनः सुदृढ करण्याकरतां मागील मंडळीनें आजपर्यंत सद्धर्मस्थापनेकरतांही केवढाले प्रयत्न केले आहेत तें आज सर्व

* 'उत्तररामचरिता' च्या चवथ्या अंकाचा विष्कंभक पहा.

प्रसिद्धच आहेत. पन्नास वर्षांपूर्वीचा ब्रह्मसमाज,वीस वर्षांपूर्वीचा प्रार्थना-समाज, शिवाय माजी होऊन बसलेले किंवा मधे मधे होणारे आर्यसमाज, सत्यशोधकसमाज वगैरे हे सर्व कोणास तरी ऐकून माहीत नाहींत ? तर आतां या पहिल्या जबरदस्त कोटिक्रमाविषयीं विचार करूं.

हिंदु धर्माविषयीं हा येवढा तिरस्कार आमचे ठायीं आजपर्यन्त कां बाणून राहिला आहे, याचा जर विचार केला तर त्याचीं दोन मोठालीं कारणें दिसतात. एक कारण मिशनरी मंडळी, व दुसरें आमचें आत्मविषयक अज्ञान. पाद्री मंडळाचा पहिल्यापासूनचा बाणा तर जगजाहीर आहेच, कीं दुसरा धर्म म्हटला कीं तो हाणून पाडायाचा.त्यांच्या बुद्धीनें ईश्वरज्ञानाचा, नीतीचा व एकंदर ज्ञानाचा गड्डा काय तो 'पवित्र शास्त्रां'त आकाशांतील देवबापानें सांठवून ठेवला आहे; तेव्हां बौद्ध, मुसलमान, हिंदु वगैरे चट सारे धर्म हे ईश्वराज्ञान, अनीति व अज्ञान यांनीं ओतप्रोत भरलेले आहेत, व यास्तव त्यांचा जेवढा विध्वंस होईल तेवढा जगास हितावह ही समजूत वरील पवित्र मंडळींच्या डोक्यांत अगदीं ठाम बसून गेली आहे. वस्तुतः पाहतां वरच्या इतका मूर्खपणाचा समज फारच थोडा आढळेल.विलायतेंत व एकंदर युरोपांत ख्रिस्ती धर्माची उत्तरोत्तर प्रतिष्ठा वाढत चालली आहे किंवा कमी होत आहे हें कोणाही विद्वान् व शोधक मनुष्यास सांगण्याची आज गरज उरली नाहीं. पण आपल्या मुख्य तळावर येवढा भडिमार सुरू आहे व तो दिवसेंदिवस अगदीं अंगाशीं येऊन लगटतो आहे, या जगप्रसिद्ध गोष्टीकडे कानाडोळा करून विलायतेंतल्या प्रेषितमंडळीनें या देशावर येऊन धाड घातली आहे, व येथील विद्वानांचीं मनें आमच्या धर्माच्या,आचारविचारांच्या वगैरेसंबंधानें पराकाष्टेचीं दूषित करून टाकलीं आहेत. वस्तुतः पाहतां वरील दूषणप्रकार फारसा सिद्धीस जाऊं नये; कां कीं ख्रिस्ती धर्माची बळकटी व त्या लोकांची नीति वगैरे जगजाहीर आहेत. पण स्वतःविषयीं अज्ञान व दुसऱ्याविषयीं अयथार्थ बुद्धि हीं असलीं म्हणजे मनाचा हवा तो ग्रह बनण्यास उशीर नाहीं. आजपर्यंत आमच्या लोकांच्या मनानें ही समजूत बळकट धरलेली होती व अजूनही ती केवळ ढळली आहे असें नाहीं, कीं साहेबप्रणीत ग्रंथ म्हटला कीं तो केवळ वेदवचन, व साहेबांचें भाषण म्हटलें म्हणजे त्यांत असत्यतेचा

म्हणून शिरकावच व्हावयाचा नाहीं. ज्या लोकांनीं पुराणांतरीं ऐकलेल्या गोष्टींची प्रचीति सर्वांस आणून दिली एवढें ज्यांचें बुद्धिवैभव त्यांचें मत अयथार्थ असेल तरी कसें ? या मतिभ्रमावरूनच आजपर्यंत मेकॉले सारख्यांचें ग्रंथप्रामाण्य व रे. विल्सन्सारख्यांचें वचनप्रामाण्य सर्वांनीं गृहीत केलें. वस्तुतः पाहतां वरील पंडितशिरोमणींस आमच्या संबंधाची कितीशी माहिती असण्याचा संभव आहे बरें ? पण ही कल्पनाच अगोदर कोणाच्या डोक्यांत उतरेल तर सगळी पुढली गोष्ट! तर आजपर्यंत आमच्या पुरातन धर्माच्या संबंधानें व आचारविचारांच्या संबंधानें जे जे अभिप्राय प्रगट झाले आहेत ते सर्व वरील मासल्याचें होत; म्हणजे परद्वीपस्थ व परधर्मी लोकांनीं अज्ञानास्तव व दुराग्रहास्तव जीं मतें ठोकून दिलीं त्यांचा तो अनुवाद होय.

वरील स्थिति आजपर्यंत चालत आली तें ठीकच झालें; त्यावांचून आम्हांला गतिच नव्हती पण वरील मिंधेपणा व परमतावलंबन हें टाकून देऊन स्वतःच्या विवेचनशक्तीचा स्वतंत्रपणें उपयोग करून काय ठरतें तें पाहण्याचे आज दिवस आले आहेत. आज पांच पंचवीस वर्षांत एतद्देशीय व परदेशीय विद्यांचाहि संस्कार आम्हांस बराच घडल्यामुळें आतां वरील 'पारंग्याचीं वाहिलें' कांठावर ठेवून भर धारेंत उडी झोकली असतांही चालेल असें आम्हांस वाटतें ! तर आतां केवळ स्वतंत्र रीतीनें प्रस्तुत विषयाचा विचार करूं.

आमची सुधारणा होण्यास हिंदु धर्म हा प्रतिबंधक होय असें जे म्हणतात, त्यास आम्ही असें विचारतों कीं, प्राचीन काळीं जी आमची सुधारणा गाजत होती तिच्या वेळेस हाच धर्म होता कीं नाहीं ? मग त्या वेळेस तो तीस कसा आडवा आला नाहीं बरें ? 'ऋषींच्या कारकीर्दीं'त जर सुधारणेचा कळस झाला होता, तर त्याच ऋषींचीं वचनें आज आम्ही पाळीत आहों; मग प्राचीन व अर्वाचीन काळांत येवढा विपर्यास कां दृष्टीस पडावा बरें ? त्याप्रमाणेंच असाही चमत्कार आढळतो कीं, मूर्ति-पूजादिक प्रकार जे सुधारणेस अत्यंत विरुद्ध म्हणून मानलेले ते सर्व साऱ्या प्राचीन राष्ट्रांतून तर जारीनें चालू होते. मिसर, ग्रीस, रोम वगैरे ठिकाणें म्हणजे मूर्तिपूजेचीं केवळ आगरें होतीं, आणि असे असतां वरील राष्ट्रें

उन्नतीच्या शिखराला चढलीं ! एडन् बागेमध्यें आमच्या आदिजनकानें व आदिजननीनें झाडाचें फळ खाल्लें, त्यामुळें आकाशांतील बाप कोपायमान होऊन त्यानें साऱ्या मनुष्यजातीला शाप दिला, पुढें त्यांचा एकुलता एक पुत्र हमीदार होऊन भूलोकावर आला आणि त्यास देवाच्या लाडक्या लोकांनीं हालअपेष्टा करून मारलें तेव्हां त्याच्या पवित्र रक्तानें * सारी मानवजाति परिपूत झाली, वगैरे जीं पवित्र धर्माची सुधारणामूलभूत सत्य तत्त्वें तीं मिसरी मनोरे बांधणारांस व जगद्विजय करणाऱ्या शिकंदराच्या किंवा सीजराच्या शिपायांस बिलकूल माहीत नव्हतीं. तसेंच दुसऱ्या पक्षीं असेंही आढळतें कीं पवित्र शास्त्राचा प्रसाद ज्यास मिळतो त्याच्या अंगीं कांहीं अद्भुत संचार झालेला बिलकूल दृष्टीस पडत नाहीं. यास मोठें उदाहरण आमचे माजी धर्मबंधू गोमांतकी लोक यांचें आहे. तेथें पोप-साहेबांचें पवित्र प्रोक्षण साऱ्यांच्या डोक्यांवरून झालें असतां त्या जलबिंदूंचा प्रभाव आज तीनचारशें वर्षांत तर कांहीच नजरेस आला नाहीं. देवीच्या किंवा खंडोबाच्या पायां पडत असतां जी गोवेकरांची स्थिति होती तीच किंवा त्याहुनही वाईट आज झाली आहे, मग गेल्या तीन चार शतकांत येशूची व मारवा देवीची भक्ति त्यांस फलद्रूप कां बरें झाली नाहीं ? तेव्हां दोन्ही बाजूंनीं पाहतां वरील सिद्धांताचा जम काहींच बसत नाहीं.

* वरील शब्दांचा अर्थ आमच्या मराठी वाचकांस तर मुळींच कळायाचा नाहीं; यास्तव त्यांवर थोडेंसें व्याख्यान करणें इष्ट आहे. ख्रिस्ती धर्मांत येशूला 'अजापुत्र' अशी सज्ञा आहे; याचा अर्थ असा कीं, देवतांच्या प्रसादार्थ पशूचें आलभन करण्याचा जसा सर्व प्राचीन राष्ट्रांतून सांप्रदाय होता, त्याप्रमाणेंच वरील देवपुत्राचें ऊर्फ अजापुत्राचें आकाशांतील बापाच्या कोपशांत्यर्थ हनन झालें. तेणेंकरून देवबापा खूष होऊन त्यानें असें शुभवर्तमान चोहोंकडे पिटविलें कीं जो आमच्या एकुलत्या एक पुत्रावर विश्वास ठेवील तो वरील महायक्षाच्या पुण्याईनें पावन होत्साता स्वर्लोकीं अक्षय्य सुख पावेल; व जे विश्वास ठेवणार नाहींत त्यांस आम्ही अक्षय्य नरकांत लोटून देऊं. ख्रिस्ती धर्माचे जगद्गुरु पोपसाहेब यांनीं वरील यज्ञाचा पेटंट (मालकीचा हक्क) सारा आपणाकडे ठेवून ते पाहिजे त्यास स्वर्गलोकींचें तिकीट देत असतात हें इतिहासप्रसिद्धच आहे !

आतां प्रस्तुत विषयाचा स्वरूपत:च जर विचार केला, तर तिकडूनही आमची तर अशी समजूत आजपर्यंत झाली आहे कीं, हवी तितकी सुधारणा होण्यास सध्यांचा हिंदुधर्म मोठासा बाधक आहे असें नाहीं. पहा कीं, सिंधु नदीच्या उल्लंघनाची एतद्देशीयांस मनाई आहे अशी जरी आजपर्यंत समजूत चालत आली आहे, तरी ज्या शिपायांनीं १८०७ व १८५७ सालीं य:कश्चित् कारणाकरितां येवढालीं बंडें केलीं तेच अफगाणिस्थानांत, इराणांत, माल्टा बेटांत मुकाट्यानें जाऊन आले कीं नाहीं ? भर पेशवाईंत राघोबा दादाचा वकील बर्कच्या बंगल्याशेजारीं उतरून तेथें इंग्रेजी सूर्याला अर्घ्यप्रदान करीत होता कीं नाहीं ? त्याप्रमाणेंच परवां कांहीं मंडळीं खुद्द श्रीनें पावन करून घेतली कीं नाहीं ? पेशव्यांनीं थेट अटकेपर्यंत ज्या भराऱ्या मारल्या त्या स्नानसंध्या अंतरायाची नाहीं असा आग्रह धरून व 'न नीचो यवनात्पर: ' हीं महावचनें उराशीं बाळगून मारल्या काय ? थोरले माधवराव साहेब जपजाप्यनिमग्न होऊन रामशास्त्रीबोवांचा जरासा खोळंबा झाला असतां त्या महाब्राह्मणानें खुद्द राजश्रींस काय उत्तर केलें बरें ? मग या सर्व गोष्टींवरून पाहतां आमच्या धर्माच्या संबंधानें जी आजपर्यंत हाकाटी चालली आहे ती पोकळ आहे असें सिद्ध होत नाहीं काय ? तुमचा धर्म वेडगळ व गैरसोईचा आहे म्हणून परम सोज्वळ व अघळपघळ सोईचा असा हा गाण्याबजावण्याचा व डोळे मिटण्याचा धर्म आम्ही तुम्हांस लावून देतों, व तुमच्या लग्नाच्या चाली अगदीं अप्रयोजक आहेत यास्तव घरीं एका हीनजाति विद्वानाला आणि सुशिक्षित ब्राम्हणविधवेला आणि द्या त्यांच्या पदराला गांठ, याप्रमाणें तुमच्यांत दुहेरी तिहेरी सुधारणा आम्ही करून देतों, किंवा उठली एक हिंदु लेडी आणि पडली एका टोपडयाच्या गळ्यांत, याप्रमाणें झोटिंगपाच्छाई न करतां पूर्वक्रमास अनुसरून जर आमची विद्वान व लोकहितेच्छु म्हणविणारी मंडळी क्रमाक्रमानें सुधारणा करण्यास प्रवृत्त झाली असती तर फार बरें झालें असतें असें आम्हांस वाटतें. तसेंच हिंदु धर्माच्या आड वरचेवर लपून आपला कमकुवतपणा झांकण्यास जें आमच्या पुढारी मंडळीस आजपर्यंत फावलें तेंही फावलें नसतें !

४. आमच्या देशास दैन्य प्राप्त होण्याची दुसरी एक मोठी उपपत्ति पुष्कळ पंडितांच्या तोंडून अशी येते कीं, आमच्यांत बालविवाह शास्त्रोक्त

आहे हें आम्ही दुर्बळ होण्यास कारण झालें आहे. या उपपत्तीचीही अशी मजा आहे कीं, ती मागील काळास बिलकूल लागू पडत नाहीं. जर बाल-विवाह हा आमच्या नाशास कारण, तर या कारणाचें कार्य आजपर्यंत कां बरें प्रत्ययास आलें नाहीं ? निदान तीन हजार वर्षें वरील प्रचार येथें सुरू असला पाहिजे; मग त्याची हांकाटी गेल्या पांच पन्नास वर्षांतच का कानीं यावी बरें ? आमचे आज पणजे वगैरे मंडळी जी येवढी सुदृढ असे तीस वर्षांच्या, तीस वर्षांच्या किंवा याहूनही अधिक उमरीच्या कुमारींचा विवाह होतो व पुरुषांचेंही सदरहूप्रमाणें, तसा प्रकार पूर्वी इकडे चालू होता काय ? आमचे आजे पणजे नुकते नुकते साऱ्या हिंदुस्थानभर धुमश्चक्री करीत असतां आम्हीच एक दोन पिढ्यांत वाऱ्याशीं भांडायाजोगते जे झालों याचें अपेश बालविवाहावर कसें देतां येईल ? शिवाय ज्या ब्राह्मणेतर जातींस ' अष्टवर्षा भवेत्कन्या ' हें सूत्र लागू नाहीं त्यांच्यांत तरी आज पहिल्या इतका जोम आढळतो काय ? तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करतां वरील उपपत्तींतही ' जुक्ती ' चा फारसा अंश उरत नाहीं.

५. याप्रमाणेंच जातिभेद, स्त्रीशिक्षण, वगैरे विषयांच्या संबंधानें जेवढ्या कोट्या आजपर्यंत पुढें आल्या आहेत त्या सर्वांची व्यवस्था लागते. आमचेच पंडित इंग्रेज ग्रंथकारांचा अनुवाद करून जर आम्हांस सांगतात, कीं शिकंदर बादशाहानें पंजाबवर स्वारी केली त्या वेळीं जी या देशाची स्थिति होती तीच आज आहे, तर मूर्तिपूजेच्या किंवा जातिभेदाच्या नांवानें हांका मारण्यांत काय हांशील आहे ? कार्यकारणांचा परस्पर जो नित्यसंबंध आहे त्यास कालांतरानें विपर्यास पडत असतो काय ? पोरस् राजानें दिग्विजय करून आलेल्या शिकंदराशीं टक्कर दिली तेव्हां त्याच्या लष्करांत दयानंदजींचा ' सब् गोलंकार ' चालू होता काय ? किंवा आपासाहेबानें फिरंग्यास जेर केलें तेव्हां तो एकेश्वराचा वरप्रसाद घेऊन आला होता काय? त्याप्रमाणेंच आमच्या देशांत येवढाले कवि, येवढाले शास्त्रकार, येवढाले शिल्पी वगैरे होऊन गेले; पण बेकन्ला जसें त्याच्या आईनें शिकविलें त्याप्रमाणें इकडेही गदाधरभट्टाची आई मोठी विदुषी होती वगैरे कांहीं एक ऐकण्यांत नाहीं ! मग हजारों वर्षें ज्या कारणांचें अस्तित्व या देशांत आहे त्यांच्या

कार्यांचा आविर्भाव काय तो गेल्या पांच पन्नास वर्षांतच दृष्टी पडूं लागला हें म्हणणें किती समंजसपणाचें आहे बरें ?

आतां वरील कोटयांचें जें आम्हीं खंडन केलें त्यावरून कित्येक समंजस मंडळीचें कदाचित् असें अनुमान होईल कीं, वरील बालविवाहादि प्रकार आम्हांस सर्वप्रकारें मान्य होते, व आजपर्यंत जें चालत आलें आहे तें सर्व जसेंचें तसें चालू ठेवण्याविषयीं आमचा आग्रह आहे. वस्तुतः पाहतां वरील मतें काढण्यास बिलकूल आधार नाहीं. आमचें म्हणणें जें काय आहे तें इतकेंच कीं, वरील प्रचार चांगले असोत किंवा वाईट असोत, त्यांच्यांत फेरफार करणें किंवा ते नाहींसें करून टाकणें हें इष्ट असो किंवा अनिष्ट असो; आज आमची जी अवस्था झाली आहे तिला ते कितपत कारणभूत होत इतकेंच काय तें पहावयाचें. येवढयापुरता विचार केला असतां आमचा आजपर्यंत असा अभिप्राय ठरला आहे कीं, वरील गोष्टींमुळें आज आम्ही दुर्बळ, द्रव्यहीन, सत्ताहीन वगैरे झालों आहों या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आम्ही मूर्तीच्या पायां पडतों व स्त्रियांस शिक्षण देत नाहीं यामुळें आम्ही इंग्रेजांचे अंकित झालों हें म्हणणें, आणि आम्ही टोप्यांच्या ऐवजीं पागोटीं घालतों किंवा विजारींच्या ऐवजीं धोत्रें वापरतों म्हणून आज आमची अशी दशा झाली आहे हें म्हणणें हीं दोन्ही 'जुक्ती'च्या पारडयांत सारख्याच वजनाचीं भरतील असें आम्हांस वाटतें !

६. तेव्हां एकंदरींत पाहतां आमच्या राष्ट्राच्या प्रस्तुत विपत्तीची आजपर्यंत आमच्यांतल्या बडया बडया मंडळीनें जीं एकेक बडीं बडीं निदानें ठरविलीं आहेत तीं आम्हांस बहुतेक अंशीं चुकीचींच वाटतात. वरील उपपत्ति त्यांनीं केवळ इंग्रेज लोकांच्या प्रलापावरून बसविल्या आहेत. जे इंग्रेज लोक येथें चाळीस वर्षें राहिलेले असतां व इतका काळ पावेतों आमच्यांत वावरलें असतां इकडील सामान्य गोष्टींच्या संबंधानेंही कित्येक वेळां अत्यंत अनभिज्ञ असलेले आढळतात; त्यांनीं आमच्या राष्ट्राची आपल्या राष्ट्रावरून परीक्षा करावी, आणि रोगनिदान ठरवावें हें आम्हांस तर केवळ हास्यास्पद वाटतें. इंग्लंडांत हवा निराळी, राहणी निराळी, सर्वच निराळें; पण तें लक्षांत न आणतां इकडच्या रोग्याला जे उपचार करायाचे ते सर्व तिकडचे केले असतां चालतील काय ? जो खरा वैद्य आहे तो अगोदर रोग्याच्या प्रकृतीचें मान पूर्णपणें लक्षांत आणतो, त्यास

कशापासून काय विकार जडला आहे याचा चांगला विचारपूर्वक शोध करतो आणि मग औषधयोजना करून तिजपासून त्यास गुण येतो किंवा कसें हें वरचेवर पाहतो. पण यांपैकीं प्रस्तुत प्रकरणीं कांहींच प्रकार आढळत नाहीं. चाललेला प्रकार म्हटला म्हणजे इंग्रेजी व विशेषत: नेटिव डॉक्टरांचा जो आढळतो तो ! डॉक्टरसाहेबांस पाचारण करायाचें म्हटलें म्हणजे प्रथमत: रथ सज्ज करा, निघण्यापूर्वी प्रथमत: किंचित् व्यवहारिकं द्रव्यं ' म्हणून पाद्यपूजां करा, नंतर स्वारींची पायधूळ बिचाऱ्या रोग्याच्या घरीं बूटस्टॉकिंगांनिशीं झाल्यानंतर नलिकाप्रयोग वगैरे थोडेंसें सोंग झालें कीं, आणा कागद आणि पेन, कीं साहेबांनीं आपल्या पातीदार दवाखानेवाल्यावर दिली एक चिठ्ठी खरडून ! हें आटपलें कीं लागलेंच निघालें घडयाळ खिशांतून, कीं चालली स्वारी पुन: फडकत,—मग या त्यांच्या इंग्रेजी थाटाखालीं मर्धे बिचाऱ्या रोग्याचें कांहीं कां होईना; त्याची कोणाला पर्वा आहे ! इंग्रेजी वैद्यकग्रंथांतून ठरवलेलीं औषधें ठोकून द्यावयाचीं; मग गुण येणें न येणें त्या ग्रंथकाराच्या माथ्यावर ! डॉक्टरांची व त्यांच्या घोडयाची चंदी निघाल्याशीं त्यांचें काम ! तर आमच्या आर्यभूमीचीं निदानें आजपर्यंत फरडचा इंग्रेज ग्रंथकारांनीं व हजारों रुपये ' आप्याय स्वाहा ' करणाऱ्या रेवरेंड मंडळीनें जीं आजवर केलीं आहेत तीं सर्व वरील मासल्याचीं होत. इंग्लंडांत हजामाचा मुलगा लॉर्डची पदवी मिळवितो, किंवा खाटकांचे चिरंजीव वजीर बनून ख्रिस्ती धर्माचे शंकराचार्यही होऊं पाहतात, म्हणून आमच्या पाश्चात्य मंडळीस इकडे तोच प्रकार सुरू करावासा वाटतो; व तो प्रकार इकडे सुरू होईपर्यंत सुधारणा थंबकून राहणार आहे असा ते सिद्धांत करतात. त्याप्रमाणेंच इंग्लंडांतील लोक मूर्तिपूजक नाहींत, व बेकन किंवा न्यूटन हे देवतार्चन किंवा पितृतर्पण करीत नसत, म्हणून वरील प्रकार सुधारणादेवीचे प्रतिपक्षी होत असें प्रमेय ताबडतोब त्यांच्या डोक्यांत ठाम होऊन बसतें. पण आम्हांस तर वरील प्रकारांचा आणि देशोन्नतीचा येवढा निकट संबंध कोणता आहे तो बिनचूक नजरेस येत नाहीं. आमच्या महाराष्ट्रांत येवढया अठरापगड जाती असतां कोंकणच्या ' भटां ' नीं * इतक्यांसही आपल्या बगलेंत

* अंक ७३ पृष्ठ ४ यांतील शतपत्र नंबर ६१ पहा.

मारून साऱ्या आर्यभूमीस पालाण घालून भोजराजा किंवा विक्रमादित्य यांचे दिवस येथें पुनः आणले कीं नाहीं ? मल्हारी धनगराचे जेव्हां मल्हार-राव बनले तेव्हां जोतीजींची 'गुलामगिरी' कोठें गेली होती बरें ? राघोबा दादा येवढा कर्मिष्ठ होता म्हणून अटक नदीवर केलेली श्रावणी त्याच्या तरवारीच्या आड कधीं आली काय ? उद्यां जर आम्हांस पार्लमेंटांत मेंबर होण्याचा अधिकार आला, तर ऐरिश समुद्रांत बुडणाऱ्या सूर्यास अर्घ्य-प्रदान केल्याबरोबर कर्णाची अस्त्रविद्या जशी त्यास समयीं स्फुरेना,त्याप्रमाणें आमची सरस्वती ही अंजल्युदकाबरोबर विगलित होऊन भर पार्लमेंटांत आम्ही कोरडे ठणठणीत होऊन उभे राहूं काय ? तेव्हां एकंदरींत पाहतां आमच्या नवीन पंडितांनीं काढलेल्या सर्व मीमांसा सुविचारापुढें एकदम शुष्कप्राय होऊन जातात. धर्म व व्यवहार हे कोणत्याही देशांत परस्पर-विरोधानें कधींही राहत नाहींत. दोघांची घासाघासी होण्याचीं वेळ आली असतां त्या घासाघासीनेंच क्रमाक्रमानें दोघांचीही सोय निघते. ख्रिस्ती धर्म येवढा सोज्वळ व सुधारणेस अत्यंत अनुकूल म्हणून त्याचा मिथ्या-स्तव तदनुयायी करतात, व तेंच तुणतुणें आमच्या इकडचे नूतन पंडितही पुढें चालवतात, पण वस्तुतः पाहतां वरील धर्मासारखा व्यवहारदृष्ट्या अप्रयोजक धर्म दुसरा फारच थोडा सांपडेल. आमच्या राज्यकर्त्यांचे सद्-गुरु साक्षात् ईश्वरपुत्र हे आपल्या अनुयायांस उपदेश करतात,–"बाबांनो, तुमच्या एका गालावर कोणीं मारली असतां दुसरा गाल पुढें करीत जा." "तुमच्याशीं दुसऱ्यानें जसें वागावें असें तुम्हांस वाटतें तसें दुसऱ्यांशीं वागत जा." "माझें राज्य या लोकींचें नाहीं, तर आकाशींचें आहे, व तें जवळ येत आहे." हा उपदेशाचा भाग झाला. आतां 'पवित्र शास्त्रां' तील आचारप्रकरण पहा. आदितवारीं ईश्वरानें विश्रांति घेतली, यास्तव सर्व मनुष्यांनीं त्या पवित्र दिवशीं विश्रांति घ्यावी, कांहींएक काम करूं नये, जो करील तो महापातकाचा अधिकारी होईल. त्याप्रमाणेंच ईश्वराची मोठी तुतारी शेवटल्या न्यायाच्या दिवशीं वाजणार आहे. यास्तव सर्वांनीं आपापल्या थडग्यांतून बाहेर पडण्याची त्या दिवसाची तयारी करून ठेवावी ! आतां वरील उपदेश व वरील आचार यांविषयीं जर विचार केला, तर साऱ्या ख्रिस्ती लोकांच्या माथीं ईश्वरदत्त आज्ञांचा केवळ भंग

केल्याचा चार्ज येत नाहीं काय ? एका थोबाडींत लगावली असतां दुसरें थोबाड पुढें करणारे ख्रिस्तपुत्र आज साऱ्या भूमंडळावर कितीसे आढळतील बरें ? येशूच्या नांवावर विकून प्रतिमासीं हजारों रुपये पोतडींत भरणाऱ्या पाद्रीसाहेबांवरच वरील चपेटिका प्रयोग केला असतां पोलिसास न बोलावणारे देवाचे लाल कितीसे सांपडतील ? क्लैव, हेस्टिंग्स्, डालहौसी, लिटन्, टेंपल्, वगैरे मंडळींची शेवटल्या दिवशीं ईश्वरपुत्र सपाटून पाठ थोपटील काय ? ही सारी खाशी मंडळी जर ख्रिस्ती होय, तर उमाजी रामोशास वरील न्यायाचे दिवशीं ख्रिस्तांचें अर्धासन कां मिळूं नये ? इंग्रेजांचा व साऱ्या ख्रिस्ती लोकांचा आज कित्येक शतकें जो एकंदर जगाशीं व्यवहार चालू आहे त्यास वरील ख्रिस्तप्रणीत द्वितीय सूत्र कितपतसें लागू पडेल बरें ? इंग्रेज लोक गेल्या शतकभर आमच्याशीं ज्या तऱ्हेनें वागले त्याच तऱ्हेनें इतरांनीं त्यांच्याशीं वागावें असें ते इच्छितात काय ? आम्ही उठून उद्यां इंग्लंडावर गेलों, आणि सारी दौलत आणून हिंदुस्थानांत भरली तर चालेल काय ? नाना तऱ्हेचे चरक लावून तेथील सारी प्रजा पिळून काढली असता तें आमच्या पाश्चात्य आर्यबंधूस कितीसे मानवेल बरें ? फुलर साहेबांनीं एका शिपायास मारलें आणि त्याच्या बायकोला तीस रुपये त्याच्या प्राणाची भरपाई म्हणून दिले, त्याप्रमाणेंच एखाद्या ख्रिस्तपुत्रास आकाशांतील बापाकडे रवाना करून मडमसाहेबांची समजूत वरील दक्षिणा देऊन केली, तर मोठी मौज होईल नाहीं बरें ? बिचारा क्रुसावर चढणारा येशू जर आपल्या शिष्यांस असें सांगतो, कीं मी तुम्हांस आकाशांतील राज्याचे वांटेकरी करीन, तर आजपर्यंत या सच्छिष्यांनीं साऱ्या पृथ्वीभर जो धिंगाणा घातला व अजूनही घालीत आहेत व नवी नवी रणसामग्री करून एकमेकांच्या उरावर बसण्यास ते जे नेहमीं टपलेले असतात, हा सर्व प्रकार ईश्वरपुत्राच्या कानांवर जेव्हां पूर्वोक्त दिवशीं जाईल तेव्हां त्यास काय वाटेल बरें ? आमच्या साध्याभोळ्या आदिपितरांतीं नुसतें झाडाचें फळ तोडून खाल्लें येवढ्यावद्दल जर अल्लासाहेब इतके क्रुद्ध झालें, तर त्यांच्या पुत्रास वरील आज्ञाभंग पाहून किती अपरिमित संतोष होईल कोण जाणे ! ! याप्रमाणेंच विश्रामदिवशीं काम केलें असतां महापातक लागतें या पवित्र आज्ञेचा तरी वरील सत्यधर्मी लोक कितीसा प्रतिपाळ करतात हे दिसतेंच

आहे; तसेंच जहाजावर जे जे मरतात त्यांचा अंत्यविधि 'समुद्रास्तृप्यंतु' या वचनास अनुसरून जो होत असतो त्या वेळेस तरी पवित्र शास्त्र गुंडाळूनच ठेवतात कीं नाहीं? कां कीं अटलांटिक किंवा पासिफिक महासागराच्या तळीं शेवंटल्या दिवशींची तुतारी वरील ख्रिस्तपुत्रांच्या कानीं पडेल हें म्हणणें नीट दिसत नाहीं; आणि त्याहूनही जी मंडळी माशांच्या उदरीं जाऊन त्यांचा तळीराम गार करीत असेल त्यांची तर बिचाऱ्यांची मधल्यामध्यें काय वाट होणार कोण जाणे! 'इतो भ्रष्टास्ततो भ्रष्टाः'!!' असो; तर एकंदरींत काय सांगायाचें, कीं ईश्वरप्रणीत व अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचा जो खासा ख्रिस्ती धर्म त्याची वर सांगितल्याप्रमाणें दशा आहे. त्यांतील अत्यंत मूलभूत सिद्धांतही व्यवहाराला अत्यंत विरुद्ध आहेत, त्याप्रमाणें जर कोणी चालेन म्हणेल तर त्यास बिचाऱ्यास एक पाऊलही पुढ टाकण्याची सोय नाहीं. मग असें असतांही आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंनीं जर आज इतकी मजल मारली, तर प्राच्य आर्यांनीं येवढें हवालदील होऊन हात टेकून कशाला बसायला पाहिजे बरें? आम्हांस तर खास वाटतें कीं, आजपर्यंत आमच्या खाशा विद्वन्मंडळानें आपल्या जुन्या धर्माच्या संबंधानें व भटांच्या नांवानें सदोदित हाकाटी करीत बसायाचें सोडून आपला देश सुधारायाचे कामीं जर एकदम कंबर बांधली असती, तर आजमित्तीलाच आम्हीं केवढा पल्ला आटपला असता! पण आजपर्यंत झालेला प्रकार कांहीं विचित्रच! मूर्तिपूजा ही आमच्या देशाच्या सुधारणेस अत्यंत विघ्नभूत, म्हणून ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरेंची स्थापना अवश्य झाली पाहिजे; जुने शास्त्री व जुनीं भटें मोठीं खडतर, म्हणून 'प्रथम पाटशाळेचा विध्वंस होउन हें पुरंधरचें बंड मोडलें पाहिजे;' जातिभेद हा तर मोठाच समंध, यास्तव सब् गोलंकार करण्याचा मक्ता पाश्चात्य सुधारणेचा केवळ अर्कच जो द्राक्षारस त्याच्याकडें सोंपून दिला पाहिजे; युरोपांत स्त्रियांच्या पाणिग्रहणास् कांहीं मर्यादा नाहींच, यास्तव चाळीस व पन्नास वर्षांच्या कोवळ्या वधूवरांचा संयोग होऊन लग्नाची टाळी वाजली पाहिजे; आमच्यांतले नामदारपुत्र प्रभृति एकेक जाडे जाडे पंडित तिकडे विलायतेस जाऊन पार्लमेंट गर्जवून देणार, यास्तव सोवळ्याओवळ्याचें मूर्खपणाचें लचांड काढून टाकण्याकरतां देहास पावन करणाऱ्या

बुटणेरी पावांचा ओनामा येथपासून पडला पाहिजे ! याप्रमाणें आमची सुधारणेच्छु मंडळी आजपर्यंत कोणीकोणीकडे भकून गेली आहे याचा पत्ता नाहीं; आणि इतके दिवस सुधारणेच्या मागें लागले असतां ती अद्याप धावली नाहीं तीं नाहींच ! नाहीं म्हणायला 'शिव शिव न हिंदुर्न यवन:' इतक्या मासल्याचे कांहीं चारचार कराबला मात्र आम्ही शिकलों आहों ! त्यांच्या योगानें आमच्या पूर्व स्वरूपास आम्ही मुकून हल्लींच्या दैन्य व विपत्ति यांच्या विलक्षण स्थतीस मात्र येऊन पोचलों आहों !–ना धर्म, ना सामर्थ्य, ना संपत्ति, ना कांहीं ! !

छिन्नोऽपि रोहति तरुश्चंद्रः क्षीणोऽपि वर्धते लोके ।
इति विमृशंतः सतः संतप्यंते न लोकेऽस्मिन् ।।*

'नीतिशतक'

अंक ८३--(१) विषयोपक्रम. (२) उपपत्ति व उपचार,

१. मागील अंकांत आमच्या राष्ट्राच्या संबंधानें आजपर्यंत विद्वन्मंडळानें काय काय निदानें ठरविलीं व काय काय चिकित्साप्रयोग केले ते सांगितले. आतां आम्ही आपली उपपत्ति व उपचार आमच्या देशबंधूंस सादर करून हा विषय आटपतों.

२. प्रथमत: आमच्या प्रस्तुतच्या ऱ्हासस्थितीची उपपत्ति. प्रस्तुत विषयावर आमच्या आजपर्यंत काय समजुती झाल्या आहेत त्या नुकत्याच आम्हीं प्रदर्शित केल्या आहेत, यास्तव त्या पुन: येथें दाखल करण्याची जरूर नाहीं. आमचा ठरलेला सिद्धांत आम्हीं मागेंच नमूद केला आहे, कीं आमच्या देशास कांहीं एक झालें नाहीं. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांही एक विकार नाहीं. यास्तव आमच्या अर्वाचीन पंडितमंडळीनें डाक्तरी पद्धतीस अनुसरून एकावर एक जालीम

---

* "झाड तोडलें तरी पुन्हां वाढतें, व चंद्रास क्षय लागला असतांहि तो पुन: वृद्धिगत होतो,—या सृष्टिधर्माकडे लक्ष देऊन सज्जन विपत्तींतही खचून जात नाहींत."

दवे सुरू करून व शस्त्रक्रियेचे तीव्र प्रयोग करून त्याची जी हलाखी मांडली आहे व विनाकारण विटंबना आरंभली आहे ती सर्व सोडून देऊन साधारण पौष्टिकाचे उपचार त्याजवर सुरू झाले असतां तो लवकरच पुनः पहिल्या-सारखा सशक्त व तेजस्वी होईल याविषयीं आम्हांस बिलकूल संशय नाहीं. हल्लीं जी आमच्या राष्ट्रास विपत्तीची स्थिति प्राप्त झाली आहे ती आमच्या अंगच्या कांहीं अनिवार्य दोषांमुळें आली नसून ती यदृच्छेनें कोणत्याही देशास येण्यासारखी आहे, व आजपर्यंत आलीही आहे. इंग्रेज लोक हे आम्हांहून अनेक प्रकारांनीं बलिष्ठ असल्यामुळें व आमचें दैव फिरल्यामुळें हल्लींच्या अवस्थेंत आम्ही येऊन पडलों आहों. ज्या प्रबलतेमुळें व ज्या सद्दीमुळें स्कॉटलंडसारखा वीर्यपरिप्लुत देश आमच्या राज्यकर्त्यांच्या सत्तेखालीं आला आणि फिलिप व नेपोलियनसारखे मी मी म्हणत त्यांच्यावर चढाई करून गेले असतां ते हतवीर्य होऊन माघारीं आले, त्याच दोन कारणांचा येथेंही प्रभाव गाजला आहे. बाकी ज्या देशांत शिवाजी, बाजीराव, माधवराव, राघोबा, हैदर, यशवंतराव, रणजितसिंग, तात्या टोपी, असलाले एकेक तरवारबहाद्दर होऊन गेले व बाळाजी विश्वनाथ, नाना फडनवीस, सखाराम बापू, महादजी शिंदा, नानासाहेब, असले मसलती पुरुष ज्या देशांत निपजले तो म्हणजे क्यापटन क्लैव सारख्यांस व वारन हेस्टिंग्स सारख्यासही हार जावा अशांतली बिलकूल गोष्ट नव्हती ! पण कालगति विचित्र आहे; त्या वैचित्र्यांतीलच आमची प्रस्तुतची स्थिति हा एक प्रकार होय.

आतां ही जी आमची सांप्रतची दुरवस्था हींतून सुटण्याचा कांहीं मार्ग आहे कीं नाहीं व असल्यास तो कोणता याविषयीं विवेचन करायाचें.

आमच्या प्रस्तुतच्या दैन्याचें मुख्य कारण काय आहे हें कोणालाही सांगायला नकोच. तें परकी अंमल हें होय हें उघडच आहे. इंग्रेज लोक इकडे प्रभु होण्यापूर्वी हा देश फार संपन्न होता व मुसलमानांची जुलमी म्हटलेली कारकीर्द सांप्रतच्या सुधारलेल्या कारकीर्दीहून शंभर वांट्यांनीं बरी वगैरे गोष्टी आलीकडे सिद्धांतासारख्या होऊन बसल्या आहेत, व प्रत्यक्ष इंग्रेज लोकही त्या बोलून दाखवितात, हें आज बहुधा सर्वांस माहीत असेलच असो; तर आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंचें आधिपत्य हें जर आमच्या विपत्तीचें मोठें कारण होय, तर तें नाहींसें झालें असतां आमची स्थिति

सुधारेल ही अर्थातच कोणाच्याही मनांत प्रथमतः मोठी कल्पना येणार आहे. तर आमचा व आमच्या राज्यकर्त्यांचा संबंध तोडून टाकून आपणांस सुखी करण्याचें आमच्या स्वाधीन आहे कीं काय याविषयीं पहिल्याप्रथम विचार करूं.

वरील उपाय म्हटला म्हणजे आम्ही आमच्या राज्यकर्त्यांशीं लढाइला उभें राहून त्यांचा पराजय करायचा, व आपलें राज्य पुनः आपलें आपण वहिवाटायाचें हा होय. आतां ही गोष्ट हल्लींच्या काळीं कितपत साध्य आहे हें बहुधा एकाद्या लहान पोरालाही कळण्यासारखें आहे. जो असंबंध सिद्ध करायास आमच्या पातालवासी बंधूंस आठ वर्षें घनघोर संग्राम करावा लागला व ऐरिश लोकांनीं आज शेंकडों वेळां झटापटी खाल्ल्या पण कांहीं एक झालें नाहीं, तो आमच्यानें आज तडीस जावयाचा म्हणजे खरेखुरेच मुसळास अंकुर फुटायाचे होत ! आमच्या राज्यकर्त्यांचें केवढें अपार सामर्थ्य व केवढा कट्टा सरंजाम, तसाच केवढा जगड्वाळ बंदोबस्त; आणि आमच्याकडे मंडळींत परस्पर किती सूत, आमची हल्लींची रणसामग्री किती, व युद्धकलेचें ज्ञान किती...सर्वच गोष्टी अनुकूल! असो; तर वरील थोरल्या उपायाच्या संबंधानें तर आज कोणी गोष्टही काढूं नये अशी सांप्रतची अवस्था आहे हें स्पष्टच आहे.

तेव्हां हें सिद्ध आहे कीं आम्हांस सांप्रतच्या दुरवस्थेंतून जर निघायाचें असेल तर आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांशीं बिघडून आम्हांस बिलकूल सोय नाहीं. जो प्रसंग पडला आहे त्यास सादर होऊन त्यांच्या सलोख्यानेंच जें काय कार्य होईल तेवढें करून घेतलें पाहिजे. हा सलोखा होण्यास दिवसेंदिवस अधिकाधिक सोईही होत चालल्या आहेत. पूर्वी टोपकराचा स्पर्श होतांच सचैल स्नान करावें अशा ज्या आमच्या ठिकाणीं आमच्या पाश्चात्य आर्यबंधूविषयीं समजुती होत्या त्या आतां पुष्कळ कमी होऊन त्यांचें वैभव व थोरवी हीं आतां आमच्या पुरती लक्षांत येऊन चुकलीं आहेत; त्याप्रमाणें हिंदु म्हणजे आफ्रिकेंतील नीग्रो लोकांचे बंधु ही जी आकाशांतील बापाच्या पवित्र लेंकरांनीं चोहोंकडे समजूत पसरून दिली होती तींतही आतां इतकें अंतर पडलें आहे कीं, जगाच्या चारी खंडांत गीर्वाण वाणीचा घोष सुरू होऊन अमेरिकेंतली मंडळी अर्धा गोल

वलांडून आम्हांस कडकडून भेटण्याकरितां व आमच्या प्राचीन ऋषींचा आम्हांपासून अनुग्रह घेण्याकरितां आम्हांकडे उड्या टाकूं लागली आहे. तसेंच अर्वाचीन शास्त्रांनीं व कलांनीं सारें भूमंडल एकमय करून टाकून 'पवित्र शास्त्रां'तील सार्वलौकिक बंधुत्वाचें जें पोकळ मत त्यास यथार्थता आणण्याचा योग आणला आहे. खेरीज या शतकांत राजांच्या सत्तेस धक्का बसून त्यांचें माहात्म्य किती कमी होत चाललें आहे, आणि लोकप्रभुत्व व स्वातंत्र्य हीं तत्त्वें चोहोंकडे किती जारीनें पसरत चालली आहेत हेंही आज कोणाही शोधक मनुष्याला अश्रुत नाहीं. तर वरील सर्व गोष्टींचा विचार केला असतां या देशाविषयीं कळकळ बाळगणाऱ्या कोणाही मनुष्यास मोठी उमेद येण्यासारखी आहे कीं, हल्लींच्या निकृष्टावस्थेंतून निघून हिंदुस्थाननें पुनः आपलें नांव जगांत गाजवावें असें होण्यास दिवसेंदिवस अधिकाधिक उपाय सिद्ध होत आहेत.

आतां वरील उपाय कोणते, त्यांची योजना कोणत्या तऱ्हेनें झाली पाहिजे, व आजपर्यंत आमच्या मंडळींचें काय काय चुकत होतें, वगैरे गोष्टींच्या संबंधानें आम्ही आपले विचार आमच्या देशबंधूंस सादर करतों.

मनुष्याची किंवा राष्ट्राची सुधारणा करायाची म्हटली म्हणजे तिचा पाया आत्मस्थितीचें पूर्ण ज्ञान हें होय. ज्यास आपली अवस्था काय आहे, पुढें काय होणार, आपलें बळाबळ किती, वगैरे गोष्टींचें चांगलेसें ज्ञान नाहीं त्याची स्थिति कधीं सुधारायाची नाहीं. तर आमच्या लोकांस प्रथमतः स्वतःविषयीचें ज्ञान करून देणें अवश्य होय. आतां स्वतःविषयींचें ज्ञान म्हणजे काय अशी कोणीं पृच्छा केली तर तिचें उत्तर असें आहे. साऱ्या जगाची स्थिति हल्लीं काय आहे, आलीकडे निरनिराळ्या संबंधांनीं पृथ्वींतील देशांचे परस्परांशीं व्यापार कसें सुरू आहेत, त्यांत या आमच्या देशाचें इतरांशीं दळणवळण कोणत्या प्रकारचें आहे, आमच्या राष्ट्राची पूर्वीं स्थिति कशी होती व हल्लीं कशी आहे, या स्थित्यंतराची उपपत्ति काय, आपली पुनः भरभराट होण्यास कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत, इत्यादि विषयांवर सर्वांचे यथार्थ समज होणें हें अगोदर फार जरूरीचें आहे. जोंपर्यंत हें होणार नाहीं तोंपर्यंत हल्लींसारखेंच पोकळ लोककल्याण व रिकामी बडबड चालेल. व वास्तविक उपयोगाचें असें कांहीं एक होणार

नाहीं. उघडच आहे कीं, ज्याला आपणांस कांहीं रोग जडला आहे हीच मुळीं कल्पना नाहीं तो औषधक्रियेची तजवीज कशाला करील ? तो मूर्खपणानें कुपथ्यावर कुपथ्यें करून ऐन त्रिदोषाच्या वेळेस मात्र हाका मारीत बसेल, तर ज्यास आपली प्रकृति नीट करून शरीर दृढ करायाचें असेल त्यानें प्रथमतः आपल्या प्रकृतीचें मान समजून घेणें जसें अत्यावश्यक होय, त्याप्रमाणेंच येथेंही प्रत्येक मनुष्यास आपल्या देशाची स्थिति पूर्णपणें लक्षांत येऊन आपलें वळावळ जेव्हां त्याच्या पुरतेपणीं मनांत भरेल तेव्हां आमच्या सुधारणेला आरंभ झाला असें खास म्हणतां येईल. आतां ही साऱ्या राष्ट्राची जागृति व्हावी कशी ? हा वरच्याच्या पुढला विचार होय. पण याचाही निकाल करणें फार कठीण आहे असें नाहीं. अज्ञानध्वंसनाचीं आलीकडे जशीं जबरदस्त साधनें उपलब्ध झालीं आहेत, तशीं पूर्वीं कधींही नव्हती. छापखाने, आगगाडया, आगबोटी, डाका, तारायंत्र वगैरे अर्वाचीन कला हीं सर्व युद्धांत कामी पडणारीं कशीं केवळ दिव्य अस्त्रेंच होत असें म्हटलें असतां चालेल. पण हीं सर्व स्वतः केवढींही प्रबळ असलीं तरी उपयोग काय? पंतांनीं आपल्या प्रसिद्ध महाकाव्यांत म्हटलें आहे:-

सहाय असिला असे तरचि शत्रुला मारवे ।

मोठी भवानी तलवार असली तरी तिचें पाणिग्रहण जेव्हां 'यवन-कुंजरशिरपर' चढणाऱ्या 'सिंहा'नें करावें तेव्हां तिचें पाणी खळाळणार, नाहीं तर कोंडून राहिलेल्या डबक्याप्रमाणें तें जागच्या जागींच मठ्ठ बसून राहणार !

तर वरील महासाधनांच्या द्वारें आमचा येवढा सारा देश जो कुंभकर्णासारखा निद्रापद भोगीत व स्वस्थ व सुस्त होऊन पडला आहे त्यास हाल हालवून जागें करण्याची प्रथमतः तजवीज झाली पाहिजे. ह्याच प्रकार यापूर्वीं साऱ्या युरोपांत, फ्रान्स देशांत व रशियांत झालेला आहे. अवघें युरोपखंड हें सोळाव्या शतकापूर्वीं आमच्या देशाप्रमाणेंच स्वस्थपणें घोरत पडलें होतें. पण चीन देशांतून मुद्रणकलेनें येऊन पाश्चात्य राष्ट्रांचे ठायीं वस्ती केली मात्र तों लागलीच पन्नास साठ वर्षांत जिकडे तिकडे चळवळ सुरू झाली. जुन्या ग्रीक व लाटिन ग्रंथांचा साऱ्या देशांत अभ्यास व्हावयाला लागून युरोपची बुध्ददेवता फार दिवसपर्यंत जी निद्रिस्त झाली

होती ती एकाएकीं जागृत झाली. हिचें फळ सोळाव्या शतकांतील जगत्प्रसिद्ध धर्मक्रांति हें होय. याप्रमाणेंच फ्रान्स देशांतही अठराव्या शतकापर्यंत बिलकूल गडबड नसून हवी तशी अंदाधुंदी चालली होती, व एकंदर सष्ट्र हें मेंढवाडयासारखें होऊन गेलें होतें. सरकारी अधिकाऱ्यांनीं हवे तसे जुलूम करावे, आणि ते खुशाल खपले जावे. पण व्हॉलेटर् प्रभृति महान् महान् ग्रंथकारांनीं देशभाषेच्या द्वारें लोकांचें मन क्षुब्ध करून त्यांस सुजाण केल्याबरोबर वरील शतकाच्या शेवटीं अशी धुमश्चक्री उडाली कीं तिनें फ्रान्सच काय, पण सारें युरोपखंड खळबळून सोडलें ! अशाच प्रकारचें तिसरें उदाहरण रशियन लोकांचें होय. हे लोक अद्यापही आडदांड व दांडगे असेच आहेत, व त्यांची गणना सरासरी अर्धवट रानटी लोकांतच आहे. मग दोन शतकापूर्वी तर त्यांची अवस्था काय असेल ती पहा ! पण तसल्या स्थितींतही त्यांचा राजा **पीटर दि ग्रेट** यानें जातीनें अचाट मेहेनत करून त्यांची सुधारणा करण्याचें मनांत आणलें, आणि पांचपंचवीस वर्षांत आपल्या राष्ट्रांत अतोनात फरक करून सोडला. तो इतका कीं रशियाचें संस्थान आज साऱ्या युरोपांत प्रबळ होऊन बसलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं ! असो; तर ज्ञानाच्या प्रसाराचा महिमा असा विचित्र आहे.

तेव्हां आमच्या देशाची हलाखी पाहून ज्यास खरोखर दुःख होत असेल, व तिजपासून त्याची सुटका व्हावी म्हणून जे झटत असतील, त्यांनीं वरील ज्ञानांजनाचा प्रयोग करण्याचें मनावर घेतलें पाहिजे. सर्व क्रियेचें मूळ मन आहे, यास्तव तेंच सुविचारसंपन्न व पोक्त झालें असतां केवढा फायदा होणार वरें ! ही गोष्ट येवढी स्पष्ट असतांही तिजकडे आमच्या आजपर्यंतच्या पुढारी मंडळीचें कांहींच लक्ष पोंचलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. देशहिताची दीक्षा विद्यापीठांतील भट्टाचार्यांपासून घऊन निघाल्यावर आमच्या नूतन पंडित मंडळीनें करावें काय, तर सरकारी हुद्दे मिळवावे, जन्मभाषेची व आपल्या देशाची ओळख विसरून जाऊन पाश्चात्य भाषेंत निरंतर अद्वातद्वा प्रलाप करावे व आपल्या राज्यकर्त्यांचें सर्व प्रकारें अनुकरण करून मोराचीं पिसें लावून आयता थोरपणा मिळवूं पाहणाऱ्या डोमकावळ्याच्या पंक्तीला बसावें, आणि लोककल्याणाची मोठी शिकस्त काय, तर मोठा तंबुरा घेऊन आकाशांतील बापाच्या कानीं सुस्वर आक्रोश

पाडावा, किंवा मिशनरी साहेब जसें एखाद्या 'वेड्या कोकरा' ला घेऊन आपल्या कळपांत ओढून नेतात, त्याप्रमाणें एकादा उपटसुंभ्या बघावा आणि एकाद्या हतभाग्य देशभगिनीचा व त्याचा योग करून देऊन आपण मुकाटचानें निसटून जावें ! ज्यांच्या शिरावर साऱ्या देशसुधारणेचा भार, व जे आपणास अटोकाट शहाणे समजून आपल्या देशबंधूंचें विपत्तिरूप महागर्तेंतून उध्दरण करणार, त्यांच्या वरील कृति पाहून कोणास आश्चर्य व खेद हीं वाटणार नाहींत! प्रार्थनासमाजीय तंतुवाद्यांच्या शंभर भोपळचांनीं तरी हा विपन्मग्न देश तरण्याचा संभव आहे काय ? त्यांचा कर्णमधुर व पवित्र रव हिंदुस्थानच्या वीस कोटी प्रजेच्या कानीं कधीं पडणार ! आणि तो पडला असें जरी मानलें तरी त्यापासून या भरतवर्षाची उन्नति होण्याचा कितीसा संभव आहे याविषयीं आम्हांस फार संदेह आहे. ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज हे जरी खूप जारीनें सुरू झाले तरी त्यांत देशास किफायत ती काय होणार ? इतर शेंकडों पंथ आहेत त्यांत हेही आणखी सामील होतील, दुसरें काय ? त्याप्रमाणेंच आलीकडे पूर्वीचे संप्रदाय मोडून टाकून हवे तसे गमतीचे विवाह जे होत आहेत त्यांपासून तरी काय निष्पन्न होणार असेल तें असो ! इकडील एकादी फांकडी मिस् (कुमरी) आणि तिकडचा एक घोटक ब्रह्मचर्य आचरणारा गोरा नवरा यांचा गांधर्वविवाह झाल्यानें आमच्या देशसुधारणेचें तारूं जर पुढें ढकललें जाणार तर वटोदार मुक्कामीं कांहीं वर्षांपूर्वी जो कपोतविवाह येवढया कडाक्यानें गाजला तोही देशोन्नतीची पताका फडकण्यास. परम साधनीभूत म्हणून समजायला नको काय ? एकंदरींत पाहतां आम्हांस वरील प्रकार केवळ बालिशत्वाचे वाटतात. त्यांत व देशोन्नतींत ज्यांस कार्यकारणभाव दिसत असेल त्यांचें तार्किक आमच्याहून फार निराळें आहे असें म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे !

तर देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय. ही संपन्नता सिद्ध करण्याचीं मोठीं दोन साधनें म्हटलीं म्हणजे रसना व लेखनी हीं होत. पहिल्या सदराखालीं शाळा, व्याख्यानें हीं येतात; दुसऱ्याखालीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व ग्रंथ हे येतात. या दोन्ही साधनांचा उत्कर्ष होऊन या अज्ञानांध राष्ट्राचे डोळे

उघडावे एतदर्थ आमच्या थोर व दयाळू सरकारनें आजपर्यंत थोडा उद्योग केला आहे असें नाहीं. युनिवर्सिटी (विद्यापीठ), विद्यालयें, शाळा, वगैरेंची स्थापना करून आज वर्षोनवर्षें त्यांची व्यवस्था चालविली आहे, व देषभाषांची अभिवृद्धी व्हावी म्हणूनही होईल तितका यत्न सरकारानें केला असून अजूनही तो चालू आहेच. पण सरकारानें आपलें काम बजाविलें म्हणून तितक्यानें काय झालें ? आम्ही स्वत: मोठे कर्तृत्वाचे पडलों ना ! आमच्या तोंडावर अचानक जांभूळ पडलें तरी तें आंत लोटायालाही आणखी कोणी पाहिजेच ! आमची मर्दुमकी असली कीं रडतरावाप्रमाणें आम्हांला घोडयावर बसवून शिवाय आमच्या हातून लोकांनीं तरवारही मारविली पाहिजे ! वस्तुत: पाहतां सरकारनें जर इतका पल्ला मारला, तर बाकीची मजल आम्ही मोठया संतोषानें व उत्साहानें केव्हांच आटपावी. येवढा ज्ञानाचा प्रवाह आडवून त्याची मालकी जर आमच्या सरकारनें आमच्या नवीन बांडांस दिली, तर नलिकाद्वारें घरोघर उदकसंचय करण्याचें अल्पस्वल्प कामही त्यांच्यानें होऊं नये ? पण हें करतो कोण व गरज कोणाला ? शिवाय असें करण्यापासून कांहीं फायदा होण्यासारखा आहे हें तरी कोणाच्या अंत:करणांत बिंबलें आहे ? आमच्या भाषेंत म्हण आहे कीं, ' डोळयांत केर आणि कानांत फुंकर '; तर याच न्यायानें सारी व्यवस्था चालली आहे. आमची अन्नान्नगत झाली आहे, दुष्काळाचा तडाका उडाला म्हणजे लाखों लोकांची चांदी उडते आहे, सरकारदेण्याखालीं रयतेचा चुराडा होत आहे, लोकांस आगल्या सामान्य हक्कांचे व सामान्य गोष्टींचें सुद्धां ज्ञान नसून त्यांच्या अभावीं त्यांची स्थिति पशुवर्गांसारखी होऊन गेलेली आहे; एवढा हा संपन्न देश असतां, येथील लोकसंख्या येवढी असतां, लोकांची बुद्धि येवढी प्रखर असतां व आहे तेथें अर्थसंचयही विपुल असतां कल्पवृक्षाखालीं उपवास या न्यायानें इतकी प्रजा व्यर्थ हाल सोसते आहे,—ही स्थिति सर्वांच्या डोळयांसमोर आहे; आणि देशोन्नतीचे धुरंधर वरील विपत्तींच्या प्रतिकारार्थ उद्योग काय करीत आहेत म्हणाल, तर एक आकाशांतील बापास आरोळी देत आहेत, दुसरे आपल्या लेडीकरवीं कोणा गौरकाय अधिकाऱ्याचें हस्तपीडनपूर्वक स्वागत करताहेत, कोणी पार्लमेंटच्या गर्दीत गुंग होऊन गेले आहेत, कोणी अर्वाचीन सोम-

रसांत तल्लीन होऊन जातिभेदरूप महान् अनिष्टांचा उपशम होऊन या देशास आराम पडावा म्हणून अर्वाचीन ऋषींचा तांडा जुळवून गवालंभाचें अनुष्ठान करीत आहेत, कोणीं सरकारी अधिकाऱ्यांचे प्रतिदिवशीं उंबरठे पुजून त्यांच्यापुढें निरंतर लांगूनचालन करीत आहेत. इ. इ. ! हा सर्व प्रकार आम्हांस तर केवळ लज्जास्पद दिसतो. मेकॉले सारख्यांनीं जेवढी भवति न भवति करून वर येवढा अट्टाहास करून जी नवीन शिक्षणपद्धति सुरू केली तिचीं वर सांगितलीं हींच फळें काय ? त्यांनीं लावलेल्या उत्तम वृक्षास दरवर्षीं येवढा मोहोर येत असतां तो बहुधा सगळाचा सगळा गळून जावा आणि फळ म्हणून प्रायः मुळींच धरूं नये ही केवढी खेदाची गोष्ट आहे ! आमच्या राष्ट्रांचे पालक म्हणून ज्यांस सरकारानें नेमलें आहे त्यांनीं आपला अधिकार किती उत्कृष्ट रीतीनें आजपर्यंत बजावला वरें ?

———

टीपा

निबंध १ ला–विद्वत्त्व आणि कवित्व

सारांश –

या निबंधांत विद्वत्त्वाचा आणि कवित्वाचा कांहीं संबंध आहे का हें तपासून पाहण्याचा लेखकाचा उद्देश आहे. विद्वान् झाला कीं तो कवि झालाच, किंवा कवि असला कीं तो विद्वान् असावयाचाच, असा सिद्धान्त मांडतां यावयाचा नाहीं. कवित्वाला विद्वत्त्व पोषक होईल, पण विद्वत्त्व असलें कीं कवित्व असतेंच असें मात्र म्हणतां येत नाहीं. छंदोबद्ध रचना म्हणजे काव्य नव्हे. तो तिचा बाह्य वेष आहे. यमक, अनुप्रासादि अलंकारांची रेलचेल असली कीं काव्य, असेंहि काव्याचें लक्षण घालून देतां येणार नाहीं. यमक-अनुप्रासादिकांनीं चमत्कार वाटेल, पण तें काव्य मात्र नाहीं. श्लेष, अलंकार असला कीं काव्य हीहि चुकीची समजूत आहे. नादमाधुर्य हेंहि काव्याचें लक्षण नव्हे. रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य ही विश्वनाथाची साहित्य-दर्पणांतील व्याख्या शास्त्रीबुवांच्या पसंतीस उतरलेली आहे. काव्यानें अंत:करणाचा ठाव घेतला पाहिजे. 'अनलंकृति पुन: क्वापि' म्हणजे काव्याला अलंकार अवश्य आहेतच असें नाहीं. जें वाचल्यानें किंवा ऐकल्यानें मनाच्या वृत्ति प्रसन्न होऊन तो तो रस अंत:करणांत सहज बिंबून जातो त्याला काव्य असें म्हणावें. "Poets are born, not made." काव्यशक्ति ही नैसर्गिक देणगी आहे. ह्या शक्तीनेंच काव्याची निर्मिति होते व ह्या शक्तीच्या अभावीं काव्य उपहासास्पद होतें. अर्थाच्याच केवळ अंगभूत सौंदर्यानें व अर्थव्यंजक शब्दांच्या अपूर्व सौष्ठवानें मनास चमत्कार भासविण्याची शक्ति म्हणजे काव्य. ह्या शक्तीसच कांहीं लोक ईश्वरी प्रेरणा म्हणतात. कवितेचा विषयहि अपूर्व असावा लागतो असेंहि नाहीं. काव्यामध्यें प्रतिक्षणीं नवीनच गोडी उत्पन्न होते. विद्वत्त्व आणि कवित्व यांत अभेद आहे असा लोकांचा गैरसमज झालेला दिसतो. कवि या शब्दाचा मूळ अर्थ शहाणा असण्याचें कारण कवींनीं संपादन केलेली विद्या हेंच होय. म्हणून पूर्वी कवि असला म्हणजे तो विद्वान् असावयाचाच असें दृष्टीस पडे, पण याच्या उलट मात्र खरें नाहीं. म्हणजे जे विद्वान् आहेत ते कवीच असले पाहिजेत असें नाहीं. तर्ककर्कश शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या पंडितांनीं काव्याचा 'रंडागीतें' म्हणून अधिक्षेप केला आहे. कवित्वास विद्वत्तेची

अगदीं जरूर नाहीं. निरनिराळ्या शास्त्रांत गति असणें हें कवित्वास पोषक नाहीं, किंबहुना तें प्रतिकूलच ठरेल. चंद्र हा काव्यात्मक विषय आहे. पण पदार्थविज्ञानशास्त्रें या कवितेचा समूळ विध्वंस करून टाकतात. बुद्धीची प्रगल्भता ही कल्पनाविकासाची पुढील पायरी आहे. हल्लीं विवेचनशक्तीचा जोर वाढीस लागल्यामुळें कल्पनेचें प्राबल्य कमी झालें. सुधारणा कवितेस प्रतिकूल होय. कवितेची वाढ सज्ञानतेच्या काळीं खुंटते. कवि शब्दाचा धात्वर्थ 'गाणारा' असाहि आहे. कवींच्या अंगीं सहृदयता असावयास पाहिजे. नवरस आणि नानाविध वृत्ति स्पष्टत्वानें भासल्या पाहिजेत. मनाच्या खळबळीसरसे जे उद्‌गार आपोआप निघून जातात, ते उद्‌गार म्हणजेच काव्य. कवितेचें मूळ रूप साधें आहे. तिला थाटमाट पसंत नाहीं. पदलालित्य, माधुर्य, सरलता, निर्दोष छंद हे रसयुक्त काव्याचे गौण भाग आहेत. अश्लीलत्व आणि चावटपणा कवितेला बाधक आहेत. पदलालित्यानें काव्यास शोभा येते, पण तें काव्याचें सर्वस्व नव्हे. जो जात्या कवि आहे तो कदाचित् विद्वानहि असेल. कवित्वास किंवा रसिकतेस बाधक म्हणजे विद्वत्ताच होय.

टीपा

अप्रबुद्ध — अज्ञानी, अडाणी.

अमरकोष— अमरसिंहानें रचलेला संस्कृत शब्दांचा श्लोकबद्ध कोश.

भर्तृहरि— हा एक व्याकरणकार होऊन गेला. इ. स. ६५० मध्यें याचा मृत्यु झाला.

कारिका— व्याकरणाचा भाग ज्यामध्यें आलेला आहे असे श्लोक.

वाग्भट— वैद्यकीय शास्त्राचा एक प्रख्यात लेखक.

रघुवंश— कालिदासविरचित महाकाव्य.

शेक्सपीयर— जगप्रसिद्ध इंग्रजी नाटककार.

मोरोपंत— बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या पदरीं मोरो रामचंद्र पराडकर या नांवाचे पुराणिक होते. त्यांनीं संपूर्ण महाभारत मराठींत लिहिलें. यालाच आर्याभारत असें म्हणतात. मोरोपंतांना यमकें जुळविण्याचा मोठा नाद होता. संपूर्ण ओळींचींसुद्धां यमकें त्यांनीं जुळविलेलीं आहेत.

अष्टावधानी— आठ ठिकाणीं एकाच वेळीं लक्ष पुरविणारा मनुष्य.

श्लेषप्रिय— शब्दांतून अनेक अर्थ काढून कवीच्या मनांत नसलेलेहि अर्थ उघड करून दाखविणारे लोक.

दुर्विदग्ध— खोटी विद्वत्ता धारण करणारे किंवा विद्वत्तेचा फाजील अभिमान बाळगणारे.

मुग्धविलास— न बोलतां नुसत्या हावभावानें आणलेलें रमणीयत्व.

मीमांसा— वेदांचा अर्थ सांगणारें शास्त्र.

पूर्वपक्षन्याय— न्याय म्हणजे विचारांना शुद्ध स्वरूप देणारें शास्त्र. यालाच तर्कशास्त्र असेंहि म्हणतात. यांत पूर्वपक्ष आपली बाजू मांडतो व उत्तरपक्ष त्या बाजूचें खंडण करतो.

शंकराचार्य— उपनिषदें, ब्रह्मसूत्रें व भगवद्गीता इ. वर भाष्य लिहिणारे, संन्यास मार्गाचे आद्य प्रवर्तक.

कालिदासाचें .... पदरीं आलें असतें— विष्णुशास्त्र्यांच्या उपहासगर्भ शैलीचा आविष्कार.

दादोबा पांडुरंग (तर्खडकर)— मराठीचे आद्य व्याकरणकार. विष्णुशास्त्र्यांच्या पूर्वीच्या पिढींतील ग्रंथलेखक आणि समाजसुधारक.

केकावली— मोरोपंतांचें स्वतंत्र काव्य. मोरोपंत स्वत:ला मयूरपंत म्हणवीत. मयूराच्या केका म्हणजे आर्तस्वर. मोरोपंतांनीं या स्वतंत्र काव्यांत परमेश्वराची आर्तस्वरानें आळवणी केलेली आहे. दादोबा पांडुरंगांनीं यावर 'यशोदा पांडुरंगी' या नांवाची विस्तृत टीका लिहिली आहे. 'ते मोठे ग्रंथकार व लोकोपकारी सद्गृहस्थ होते' असा विष्णुशास्त्र्यांनीं त्यांचा गुणग्राही निर्देश केला आहे.

चंबू— लहानशी पगडी.

गजरेदार अंगरखा— अंगरख्याच्या बाहया लांब असून त्या चुणून मनगटापर्यंत बसवावयाच्या.

वाक्यं रसात्मकं काव्यम्— अशी साहित्यदर्पणांत विश्वनाथानें काव्याची व्याख्या दिलेली आहे. वर्ड्स्वर्थनें केलेलें काव्याचें लक्षण— The spontaneous overflow of powerful feelings. कोलरिज् कवीनें The best word in the best order अशी काव्याची व्याख्या केली आहे.

बाळमित्र— मूळ इंग्रजी ग्रंथाच्या आधारानें सदाशिव काशीनाथ छत्रे यांनीं १८२८ मध्यें बाळमित्राचा पाहिला भाग प्रसिद्ध केला. 'भाषांतर हया दृष्टीनें हा ग्रंथ फारच उत्कृष्ट वठलेला आहे. छत्रे यांचे अंगीं मोठी कर्तबगारी होती व त्यांचा 'बाळमित्र' नांवाजण्यासारखा झालेला आहे' असा म. म. पोतदार यांचा अभिप्राय आहे.

इसापनीति— इसाप हा एक गुलाम होता. त्यानें ग्रीक भाषेमध्यें आपल्या गोष्टी लिहिल्या व त्यांतून लोकांना नीतिबोध शिकविला.

अरबी भाषेंतील गोष्टी— अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टींचें मराठींत भाषांतर, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं केलें आहे. तें भाषांतर चांगलें उतरलें आहे.

मुक्तामाला— हळबे यांनीं लिहिलेली मराठी कादंबरी.

थोरले माधवराव व जयपाळ— हीं नाटकें वि. ज. कीर्तने यांनीं लिहिलेलीं आहेत. "वीस वर्षांच्या एका तरण्या बांडानें या वेळीं महाराष्ट्र रसिकवर्गाला आपल्या एका नाटककृतीनें वेड लावलें तेंच हें 'थोरले माधवराव पेशवे' नाटक होय. हा तरुण विनायक जनार्दन कीर्तने होय."— (पोतदार). विद्वान् व थोर गृहस्थांच्या स्तुतीसहि तें पात्र झालें. हास्य व करुणरस यांत सुंदर वठविला आहे. १८६५ मध्यें चार वर्षांनीं त्यांनीं दुसरें 'जयपाळ' नांवाचें नाटक लिहिलें. हें पांच अंकी नाटक आहे. प्रस्तावना इंग्रजींत आहे. हें नाटक ऐतिहासिक नाहीं. या नाटकांतील पात्रांचें स्वरूप स्वाभाविक व मनोरंजक उतरलें आहे.

संस्कृत श्लोकांचा सरळ अर्थ— "तमसा नदीच्या तीरावर येऊन जवळ बसलेल्या शिष्याला तें निर्मळ तीर्थ पाहून मुनि म्हणाले, 'हे भारद्वाजा, हें तीर्थ निर्मळ आहे व सज्जनाचें मन ज्याप्रमाणें असतें, त्याप्रमाणें हें तीर्थ रमणीय व प्रसन्न आहे. त्याचप्रमाणें येथील वाळूहि मऊ आहे. व या तीर्थांतील पाणीहि चांगलें आहे. येथेंच कलश खालीं ठेव व माझीं वल्कलें मला दे." या आद्य कवीच्या काव्याचें शास्त्रीबुवांनीं केलेलें परीक्षण त्यांच्या अंगीं असलेल्या रसज्ञतेचें द्योतक म्हणून सांगतां येईल.

मोर्तब— मूळ अर्थ क्रम. पसंतीचा शिक्का मारला जाणें.

क्रौंच पक्ष्याचा वृत्तान्त— क्रौंच पक्ष्याचें जोडपें झाडावर बसलेलें असतांना त्यांतील नरास एका पारध्यानें ठार मारलें व त्या उद्रेकांतच 'मा निषाद प्रतिष्ठां त्वं अगमः शाश्वतीः समाः । यत् क्रौंचमिथुनादेकं अवधीः काममोहितम् ॥ असे उद्‌गार वाल्मीकींच्या तोंडून बाहेर पडले.

त्या निषादाची उपमा साजेल— वरील श्लोकांत उद्धृत केलेल्या निर्दय पारध्याचीच उपमा त्यास साजेल.

तें ईश्वरावेंच देणें होय — प्रतिभाशक्ति ही ईश्वरदत्त असते. ती असतांना काव्य निर्माण होतें, व ती नसतांना काव्य उपहासास्पद होतें. 'तें देणें ईश्वराचें.'

ज्ञानेश्वरी— श्रीज्ञानेशांनीं लिहिलेली भगवद्गीतेवरील मराठी टीका.

ओव्यांचा मथितार्थ— पाऊस पडो किंवा न पडो, समुद्र जसा पाण्यानें भरलेला असतो त्याप्रमाणें भगवद्भक्त संतुष्ट असतो. कोणाच्याहि मान-सन्मानाची त्यास अपेक्षा नसते. आकाश ज्याप्रमाणें विशाल पण उदासवाणें दिसते. त्याप्रमाणेंच त्या भगवद्भक्ताचें मन होय. संसारांतील व्यथांनीं जो विरागी बनला तो पारध्याचे हातून सुटलेल्या पक्ष्याप्रमाणें होय. आपल्या घरींच उजेड करावा आणि परकीयांच्या घरीं अंधार पाडावा असें दिवा करीत नाहीं. आपले तुकडे करण्यासाठीं जो घाव घालतो किंवा जो आपली लावणी करतो त्या दोघांनाहि वृक्ष एकच सावली देतो. जो निंदा अंगास बोचूं देत नाहीं व स्तुतीनें हुरळून जात नाहीं असा भगवद्भक्त आहे. आकाशाला ज्याप्रमाणें लेप लागत नाहीं, त्याप्रमाणें भगवद्भक्तहि विकारा-तीत असतो. (ज्ञानेश्वरी अध्याय १२ वा.)

तुकारामाच्या अभंगाचा अर्थ स्पष्ट आहे म्हणून दिला नाहीं. त्यापुढील वनाचें वर्णन एकनाथांचे नातू मुक्तेश्वर यांनीं लिहिलेल्या महाभारतांतून घेतलेलें आहे. कण्वमुनींच्या आश्रमाचें हें वर्णन आहे.

प्रतिक्षणीं नवीच दे रुचि— रमणीय तेंच कीं ज्याची रमणीयता क्षणोक्षणीं वाढत असते व जी रमणीयता अवीट असते.

भवभूति— संस्कृतांतील विख्यात उत्तररामचरित नाटकाचा कर्ता.

रंडागीतानि काव्यानि— वेदाभ्यासजड आणि घटपटादि खटपट करणारे काव्याचा अगदीं खालच्या प्रकारचें वाङमय म्हणून तुच्छतेनें उल्लेख करतात.

शाक्यमुनि— गौतम बुद्ध.

पान १५ श्लोकार्धाचा अर्थ—" सर्व गुण एके ठिकाणीं ठेवण्यास ब्रह्मदेव तयार नसतो. "

होमर— एक ग्रीक महाकवि. याचें 'इलियड' हें काव्य प्रसिद्ध आहे.

थ्युसिडिडीस— हा ग्रीक इतिहासकार होता.

ॲरिस्टॉटल्— ग्रीक तत्त्वज्ञ, आणि निरनिराळ्या मौलिक ग्रंथांचा कर्ता.

ॲलेक्झांडर— सर्व जग पादाक्रांत करण्याची महत्त्वाकांक्षा वाळगणारा मॅसिडोनियाचा राजा. हा ॲरिस्टॉटलचा शिष्य होय.

प्रसन्नराघव— नाटक. कर्ता जयदेव. हा तेराव्या शतकांत होऊन गेला.

स्वकपोलकल्पित— स्वत:च्या मनानें रचलेलें.

शृंगारवीरकरुणा— हीं नवरसांतील पहिल्या तीन रसांचीं नांवें आहेत. अद्‌भुत, हास्य, रौद्र, भयानक, शांत आणि बीभत्स हे उरलेले रस होत.

सिसिरो— रोमन वक्ता.

कॅटिलाईन्— हाहि एक रोमन राजकारणी पुरुष होता.

जॉन्सन्— प्रख्यात इंग्रजी कोशकर्ता.

पोप— विख्यात इंग्लिश कवि.

ड्रायडन्— हाहि विख्यात इंग्लिश कवि होऊन गेला.

अथेल्लो— या नांवाचें शेक्सपियरचें नाटक.

कालिदास— कविकुलगुरु.

बर्न्स्— इंग्लिश कवि. स्कॉटलंडांत १८ व्या शतकांत होऊन गेला.

मिल्टन्— विख्यात इंग्लिश कवि.

बायरन् लॉर्ड— विख्यात इंग्लिश कवि. मृत्यु सन १८२४.

श्रीहर्ष— नैषधीय चरिताचा कर्ता.

ट्रोजन— 'इलियड' ह्या काव्यांत वर्णिलेल्या लढाईंत ट्रॉय शहराला वेढा पडला होता. ह्या ट्रॉय शहरांतील लोकांनाच ट्रोजन असें म्हणतात.

हॉलम्— इंग्लिश इतिहासकार.

वर्जिल— इटालींतील महाकवि.

जगन्नाथराय— सतराव्या शतकांतील एक संस्कृत कवि व पंडित. यानें अलंकारशास्त्रावर रसगंगाधर नांवाचा ग्रंथ लिहिला.

निबंध २ : इतिहास

सारांश –

इतिहास या शब्दाचा अर्थ "असें घडून आलें." म्हणजे मागें घडलेला वृत्तान्त. या शब्दाचा मूळ अर्थ पुराणांतील उपकथा असा होता. हल्लीं इतिहासाचा बखर असा अर्थ केला जातो. आपल्या देशांत इतिहास लिहून ठेवला गेला नाहीं ही एक मोठीच उणीव भासते. यास कारण आपल्या लोकांच्या मनाचा कल निवृत्तिमार्गाकडे बराच आहे हें होय. आपला ओढा प्रवृत्तिमार्गाकडे कधींच नव्हता. नरस्तुति गात बसण्याचा आपणांस मोठाच कंटाळा. पूर्वीं घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याचा नाद आपणांस

अगदींच नव्हता असें नाहीं. ' राजतरंगिणी ' ह्या ग्रंथांत काश्मीरचा जुना इतिहास दिलेला आहे. अकवर बादशहानें तो देश काबीज करण्यापर्यंतचा इतिहास यांत आढळतो. काशिराज नामक पंडितानें लिहिलेल्या पानपतच्या लढाईचा मजकूर अनेकांच्या वाचनांत आहेच. हा ग्रंथ मूळ फारशींत आहे. पण असे फुटकळ ग्रंथ सोडले तर अलीकडील इतिहासाप्रमाणें पूर्वी इतिहास लिहिण्याची पद्धति नव्हती हें खरें.

इंग्रज ग्रंथकारांनीं मात्र आमच्या देशाचे इतिहास लिहिण्यास प्रथम सुरवात केली. ग्रीक व रोमन तसेच इजिप्त व चीन देशांच्या लोकांनीं लिहिलेल्या ग्रंथांवरूनहि प्राचीन हिंदुस्थानविषयीं बरीच माहिती मिळते. शिवाय जयस्तंभ, ताम्रपत्रें, लेणीं हींहि पूर्वीच्या काळाचें ज्ञान होण्याचीं साधनें आहेत. ऐतिहासिक नाटकांवरूनहि कांहीं इतिहास उपलब्ध होतो. जगांतील ज्ञानसरितेचा उगम ग्रीस किंवा हिंदुस्थान या देशांतच दृष्टीस पडतो. हिरॉडट्स हा पहिला ग्रीक इतिहासकार. हिरॉडट्सच्या मागोमाग थ्युसिडिडीस हा इतिहासकार झाला. सॉक्रेटिसचा शिष्य जिनोफेन हा तिसरा इतिहासकार. रोमन लोकांनीं इतिहास लिहिण्याचा प्रघात ग्रीसवरूनच उचलला. इतिहासाचा मुख्य उपयोग जिज्ञासातृप्ति हा होय. आमच्या लोकांत इतिहासावरची अप्रीति पुष्कळ वेळां दृष्टीस पडते. इतिहासास नाक मुरडणारे एक सुखवस्तु लोक असतात व दुसरा वर्ग दुराग्रही किंवा स्थूल-बुद्धि लोकांचा. पण हे लोक जरी विद्वान् असले तरी त्यांचीं मतें असमंजस-पणाचीं आहेत. मनुष्याच्या जिज्ञासेनेंच आधुनिक शास्त्रीय संशोधन झालें आहे. इतिहासाचा दुसरा उपयोग म्हणजे नीतिबोध. चांगला मार्ग कोणता, वाईट मार्ग कोणता हें सुज्ञ मनुष्यास इतिहासवाचनानें समजतें. दृढनिश्चयी मनुष्य निवडलेल्या पुरुषांच्या चरित्रावर नजर ठेवून आपलें आयुष्य कंठीत असतो. म्हणून इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय.

इतिहासाच्या वाचनानें मनास उन्नति व प्रसन्नत्व येतें. चित्त शांत व स्थिर राहतें आणि थोर होतें. इतिहास म्हणजे या जगांत जे महापुरुष होऊन गेले त्यांचीं चरित्रें होय. ह्या महापुरुषाचीं चरित्रें वगळलीं तर इतिहासाचें इतिहासत्वच नष्ट होईल. मनुष्य हा परिस्थितीचा परिपाक होय असें ' लॉक ' नें मत प्रस्थापित केलें. मनुष्याचें मन कोऱ्या पाटीप्रमाणें असतें. स्थितिविशेषानुरूप त्याचा कल चांगल्याकडे किंवा वाईटाकडे वळतो.

जगांत जे मोठमोठे लोक होऊन गेले त्यांस चांगली संगत नसती तर ते कधींच मोठे झाले नसते. म्हणून संगतिविशेषाचें फळ अचिन्त्य होय. देशाची स्थिति अगदीं बदलून गेली तरी मागील इतिहास वाचून त्यापासून उत्साह व प्रेरणा मिळते. म्हणून इतिहासवाचनानें शहाणपणाच्या अनेक गोष्टी मनावर ठसतात व त्याचा फायदा होतो.

इतिहासापासून मनाचें रंजन होतें. घडलेल्या वृत्तान्ताचें मनन केल्यानें आल्हादहि होतो. इतिहासाची भाषासरणी, यथास्थित ग्रंथरचना, कथानकाची जुळणी, गहन विचार, तऱ्हेतऱ्हेची माहिती देण्याची खुबी, ह्यामुळें सर्वप्रकारच्या वाचकांस इतिहासाचें वाचन लाभदायी होतें. कादंबऱ्यांप्रमाणें त्यांत चमत्कृति वाटते व तत्त्वजिज्ञासू वाचकास पोक्तपणाचे व खोल विचार प्राप्त होतात. चमत्कारिक व मौजेच्या गोष्टींचाहि संग्रह करतां येतो, म्हणून इतिहास मनोवेधक होतो. मनोरंजनाचा दुसरा प्रकार उपलब्ध नसला म्हणजे मन नाट्य-कादंबऱ्यांकडे वळतें व कादंबऱ्यांचा नाद लागला असतां तो मनास अपाय करतो. कादंबऱ्यांच्या वाचनानें मनाचें दौर्बल्य वाढतें व शास्त्रीय ग्रंथ वाचनाचा त्यास त्रास वाटतो. कादंबरी-वाचक निःसत्त्व होऊन कोणतेंहि श्रमाचें काम करण्यास लायक ठरत नाहीं. इतिहासवाचनानें हे सर्व तोटे थांबतात.

इतिहासाचा पांचवा उपयोग राजकारणी पुरुषास किंवा मुत्सद्द्यास होतो. राज्यास हितकर गोष्टी कोणत्या, अपायकारक कोणत्या, राज्यावर अरिष्टें आलीं असतां त्यांचें निवारण कसें करावें, तंटेबखेडे कसे थांबवावे, प्रजा सुखी कशी ठेवावी, कायदे कशा प्रकारचे असावेत इ. ज्ञान मुत्सद्द्यास इतिहासानें होतें. इतिहासाचा शेवटचा उपयोग म्हणजे मनाचें पोषण. इतिहासवाचनानें आणि मननानें मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भ होतात. स्मरणशक्ति वाढते. कल्पनाशक्तीचा विकास होतो. मानवी बुद्धीचे व प्रयत्नांचे अद्भुत प्रभाव दृष्टीस पडतात. इतिहासानें विचारशक्ति वाढीस लागते. निरनिराळ्या पात्राचे गुणदोष, स्वभाव, कृति समजतात. निरनिराळ्या देशांतील लोकस्थिति, राज्यव्यवस्था, रीतिरिवाज इत्यादि-कांचेंहि ज्ञान होतें. बुद्धीची पोच वाढते. मूर्ख समजुती व दुराग्रह नाहींसे होतात. कोत्या समजुती नाहींशा होतात. इतरांशीं सलोख्यानें वागण्याचा बोध मिळतो. मुत्सद्द्याइतका सामान्य मनुष्यासहि इतिहासाचा उपयोग आहे. परमेश्वराचें वैभव मनास पटतें, जगाचा क्रम दिवसेंदिवस सज्ञान व सुखी होण्याचा आहे असें इतिहासानें समजतें.

अलीकडे ७५ वर्षांत आमच्या देशाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली आहे. मिशनऱ्यांच्या प्रचारामुळें आम्हांसारखे मूर्ख, वेडगळ, भित्रे, लबाड, दुराचारी असे आम्हीच हे जे गैरसमज आहेत त्यांचें जर खंडन केलें तर आपली योग्यता प्रकट होईल. सत्याचा, न्यायाचा, विद्वत्तेचा बाणा बाळगणाऱ्या मोठमोठ्या ग्रंथकारांनींहि आमच्या देशाविषयीं झोटिंग बादशाहीचा मजकूर लिहावा हाहि एक चमत्कारच आहे. इंग्रज इतिहासकारांच्या मनांत हिंदुस्थानाविषयीं बळकट अढी होती, म्हणून त्यांनीं आमच्याविषयीं चांगला मजकूर तेवढा गाळला आहे. पण या इंग्रज ग्रंथकारांपेक्षांहि वेडगळ समजुती जर आपणच आपणाविषयीं बाळगूं लागलों तर ती मोठी आश्चर्याचीच गोष्ट होय. पण स्वत:विषयींच्या दुर्मतांचें हे महाजाल चोहोंकडे पसरलें आहे. आपले दोष आपणांस कळतील तितके चांगले व जो कोणी दोष दाखवील तो दावेदार असला तरी त्याचे आपण मन:पूर्वक आभारच मानले पाहिजेत. पण जो गुणासहि दोषांचें रूप देईल त्याचे दांतच पाडणें उचित आहे, म्हणून आमच्या देशाच्या इतिहासाची आमची आम्हांसच गोडी लागली पाहिजे. नुसतें 'मराठ्यांची बखर' हें नांव ग्रँड डफ्नें आपल्या इतिहासास ठेवल्यानंतर त्याचें हजारो रुपयांचें नुकसान झालें. इंग्रजांनीं लिहिलेले इतिहास अपुरे आहेत. ह्या इतिहासांत आमच्या विद्या, कला आणि स्थिति वगैरेविषयीं अक्षर असत नाहीं. मराठींत वाचण्याजोगा इतिहास मुळींच नाहीं. आमच्या राजेरजवाड्यांनीं इतिहासलेखनास मदत करून पराक्रमी पूर्वजांची सेवा करावी. यानें इंग्रजांचा रोष होईल असें समजूं नये. कारण इंग्रज लोक तसे उदार आहेत. माहिती क्षुल्लक असली तरी तिचा संग्रह करावा. जुने लेख जपून ठेवावेत. इंग्रजांच्या इतिहासांत आपणांस अनुकूल असा पुष्कळ मजकूर सांपडतो. हिंदूंचे पक्षपाती कांहीं इंग्रज आढळतात. कप्टन मेडोज टेलर यांनीं हिंदुस्थानचा एक इतिहास लिहून प्रसिद्ध केला आहे. यांत सर्व भागांचें यथास्थित विवरण केलें आहे. मारिस, मेकाले, मिल्ल यांपेक्षां निराळीं मतें त्यांत मांडलेलीं आहेत. गतकालाविषयीं खरी माहिती मिळण्याचा हा तिसरा मार्ग आहे. खरा इतिहास लिहिल्यानें सत्यरूप सूर्याचा व ज्ञानाचा खरा उदय व्हावा अशीच आजची स्थिति आहे.

टीपा

राजतरंगिणी— काश्मीर देशांतील राजांचें वर्णन करणारा ग्रंथ. अकबराच्या कालापर्यंत या ग्रंथांत माहिती आलेली आहे. कर्ता कल्हण. चौदाव्या शतकापर्यंत तेथें हिंदु राज्य होतें. १५८६ मध्यें अकबरानें तो देश जिंकून घेतला.

काशिराज पंडित— हा महाराष्ट्रीय पंडित मोंगलांचे दरबारीं होता. पानिपतच्या युद्धांत तो स्वत: उपस्थित होता. याची एक बखरहि प्रसिद्ध आहे.

मॅक्स् मुल्लर— हा एक भाषाशास्त्रज्ञ होता. संस्कृत ग्रंथांचा त्याचा अभ्यास सखोल होता. त्यानें अनेक ग्रंथांचीं भाषांतरें केलीं आहेत. स्वत:ला मोक्षमुल्लर म्हणवून घेण्यांत त्याला धन्यता वाटे. तो शास्त्रीमंडळीप्रमाणें शालजोडी पांघरीत असे.

डॉ. हौघ्— हाहि एक जर्मन पंडित होता. संस्कृतचा प्राध्यापक म्हणून त्यानें हिंदुस्थानांत काम केलें होतें.

टॉलेमी— हा प्रख्यात गणिती आणि भूगोलशास्त्रज्ञ होता. यानें खगोल शास्त्रावर अनेक नवीन शोध प्रसिद्ध केले.

मुद्राराक्षस— विशाखदत्तानें रचलेलें नाटक. अमात्य राक्षसाला वश करून घेण्यासाठीं आर्य चाणक्यानें कसे प्रयत्न केले हें ह्या नाटकाचें संविधानक आहे.

मृच्छकटिक— चारुदत्त व वसंतसेना यांच्यावर आधारलेलें हें नाटक शूद्रक कवीनें रचलेलें आहे.

हिरॉडट्स्— हा पहिला ग्रीक इतिहासकार. याच्या ग्रंथाचे नऊ भाग असून त्या वेळच्या समाजाची माहिती त्यांत मिळते.

थ्युसिडिडीस्— हाहि ग्रीक इतिहासकार. हिरॉडट्स्च्या मागून इतिहासकार म्हणून प्रसिद्धि पावला.

जिनोफन्— हा सॉक्रेटिसाचा शिष्य. ग्रीक इतिहासकार आणि तत्त्वज्ञ.

लिव्हि— हा एक रोमन इतिहासकार होता.

सालस्ट्,सीझर, प्लूटार्क, टासिटस्— हे रोमन इतिहासकार होते. प्लूटार्कनें थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिलेलीं आहेत. प्लूटार्क आणि टासिटस् इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत होऊन गेले.

जॉन्सन्— इंग्लिश कोशकार. याचें शास्त्रीबुवांनीं लिहिलेलें समग्र चरित्र वाचण्याची विद्यार्थ्यांस सूचना आहे.

लॉक— हा एक इंग्रज तत्त्वज्ञ सतराव्या शतकांत होऊन गेला.

हॉनिबॉल— हा एक प्रख्यात कार्थेजियन सेनापति होता. ह्यानें रोमवर स्वारी केली.

सीपियो— ह्यानें सीझरला विरोध केला होता.

गोकलखा— सरदार बापू गोखले हा अष्टयाच्या लढाईत कामास आला.

पुनवडी— पुण्याचें जुनें नांव.

थर्मापिली— स्पार्टन लोकांनीं ह्या खिंडींत इराणी राजाच्या अवाढव्य सेनेचा धुव्वा उडविला.

लिओनीडस्— स्पार्टाचा राजा.

ह्यूम, गिबन, मेकॉले— हे सर्व इंग्रज इतिहासकार आहेत. ह्यांचे इतिहास लोकादरास पात्र झाले आहेत.

डॉन क्विक्झोट— एका स्पनिश ग्रंथकारानें लिहिलेली विनोदी कादंबरी.

सर वॉल्टर स्कॉट— ऐतिहासिक कादंबऱ्यांचा जनक.

ड्रायडन्— एक इंग्रज कवि.

ग्रीक व रोमन विद्येचें पुनरुज्जीवन— यालाच इंग्रजींत 'रेनेसॉन्सचा पीरियड' असें म्हणतात.

पुरूरवा व उर्वशी— कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीय' ह्या नाटकांतील नायक व नायिका.

कूपमंडूक— आडालाच मोठें जग समजणारा बेडूक.

सोलन— अथेन्समधील सुधारक.

लैकर्गस्— ह्यानें स्पार्टाची घटना तयार केली.

पक्षवायु— अर्धांगवायु.

शेणाचे दिवे लावणें— दिवाळें वाजविणें.

बर्क— ह्यानें फ्रान्सच्या राज्यक्रांतीबद्दल लेख लिहिले. पार्लमेंटमधील याचें वक्तृत्व अप्रतिम होतें.

जेम्स मिल्ल— इंग्लिश लेखक व इतिहासकार

झर्सीज— पारसीकांचा राजा.

राम्युलस— रोमचा बादशहा. रोम शहराचें नांव याच पुरुषावरून दिलें गेलें.

गाल, गॉथ, हून्स, आरब, तुर्क— या युरोपांतील रानटी टोळ्या लूटमार करण्याबद्दल प्रसिद्धीस आल्या होत्या.

मालकम सर जॉन— या इंग्रज अधिकाऱ्यानें मध्य हिंदुस्थानचा इतिहास लिहिला.

दक्षिणा प्रैज कमिटी— पेशवे रमण्यांतून ब्राह्मणांना दक्षिणा वाटीत. तींतून एल्फिन्स्टननें ही कमिटी स्थापन केली. तिनें उत्तम ग्रंथांस बक्षिसें देण्याची पद्धति सुरू केली.

निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते— मुळींच झाडें नसलेल्या देशांत एरंडाच्या लहान झाडासहि वृक्ष संबोधतात. त्याप्रमाणें अज्ञानी लोकांत थोडा ज्ञानी चमकतो.

श्लेजेल, हंबोल्ट— प्रसिद्ध जर्मन पंडित आणि भाषाशास्त्रज्ञ.

गेटी— सुप्रसिद्ध जर्मन कवि. फॉस्टचा कर्ता.

फिर्दोसी— फारसी पंडित. 'शाहनामा'चा कर्ता.

शेख सादी— गुलिस्ताँ बोस्ताँ या पर्शियन काव्यांचा कर्ता.

साडेतीन शहाणे— सखारामबापू बोकील, विठ्ठल सुंदर आणि देवजीपंत चोरघडे असे तीन वीर व मुत्सद्दी, सबंध शहाणे, व नाना फडणवीस निव्वळ मुत्सद्दी म्हणून अर्धा शहाणा असे साडेतीन शहाणे पेशवाईंत होऊन गेले.

रे. मिचेल— The Way of Salvation या ग्रंथाचे कर्ते.

फॉसेट आणि ब्राइट— पार्लमेंटमध्यें भाषणें करीत. दोघेहि राजकारणी पुरुष. एकोणिसाव्या शतकांत नीग्रो लोकांच्या दास्यमुक्ततेचा प्रश्न चर्चिला गेला.

अबिसीनियाची मोहीम— इंग्रजांनीं केलेली अबिसीनियावरील स्वारी.

अशांटी— आफ्रिकेंतील एक जात.

पाणिनि— अष्टाध्यायीचा कर्ता, संस्कृत व्याकरणकार.

वाल्मीकि— रामायणाचा कर्ता.

कालिदास— शाकुंतल, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय, रघुवंश मेघदूत इ. प्रसिद्ध ग्रंथांचा कर्ता.

आर्यभट्ट— ज्योतिषशास्त्रज्ञ. केरळप्रांतीय.

भास्कराचार्य— गणिती, खगोलशास्त्रज्ञ. 'लीलावती'चा कर्ता. ज्योतिष-शास्त्रावर याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

आमच्या देशाची स्थिति

सारांश–

आपल्या देशाची सध्यांची स्थिति आजपर्यंत झालेल्या अवस्थांतरांचें फळ होय. आजची आमच्या देशाची स्थिति फार चमत्कारिक आहे. तिला पूर्व इतिहासांत तोड नाहीं. त्याजवरोबर आमच्या देशाची भावी स्थिति कशी असेल याविषयीं जे अनेक तर्क आहेत ते कितपत खरे होतील हें परमेश्वरास ठाऊक! आमच्या मागील काळाविषयीं साद्यंत इतिहास मिळत नाहीं. वर्तमानकाळाविषयीं मात्र निश्चित विवेचन करतां येईल. या बाबतींत आमचें एक निश्चित ठाम मत नाहीं; आणि बरोबर कोणतें व करावें काय हेंहि आम्ही सांगत नाहीं. निषेध करील त्यानें विधीचाहि मार्ग सांगणें अवश्य होय. आमचें प्रतिपादन कधीं या पक्षाचें तर कधीं त्या पक्षाचें असतें याचें कारण सत्याचें चांचल्य होय. सत्य कोणा एका पक्षास चिकटून असत नाहीं. जो कोणी नांवें ठेवील त्यानें सुधारणा सांगितलीच पाहिजे असा नियम नाहीं. अमुक गोष्ट गैर आहे असें सांगण्याचा सर्वांस अधिकार आहे. दोष दाखविल्यानें लोकांचा भ्रम दवडून त्यांस सावध केल्याचें श्रेय मिळतें. या विषयावर विचार मांडण्यास पुष्कळ वाचन, पुष्कळ विचार, पुष्कळ अनुभव व मोठी पोक्त बुद्धिहि पाहिजे. कोणत्याहि राष्ट्राच्या स्थितीचें वास्तविक स्वरूप समजावून घेण्यास अंग मोडून जातीनें मेहनत करावयास पाहिजे. प्रस्तुत विषयाच्या विवेचनासाठीं अवश्य असणारीं साधनें अनुकूल नाहींत. या विषयाचे मुख्य तीन भाग आहेत: (१) आमच्या राज्यकर्त्यांची स्थिति. (२) एतद्देशीय राजेरजवाड्यांची स्थिति व (३) सामान्य लोकांची स्थिति. पहिल्या विभागावर मत प्रदर्शित करणें अवघड काम आहे. आमच्या राज्यकर्त्यांनीं छापखान्यावरहि कदर चालूं केली आहे. विलायतेंत ग्लॅडस्टन-साहेबांचें मंत्रिमंडळ आहे. तरी आपणांस स्वच्छंद भराऱ्या मारतां येणार नाहींत. पण आम्हीं दाखल केलेल्या गोष्टी इतिहासप्रसिद्ध व लोकप्रसिद्ध आहेत. राज्यकर्त्यांस अप्रिय होईल असें लिहिणें हें अनुचित असें काम आहे व ज्यांनीं ज्ञान दिलें त्यांचे दोष काढूं पाहणें अधमपणा आहे, याकडे कानाडोळा करूनच लिहावें लागणार आहे. सोळाव्या शतकापर्यंत इंग्रजांशीं आमचा कांहींएक संबंध नव्हता. सांप्रतचे राज्यकर्ते व्यापारासाठीं आले एतद्देशीय राजेरजवाड्यांस थोडीफार मदत करून त्यांनीं हक्क मिळविला

इंग्रजांचा मागें पाय म्हणून आला नाहीं. त्यांची सद्दी, कारस्थान आणि कवायत विशेष आहे. म्हणून हें राज्य त्यांच्या पदरीं पडलें. इंग्रज वैश्याचे क्षत्रिय झाले. राजेरजवाडयांस गुंडाळून सार्वभौम बनले. कोठें इंग्लंड आणि कोठें हिंदुस्थान! पण ईश्वरानें सांगड घालून दिली आहे. हे लोक हिंदुस्थानांतील लोकांना अर्धवट रानटी समजतात व त्यांना सुधारण्याचें काम ईश्वरानें आपणांकडे दिलें आहे असें समजतात. या देशावर आधिपत्य करण्यांत आमचें कल्याण करण्याचा राज्यकर्त्यांचा हेतु आहे. म्हणून त्यांचा हा दावा कितपत खरा आहे हें पाहूं. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी इंग्रजांची स्तुति करण्याचा शिरस्ताच पडून गेला होता. पण अलीकडे लोकांची पूज्य-बुद्धि कमी झालेली आहे. इंग्रजी राज्यापासून कोणते फायदे होण्यासारखे आहेत तें पाहूं. हल्लींच्या स्थितींत आम्ही युरोपियनांकडून पुष्कळच नवीन माहिती घेण्यासारखी आहे. इंग्लंडचा व हिंदुस्थानचा आलेला संबंध फायदेशीर आहे. प्राचीन ग्रीक, रोमन, हिंदु लोकांपासून पाश्चात्यांनीं ज्ञान संपादन केलें व आपल्या उद्योगानें पुष्कळच वाढविलें. नवीन शोध लावले आहेत. हें भांडवल आयतेंच आम्हांला मिळणार आहे. हें अपूर्व ज्ञानभांडार खुलें झालें आहे हा एक मोठा फायदा होय. छापखाना, आगबोटी, आगगाडया, तारायंत्रें, गिरण्या, इत्यादि व्यावहारिक कलांचें ज्ञानहि आम्हांस इंग्रजांपासून होणार आहे. पुराणांत वर्णन केलेल्या अचाट गोष्टी आज प्रत्यक्ष घडत आहेत. आमच्या राज्यकर्त्यांनीं सर्व महाभूतें वठणीस आणून त्यांपासून ते चोपून कामें करून घेत आहेत. इंग्रजी राज्यापासून तिसरा लाभ मानसिक उन्नति. ग्रीक व रोमन विद्येचें पुनरुत्थान झाल्या-पासूनच युरोपची सुधारणा झाली. युरोपांतील लोकांनी राजा हा ईश्वरी अंश आहे या असमंजस कल्पनेचा त्याग करून आपले हक्क शाबीत केले. तिकडे प्रजासत्ताक राज्य चालूं आहे. अमेरिकाहि स्वतंत्र झाली. सज्ञान दशेचें फळ देशोन्नति होय. इंग्रजी विद्येच्या प्रसाराबरोबर सुधारणा, स्वातंत्र्य व सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार. एक इंग्रजी विद्येचें वज्र आमच्या हाती असलें कीं आम्ही कोणत्याहि शाहीस भीक घालणार नाहीं. इंग्रजी राज्यानें या देशास स्वाथ्य लाभलें. आमचा व्यापार जगभर होण्याच्या सोयी झाल्या आहेत. मानसिक स्वातंत्र्य हाहि एक मोठा लाभच होय. रानटी शिक्षांचे प्रकार इंग्रजी राज्यांत अश्रुत आहेत. मिशनऱ्यांमार्फत परस्पर काम कर-ण्याचा इंग्रज सरकारचा अंतःस्थ हेतु आहे. हल्लींच्या राज्यांत आम्हांस जितकें स्वातंत्र्य आहे तेवढें स्वदेशीय राजांच्या उत्कृष्ट कारकीर्दीतहि नव्हतें.

आतां इंग्रजी राज्यापासून होणारें नुकसान पाहूं. स्वातंत्र्यनाश हें आमचें पहिलें नुकसान. स्वातंत्र्याची स्थिति पारतंत्र्यापेक्षां सुखावह असते. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं सलोख्याचा व्यवहार ठेवावा. येशूच्या दयामय धर्माचा गजर चालूं असतां झोटिंग बादशाही चालूं आहे. स्वातंत्र्यनाशानें जगांतून आमचें अस्तित्वच नाहींसें झालें आहे. एतद्देशीय राजे नुसते बुद्धि-बळांतीलच होत. आमची अलीकडील विद्वत्ता पाश्चात्य विद्येचा रजःकण होय. इंग्रज लोक जर देशांतून निघून गेले तर कुणी रेल्वे इंजिन करणारा मिळेल किंवा तारायंत्र जुळविणारा मिळेल असा आमच्या बडया विद्वानांत कोणी नाहीं. आम्ही आयतोबा झालों आहों. आमच्यांत काडीचाहि वकूब नाहीं. देशांतील जमीन सरकारची, जंगलांतील झाडें सरकारचीं, सरकारास हवे तसे कर बसविण्याची मुभा आहे. आम्हांस वस्तुतः कांहींच हक्क नाहींत. मेहेरबानीनें आम्हांस सरकार देईल त्या हक्कांवर आम्हीं संतोष मानला पाहिजे. आम्ही स्वतःचा कारभार करण्यास नालायक आहोंत. इंग्रज लोक मुळींच नसते तर आम्ही रसातळास पोचलों असतों असें मुळींच नाहीं. आम्हांस पोटभर अन्न नाहीं. रोगराई, अशक्तता, दैन्य इत्यादिकांचा प्रसार आहे. आमचें कल्याण होण्यास इंग्रजांशिवाय इतर कोणाचा उपयोग झाला नसता असेंहि नाहीं. आम्हीं इंग्रजांपूर्वी हें राज्य चालविलें, कायदे-कानू केले, कला उदयास आणल्या, ऐहिक व आध्यात्मिक विचार केले. पण आम्ही कुचकामाचे आहों इ. मूर्ख कल्पनांचा परिहार भूतकाळ करूं शकेल. आम्हांस सज्ञान करण्याचा इंग्लिश लोक आव आणतात, पण हा भ्रम आहे. आम्ही स्वातंत्र्याला लायक नाहीं व पारतंत्र्य आम्हांस हितावह आहे ह्या दोन्ही गोष्टी खोट्या आहेत. पण हीं मतें आमच्यांत खेळलीं आहेत ही शोचनीय स्थिति होय. पारतंत्र्यामुळें आम्ही व्यापारांत लक्ष घालूं शकत नाहीं. इंग्रज लोक विद्यादेवीच्या निष्काम उपासनेचा तत्त्वोपदेश नेहमीं करतात. पण तेच लोक आमच्या पैशाची उधळपट्टी करीत आहेत. पारतंत्र्यानें मानसिक उन्नति नष्ट होऊन जाते. राज्यकर्त्यांची आमच्या देशाविषयीं अनेक कर्तव्यें आहेत. आमचें सरकार म्हणजे नक्की कोण याचा मुळींच पत्ता लागत नाहीं. एकमुखी राज्यसत्तेंत राजा ज्या तऱ्हेचा मनुष्य असेल त्याप्रमाणें प्रजेचें हित किंवा अहित होतें. आमचें सरकार आपणांस ख्रिस्ती म्हणवितें, पण धर्माप्रमाणें एक आणाहि त्यांचें आचरण होत नाहीं. नीतीविषयीं

आमच्या राज्यकर्त्यांचा मोठा कटाक्ष आहे. इंग्रजांचे पाय येथें लागण्यापूर्वी लक्ष्मी, सरस्वती, अन्नपूर्णा आणि वीरश्री यांनीं आमचें राष्ट्र युक्त होतें.

आमच्या राजेरजवाड्यांची स्थिति :–कोणत्याहि देशांत तीन वर्ग असतात. (१)राजा (२) उमराव (३) रयत. आमच्या राजेरजवाड्यांची स्थिति सरकारनें पार नेभळट करून टाकली आहे. सामान्य रयतेची स्थिति त्या मानानें फार बरी. सरकारनें त्यांच्याशीं करीत असलेलें वर्तन बदललें पाहिजे. त्यांच्याशीं न्यायानें वागलें पाहिजे; कारण या संस्थानांनींच त्यांना प्रथम आश्रय दिला! संस्थानिकांनीं प्रजेची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करावा. दुर्व्यसनांत राज्याची खरावी करूं नये. देशपर्यटन करून शहाणपणाचे मार्ग आत्मसात् करावेत. आपल्या धनसमृद्धीचा सदुपयोग करावा. सामान्य लोकांचीं स्थिति समजण्यासाठीं इंग्लंड व हिंदुस्थान यांची तुलना करूं पाहणें योग्य. सुखी राष्ट्राचें लक्षण म्हणजे सर्वांचा उदरनिर्वाह चालणें. या बाबतींत इंग्रजांत व हिंदुस्थानांतील लोकांत केवढा फरक आहे! अन्नमय प्राण व प्राणमय पराक्रम. देशांतील शांतता इंग्रजांस हितावह व आम्हांस नाशप्रद आहे. आमच्या लोकांची शरीरसंपत्ति पार लयास गेली आहे. हा जो पोंचटपणा आणि दुबळेपणा आम्हांमध्यें खिळून राहिला आहे त्याचें कारण दीर्घकालीन स्वस्थता व सरकारी कदर हेंच आहे. "धन्याला धत्तुरा आणि चाकराला मलिदा" अशीच आम्हीं आपली स्थिति करून घेतली आहे. आतां आमचें असें कांहीं उरलें नाहीं. सरकारचें तर आळशीपणाला वक्षीसच आहे. स्वातंत्र्य, पराक्रम आणि अभिमान या बाबतींत आमची इंग्रजांशीं तुलनाच होणार नाहीं. तिकडे खरें स्वातंत्र्य आहे. इकडे मृगजलाचा आभास आहे. विद्या व कलांची तिकडे वाढ होत आहे, इकडे शून्याकार आहे. पूर्वी चालत आलेल्या कला आणि विद्याहि अस्तंगत होत आहेत. पूर्वीं दोन दोन हजार वर्षें चालत आलेलीं साम्राज्यें होतीं, पण त्या साम्राज्यांतील लोकांची उन्नतिच झाली. आजचीं युरोपांतील प्रबळ राष्ट्रें हीं त्यांचींच अपत्यें आहेत. इंग्रजांच्या मानानें मोंगलाई बरी. गोऱ्यांची बादशाही जेथें फिरली तेथें खराटा फिरत आहे. आमच्या देशावर कोण राज्य करीत आहे याची आम्हांस क्षिति नाहीं. आम्ही आपसांतील भांडणांतच गर्क आहोंत. आम्ही केवळ प्रेतवत् होऊन राहिलों आहोंत. आमचें धड मूळचें राहिलें नाहीं. व नवें पाणीहि आम्हांस लागलेलें नाहीं, ही स्थिति

सुधारण्यासाठीं अनेकांनीं अनेक उपाय सुचविले आहेत. आम्हीं मूर्तिपूजा सोडून दिली पाहिजे, जातिभेदाला मूठमाती दिली पाहिजे, गांधर्व विवाह केले पाहिजेत, विधवाविवाह करावा, मांसाहार केला पाहिजे, दारू प्याली पाहिजे या सर्व असमंजसतेच्या निदर्शक कोट्या आहेत. मुख्य आक्षेप आमचा धर्म वाईट आहे. प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधक समाज वगैरे प्रयत्न याच दृष्टीनें झालेले आहेत. मिशनऱ्यांचा प्रचार व धर्मविषयक अज्ञान हींच खरीं कारणें आहेत. आमच्या पुरातन धर्मावर प्रकट झालेले अभिप्राय अज्ञान व दुराग्रहनिदर्शक आहेत. प्राचीन काळीं आमची भरभराट झाली त्या वेळीं हाच धर्म होता. म्हणजे धर्म भरभराटीच्या आड येत नाहीं. गोवेकरांनीं धर्म बदलला तरी त्यांची भरभराट झालेली नाहीं. बालविवाहासंबंधींहि हाकाटी अशीच आहे. सुधारलेला म्हणून गाजलेला ख्रिस्ती धर्म कितीतरी अपसिद्धान्तांनीं भरलेला आहे. आमच्या देशास कांहींएक झालें नाहीं. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांहीं एक विकार नाहीं. आमच्या राष्ट्राची विपत्ति आमच्या अनिवार्य दोषांमुळें आलेली नसून ती यदृच्छेनें आलेली आहे. इंग्रज आम्हांहून बलिष्ठ व आमचें दैव फिरल्यामुळें आमची हालखी झाली. आमच्या दैन्याचें प्रमुख कारण परकी अंमल हेंच आहे. इंग्रज येण्यापूर्वी हा देश संपन्न होता. इंग्रज गेल्यावर आमची स्थिति सुधारेल यांत शंका नको. इंग्रजांना लढाई करून हाकून लावणें आजच्या काळीं शक्य नाहीं. शिवाय आमच्या मंडळींत परस्पर भांडणें आहेत. म्हणून राज्यकर्त्यांशीं सलोख्यानें वागूनच आम्हांस आमची उन्नति करून घेतली पाहिजे. आयरिश लोकांनीं इतके प्रयत्न करूनहि त्यांना स्वातंत्र्य मिळू शकलें नाहीं. म्हणून ह्या थोरल्या उपायासंबंधीं आम्ही कोणी गोष्टहि काढूं नये. मनुष्याची किंवा राष्ट्राची सुधारणा आत्मस्थितीच्या पूर्ण ज्ञानावरच अवलंबून आहे. स्वतःविषयींचें ज्ञान याचा अर्थ साऱ्या जगाची स्थिति हल्लीं काय आहे, पृथ्वींतील देशांचे व्यापार कसे सुरू आहेत, आमच्या राष्ट्राची पूर्वी स्थिति कशी होती व हल्लीं कशी आहे, या स्थित्यंतराची उपपत्ति काय आहे, आणि भरभराट होण्यास कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत याविषयीं यथार्थ समज होणें फार जरुरीचें आहे. छापखाने, आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रें, वगैरे अर्वाचीन कला म्हणजे इंग्रजांबरोबर लढण्यास दिव्य अस्त्रेंच होत. आमचा देश कुंभकर्णासारखा निद्रेंत घोरत

पडला आहे त्यास जागें केलें पाहिजे. त्यास हीं साधनें उपयोगी पडतील. ज्ञानाच्या प्रसाराचा महिमा आज सर्व जगभर दिसून येत आहे. आपलें मन सुविचारसंपन्न व पोक्त बनलें पाहिजे. आमचे शिकलेले लोक आपलें हें कर्तव्य पार पाडीत नाहींत. ज्यांच्या शिरावर वास्तविक साऱ्या देशसुधारणेचा भार, त्यांची ही स्थिति. देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय. रसना व लेखणी हीं त्याचीं दोन साधनें होत. शाळा, व्याख्यानें, वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें व ग्रंथ या साधनांचा उत्कर्ष केला पाहिजे. या बाबतींत सरकारनें आपलें काम बजाविलें आहे. आपणहि आपलें कर्तव्य केलें पाहिजे. आमच्या राष्ट्राचे पालक म्हणून ज्यांस सरकारनें नेमलें आहे त्यांनीं आपले अधिकार उत्कृष्ट बजाविले पाहिजेत.

टीपा --

भौमासुराचा वाडा— उत्खनन आणि संशोधनपर केलेली सौम्य टीका.

शेखमेन्याचा डोला आणि पर्वतीच्या पायऱ्या— ज्यांचा परस्परसंबंध कांहीं नाहीं अशा दोन वाई आणि पुणें ह्या ठिकाणच्या वस्तु.

बादरायण संबंध— कांहीं तरी करून उकरून काढलेला संबंध. आमच्याकडे बोरीच्या लाकडाचें चाक आहे तर तुमच्याकडे बोरीचें झाड आहे, म्हणून तुमचा आमचा संबंध असलाच पाहिजे.

वाटसराची परस्परविरोधी कृति— गरम वस्तु थंड करण्यासाठीं तोंडानें फुंकर घालणारा वाटसरू त्याच फुंकरीनें हातांना ऊब आणतांना पाहून वनदेवतेस अचंबा वाटला.

विधि आणि निषेध— काय करावें तें सांगणारें विधिशास्त्र व काय करूं नये हें सांगणारें निषेधशास्त्र. विधि आणि निषेध सांगितल्याशिवाय कोणतेंहि शास्त्र पुरें झालें नाहीं असें मानतात.

बाँबे गॅझेट— सरकारतर्फे चालविलेलें वर्तमानपत्र.

ज्ञानोदय— ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं ज्ञानसंवर्धनासाठीं चालविलेलें पाक्षिक.

अथेल्लो— शेक्सपीयरचा नायक.

अयागो— खलनायक

सूपशास्त्र— सैंपाकशास्त्र.

बीकन्स्फील्ड— इंग्लंडचा पंतप्रधान.

ग्लॅडस्टन— बीकन्स्फील्डनंतर आलेला इंग्लंडचा पंतप्रधान. १८८० मध्यें याचें मंत्रिमंडळ तयार झालें.

एलिफास— मेजर जेकब या नांवाच्या गृहस्थानें एलिफास या टोपण नांवानें देशी वृत्तपत्रें व कारस्थानी ब्राह्मण या सदराखालीं बॉम्बे गॅझेट (स्था. १७९०) मध्यें एक पत्र लिहून मालेच्या तिसाव्या अंकांत प्रदर्शित केलेल्या मताविरुद्ध राजद्रोह म्हणून गिल्ला केला. निबंधमालेचे संपादक ब्राह्मण, ते ज्या शाळेंत नोकरी करतात त्या शाळेचा मुख्याध्यापक ब्राह्मण, सरकारी वृत्तपत्रांची हालहवाल पोचविणारा अधिकारी ब्राह्मण (कृष्णशास्त्री चिपळूणकर) आणि पुणें शहरहि ब्राह्मणांचेंच आगर. मेजर साहेबांनीं तिसाव्या अंकाचें संपूर्ण भाषांतर करून सरकारला पाठविलें. विष्णुशास्त्र्यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची तर 'एलिफास' (हत्ती) च्या शुंडाप्रहारानें अनुकंपनीय स्थिति झाली.

ऑलबेली— खुशाली.

लिटन— हा हिंदुस्थानचा व्हाईसरॉय होता. (१८८०).

टेंपल सर रिचर्ड— मुंबईचा गव्हर्नर होता.

चॅटफील्ड— हा मुंबईचा शिक्षणाधिकारी होता. याची कृष्णशास्त्र्यांवर फार मर्जी होती. यानेंच विष्णुशास्त्र्यांची बदली रत्नागिरीस केली.

मूर— हा कायदेकौन्सिलचा सभासद होता.

चुलता–रघुनाथराव पेशवे ऊर्फ राघोभरारी, **पुतण्या**–माधवराव पेशवे.

छोकऱ्यांनीं गडबड केली न केली तो बुढ्ढे मंडळीस खाशी थप्पड येते– चॅटफील्ड साहेबांनीं कृष्णशास्त्री चिपळूणकरांस आपल्या मुलास ताकीद देण्याबद्दल सांगितलें होतें. या स्वानुभवावरून विष्णुशास्त्र्यांनीं असें लिहिलें आहे.

जॉर्ज वॉशिंग्टन— अमेरिकेचा पहिला अध्यक्ष आणि सेनापति.

मतलबासिधु— आपल्या मतलबापुरत्या गोष्टी विधिविधानांत असल्याबद्दल डांगोरा पिटणें.

मंगो पार्क— प्रवासी आणि ग्रंथलेखक.

एकी बेकी आणि फुकी— लहान मुलांचे खेळ.

फुलरसाहेब— एक इंग्रज वकील. यानें आपल्या गाडीवानाला रागाच्या सपाट्यांत ठार मारलें. पण त्याला केवळ ३० रुपये दंड झाला.

जॉर्ज नेल्स्--एका शिपायाला मारल्याबद्दल याला फांशी जावें लागलें

घाशीराम--हा पुण्यांत कोतवाल (फौजदार) होता.

डंकन रोड--मुंबईतील वेश्यावस्ती.

गोत्रजहत्या--आपल्या नातेवाईकाला मारणें.

ब्रह्महत्या--ब्राह्मणाला मारणें .

सत्तावीसचे कायदे--इंग्रजी अंमल सुरू झाला त्या वेळीं केलेले कायदे.

शौंडिक--दारूचा व्यापारी.

कल्लोलोपमतुरंग सैन्य--एका पाठोपाठ एक हल्ला करणारे घोडेस्वार.

ऋक्षमहाराज--रशियाची ओळखण्याची खूण अस्वल ही आहे म्हणून ऋक्ष शब्दानें रशियासंबंधाचा बोध होतो.

आयुबखान--यानें अफगाणिस्थानचें राज्य मिळविण्याचा प्रयत्न केला.

कपिलाषष्ठी--साठ वर्षांनीं एकदां येणारा योग.

सर महाराज--वडोद्याचे दिवाण.

वलंदेज--हालंडचे लोक.

विलेखन-- नांगरणें.

अमृतसिद्धियोग-- विशिष्ट वारीं विशिष्ट नक्षत्र येणें.

गायकवाडी खिचडी--वडोद्याचे महाराज गोरगरिबांना खिचडी वाटीत.

मद्रदेश--मद्रास.

झुलू--आफ्रिकेंतील लोकांची एक जात.

ब्रह्मोसमाज-स्थापना १८३०.

प्रार्थना समाज---स्थापना १८६७ मुंबई.

सत्यशोधक समाज--ज्योतिबा फुले यानीं १८७३ मध्यें स्थापला.

आर्यसमाज--स्थापना १८७५.दयानंद सरस्वती हे ह्या समाजाचे प्रवर्तक.

आदि जनक आणि आदि जननी--ॲडॅम आणि ईव्ह.


अप्याय स्वाहा---स्वार्थ साधणें.

पालाण--खोगीर.

पुरंदरचें बंड--लोकहितवादींनीं ब्राह्मण समाजावर ओढलेले कोरडे.

त्रिदोष--वात, पित्त आणि कफ.प्रत्येकाच्या प्रकृतींत ह्यांपैकीं एकाचा जोर असतो.

व्हॉल्टेअर--फ्रेंच राज्यक्रांतीस साहाय्य करणारा फ्रेंच लेखक.



REFBK-0009756